# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**सर्वसाधारण सभा इतिवृत्त**

दिनांक २४/०४/२००२ ते १८/१०/२००२

## रजिष्टर क्र. ०६

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

## सर्वसाधारण सभा

| अ. क्र. | सर्वसाधारण सभेचा दिनांक | विषय क्रमांक व ठराव | प्रश्न क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | २४-०४-२००२ | ५८३/१ ते ६१४/११ | ३६ ते ५८ | |
| २. | १४-०५-२००२ | ६१५/१ ते ६१८/४ | | |
| ३. | १९-०६-२००२ | ६१९/१ ते ६३७/४ | ५९ ते ६९ | |
| ४. | २०-०७-२००२ | ---- | ----- | |
| ५. | १२-०८-२००२ | ६३८/१ ते ६४७/५ | ----- | |
| ६. | १९-०८-२००२ | ६४८/१ ते ६७२/४ | ----- | |
| ७. | ३०-०९-२००२ | ----- | ----- | |
| ८. | ०५-१०-२००२ | ६७३/१ ते ६९६/३ | ८० ते ८८ | |
| ९. | १८-१०-२००२ | ६९७/१ ते ७२९/२४ | ८९ ते ९२ | |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २४-४-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**बुधवार दि. २४-४-२००२ रोजी मा. महापौर श्री. विकास जैन यांचे अध्यक्षते खाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी १२.४० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. अधिकारी यांचेसह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
४) स.स.श्री. तुलसिबागवाले किशोर बाबुलाल
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स.श्री. शे. इलियास किरमानी शे. उमर
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी
११) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१२) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१३) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१४) स.स.श्रीमती धायातिलक लिलावती बाळासाहेब
१५) स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१६) स.स.सौ. शिंदे रुख्मिणी राधाकिसन
१७) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१८) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
१९) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२०) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२१) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२२) स.स.सौ. विजया किशोर रहाटकर
२३) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२४) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२५) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२६) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२७) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२८) स.स.श्री. डॉ. कराड भागवत किसनराव
२९) स.स.श्री. तांदुळवाडीकर आनंद विनायकराव
३०) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३१) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३२) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३३) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खान

३४) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
३५) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
३६) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
३७) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
३८) स.स.श्री. अ. कदिर मौलाना सय्यद
३९) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४०) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
४१) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४२) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४३) स.स.श्री. अंबादास एकनाथ दानवे
४४) स.स.श्रीमती शाहीन जफर महेमुद जफर
४५) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
४६) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
४७) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
४८) स.स.श्री. स. सलिम स. युसुफ
४९) स.स.श्री. तकी हसनखान कासिम हसनखान
५०) स.स.श्री. मिर हिदायत अली मीर बसालत अली
५१) स.स.श्रीमती सुलताना बेगम चॉद खॉ
५२) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५३) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासिन
५४) स.स.श्री. सलिम पटेल समशेर पटेल
५५) स.स.श्री. कैसरखान बद्रोद्दीन खॉन
५६) स.स.श्री. जगदिश कन्हैयालाल सिध्द
५७) स.स.सौ. बबीता सुभाष कागडा
५८) स.स.श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
५९) स.स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज
६०) स.स.सौ. निखत परविन एजाज अली

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
३) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
४) स.स.सौ. सलमा बानो मिर मो अली.

संवाद

श्री. संजय शिरसाठ : गेल्या बजेटच्या बैठकीत एक हरकतीचा मुद्दा मी उपस्थित केला होता की, या मनपाचे स. सदस्य असलेले श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या यांचे १४-१२-२००१ रोजी जात पडताळणी समितीने जात प्रमाण पत्र रद्द केले होते. त्यानुसार १८-१२-२००१ ला प्रशासनाने राज्य निवडणुक आयोग यांना पत्र पाठवुन मार्गदर्शन मागविले की, अशा नगर सेवकाबाबत काय कार्यवाही

करायची गेल्या तीन महिन्यात स. सदस्य, श्री. सुरगोणिवार यांचेवर प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही त्यानंतर दि. २२-३-२००२ रोजी मा. महापौर यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने रद्द केले त्यांना ते त्या समाजाचे नाही असे म्हटले त्यानुसार मा. आयुक्त यांनी महापौरांवर तात्काळ कार्यवाही केली. सकाळी ११.३० वाजता प्रशासनाला कळविण्यात आले ११.३० वाजता महापौरांवर कार्यवाही केली तशा बातम्याही वृत्तपत्रात आल्या त्या उलट सुलट देऊन महापौरांची गाडी घेण्यात आली, महापौराचे निवासस्थान घेण्यात आले ऑफिस कॅबिनला लॉक लागले एखादा सदस्य म्हणुन सभागृहात असेल व शासन जी.आर. नुसार जर जात पडताळणी समितीने प्रमाणपत्र रद्द ठरविल्या नुसार तसे त्या सदस्यास कळवावयास पाहिजे व त्यानुसारच मा. महापौरांना प्रशासनाने तात्काळ कार्यवाही केली त्याबद्दल कुणचेही दुमत नाही परंतु गेल्या तीन महिने एक सदस्य सभागृहात कामकाजात भाग घेतात. मानधन घेतात, मतदान करतात, स्थायी समितीच्या सदस्य पदासाठी झालेल्या निवडणुकीत एक स. सदस्य १ मताने पडले व ते सदस्य सुध्दा न्यायालयात गेलेले आहे त्यांनी दावा दाखल करुन सदर एका सदस्यांनी मतदान केल्यामुळे पडले स्थायी समिती सदस्य पदा पासुन वंचित झाले असा दावा केलेला आहे म्हणुन प्रकरण न्याय प्रविष्ठ झाले म्हणुन या प्रकरण्याला जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित केलेला होता तसेच एक आमचे बाळासाहेब थोरात स. स.श्री सुनिल वडागळे यांचे जात प्रमाण पत्र रद्द झाल्यानंतर त्यांना सुध्दा कळविण्यात आलेले नाही. कोणतीही नोटीस वगैरे देण्यात आलेली नाही. आताच आमचे स.स.श्री. बाळासाहेब थोरात यांचे प्रकरण उच्च न्यायालयाने रद्द केले त्यानुसार त्यांना प्रशासनाने कोणताही पत्र व्यवहार केला नाही परंतु आम्ही सुचना करुन सभागृहात भाग घेऊ नये अशा सुचना केलेल्या आहे जे की, उद्या त्यावर कुणीही आक्षेप घेऊ शकतात. व या सर्व प्रकरणाला जबाबदार कोण म्हणुन प्रश्न उपस्थित झाल्या नुसार मा. आयुक्त अहवाल सादर करणार होते त्या बाबत खुलासा दयावा व अहवाल सादर करावा.

श्री. तकी हसनखान : आताच सांगण्यात आले की, एका सदस्याने मतदान केले म्हणुन दुसऱ्या सदस्यांना स्थायी समिती सदस्य म्हणुन त्या पदातुन वंचित राहावे लागले या बाबतीत मा. आयुक्तांना जबाबदार म्हणुन धरण्यात येत आहे. जेंव्हा मतदान झाले त्यावेळी परिस्थिती म्हणुन मा. आयुक्त जबाबदार नाही जे पिठासन अधिकारी होते ते त्यास जबाबदार आहे त्यांनी किती मतदान आहे याची चौकशी करायला पाहिजे होती. जेवढे प्रशासन जबाबदार तेव्हढेच पिठासन अधिकारी सुध्दा जबाबदार आहेत व आपण स्वत: पिठासन अधिकारी होते सर्वात जास्त जबाबदारी आपली आहे हा मुद्दा ही लक्षात घ्यावा.

मा. महापौर : जे जात प्रमाण पत्र रद्द होते त्या संबंधीताचे पत्र पिठासन अधिकाऱ्याकडे येत नाही.

श्री. शिरसाठ संजय : येथे वादाचा प्रश्न नाही ३ महिने ज्या सदस्यांनी नगर सेवक नसतांना सभागृहात भाग घेतला, मतदान केले, मानधन घेतले त्या संदर्भात प्रशासनाने तसे महापौरांना कळविले होते का?

श्री. काशिनाथ कोकाटे : या विषयावर जास्त चर्चा न करता मागील बैठकीतील चर्चेनुसार जो अहवाल ठेवणार होते तो वाचुन दाखवावा व पुढील कामकाज सुरु करावे.

मा. महापौर : प्रशासनाने अहवाल दिलेला आहे सभागृहात वाचुन दाखविण्यात येईल. मुख्य लेखधिकारी यांनी अहवाल वाचुन दाखवावा.

मुख्यलेखाधिकारी : मागील बैठकीत झालेल्या चर्चेनुसार मा. आयुक्तांनी सादर केलेल्या अहवाल वाचुन दाखविण्यात येत आहे. (अहवाल वाचुन दाखवितात) (अहवाल सोबत जोडला आहे)

श्री. सुरगोणिवार नारायण चंद्रय्या यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवुन केलेल्या कार्यवाहीचा चौकशी सहवाल.

१) श्री. सुरगोणिवार नारायण चंद्रय्या नगर सेवक प्रभाग क्र. ५२ अविष्कार कॉलनी, सिडको, औरंगाबाद यांचे जात प्रमाणपत्र फेटाळल्याबद्दल जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने त्यांचे पत्र क्र. विसक-अ आ/जाप्रप/मनपा/निर्णय/२९/२०००/ सुरगोणीवार/५९९१, दिनांक २१-११-२००१ नुसार कळविले असुन सदरील पत्र महानगरपालिकेस दिनांक १३-१२-२००१ रोजी प्राप्त झाल्याचे अभिलेखावरुन दिसुन येते.

२) उपरोक्त पत्रानुसार नगर सचिव यांनी दिनांक १५-१२-२००१ रोजी टिपणी सादर करुन सदरील बाब राज्य निवडणुक आयोगास कळविणे योग्य राहील अशी शिफारस राज्य निवडणुक आयोगास पाठवणे बाबत संचिका सादर केली होती. तदनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/नगरसचिव/२००१/९१८, दिनांक १८-१२-२००१ नुसार राज्य निवडणुक आयोगास या कार्यालयातर्फे सदरील माहिती कळविण्यात आलेली आहे.

३) संचिकेची संपुर्ण तपासणी केली असता असे दिसुन येते की, पुर्वी पासुन जात दावा प्रमाण पत्र अवैध ठरलेल्या नगरसेवकांची माहिती राज्य निवडणुक आयोगास येत होती.

४) ज्या नगर सेवकांचे जात प्रमाण पत्र वैध ठरलेले आहेत अशा नगर सेवकांची माहितीही राज्य निवडणुक आयोगास कळविण्यात आलेली असल्याचे संचिकेवरुन दिसुन येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार नगर सचिव हे स्वतंत्र पद असुन स्थायी समिती व महानगरपालिका यांच्या अखत्यारातील असल्याने नगर सचिव हे स्वतंत्र्य विभाग प्रमुख आहेत.

५) विभाग प्रमुख म्हणुन सचिव यांनी संपुर्ण प्रकरणाची पडताळणी करणे, अस्तित्वात असलेले नियम अधिनियम यांचा अभ्यास करुन सविस्तर टिपणी सादर करणे ही जबाबदारी नगर सचिव विभागाची आहे. तसेच विभाग प्रमुख म्हणुन व स्थायी समिती व महानगरपालिका यांच्याशी त्यांची कामे प्रमुख म्हणुन व स्थायी समिती व महानगरपालिका यांच्याशी त्यांची कामे निगडीत असल्याने सर्व कामकाजांची माहिती स्थायी समिती अध्यक्ष व महापौर यांना वेळोवेळी देणे ही त्यांची जबाबदारी आहे.

६) अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जाती प्रमाणापत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम २००० हे दिनांक १८-१०-२००१ पासुन अंमलात आलेले आहेत. सदर

अधिनियमाचे कलम १० (४) प्रमाणे जातीचा दावा पडताळणी समितीने रद्द केल्यावर अशा उमेदवारास निवडणुकीच्या तारखेपासुन संपुष्टात येईल अशी तरतुद आहे.

७) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण) दिनांक ६-१-२००२ मध्ये दुरुस्ती करण्यात आलेली आहे. दुरुस्तीतील कलम १० पोटकलम १ (अ) अन्वये जातीचे प्रमाणपत्र विधी अग्राहय व रद्द केल्यास त्याचा परिणाम म्हणुन तो सदस्य म्हणुन राहण्यास अनर्ह होईल व सक्षम प्राधिकाऱ्याने असे प्रमाणपत्र विधी अग्राहय असल्याचे घोषित करुन ते रद्द केल्याच्या दिनांकास व त्या दिनांकापासुन त्या सदस्याने आपले पद रिकामे केले असल्याचे समजण्यात येईल अशी तरतुद आहे.

८) उपरोक्त नुसार कायद्यात फेर बदल झाल्यानुसार संपुर्ण प्रकरणामध्ये सदरील फेरबदलासह सुधारित टिप्पणी सादर करण्याचे काम विभाग प्रमुख म्हणुन नगरसचिव यांचे आहे. संचिकेची तपासणी केली असता अशा प्रकरणात सुधारीत तरतुदी संदर्भात कोणतीही टिपणी नगर सचिव यांनी सादर केल्याचे दिसुन येत नाही. तसेच निवडणुक आयोगास जाती प्रमाणपत्र अवैध ठरविल्या बाबत कळविल्यानंतर त्या प्रकरणात कोणताही पाठपुरावा केल्याचे दिसुन येत नाही.

९) सदरील अधिनियम प्रसिध्द झाल्यानंतर त्यामध्ये काही संदिग्धता असल्यास किंवा नियमांचे आकलन होत नसल्यास त्याबाबत विधी सल्लगार अथवा महानगरपालिकेचे विधिज्ञ यांचे कोठेही अभिप्राय अथवा कायदेशीर सल्ला घेतलेला दिसत नाही.

१०) श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या यांचे जाती प्रमाणपत्र अवैध ठरल्याने उपरोक्त अधिनियमानुसार त्यांचे पद रिक्त झाल्याचे त्यांना कळविण्यात यावे म्हणुन सचिव यांची दिनांक २२-३-२००२ रोजी संचिका सादर केलेली होती. या संचिकेचे अवलोकन केले असता त्यांनी सादर केलेल्या टिपणी नुसार विधी सल्लगार यांचेसह श्री. सोमन,वकील यांच्याशी चर्चा करुन त्यांनी सदरील टिपणी तयार केल्याचे दिसुन येते. तसेच या संचिकेवर महानगरपालिकेचे विधी सल्लागार उप आयुक्त याचे अभिप्राय घेवुन सदरील संचिका आयुक्त यांच्याकडे सादर केल्याचे दिसुन येते. अशी संचिका प्राप्त झाल्यानंतर दिनांक २२-३-२००२ रोजी श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या यांना त्यांचे पालिका सदस्यत्व संपुष्टात आल्याबद्दल कळविण्यात आलेले आहे.

११) उपरोक्त सर्व मुद्यांचा सारासार विचार करता असे निदर्शनास येते की. अधिनियमात सुधारणा झाल्यानंतर त्या बाबतची कोणतीही टिपणी सादर न केल्यामुळे अथवा उप आयुक्त, विधी सल्लागार महानगरपालिकेचे विधिज्ञ यांच्याशी कोणताही विचार विनिमय न करता टिपणी सादर केल्याने श्री. सुरगोणीवार यांच्या प्रकरणात कारवाई करण्यास विलंब झालेला आहे. परिणामी त्यांचे पद संपुष्टात आल्यानंतरही काही कालावधी त्यांनी पालिका सदस्य म्हणुन कामकाज केले व कामकाजात सहभाग नोंदविला. श्री. सुरगोणीवार हे कामकाजात तेव्हाच भाग घेवु शकतात जेव्हा की त्यांना रितसर सचिवामार्फत कामकाजाची माहितीपत्रीका कळविलेली असेल, त्यांच्यावर कोणताही आक्षेप घेण्यात आलेला नसेल. सदरील बाब ही सचिव यांच्या अखत्यारितीला असल्याने त्यांनी याबाबत पुर्ण दक्षता घेणे आवश्यक होते. उपरोक्त सर्व बाबी नगर सचिव यांनी जाणुनबजुन केल्याचे दिसुन येत नाही. पण प्रशासकिय कामे करीत असतांना या प्रकरणामध्ये दुर्लक्ष झाले आहे.

उपरोक्त अहवाल सर्वसाधारण सभेत ठेवण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-
आयुक्त
दि. २३-४-०२
महानगरपालिका. औरंगाबाद.

श्री. सिरसाठ संजय : अहवाल वाचुन दाखविला त्यानुसार ही गंभीर स्वरुपाची बाब आहे. मागील सभेतच मी सुचना केल्या होत्या की, एकाला एक न्याय दुसऱ्याला एक न्याय आयुक्तांनी त्यांचे अहवाल संपुर्ण रिपोर्ट दिलेला आहे व सर्व पोट कलम दिलेले आहे की, जात पडताळणी समितीने स. सदस्याचे जात प्रमाणपत्र रद्द केले तेव्हा पासुनच त्यांचे पद रद्द झाले असे समजावे जेव्हापासुन ते निवडुण आले तेंव्हा पासुन रद्द समजण्यात यावे. सर्व नियम वगैरे वाचलेले आहेतच एक महापौर पदावर असलेले नगर सेवक यांचे जात प्रमाणपत्र रद्द होते त्यांचेवर १ तासात कार्यवाही होते त्यांना अपमानिय करण्यात येते महापौर बंगल्या वरील सुरक्षा रक्षक ३० मिनिटात काढुन घेण्यात येतात महापौर बगल्यात राहत नव्हते, नसता पुर्ण कुटुंबाला प्रशासनाने बाहेर काढले असते अशी शंका येते व शहराचा प्रथम नागरिक व या सभागृहाचा सर्वोच्च पदाधिकारी म्हणुन त्यांचा मानसन्मान आहे त्यांना अपमानित करणे योग्य नाही महापौर कोणत्या पक्षाचे असो त्या बद्दलचा प्रश्न नाही परंतु एक प्रथम नागरिक व त्याचेवर १ तासात कार्यवाही होते व दुसऱ्या एका सदस्यांना अशा प्रकरणात ३ महिने सभागृहात येऊ देतात मागील बैठकीत सांगण्यात आले निवडणुक आयोगा कडुन फोन वरुन माहिती घेण्यास आली व पत्र देण्यास हरकत नाही आयुक्तांशी कोण बोलले माहित नाही परंतु या ठिकाणी सर्व सुविधा असतांना फोन करण्यात आला मनपाकडे फॅक्स मशिन आहे १ ते २ मिनिटात अहवाल प्राप्त झाला असता परंतु तशी गरज प्रशासनाला लागली नाही ही खेदाची बाब आहे तोंडी माहिती घेण्यात आली असे उत्तर आयुक्तांनी मागच्या वेळेस दिलेले आहे संबंधीत सदस्यांनी ३ महिने सभागृहात सहभाग घेतला मानधन घेतले मतदानात भाग घेतला ही जबाबदारी कुणाची असा प्रश्न आहे. आयुक्तांनी अहवाल दिला त्यानुसार जबाबदारी निश्चित करावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : जो अहवाल वाचुन दखविला त्यावर निर्णय घ्यावा व सभेचे पुढील कामकाज सरु करावे.

श्री. जयवंत ओक : अहवाला नुसार निर्णय घ्यावा पुढील कामकाज सुरु करावे.

श्री. संजय शिरसाठ : आयुक्तांनी अहवाला नुसार चौकशी करण्यात यावी. आणि यापुर्वी सचिव ज्या विभागात होते त्या विभागात त्यांना पाठवावे व विभागीय चौकशी करावी जेंव्हा अहवाल येईल व त्या अहवाला नुसार ते निर्दोष असतील तर पुन्हा त्यांना नगर सचिव पदावर घेण्यात यावे त्यांची बदली करावी व सखोल चौकशी करावी.

श्री. तकी हसनखान : चौकशी झाली अहवाल आला काय निर्णय घ्यायचा हे आपल्या अधिकार आहे परंतु सर्व बाबतीत विचार करुन निर्णय व्हावा. महापौरांचे जात प्रमाणपत्र रद्द झाले तेव्हाच काही सदस्य आयुक्तांकडे गेले परंतु एक सदस्याचे जात प्रमाणपत्र रद्द होते त्यावेळी एक बॉडी म्हणुन आयुक्ताकडे

कुणी आक्षेप दिलेला नाही ही जबाबदारी आपली नव्हती का? ट्रस्टी म्हणुन सभागृहाची नव्हती का? करिता या बरोबरच आपणही तेव्हढेच दोषी आहात करिता हे प्रकरण बंद करावे व योग्य तो निर्णय घ्यावा एक सदस्य बोलले म्हणुन निर्णय वेगळा घेऊ नये.

श्री. शिरसाठ संजय : जात पडताळणीचा अहवालात दिलेले सदस्यांचे जात प्रमाण पत्र रद्द होऊन आले याची तपासणी/चौकशी सदस्यांनी करायची का? मा. आयुक्तांच्या अहवालातच सर्व आलेले आहे.

मा. महापौर : महापौर हा व्यक्ती कोण व विकास जैन आहे म्हणुन प्रश्न नाही. शहराचा प्रथम नागरिक हा कोणात्याही पक्षाचा असो महापौर हे शहराचे प्रथम नागरिक असतात हे आपण समजतो जसे राज्याचा मुख्यमंत्री असो देशचे पंतप्रधान असो ते शहरात दाखल होत असतांना त्यांचे स्वागत करण्याचा मान प्रथम महापौरांना असतो अशा उच्च पदाच्या बाबतीत प्रशासन निर्णय घेते जसे अहवालात समजले की, चुकीचे निर्णय घेण्यात येत आहे.

श्री. स.अली मिरा सलामी : अहवाल वाचण्यात आला स.सदस्यांनी मत व्यक्त करुन त्यांच्या भावना मांडल्या महापौर कोणत्या पक्षाचे व कोण आहे हे बाजुला ठेवावयास पाहिजे प्रश्न असा की, महापौर यांचे जात प्रमाणपत्र रद्द होते त्यांचेवर तात्काळ कार्यवाही होत व त्याच बरोबर एका सदस्यांचे तीन महिन्यापुर्वीच जात प्रमाणपत्र रद्द ठरले म्हणुन त्याच वेळी कळविण्यात येते. त्याचा अहवाल आपल्या समोर आलेला आहे हे सर्व सत्य आहे. परंतु महापौर हे पद या शहराच्या नागरिकांसाठी सर्वोच्च पद व प्रथम नागरिक म्हणुन आहे जात प्रमाणपत्र कुणाचे रद्द झाल्यास त्याचेवर कार्यवाही तात्काळ करावयास पाहिजे या प्रकरणात दिरगाई झाली हे स्पष्ट झाले परंतु यात महापौरांचा अपमान झाला असे म्हणता येणार नाही. कारण जात प्रमाणपत्र रद्द केले म्हणुन सदस्य असो महापौर असो नियमाने कार्यवाही झाली त्यात महापौरांचा अपमान केलला नाही आदेश आहे अंमलबजावणी केली. कायदा लहान मोठा पाहत नाही. दोन बैठकी पासुन या विषयावर चर्चा होत आलेली आहे. नागरिक हे विकास कामे होण्यासाठी डोळे उघडुन बसलेले आहे म्हणुन आपण राजकारण करण्यासाठी ही कार्यवाही करणे योग्य नाही. त्यासाठी या प्रकरणाची चर्चा बंद करावी व विकास कामाचा संदर्भात जास्तीत जास्त चर्चा करुन योग्य निर्णय घेण्यात यावे.

श्री. गायकवाड राधाकृष्ण : अहवाल दिला परंतु अहवालात स. सदस्यांनी घेतलेल्या सवलती. मानधन व मतदानात घेतलेला भाग यास कोण जबाबदार आहे याचा उल्लेख केलेला नाही एक सदस्यांनी मतदान केले म्हणुन जे सदस्य स्थायी समिती सदस्य म्हणुन निवडणुक जिंकणार होते ते त्या पासुन वचित राहिले. त्यास जबाबदार कोण? त्याचा सुध्दा अहवालात उल्लेख करावा.

श्री. सोनवणे सुदाम : आताच म्हटले गेले की, यात महापौर यांचा अपमान झालेला नाही कार्यवाहीस उशिर झाला महापौरांच्या अपमान झाला असा अर्थ घेत नाही परंतु मुद्दा असा होतो की, एक सदस्यांचे जात प्रमाणपत्र रद्द होऊन येते शासनाकडे अहवाल मागविला जातो त्याचेवर कार्यवाही करण्यास ३ महिने लागतात महापौर हे कोणत्या पक्षाचे याचा संबंध नाही. परंतु महापौरांचे जात प्रमाणपत्र रद्द झाल्या नंतर त्यांचेवर १० मिनिटात कार्यवाही होते गाडी निवासस्थान सुरक्षा रक्षक घेतले जातात ज्या प्रमाणे स. सदस्य नारायण

सुरगोणीवार यांचे बाबतीत मार्गदर्शन मागविण्या संदर्भात शासनाकडे जशी टिप्पणी सादर केली तशी महापौरांच्या बाबतीत का केली नाही महापौर हे पद राज्य मंत्र्याचे दर्जाचे पद मंत्र्यावर कार्यवाही करायची असेल तर कायदशिर सल्ला घ्यावा लागतो या प्रकरणाच्या बाबतीत का घेतला नाही तसेच सदस्याचे बाबतीत आयोगाशी तीन महिन्या पासुन पत्र व्यवहार चालतो महापौरांचया बाबतीत का केला नाही म्हणुन या प्रकरणात महापौर, विकास जैन म्हणुन यांचा अपमान झालेला नाही तर या शहराचा प्रथम नागरिक म्हणुन अपमान झालेला आहे अहवाल सर्वांना समजला परंतु वेगळे वळण देण्याचा प्रयत्न होत आहे.

श्री. तकी हसनखान : अहवालात सचिव जबाबदार दाखवले आयुक्तांवर टॉन्ट आहे असे सिध्द होते परंतु ज्यावेळी स्थायी समिती सदस्य पदाची निवड झाली त्यावेळी नगर सेवक नसतांना एका सदस्यानी मतदान केले ही जबाबदारी पिठासन अधिकारी यांची होती व मतदान करु दिले याचा अर्थ निवडणुकांचे कामकाज अनधिकृतपणे पार पडले तर पुन्हा निवडणुक घेणार का?

मा. महापौर : अहवाला प्राप्त झाला त्यानुसार सभागृहाने आपआपले मत मांडले कायदा एकच असला तरी दोन सदस्यांच्या बाबतीत वेगवेगळया ॲक्शन घेण्यात आलेल्या आहे हे रिपोर्ट वरुन दिसुन आलेले आहे नगर सचिव यांचे नेमणुक करण्याचे अधिकार कलम ४५ नुसार महानगरपालिकेचे आहे या प्रकरणात प्राथमिक अहवालानुसार चुक झाल्याचे दिसुन येते. करिता या प्रकरणाची गंभिरता लक्षात घेऊन या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी. चौकशी पुर्ण होई त्यांची इतर विभागात बदली करण्यात यावी. महानगरपालिकेला कलम ५१ नुसार नेमणुक करण्याचे अधिकार आहे. या कालावधीत त्यांची बदली करण्यात यावी अशी मी प्रशासनास सुचना करण्यात येत आहे. व दोषी न आढळल्यास पुन्हा त्याच पदावर त्यांना घेण्यात यावे.

श्री. संजय शिरसाठ : महानगरपालिकेत संगणक विभागात कार्यरत असलेले कर्मचारी श्री. बारी यांना प्रोग्रामर पदासाठी मुलाखतीस निवड कमेटी समोर बोलविले होते. संबंधित कर्मचारी यांना संगणकाचे चांगले ज्ञान आहे हे मा. आयुक्तांनी प्रत्यक्ष बघीतले जे कोणी उमेदवार मुलाखतीला येतील निवड झालेल्या उमेदवारास तेथेच ताबडतोब सुचना देण्यात येते ही मा. आयुक्तांची चांगली भुमिका आहे. अभिनंदन करण्यासारखी आहे. नियुक्ती दिले गेले असते तरी फक्त २९१/- रुपयांची वाढ त्याचे वेतनात होत होती, परंतु आपल्या अधिकाऱ्यांनी आयुक्तांना सांगितले सदर पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता सर्वसाधारण सभेपुढे ठेवावे लागेल. १०-१५ हजारांची मागणी केली त्यांचेकडे नव्हते फक्त २९१/- रुपयांचा फायदा होणार होता अधिकाऱ्यांनी मिस गाईड केले. अशी बातमी आहे ही बातमी सामना वृत्तापत्रात आलेली आहे या बाबतीत प्रशासनाने काय दखल घेतलेली आहे सांगावे. एखादा कर्मचारी पात्र ठरत असतो व त्या पदावरुन त्याला वगळयाल्या जात असेल तर अधिकारी त्याचे हित जोपासण्याच्या दृष्टीने कामे करतात. सर्वसाधारण सभेपुढे आणायाचे असते तर आताच आणले असते या संदर्भात सभागृहापुढे मी ॲफिडेव्हीट देण्यास सुध्दा तयार आहे अशा अधिकाऱ्यावर काय कार्यवाही होणार आहे. एक तर खुलासा

करावा, नसता संबंधीत अधिकांऱ्यावर कार्यवाही करावी. दोन अधिकाऱ्यांची कमेटी करावी त्यांना प्रमोशन दयावे. इतर चौकशी करण्यात यावी.

श्री. रतनकुमार पंडागळे : अधिकारी कोण आहे.

श्री. सोनवणे सुदाम : नियुक्ती देण्यासाठी पैसे मागितले पेपरला बातमी आली गुणवत्ते वरुन असेल तर नियुक्ती देण्यात यावी. नियमाने जे होते ते करावे. ज्यांनी रक्कम मागीतली अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी. हा मुद्दा मागील बैठकीस उपस्थित केलेला होता उप आयुक्त (महसुल) श्री. गुटटे यांनी रजा घेतली नगर सेवकांनी पडदा काढण्याचा प्रयत्न केला तर रजा टाकुन जातात जे अधिकारी कमी वसुली करतात त्यांचेवर कार्यवाही होत नाही. मनपा तोटयात येते यास नगर सेवक कारणीभुत नाही. अशा अधिकाऱ्यावर तात्काळ कार्यवाही झाली पाहिजे सामना वृत्तपत्रात संपुर्ण माहिती आलेली त्यानुसार कार्यवाही करावी. मागील बैठकीत महसुली उत्पन्नावर चर्चा होईन आढावा घेतला त्या नुसार जे अधिकारी महसुली उत्पन्नात कमी पडते त्यांची वेतनवाढ थांबविण्याचा आपण निर्णय घेतला त्यावर सुध्दा अदयाप कार्यवाही केलेली नाही ही मनपा तोटयात आहे व यास मनपा नगर सेवकच जबाबदार आहेत असा सर्वसामान्य व्यक्तीचा समज झालेला आहे व ज्यांनी पैसे मागीतले त्या अधिकाऱ्यांवर सुध्दा कार्यवाही करावी.

मा. महापौर : या प्रकरणात मा. आयुक्त यांना सुचना दिलेल्या त्यानुसार अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावीच लागेल.

श्री. कदिर मौलाना : सभागृहात चांगल्या विषयांवर चर्चा होत आहे चौकशीच्या संदर्भात बोलु इच्छितो की, मा. आयुक्तांनी अहवाल दिल्या नुसार अंतिम चौकशी होत नाही तो पर्यंत नगर सचिव यांची बदली चालु करावी या संदर्भाने माहिती घेऊ इच्छितो आपल म्हणजे मुलगा व इतरांचे कार्ट, मेगा सिटी प्रोजेक्ट बाबत चौकशी चालु आहे त्याचा अहवाल अदयाप प्राप्त झालेला नाही. या बाबत मला देणे घेणे नाही त्रास नाही परंतु एखादया अधिकारी/कर्मचाऱ्याबाबत वेगळा मानवी दृष्टीकोन होऊन निर्णय घेणे हे सभागृहाचे धोरण बरोबर नाही. आपण सर्वांचे महापौर आहात सर्वाच्याच बाबतीत समान निर्णय व्हावयास पाहिजे.

श्री. शिरसाठ संजय : स. नगर सेवकांचा गैरसमज झालेला आहे. नगर सचिव, श्री. पठाण यांचे बाबतीत निर्णय घेतला ते मुस्लिम समाजाचे आहे म्हणुन प्रश्न नाही, परंतु आताच कर्मचारी श्री. बारी याचा प्रश्न उपस्थित केलो ते सुध्दा मुस्लिम समाजाचे त्यांना पैसे मागविले म्हणुन मुख्य लेखा परिक्षक श्री. सोनार यांचेवर आताच कार्यवाही होण्याबाबत निर्णय घ्यावा असे स्पष्ट मत मी मांडत आहे.

मा. महापौर : या विषयावर भरपुर चर्चा झाली, पैसे मागतात वगैरे बातम्या आल्या त्या नुसार माहिती घेतली असता असे समजते की, प्रमोशन होतांना आता थांबविले, कित्येक दिवस निघुन गेले त्यांना अद्याप प्रमोशन झाले नाही. कित्येक प्रमोशन झाले. काहीचे १० दिवसात मंजुर होते. परंतु एखादा साधारण कर्मचारी असेल व ज्याच्याकडे पैसा नसेल व ज्याची ओळख नसेल अशी कामे थांबविण्यात येते हे वरुन निदर्शनास येते. आताच सभागृह नेते यांनी मुख्य लेखा परिक्षक यांचे बाबतीत आक्षेप घेतला. अस्थापना विभाग तसेच मालमत्ता विभागासंबंधी नेहमीच बातम्या प्रसिध्द होतात. व बारी यांचे

संबंधीही बातमी प्रसिध्द झालेली आहे. प्रशासकिय कामकाजात चुकीचे निर्णय हा विभाग देत असेल तर त्यांचेही ऑडीट होत नाही या बाबी विचारात घेऊन त्यांनी प्रस्तावित केलेल्या सर्व संचिकांची व बारी यांचे प्रकरणाची चौकशी करण्यात यावी. या चौकशीसाठी उप आयुक्त, (प्र) श्री. कांबळे तसेच मुख्य लेखाधिकारी यांना या चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात येत आहे. येणाऱ्या सर्वसाधारण सभेत तसा अहवाल सादर करावा. आताच स. सदस्यांनी विचारणा केल्या नुसार डी.पी. कुलकर्णी हे सध्या स्लम मध्ये काम करतात नगर रचना विभागात नाही. श्री. पठाण यांना त्याच संवर्गात ठेवुन टेबल बदलत्याबाबत सांगितलेले आहे त्यांचे पद कमी करीत नाही.

डॉ. भागवत कराड : या प्रकरणात मा. आयुक्तांकडे चौकशी सोपवावी चौकशी उप आयुक्त मुख्य लेखाधिकारी यांचेकडे देऊ नये.

श्री. जयवंत ओक : जी जी प्रकरणे प्रलंबित असतील त्या बाबतीत चौकशीचे अधिकार आयुक्तांना दयावे.

श्री. स.अली मिरा सलामी : भ्रष्टाचाराची बाब समोर आलेली असुन जर पैशाची मागणी करुन कामे होत असतील तर गंभिर स्वरुपाची बाब आहे. सभागृहाच्या निदर्शनास आणुन देतो. की, लाचलुचपत प्रकरणात काही कर्मचाऱ्यांचा प्रत्यक्ष पडण्यास आले परंतु त्यांना स्थायी समिती तसेच सर्वसाधारण सभेने त्यांचा गुन्हा माफ केला व पुन्हा त्यांना कामावर घेतलेले आहे. त्यासाठी कार्यवाही करायची असेल तर सर्व जे दोषी आहे. त्यांचेवर कार्यवाही व्हावी हे सभागृह आपल्या पाठीशी राहील ५-७ वर्षा पासुनची जी प्रकरणे असतील अशा सर्व प्रकरणांची चौकशी करुन कार्यवाही व्हावी. ठराविक कर्मचाऱ्यांवर कार्यवाही होऊ नये सभागृह नेते यांनी उघडपणे संबंधित आधिकारी यांचे नांव घेतलेले आहे त्या अधिकाऱ्यांचा खुलासा घ्यावा यात अंदाज व्यक्त केला जात असुन ज्यांनी प्रत्यक्ष पैसे घेऊन भ्रष्टाचारात गुंतते त्यांना माफ केलेले आहे. हेजुपुस्कर बदनाम करण्याचा हा प्रकार आहे. याबाबत चौकशी व्हावी ती ही निपक्षपातीपणाने करावी तसेच जे.ई.चे प्रकरण आलेले आहे. प्रमाणपत्र खोटे दाखल केले भरती करायचे प्रमोशन द्यायचे नंतर प्रमाणपत्र खोटे आहे म्हणुन निष्कृर्ष काढायचा या बाबतीतही कार्यवाही व्हावी. वृत्तपत्रात बातम्या येतात त्यानुसार चर्चा करणे बरोबरब नाही जे.ई. चे वृत्तपत्रात आले तर त्या बाबतीत कार्यवाहीकरणार काय? सभागृह नेता यांनी श्री. सोनार साहेब यांनी पैसे मागितल्याचा आरोप केला त्या बाबतीत त्याचा खुलासा घ्यावा नसता उदया कुणीही आरोप करेल. पैसे घेतले नाही व काम केले नाही तरी आरोप केले जातात.

डॉ. बिनवडे आशा : कर्मचाऱ्यावर अन्याय करणाऱ्या किंवा लाच घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर किंवा दोषी अधिकाऱ्यांवर नक्कीच कार्यवाही व्हावी असे मत सभागृहाचे असेल तरी सुध्दा एखादया विशिष्ट वृत्तपत्रात बातमीच्या आधारे कार्यवाही करणार आहात काय? बातमी मध्ये तथ्य आहे का? याची अगोदर चौकशी होऊनच पुढील कार्यवाही व्हावी आणि यापुढील प्रत्येक वृत्तपत्रात येणाऱ्या बातम्यांची दखल घेणार आहोत का? याचा सुध्दा खुलासा व्हावा.

मा. महापौर : अदयाप ॲक्शन घेतलेली नाही चौकशी करण्याबाबत सुचविले स. सदस्यांच्या सुचनेची नोंद घ्यावी. आजची सभा ३० मिनिटांसाठी तहकुब करण्यात येते )(सभा दुपारी १.४० वाजता तहकुब पुन्हा ३.२५ वाजता सभेला सुरुवात)

श्री. किरमानी इलियास : दुय्यम अवेक्षक, कनिष्ट अभियंता यांचे व्यावसायिक परिक्षेचे प्रमाणपत्र बाबत पोलिस गुन्हा दाखल करु नये त्यांचे पत्रिकेत बदल झाला असेल तर त्यात त्यांचा काय दोष खाते चौकशी करावी गुन्हा दाखल करु नये.

श्री. घोडेले नंदकुमार : संबंधित विभागाकडुन प्रमाणपत्र या विभागात आलेले आहे. रजिष्टर्ड पोस्टने आलेले आहे ज्यांनी पाठविले त्यांची चौकशी पुर्ण करावी त्या नंतर कार्यवाही प्रस्तावित करावी तो पर्यंत या प्रकरणात कुठलाही कार्यवाही करु नये असे माझे मत आहे.

श्री. गायकवाड राधाकृष्ण : सन ९८ मध्ये काही आपल्या कडील जे.ई. यांनी परिक्षा दिलेल्या होत्या त्या परिक्षेचा निकाल आल्या नंतर त्यांचे नियुक्ती देण्यात आल्या मेरी यांनी असे एक पत्र पाठविले की जे बोगस प्रमाणपत्र आहेत व या संदर्भात मा. आयुक्तांनी फौजदारी कारवाया कराव्या असे आदेश दिलेले आहे तसे वृत्तपत्रात आलेले आहे. मेरी संस्थेने ज्या वेळी निकाल दिला त्या वेळी निकाल प्रत्यक्ष न येता रजिष्टर्ड पोस्टाने आलेला आहे. त्यानंतर उप आयुक्त, सहाय्यक आयुक्त व मा. आयुक्त यांच्या सहीनेच त्यांना ऑर्डर दिलेल्या आहे. त्यात त्यांचा काय दोष आहे शंका येत असेल तर चौकशी करावी त्या नंतर पुढील कार्यवाही करावी.

डॉ. कराड भागवत : बोगस प्रमाण पत्र असेल तर त्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे पोस्टाने आलेले आदेश किंवा दुसरे कुणी पाठविले असेल म्हणुन कुठल्याही प्रकारची फौजदारी गुन्हा दाखल न करता विभागीय सदील चौकशी करुन त्यांनी जे फायदे व सवलती घेतल्या असतील त्या त्यांचे कडुन वसुल करावे.

मा. महापौर : कनिष्ठ अभियंता व दुय्यम आवेक्षक यांचे प्रकरणात प्रशासनाने सखोल चौकशी करुन मेरीच्या प्रमाण पत्रा आधारे जे फायदे व सवलती दिल्या असतील त्या ताबडतोब रद्द करण्यात याव्यात. या प्रकरणात सदरील कर्मचाऱ्यांची जाणुन बुजुन कुणीतरी फसवणुक केल्याचे दिसुन येत आहे. म्हणुन त्यांचेवर कोणत्याही प्रकारचे गुन्हे दाखल करु नये. प्रशासनाने नियमाने कार्यवाही करावी.

श्री. निकाळजे प्रकाश : हा मुद्दा प्रशासकिय पातळी वरील आहे. सर्वसाधारण सभेचे बंधन घालु नये चुकीचे असल्याचे निदर्शनास आले तर कार्यवाही करावी. मा. आयुक्तांना सर्वसाधारण सभेने बंधन घालु नये प्रशासन नियमाने कार्यवाही करेल. संबंधित कनिष्ट अभियंता, दुय्यम आवेक्षक यांनी विभागा अंतर्गत परिक्षा दिल्या ते त्या परिक्षेत नापास झालेले असुन त्यानंतर पुढे प्रमोशन व इतर फायदे मिळविण्याच्या दृष्टीने ज्यांनी बोगस प्रमाणपत्र सादर करुन जे फायदे, सवलती घेतल्या त्यांचेवर कार्यवाही होणे आवश्यक आहे परंतु प्रमाणपत्र बरोबर असेल तर त्यांना निर्दोष करावे ही कार्यवाही मा. आयुक्त यांचे अंतर्गत येते. सभागृहाने चर्चा करणे बरोबर नाही. मा. आयुक्तांना बंधन घालु नये. मा. आयुक्त त्यांचे पातळीवर कार्यवाही करतील.

श्री. कोकाटे काशिनाथ : संपुर्ण चौकशी झाल्या नंतर मा. आयुक्त काय ॲक्शन घेतील ती बाब सभागृहा समोर आल्या नंतर काय चर्चा करायची त्या नुसार करता येईल. कार्यवाही करण्याच्या अगोदर इंटरफेअर करणे बरोबर नाही.

मा. महापौर : विभागीय चौकशी व्हावी. त्यानंतर कार्यवाही करता येईल.

श्री. तायडे पांडुरंग : नगर रचना विभातील एस.एस.कुलकर्णी यांनी महानगरपालिकेचे नांव बदनाम केलेले आहे. त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही व्हावी. व त्यांची इतर विभागात बदली करावी.

मा. महापौर : स. सदस्य, श्री. तायडे यांनी सुचना केल्या नुसार प्रशासकीय कार्यवाही होईल. जनता दरबारा मध्ये सर्व परिस्थिती मा. आयुक्तांनी पाहिलेली आहे ते स्वत: निर्णय घेणार आहेत.

श्री. संजय शिरसाठ : आता विषय पत्रिकेला सुरुवात करावी.

श्री. स.अली मिरा सलामी : प्रभाग समितीचे निवडणुक असतांन नेहरु भवन येथे पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी श्री. पवार व श्री. संगेवार काय काम करित होते त्यांची चौकशी व्हावी अशी माझी विनंती आहे.

मा. महापौर : संबंधित सदस्य यांनी केलेल्या सुचनेची प्रशासनाने दखल घ्यावी.

**विषय क्र. ५८३/१ :**

दिनांक १८-२-२००२ रोजी सकाळी ११.३० वाजता व दुपारी २.३० वाजता, दिनांक २८-२-२००२ आणि दि. ७-३-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद

श्री.जयवंत ओक : दिनांक १८-२-२००२ च्या इतिवृत्तातील पान क्र. १९ वर दिलेले आहे. त्यानुसार ११४ वस्त्याचा प्रश्न आहे. मा. आयुक्तांनी जे मनोगत व्यक्त रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त व या सभेचे इतिवृत्त, जे की, २३ वर गुंठेवारीच्या संदर्भात आपण जी रुंलीग दिले होते. की, ५ वसाहतीचा सर्व्हे करुन काय तुटी आहेत हे सर्व माहिती घेऊन आता अंतिम निर्णय आपण घेणार आहोत गुंठेवारीच्या प्रस्तावाला आपण आज कायम करित आहोत प्रशासनाचे मनोगत दिनांक ३०-६-२००१ च्या सभेचे इतिवृत्त व ५ वसाहतीचा सर्व्हे करण्याचे आदेश दिले होते. त्याच्या अहवाला नुसार आता काय निर्णय देणार त्याचे इतिवृत्त हे सर्व प्रोसिंडीग या ठरावास मंजुरी देण्यासाठी शासनाकडे पाठवावे, पुढील कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : ठिक आहे, स.सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे तात्काळ ठराव शासनाकडे पाठवावा. विषय क्र. १ मंजुर.

श्रीमती पार्वती मानकापे : शासनाकडे पाठवण्याची कार्यवाही २ वर्षापासुन चालु आहे. आणि किती दिवस लागतील जनतेला उत्तरे द्यावी लागतात, वार्डात कामे होत नाही.

श्री. जगताप मोतिलाल : गुंठेवारीचा प्रस्ताव कायम करुन शासनाकडे पाठवावा शासन मंजुरी देईल. तो पर्यंत कामे करावी. आपल्या कार्यकाळात तरी कामे होतील की नाही.

श्री. जयवंत ओक : दिनांक ६-७-२००२ चे इतिवृत्त कायम करावे मा. आयुक्तांचे मनोगत आणि घेण्यात येणारे निर्णय याचे सर्व इतिवृत्त पाठवावे.

मा. महापौर : या प्रस्तावा संबंधी संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

उप अभियंता नगररचना : प्रकल्प अधिकारी यांनी ज्या ११४ अनधिकृत वसाहतीचे सर्व्हेक्षण केलेले होते. त्यापैकी ५ वसाहतीचा जो सर्व्हे तो नगररचना विभागामार्फत करण्यात आलेला आहे. सर्व्हे पुर्ण झालेला असुन त्या बाबतीचा रिपोर्ट व हा ठराव शासनाकडे पाठविण्यांत येईल.

श्री. जयवंत ओक : सर्व्हे मध्ये काय आढळुन आले वाचुन दाखविण्यात यावे,दि. ६-७-२००१ रोजी सभेचे तसेच दि. १८-२-२००२ च्या सभेचे व आजच्या सभेचे इतिवृत्त एकत्र करुन शासनाकडे पाठवावे. तसेच ५ वार्डाचा जो सर्व्हे केला, त्याचा रिपोर्ट काय आहे, तो सुध्दा शासनाकडे देऊन पुढील कार्यवाही करावी, जी सर्व्हे केला त्यात काय आढळले खुलासा द्यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १८-२-२००२ रोजी सकाळी ११.३० वाजता व दुपारी २.३० वाजता, दिनांक २८-२-२००२ आणि दि. ७-३-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५८४/२ :**

सहाय्यक संचलाक नगर रचना, महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर प्रारुप विकास योजन (सुधारित) नुसार आरक्षण क्र. ५७ "प्राथमिक शाळा" तसेच १२ मीटर व ९ मीटर रुंद रस्त्याने न.भु.क्र. ४२२७ ही संपुर्ण बाधीत असुन सदर मिळकतीचे एकुण क्षेत्र ३३८१.५० चौ.मी. आहे.

उक्त मिळकतधारकाने बांधकाम परवानगीसाठी संचिका दाखल केली असता महानगरपालिकेने सदर मिळकत विकास योजना (सुधारित) नुसार वरील प्रस्तावाने बाधीत होत असल्याने बांधकाम परवानगी नाकारली आहे. त्यामुळे मिळकत धारकाने सदर मिळकत संपादनासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी सुचना शासनास बजावलेली आहे शासनाने सदरील खरेदी सुचना दि. १७-४-२००१ रोजी कायम करुन महानगरपालिकेस कळविले आहे. सबब शासनाने सदरील खरेदी सुचना कायम केल्यापासुन एक वर्षाच्या आत म्हणजे १६-४-२००२ पुर्वी भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे बंधनकारक आहे. जर मुदतीच्या आत भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविला गेला नाही तर सदरील आरक्षण रद्द/व्यपगत होईल व लगतच्या विकास योजनेचा वापर देय होऊन बांधकाम परवानगी द्यावी लागेल.

सबब सदर आरक्षणाने बाधीत संपुर्ण क्षेत्र संपादन करणेसाठी व त्यालगतचे १२ मीटर व ९ मीटर रुंद रस्ते संपादन करणेसाठी भुसंपादन प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. सदर भुसंपादनासाठी अंदाजे ४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. करिता भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणेसाठी मान्यतेस्तव सादर.

संवाद

श्री. सुदाम सोनवणे : जागा कुठे आहे ठराव घेण्याची आवश्यकता काय होती.

उप अभियंता नगररचना : आरक्षण क्र. ५७ हे प्राथमिक आरक्षीत आहे. खरेदी सुचना पाठविण्यात आलेली होती. शासनाने आहे. खरेदी सुचना मान्य केली आहे. ही जागा कुंभारवाडा येथील आहे खरेदी सुचना कायम केल्यांनतर ६ महिन्याच्या आत तसा प्रस्वात मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावा लागतो.

श्री. सुदाम सोनवणे : इतर विषय न घेता या जागे बाबतच का विषय आला नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिकेकडे एवढी रक्कम देण्यासाठी बजेट ठेवलेले आहे का? रक्कम दिली नाही. तर त्याचे पारिणाम काय होतील शहरात किती भुखंड आहे की, पैशा अभावी आरक्षणाचा विकास करता आला नाही.

मा. महापौर : ज्या जागेच्या आरक्षणास १० वर्ष झाले त्या संबंधीच्या नोटीस येतात, अशा किती जागा आहे.

उप अभियंता नगररचना : जस-जसे पर्चेस नोटीस येतात, त्यानुसार जागा भुसंपादनाचे प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावा लागतात.

मा. महापौर : १२७ ची नोटीस केंव्हा येते या दोन जागे व्यतिरिक्त आणखी किती प्रकरणे आहेत.

उप अभियंता नगररचना : प्लॅन मंजुर झाला त्यानंतर १० वर्ष झाले १० वर्ष जागा भुसंपादन केली नाही तर १२७ ची नोटीस येते ही नोटीस कलम ४९ ची आहे. त्यांनी शासनाला नोटीस बजावली शासनाने ती पर्चेस नोटीस कायम केलेली आहे. प्रस्ताव पाठविला नाही तर हे आरक्षण रद्द होईल.

श्री. डॉ कराड भागवत : विषय क्र. २ मध्ये प्राथमिक शाळा ९ मीटर व १२ मीटर रुंद रस्त्याचे आरक्षण आहे. शासनाने खरेदी सुचना १७-४-२००२ रोजी कायम करुन महानगरपालिकेस कळविले एक वर्षापुर्वी मंजुरी आली, आणि १ वर्षानंतर सभागृहापुढे हा प्रस्ताव येतो यात दि. १६-४-२००२ पुर्वी भुसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावयाचा आहे, असे नमुद केले परंतु दि. १६-४-२००२ ही तारीख निघुन गेलेली असुन आज दि.२४-४-२००२ ही तारीख आहे. उशीर का झाला दुसरा प्रश्न असा की, हा ठराव योग्य रितीने मांडलेला नाही जागा कुठे आहे, नमुद केले नाही. म्हणुन मा. जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन मुदत वाढवुन घ्यावी. व हा प्रस्ताव स्थगित ठेवावा. हा प्रस्ताव अपुर्ण आहे.

श्रीमती डॉ आशा बिनवडे : विकास आराखडा मंजुर होऊ आला का? या प्रस्तावात जागा कोठे येते. उल्लेख नाही. अपुर्ण प्रस्ताव आहे स्थगित ठेवावा.

सौ. साधना सुरडकर : प्रस्ताव उशीरा का आला, शेवटच्या क्षणी हा प्रस्ताव ठेवला आहे. बजेट मध्ये तशी तरतुद का केलेली नाही. ४ कोटी द्यायचे आहेत, असे किती प्रकरण आहेत.

श्री. कोकाटे काशिनाथ : सदर प्रकरणास देऊन १ वर्ष झाले. १,२ महिन्यात छाननी होऊन असे प्रस्ताव मंजुरीसाठी येणे आवश्यक होते. आज मंजुर केला नाही तर वाढवि पैसे द्यावे लागतील असे प्रस्ताव सादर करतांना नकाशासह व इतर सर्व माहितीसह ठेवणे आवश्यक होते. व नकाशाची प्रत, झेरॉक्स प्रत यासह सादर केल्यास सभागृहास महिती मिळते. परंतु या प्रस्तावा सोबत काहीही माहिती नाही. जनता दरबार आपण घेतला अशा प्रकरणात किती समस्येला सामोरे जावे. लागते, याचा अनुभव आलेला आहे. असे प्रस्तावास एक वर्षापुर्वी मंजुरी देऊन ऐनवेळी शेवटच्या काळात प्रस्ताव ठेवुन त्यावर एकमताने निर्णय होत नसेल तर हा प्रस्ताव मंजुर न करता व सविस्तर माहितीसह ठेवावा.

श्री. घडामोडे भगवान : शासनाने २००१ मध्ये खरेदी सुचना कायम करुन दिलेली आहे. आणि एक वर्षानंतर ठराव ठेऊन कोणत्या येरीया मध्ये येते. उल्लेख नाही. प्रस्ताव घेण्याची आवश्यकता आहे. महानगरपालिकेस जनतेसाठी

पाणी,लाईट,ड्रेनेज, या सुविधा द्यायच्या आहे. हा प्रश्न समोर असतांना ४ कोटी चे प्रसताव प्रशासनच ठेवतात. तसेच सविस्तर माहिती या प्रस्तावात दिलेली नाही. म्हणुन हा प्रस्ताव स्थगित ठेवावा सविस्तर माहितीसह सादर करावा.

श्री. जयवंत ओक : गरज नसेल तर आरक्षण काढुन टाकावे व परवानगी द्यावी.

श्री. घडामोडे भगवान : शासनास २००१ ला खरेदी सुचना दिली, कुठे आहे. खरोखरच जागेची महानगरपालिकेस आवश्यकता आहे, व बजेट नसेल तर ही बाब सुध्दा स. सदस्यांच्या निदर्शनास यावयास पाहिजे. सद्या प्राथमिक सुविधा पुरविण्यास अडचण येते. आर्थिक स्थिती चांगली नाही. स्थगित ठेवावा. जागेच्या माहितीसह व नकाशासह प्रस्ताव ठेवावा.

मा. महापौर : हा प्रस्ताव स्थगित करण्यात येत आहे.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ५८५/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील सिध्दार्थ जलतरण तलाव सन १९९४ साली सुरु झाला असुन सन २००१-२००२ या वर्षी अर्थसंकल्पीय बैठकीत १९९४ पासुन चालु असलेल्या सभासद शुलकात वाढ करण्यात आली. त्या नुसार सुरुवातीचे जे आजीव सभासदांचे शुल्क रु. ८०००/- वरुन रक्कम रु. २०,०००/- अशी वाढ करण्यात आली.

वरील नवीन सुधारित दर वाढविल्यापासुन आजीव सभासदांच्या संख्यमध्ये घट झाली असुन जेंव्हा पासुन सदरील शुल्क वाढविण्यात आले आहे. तेंव्हा पासुन अद्यापपर्यंत एकही आजीव सभासद झालेला नाही.

तरी आजीव सभासद शुल्क काही मर्यादीत कालावधीकरिता ( उदा. ३० दिवस) रु. २०,०००/- वर्तमान पत्रातुन प्रसिध्द केल्यास बरेच सभासद होतील असे वाटते. अशी मर्यादीत कालववधीची (उदा. ३० दिवस) सवलतीची योजना केल्यास अंदाजे ४०० सभासद मिळु शकतील व यामधुन महानगरपालिकेला रु.६०,००,०००/- इतके उत्पन्न मिळु शकेल व सदर रकमेच्या ठेवी व्याजामध्ये जलतरण तलावाची देखभाल व दुरुस्ती करता येऊ शकेल व उत्पन्नातही वाढ होऊ शकेल.

वरील प्रमाणे सवलतीची योजना उन्हाळी सत्रापुर्वी राबविण्यास निश्चितच सभासदांचे संख्येमध्ये वाढ होऊन उत्पन्नात भर पडेल.

तसेच जलतरण तलावासाठी जे आजीव सभासद होतील त्यांना जलतरण तलाव येथे कार्यरत असलेल्या जिम्नॅशियम करिता र रु.५०/- प्रतिमहा असा शुल्क आकारणे योग्य वाटते.

तरी उन्हाळी सत्र सुरु होण्यापुर्वी मर्यादित कालावधी करिता सवलतीची योजना करुन आजीव सभासदाकरिता र. रु. २०,०००/- ऐवजी र.रु. १५,०००/- शुल्क आकरणी करणे तसेच आजीव सभासदाकरिता जिम्नॅशियम रु. ५०/- प्रतिमहा या दराने देणेबाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

संवाद

श्री. संजय शिरसाठ : रु. १२०००/- फी करावी.

श्री. डॉ. कराड भागवत : आजीव सभासद शुल्क २०,०००/- रु. होते ते १५,०००/- करण्याचे प्रशासनाने सुचविलेले आहे. रु.१५,०००/- ऐवजी रु. १२,०००/- करावे, असे माझे मत आहे.

मा. आयुक्त : लाईफ मेंबरसाठी रु. ८०००/- फि होती ती रु. २०,०००/- करण्यांत आली. वाढ झाल्याचे तारखेपासुन आजपर्यंत एकही आजीव सभासद नोंदणी झाली नाही. एक महिन्यात जास्तीत जास्त मेंबर करुन घ्यावेच आहे. आणि एका महिन्यात २५०-३०० मेंबर करण्याचा प्रयत्न करण्यांत येईल. तसेच आजीव सभासदा करिता जिम्नॅशियम साठी रु. ५०/- प्रतिमहा आकारणी होणार या दराने रु. ६००/- वर्षाचे होतात, त्या ऐवजी ५००/- रु. करुन १ महिन्यात जेव्हढे सदस्य होतील तेव्हढे करुन घेण्यात येतील व पुन्हा आढावा घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही होईल.

मा. महापौर : आज पासुन एक महिन्यापर्यंत म्हणजेच ३० मे पर्यंत रु. १२,०००/- येणाऱ्या आजीव सभासद फि आकारणी करण्यास मंजुरी देण्यांत येते.

श्री. जयवंत ओक : तेथे लेडीज बॅचेस चालतात त्या वेळात जेन्टस् जाणार नाही याची काळजी घेतली जाते मी प्रत्यक्ष पाहिलेले, व तशा पुन्हा सुचना ही केलेल्या आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चे नुसार सिध्दार्थ उद्यान येथील सिध्दार्थ जलतरण तलावाचे दर वाढविल्यामुळे आजीव सभासदांच्या संख्येमध्ये घट झाली तरी आजीव सभासद शुल्क मर्यादित कालवधीतील ( उदा. ३० दिवस) रु. २०,०००/- ऐवजी १२,०००/- करण्यास व जलतरण तलाव तेथे कार्यरत असलेल्या जिम्नॅशियम करिता आजीव सभासदासाठी रु. ५०/- प्रतिमाह असा शुल्क आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८६/४ :**

कार्यकारी अभियंता (जलनिःसारण व विद्युत) हे खाली प्रमाणे प्रस्ताव सादर करित आहेत की, औरंगाबाद शहरात पाणी पुरवठा करण्याच्या योजणे अंतर्गत जायकवाडी प्रकल्पाचे "नाथसागर" मधुन दररोज साधारणतः १२५.०० एमएलडी पाणी पंपींग व्दारे उचलण्यात योते व नाथसागर-जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंत पंपींगव्दारे हे पाणी आणल्या जाते. हया प्रक्रियेत मुख्यतः वीज पावर हा पुमख घटक असुन महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळा कडुन महानगरपालिकेला प्रतिमहा साधारणतः रक्कम रु. १५०.०० लक्ष चे देयक प्राप्त होते. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती व वीज दराचा मुद्दा या संबंधाने प्राप्त देयकाऐवजी रक्कम प्रतिमहा महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास देणे महानगरपालिकेस शक्य होत नाही. त्यामुळे आतापावे्तो. र. रु. १३५.०० कोटी एवढी थकबाकी आहे. या संदर्भात यापुर्वी वेळोवेळी ही बाब सर्वसाधारण सभेसमोर आणुन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे मागणी नुसार देयक रक्कम अदा करण्याबाबतचे कायर्वाहीमध्ये सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने आता महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळास रु. ७५.०० लक्ष प्रतिमहा देण्यात येते.

दरम्यानचे काळात महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाकडुन थकबाकी वसुली बाबत पत्रव्यवहार होत असुन नियमितपणे मागणी करण्यांत येते.

आता महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाने थकबाकी दाराकडुन थकबाकी वसुली करण्याचे कार्यवाही अंतर्गत महाराष्ट्र वीज नियामक मंडळाच्या आदेशानुसार व मंत्री मंडळाने

घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने स्थनिक वर्तमानपत्रात अंतिम जाहीर नोटीस/निवेदत देऊन महानगरपालिकेने महानगरपालिकेकडील थकबाकी

| अ. क्र. | ग्राहकाचे नांव | चालु बिलाची रक्कम डिसेंबर २००१ | थकबाकी रक्कम | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | महानगरपालिका औरंगाबाद (जायकवाडी उदा.ग्रा.क्र.१५७) | १८,६१,२४,५५७/- | ११,४७,२४,५५७/- | ११,६५,८५,६६९/- |
| २. | महानगरपालिका औरंगाबाद (फारोळा उदा..ग्रा.क्र.१५८) | २६,९३,५६५/- | २१,४३,५९,२५६/- | २१,७०,५२,८२१/- |
| ३. | महानगरपालिका औरंगाबाद (जायकवाडी उदा.ग्रा.क्र.४८८) | २९,९२,७४४/- | ३५,८०,७८,६३५/- | ३६,१०,७१,३७९/- |
| ४. | महानगरपालिका औरंगाबाद (फाराळा उदा.ग्रा.क्र.४८९) | ५८,११,३००/- | ६३,९२,२४,१३८/- | ६३,७०,३५,४३८/- |
| | मनपा औरंगाबाद वकील थकबाकी | १,३३,५८,७२१/- | १३१,८३,८६,५८६/- | १३३,१७,४५,३०७ /- |

चा भरणा दिनांक ५-२-२००२ पासुन एक महिन्याचे आत करण्याची नोटीस भारतीय विज अधिनियम १९१० सब सेक्शन १ सेक्शन २४ प्रमाणे दिलेली आहे व ही थकबाकी रक्कम भरणा न केल्यास महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनेचा विद्युत पुरवठा तात्पुरता खंडीत करावा लागेल असे नमुद करुन जनतेची गैरसोय होऊ नये. म्हणुन थकबाकी त्वरीत भरुन वीज मंडळास सहकार्य करावे म्हणुन कळविलेले आहे. तसेच या आशाचे पत्रही विद्युत मंडहाकडुन महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे.

करिता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे उपरोक्त जाहिर नोटीस/ निवेदना संदर्भाने चर्चा करुन योग्य तो निर्णय घ्यावा.

संवाद

श्री. डॉ. कराड भागवत : १२५ एमएलडी पाणी शहराला पंपींगव्दारे पुरवठा केले जाते का? त्यात किती पाण्याची गळती होते. महत्वाचा प्रस्ताव आलेला त्यावर चर्चा करणे आवश्यक आहे. सध्या महानगरपालिका ७५ लक्ष रुपये विज बिलापोटी एम.एस.ई बी. ला भरणा केला जातो. १३५ कोटीचा बोजा महानगरपालिकेवर लाईट बिलाचा आहे. हे बिल महानगरपालिकेने भरले नाही तर एम.ई. आर. सी व महाराष्ट्राच्या मंत्री मंडळाने असा निर्णय घेतला की, पाणी पुरवठासाठी दिला जाणारा विज पुरवठा बंद केला जाईल अशा प्रकारचे पत्र महानगरपालिकेकडे आलेले आहे का? या जिल्हयाचे

पालकमंत्री व संपर्कमंत्री हे दोन्ही मंत्री ऊर्जामंत्री आहे, त्यांना सर्व पदाधिकारी यांनी त्यांना जाऊन भेटावे. ऐवजी १ कोटी रु. द्यावे असे माझे मत आहे. २५ लक्ष वाढेल, अनाधिकृत नळ शोधावे त्या माध्यामातुन केव्हढे उत्पन्न होऊ शकेल वसुली वाढवावी. त्यातुन हे देण्यांत यावे.

मा. महापौर : २५ लक्ष रुपये हे वाढवुन देण्याचे सुचविले परंतु कोठुन द्यायचे याबाबत चर्चा करावी नसता यातील कामे कमी करावी लागतील.

श्री. डॉ. कराड भागवत : विकासाची कामे कमी करुन जमणार नाही. मालमत्ताची वसुली वाढवावी तसेच अनधिकृत नळ कनेक्शन शोध मोहिम राबवावी व गुंठेवारीच्या प्रस्तावानुसार ५०% रक्कम घेऊन कार्यवाही केल्यास उत्पन्न वाढु शकते महापौर बंगल्या जवळील दुकाने,भाजी मंडई, वसंत भुवन आणि शहागंज येथील दुकाने भाडयाने दिल्यास खुप मोठया प्रमाणात उत्पन्न होईल. ४-४ वेळेस टेंडर होऊन ही कार्यवाही होत नाही, रस्ता,ड्रेनेज, पाणी योजना असतील त्या बंद कराव्या महानगरपालिकेस उत्पन्न येण्याची भरपुर साधने आहे. बोल्ट पध्दतीने उत्पन्न वाढवावे, त्यानुसार कार्यवाही व्हावी. वीज बंद केल्यास पुन्हा उपोषण होईल, किंवा करावे लागेल. या अगोदर आपण उपोषण, अंदोलन केलेले होते.

श्री. कोकाटे काशिनाथ : शहराला १२५ एमएलडी पाणी देण्याचा उल्लेख केलेला आहे. १२५ एमएलडी पाणी येतच नाही या बाबतीत या सभागृहात अनेक वेळा चर्चा झाली. येत असेल तर त्याचा हिशोब द्यावा. चुकीचे नमुद केले आहे, आकडेवारी काढुन टाकावी. १३५ कोटी वीज मंडळाचे थकीत आहे. ७५ लक्ष सध्या देण्यांत येते. १५०-२०० लक्ष देऊ शकणार नाही परंतु यांनी लक्ष ऐवजी १ कोटी देण्याचे येथे माजी महापौर यांनी सुचविले, देण्यास हरकत नसावी. प्रश्न २५ लक्ष कोठुन द्यायचे हा आहे. तर बजेट बैठकीच्या वेळी वसुलीच्या बाबतीत अधिकाऱ्यांना सक्त ताकीद दिलेली आहे. त्यामुळे वसुलीत वाढ होईलच. वर्षाच्या शेवटी फेब्रुवारी मार्च या महिन्यातच मालमत्ता, पाणीपट्टी वसुली जास्त होते. त्याप्रमाणे इतर माहिन्यात सुरुवातीपासुन वसुली होत गेल्यास उत्पन्न वाढेल अशी अपेक्षा आहे. पाणी प्रश्न हा जनतेचा मुलभुत प्रश्न आहे. ७५ लक्ष ऐवजी वीज मंडळास १ कोटी रु. दरमहा भरण्याचा निर्णय घ्यावा व वीज पुरवठा खंडीत होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. इतर थकीत रकमेच्या बाबतीत एक पदाधिकारी व जेष्ठ सदस्य यांचेसह एक शिष्टमंडळ घेऊन जावे व शासनाकडुन हे बील माफ करुन घ्यावे. व ग्रामीण भागात जो वीजेचा वापर होतो तो कृषी दराने लावण्याबाबत मागणी करुन मंजुर करुन घ्यावे. ज्याप्रमाणे प्रवरा संस्थेस ७०० कोटीचे कर्ज शासनाने माफ केले, त्या प्रमाणे महानगरपालिकेचे सुध्दा लाईट बिलाच्या बाबतीत व्हावे. तसे प्रयत्न व्हावे.

श्री. किशोर तुळशीबागवाले : ७५ लाख ऐवजी १ कोटी भरावे मागील बैठकीत शहरातील अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्याचा निर्णय घेतला. त्या संदर्भात झोन मध्ये कार्यवाही होण्याच्या दृष्टीने अद्याप कळविण्यात आलेले नाही. आपण स्वत: पत्र देऊन कार्यवाही करण्याचे आदेश करावे. जेणे करुन या योजनेमुळे उत्पन्न वाढेल. व २५ लक्ष रु. एम.एस.ई.बी. ला जास्तीचे भरु शकतो.

श्री. संजय शिरसाठ : एम.एस.ई.बी. महानगरपालिकेस नोटीसा देऊन एक प्रकारची ताकीद देऊन थकीत रक्कम भरण्याबाबत सुचना करतात व वीज पुरवठा बंद करण्याच्या धमकी देतात, हे बरोबर नाही. ४-५ वर्षापासुन जे वीज बील आकारले गेले व यापुढे सुध्दा येणारे बील हे कृषी दराने आकारण्यात यावे या संदर्भात एक ठराव घेऊन शासनाकडे पाठवावा. या शहरात एम.एस.ई.बीचे पोल आहे डी.पी. आहेत तसेच ते जे वीज विक्री करतात. कस्टमर सर्व्हीस चार्जेस मधुन या तीनही बाबतीत महानगरपालिकेने सुध्दा मागणी केली पाहिजे. टॅक्स वसुल झाला पाहिजे. ग्राहकाकडुन पैसे वसुल करतात. महानगरपालिकेकडुन व्यावसायिक दराने विज बील वसुल केले जाते. ८८ लक्ष रु. सध्या दिले जातात. फक्त १२ लाखाची वाढ करायची आहे. वाढ करीत असतांना तसा ठराव पास करुन या बरोबरच पाठवावा. जेणे करुन पुढील परिस्थिती बघुन त्यावर विचार करता येईल. पाणी प्रश्न हा जनतेच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. त्यामुळे १ कोटी रु. दर महिन्याला देण्यास हरकत नसावी.

मा. महापौर : आताच स.स.यांनी केलेल्या सुचनेस मंजुर देण्यात येते. प्रशासनाने त्या बाबत कार्यवाही करावी. व शासनाकडे तसा प्रस्ताव पाठवावा. आता किती रक्कम एम.एस.ई.बीला दिली जाते, मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री. स.अली मिरा सलामी : शासनाकडे कोणता प्रस्ताव पाठवणार.

मा. महापौर : सभागृह नेता श्री. शिरसाठ यांनी मांडलेल्या सुचनेप्रमाणे पोल डी.पी. या जागावर भाडे आकारणे ग्राहकांना विज दरावरील चार्जेस लावणे कशा प्रकारे लावावयाचे ते प्रशासनाने पहावे.

मुख्यलेखाधिकारी : जायकवाडी शहरात आणण्यात येणाऱ्या पाण्यावर जे वीज बील येते. त्यानुसार ७५ लक्ष वीज बील अदा केले जाते. व क्रांतीचौकयेथील वीज बिलाचे १३ लक्ष असे एकुण ८८ लक्ष दिले जातात. १ कोटी देण्याचे निश्चित केल्यास १.४४ कोटींची रकमेत वाढ होते.

मा. महापौर : वर्कवाईज बजेट केलेले वाढवुन केस देणार आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : मालमत्ता वसुलीत वाढ करुन द्यावी. आपण वर्कवाईज बजेट केले, परंतु आपण उलट आणखी सुचना मागवुन विकास कामे करणार आहोत. त्यात १२ लक्ष प्रमाणे तरतुद करावी.

मुख्यलेखाधिकारी : मालमत्तेचे टारगेट केलेले आहे. आणखी वाढ केल्यास वसुली सुध्दा झाली पाहिजे. २५ लक्ष दर महिन्यात वाढीव वसुल होणे शक्य नाही.

श्री. कोकाटे काशिनाथ : १००% वसुली झाली पाहिजे असे आदेशित करावे.

मा. महापौर : २५ लक्षची वाढ करुन १ कोटी रुपये एम.एस.ई.बीला वीज बीलापोटी दरमहा भरण्यात यावे. हा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

श्री. स.अली सलामी : ऐनवेळी प्रस्ताव आहे. टपरी कमेटीचा पुन्हा सर्व्हे करावे. २५ ते ३० लक्ष उत्पन्न बुडत आहे. पुन्हा सर्व्हे करावा भाडे वाढवावे, २५ लक्षचे नुकसान होत आहे. सर्व्हे करणार होते, त्या बाबतीत काय कार्यवाही केली खुलासा व्हावा. लाईफ मेंबरचे फिची रक्कम येणार आहे. उत्पन्नात वाढ होते आहे. विकास कामे कमी करु नये. इतर माध्यमातुन वाढ करुन २५ लक्ष भरावे.

मुख्यलेखाधिकारी : १ कोटीचे भरणा करावी लागणारी रक्कम ही एम.एस.ई.बीला जे भरणा करावी लागणारी रक्कम ही दर महिन्याला भरावी लागते. जे टारगेट वाढवुन देत आहे. तेव्हढे उत्पन्न अपेक्षित आहे, किती येईल निश्चित माहित

नाही. तुर्त दर महिन्याला २५ लक्ष कोढुन भरायचे याचा विचार करुन निर्णय घ्यावा.

श्री. जयवंत ओक : थकीत रक्कम १३५ कोटी आहे. यास जबाबदार कोण. ७५ लक्ष भरणा होतो २ कोटी दर महिन्याचे बील येते उर्वरित रक्कमेवर व्याप्त आकारणी होत आहे. किती व्याज आकारले जाते. जास्तीत जास्त भरणा करावे. उद्दीष्ट आणखी वाढवुन द्यावे. आणखी तीन वर्षात २०० कोटी विज बिलाचे थकीत रक्कम होईल. जनतेला पाणी, लाईट, रस्ते, ड्रेनेज इ. सुविधा देणे आवश्यक आहे. त्यासाठी उत्पन्न म्हणुन बोल्ट पध्दतीने विकास करावा. मालमत्ता कर भरण्यास लोक येतात. परंतु कर्मचारी त्यांना साथ देत नाही. जनतेची कामे झाली पाहिजे व त्यासाठी सभागृह व प्रशासन यांनी एकमताने कामे करण्याचा निर्णय घेतला पहिजे. शहरातील महानगरपालिकेच्या मालकीची व्यापार संकुले आहे. भाडे तत्वावर देण्यांत यावे. उत्पन्न वाढेल जनतेला सुविधा देणे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. आपण जनता दरबार घेतला अभिनंदन करण्यांत येते. जनतेच्या भावना प्रशासन समजावुन घेत नाही. बोल्ट पध्दतीने व्यापारी संकुल द्यावे, उत्पन्न वाढवावे.

मा. महापौर : महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती कशी सुधारेल या संदर्भात स. सदस्य यांनी भावना व्यक्त केलल्या आहे. बोल्ट पध्दतीने शहरात वास्तु झाल्या पाहिजे. बजेट मध्ये जी कामे होणारी आहे त्याचा उल्लेख केलेला आहे. यासाठी वर्षभरामध्ये प्रशासन प्रयत्न करित आहे. व्यापारी संकुल उभारणेसाठी प्रशासनाचे प्रयत्न चालु आहे. तसेच आदर्श भाजी मंडईसाठी मा. आयुक्तांनी आधिकाऱ्यांना सुचनाही दिल्या, लवकरच टेंडर कॉल करण्यात यावे, याचा अर्थ महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नक्कीच सुधारेल,किती लाभ होणार गृहीत धरु शकत नाही.

श्री. घडमोडे भगवान : महानगरपालिकेचा विद्युत पुरवठा खंडीत करण्याचा निर्णय नियामक मंडळ व मंत्रीमंडळाने घेतलेला आहे. या शहराचे आमदार लोकप्रतिनिधीच करणारे मंत्री हे ऊर्जामंत्री आहे. या शहराच्या जनतेचे तोंडचे पाणी पळवित आहे. ही बाब तेव्हा मंत्र्याना साकडे घालण्याची वेळ आलेली आहे. युतीच्या काळात महानगरपालिकेची परिस्थिती चांगली नाही. आज २५ लक्ष वाढवुन दिले, परंतु कोठुन देणार हा अडचणीचा प्रश्न निर्माण होईल. म्हणुन सभागृहाच्या वतीने साकडे घालुन विज बंद न करण्याची विनंती करावी.

मुख्यलेखाधिकारी : आताच स.स.श्री. जयवंत ओक यांनी सुचना केल्यानुसार ही जबाबदारी प्रशासनाची आहे, परंतु अर्थसंकल्प मंजुर करतांना आपण तरतुद ठेवली, त्यात ७५ लक्षची तरतुद ठेवलेली आहे. प्रशासनाचे मत २.०० कोटी दरमाह द्यावे, परंतु सभागृह मान्य करेल का? अस्थापना खर्च ९० कोटीवर गेलेला आहे. वाढीव रक्कम द्यायची असेल तर काही कामे कमी करावी लागणार आहे. सर्वसाधारण सभा मंजुरी देत नाही, तोपर्यंत प्रशासन काहीच कार्यवाही करु शकत नाही. एम.एस.ई.बीची नोटीस आल्या नंतर सर्वोच्च सभागृहासमोर ही बाब निदर्शनास आणणे आवश्यक आहे. १३९ कोटीची थकबाकी आहे, धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. मा. सर्वसाधारण सभेने प्रशासनास योग्य मार्गदर्शन केल्यास योग्य राहील.

मा. महापौर : प्रशासनाला मार्गदर्शन करण्यांत येत आहे की, उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने प्रशासनाने तात्काळ काही उपाययोजना राबवाव्या हे सभागृह नेहमी

प्रशासनास उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सुचना देतात, उत्पन्न वाढविण्याचे मार्ग दाखवितात. ते सर्व उपक्रम चालु वर्षात अंमलात आणावे व उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करावा व त्यातुनच ही रक्कम भरणा करावी.

मुख्यलेखाधिकारी : सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार ताबडतोब कार्यवाही करायची झाल्यास पुढील महिन्यापासुन रक्कम द्यावी लागणार आहे, या दृष्टीने अंदाजपत्रकात तरतुद असणे आवश्यक आहे.

मा. महापौर : एक अनधिकृत नळ कनेक्शन महानगरपालिका तात्काळ कट करु शकत नाही. या शहराची पाणी पुरवठयाची संपुर्ण वीज पुरवठा बंद करण्याचे धाडस एम.एस.ई.बी. करते. किती तळमळ उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने या विभागास आहे. अभिनंदन करावेसे वाटते. आणि महानगरपालिकेचे अधिकारी वसुली ही १००% होणार नाही, उत्तरे देतात हे बरोबर नाही.

श्री. कोकाटे काशिनाथ : निर्णय घेतल्यानंतरही प्रशासन एवढी रक्कम देता येत नाही असे उत्तर देत असतील तर प्रस्ताव कशासाठी ठेवला. कोणत्या हेड मधुन कमी करायचे, याचा निर्णय प्रशासनानेच घ्यावा. १ कोटीची उपाययोजना कशी करायची हे प्रशासनाने पाहावे.

श्री. डॉ. कराड भागवत : ८८ लक्ष रु. भरणा केला जातो १२ लक्षची आपण वाढ केली. प्रत्येक विभागाने दर महिन्याला ४ लक्षने बजेटचे मध्ये उद्दीष्ट वाढवुन द्यावे. त्या प्रमाणे १२ लक्ष रु. एम.एस.ई.बीला भरणा करता येतील.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाला विज देयकाची रक्कम रु. ७५ लाख प्रतीमहा ऐवजी रु. १.०० कोटी प्रतीमहा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच सदरची वाढीव रक्कम ही उत्पन्न वाढ करुन भरपाई करण्यांत यावी. उत्पन्न वाढीसाठी प्रशासनाने तात्काळ योजना राबवण्यात यावी. असे सर्वानुमते ठरेले, त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८७/५ :**

आरोग्य वैद्यकिय आधिकारी यांनी प्रस्तावित केले होते की, विभाग क्र. ६ च्या कार्यक्षेत्रात प्रायोगित तत्वावर सफाईचे खाजगीकरण करुन खाजगी संस्थेमार्फत स्वच्छता करणेस्तव यापुर्वी दिनांक २०-११-२००१ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत ऐनवेळचा प्रस्ताव क्र. ५३५/३ नुसार मांडला होता. परंतु या प्रस्तावावर चर्चा होऊन प्रस्ताव स्थगित ठेवण्याचा निर्णय झाला होता.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी हे सदरील स्थगित प्रस्ताव सर्वसाधारण सभेस परत सादर करुन प्रस्तावित करित आहे की, शहरातील साफ सफाई व स्वच्छतेचा व्याप वाढला असुन सुंदर व स्वच्छ औरंगाबाद ठेवणेसाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत विभाग क्र. ६ च्या कार्यक्षेत्रात प्रायोगिक तत्वार खाजगी संस्थेस अथव बिनसरकारी संघटना, कामागार सहकार संघटना व नोंदणीकृत ठेकेदार किंवा भागीदार यांच्यापैकी एकाव्दारे संपुर्णत: साफसफाई व स्वच्छता एक वर्षाच्या कालावधीसाठी खाजगीकरण करणे योग्य राहील या खाजगीकरणामुळे विभागीय कार्यालयातील कार्यरत कायम कर्मचाऱ्यांवर कोणताही परिणाम होणार नाही. तेथील कर्मचारी इतर भागात विभागाले जाऊन त्यांचेकडुन काम करुन घेण्यात येईल. जसे नागपुर,अमरावती, महानगरपालिकेची तसेच सिडको प्रशासनाने

साफसफाई व स्वच्छतेचे खाजगीकरण करुन योजना राबविली आहे. त्याच पध्दतीने औरंगाबाद महानगरपालिका विभाग क्र. ६ च्या कार्यक्षत्रात स्वच्छतेचे व साफसफाईचे खाजगीकरण करणेस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर करण्यांत येते आहे.

संवाद

श्री. घोडेले नंदकुमार : प्रायोगिक तत्वावर देण्यांत यावे, कायम स्वरुपी ठेऊ नये, हा प्रस्ताव मंजुर करावा.

श्री. सुदाम सोनवणे : महानगरपालिकेकडे कर्मचारी आहे, सध्या चांगल्याप्रकारे साफसफाई होत आहे. खाजगीकरण न करता आपल्याच कर्मचाऱ्याकडुन साफसफाईची कामे करुन घ्यावी. कामगारावर अन्याय होण्याची शक्यता या प्रस्तावाच्या माध्यमातुन होईल. म्हणुन हा प्रस्ताव नामंजुर करुन महानगरपालिकेच्याच कामागाराकडुन साफसफाई व्हावी. जकातीचे खाजगीकरण करण्यात यावे.

श्री. संजय शिरसाठ : सर्वात जास्त उत्पन्न जकातीपासुन मिळणार आहे. झोनचे खाजगीकरण केल्यास येथे सध्या वर्ग-३,४ चे कर्मचारी काम करतात. खालच्या वर्गापासुन सुरुवात केल्यास गोरगरीब कर्मचाऱ्यांवर अन्याय केल्यासारखे होईल. म्हणुन झोनची साफसफाईचे खाजगीकरण न करता जकातीचे करावे, हा प्रस्ताव नामंजुर करावा, सर्वांना न्याय सारखाच द्यावा दोन वर्षापुर्वी जकात खाजगीकरणाचा दोन वर्षापासुन प्रस्ताव मंजुर झालेला आहे, त्या संबंधीची अंमलबजावणी करावी.

मा. महापौर : हा विषय स्थगित करण्यांत येत आहे.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित करण्यास सर्वानुमते देण्यात येते.

**विषय क्र. ५८८/६:**

दिनांक २०-१२-२००१ रोजी सर्वसाधारण सभेपुढे अण्णाभाऊ साठे मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृह, समाज कल्याण विभागास भाडे तत्वावर चालविण्यासाठी देण्याबाबतचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. परंतु सदरचा प्रस्ताव फेटाळुन लावण्यात आला व महानगरपालिका मार्फत वस्तीगृह चालविण्यात यावे या बाबत ठराव क्र. ५४३/३ नुसार मंजुर करण्यांत आला.

परंतु सदरचे वस्तीगृह चालु ठेवण्याकरिता दरवर्षी ५.५० लक्ष पर्यंत अपेक्षित खर्च येणार आहे. ही बाब लक्षात घेऊन सदरचे वस्तीगृह भाडे तत्वावर चालविण्यासाठी समाज कल्याण विभागास देण्याबाबत प्रस्ताव पुनविचारार्थ सादर.

**ठराव क्र. ५८८/६:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अण्णाभाऊ साठे मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृह, समाज कल्याण विभागास भाडे तत्वावर चालविण्यासाठी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८९/७:**

सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, समर्थनगर मंजुर रेखांकनात सर्व भुखंडाच्या मागील बाजुस १५ फुट रुंदीची गल्ली मैला व घाण पाणी वाहुन नेण्यासाठी ठेवण्यात आलेली होती. सदरील भागात भुमिगत जलनि:सारण वाहिनी उपलब्ध असल्याने सदरील गल्लीचे प्रयोजन नाही. म्हणुन यापुर्वी विषय क्र. १०९२/८ दिनांक २८-४-१९८९ च्या ठरावात निश्चित केलेली र. रु. १८४८/- आकारुन ७.६X ५०- ३७५.०० चौ. फुट म्हणजेच ३४.८५ चौ.मी. क्षेत्राची गल्ली देण्यात येते असे यात बदल करुन ठराव क्र. १०७ दिनांक २३-२-१९९५ नुसार र. रु. ५०,३६०/- आकरण्यात येते. तथापी आता ६ ते ७ वर्षाचा कालावधी लोटला असुन जमीनीच्या किमतीत झालेली वाढ विचारात घेता पुर्वीचा दर बदलुन आता सध्याच्या शिघ्र सिध्द गणकाप्रमाणे ७.६X ५०- ३७५.०० चौ. फुट (३४.८५ चौ.मी.) क्षेत्रासाठी सन २००२ चे बाजार मुल्य दर तक्ता झोन क्र. १.१४१ नुसार रु. ४०००/- प्रति चौ.मी. प्रमाणे रक्कम रु. १,३९,४००/- (एक लाख एकोणचाळीस हजार चारशे फक्त) आकारुन दोन्ही बाजुच्या भुखंड धारकांना गल्ली बांधकामासाठी चटई क्षेत्र निर्देशांक वाढविण्यासाठी व त्या गल्लीचा केवळ सामासिक अंतर म्हणुन उपयोग करण्यासाठी वाढवुन देण्यात यावी. तसेच सदरची वाढ ही आतापर्यंत ज्यांनी रु. ५०,३६०/- महानगरपालिकेच्या खजिन्यात जमा केले नाही त्या सर्व अर्जदारांना लागु करण्यात यावा. यापुढे दर वर्षाचे सिध्द शिर्घ्र गणकाप्रमाणे भुखंड क्षेत्राचे किंमतीत वाढ करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरस्तव सादर.

संवाद

श्री. आनंद तांदुळवाडीकर : हा प्रस्ताव माझ्या वार्डातील असुन दोन प्लॉटच्या मागील १५ फुट गल्ली आहे. गेल्या १० वर्षापुर्वी रु. १८४८/- रु प्रमाणे जागा देत होतो. ५० हजारावरुन १.३९ लक्ष ठेवण्यात आलेले आहे.

श्री. जयवंत ओक : रकमेत खुप वाढ झालेली आहे. शंका निर्माण होते.

मा. महापौर : हा प्रस्ताव स्थगित करण्यांत येत आहे.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ५९०/८:**

मा. आयुक्त, महानगरपालिका यांची मान्यता दि. २६-३-२००२ नुसार प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका अग्निशमन विभागातील खाली अग्निशमन अधिकारी यांना उत्कृष्ठ कार्याबद्दल मा. राष्ट्रपती, भारत सरकार, दिल्ली यांच्यातर्फे पुरस्कार प्रदान करण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नांव/पद | पुरस्काराचे स्वरुप | प्रदान दिनांक |
|---|---|---|---|
| १. | श्री. शिवाजी बाबुराव झनझन मुख्य अग्निशमन अधिकारी | अग्निशमन शौर्यपदक | २६-०१-१९९७ |
| २. | श्री. किसन पांडुरंग राऊत सब ऑफिसर. | अग्निशमन गुणवत्ता सेवापदक | २६-०१-१९९७ |
| ३. | श्री. रंगनाथ रामराव कुबेर सब | अग्निशमन गुणवत्ता | २६-०१-२००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | ऑफिसर. | सेवापदक | |

करिता वरील अग्निशमन अधिकारी यांना उपरोक्त पुरस्कार मिळाल्याच्या तारखेपासुन १ (एक) आगाऊ वार्षिक वेतनवाढ देण्याचा प्रस्ताव महानगरपालिका सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव व वैधानिक कार्यवाहीस्तव सादर.

संवाद

श्री. दानवे अंबादास : राष्ट्रपती पुरस्कार मिळालेला आहे. आगाऊ वर्षिक वेतनवाढ देण्याबाबत प्रस्ताव आहे, अग्निशमनचे शहरात तीन केंद्र चालतात. मागील वर्षभरात या विभागामार्फत अनेक चांगल्या कामगिरी केलेल्या असुन वसुलीत सुध्दा सहभाग झालेला आहे. वर्षभरात ज्या आगीच्या घटना घडल्या त्यात चांगले काम या विभागातील कर्मचारी/ अधिकारी यांनी केलेले आहे. आता १५ दिवसापुर्वी एक मीलला आग लागलेली होती यात स्वत: श्री. झनझन व इतर अधिकारी/कर्मचारी यांनी चांगली कामे केलेले आहे. म्हणुन १ ऐवजी २ (दोन) वेतनवाढ देण्यांत यावी, अशी विनंती करीत आहे. प्रशासनाला काय योग्य वाटेल ते करावे, ३ केंद्र असुन आणखी चिकलठाणा एम.आय.डी.सी. मध्ये केंद्र सुरु होणार आहे. येणाऱ्या काळात डिझेलपंप, रॉकेलचे गोडाऊन्स,आय.पी.आय. चे गोडाऊन्स पेट्रोल पंप, अल्कोहोलचे गोडाऊन्स, एल.पी.एल चे गोडाऊन, केमीकल गोडाऊन पेन्ट शॉप या सर्वांवर विकास नियंत्रण नियमावली नुसार जसे हॉटेल यांना कम्पंलसरी केले तसे येणाऱ्या काळात यासाठी सुध्दा करावे. लागणार आहे तसेच या विभागाला स्वत: विभाग प्रमुखाचे अधिकार द्यावेत. जे आर्थिक व प्रशासकिय अधिकार इतर विभागप्रमुखांना आहे, त्याप्रमाणे द्यावे. अनेक कामे मार्गी लागतील म्हणुन २ वेतनवाढ देऊन तात्काळ कार्यवाही व्हावी. ज्यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाले अशा सर्वाना वेतनवाढ द्यावी. इतरांचा वेगळा प्रस्ताव आणावा.

श्री. जयवंत ओक : राष्ट्रपती पुरस्कार केव्हा मिळाले त्या तारखा नमुद केल्याप्रमाणे बरोबर नसेल तर दुरुस्ती करावी. एम.आय.डी.सी. चे केंद्र चालु करावे.

मा. महापौर : दुरुस्ती करुन घ्यावे.

श्री. डॉ. कराड भागवत : महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. १ वेतनवाढ द्यावी. व जनतेच्या तक्रारीचे निवारण वेळेवर व्हावे. एक किंवा जास्त वेतनवाढ देऊ नये.

श्रीमती लिलवती धायातिलक : जिल्हा परिषद मध्ये ज्या शिक्षकांना पुरस्कार मिळाले, त्यांना २ वेतन वाढ आता पर्यंत दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे यांना सुध्दा द्यावेत.

श्री. डॉ कराड भागवत : या विभागातील एकंदरीत ५० संचिकेची पाहणी करावी. एकही रिपोर्ट चांगला नाही. वेगवेगळया सुचना, शेरे संचिकेमध्ये अधिकारी देतात, व काम करण्यास उशीर केला जातो. काही कंपन्या यांना बांधकाम परवानगी देतांना अग्निशमन विभागाचे प्रमाणपत्र लागते, परंतु कंपनी मालक हे महानगरपालिकेकडे अर्ज न करता मुंबई हुन प्रमाणपत्र आणतात. व त्यानंतर त्यांना बांधकाम प्रमाणपत्र मिळते. यास एकमेव कारण संबंधीत या महानगरपालिकेचे अग्निशमन अधिकारी त्यांची कुठे आग लागल्यास त्या बध्दलची कामगिरी त्यांची चांगली आहे, परंतु हॉटेलस, कंपनी मालक यांना

त्यांचे कडुन त्रास दिला जातो. याची खबरदारी घ्यावी व तशी ताकीद देऊन एक वेतन वाढ देण्यात यावी.

श्री. सुदाम सोनवणे : १ ऐवजी दोन वेतनवाढ द्यावेत गेल्या काही दिवसापुर्वी पक्षाचे नेते श्री. जैस्वाल यांचा म्हैसमाळ येथील तलावात बुडुन मृत्यु झाला, त्यावेळी महानगरपालिकेच्या या विभागातील अधिकारी यांचेसह तेथे ८ तास पाण्यात राहुन मृतदेह बाहेर काढला या विभागाचे अधिकारी/कर्मचारी जीव धोक्यात टाकुन कामे करतात. तसेच शहरात सॉ मिळला आग लागल्यानंतर लगेच या विभागातील कर्मचारी तेथे जाऊन आग आटोक्यात आणुन ७-८ व्यक्तीचे प्राण वाचविले, तसेच आताच स. सदस्य श्री. डॉ. कराड यांनी जो आरोप केला त्यानुसार खुलासा करु इच्छितो की, जो कुणी हरकत कागदपत्राची पुर्तता करीत नसेल तर त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देता येणार नाही व बोगस प्रमाणपत्र देणे ही प्रवृत्ती श्री. झनझन यांचेत नसल्याने त्यांचेवर आरोप करणे बरोबर नाही. व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याचे दृष्टीने ते चांगले काम करीत आहे. दोन वेतनवाढ देण्यांत यावी.

श्री. कोकाटे काशिनाथ : संबंधीत अधिकारी यांनी चांगली कामगिरी केलेली असल्याने राष्ट्रपती पुरस्कार त्यांना मिळालेला आहे. आताच माजी महापौर यांनी आपले वैयक्तिक मत व्यक्त केले. गेल्या ५ वर्षात चांगली कामगिरी या विभागाने केलेली आहे, व त्याचाच फायदा म्हणुन त्यांना राष्ट्रपती भारत सरकार दिल्ली, यांचेतर्फे पुरस्कार प्रदान केलेला आहे. या महानगरपालिकेची तेथे नोंद झालेली आहे. म्हणुन या अधिकाऱ्याचा गुण गौरव चांगल्या रितीने होणे अत्यंत गरजेचे आहे. महानगरपालिका अग्निशम विभागाचे काम चांगले असुन या विभागाचा अनेक ठिकाणी उल्लेख केला जातो. म्हणुन स. सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा.

श्रीमती लिलावती धायतिलक : जिल्हा परिषद शिक्षण विभागामध्ये ज्या शिक्षकांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाले अशांना दोन वतेनवाढ केलेल्या आहेत. या अधिकाऱ्यांना सुध्दा दोन वेतनवाढ द्यावेत.

श्री. घडामोडे भगवान : संबंधीत अधिकारी व त्यांचे सहकारी यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळालेला आहे. सर्व सभागृहाने त्यांची प्रशंसा केलेली आहे. काम चांगल्या प्रकारे करतात, म्हणुन डॉ. कराड यांनी सुध्दा तारीफ केलेली आहे. राष्ट्रपती पुरस्कार मिळालेले किती कर्मचारी/अधिकारी या महानगरपालिकेत आहे, त्यांची सुध्दा २ वेतनवाढ देण्याबाबत मागणी होईल व त्यांनाही दोन वेतनवाढ देणार काय? चर्चा होत असतांना काही सदस्य अधिकाऱ्यांचे बाजु घेतात व काही विरोध करतात असा गैरसमज झालेला आहे. तो गैरसमज काढुन योग्य निर्णय घेण्याबाबत सुचवावे. चांगले काम केल्याबध्दल त्यांना पुरस्कार घ्यावा. परंतु वेतनवाढ देऊ शकतो का याचा योग्य विचार करुनच निर्णय घ्यावा १ वेतनवाढ द्यावी. जनतेच्या सुविधा पुर्ण करणे गरजेचे आहे.

श्री. डॉ कराड भागवत : संबंधीत अधिकारी यांचे सत्कारासाठी आमचे मानधन घ्यावे. परंतु २ वेतन वाढ देऊ नये, महानगरपालिकेचे नुकसान होणार आहे. जनतेचा पैसा जनतेसाठी वापरावा असे माझे मत आहे.

श्री. सुदाम सोनवणे : श्री. झनझन यांना व इतर दोन कर्मचाऱ्यांना २ वेतनवाढ द्यायचे आहे. या संबंधी चर्चा चालु आहे. त्यांचा सत्कार करणे किंवा वेतनवाढ देणे. बाबत

संबंधीत अधिकारी महानगरपालिकेस अर्थिक फायद्यासाठी मागणी करतात. असा प्रकार नाही ते मुळातच श्रीमंत आहे, परंतु त्यांनी चांगले काम केले व पुरस्कार मिळालेले कर्मचारी असल्याने त्यांना दोन वेतनवाढ देण्यांत यावे. श्री. साजिद हे ६ वर्षापासुन निलंबीत होते. त्यांना पुन्हा कामावर घेतले. यात महानगरपालिकेचे ६ लक्ष रुपयाचे नुकसान झाले त्यावेळी का महानगरपालिकेचे हितद बघीतले नाही. एक ऐवजी दोन वेतनवाढ देण्यांत यावी.

श्री. डॉ. कराड भागवत : एखादया अधिकाऱ्यांना वेतनवाढ देऊन त्यात त्यांचे रहस्य नाही. म्हणुन एखादया मोठया कार्यक्रमामध्ये त्या अधिकाऱ्यांचा सत्कार झाला तर त्यामध्ये त्यांचा खरा मोठेपणा आहे. त्यासाठी महानगरपालिकेतर्फे विशेष कार्यक्रम घेऊन या अधिकाऱ्यांचा सत्कार व्हावा.

मा. महापौर : एक ऐवजी दोन वेतनवाढ देण्यांस मंजुरी देण्यांत येते व ठराव मंजुर झाल्यापासुन या बाबतची अंमलबजावणी करावी.

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तवित अ.क्र.१ ते ३ मधील अधिकारी व कर्मचारी यांना मा. राष्ट्रपती भारत सरकार, दिल्ली यांचे तर्फे पुरस्कार मिळाले असल्याने औरंगाबाद महानगरपालिकातर्फे त्यांना सदर ठराव पारित झाल्याचे तारखे पासुन म्हणजेच दिनांक २४-४-२००२ पासुन पत्येकी दोन आगाऊ वार्षिक वेतनवाढ देण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९१/९:**

सहाय्यक संचालक, नगररचना, महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की. औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार आरक्षण क्र.डी. /१ "ड्रमा थिएटर" या प्रस्तावाने बाधीत मिळकत सर्व्हे क्र. ८९ क्षेत्र ०.८१ आर.आहे.

उक्त मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दि. ९-१-२००२ रोजी महानगरपालिकेस दिलेली आहे.

उपरोक्त खरेदी सुचनेनुसार सहा महिन्याच्या आत म्हणजे दिनांक ८-६-२००२ पुर्वी भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. जर मुदतीच्या आत भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविला गेला नाही, तर सदरील आरक्षण रद्द/व्यपगत होईल व लगतच्या विकास योजनेचा वापर देय होईल बांधकाम परवानगी द्यावी.

सबब सदर आरक्षणाने बाधीत संपुर्ण क्षेत्र संपादन करणेसाठी भुसंपादन प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. भुसंपादनासाठी अंदाजे रुपये ५० लाख अपेक्षित आहे. करिता भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे मुदतीपुर्वी म्हणजे दि. ८-६-२००२ पुर्वी पाठविणेसाठी मान्यतेस्तव सादर.

संवाद

श्री. घोडेले नंदकुमार : कोणत्या भागात जागा आहे, जागेची सध्याची स्थिती काय आहे, असे प्रस्ताव ठेऊन दिशाभुल करित असेल तर चुकीची पध्दत आहे प्रस्तावात सविस्तर माहिती नाही. ५० लक्ष मुल्य गृहीत धरले कोणता निकर्ष लावण्यात आला याचा सुध्दा सुलासा द्यावा.

श्री. सुदाम सोनवणे : पुढील बैठकीत सविस्तर प्रस्ताव आणावा यास नामंजुर करावे. सभागृहात कोरम सुध्दा नाही. सभेचे कामकाज थांबवावे.

श्री. घोडेले नंदकुमार : शासनाचे आदेश असतील, न्यायालयाचे असतील परंतु खरोखरच "ड्रामा थिएटर ची तेथे आवश्यकता आहे का? गरजेच असेल तरच ५० लाख रु. द्यावे. या भागात पाण्याचे टाकीसाठी जागेचे भुसंपादन केले, प्रस्ताव पास केला. १४ लक्ष देण्यास नाही. ५० लक्ष कोठुन देणार. व ड्रामा थिएटर कोठे उभारणार आहेत. असे बेजबाबदार प्रस्ताव यावयास नको, संबंधित विभागास ताकीद द्यावी.

श्री. स. अली सलामी : ज्या ज्या प्रकरणात १२७ ची नोटीस देऊन कार्यवाहीसाठी आहे, सर्व रद्द करावे, महानगरपालिकेकडे सध्या पैसा नाही. निर्णय घ्यावा सभा बोलवावी जे डिलीट करता येतील ते करावे.

मा. महापौर : हा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास सर्वानमुते मंजुरी देण्यांत येते.

**संवाद**

श्री. दानवे अंबादास : विरोधी पक्षनेते यांनी स्थायी समिती सभेत प्रश्न उपस्थित केलेला होता की, गारखेडा भागामध्ये सर्व्हे नं. ५०/१ ते ५३/१ ही महानगरपालिकेने ३ एकर जागा खरेदी केलेली होती. आता ३ एकर जागा उपलब्ध नाही. २ १/२ (अडीच) एकर पेक्षा सुध्दा कमी आहे. या जागेला तार कुंपन नाही. जेव्हा १ ते २ लक्ष खर्च केलेले आहे कुंपन राहिले नाही. परंतु जी जागा आहे, ती सुध्दा सुरक्षित नाही. जेव्हा खरेदी केली, तेंव्हा कुणी संबंधीत अधिकारी होते. त्यांनी मोजमाप करुन जागा घेतली होती का. हा महत्वाचा प्रश्न आहे बरोबर नसेल तर रक्कम अदा कशी केली. अशी माहिती मिळते की, अर्ध्या एकर जागेवर एका बिल्डरने स्वत:चे बांधकाम केलेले आहे व त्यास महानगरपालिकेने परवानगी सुध्दा दिलेली आहे. प्रत्यक्ष पाहणी व्हावी. कमेटी वगैरे न करता यासाठी प्रशासन चौकशी करेल. व्यावसायिक झोनचे निवासी व निवासी झोनचे व्यायसायिक झोन म्हणुन भरपुर परवानगी देण्यांत आलेल्या आहे, या विभागाचे काम बरोबर नाही, याचा अनुभव आपण जनता दरबारात घेतलाच आहे. ही जागा महानगरपालिकेने विकत घेतलेली आहे. जागा ताब्यात घेतलेली नसतांना रक्कम देण्यात आलेली आहे का. याची चौकशी होणे जरजेचे आहे. अशी अनेक प्रकरणे असतील यामुळे महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे.

श्री. सुदाम सोनवणे : आताच स.स.श्री. दानवे यांनी मुद्दा उपस्थित केला त्यानुसारच शहरातील श्रीमती मानकापे स.सदस्या यांचे वार्डात एक ले-आऊट मंजुर असलेल्या ओपन स्पेस आहे. या जागेला तार कुंपन सुध्दा आहे. तेथे महानगरपालिकेच्या मालकीची विहीर सुध्दा आहे. व त्या विहीरीवर विद्युत मोटार, त्याचे येणारे बील सुध्दा महानगरपालिका भरते. दुर्द्रव असे की, या जागेवर एक व्यक्ती शेती पध्दतीने मशागत करुन भाजीपाला उत्पन्न काढतो. जे पाणी विहीरीतुन भाजीपाल्यासाठी काढले जाते. त्याचे वीज बील महानगरपालिका भरते. या विभागात फार मोठा अंदाधुदी कारभार चालु

आहे. एम.आय.डी.सी. भागात एम.आय.डी.सी. झोन असतांना एका मालकाला ७-८ एकर जागा निवासी झोन म्हणुन परवानगी देण्यांत आलेली आहे. तयासाठी या विभागावर सविस्तर चर्चा करण्यासाठी बैठक बोलवावी. या विभागातील अधिकारी कामे करित नाही. जनता दरबारात काय झाले त्याचा सुध्दा अहवाल सभागृहात आला पाहिजे. व दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई झाली पाहिजे.

श्री. दानवे अंबादास : आपण जनता दरबार घेतला किती व कोणत्या तक्रारी होत्या किती तक्रारीचे निवारण करण्यात आले यांचा सविस्तर अहवाल या सभागृहात देण्यात यावा. येणाऱ्या बैठकीत तो अहवाल ठेवावा व दोन प्रकरणाच्या बाबतीत आताच स.स. सोनवणे यांनी प्रश्न उपस्थित केला व ५०/१,५३/१ या जागेच्या संदर्भात सखोल चौकशी करुन कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात यावा.

श्री. किशोर तुलशीबागवाले : सर्व्हे नं. ५०/१,५३/१ गारखेडा येथे सद्यः स्थितीत २ १/२ (अडीच) एकर जागा असुन उर्वरित जागेवर २०x३० चे प्लॉट पाडुन लोक राहतात, संरक्षित भिंत बांधवी नसता जी जागा आहे, त्यावर सुध्दा अतिक्रमण होण्याची शक्यता आहे.

मा. महापौर : जो प्रश्न स. सदस्यांनी जागेच्या संदर्भात उपस्थित केला त्याचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा. त्यासाठी कमेटी गठीत करण्यात येत असुन कमेटीत स.स.श्री. किशोर तुलशीबागवाले, स.सदस्य श्री. अंबादास दानवे, स.सदस्य श्री. कैसर खान, स.सदस्य श्री. सुरजीतसिंग खुंगर व प्रशासनातर्फे कार्यकारी अभियंता (ड्रेनेज व विद्युत) यांचा समावेश करण्यांत येत आहे. अहवाल सादर करुन संबंधीत यांना सुचना करण्यांत येत आहे की, ही जागा सुरक्षीत कशी राहिल यासाठी कार्यवाही करावी.

"पुरवणी विषय"

**विषय क्र. ५९२/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, नंदनवन कॉलनी परिसरात न्यु शांतीपुरा स.नं.२९-३० मधील महानगरपालिकेची नियमानुसार खुली जागा ध्यान साधन केंद्रासाठी महानगरपालिकेतर्फे देण्यात यावी जेणे करुन तेथील नागरीकांना अध्यात्माची ओढ लागुन त्यांचे मनाची शांती होईल.

सदरील जागेवर मेडीटेशन एज्युकेशन ट्रेनिंग ट्रीटमेंट अकॅडमी, औरंगाबाद ही संस्था साधना केंद्र उभारण्यास तयार आहे. व सदरील संस्थेत जागा दिल्यास महानगरपालिकेचे अटी/शर्ती त्यांना मान्य आहेत, तसे त्यांनी पत्र दिले आहे.

करिता न्यु शांतीपुरा स.नं. २९-३० मधील महानगरपालिकेची नियमानुसार खुली जागा साधना केंद्रासाठी मेडीटेशन एज्युकेशन ट्रेनिंग ट्रीटमेंट ॲकडमीस देणे बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर

सुचक : श्री. राजु शिंदे, श्री. भगवान घडामोडे
अनुमोदक : डॉ. श्री. भागवत कराड, श्री. संजय शिरसाठ,
श्री. गणेश तांबे.

संवाद

श्री. स.अली सलामी : असे प्रस्ताव नगररचना विभागामार्फत यावेत. खुली जागा देऊ शकतो का. प्रशासकिय खुलासा घ्यावा.

मा. महापौर : सर्व पुरवणी विषय व ऐनवेळचे विषय मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नंदनवन कॉलनी परिसरात न्यु शांतीपुरा स.नं.२९-३० मधील महानगरपालिकेची अनुज्ञेयहोणारी खुली जागा ध्यान साधन केंद्रासाठी मेडीटेशन एज्युकेशन ट्रेनिंग ट्रीटमेंट अकॅडमी, औरंगाबाद यांना महानगरपालिकेच्या अटी/शर्ती नुसार देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९३/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सिडको-हडकोतील नागरिकांना सध्याचे काळात महानगरपालिकेतर्फे आवश्यक तेव्हढे पाणी पुरवठा करण्यांत येत नाही. त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी खुप त्रास सहन करावे. लागत आहे. महानगरपालिकेतर्फे जी नविन एक्सप्रेस पाणी पुरवठा लाईन (७ कोटीची योजना) टाकण्यात येणार आहे, त्याचे कामासाठी १ वर्षापेक्षा जास्तीचा कालावधी लागणार आहे जानेवारी महिन्यातच या भागातील नागरिकांना पाण्यासाठी इतरत्र फिरावे लागत आहे. याचा विचार करता उन्हाळयात तर या नागरिकांना पाणीच मिळु शकणार नाही.

या भागातील नागरिकांकडुन महानगरपालिकेस सर्वात जास्त वॉटर टॅक्सचा भरणा होतो. परंतु त्या प्रमाणात पाणी पुरवठा महानगरपालिकेतर्फे करण्यांत येत नाही. तरी उन्हाळयात या नागरिकांना पाणी पुरवठा करणेसाठी एम.आय.डी.सी. कडुन एक वर्षासाठी अथवा ४ महिन्यासाठी पाणी पुरवठा उपलब्ध करुन तेथील नागरिकांना दिल्यास त्यांचा त्रास कमी होईल. तरी एम.आय.डी.सी. तर्फे पाणी घेणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर

सुचक : श्री. राजु शिंदे, श्री. भगवान घडामोडे
अनुमोदक : डॉ. श्री. साहेबराव कावडे, सौ. जयश्री मोरे,

**ठराव :**

प्रस्तावा दर्शविल्याप्रमाणे, सिडको-हडकोतील नागरिकांना वेळेवर पाणी पुरवठा होणेसाठी एम.आय.डी.सी. कडुन १ वर्ष अथवा ४ महिन्यासाठी पाणी पुरवठा उपलब्ध करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९४/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सरस्वती भुवन कॉलनी ही मंजुरी रेखांकनातील वसाहत आहे. या वसाहतीचे रेखांकन मंजुर करतांना नियमानुसार १०% खुली जागा सरस्वती भुवन संस्थेने वसाहतीचे दक्षिणेस क्रिडांगण व उत्तरेस उद्यानासाठी सोडलेली आहे. या वसाहती मधील या भागात उद्यान व क्रिडांगण नसल्यामुळे त्याची अत्यंत गैरसोय होत आहे. रहिवाशांची गैरसोय विचारात घेता या वसाहतीमध्यील दक्षिणेकडील खुल्या जागेत

क्रिंडागण तसेच उत्तरे कडील खुल्या जागोत उद्यान विकासीत करणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सुचक : चंद्रशेखर जैस्वाल.

अुनमोदक : श्री. जयवंत ओक, श्री. आनंद तांदुळवाडीकर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सरस्वती भुवन कॉलनी ही मंजुरी रेखांकनातील या मंजुरी व उत्तरेस असलेल्या खुल्या जागेत उद्यान विकसीत करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९५/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेतर्फे दैनिक वर्तमान पत्रात देण्यांत आलेल्या जाहिरात मनपा जा. क्र. /१२९/२००२ दिनांक २३-२-२००२ अन्वये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यास आमची काहीही हरकत नाही. परंतु महानगरपालिका ९ ते ४५ मीटर रुंदीकरणातील अतिक्रमण म्हणुन टपरी धारकांना हटवित आहे. महानगरपालिका त्यांच्याकडुन सुमारे १० ते १५ वर्षापासुन भाडे घेत आहे, सध्या उदानिर्वाहाचे ते साधन आहे. शहरात आधीन बेरोजगारी असुन टपऱ्या हटविल्यास आणखीण बेरोजगारी वाढेल.

करिता अतिक्रमणे हटविणे नियमित भाडे धारकांना सहानुभुतीपुर्वक विचार करुन त्यांना महानगरपालिका कमर्शिअल झोन मध्ये पर्यायी जागा देण्याचा विचार करण्यात यावे, व पुढील रुपरेषा ठरविण्यासाठी सर्वसाधारण सभेत चर्चा करण्यासाठी प्रस्ताव सादर.

सुचक : श्री. किशोर तुळशीबागवाले

अनुमोदक : श्री. अ.रशिद अ. सत्तार, श्री. नासेर खान, मिर हिदायत अली.

**टराव :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेतर्फे ९ ते ४५ मीटर रुंदीकरणातील १० ते १५ वर्षापासुन भाडे भरणा करित असलेल्या टपरी धारकांना महानगरपालिका कमर्शियल झोन मध्ये पर्यायी जागा देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९६/५ :**

सर्वसाधारण सभेचे प्रस्ताव सादर करण्यांत येतो की. शासनाने महानगरपालिका हद्दीतील क्षेत्रास गुंठेवारी आध्यादेश लागु केलेला आहे. सदर अध्यादेशावर यापुर्वी चर्चा झालेली आहे. मुंबई, ठाणे, कोल्हापुर, सांगली व सोलापुर महापालिकेच्या क्षेत्रातील व औरंगाबाद क्षेत्रातील परिस्थिती भिन्न आहेत. दोन्हीकडील भौगोलिक, सामाजिक व ऐतिहसिक प्रश्न वेगवेगळे आहेत. त्यामुळे गुंठेवारी अध्यादेश औरंगाबाद सारख्या महानगरपालिकेच्या क्षेत्राला लागु करु नये. हया संदर्भात मोर्चेकऱ्यांनी मागण्याचे निवेदन दिलेले असुन त्या निवेदनासह हा ठराव शासनाला पाठावावा. म्हणुन हा प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

सुचक : श्री. जयवंत ओक

अनुमोदक : सौ. कचराबाई लोखंडे, श्री. बाळासाहेब थोरात,
श्री. नंदकुमार घोडेले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाने महानगरपालिका हद्दीतील क्षेत्रास गुंठेवारी अध्यादेश लागु केलेला आहे. मुंबई, ठाणे, कोल्हापुर, सांगली व सोलापुर महापालिकेच्या क्षेत्रातील व औरंगाबाद महानगरपालिकेच्या क्षेत्रातील परिस्थिती भिन्न असल्यामुळे या संदर्भात जे मोर्च निघाले होते. त्यांचे निवेदनासह हा ठराव शासनास पाठविणे. सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९७/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत वसाहतीमध्ये नागरिकांना महानगरपालिकेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकास व अन्ये निधीमधुन मुलभुत गरजा पुरविलेल्या आहेत. त्या रस्ते, लाईट, नळ, ड्रेनेज इत्यादी शासनाने गुंठेवारीच्या अध्यादेशामुळे महानगरपालिका प्रशासनांनी बंद केलेल्या आहेत. त्यावर महानगरपालिका व शासनाचा तसेच आमदार निधी खासदार निधी, नगरसेवक निधीतुन खर्च झालेला आहे. त्याचा विचार व्हावा व दिलेल्या सुविधा नळ,लाईट, रस्ते, ड्रेनेज या मुलभुत सोयी पुर्ववत चालु ठेवाव्यात व त्यांची देखभाल व दुरुस्तीही करण्यांत यावी. असा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी सादर.

सुचक : श्री. जयवंत ओक
अनुमोदक : श्री. कचराबाई लोखंडे, श्री. बाळासाहेब थोरात,
श्री. नंदकुमार घोडेले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत वसाहतीमध्ये नागरिकांना महानगरपालिकेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकास व अन्ये निधीमधुन मुलभुत गरजा पुरविलेल्या आहेत. तसेच आमदार निधी खासदार निधी, नगरसेवक निधीतुन खर्च झालेला आहे. करिता पुर्वी जेथे-जेथे सुविधा पुरविण्यांस आले जसे रस्ते, नळ,लाईट, ड्रेनेज इत्यादी मुलभुत सोयी पुर्ववत चालु ठेवण्यास व त्यांची देखभाल व दुरुस्ती करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९८/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, गेल्या अनेक वर्षापासुन सिडको-हडकोतील जनता त्रासाला सामोरे जात आहे. सिडको-हडको पाणी प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात गेल्या अनेक वर्षापासुन महानगरपालिकेच्या प्रत्येक सर्वसाधारण सभेत मांडला जात असतांना सुध्दा प्रश्न सुटलेला नाही. त्यामुळे स्थानिक आमदार, खासदार, वार्डातील नगरसेवक व महानगरपालिकेचे पदाधिकारी यांच्या बद्दल सिडको हडकोतील जनतेची नेहमीच आरडा-ओरड होत होती. व या परिसरातील नागरिक पाणीपट्टी भरण्यासंदर्भात नाराजी होत होती. सिडको-हडकोतील पाण्याची टंचांई होऊन व नागरिकांच्या पाण्यापासुन होणाऱ्या त्रासाची जान लक्षात घेवुन या शहरामध्ये माजी पालकमंत्री व सध्याचे खासदार मा. श्री. चंद्रकांतजी खैरे साहेब, शहराचे महापौर मा. श्री. विकास जैन, सभापती मा. श्री. प्रशांतजी देसरडा, उपमहापौर श्री. राजुजी शिंदे व महाराष्ट्र शासनाचे पाणी पुरवठा मंत्री मा. श्री. आर.आर.

पाटिल साहेब, व महानगरपालिकेचे आयुक्त मा.श्री. डॉ. शैलेशकुमार शर्मा यांनी सिडको-हडकोचा पाणीप्रश्न सोडवला व या परिसरातील नागरिकांना न्याय दिला त्याबद्दल मी माझ्या वार्डातील नागरिकातर्फे व माझ्यातर्फे वरील मान्यवरांचे आभार मानते. व अभिनंदन करते व धन्यवाद देते.

सुचक : सौ. जयश्री मोरे
अनुमोदक : श्री. बाळासाहेब थोरात, श्री. सुदाम सोनवणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको-हडकोतील जनतेला पाणी पुरवठयासाठी होणाऱ्या त्रासाची जान लक्षात घेवुन महाराष्ट्र शासनाचे पुरवठा मंत्री मा. श्री. आर.आर. पाटिल साहेब, व विद्यमान खासदार मा. श्री. चंद्रकांतजी खैरे साहेब, शहराचे महापौर मा. श्री. विकास जैन, उपमहापौर श्री. राजुजी शिंदे, सभापती मा. श्री. प्रशांतजी देसरडा व मा. आयुक्त श्री. डॉ. शैलेशकुमार शर्मा यांनी सिडको-हडकोचा पाणीप्रश्न सोडवला व त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९९/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका तांत्रिक विभागात सध्या कार्यकारी अभियंताची दोन पदे व उप अभियंताची तीन पदे रिक्त असुन या पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविलेला आहे. यामुळे कार्यरत असलेल्या अभियंता संवर्गामधील अधिकाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण पडत असुन त्यांचे कडुन दैनंदिन कामे पुर्ण करणेस विलंब होतो. त्यामुळे वेळोवेळी नगरसेवकांची कामे पुर्ण होत नसल्यामुळे त्यांना प्रभागातील नागरिकांचा रोष पत्कारावा लागतो. नेहमी नगरसेवक व अधिकारी यांच्यात कामातील दिरंगाईमुळे वादविवाद होतात.

महानगरपालिका तांत्रिक विभागातील दैनंदिन कामकाज सुरळीत चालणेसाठी व महापालिका हद्दीतील सर्वही प्रभागामधील नागरिकांना मुलभुत नागरी सुविधा वेळेवर मिळणेसाठी तसेच अधिनस्त कर्मचारी व तांत्रिक अधिकाऱ्यांवर अंकुश ठेवणेसाठी कार्यकारी अभियंता तसेच उप अभियंता संवर्गातील एकुण (५) पदांवर प्रतिनियुक्तीव्दारे शासनाकडुन ३ वर्षाचे कालावधीसाठी मागविण्यात यावे, जेणे करुन नगरसेवक व रहिवाशांना नागरी सुविधा महानगरपालिकेस पुरविणे सुकर होईल. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. बाळासाहेब थोरात
अनुमोदक : श्री. भरत लकडे, श्री. आनंद तांदुळवाडीकर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यकारी अभियंता संवर्गातील रिक्त असलेली २ पदे व उप अभियंता संवर्गातील रिक्त असलेली ३ पदे अशी एकुण ५ पदे ३ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर मागविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६००/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र. ८० मधील अभिनय टॉकिज जवळील तारभुवन समोर असलेल्या चौकास "महर्षि वाल्मीकी चौक" असे नांव देण्यांत यावे.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.
सुचक : सौ. बबीता कागडा
अनुमोदक : श्री. अंबादास दानवे, श्री. भगवान घडामोडे,
श्री. राजु शिंदे, सौ. संगिता मैंद.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र. ८० मधील अभिनय टॉकिज जवळील तारभुवन समोर असलेल्या चौकास "महर्षि वाल्मीकी चौक" असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०१/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मंजुर विकास योजना (सुधारित) नुसार स.नं. २६ भावसिंगपुरा या जमिनीत आरक्षण क्र. १४४ "प्राथमिक शाळा" व आरक्षण क्र. १४५ क्रिंडागणासाठी आरक्षणे ठेवण्यात आलेली आहे. सध्या या आरक्षणाखालील जमीन खुलीच आहे. तसेच या आरक्षणासाठी नियोजन प्राधिकरण आणि विकास प्राधिकरण औरंगाबाद महानगरपालिकाच असुन विकास योजना प्रस्तावांची अंमलबजावणी करणे, महानगरपालिकेस बंधनकारक आहे. या दोन्ही आरक्षणाखाली जमीन ही स.नं. २६ भावसिंगपुरा त्रिमुर्ती इंटप्रायझेस यांची असुन सदर जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भुसंपादन अधिनियम १९९४ चे कलम ६ प्रमाणे रितसर संपादन करणे किंवा जमिन मालकाकडुन खाजगी वाटाघाटी करुन संपादन करणेस भुसंपादनासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चासह या आरक्षणाखाली जमीन भुसंपादन करण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. गणेश तांबे
अनुमोदक : श्री. डॉ. भागवत कराड.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मंजुर विकास योजना (सुधारित) नुसार स.नं. २६ भावसिंगपुरा या जमिनीत आरक्षण क्र. १४४ "प्राथमिक शाळा" व आरक्षण क्र. १४५ क्रिंडागणासाठी आरक्षणे असलेली खुली जागा ही त्रिमुर्ती इंटप्रायझेस यांची असुन सदर जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भुसंपादन अधिनियम १९९४ चे कलम ६ प्रमाणे रितसर संपादन करणे किंवा जमिन मालकाकडुन खाजगी वाटाघाटी व्दारे संपादन करणेस व भुसंपादनासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चासह जमीन भुसंपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०२/११ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, देशभरात हे वर्ष भगवान महावीर जन कल्याण अंहिसा वर्ष म्हणुन २६०० वी जयंती साजरी होत आहे. याचे अवचित साधुन बन्सीलाल नगर येथील सांस्कृतिक सभागृहाचे "भगवान महावीर सांस्कृतिक सभागृह" असे नामकरण करण्यांत यावे.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. संजय शिरसाठ, श्री. अंबादास दानवे.
अनुमोदक : श्री. किशोर तुळशीबागवाले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बन्सीलाल नगर येथे महानगरपालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या सांस्कृतिक सभागृहाचे "भगवान महावीर सांस्कृतिक सभागृह" असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०३/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद या अतिशय ऐतिहासिक व जुने शहर असुन जगाच्या नकाशावर या शहराचे अनन्य साधारण महत्त्व आहे. या शहरात राष्ट्रीय स्तरावरील विमानतळ चिकलठाणा विमानतळ नावाने कार्यरत असुन या विमानतळास ऐतिहासिक नांव देण्याची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत या विमानतळास "राजे संभाजी भोसले विमानतळ" असे नांव देण्यांत यावे.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अंबादास दानवे
अनुमोदक : श्री. संजय शिरसाठ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात असलेल्या चिकलठाणा येथील राष्ट्रीय स्तरावरील विमानतळास "राजे संभाजी भोसले विमानतळ" असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *"ऐनवेळचे विषय"*

**विषय क्र. ६०४/१ :**

शहरातील महावीर चौक हा रस्ता रहदारीचा असुन या रस्त्यावरुन जास्त प्रमाणात वर्दळ असते. अशा प्रसंगी या ठिकाणी जास्त प्रकाश झोताचे विदयुत दिवे बसविणे बाबत नागरिकांकडुन सतत मागणी होत असते. ही बाब विचारात घेता सदरील चौकात हामास्ट बसविणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. संजय शिरसाठ
अनुमोदक : श्री. किशोर तुळशीबागवाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,शहरातील महावीर चौ या रस्त्यावरुन जास्त प्रमाणात वर्दळ असल्यामुळे नागरिकांच्या मागणीनुसार महावीर चौकात हायमास्ट बसविण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०५/२ :**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील नारेगांव ब्रिजवाडी मसनतपुर येथील अकृषी क्षेत्रातील जमीन निवासी क्षेत्रात बदल करावा सध्या औद्योगिक वसाहतीस लागुन असुन हया क्षेत्रास निवासी जागेसाठी बरीच मागणी आहे, व या परिसरात निवासी क्षेत्राचा विकास झपाटयाने होत असुन सध्याच्या परिस्थितीत हया क्षेत्रातील प्लॉटची किंमत सर्व सामान्यांना परवडत आहे. परंतु हया परिसरात बऱ्याच लोकांनी अनधिकृत प्लॉटींग चालु केल्यामुळे अनियोजित विकास होत आहे व त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेचे व शासनाचे उत्पन्न बुडत आहे व त्याच प्रमाणे सर्व क्षेत्र कृषी क्षेत्रात असल्यामुळे महापालिकेला बेटरमेंट चार्जेस व रेखांकन मुल्य आकारता येत नाही व त्याचप्रमाणे सदर वस्त्यांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी महापालिकेला बराच पैसा खर्च होत असुन महानगरपालिकाचे फार मोठे आर्थिक नुकसान होत आहे व त्याचप्रमाणे समान्य जनतेला अधिकृत प्लॉट मिळत नाही त्यांना अनधिकृत प्लॉट विकत घ्यावे लागतात, व अशा अनधिकृत बांधकामाचे काम महापालिकेने बंद केले नाही, किंवा पाडले नाही तर सर्व सामान्य जनतेचा राग महापालिकेला ओढावुन घ्यावे लागेल. सध्याच्या परिस्थितीत उपलब्ध असलेल्या रहीवाशी क्षेत्रापेक्षा (डेव्हलपमेंट प्लॉन मधील रहीवाशी क्षेत्र) निवासी क्षेत्राची आवश्यकता निश्चितच जास्त आहे. वरील सर्व परिस्थिती पाहुन या भागात महत्वाचे स्थानक आहेत. १ विमानतळ २ रेल्वेस्टेशन ३. सिडकोचे मोठे वसस्थानक ४. भारतीय दुरसंचार निगमचे कार्यालय आहे. लागुनच शेंद्रा पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र आहे. हे सर्व असुन सुध्दा या भागाचा म्हणावा तसा विकास झालेला नाही त्या करिता या भागाचा चांगल्या प्रकारे विकास व्हावा. व औरंगाबाद सुंदर शहरात भर पडावी, म्हणुन कलप ३७ एम.आर.टी.पी. ॲक्ट नुसार कारवाई करण्यासाठी सर्व साधारण सभेमध्ये हा ठराव मंजुर करुन शासनाच्या परवानगीसाठी कार्यवाही करण्यासाठी शासनास पाठवुन परवानगी मिळविण्यात यावा करिता ठराव मंजुर करण्यांत यावा.

सुचक : श्री. भगवान रगडे
अनुमोदक : श्री. राजु शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील नारेगांव ब्रिजवाडी मसनतपुर हे औद्योगिक वसाहतीस लागुन असुन या भागात अनधिकृत प्लॉटींग त्यामुळे होणारा अनियोजित विकास आणि बेटरमेंट चार्जेस, रेखांकन मुल्य यापासुन महानगरपालिकेचे बुडणारे उत्पन्न थांबविण्यासाठी नारेगांव ब्रिजवाडी मसनतपुर येथील कृषी क्षेत्रातील जमीन निवासी क्षेत्रात बदल करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०६/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रारुप विकास योजना (सुधारित) चे आरक्षण क्र. ३११ पार्किंगसाठी सि. नं. १७३५२/३ पैकी १३२६.३ चौ.मी. व सि. नं. १७३५२/३ पैकी सुमारे ९६६.२ चौ.मी. जागा बाधीत होते. या जागेत १९६९ व ७५ मंजुर विकास योजनेची आरक्षणे ठेवण्यात आलेले असुन म.प्रा.व.न.र. अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना देण्यांत आली होती. त्यानुसार ठराव क्र. १८४/८ अन्वये भुसंपादन सुरु केलेले आहे. सध्या महानगरपालिका आर्थिक अडचणीत असुन भुसंपादनास फार मोठा खर्च येईल सुमारे १.७५ कोटी इतका या जागेसाठी खर्च अपेक्षित असुन संपुर्ण आरक्षणासाठी ६ ते ७ कोटी खर्च

अपेक्षित आहे. व सध्या भुसंपादन अधिनियमाचे कलम ६ वी अधिसुचना प्रसिध्द झालेली नाही व प्राथमिक स्तरावर असुन सध्याच्या शासनाचे धोरणानुसार २/३ रक्कम जमा केल्याशिवाय भुसंपादन कार्यवाही सुरु होणार नाही.

आरक्षण क्र. ३११ पार्कसाठी ही जागा अनावश्यक असल्याने व ही जागा वगळता या आरक्षणात शिल्लक राहणारी जागा ही योग्य आकाराची व योग्य क्षेत्राची रहात असल्याने विकास योजना मंजुर करतांना ही जमीन आरक्षणापासुन वगळण्यात किंवा मंजुर झाल्यावर म.प्रा.व.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरफार करण्यास व ही जमीन भुसंपादनातुन वगळण्यास मंजुरी मिळाली त्यासाठी सर्व अधिकार आयुक्त यांना प्रदान करण्यांत यावे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

सुचक : श्री. मीर हिदायत अली, श्री. किशोर तुळशीबागवाले.
अनुमोदक : श्री. स.सलीम स. युसुफ. श्री. काशिनाथ कोकाटे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रारुप विकास योजना (सुधारित) चे आरक्षण क्र. ३११ पार्किंगसाठी भुसंपादन सुरु केलेले असुन सि. नं. १७३५२/३ पैकी १३२६.३ चौ.मी. व सि. नं. १७३५२/३ पैकी सुमारे ९६६.२ चौ.मी. जागा बाधीत होते. व भुसंपादन कार्यवाही अंतर्गत भुसंपादन अधिनियमाचे कलम ६ ची अधिसुचना प्रसिध्द झालेली नाही. व शासनाचे धोरण २/३ रक्कम जमा केल्याशिवाय भुसंपादनाची कार्यवाही पुर्ण होणार नाही. सदर आरक्षणाखालील जमीन ही योग्य आकार व योग्य क्षेत्राची राहत असल्याने सि.स.नं. १७३५२/३ पैकी १३२६.३ चौ.मी. व सि. नं. १७३५२/३ पैकी सुमारे ९६६.२ चौ.मी. जागा भुसंपादनातुन वगळण्यास तसेच प्रारुप विकास योजना (सुधारित) मंजुर करतांना आरक्षण क्र. ३११ पार्किंग मधुन वरील जमीन आरक्षणातुन वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच मध्यंतराच्या काळात विकास योजना मंजुर झाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदल करण्यास व यासाठी सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०७/४ :**

प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर करण्यात येतो की, ब्रिजवाडी येथे एक मोठा नाला असुन ब्रिजवाडी मधील सर्व्हे क्र. ५,६,७,८,९,१० मधुन गाडीवाट आहे. या रस्त्याला दहा ते पंधरा खेडयांची वाहतुकीची रहदारी आहे. तसेच ब्रिजवाडीची सुध्दा मोठया प्रमाणावर याच रस्त्यावर रहदारी आहे. परंतु पाण्या पावसाच्या दिवसात या नाल्यात मोठे पाणी येते. त्यामुळे नाला ओलांडुन येता नसल्या कारणाने स्त्री,पुरुष यांना नाल्याच्या कडेलाच पाणी कमी होई पर्यंत मुक्काम करावा लागतो, त्यामुळे कमी होई पर्यंत मुक्काम करावा लागतो, त्यामुळे जनजीवन विस्कळीत होते. व शेतकऱ्यांना सुध्दा आपले शेतीचे कामे करण्याकरिता जाणे येणे कठीण होते.

करिता मौजे ब्रिजवाडी येथील महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे क्र. ३२/२ व ३२/४ लागुन असलेल्या नाल्यात पुल बांधण्यात यावा. प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. भगवान रगडे
अनुमोदक : श्री. राजु शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ब्रिजवाडी येथील सादर करण्यात येतो की, स. नं. ३२/२ व ३२/४ ला लागुन असलेल्या नाल्यावरुन ब्रिजवाडी आणि त्यालगत असलेल्या दहा पंधरा खेडयांची रहदारी होत असल्याने पावसाळया च्या दिवसात नाल्यावरुन येणारे पाणी आणि विस्कळीत होणारी वाहुतक लक्षात घेता या नाल्यावर पुल बांधण्यात सर्वानुमते मंजुर देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०८/५ :**

प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर करण्यांत येतो की. औरंगाबाद शहरातील सेव्हन हिल येथे बांधण्यात येत असलेल्या उड्डाण पुलाचे नांव "भगवान महावीर उड्डाण पुल" असे ठेवण्यांत यावे.

प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. संजय शिरसाठ, श्री. आनंद तांदुळवाडीकर

अनुमोदक : श्री. किशो तुळशीबागवाले, श्री. प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यप्रमाणे सेव्हन हिल येथे बांधण्यात येत असलेल्या उड्डाण पुलाचे नांव "भगवान महवीर उड्डाण पुल" असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०९/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) व सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ६७ अन्वये खालील विशेष समित्याचे गठण करण्यांत यावे. याबाबत दिनांक १८-४-२००२ च्या सर्वसाधारण सभेत चर्चा झालेली आहे.

१) वैधकिय सहाय्य व आरोग्य समिती.
२) शहर सुधार समिती
३) माध्यमिकपुर्व माध्यमिक व तांत्रिक शाखा समिती
४) गलिच्छ वस्ती निर्मुलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती.

मंजुरी तथा विचारार्थ सादर.

सुचक : श्री. अंबादास दानवे,

अनुमोदक : श्री. किशोर तुळशीबागवाले, श्री. चंद्रशेखर जैस्वाल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) व सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ६४ अन्वये खालील विशेष समित्याचे गठण करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१) वैधकिय सहाय्य व आरोग्य समिती.
२) शहर सुधार समिती
३) माध्यमिकपुर्व माध्यमिक व तांत्रिक शाखा समिती
४) गलिच्छ वस्ती निर्मुलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती.

या प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१०/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, भिमनगर, भावसिंगपुरा महानगरपालिका शाळेच्या मोकळया असलेल्या जागेपैकी २५ गुंठे जागेवर सदरील भागात स्लम मध्ये सर्व सोईयुक्त दवाखाना बांधण्यास वरील जागा राखुन ठेवण्यात यावी. यापुर्वी भिमनगर भावसिंगपुरा भागात सर्व सोईयुक्त दवाखाना बांधण्यात यावा असा ठराव मंजुर करण्यांत आलेला आहे. परंतु सदरील भागात जागा उपलब्ध नसल्याचे आढळले करिता वरील दर्शविलेल्या ठिकाणी दवाखाना बांधण्याकरिता जागा राखुन ठेवण्याचा प्रस्ताव मंजुर करण्यांत यावा.

सुचक : श्री. गणेश तांबे
अनुमोदक : श्री. आनंद तांदुळवाडीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भिमनगर, भावसिंगपुरा महानगरपालिका शाळेच्या मोकळया असलेल्या जागेपैकी २५ गुंठे सर्व सोईयुक्त दवाखाना बांधण्यास सदरील जागा राखुन ठेवण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६११/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगर पालिकेतील कनिष्ठ अभियंता व दय्यम आवेक्षक संवर्गातील एकुण ९ कर्मचाऱ्यांचे मेरी (नाशिक) या संस्थेकडुन व्यावसायीक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे खोटे प्रमाणपत्र असल्याचे निष्पन्न झालेले आहे. त्यामुळे त्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेतर्फे या प्रमाणपत्र आधारे ज्या वाढीव श्रेण्या दिल्या असतील अथवा पदोन्नती दिली असतील अथवा इतर अनुषंगाचे फायदे दिले नसतील ते तात्काळ रद्द करण्यात याव्यात. तसेच सदरील कर्मचाऱ्यांचे फसगत झाल्याचे दिसुन येते, त्यामुळे त्यांचेवर याबाबतीत पोलिस केस करण्यांत येऊ नये. त्यांना दिलेले सर्व फायदे काढुन घेण्यात यावे व त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करावी.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री. शे. इलियास किरमानी
अनुमोदक : भगवान घडमोडे, श्री. संजय शिरसाठ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगर पालिकेतील कनिष्ठ अभियंता व दय्यम आवेक्षक संवर्गातील एकुण ९ कर्मचाऱ्यांचे मेरी (नाशिक) या संस्थेकडुन व्यावसायीक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे खोटे प्रमाणपत्र असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना महानगरपालिकेतर्फे या प्रमाणपत्र आधारे ज्या पदोन्नती दिली असतील अथवा इतर अनुषंगाचे फायदे दिले असतील ते तात्काळ रद्द करुन त्यांचेवर पोलिस केस करता त्यांना दिलेले सर्व फायदे काढुन घेण्यास यावे व त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१२/९ :**

मा. उच्च न्यायालाचे रिट क्र. ३८६३ प्रमाणे आदेशाची अंमलबजावणी म्हणुन शहरातील अनधिकृत बांधकामे, अथवा दुकाने, टपऱ्या हटविण्याचे काम सुरु आहे. मा. उच्च न्यायालयाचया विरुध्द जाणे योग्य नसल्याने सदरील काम जे परवाना धारक व महानगरपालिकेचे भाडेकरु आहेत. अशा टपऱ्या सुध्दा हलविण्यात आलेले आहे. या वरुन असे समजते महानगरपालिका औरंगाबाद प्रशासनाने मा. उच्च न्यायालयात आपली आर्थिक बाजु योग्य रितीने सविस्तर दिलेले नाही. सर्व साधारण सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यांत येते की, मा. उच्च न्यायालायला महानगरपालिका प्रशासनाने शपथ पत्र देऊन परवाना दिलेल्या टपऱ्या हलविण्यास वार्षिक किमान २५ ते ३० लाख रुपयाचा आर्थिक तोटा होणार असुन सध्या औरंगाबाद महानगरपालिकेला २१८ कोटी रुपये म.रा.वि.म. इतर संस्थेस देयक थकबाकी आहे. आर्थिक स्थिती बिकट असतांना वार्षिक ३० लाखचा बोजा सहन करणे योग्य होणार नाही करिता मा. उच्च न्यायालायानेच आम्हास मार्गदर्शन करावे.

ज्या टपरी धारकांना टपरी देण्यांत आलेले आहे. ते अतिक्रमण नसुन रहदारीस अडथळा होणार नाही. म्हणुन शहर वाहतुक नियंत्रण विभागाचा ना हरकत प्रमाणपत्र घेऊन व नगर रचना विभागाकडुन चौकशी करुन कायदेशीर परवाने देण्यात आलेले आहे. ज्या रस्त्याचे विकास आराखडा प्रमाणे रुंदीकरण होईल त्यावेळेस अशा टपऱ्या काढुन पर्यायी जागा देण्याची व्यवस्था महानगरपालिका करील अशी विनंती मा. उच्च न्यायालयाला विनंती करण्यांत यावी, सर्वानुमते मंजुर करण्या करिता प्रस्ताव सादर.

सुचक : श्री. किशोर तुळशीबागवाले

अनुमोदक : श्री. स.अली सलामी स. मिरा सलामी, श्री. राजु शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सध्या बिकट आहे. व महानगरपालिकेने परवाना दिलेल्या टपऱ्या हलविण्यास महानगरपालिकेला २५ ते ३० लाख रुपयांचा तोटा होणार असुन ज्या टपरीधारकांना शहर पोलिसांचे ना हरकत प्रमाणपत्र घेवुन कायदेशीर परवाने देण्यात आलेले आहेत व विकास योजना आराखडयाप्रमाणे जेंव्हा रुंदीकरण होईल त्यावेळेस अशा टपऱ्या काढुन महानगरपालिका पर्यायी जागा देण्याची व्यवस्था करेल अशा प्रकारची विनंती महानगरपालिकेतर्फे मा. उच्च न्यायालयत सादर करण्याची कार्यवाही करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१३/१०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, गारखेडा परिसरातील सुतगिरणी चौकास "स्वर्गवासी धर्मवीर आनंद दिर्घ" चौक असे नामकरण करणे बाबत नागरिकांची मागणी आहे.

करिता सुतगिरणी येथील चौकास "धर्मवीर आनंद दिर्घ चौक" असे नामकरण करण्यांत यावे.

प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. संजय शिरसाठ

अनुमोदक : श्री. चंद्रशेखर जैस्वाल

**ठराव क्र. ६१३/१०:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा परिसरातील सुतगिरणी येथील चौकास "स्वर्गवासी धर्मवीर आनंद दिर्घ चौक" असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१४/१२:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, म.म. उर्फ बाबा दळवी यांचे औरंगाबादच्या सामाजिक व विकास कार्यात मोलाचे योगदान राहिले. त्यांचे हे कार्य लक्षात घेता त्यांचे नावे एम.जी.एम. कॉर्नर ते चिश्तिया चौकापर्यंतच्या मार्गास देण्यांत यावे.

प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

सुचक : श्री. सुरजितसिंग खुंगर

अनुमोदक : श्री. रतनकुमार पंडागळे

**ठराव क्र. ६१४/१२:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सादर करण्यांत येतो की, एम.जी.एम. कॉर्नर ते चिश्तिया चौकापर्यंतच्या मार्गास म.म. उर्फ बाबा दळवी यांचे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>प्रश्नोत्तरे</u>

प्रश्न समुह क्र. १ -
मा. श्री. अंबादास दानवे,
नगरसेवक, (प्राप्त दि. ०४-०२-२००२)

दि. १८ फेब्रुवारी २००२ च्या
सर्वसाधारण सभेतील शिल्लक प्रश्न

प्रश्न क्र. ३८ : अ) महाराष्ट्र राज्यात गर्भजल चिकित्सा प्रबंधक कायदा अस्तित्वात आहे काय? औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत सदर कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेकडे आहे काय? असल्यास औरंगाबाद महानगरपालिकेने काय पावले उचलेली आहे?

ब) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत किती गर्भजल चिकित्सा केंद्र आहेत, त्याची अधिकृत मनपा आरोग्य विभागात नोंदणी करण्यांत आली आहे काय? कायद्यानुसार आवश्यक त्या सुविधा या केंद्रात आहेत काय नसल्यास आपण त्यावर कारवाई करणार आहेत? सदर केंद्रातुन गर्भजल चिकित्सेचा गैरफायदा घेवुन गर्भपात केले जात असल्यास, सदर चिकित्सा केंद्रावर आपण कोणती कारवाई करणार आहात? गर्भजल चिकित्सा केंद्र ठिकाणी गर्भजल चिकित्सेशिवाय गर्भलिंगाची माहिती देण्यात येते हे खरे आहे काय?

क) गर्भजल चिकित्सा प्रबंधक कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नुकतेच उच्च न्यायालयाने सर्व मनपांना कायदा पालनाचे आदेश दिलेले आहेत, यांची अंमलबजावणी आपण सुरु केलेली आहे काय?

सविस्तर खुलासा सर्वसाधारण सभेत करण्यात यावा.

उत्तर क्र. ३८ : (आरोग्य वैद्यकिय अधिकारी)

अ) होय, महाराष्ट्र राज्यात गर्भजल चिकित्सा प्रबंधक कायदा महाराष्ट्र शासन अधिनियम १९९४ चा अस्तित्वात आहे

- महानगरपालिका औरंगाबाद यांची कायदा पालन करण्याची जबाबदारी आहे.
- गर्भजल चिकित्सा प्रतिबंधक कायदा महाराष्ट्र शासन अधिनियम १९९४ नुसार महानगरपालिका औरंगाबाद यांनी यासाठी शासनाचे आदेशाचे सक्षम अधिकारी म्हणुन आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांना प्रमाणीत केले आहे. महानगरपालिकाने औरंगाबाद शहरातील मान्यवर दैनिक वार्तापत्र यांत जाहिर निवेदन दिले. १) दैनिक सकाळ २) दैनिक लोकमत या दैनिकात जाहिरातीनुसार मुदत (तीन दिवस) देवुन तसे कळविले आहे. तसेच काही हॉस्पीटलसाठी कारणे दाखवा नोटिस पाठवुन सर्व हॉस्पीटल धारकांना गर्भजल चिकित्सा कायद्यानुसार प्रत्येकाकडुन रुपये ३,०००/- नोंदणी फिस कार्यालयात जमा करुन घेतले.

ब) औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत एकुण ८२ गर्भजल चिकित्सा केंद्रे आहेत. ८२ गर्भजल चिकित्सा केंद्राची अधिकृतपणे नोंदणी करण्यांत आलेली आहे.

- कायदा महाराष्ट्र शासन अधिनियम १९९४ च्या सुचनेनुसार आरोग्य विभागातील एक पथक तयार करुन शहरातील सर्वत्र हॉस्पीटलवर धाडी टाकुण हया केंद्रावर सुविधा आहेत किंवा नाहीत याबाबत समक्ष पाहणी करुन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करणार आहोत. गर्भजल चिकित्सा प्रबंधक कायद्यानुसार संबंधीत डॉक्टरांवर दखल पात्र गुन्हा नोंदविण्याची व नियमानुसार कार्यवाही करण्याची तरतुद आहे. त्यानुसार कार्यवाही केली जाईल.
- गर्भजल चिकित्सा केंद्र ठिकाणी गर्भजल चिकित्सेशिवाय गर्भलिंगाची माहिती देण्यात येते हे खरे नाही.

क) गर्भजल चिकित्सा प्रबंधक कायद्याची अंमलबजावणी आपण सुरु केलेली आहे.

प्रश्न समुह क्र. १ -
मा. श्री. किशनचंद तनवाणी,
नगरसेवक, (प्राप्त दि. २६-०२-२००२)

प्रश्न क्र. ४१ : महानगरपालिका हद्दी मधील गट क्र. १ ते ४४ या भागात महानगरपालिके-मार्फत नविन घरांना बांधकाम परवागी देणे, घरांना मालमत्ता कर आकारणे, घरांचे नामांतर करणे इ. कार्यवाही बंद केलेली आहेत काय? असल्यास अशी कार्यवाही महानगरपालिकेने केव्हा पासुन बंद केली आहे. या भागातील मालमत्ता धारकांची ही कामे कोणत्या कारणामुळे बद करण्यात आलेली आहेत. महानगरपालिका या भागातील रहिवाशांसाठी अशा सुविधा केव्हा उपलब्ध करुन देणार आहे.

महानगरपालिका हद्दीतील गट क्र. १ ते ४४ या भागातील रहीवासांना वर नमुद केलेल्या बाबी महानगरपालिकेने पुरविणे बंद केल्यामुळे त्यांचे विरुध्द

येथील एका व्यक्तीने हैद्राबाद उच्च न्यायालयात दावा दाखल केलेला आहे काय? असल्यास या दाव्याचा निकाल लागला आहे काय? या प्रकरणात महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात आली आहे काय? सदर दावा न्यायालयामार्फत निकाली निघाला असल्यास न्यायालयाने या प्रकरणात दिलेल्या निकालानुसार महानगरपालिका भविष्यात कार्यवाही करणार आहे काय? असल्यास या भागातील नागरिकांना महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवानगी देणे, घरांना मालमत्ता कर आकारणे, घरांची नामांतर करणे इ. कार्यवाही करणार आहात काय? नसल्सास अशी कार्यवाही अजुन किती वर्ष बंद ठेवणार आहात या बाबत मा. हैद्रबाद उच्च न्यायालयाचे निर्णयानुसार आपले अभिप्रयासह सविस्तर महिती सभागृहात सादर करण्यात यावी.

उत्तर - ४१ : (उप-आयुक्त (म) ) रिट याचिका क्र. १९२५४/०१ व १९२५५/०१, सय्यद दाऊद स. हयात विरुध्द मनपाचे प्रकरणी मा. उच्च न्यायालय आंध्रप्रदेश,हैद्राबाद यांनी दिलेल्या स्थगितीचे अनुषंगाने विधी सल्लागार, महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्याचे कार्यालयीन पत्र क्र. मनपा/विधी/२०८६/२००१ दि. १२-१०-२००१ नुसार सर्व्हे नं. १ ते ४४ बायजीपुरा, सर्व्हे नं. १ ते १७,९०,९१,८३ मालजीपुरा समर्थनगर, स.नं. १ ते १६ मजनुहिल सर्व्हे नं. १ ते २२ बागशेर जंग जालना रोड या ठिकाणी असलेल्या मालमत्ताचे नांमतराचे, नविन आकारणी करणे इत्यादी कामे बंद करण्यांत आली आहेत. रिट याचिका क्र. १९२५४/०१ व १९२५५/०१ चे प्रकरणी Stay Vacant (स्टे व्हॅकेट) झाल्याबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर अथवा मा. न्यायालयाचे पुढील आदेश प्राप्त झाल्यानंतर सर्व्हे नं. १ ते ४४ बायजीपुरा येथील घरांना नविन कर आकारणी मालमत्तांचे नामांतराची कामे सुरु करण्यात येतील.

उत्तर - ४१ : सहाय्यक संचालक (नगर रचना) औरंगाबाद शहरातील मौ. बागशेरजंग येथील स.नं. १ ते २२, बायजीपुरा जालना रोड येथील स.नं.१ ते ४४ मजनुहील कलेक्टर ऑफिसचे मागे येथील स.नं. १ ते १६ आणि स.नं. १ ते १७,९०,९१, व ८२ मालजीपुरा औरंगाबाद येथे महानगरपालिकेच्या मा. विधी सल्लागार यांचे पत्र क्र. मनपा/विधी/२०८६/२००१, दि. १२-१०-२००१ अन्वये बांधकाम परवानगी कुठलाही विकास परवाना तसेच भुसंपादन बाबत स्टेटस को. आदेश मा. उच्च न्यायालय आंध्रप्रदेश हैद्राबादच्या असल्याकारणाने या विभागाने वरील ठिकाणी कार्यवाही करणे बंद केलेली आहे.

पत्रातील इतर मुद्दे विधी सल्लागार यांचे विभागाशी संबंधीत आहेत.

प्रश्न समुह क्र. २ -
मा. श्री. अंबादास दानवे,
नगरसेवक, (प्राप्त दि. ०४-०३-२००२)

प्रश्न क्र. ४२ : अ) आरोग्य विभागामार्फत मागील पाच वर्षात १९९७-९८,९८-९९,२०००-२००१,२००१-२००२ या आर्थिक वर्षात विविध औषधी व उपकरणे खरेदी करण्यात आलेली असुन उपरोक्त आर्थिक वर्षात प्रती वर्षी औषधी खरेदी व उपकरणावर किती रक्कम खर्च करण्यात आली?

ब) उपरोक्त आर्थिक वर्षात औषधी खरेदी ही एम.आर.पी. दरापेक्षा जास्त दराने खरेदी केली आहे काय? जास्त दराने खरेदी केली असल्यास त्याची कारणे कोणती?

क) मे. केंकरे ब्रदर्स मुंबई यांचेकडुन मागील पाच आर्थिक वर्षात आपण औषधी व उपकरणे खरेदी केली असुन,त्याचे व एम.आर.पी. यात तफावत आहे का? मे. केंकर ब्रदर्स,मुंबई यांचे औषधी व उपकरणे निर्मितीचे स्वतःचे युनीट आहे काय? सदर कंपनी कागदोपत्रीच आहे, हे खरे आहे काय? सर्व कंपन्याकडुन खरेदी करण्यात आलेल्या औषधाची नोंद स्टॉक बुक मध्ये आहे काय? त्यासाठी मनपाची कोणती यंत्रणा आहे काय?

ड) वरील आर्थिक वर्षात निविदा काढतांना तीन लिफापा पध्दतीचा अवलंब केला आहे काय, औषध खरेदी निविदेच्या वेळी कित्येक वेळा एक निविदा प्राप्त झाल्यावर आपण फेरनिविदा न मागवता एक निविदा भरलेल्या निविदेस मंजुरी दिली आहे काय? असल्यास कारणे काय? मे केंकरे ब्रदर्स यांचीच एकमेव निविदा किती वेळेस प्राप्त झाली व आपण त्यास किती वेळा मंजुरी दिली? या निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम किती?

इ) औषधी व उपकरणे खरेदी संदर्भात स्थायी समिती मार्फत मागील दोन वर्षाचे लेखापरिखण केल्याचे काळाते, यामध्ये आरोग्य विभागावर गैरकारभाराचा ठपका ठेवण्यात आलेला आहे काय? करण्यात आलेले लेखापरिक्षण कोणत्या नियमानुसार करण्यात आले? लेखापरिक्षण करण्यात आले असल्यास लेखपरिक्षकाने कलम १०६ (३) मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ यानुसार लेखापरिक्षण केले नव्हते काय? केले असल्यास औषधी विभागातील गैरव्यवहार लेखापरिक्षणाच्या गरजेस आला नव्हता काय? आला असल्यास त्याच वेळी लेखापरिक्षकाने औषधी विभागाच्या त्रुटी मनपाच्या निदर्शनास आणुन दिल्या नाहीत हे सत्य आहे काय? आल्या नसल्यास या कारभारास लेखापरिक्षक व लेखाविभाग हे सुध्दा जबाबदार नाहीत काय?

उत्तर - ४२ :

| अ. क्र. | मुख्य लेखापरीक्षक | | |
|---|---|---|---|
| १. | औषधी व अपकरणे खरेदी संदर्भात स्थायी समिती मार्फत मागील दोन वर्षाचे लेखापरिक्षण केल्याचे कळते, यामध्ये आरोग्यविभागावर गैरकारभाराचा ठपका ठेवण्यात आलेला आहे काय? | -- | औषधी उपकरणे व खरेदी संदर्भात स्थायी समितीने निर्देशित केल्यानुसार लेखापरिक्षण केलेले आहे व त्या बाबत अंतरिम लेखापरिक्षण अहवाल सादर केलेला आहे जो पर्यंत सदरचा अहवाल अंतिम होत नाही तो पर्यंत आरोग्य विभागावर गैरकारभाराचा ठपका ठेवण्यात आलेला आहे असे होत नाही. |
| २. | करण्यात आलेले लेखापरिक्षण कोणत्या नियमानुसार करण्यात आले? | -- | करण्यात आलेले लेखापरिक्षण हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४७(१) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | (अ) व कलम १०६ (१) (अ) अन्वये केलेले आहे. |
| ३. | लेखापरिक्षण करण्यात आले असल्यास लेखापरिक्षकाने कलम १०६(३) मुंबई प्रां. मनपा अधिनियम १९४९ यानुसार लेखापरिक्षण केले नव्हते काय? | -- | सन २०००-२००१ व सन २००१-२००२ या वर्षाचे लेखापरिक्षण नियमित कार्यक्रमानुसार कले असल्यामुळे कलम १०६ (३) अन्वये वार्षिक लेखापरिक्षण अहवाल एप्रिल २००२ नंतर सादर करावयाचा आहे. त्यामुळे यापुर्वीच्या वार्षिक लेखापरिक्षण अहवालात त्याचा समावेश होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. |
| ४. | केले असल्यास औषधी विभागातील गैरव्यवहार लेखापरिक्षणाच्या नजरेस आला नव्हता काय? | -- | लेखापरिक्षण नुकतेच केले असल्यामुळे यापुर्वी लेखापरिक्षणाच्या नजरेस येण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. |
| ५. | आला असल्यास त्याचवेळी लेखापरिक्षकाने औषधी विभागाच्या त्रुटी मनपाचया निदर्शनास आणुन दिल्या नाहीत हे सत्य आहे काय? | -- | हे सत्य नाही. नव्यानेच लेखापरिक्षण केले असल्याने सदरच्या त्रुटी स्थायी समितीच्या लगेचच निदर्शनास आणुन देण्यात आलेल्या आहेत. |
| ६. | आल्या नसल्यास या कारभारास लेखापरिक्षक व लेखाविभाग हे सुध्दा जबाबदार नाहीत काय? | -- | नाही. |

उत्तरे -४२ : आरोग्य वैद्यकिय अधिकारी

अ) औषधी व उपकरणावर खाली प्रमाणे औषधी खरेदी करण्यात आली.

सन ९७-९८ --//-- २५ लाख
९८-९९ --//-- ४२ लाख
९९-२००० --//-- २९ लाख
२०००-२००१ --//-- ३० लाख
२००१-२००२ --//-- १८ लाख

(अर्थसंकल्पात तरतुद केल्यानुसार )

ब) एम.आर.पी. दराची माहिती काढणे चालु आहे. मनपा अधिनियम १९४९ च्या ७३ व प्रकरण ५ संविधा या कायद्यानुसार जाहिर निविदा प्रसिध्द करुन दर पत्रके मागविण्यात आली होती व त्यानुसार मा. आयुक्तांनी दर निश्चिती करुन स्थायी समितीची मंजुरी घेऊनच खरेदी केलेली आहे.

क) मे. केंकरे ब्रदर्स मुंबई यांचेकडुन मागील पाच आर्थिक वर्षात औषधी व उपकरणे खरेदी याबाबत एम.आर.पी.दराची माहिती काढणे चालु आहे.

मे. केंकरे ब्रदर्स यांचे औषधी व उपकरण्रो निर्मितीचे स्वतःचे युनिट आहे. सदर कंपनी कागदोपत्रीच आहे, हे खरे नाही.

सर्व कंपन्याकडुन खरेदी करण्यात आलेल्या औषधाची नोंद स्टॉकबुक मध्ये घेण्यात आलेली आहे. यासाठी मनपाचे भांडारपाल व वैद्यकिय अधिकारी अशी यंत्रणा आहे.

ड) लेखापरिक्षणाने मार्गदर्शन केल्यानुसार २ लिफाफा पध्दतीने अवलंब केला आहे. संबंधीत खर्चाचे लेखापरिक्षण झालेले आहे. सर्व प्रथम तांत्रिक कमिटीने औषधी व साहित्याची यादी मंजुर केलेली आहे. त्यामुध्ये मा. आयुक्त मा. उपसंचालक यांचे प्रतिनिधी व आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांच्या कमिटी मंजुर केल्याप्रमाणे औषधी व साहित्य यांच्या निविदा जाहिर निवेदा जाहिर निवेदा पध्दतीने काढण्यात आलेल्या आहे जेव्हा दर दरात फरक असेल तर फेरनिविदाही. काढण्यात आलेल्या आहे. औषधी व साहित्याची गरज लक्षात घेवुन संबंधिताबरोबर वाटाघाटी करुन १०% दर कमी करुन निविदा प्रस्तावित केलेली आहे व त्याच स्थायी समितीने मंजुर केल्यानंतरच खरेदी करण्यात आलेली आहे.

मे. केंकरे ब्रदर्स यांचीच एकमेव निविदा केव्हाच प्राप्त झालेली नाही.

इ) सदरचा मुद्या लेखापरिक्षण विभागाशी संबंधीत आहे.

प्रश्न समुह क्र. ३ -
मा. श्री. सय्यद अली मिरा सलामी,
नगरसेवक, (प्राप्त दि. ०५-०३-२००२)

प्रश्न क्र. ४३ व ४४ : १) कुमार सय्यदा वाजेदा पिता श्री. अमीरोद्यीन यांना अलतमश कॉलनी, जसवंतपुरा येथे प्लॉट क्र. ६ वर बांधकाम करण्यासाठी महानगरपालिकाने दिलेल्या परवानगी क्र. २७७/९६ दि. २१-०८-९६ विरुध्द तसेच झालेले बांधकाम विरुध्द नगर विकास मंत्रालय, मुंबई येथे अपील दि. १९-०७-२००१ रोजी दाखल झाली आहे काय?

२) सदरील प्रकरण बाबत नगर विकास मंत्रालय, मुंबई कडुन पत्र जा.क्र./टी.पी.एस./३००१/१२२६/प्र.क्र./ २२१/२००१ सल-३ दि. ०८-११-२००१ हे दिनांक २३-११-२००१ रोजी प्राप्त झाले, नंतर दिनांक १०-१-२००२ रोजी मा. आयुक्त यांच्या समक्ष ठेवण्यात आले दि. १४-०१-२००२ रोजी मा. आयुक्त यांनी सदर प्रकरणावर चर्चा करण्याचे म्हटले होते, उक्त प्रकरणात महानगरपालिकातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली.

उत्तर - ४३ व ४४ : सहाय्यक संचालक नगर रचना

१) उपरोक्त बांधकाम परवानगी संदर्भाने अर्जदार श्रीमती फिरोजा बेगम मे. अब्दुल मुकील सिद्यीकी यांनी महाराष्ट्र शासनाकडे ३१ जुलै २००१ ला निवेदन सादर केले आहे. याबाबत आधिक माहिती अशी की संबंधीत बांधकाम परवानगी धारकाने या प्रकरणातील मा. उच्च न्यायालयाचे आदेश म.न.पा च्या निदर्शनास आणुन न देता सुधारीत बांधकाम परवानगी प्रस्ताव सादर करुन सुधारीत बांधकाम परवानगी मिळाविली होती.

२) उक्त प्रश्नात नमुद बाबी वस्तुनिष्ट असुन या प्रकरणात मा. आयुक्त यांचे मान्यतेनुसार संबंधीत बांधकाम परवानगी धारक सय्यदा वाजिदा अहमद पि. मिर अहमोद्यीन यांना अनुज्ञेय करण्यात आलेली सुधारित बांधकाम परवानगी

या कार्यालयाचे पत्र जा.क्र. /मनपा/नरवि/८२०/२००२ दि. ११-०४-२००२ अन्वये रद्द करण्यात आली आहे.

प्रश्न समुह क्र. ४ -
मा. श्री. भगवान देविदासराव घडामोडे,
नगरसेवक, (प्राप्त दि. ११-०३-२००२)

प्रश्न क्र. ४५ : १) सन १९९६ ते १९९८ या कालावधीत शहरातील रस्ता दुभाजकावर लोखंडी रेलींगची एकुण १० कामे रु. १.२९ कोटीची करण्यात आली हे खरे आहे का?

२) लोखंडी रेलिंगचे दर डी.एस.आर. मध्ये नसल्याने ३ कोटेशन मागवुन अंदाजपत्रक तयार करुन निविदा मागविल्या हे खरे आहे का? रेलिंग खदेरी सुमारे ७० लक्षची असतांना कंपनीकडुन दर न मागविता ३ कोटेशवर दर मागविता येतात का?

३) बाजारात रेलींगचे दर हलो पाईपचे दर होलसेल भावत १२ ते १४ रुपये प्रति किलो असतांना रु. २२.५० प्रति किला दर गृहित धरुन अंदाजपत्रक तयार केले हे खरे आहे का?

४) निविदा मागविल्यानंतर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.९९% व ३५% व ३८% दरपेक्षा १२.९९% दर कमी प्राप्त झाल्यावर प्रकरणात डिसाईन बदलुन निविदा अंदाजपत्रकी दराने मंजुर करण्यास आल्या हे खरे आहे का?

५) या सर्व प्रकरणात मुख्य लेखापरिक्षक यांना अधिकार नसतांना त्यांनी मान्यता दिलेल्या आहेत. त्यामुळे याचे संपुर्ण प्रि ऑडिट व पोस्ट ऑडिट एकाच व्यक्तीने केले आहे? नागपुरचे चाचणी लेखापरिक्षण झाले आहे? प्रकरणात फक्त तांत्रिक मुद्यावर चौकशी विभागीय आयुक्तांकडुन झाली आहे. त्यामुळे आर्थिक नुकसानीचे कोणतेही ऑडीट झाले नाही? नियमानुसार त्याचे लेखा परिक्षण न करण्याची कारणे काय आहेत/ बीपीएमसी ॲक्टनुसार प्रकरण ३ कलम ५ (१०) नुसार मुख्य लेखापरिक्षक यांचे व्यतिरिक्त इतर अधिकाऱ्यांकडुन या बाबीचे १००% लेखा परिक्षण झाले आहे का? नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

उत्तर - ४५ : अतिरिक्त शहर अभियंता

१) सन १९९६ ते सन २००१-२००२ पर्यंत शहरातील रस्ता दुभाजकावर लोखंडी रेलिंगची र.रु. कोटीची कामे करण्यात आलेली आहे हे खरे आहे.

२) लोखंडी रेलिंगचे दर तीन कोटेशन मागवुन करण्यात आलेले आहे हे खरे नाही. कारण अंदाजपत्रक तयार करतांना त्या वर्षीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची नुसार दर पृ:थकरण करुन दर निश्चित करण्यात आलेले आहेत व निविदा मागवुन कामे करण्यास आली आहेत व या सर्व कार्यवाहीस स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली आहे.

३) अंदाजपत्रक तयार करतांना त्या वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची मधील दरानुसार जे दर येतात ते विचारात घेऊन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

४) निविदा मागविण्यापुर्वी डिझाईन निश्चित करण्यात आले होत त्याच डिझाईन प्रमाणे प्रत्यक्ष निविदा दराने कामे करुन घेण्यात आली आहेत.

उत्तर - ४५ : मुख्यलेखापरिक्षक (अ.क्र. ५ चे उत्तर)

- महानगरपालिका स्थापनेनंतर सन १९९७ पर्यंत लेखा मुख्य लेखाधिकारी हे पद नसल्यामुळे वेळोवेळी तत्कालीन प्रशासक यांना शासकीय अनुदानातील कामांबाबत आर्थिक बाबी संबंधी अभिप्राय देणे पासुन कामाचे देयक अदा करण्याबाबतचे अधिकार मुख्य लेखा परिक्षक यांनी नियमानुसार हे काम फार पाडलेले आहे व त्याच बरोबर पोस्ट ऑडीट सुध्दा झालेले आहे. त्यामुळे अधिकार नसतांना हे काम केले ही बाब बरोबर नाही.
- नागपुर चाचणी लेखा परिक्षण झालेले आहे.
- विभागीय आयुक्तांकडुन या प्रकरणी तांत्रिक, आर्थिक व इतर मुद्दयांवर सखोल चौकशी झाली असुन त्या बाबत अहवाल शासनास पाठविण्यात आलेला आहे. शासनाकडुनही सदर विषयाबाबत छाननी करण्यात येऊन सदर प्रकरणात काही गैरव्यवहार झाल्याचे अथवा आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास न आल्यामुळे सदरचे प्रकरण अंतिम करण्यात येऊन नस्तीबध्द करण्यात आले आहे.
- उपरोक्त मुद्दा क्र. १ व २ मध्ये नमुद केल्यानुसार लेखा परिक्षण झालेले आहे.
- सदरील तरतुद या प्रकरणात लागु होत नाही. कारण या प्रकरणात खर्चासाठी मंजुरी ही मुख्य लेखा परिक्षक यांनी दिलेली नसुन तत्कालीन प्रशासक मा. आयुक्त, मा. स्थायी समिती, मा. सर्वसाधारण सभा यांनी दिलेल्या आहेत. सदराची तरतुद ही मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांचे स्वतःचे कार्यालयासाठी ज्या खर्चास मंजुरी दिलेली आहे त्याचे लेखा परिक्षण महानगरपालिकेकडुन नामनिर्देशिक करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्याकडुन करावयाचे आहे. याबाबत अशी प्रकारचे नामनिर्देशन झालेले नाही.

प्रश्न क्र. ४६ : १) शहानुरवाडी ते सुतगिरणी रस्त्यांवर सुमारे रु. १.०० कोटी खर्च केल्यावर सदर रस्ता ६ महिन्यात खराब झाला हे खरे आहे का? असल्यास दोषीवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे?

२) या प्रकरणत विभगीय आयुक्तांनी दोष असल्याचे निष्पन्न झाल्याचे म्हटले आहे. प्रशासनाने त्यावर पुढे काय कार्यवाही केली आहे?

३) या प्रकरणात संबंधीत अभियंत्यांना नोटीस देण्यात आल्या होत्या, त्यामध्ये पुढे काय कार्यवाही झाली.

४) सदरील रस्ता आज ही नादुरुस्त आहे त्यामुळे प्रशासन त्यावर पुन्हा खर्च करणार आहे काय?

उत्तर -४६ : अतिरिक्त शहर अभियंता

१) सदरील रस्ता हा जड वाहतुकीसाठी नसतांना त्यावरुन सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संमतीविना वळविण्यात आल्याने काही ठिकाणी

रस्ता खराब झाला होता तो मुळ गुत्तेदारा मार्फतच विना मोबदला निविदेतील अटीनुसार दुरुस्त करुन देण्यात आला आहे.

२) या विभागाचे काही मत नाही.

३) या विभागाचे काही मत नाही.

४) रस्त्याचे बांधकाम होऊन तीन वर्षे झालेली आहेत त्यामुळे व जड वाहतुक आजही परत सेव्हनहील येथील उड्डाण पुलामुळे या रस्त्यावरुन सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वळविण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर रस्त्यांचा काही पृष्टभाग खराब झाला आहे त्याची दुरुस्ती "देखभाल व दुरुस्ती" अंतर्गत करुन घेण्यात येईल.

उत्तर - ४६ : उप आयुक्त (महसुल)

१) शहनुरवाडी ते सुतगिरणी रस्ता तयार झाल्यानंतर सहा-सात महिन्या खराब झाला हे बरोबर आहे. प्रकरणांत विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिक्षेक अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांकडुन चौकशी करवुन घेण्यांत आली. प्रकरणात दोषी असलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर कामात निष्काळजीपणा केलयाबाबत त्यांच्यावर कार्यवाही का करण्यात येवु नये अशा नोटीस बजावण्यांत आल्या आहेत.

२) संबंधीत अधिकारी, कर्मचारी यांच्या नोटीसा बजावण्यांत आल्या आहेत.

३) संबंधीत अधिकारी,कर्मचारी यांनी सादर केलेले स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने त्यांच्याविरुध्द दोषारोषपत्र देवुन विभागीय चौकशी सुरु करण्यांत येते आहे.

४) सदरील रस्त्याचे बांधकाम होऊन तीन वर्ष झालेली आहेत, त्यामुळे व सेव्हन हिल रस्त्यावरील उड्डाण पुलामुळे जड वाहतुक या रस्त्यावरुन सुरु आहे त्यामुळे सदर रस्त्याचा पृष्ठभाग खराब झाला आहे. त्याची दुरुस्ती "देखभाल व दुरुस्ती" अंतर्गत करुन घेण्यांत येईल.

प्रश्न समुह क्र. ५ -
मा. श्री. अंबादास एकनाथराव दानवे,
नगरसेवक, (प्राप्त दि. ११-०३-२००२)

प्रश्न क्र. -४७ : इ.स.२०००-२००१ व इ.स. २००१-२००२ या आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या मार्फत डिव्हायडर मधे रेलींग यासाठी प्रतिवर्षी किती रक्कम खर्च करण्यात आली, या दोन्ही अर्थिक वर्षात कोणकोणत्या ठिकाणी रेलींग करण्यात आली, ठिकाणाचे (मार्गाचे) नाव व त्यावरील खर्च करण्यांत आलेली रक्कम किती? अपुर्ण असलेली कामे कोणती? येणाऱ्या आर्थिक वर्षात कोणकोणत्या मार्गावर डिव्हायडर मध्ये रेलींग करण्याची मागणी करण्यात आली आहे.

उत्तर - ४७ : अतिरिक्त शहर अभियंता : सन २०००-२००१ व सन २००१-२००२ या आर्थिक वर्षात या विभागाकडुन करण्यांत आलेल्या रेलींगच्या कामाबाबतची माहिति खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | झालेला खर्च |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १. | चंपा मस्जीद चौक ते एस.टी.कॉलनी या रस्त्यावर दुभाजकाची उंची वाढवुन लोखंडी रेलींग बसविणे | २,४६,६००.०० | २,१०,६७८.०० |
| २. | वरद गणेश मंदिर ते समर्थ नगर चौकापर्यंतच्या रस्ता दुभाजकावर ग्रिल बसविणे. | ६,४६,३८७.०० | ६,५०,१८९.०० |
| ३. | सिल्लेखाना चौक ते लक्ष्मणचावडी रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रिल बसविणे. | ६,८६,२३३.०० | ७,६७,३०९.०० |
| ४. | महेशनगर कॉर्नर ते गादीया पार्क रस्ता दुभाजकावर लोखंडी रेलींग बसविणे. | ३,९०,५००.०० | २,७७,१४३.०० |
| ५. | सिध्दार्थ उद्यानासमोर रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रिल बसविणे. | १,२९,२१३.०० | १,३८,९९५.०० |
| ६. | वरद गणेश मंदिर ते महावीर चौक रस्ता दुभाजकावर लोखंडी जाळी बसविणे. | ४,२३,६५५.०० | २,८९,१२३.०० |

सन २०००-२००१ व २००१-२००२ या आर्थिक वर्षातील दुभाजकावर लोखंडी ग्रिल बसविण्याची सर्व कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत. कोणतेही काम अपुर्ण नाही.

१) महावीर चौक ते रेल्वेस्टेशन रस्ता
२) महावीर चौक ते क्रांतीचौक (अदातल रोड) रस्ता
३) शहानुरमियॉ दर्गा ते सुतगिरणी (दर्गा रोड) रस्ता
४) क्रांतीचौक ते पैठण गेट रस्ता

यापैकी पुढील आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात नावनिशी बजेटमध्ये क्रांतीचौक ते पैठणगेट या रस्त्यावर लोखंडी ग्रिल बसविण्याच्या कामाचा समावेश करण्यात आलेला आहे.

प्रश्न समुह क्र. ६ -
मा. श्रीमती शाहीन जफर महेमुद जफर,
(प्राप्त दि. १३-०३-२००२)

प्रश्न क्र.- ४८ : सन १९९० ते ११-०३-२००२ पर्यंत शहरात भुसंपादन प्रकरणात महानगरपालिकातर्फे तडजोड करुन किती लोकांना पैसे देण्यात आले. त्याचे सि.टी.एस.नंबर व मालकाचे नांव ऐरिया. मोहल्ला व किती रक्कम दिले ही सर्व माहितीसह येणारी सर्वसाधारण सभेत पुरविण्यात यावे.

उत्तर - ४८ : सहाय्यक संचालक नगर रचना

सबब कालावधीचे (सन १९९० ते ११-०३-२००२ पर्यंत) अभिलेख उपलब्ध करुन घेऊन तपासणी करणेसाठी किमान दोन महिन्याचा कालावधी लागेल व उक्त माहिती आपणास दोन महिन्यानंतर देता येईल.

प्रश्न समुह क्र. ७ -
मा. श्री. राजु रामराव शिंदे,
(प्राप्त दि. १४-०३-२००२)

प्रश्न क्र. ४९ : हॉटेल अमरप्रीत समोरील जागा सालारजंग इस्टेट व महानगरपालिकेच्या देखील मालकीची जागा असुन सालारजंग इस्टेट यांच्या जागेबाबत सुप्रीम कोर्टात वाद चालु आहे. कोर्टात सदरील प्रकरण चालु असल्याने सालरजंग इस्टेटच्या कुठल्याही जागेवर बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही. असे असतांना रमानगर येथे उपरोक्त ठिकाणी एक मोठे बांधकाम चालु असल्याचे दिसुन येते. तरी सदरील बांधकामास परवानगी देण्यात आलेली आहे किंवा कसे? याबाबत संपुर्ण माहिती देण्यात यावी. तसेच बांधकाम चालु असलेली जागा कोणत्या मालकीची आहे याबाबत माहिती येत्या सर्वसाधारण सभेत देण्यात यावी.

उत्तर - ४९ : उपअभियंता (नगररचना)
हॉटेल अमरप्रित समोर दाऊदपुरा येथे श्री. चंद्रकांत बाळाकृष्ण व कुलकर्णी व रविकांत बाळकृष्ण कुलकर्णी या नांवाने परवाना क्रमांक ९०४/२००० दिनांक १५-०३-२००० रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.

उत्तर - ४९ : विधी सल्लागार : हॉटेल अमरप्रित समोरील जागा सलारजंग इस्टेट या जागेबाबत सुप्रीम कोर्टात वाद चालु असल्याबद्दल या कार्यालयांस सुप्रीम कोर्टाची कोणतीही नोटीस नाही. सदरील सालारजंग इस्टेट बाबत मा. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे सालरजंग इस्टेटच्या जागेवरील बांधकाम बाबत परवानगी नगररचना विभागाकडुन देण्यांत आलेली नाही.

तसेच रमानगर येथे उपरोक्त ठिकाणी मोठे बांधकाम चालु असल्याचे या विभागास अवगत नाही. हा प्रश्न प्रशाकिय अधिकारी विभागाशी संबंधीत आहे. हया विभागाशी संबंधीत नाही. सदरील बांधकामास परवानगी देण्यात आलेली आहे किंवा नाही ही माहिती नगररचना विभागाशी संबंधीत आहे. तसेच जागेच्या मालकी संबंधीची माहिती हया विभागाशी संबंधीत नाही.

उत्तर - ४९ : प्रशासकीय अधिकारी : हॉटेल अमरप्रित समोरील दाऊदपुरा येथे श्री. चंद्रकांत बाळकृष्ण कुलकर्णी रविकांत कुलकर्णी या नावाने बा.प.क्र. ९०४/२००० दिनांक १५-०३-२००० नुसार देण्यात आलेले आहे. व सदर बांधकाम परवानावर आद्याप आक्षेप नाही असे नगररचना विभागाने कळविणे आहे.

प्रश्न क्र. ५० : मसनतपुर येथील एम.आय.डी.सी. च्या मालकीची जमीन २५/३० वर्षापासुन रिकामी आहे सदरील जमीन प्लॉट क्र. ९० महानगरपालिकेने एम.आ.डी.सी. कडुन विकत घेऊन ताब्यात घेणे बाबत मी दिनांक ११-०९-२००० रोजी नगर रचना विभागास पत्र दिले होते. तथापि याबाबत काय कार्यवाही झाली त्याबाबत काहीही खुलासा दोन वर्षापासुन देण्यात आलेला नाही. तरी येत्या सर्व साधारण सभेत याबाबतची माहिती मला देण्यात यावी.

उत्तर - ५० : सहाय्यक संचालक नगर रचना : मौजे मसनतपुरला लागुन सेंट्रल वेअर हाऊसिंग कॉपोरेशनच्या उत्तरेस असलेला प्लॉट क्र. ९० आरोग्य केंद्र सांस्कृतिक हॉल, उद्यान इत्यादीसाठी संपादन करणेसाठी कळविलेले आहे.

सबब उपरोक्त प्लॉटच्या मालकी हक्काबाबत एम.आय.डी.सी. औरंगाबाद यांना या विभागामार्फत पत्र देण्यात आले आहे. मालकी हक्का बाबत माहिती उपलब्ध झाल्यास भुसंपादन बाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

प्रश्न क्र. ५१ : महानगरपालिकेतर्फे शहरात नाल्यांवर बांधकामाच्या परवानगी देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे नाला चोकअप होऊन नाल्यालगत रहात असलेल्या गरीब रहिवाश्यांचे नुकसान झाल्याचे आढळुन येते. अशाच प्रकारची परवानगी श्री. चंद्रकांत देविदास देखमुख, अदित्य नगर, गारखेडा सि.स.नं. १५८४७/१९८, फाईल क्र. ३९०/२०००/१७, परवाना क्र. २२८/०० दि. २५-१०-२००० रोजी कशा पध्दतीने देण्यात आली याबाबत उप-संचालक नगर रचना यांना जाक्र/उपमहापौर/७४/०२ दिनांक २१-०१-२००२ अन्वये खुलासा मागविला असता अद्याप पर्यंत संबंधीत विभागाकडुन खुलासा सादर न केल्याने येत्या सर्वसाधारण सभेत याबाबतची माहिती देण्यात यावी.

उत्तर - ५१ : सहाय्यक संचालक नगर रचना : नगर भुमापन क्र. १५८४७/१९८ अदित्यनगर येथे श्री. चंद्रकांत देविदासराव देशमुख यांना कार्यालयामार्फत सुधारीत बांधकाम परवानगी दि. २५-१०-२००० अन्वये आदेश क्र. २२८/२००० संचिका क्र. ३९०/१७/२००० आधारे देण्यात आली आहे. मिळकतीवरील स्थितीबाबत मा. कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनि:सारण) हयांचे मार्गदर्शनानुसार बांधकाम परवानगी मध्ये अटी व शर्ती नमुद करुन बांधकाम परवानगी निर्गमीत केली आहे, तसेच सदर ठिकणी रेखांकन मंजुर असुन मिळकत संपुर्णत: खाजगी आहे.

प्रश्न समुह क्र. ८ -
मा. श्री. शेख इलियास किरमाणी,
नगरसेवक, (प्राप्त दि. १६-०३-२००२)

प्रश्न क्र. ५२ : श्री. संजय पवार यांना सन १९८२ मध्ये लिपीक म्हणुन अनु-जाती संवर्गातुन मिळाली होती नंतर सन १९९६ मध्ये लेखाधिकारी म्हणुन किंवा विभागीय अधिकारी म्हणुन पदोन्नती कोणत्या आधारे देण्यात आली. या बाबत सविस्तर माहिती व त्यांची नेमणुक व पदोन्नतीचे आदेशाची प्रत येणारी सर्व साधारण सभेत पुरविण्यात यावी.

उत्तर - ५२ : (अप्राप्त)

प्रश्न क्र. ५३ : दिनांक २७-०३-२००२ रोजी विषय क्र. ९६/१४ व्दारे श्री. एम.ए. साजीद यांच्या निलंबना प्रकरणी त्यांना कामावर रुजु करुन घेण्याबाबत ठराव पारित करण्यात आला असुन मा. न्यायालयात मनपा तर्फे काम करीत असलेल्या वकीलास त्वरीत बदली करुन जेष्ठ वकीलांना सदर प्रकरण सोपविण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

तरी सदर वकीलाच्या ऐवजी वरिष्ठ वकीलाची नियुक्ती मनपा तर्फे करण्यात आली का? असल्यास कोणत्या वकीलाकडे प्रकरण सोपविण्यात आले? वकील बदलला नसल्यास त्याची कारणे काय? श्री. एम.ए.साजेद यांना रुजु करुन घेण्यात आले का नसल्यास का नाही? श्री.एम.ए. साजेद (निलंबित) यांच्या प्रकरणी निलंबित ठेवण्यासाठी मुंबई प्रांतिक आधिनियम १९४९ च्या कलम ५६ (२) परंतु प्रमाणे सर्व साधारण सभेची परवानगी घेण्यात आली का? नसल्यास श्री.एम.ए. साजीद यांचे निलंबन सहा महिन्यात संपुष्टात

येते हे खरे आहे का? श्री. श्री.एम.ए. साजीद यांना महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियम १९७९ व्दारे निलंबित करण्यात आले होते काय? व त्याच नियमानुसार एका वर्षापेक्षा जास्त निलंबित ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिव यांची परवानगी घेतली होती काय? नसल्यास का नाही? याबाबत सविस्तर लेखी माहिती कृपया द्यावी ही विनंती.

उत्तर - ५३ : उप आयुक्त (महसुल) :

- दि. २७-०३-२००२ रोजी मा. स्थायी समितीने विषय क्र. ९६/१४ व्दारे श्री. एम.ए. साजेद यांच्या निलंबन प्रकरणी परित केलेला ठराव, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ अन्वये रद्द होण्यास्त शासनाकडे पाठविण्यांत आलेला आहे.
- यास्तव प्रकरणांतील सध्याच्या वकीलाऐवजी अन्य वकिलाची नियुक्ती करण्यांत आलेली नाही व श्री. साजेद यांस कामावर रुजुही करुन घेण्यांत आलेले नाही.
- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१) परंतुक व प्रकरणांत लागु होत नाही.
- श्री. साजेद यांस महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ च्या नियम ४ नुसार निलंबित करण्यात आलेले आहे तसेच त्यांचे निलंबन जारी ठेवायासाठी आयुक्त हे सक्षम आहेत.

प्रश्न समुह क्र. ९ -
मा. श्री. नंदकुमार घोडेले,
नगरसेवक, (प्राप्त दि. ०३-०४-२००२)

प्रश्न क्र. ५४ : अ) इ.सन २००१-२००२ मध्ये महानगरपालिकेच्या वतीने शहरात किती व कोणती स्व स्वरुपाची डांबरीकरणाची विविध कामे घेण्यात आली होती? त्याची यादी, कामाची रक्कम व काम करण्याचे दर काय काय याची सविस्तर माहिती तसेच एजन्सीचे नांव देण्यात यावे.

ब) जर एकाच स्वरुपाची कामे असतील आणि एजन्सीचे काम करण्याचे दर यामध्ये बरीच तफावत असेल तर याचे कारण काय? एका एजन्सीचे एखादया कामाचे काम करण्याचे दर ५% कमी आणि त्याच एजन्सीचे दर दुसऱ्या त्याच प्रकारच्या कामाचे २०% २५% किंवा त्यापेक्षा कमी दर या प्रकारचे दर येण्याचे कारण काय?

क) डांबरीकरणाच्या कामाचा दर्जा सक्षम अधिकाऱ्यांकडुन देयके देण्यापुर्वी तपासली जाते काय?

ड) कमी दाराच्या किती निविदांमध्ये गव्हर्नमेंट इंजिनिअरींग कॉलेज तर्फे थंड पार्टी इन्स्पेक्शन झालेले आहे.

इ) एखादे कामाची निविदा काढण्यापुर्वी ते काम किती वर्षापुर्वी नियमानुसार झालेले असावे या नियमाचे पालन वरील कामांमध्ये झालेले आहे काय?

उत्तर - ५४: अतिरिक्त शहर अभियंता : सन २००१-२००२ या आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या डांबरीकरणाच्या कामाबाबतची माहिती देणे बाबत कळविले होते. त्यानुसार माहिती तयार करुन सादर करण्यात येत आहे.

प्र.-१ उपप्रश्न - १ वा खुलासा : सन २००१-२००२ आर्थिक वर्षात नविन डांबरीकरणाची आणि पुर्वः डांबरीकरणाची अशा रितीनी मिळुन एवढी कामे घेण्यात आली होती. सदर कामाची तपशिलावर माहिती सोबत जोडली आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अ.प.रक्कम | कंत्राटदाराचे नांव | निविदा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | नविन डांबरीकरण शारदाश्रम कॉलनीतील वाचनालयाच्या बाजुला खडी रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २४,९००/- | डी.अजितसिंग | अ.प.दराने | |
| २. | रेल्वेस्टेशन भाजीमंडी ते बन्सीलाल नगर ४० फुट रुंद रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ५,१७,५००/- | ए.एस.कंस्ट्रक्शन | अ.प.दराने | |
| ३. | चंद्रलोक हॉ. सोसा(ज्योतीनगर) येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्णः डांबरीकरण करणे. | १,३८,९१०/- | ए.सी. कोठारी | १९.९१% कमी | |
| ४. | संजय सौ. सोसा (पिरबाजार) येथील अंतर्गत रस्त्यांचे पुर्णः डांबरीकरण करणे. | २,१६,११५/- | डी. अजितसिंग | १८.११% कमी | |
| ५. | उल्कानगरी येथील खिंवसरापार्क ते गारखेडा या रस्त्यांचे पुर्णः डांबरीकरण करणे. | ४,७८,७४५/- | ए.सी. कोठारी | १९.२०% कमी | |
| ६. | जवाहर कॉलनी येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ४,०३,९००/- | डी. अजितसिंग | १५.४१% कमी | |
| ७. | महाविरनगर (पिरबाजार) येथील अंतर्गत रस्त्यांचे पुर्णः डांबरीकरण करणे. | १,१७,९४०/- | ए.सी. कोठारी | १९.९१% कमी | |
| ८. | सिल्कमिल्क कॉलनी (पुर्व) येथील अंतर्गत रस्त्यांचे पुर्णः डांबरीकरण करणे. | २,७७,७००/- | डी. अजितसिंग | १८.११% कमी | |
| ९. | एकनाथ नगर येथील अंतर्गत रस्त्यांचे पुर्णः डांबरीकरण करणे. | ५,४०,४९६/- | ए.सी.कोठारी | १९.९१% कमी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०. | क्रांतीचौक ते सिल्लेखान या १०० वि.यो. रस्त्यांचे पुर्ण: (डांबरीकरण) करणे. | ९,८०,०००/- | डी. अजितसिंग | ३१.०१% कमी | |
| ११. | राधामोहन कॉलनी फुले कॉलनी देवगिरी कॉलनी पांडुरंग कॉलनी खोकडपुरा अंतर्गत रस्त्यांचे पुर्ण: डांबरीकरण करणे. | ७,९९,४००/- | डी. अजितसिंग | १% कमी | |
| १२. | पैठण राज्य रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपुला जवळील सार्व्हस रोडचे डांबरीकरण करणे. | १,०४,४४९/- | ए.सी.कोठारी | ५% कमी | |
| १३. | विजयचौक ते जयदुर्गा मॉ.सोसा. पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | २,८२,५१०/- | ए.सी. कोठारी | ५% कमी | |
| १४. | जवाहरनगर शंभु महादेवनगर येथे डांबरीकरण करणे. | ८,१०,०००/- | के.बी.पाथ्रीकर | २८.११% कमी | |
| १५. | न्यु श्रेयनगर सर्व्हे नं. ४३ सि.टी.एस.नं. १५८५१ या भाग अंतर्गत खंडी रस्त्यांचे पुर्ण: डांबरीकरण करणे. | १,०६,५००/- | एम.ए.सिद्याकी | ५% कमी | |
| १६. | जयभवानी हॉ. सोसा. व इंद्रप्रस्थ हॉ. सोसा. अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ४,३२,२००/- | ए.सी. कोठारी | २६.९९% कमी | |
| १७. | भाग धनगर वसाहती अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ३,६७,३००/- | के.बी. पाथ्रीकर | २८.३१% कमी | |
| १८. | आरेफ कॉलनी येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ११,१०,०००/- | मे. कास्क्ट कंस्टक्शन | १५.८६% कमी | |
| १९. | वार्ड क्र. १८ जुना मोंढा भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ७,४१,४००/- | मे. मॉस्काट कॅस्ट्रक्शन | ३२.०२% कमी | |
| २०. | सिध्देश्वर कॉलनी हर्सुल येथे डांबरीकरण करणे. | ९०,९९,५७/- | मे. मॉस्काट कॅस्ट्रक्शन | ३१.०२% कमी | |
| २१. | सफष वसुधरा कॉलनी | २,२६,०२०/- | मे. कॉस्काट | १२.८६% | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | येथे डांबरीकरण करणे. | | कॅस्ट्रक्शन | कमी | |
| २२. | समर्थनगर अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | १७,७३,३६६/- | में.जग्गी कॅस्ट्रक्शन | ३१.३५% कमी | |
| २३. | हॉलीक्रॉस मुख्य कार्यालया व्हाय रविवार बाजार ते जाफरगेट मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ६७,४४,५००/- | मे. जग्गी कॅस्ट्रक्शन | ३३.३२% कमी | |
| २४. | साईनगर म्हाडा कॉलनी येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | १,३०,९९०/- | श्री.ए.सी. कोठारी | ---- | |
| २५. | पुष्पनगरी वृन्दावन कॉलनी रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | २,६५,६६९/- | में. दारर्णाथ कंस्ट्रक्शन | ३७.८१% कमी | |
| २६. | रहेमान कॉलनी रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ५६,४००/- | में.एम.ए. सिद्याकी | २२.९४% कमी | |
| २७. | अगुरीबाग येथे अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ४,०६,४६५/- | श्री. ए.सी. कोठारी | १.२१% कमी | |
| २८. | चौराहा कॉलनी पानदरीबा येथे रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ७,२६,९२३/- | ए.सी. कोठारी | ५% कमी | |
| २९. | बंजारा कॉलनी दत्त नगर येथे रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | २,९९,२००/- | श्री. ए.सी. कोठारी | १७.९२% कमी | |
| | पुर्नः डांबरीकरण | | | | |
| १. | चक्रपानी कॉलनी, एम.आय.डी.सी. कॉलनी, लघुउद्योग वसाहत, रेल्वेस्टेशन व म्हाडा कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे रिसरेर्फेसिंग करणे. | ३,४७,०००/- | जी.एम.जग्गी | अ.प.दराने | |
| २. | पदमपानी कॉलनी, नंदादिप हॉ.सोसा. उसली कॉलनी, बन्सीलाल नगर येथे पुर्न डांबरीकरण करणे. | १,७५,८९३/- | जी.एम. जग्गी | अ.प.दराने | |
| ३. | मोरेश्वर हॉ. सोसा. गारखेडा येथील अंतर्गत | ३,११,८००/- | डी. अजितसिंग | १८.११% कमी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रस्त्याचे पुर्न डांबरीकरण करणे. | | | | |
| ४. | स्वप्ननगरी गारखेडा येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्न डांबरीकरण करणे. | २,२६,०९८/- | डी. अजितसिंग | २९.११% कमी | |
| ५. | परिमल कॉलनी गारखेडा येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्नः डांबरीकरण करणे. | ३,५७,९७१/- | डी. अजितसिंग | १८.११% कमी | |
| ६. | विकासनगर गजानन कॉलनी मित्रमंडळ सोसा. अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ४,४२,६००/- | ए.एस. कंस्ट्रक्शन | अ.प.दराने | |
| ७. | पदमपुरा येथील गणेश किराणा मानिल गल्लीत डांबरीकरण करणे. | ६२,३१०/- | व्यंकटेश कंस्ट्रक्शन | २७.२७% कमी | |
| ८. | रचनाकार कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ३,९६,१५०/- | डी. अजितसिंग | अ.प.दराने | |
| ९. | अजिंठा सोसा. दिपनगर सहकारनगर शहानुरवाडी अंतर्गत रस्त्याचे पुर्नः डांबरीकरण करणे. | ३,१२,०५०/- | एम.ए. सिद्याकी | ५% कमी | |
| १०. | समर्थ हॉ. सोसा. स्नेहवधर्णी सह. गृह निर्माण संस्था भागवती कॉलनी शास्त्रीनगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ५,६९,९१०/- | के.बी. पाथ्रीकर | २९.२१% कमी | |
| ११. | कटकटगेट न्यु एस.टी. कॉलनी रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ६,९९,५९१.०० | व्यंकटेश कंस्ट्रक्शन | ०.०१% कमी | |
| १२. | नारळीबाग येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १,९८,५११.०० | के.बी. पाथ्रीकर | ३७.७% कमी दराने | |
| १३. | आनंदनगर टाऊन हॉल येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २,५६,५०९.०० | के.बी पाथ्रीकर | २९.५१% कमी दराने | |
| १४. | शहाबाजार प्रभागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २,१६,९०१.०० | मे. मास्कॉट कंस्ट्रक्शन | | |
| १५. | नागसेन कॉलनी मधील | ७,२८,०००.०० | --- | २४.८६% | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रस्त्याचे डांबरीकरण करणे. | | | कमी दराने | |
| १६. | गौरीशंकर कॉलनी मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २,३०,२११.०० | ए.सी. कोठारी | २% कमी दराने | |
| १७. | कैसर कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ६,४१,७००.०० | एम.ए. सिद्याकी | अंदाजपत्रकीय दराने | |
| १८. | मोहनलाल नगर मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १,४०,०३०.०० | चारणीया कंस्ट्रक्शन | १५% कमी दराने | |
| १९. | बिल्डर्स सोसायटी मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २,८५,२००.०० | ए.सी. कोठारी | १९.७१% कमी दराने | |
| २०. | एस.टी. कॉलनी मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २,८७,२००.०० | अे. एस. कंस्ट्रक्शन | ५% कमी दराने | |
| २१. | बुऱ्हाणी कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ४,८५,५००.०० | मास्कॉट कंस्ट्रक्शन | १% कमी दराने | |
| २२. | लोटाकारंजा भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ६,२८,०००.०० | ए.सी. कोठारी | २% कमी दराने | |
| २३. | नंदनवन कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ८,३०,०००.०० | केबी प्राथ्रीकर | २६.२१% कमी दराने | |
| २४. | एन- ९ सिडको भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ५,०७,८००.०० | डी. अजितसिंग | १८.११% कमी दराने | |
| २५. | मोतिकारंजा मो. भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ५,४०,२९३.०० | ए.सी. कोठारी | २१.२१% कमी दराने | |
| २६. | बेगमपुरा भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ११,५१,१००.०० | मास्कॉट कंस्ट्रक्शन | १% कमी दराने | |

ब) उपरोक्त नमुद यादीप्रमाणे कामे स्पर्धात्मक निविदा व्दारे हाती घेतलेली असुन निविदा दर प्रचलीत स्पर्धा दराप्रमाणे प्राप्त होतात. व त्यानुसार मंजुर निविदा दराआधारे कामे हाती घेण्यात येतात.
क) डांबरीकरणाच्या कामाचा दर्जा देयक देण्यापुर्वी सक्षम अधिकाऱ्याकडुन तपासला जातो.

ड) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडील थर्डपार्टी पॅनलकडुन डांबरीकरणाच्या क्र. ५,७,१७ व २५ या कामाची व तपासणी करण्यात आलेली आहे.

ड) निविदा काम हाती घेण्यापुर्वी काम हाती घेण्यासाठीच्या कालावधीचा नियमाने पालन झालेले आहे.

प्रश्न समुह क्र. १० -
मा. श्री. अंबादास एकनाथराव दानवे,
नगरसेवक, (प्राप्त दि. ११-०४-२००२)

प्रश्न क्र. ५५ : अ) इ.स.२००१-२००२ या आर्थिक वर्षात सर्वसाधारण सभेत किती प्रशासकीय ठराव मंजुर करण्यात व त्यातील किती मंजुर करण्यात आले, किती नामंजुर व किती स्थगित करण्यात आले?

ब) इ.स. २००१-२००२ या आर्थिक वर्षात सर्वसाधारण सभेत किती अशासकीय ठराव ठेवण्यात आले व त्यातील किती मंजुर करण्यात आले किंवा किती नामंजुर, किती स्थगित करण्यात आले.

क) किती प्रशासकीय मंजर ठरावाची अंमलबजावणी करण्यात आली किंवा अंमलबजावणी प्रक्रिया करण्यात आली.

ड) विभाग निहाय प्रशासकीय ठरावाची माहिती देण्यात यावी, मंजुर अशासकीय ठरावाची अंमलबजावणी प्रशासनाची मार्फत करण्यात आलेली आहे काय, असल्यास उल्लेख करावा.

इ) मंजुर करण्यात आलेले प्रशासकीय ठरावाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासनाची असलयाने ही अंमलबजावणी होत नसल्यास, याला जबाबदार कोण आहे?

उत्तर - ५५ : प्रकल्प संचालक : सर्वसाधारण सभा प्रश्न क्र. ५५ माहे एप्रिल २००१-२००२ मध्ये झालल्या ठरावाची अंमलबजावणी बाबतची माहिती जोडण्यांत आली आहे.

| सर्वसाधारण सभा ठराव क्र. व दिनांक | मंजरी प्रस्तावाचा तपशिल | अंमलबलावणी व कार्यवाही |
|---|---|---|
| ठराव क्र. १३७/४ दि. १९-१२-२००० | महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ औरंगाबाद यांच्या वतीने औरंगाबाद शहरातील शासकीय जमीनीवर २१ घोषित झोपडपट्टयामध्ये लोक आवास योजना (घरकुल योजना) राबाविण्यात येत आहे. आता पर्यंत एकुण १८ वस्तीचे सर्व्हेक्षण करत ६७५ पॉर्मस म्हाडा कार्यालयास साद करण्यात आले आहे. | यापैकी मोची मोहल्ला पदमपुरा वस्तीमध्ये लोकांचा सहभाग जमा करणे बाबत कार्यवाही चालु आहे. या संदर्भात जिल्हा गृहनिर्माण समितीची बैठका संपन्न दि. ८-३-२००० दि. २९-१२-२०००, दि. ८-१-२००१, दि. ८-३-२००२ तसेच सन्माननीय नगरसेवकांची दि. ४-१-२००१ रोजी बैठक संपन्न. स्वत: सहभाग जमा करणे बाबत ४-३-२००२ व दि. २७- |

| | | |
|---|---|---|
| | | ३-२००२,१४-३-२००२ सहभाग जमा करणे बाबत प्रकल्प संचालक यांनी नागरिकांची बैठक घेतली. |
| ठराव क्र. ८०/६दि. ३०-९-२००० | मिसारवाडी वस्तीत झोपडपट्टी (स्लम) घोषित करणे. | मिसारवाडी या वस्तीत स्लम घोषित करणे करिता संचिका आरक्षणा बाबत व नकाशा तयार करणे करिता नगर रचना विभागाकडे सादर करण्यात आली आहे. तसेच आरक्षण रद्द करणे करिता महाराष्ट्र शासनाकडे ठराव नगररचने विभागामार्फत पाठविण्यात आले आहे. |
| ठराव क्र. १ दि. ३०-६-२००१ | गुंठेवारी विकास | सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १३ नुसार सदर प्रकरण सहाय्यक संचालक नगर रचना विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे. |
| ठराव क्र. ४०५/४ दि. १५-५-२००१ | स. नगरसेवक स्वेच्छा निधीतुन प्रशिक्षण | स्वेच्छा निधीतुन बेरोजगार युवक/युवतींना चार चाकी वाहन चालक, तिन चाकी वाहन चालक तसेच संगणक प्रशिक्षण मागील वर्षा पासुनपुढेही अंमलबजावणी व्हावी या करिता ठराव क्र. ४०५/४ नुसार मंजुरी प्राप्त झाली त्या नुसार दि. २१-८-२००१ रोजी मा. प्रधान सचिव नगर विकास मंत्रालय मुंबई (शासनाकडे) मंजुरीस्तव पाठविण्यात आले आहे मंजुर अद्याप अप्राप्त आहे. |
| ठराव क्र. ५/१ दि. १३-६-२००१ | • महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत विविध व्यावसयांचे प्रशिक्षण<br>• म.बा.क.स. अंतर्गत शिवणयंत्र वाटप<br>• अ.बा.क.स. अंतर्गत सायकल वाटप | - विविध व्यवसायीक प्रशिक्षण करिता लाभार्थ्यांच्या यादीसह मंजुरीस्तव सादर.<br>- शिवनयंत्र वाटपा बाबत आदेश निर्गमित करण्यात आले. (दि. १२-४-२००२ |

| | | |
|---|---|---|
| | • स.सदस्यांना प्रशिक्षण (महिला)<br>• बालकामगार कल्याण योजना<br>• महिला व मुलीसाठी रोग निदान<br>• अनाथ/ निरक्षित मुली/ मुलांना दत्तक घेण्याऱ्या पालकांना प्रोत्साहनपर अनुदान | रोजी)<br>- सायकल वाटपा बाबत आदेश निर्गमित करण्यात आले. (दि. १२-४-२००२ रोजी)<br>- सदर प्रशिखणाचा कार्यक्रम दि. २६-२-२००२ रोजी झाला.<br>- कामगार उप आयुक्त यांच्याकडुन यादी उद्याप अप्राप्त<br>- विविध वसाहतीमध्ये शिबीर आयोजित (५) करण्यात आले.<br>- कार्यवाही चालु आहे. वृत्तपत्रातुन जाहिरात देणे बाकी आहे. |
| ठराव क्र. १२०/५ दि. ५-१-२००१ | वस्तीगृहासाठी नियमावली | सदर वस्तीगृह अद्याप कार्यान्वीत झाले नाही. |

उत्तर - ५५ : उप-आयुक्त (महसुल) : माहे एप्रिल २००२ मध्ये संपन्न होणाऱ्या सर्वसाधारण सभेत सन २००१-०२ मध्ये झालेले ठराव व त्याची अंमलबजावणी बाबत आपण विचारलेल्या प्रश्नासंदर्भाने संबंधीत विभाग/शाळा प्रमुख यांना कार्यवाहीसाठी कळविण्यांत आले आहे. कार्यवाही अहवाल प्राप्त होणेसाठी अवधी लागणार असल्याने आपण विचारलेल्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर आपणांस पुढील सर्वसाधारण सभेत देण्यांत येईल.

उत्तर - ५५ : मुख्यलेखा अधिकारी : इतिवृत्त पुस्तिका आपले विभागात असल्याने आपण एकत्रित माहिती देणे योग्य याबाबत लेखा विभागाकडील माहिती निरंक समजण्यात यावी.

उत्तर - ५५ : मुख्य लेखापरिक्षक : सन २००१-२००२ या आर्थिक वर्षात या विभागाकडुन कोणतेही प्रशासकीय वा अशासकीय प्रस्ताव ठेवण्यात आलेले नसल्यामुळे या बाबतची लेखापरिक्षण विभागाची माहिती निरंक समजण्यात यावी ही विनंती.

उत्तर - ५५ : उप अभियंता (इमारती व बांधकाम) : प्रश्न क्र. ५५/२००२/२५० दिनांक १८-०४-२००२ अन्वये श्री. अंबादास दानवे यांनी विचारलेल्या प्रश्नाची माहिती इमारती व उद्यान बांधकाम विभागाअंतर्गत खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

अ) इ.स. २००१-२००२ या आर्थिक वर्षात एकंदर ५ प्रस्ताव ठेवण्यात आले, व सर्व ठरावाला (५) मंजुरी देण्यात आली.

ब) इ.स. २००१-२००२ या आर्थिक वर्षात एकुण १८ अशासकीय ठराव ठेवण्यात आले व सर्वांना (१८) मंजुरी देण्यात आली.

क) तीन ठरावाची अंमलबजावणी करण्यात आली व दोन ठरावाची अंमलबजावणी प्रक्रिया करण्यात आली.

ड) १) ठराव क्र. ३४५/७ दि. २०-०४-२००१ स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत निधी अंतर्गत मनपा तर्फे बांधण्यात आलेल्या व्यायाम शाळा व सभागृहाला नाव देणे बाबत सभागृहाला व व्यायाम शाळेला नांव देण्यात आले. २) ठराव क्र. ३४६/८ दि. २०-०४-२००२ अन्वये आमदार श्री. शालीग्राम बसैय्ये यांच्या निधीतुन बांधण्यात आलेल्या विठ्ठलनगर येथील सभागृह "महाराण प्रताप सभागृह" असे नांव देणे. ३) ठराव क्र. ४२५/२ दि. १८-०७-२००२ अन्वये कारगील युध्दात शहीद झालेल्या जवानांच्या स्मृती प्रित्यर्थ विवेकानंद उद्यान (मजनुहिल) येथे हॉल बांधणे.

सदर कामाची निविदा काढण्यात आली असुन एजन्सी नेमण्यात आली आहे. कामाचे कार्यादेश देणे बाकी. ४) ठराव क्र. ४५८/६ दि. २०-०८-२००१ अन्वये प्रभाग समिती "ब" साठी कार्यालया तयार करणे,

प्रभाग समिती "ब" च्या कार्यालयाची व्यवस्था किराडपुरा जसवंतपुरा पाण्याच्या टाकी समोरिल परमवीर अ. हमीद सांस्कृतिक सभागृहात करण्यासाठी कामाचे आदेश देण्यात आले आहे, व लवकर काम पुर्ण होईल. ५) ठराव क्र. ४८२/५ दि. २०-१०-०१ अन्वये किराणा चावडी येथील पोलिस चौकी शहागंज चमन येथे तात्पुरत्या स्वरुपात उभारणे,

सदर काम पुर्ण झाले असुन तेथे चौकी कार्यरत आहे. तसेच कोणत्याही अशासकीय ठरावाची अंमलबजावणी प्रशासनामार्फत करण्यात आली नाही.

फक्त अशासकीय ठराव क्र. ४०७/६ दि. १३-०७-२००१ अन्वये अजबनगर भागातील श्री. निकेतन कॉलनी येथील सभागृहात "प्रबोधनकार ठाकरे सभागृह" नांव देणे.

सदर सभागृहास "प्रबोधनकार कै कैशव सिताराम ठाकरे सभागृह" असे नांव देणेची कार्यवाही चालु आहे.

इ) मंजुर करण्यात आलेले प्रशासकीय ठरावाची व अशासकीय ठरावाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही चालु आहे.

उत्तर - ५५ : कार्यकारी अभियंता (जलनिःसारण व विद्युत) : माहे एप्रिल २००२ च्या सर्वसाधारण सभेकरिता विचारलेल्या प्रश्नाची प्रत संदर्भिय पत्राने प्राप्त झ ाली असुन याविभागासंबंधीने सर्वसाधारण सभेत मंजुर झालेले प्रशासकीय ठराव बाबत व सर्व साधारण सभेसमोर सादर केलेल्या प्रस्तावाची सविस्तर माहिती उप विभागामार्फत गोळा करण्यात येत असुन एकत्रित माहिती नंतर सादर करण्यात येईल. करिता माहितीस्तव कळविण्यांत येते.

प्रश्न क्र. ५६ : अ) महानगरपालिकेतील मुख्य लेखापरिक्षक श्री. म.न.सोनार यांची महाराष्ट्र शासन वित्त मार्फत महानगरपालिकेत मुख्य लेखा परिक्षक या पदावर किती कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात आलेली आहे.

ब) त्यांच्या प्रतिनियुक्तीची मुदत दिनांक २३-०१-२००२ पर्यंत असल्यानंतर या नियुक्तीस दिनांक २४-०१-२००२ पासुन ०६ महिन्यासाठी कालावधी वाढवुन देण्यात आलेला आहे, श्री. म.न. सोनार यांची मुदत संपल्यानंतर त्वरीत दुसरा अधिकारी उपलब्ध व्हावा यासाठी सर्वसाधारण सभेने प्रशासनाने काही निर्देश दिलेले आहेत काय?

क) श्री. न. सोनार यांच्या पदाचा कालावधी संपल्यानंतर त्वरीत वित्त विभागातुन दुसरा अधिकारी प्रतिनियुक्तीवर यावा यासाठी प्रशासनाने काय कारवाई केली?

ड) मुंबई प्रांतिक अधिनिय १९४९ च्या कलम ४७ नुसार मा. मुख्य लेखापरिक्षक श्री. म.न.सोनार यांनी आपले अधिकार बजावलेले आहेत काय?

इ) स्थायी समितीने मंजुर देवुनही मा. लेखापरिक्षकास त्यांच्या विभागाच्या लिपिक, कर्मचारी यांच्या कृतीवर व कामकाजावर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवणे व विनिमयाच्या अधिन कर्मचाऱ्यांच्या सेवा परिश्रमिक व विशेषाधिकार व संबंधीच्या सर्व प्रश्नांचा निकाल करणे याबाबत कलम ४७ "ब" व "ब" नुसार व त्याप्रमाणे ६७/३/ब नुसार मुख्य लेखा परिक्षकास विशेष अधिकार आपल्या महानगरपालिके मार्फत देण्यात आलेले आहेत काय? असल्यास केव्हा, नसल्यास याबाबी जबाबदार कोण?

उत्तर - ५६ : उप आयुक्त (महसुल) : सर्व उप प्रश्नांची माहिती दर्शविणारा तक्ता सोबत पाठविण्यात येत आहे.

श्री. अंबादास दानवे, स. नगरसेवक यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबतची माहिती सर्व साधारण सभा प्रश्न क्र. ५६

| अ. क्र. | प्रश्न | | उत्तर |
|---|---|---|---|
| अ) | महानगरपालिकेतील मुख्यलेखा परिक्षक श्री. म.न. सोनार यांची महाराष्ट्र शासन वित्त विभागामार्फत महानगरपालिकेत मुख्यलेखा परिक्षक या पदावर किती कालवधीसाठी प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यांत आलेली आहे. | -- | महानगरपालिकेतील मुख्य लेखा परिक्षक श्री. म.न. सोनार यांची महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. संलेको- ११९५/२६९/भा-२/कोषा- १/ दि. २० जाने. २००१ अन्वये एक वर्षाकरिता प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्यांत आलेली आहे. |
| ब) | त्यांच्या प्रतिनियुक्तीची मुदत दि. २३-१-२००१,२००२ पर्यंत असल्यानंतर या नियुक्तीस दि. २४-१-२००२ पासुन ६ महिन्यासाठी कालावधी वाढवुन देण्यांत आलेला आहे, श्री. म.न.सोनार यांची मुदत संपल्यानंतर त्वरीत दुसरा अधिकारी उपलब्ध व्हावा यासाठी सर्वसाधारण सभेने प्रशासनाने काही निर्देश दिलेले आहेत काय? | -- | दि. २० डिसेंबर २००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र. ५४२/२ मध्ये सर्वसाधारण सभेने श्री. म.न.सोनार यांचे वाढीव मुदत संपल्यानंतर त्वरीत अधिकारी उपलब्ध होण्यासाठी प्रशासनाने आता पासुन पाठपुराव करावा असे निर्देश दिलेली आहेत. |
| क) | श्री. म.न. सोनार यांच्या पदाचा कालावधी संपल्यानंतर त्वरित | -- | ज्या संदर्भाने प्रशासनाने मा. सचिव, लेखा व कोषागोर वित्त विभाग यांना |

| | | | |
|---|---|---|---|
| | वित्त विभागातुन दुसरा अधिकारी प्रतिनियुक्तीवर यावा यासाठी प्रशासनाने काय कारवाई केली? | | पत्र क्र.जा.क्र. मनपा/आस्था-१/२००२/५७७/ दि. २७-२-२००२ अन्वये श्री. म.न. सोनार यांचा प्रतिनियुक्तीवरील कालावधी संपल्यानंतर लागेचच त्यांच्या जागी योग्य अधिकाऱ्यांची नियुक्त करण्यांत यावी याबाबत विनंती करण्यांत आलेली आहे. तसेच सदर पत्राची प्रत संचालक लेखा व कोषागोर संचालनालय मुंबई यांना देण्यांत आलेली आहे. तद्नंतर जा.क्र.मनपा/आस्था-१/२००२/९४१/दि. ११-४-२००२ अन्वये स्मरणपत्र देऊन योग्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे संदर्भाने विनंती केली आहे. |
| ड) | मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या कलम ४७ नुसार मा. मुख्य लेखापरिक्षक श्री. सोनार यांनी आपले अधिकार व कर्तव्य बजावलेले आहेत काय? | -- | प्रकरणात मुख्यलेखा परिक्षक यांचे अभिप्राय मागविण्यांत आले असता या मुद्याच्या, संदर्भात सर्व अहवाल ईत्या तपासुन उत्तर तयार करावयाचे असल्याने त्यासाठी एक सप्ताचा कालावधी लागेल असे त्यांनी कळविले आहे. त्यांच्याकडुन अहवाल प्राप्त होताच या मुद्या बाबत माहिती देण्यांत येईल. |
| इ) | स्थायी समितीने मंजुरी देवुनही मा. लेखा परिक्षकास त्यांच्या विभागाच्या लिपिक, कर्मचारी यांच्या कृतीवर कामकाजावर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवणे व विनियमाच्या अधिन कर्मचाऱ्यांच्या सेवा परिमानिक व विशेषाधिकार व संबंधीच्या सर्व प्रश्नांचा निकाल करणे याबाबत कलम ४७"ब"व "ब" नुसार व त्याचप्रमाणे ६७/३/ब नुसार मुख्य लेखा परिक्षकास विशेषाधिकार आपल्या महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेले आहेत काय? असल्यास केव्हा, नसल्यास या बाबी जबाबदार कोण? | -- | स्थायी समिती ठराव क्र. ५२७/१० दि. २६-३-९९ अन्वये महानगरपालिकेतील मुख्य लेखा परिक्षक यांचा विभाग प्रशासनापासुन अलग करण्याचा प्रस्ताव पारित करण्यांत आला असुन त्यापासुन मुख्य लेखा परिक्षक यांच्या कार्यालयांत कायम स्वरुपी काम करण्यांस इच्छुक कर्मचाऱ्यांकडुन विकल्प मागविण्यांत आले असुन प्राप्त झालेल्या विकल्पापैकी मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेले दोन वारिष्ठ लिपीक व एक कनिष्ठ लिपीक यांचे विकल्प अंतिम करण्यांत आले असुन प्रकरण पुढील कार्यवाही अंतर्गत आहे. |

प्रश्न क्र. ५७ : अ) मा. आयुक्ता मार्फत प्रतिवर्षी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ९४ नुसार वार्षिक प्रशासन अहवाल व लेखा विवरण पत्र सादर करण्यांत येते काय?

ब) येत असल्यास महानगरपालिका स्थापनेपासुन आजपर्यंत कोणकोणत्या आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवाल व लेखा विवरण पत्र मा. आयुक्तांनी सादर केले आहेत.

क) वार्षिक प्रशासन अहवाल व लेखा विवरण पत्र प्रतिवर्षी स्थायी समिती व सर्व साधारण सभेची मंजुर घेण्यात येते काय?

ड) वार्षिक प्रशासन अहवाल व लेखा विवरण स्थायी समिती समोर सादर करण्यांत आलेले नसल्यास त्याची कोणावर आहे?

इ) आजपर्यंत विविध वर्षाचे न सादर केलेले वार्षिक प्रशासन अहवाल व लेखा विवरण पत्र मा. आयुक्ता मार्फत सर्वसाधारण सभेसमोर किती कालावधीत ठेवण्यात येणार आहे?

उत्तर - ५७ : उप-आयुक्त (महसुल) : अ) मा. आयुक्ता मार्फत प्रतिवर्षी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ९४ नुसार वार्षिक प्रशासन अहवाल सादर करण्यांत येतो.

ब) त्यानुसार महानगरपालिका स्थापने पासुन आज पर्यंत सन १९९६-९७ व १९९७-९८ पर्यंतचा प्रशासकीय महानगरपालिका स्थापने पासुन आज पर्यंत सन १९९९ मध्ये सादर करण्यांत आलेला आहे. सादर करण्यांत आलेल्या अहवालावर अद्याप पावेतो चर्चा झालेली नाही.

क) सादर करण्यांत आलेल्या १९९६-९७ व १९९७-९८ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावर मा. स्थायी समितीमध्ये अद्याप चर्चा झालेली नाही. करिता सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यांत आलेली नाही.

ड) वार्षिक प्रशासन अहवाल वर नमुद करण्यांत आल्या प्रमाणे स्थायी समिती समोर करण्यात आलेला आहे.

इ) आजपर्यंत विविध वर्षाचे न सादर केलेले वार्षिक प्रशासन अहवाल मा. सर्वसाधारण सभे समोर ठेवणे बाबतची कार्यवाही लवकरच प्रस्तावित करण्यांत येईल. करिता माहितीस्तव.

प्रश्न क्र. ५८ : अ) महानगरपालिका आस्थापनेमध्ये वर्ग -२ वर्ग - ३ या संवर्गातील किती पदे मंजुर आहेत. मंजुर पदे संपुर्णपयो भरण्यात आलेली आहेत काय? वरील तीनही संवर्गातील किती पदे रिक्त आहेत.

ब) वर्ग- १,२ व ३ मध्ये अनुसुचित जाती व अनुसुचित जामातीचे किती पदे आतापर्यंत भरण्यात आलेले आहे. संवर्गानिहाय नाम, पदनाम यांची माहिती देण्यात यावी.

क) अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती यांचे कायद्यानुसार आरक्षणाची पुर्तता आस्थापना विभागाकडे केलेली आहे काय? वरील माहिती सह संपुर्ण अहवाल सभागृहात सादर करण्यात यावा.

उत्तर - ५८ : उप-आयुक्त (महसुल) : विचारलेला प्रश्न हा मे महिन्याच्या सभेसाठी होता. परंतु सदर प्रश्न माहे एप्रिल महिन्याच्या सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेत आलेला आहे.

सदर प्रश्नाची संपुर्ण माहिती संकलीत करुन माहे मे महिन्यांच्या सर्वसाधारण सभेच्या वेळी पुरविण्यांत येईल.

करिता माहितीस्तव सादर.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद,

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद,

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १४-मे-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दिनांक . १४-मे-२००२ रोजी मा. महापौर श्री. विकास जैन यांचे अध्यक्षते खाली सकाळी ११.३०वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेला अधिकारी वर्गासह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१. स.स.श्री. राजु रामराव शिंदे
२. स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३. स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
४. स.स.श्री. तुलसिबागवाले किशोर बाबुलाल
५. स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६. स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
७. स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
८. स.स.श्री. शे. इलियास किरमानी शे. उमर
९. स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
१०. स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
११. स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी
१२. स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१३. स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४. स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१५. स.स.श्रीमती धायातिलक लिलावती बाळासाहेब
१६. स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१७. स.स.सौ. शिंदे रुख्मिणी राधाकिसन
१८. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१९. स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
२०. स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
२१. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२२. स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२३. स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२४. स.स.सौ. विजया किशोर रहाटकर
२५. स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२६. स.स.सौ. ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२७. स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रगजितसिंग
२८. स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२९. स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
३०. स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
३१. स.स.श्री. अब्दुल रशिद अ. सत्तार
३२. स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
३३. स.स.श्री. डॉ. कराड भागवत किसनराव

३४. स.स.श्री. तांदुळवाडीकर आनंद विनायकराव
३५. स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३६. स.स.श्री. नासेर खान सरदार खान
३७. स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३८. स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३९. स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४०. स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खान
४१. स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
४२. स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४३. स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४४. स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४५. स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४६. स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
४७. स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
४८. स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४९. स.स.श्री. अशरफ मोतीवाला
५०. स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५१. स.स.सौ. संगीता बाळु मैंद
५२. स.स.श्री. अंबादास एकनाथ दानवे
५३. स.स.श्री. नासेर खान अब्दुल रहेमान खान
५४. स.स.श्रीमती शाहिन जफर महेमुद जफर
५५. स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५६. स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५७. स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५८. सय्यद सलिम सय्यद युसुफ
५९. स.स.श्री. तकी हसनखान कासिम हसनखान
६०. स.स.श्री. मिर हिदायत अली मिर बसालत अली
६१. स.स.श्री. शेख इसाक जैनुद्यीन शेख
६२. स.स.श्री. अफसर खान यासिन खान
६३. स.स.श्रीमती सुलतान बेगम चॉद खाँ
६४. स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६५. स.स.श्री. शेख मुनाफ शेख यासिन
६६. स.स.श्री. सलिम पटेल समशेर पटेल
६७. स.स.श्री. कैसर खान बद्रुद्यीन खान
६८. स.स.श्री. जगदिश कन्हैय्यालाल सिध्द
६९. स.स.सौ. बबिता सुभाष कागडा
७०. स.स.श्री. सय्यद अली सलामी सय्यद मिरा सलामी
७१. स.स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज
७२. स.स.सौ. निखत परविन एजाज अली

## स्विकृत सदस्य

१. स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२. स.स.श्री. सुरजितसिंग तिलकराज खुंगर
३. स.स.सौ. सलमाबानो मिर मो.अली

श्री. दानवे अंबादास : मा. श्री. मनोहर जोशी यांची लाकसभेचे सभापती म्हणुन बिनविरोध निवड झाल्याबद्दल या सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात यावे.
श्री. प्रकाश निकाळजे, श्री. भागवत कराड : यास माझे अनुमोदन आहे.
मा. पिठासन अधिकारी : सभागृहातर्फे मा.श्री. मनोहर जोशी यांची लोकसभेचे सभापतीपदी बिनविरोध निवड झाल्या बद्दल अभिनंदन करण्यात येते.

**विषय क्र. ६१५/१** :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ते कलम ३०(१) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ६७ व ७० अन्वये वैद्यकिल सहाय्य व आरोग्य समिती नऊ (९) सभासदांनी निवड करणे.

संवाद :
श्री. नंदकुमार घोडेले : आज सभागृहामध्ये विशेष समित्यांच्या सदस्य पदाची निवड होत आहे. ही निवड झाल्यानंतर विशेष समित्यांच्या कार्यांना प्रत्यक्ष सुरुवात होईल तेव्हा गठीत होणाऱ्या चार ही विशेष समित्यांकरिता फक्त सभापती पदाची निवड करण्यांत यावी.
पिठासन अधिकारी : सभागृहाच्या भावना लक्षात घेवुन गठीत होणाऱ्या चार ही विशेष समित्यांनसाठी फक्त सभापती पदाची निवड करण्यांत मंजुरी देण्यांत येते.
पिठासन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) अन्वये वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सदस्य पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक ३०-४-२००२ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४,४५,४७,६८,६९ व ७० अन्वये निवडणुक कार्यक्रम घोषित करण्यांत आला आहे. त्यानुसार दिनांक ३०-०४-२००२ ते ७-०५-२००२ पर्यंत नामनिर्देश पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पुर्ण झाली असुन दिनांक ७-०५-२००२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सदस्य पदासाठी खाली प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यांत आली असुन खाली नामनिर्देशन पत्र वेध ठरलेले आहेत.

| अ. क्र. | प्रभाग क्र. | उमेदवाराचे नांव. |
|---|---|---|
| १. | ०१ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| २. | ६७ | श्री. तकी हसनखान कासिम हसनखान |
| ३. | ६९ | श्री. मिर हिदायत अली मिर बसालत अली |

| | | |
|---|---|---|
| ४. | ४४ | सौ. खरात कुसुमबाई दौलत |
| ५. | ३६ | सौ. रशिदा बेगम गफार यार खान |
| ६. | ०३ | सौ. साजेदा बेगम विखार अहमद |
| ७. | ६२ | श्रीमती शाहिन जफर मेहमुद जफर |
| ८. | ०४ | श्री. शेख इलियास किरमानी |
| ९. | २२ | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| १०. | ३५ | श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर |
| ११. | ६३ | श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण |
| १२. | ०२ | श्री. गणेश रामचंद्र तांबे |
| १३ | १८ | डॉ. आशा उत्तम बिनवडे |
| १४. | १९ | श्रीमती मानकापे पार्वती लहानु |
| १५. | ०९ | श्री. कवडे साहेबराव राणुबा |

पीठासन अधिकारी : चार विषय समित्यांच्या सदस्य पदासाठी आज निवडणुक घेण्यात येत आहे. सर्वांनी सहकार्य करुन बिनविरोध निवडणुक पार पाडण्याचा पग्रत्न करावा अशी सर्वांना विनंती करण्यांत येते.

वरील पैकी ज्याउमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल. तसेच शहर सुधार समिती, माध्यमिक पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती आणि गलिच्छ वस्ती निर्मुलन घर बांधणी व समाज कल्याण समितीच्या उमेदवारांनाही नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांनीही आताच सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल सभेत सुचक किंवा अनुमोदक या पैकी एकदा उपस्थित नसेल तर इच्छुकाला या दोहोपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे त्यांचा संमतीने ३० मिनिटाच्या अवधित म्हणजेच १.०० वाजेपर्यंत आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना वैद्यकिय सहाय्य व आरोग्य समिती सदस्य पदासाठी व वर प्रस्तावित इतर समित्यांचे सदस्य पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्या प्रमाणे आपले नांव १.०० वाजेपर्यंत परत घेता येईल. मात्र वेळेनंतर नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी. तोपर्यंत सभा तहकुब करण्यांत येते (सभेला २.५५ वाजता सुरुवात होते.)

श्री. जयवंत ओक : पाणी प्रश्न हा नागरिकांचा जिव्हाळयाचा प्रश्न असतो. नाशिक, ठाणे, पुणे मुंबई महानगरपालिकेत पाणी पुरवठा हा स्वातंत्र विभाग आहे. त्यासाठी पाणी पुरवठा समिती सुध्दा गठित करुन कार्यवाही करावी.

मा. पीठासन अधिकारी : प्रशासनातर्फे माहिती घेण्यांत येईल त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री. प्रकाश निकाळजे : विषय समित्यांची स्थापना झाल्यानंतर त्यांना काय अधिकारी राहणार आहेत या बद्दल माहिती देण्यात यावी.

मा. पिठासन अधिकारी : आपण जेष्ठ सदस्य आहात आपणास तरतुद माहितच असेल तरी प्रशासनाने नगरसचिव यांनी सर्व सदस्यांना या बद्दल लेखी माहिती देण्यात यावी.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : आज सकाळी जम्मु मध्ये पाकिस्तानी अतिरेक्यांनी हल्ला केला त्यात पन्नास भारतीय शहीद झाले असुन या घटनेचा निषेध करण्यात यावा .

श्री. सुदाम सोनवणे : यास माझे अनुमोदन आहे.

मा. पिठासन अधिकारी : सभागृहातर्फे निषेध करण्यांत येत आहे.

श्री. अंबादास दानवे : आता स. सदस्य श्री. गायकवाड यांनी सुचना केल्या प्रमाणे भारतीय सैनिक जम्मु मध्ये हल्ल्यात शहीद झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

श्री. भागवत कराड : यास माझे अनुमोदन आहे.

मा. पिठासन अधिकारी : कृपया सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यांसाठी उभे रहावे. याच वेळी जम्मु मध्ये पाकिस्तानी अतिरेक्यांनी जो हल्ला केला व त्यात पन्नास भारतीय सैनिक शहीद झाले त्यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

मा. पिठासन अधिकारी : वैद्यकिय सहाय्य व आरोग्य समिती सदस्य पदासाठी १५ उमेदवार पैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

| अ. क्र. | उमेदवारी परत घेण्याऱ्यांची नांवे |
|---|---|
| १. | स.स.श्री. तकी हसनखान कासिम हसनखान |
| २. | स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| ३. | स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत |
| ४. | स.स.श्रीमती शहिन जफर महमुद जफर |
| ५. | स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु |
| ६. | स.स.श्री. गणेश रामचंद्र तांबे |

आता वैद्यकिय सहाय्य व आरोग्य समिती सदस्य पदाचे निवडणुकीसाठी खाली प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| अ. क्र. | उमेदवारीची नांवे |
|---|---|
| १. | श्री. मिर हिदायत अली मिर बसालत अली |
| २. | सौ. रशिदा बेगम गफार यार खान |
| ३. | सौ. साजेदा बेगम विखार अहमद |
| ४. | श्री. शेख इलियास किरमाणी |
| ५. | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| ६. | श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर |
| ७. | श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण |
| ८. | डॉ. आशा उत्तम बिनवडे |
| ९. | श्री. कावडे साहेबराव राणुबा |

पिठासन अधिकारी : सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४८ प्रमाणे वैद्यकिय सहाय्य व आरोग्य समिती सदस्य पदाकरिता पक्त नऊ (९) सदस्य शिल्लक

असल्याने वरील नऊ (९) सदस्य बिनविरोध निवडुन आल्याचे मी घोषित करतो व या सर्व सदस्यांचे अभिनंदन करतो.

**ठराव क्र. ६१५/१** :

मुंबई प्रतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ६७ व ७० अन्वये वैद्यकिय सहाय्य व आरोग्य समिती सदस्य पदाकरिता उमेदवारी परत घेतल्यानंतर योग्य रितीने शिल्लक राहिलेले नऊ (९) उमेवारी अर्ज असल्याने वैद्यकिय सहाय्य व आरोग्य समिती सदस्य पदाकरिता खालील नऊ (९) सदस्यांची बिनविरोध निवड झाली त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | |
|---|---|
| १. | श्री. मिर हिदायत अली मिर बसालत अली |
| २. | सौ. रशिदा बेगम गफार यार खान |
| ३. | सौ. साजेदा बेगम विखार अहमद |
| ४. | श्री. शेख इलियास किरमाणी |
| ५. | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| ६. | श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर |
| ७. | श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण |
| ८. | डॉ. आशा उत्तम बिनवडे |
| ९. | श्री. कावडे साहेबराव राणुबा |

याशिवाय सभागृहात झालेल्या चर्चेनुसार गठीत झालेल्या वैद्यकिय सहाय्य व आरोग्य समिती करिता फक्त सभापती पदाची निवड करण्यांत यावी असे सर्वांनुमते ठरले त्यास सर्वांनुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ६१६/२** :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ६७ व ७० अन्वये शहर सुधार समितीकरिता नऊ (९) सभासदांची निवड करणे.

संवाद

श्री. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) अन्वये शहर सुधार समिती सदस्य पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक ३०-४-२००२ रोजी औरंगाबाद महानगर पालिकासभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४,४५,४७,६७,६८,६९, व ७० अन्वये निवडणुक कार्यक्रम घोषित करण्यांत आला आहे. त्यानुसार दिनांक ३०-०४-२००२ ते ७-०५-२००२ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकरणेची कार्यवाही पुर्ण झाली असुल दिनांक ७-०५-२००२ रोजी सायंकाळी ६.०० वाजपर्यंत शहर सुधार समिती सदस्य पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन

पत्राची छाननी करण्यांत आली असुन खालील नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहेत.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | उमेदवारांची नांवे |
|---|---|---|
| १. | स्वीकृत सदस्य | श्री. सुरजितसिंग तिलकराज खुंगर |
| २. | ४७ | श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव |
| ३. | ०१ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| ४. | ६७ | श्री. तकी हसनखान कासिम हसनखान |
| ५. | ६९ | श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली |
| ६. | ७८ | श्री. तुळसीबागवाले किशोर बाबुलाल |
| ७. | ४६ | श्रीमती नुसरत बानो फिरोज खान |
| ८. | स्वीकृत सदस्य | श्रीमती सलमाबानो मिर मोहंमर अली |
| ९. | १३ | श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ |
| १०. | ७७ | श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान |
| ११. | ७७ | श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान |
| १२. | ५६ | सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर |
| १३. | ७९ | श्री. जगदिश कन्हैय्यालाल सिध्द |
| १४. | १० | श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव |
| १५. | २१ | सौ. साधना गणेश सुरडकर |
| १६. | ५४ | श्री. देसरडा प्रशांत सुभाष |
| १७. | ४५ | श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक |
| १८. | २२ | सौ. विजया किशोर रहाटकर |

पिठासन अधिकारी : शहर सुधार समिती सदस्य पदासाठी १८ उमेदवारांपैकी विहीत मुदतीत खाली उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहे.

| अ. क्र. | उमेदवारी नांव |
|---|---|
| १. | स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष |
| २. | स.स.सौ. विजया किशोर रहाटकर |
| ३. | स.स.सौ. सलमा बानो मिर मोहंमद अली |
| ४. | स.स.श्री. सुरजितसिंग तिलकराज खुंगर |
| ५. | स.स.श्री. हिदायत अली मिर बसालत अली |
| ६. | स.स.श्री. तकी हसनखान कासिम हसनखान |
| ७. | स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ |
| ८. | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुराव |

आता शहर सुधार समिती सदस्य पदाचे निवडणुकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| अ. क्र. | उमेदवारी नांव |
|---|---|
| १. | श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव |
| २. | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| ३. | श्रीमती नुसरत बानो फिरोजखान |
| ४. | श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान |
| ५. | सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर |
| ६. | श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द |
| ७. | श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव |
| ८. | सौ. साधना गणेश सुरडकर |
| ९. | श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक |

पिठास अधिकारी : सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४८ प्रमाणे शहर सुधार समिती सदस्य पदाकरिता फक्त नऊ (९) सदस्य शिल्लक असल्याने वरील नऊ (९) सदस्य बिनविरोध निवडुण आल्याचे मी घोषित करतो व या सर्व सदस्यांची अभिनंदन करतो.

**ठराव क्र. ६१६/२** :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ६७ व ७० अन्वये शहर सुधार समिती सदस्य पदाकरिता उमेदवारी परत घेतल्यानंतर योग्य रितीने शिल्लक राहिलेले नऊ (९) उमेदवारी अर्ज असल्याने शहर सुधार समिती सदस्य पदाकरिता खालील नऊ (९) सदस्यांची बिनविरोध निवड झाली आहे त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | उमेदवारी नांव |
|---|---|
| १. | श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव |
| २. | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| ३. | श्रीमती नुसरत बानो फिरोजखान |
| ४. | श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान |
| ५. | सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर |
| ६. | श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द |
| ७. | श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव |
| ८. | सौ. साधना गणेश सुरडकर |
| ९. | श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक |

याशिवाय सभागृहात झालेल्या चर्चेनुसार गठीत झालेल्या शहर सुधार समितीकरिता फक्त सभपती पदाची निवड करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ६१७/३** :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ६७ व ७० अन्वये माध्यमिक, पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती करिता नऊ (९) सभासदांची निवड करणे

पिठासन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) अन्वये माध्यमिक, पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती सदस्य पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक ३०-०४-२००२ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४,४५,४७,६७,६८,६९ व ७० अन्वये निवडणुक कार्यक्रम घोषित करण्यांत आला आहे. त्यानुसार दिनांक ३०-०४-२००२ ते ७-०५-२००२ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटपकरणे व स्विकारणेची कार्यवाही पुर्ण झाली असुन दिनांक ७-०५-२००२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत माध्यमिक , पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती सदस्य पदासाठी खाली प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहे. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यांत आली असुन खालील नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहेत.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | उमेदवारांची नांवे |
|---|---|---|
| १. | स्विकृती सदस्य | श्री. सुरजितसिंग तिलकराज खुंगर |
| २. | ०१ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| ३. | ७८ | श्री. तुळसीबागवाले किशोर बाबुलाल |
| ४. | १३ | श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ |
| ५. | ८३ | सौ. निखत परविन ईजाज अली |
| ६. | ४४ | सौ. खरात कुसुमबाई दौलत |
| ७. | १२ | सौ. छायातिलक लिलावती बाळासाहेब |
| ८. | ६२ | श्रीमती शाहिन जफर महेमुद जफर |
| ९. | २८ | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिशन |
| १०. | ५० | श्री. फुलारी नंदकुमार माधवराव |
| ११. | ६० | श्री. अंबादास एकनाथराव दानवे |
| १२. | ०२ | श्री. गणेश रामचंद्र तांबे |
| १३. | १५ | श्रीमती किवळेकर जयश्री सारंग |
| १४. | ४८ | सौ. मोरे जयश्री कुमारराव |

पिठासन अधिकारी : माध्यमिक पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती सदस्य पदासाठी १४ उमेदवारापैकी विहित मुदतीत खाली उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहे.

| अ. क्र. | उमेदवारी नांव |
|---|---|
| १. | स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ |
| २. | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल |
| ३. | स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| ४. | स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत |
| ५. | स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिशन |

आता माध्यमिक पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती सदस्य पदाचे निवडणुकीसाठी खाली प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| अ. क्र. | उमेदवारी नांव |
|---|---|
| १. | श्री. सुरजितसिंग तिलकराल खुंगर |
| २. | श्रीमती निखत परविन ईजाज अली |
| ३. | सौ. छायातिलक लिलवती बाळासाहेब |
| ४. | श्रीमती शाहिन जफर महेमुद जफर |
| ५. | श्री. फुलारी नंदकुमार माधवराव |
| ६. | श्री. अंबादास एकनाथराव दानवे |
| ७. | श्री. गणेश रामचंद्र तांबे |
| ८. | सौ. श्रीमती किवळेकरण जयश्री सारंग |
| ९. | सौ. मोरे जयश्री कुमारराव |

पिठासन अधिकारी : सभाकामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४८ प्रमाणे माध्यमिक पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती सदस्य पदाकरिता फक्त नऊ (९) सदस्य शिल्लक असल्याने वरील नऊ (९) सदस्य बिनविरोध निवडुण आल्याचे मी घोषित करतो व या सर्व सदस्यांचे अभिनंदन करतो.

**ठराव क्र. ६१७/३** :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ६७ व ७० अन्वये माध्यमिक, पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती पदाकरिता उमेदवारी परत घेतल्यानंतर योग्य रितीने शिल्लक राहिलेले नऊ (९) उमेदवारी अर्ज असल्याने माध्यमिक,पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती सदस्य पदाकरिता खालील नऊ (९) सदस्यांची बिनविरोध निवड झाली आहे त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | उमेदवारी नांव |
|---|---|
| १. | श्री. सुरजितसिंग तिलकराल खुंगर |
| २. | श्रीमती निखत परविन ईजाज अली |
| ३. | सौ. छायातिलक लिलवती बाळासाहेब |

| | |
|---|---|
| ४. | श्रीमती शाहिन जफर महेमुद जफर |
| ५. | श्री. फुलारी नंदकुमार माधवराव |
| ६. | श्री. अंबादास एकनाथराव दानवे |
| ७. | श्री. गणेश रामचंद्र तांबे |
| ८. | सौ. श्रीमती किवळेकरण जयश्री सारंग |
| ९. | सौ. मोरे जयश्री कुमारराव |

याशिवाय सभागृहात झालेल्या चर्चेनुसार गठीत झालेल्या माध्यमिक पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीकरिता फक्त सभापती पदाची निवड करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ६१८/४** :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ६७ व ७० अन्वये गलिच्छ वस्ती निर्मुलन घर बांधणी व समाजकल्याण समितीकरिता नऊ (९) सभासदांची निवड करणे.

पिठासन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ६७ व ७० अन्वये गलिच्छ वस्ती निर्मुलन घर बांधणी व समाजकल्याण समिती सदस्य पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक ३०-०४-२००२ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४,४५,४७,६७,६८,६९ व ७० अन्वये निवडणुक कार्यक्रम घोषित करण्यांत आला आहे. त्यानुसार दिनांक ३०-०४-२००२ ते ७-०५-२००२ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पुर्ण झाली असुन दिनांक ७-०५-२००२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत गलिच्छ वस्ती निर्मुलन घर व समाजकल्याण समिती सदस्य पदासाठी खाली प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यांत आली असुन खालील नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहेत.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | उमेदवारांची नांवे |
|---|---|---|
| १. | ०१ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| २. | ४४ | सौ. खरात कुसुमबाई दौलत |
| ३. | १२ | सौ. छायातिलक लिलावती बाळासाहेब |
| ४. | ०७ | श्री. रगडे भगवान दगडुजी |
| ५. | ०७ | श्री. रगडे भगवान दगडुजी |
| ६. | ४६ | श्रीमती नुसरतोबानो फिरोज खान |
| ७. | ३६ | श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान |
| ८. | ७५ | श्री. शेख मुनाफ शेख यासिन |
| ९. | ७५ | श्री. शेख मुनाफ शेख यासिन |
| १०. | १६ | सौ. कचराबाई उत्तमराव लोंखडे |

| | | |
|---|---|---|
| ११. | ६५ | श्री. ओक जयवंत केशवराव |
| १२. | ७४ | श्री. लकडे भरत श्रीपती |
| १३. | २३ | श्रीख सावंत मधुकर दामोधर |
| १४. | ८० | सौ. बबिता सुभाष कागडा |
| १५. | ११ | सौ. पवार मंदाबाई प्रभाकर |

पिठासन अधिकारी : गलिच्छ वस्ती निर्मुलन व समाज कल्याण समिती सदस्य पदासाठी १५ उमेदवारापैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले

| अ. क्र. | उमेदवारी नांव |
|---|---|
| १. | स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| २. | स.स.सौ. बबीता सुभाष कागडा |
| ३. | स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान |
| ४. | स.स.सौ. छायातिलक लिलावती बाळासाहेब |

आता गलिच्छ वस्ती निर्मुलन व समाज कल्याण समिती सदस्य पदाचे निवडणुकीसाठी खाली प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| अ. क्र. | उमेदवारी नांव |
|---|---|
| १. | सौ. खरात कुसुमबाई दौलत |
| २. | श्री.रगडे भगवान दगडुजी |
| ३. | श्रीमती नुसरत बानो फिरोज खान |
| ४. | श्री. शेख मुनाफ शेख यासिन |
| ५. | सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे |
| ६. | श्री. ओक जयवंत केशवराव |
| ७. | श्री. लकडे भरत श्रीपती |
| ८. | श्री. सावंत मधुकर दामोधर |
| ९. | सौ. पवार मंदाबाई प्रभाकर |

पिठासन अधिकारी : सभाकामकाज नियमावलीचे नियमक्रमांक ४८ प्रमाणे गलिच्छ वस्ती, निर्मुलन व समाज कल्याण माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती सदस्य पदाकरिता फक्त नऊ (९) सदस्य शिल्लक असल्याने वरील नऊ (९) सदस्य बिनविरोध निवडुन आल्याचे मी घोषित करतो व या सर्व सदस्यांचे अभिनंदन करतो.

**विषय क्र. ६१८/४** :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ६७ व ७० अन्वये गलिच्छ वस्ती निर्मुलन व समाज कल्याण समिती सदस्य पदाकरिता उमेदवारी परत घेतल्यानंतर योग्य रितीने शिल्लक

राहिलेले नऊ (९) उमेदवारी अर्ज समिती सदस्य पदाकरिता खाली नऊ (९) सदस्यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | उमेदवारी नांव |
|---|---|
| १. | सौ. खरात कुसुमबाई दौलत |
| २. | श्री.रगडे भगवान दगडुजी |
| ३. | श्रीमती नुसरत बानो फिरोज खान |
| ४. | श्री. शेख मुनाफ शेख यासिन |
| ५. | सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे |
| ६. | श्री. ओक जयवंत केशवराव |
| ७. | श्री. लकडे भरत श्रीपती |
| ८. | श्री. सावंत मधुकर दामोधर |
| ९. | सौ. पवार मंदाबाई प्रभाकर |

या शिवाय सभागृहात झालेल्या चर्चेनुसार गठीत झालेल्या गलिच्छ वस्ती निर्मुलन व समाज कल्याण समिती करिता फक्त सभापती पदाची निवड करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

यानंतर "जन गण मन" या राष्ट्रगिताने आजची सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**बुधवार दिनांक १९-०६-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**बुधवार दि. १९-०६-२००२ रोजी मा. महापौर श्री. विकास जैन यांचे अध्यक्षते खाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी १२.०० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
४) स.स.श्री. तुलसिबागवाले किशोर बाबुलाल
५) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
७) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
८) स.स.श्री. शे. इलियास किरमानी शे. उमर
९) स.स.श्रीमती शे. इंगळे शंकुतलाबाई सांडुजी
१०) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
११) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२) स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी
१३) स.स.श्री. जगताप मोतीराम रघुनाथ
१४) स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१५) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सांरग
१६) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१७) स.स.श्रीमती धायातिलक लिलावती बाळासाहेब
१८) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
१९) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२०) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२१) सौ. विजया किशोर राहाटकर
२२) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२३) स.स.सौ. ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२४) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२५) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊसाहेब
२६) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२७) स.स.श्री. अ. रशिद अ. सत्तार
२८) स.स.श्री. मजर हमीद अब्दुल गफुर
२९) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३०) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३१) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३२) स.स.श्री. मोहम्मद जावेद मोहम्मद ईसाक
३३) स.स.श्री. सुदाम रामदास सोनवणे

३४) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३५) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३६) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
३७) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
३८) स.स.श्री. कोकाटे कशिनाथ हरिभाऊ
३९) स.स.श्री. फुलारी नंदुकमार माधवराव
४०) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४१) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
४२) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४३) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
४४) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४५) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४६) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
४७) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
४८) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
४९) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५०) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५१) स.स.श्री. स.सलीम स.युसुफ
५२) स.स.श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
५३) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५४) स.स.श्रीमती नुसरत बानो फिरोजखान
५५) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
५६) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५७) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
५८) स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
५९) स.स.श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान
६०) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६१) स.स.श्री. स. सली सलामी स. मीरा सलामी
६२) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली
६३) स.स.श्री. सोपान भाऊराव पारे
६४) स.स.श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद
६५) स.स.श्री. नासेर खान अब्दुल रहेमान खान
६६) स.स.श्री. गाजी सादोद्यीन गाजी जहिर खान
६७) स.स.श्री. श्रीमती नईम सुलताना महम्मद फसीयोद्यीन
६८) स.स.श्री. शेख ईसाक जैनोद्यीन शेख
६९) स.स.श्री. सौ. बबीता सुभाष कागडा
७०) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
७१) स.स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह

२) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
३) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
४) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५) स.स.सौ. सलमा बानो मिर मो अली.

संवाद

श्री. निकाळजे प्रकाश : निवडुन आलेले नविन सदस्य यांचा सभागृहातर्फे देऊन स्वागत करण्यांत यावे.

मा. महापौर : महापालिका पोट निवडणुकीत निवडुन आलेले नविन सभासद यांचे स्वागत करण्यांत येत आहे. (याचवेळी नवनियुक्त सभासद यांचे मा. महापौर हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यांत येते)

**विषय क्र. ६१९/१ :**

दिनांक ३०-०३-२००२, ०१-०४-२००२, ०२-०४-२००२, १८-०४-२००२, २४-०४-२००२, १४-०५-२००२, रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

श्री. कुमावत अविनाश : दिनांक ०१-०४-२००२ च्या इतिवृत्तातील पान क्र. १५ वर मुख्यलेखा परिक्षक, उपआयुक्त (प्र), मुख्यलेखाधिकारी, तसेच उपमहापौर श्री. राजु शिंदे विरोधी पक्षनेते सभागृह नेते तसेच स. सदस्य श्री. भगवान घडमोडे यांची एक कमेटी नेमलेली होती त्या बाबतीत अहवाल आलेला आहे का.

मा. महापौर : कमेटी नेमलेली नव्हती मा. आयुक्तांना चौकशीचे अधिकार दिलेले होते. त्या संबंधीचा अहवाल दिनांक २४-०४-२००२ च्या इतिवृत्ता सोबत दिलेला आहे. मागील बैठकीत अहवाल सभागृहात वाचुन दाखविला होता.

श्री. कुमावत अविनाश : अहवालात असे नमुद केले आहे की, उपरोक्त सर्व बाबी नगरसचिव यांनी जाणुनबुजुन केल्याने दिसुन येत नाही. पण प्रशासकीय कामे करित असतांना या प्रकरणामध्ये दुर्लक्ष झाले आहे. या अहवालाच्या वेगळया प्रती स. सदस्यांना दयावयास पाहिजे होत्या.

मा. महापौर : मागील सभेत हा अहवाल वाचुन दाखविण्यात आलेला होता. अहवाल वाचल्यानंतर आपण नगरसचिव यांची बदली करावी अशा सुचना दिल्या होत्या. नगरसचिव हे पद संविधानिक व एकाकीपद असल्याने सभागृहाच्या सम्मतीने असा निर्णय घेण्यात येतो की, बदली करु नये.

श्री. अफसर खान : या प्रकरणात नगरसचिव दोषी नाही आयुक्त दोषी आहे. आयुक्तांनी महापौर दालनास लॉक लावण्याचे गाडी घेण्याचे कर्मचारी काढण्याचे आदेश केले. आयुक्तांची चौकशी व्हावी.

मा. महापौर : सचिव याची बदली करु नये असे आताच सांगण्यात आलेले आहे. या विषयावर आला चर्चा करु नये.

श्री. पंडागळे रतनकुमार : नगरसचिव हे पद कलम ४५ अन्वये संविधानिक व एकाकी पद आहे. नगरसचिव यांनी या प्रकरणात मा. महापौर व पदाधिकारी यांना सविस्तर निवेदन सादर केलेले आहे. त्यांनी सादर केलेल्या निवेदनाचा विचार करुन दि. २४-०४-२००२ च्या इतिवृत्तातील पान क्र. ६ वरील

प्रकरणात, प्राथमिक अहवालानुसार पासुन ते त्यांची बदली करण्यांत यावी हे वाक्य वगळण्यांत यावे. अशी इतिवृत्तांत दुरुस्ती करावी.

मा. महापौर : आताच स. सदस्य श्री. पंडागळे यांनी सुचना केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यांस मंजुरी देण्यांत येते.

श्री. कोकाटे : निवडणुका झाल्या सर्व काही झाले तो विषय आता बंद करावा.

श्री. कुमावत अविनाश : प्रत्येक निवडणुकीच्या बैठकीत नियमावली बदल्याची सुचना केली जाते. परंतु निवडणुकीच्या कालवधी संपला की, पुढे काहीही कार्यवाही होत नाही. नियमावलीत बदल होत नाही. न्यायालयाचे निर्देश आहे त्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची कार्यवाही व्हावी.

नगरसचिव : सभा कामकाज नियमावलीमध्ये बदल करण्या संदर्भात विधी विभागाकडुन प्रस्ताव मा. आयुक्तांकडे सादर झालेला होता. त्यात निवृत्त न्यायमुर्ती मा. श्री. चपळगांवकर साहेब हे काम पाहत आहे. या संदर्भात दोन तीन वेळेस त्यांचे सोबत बैठका सुध्दा झालेल्या आहेत व दुरुस्ती करण्या संदर्भात कार्यवाही चालु आहे. दुरुस्तीचे काम अंतिम झाल्यानंतर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे सादर होईल.

श्री. घोडेले नंदकुमार : दि. २४-०४-२००२ च्या इतिवृत्तातील पान क्र. २२ वर विषय क्र. ५९१ ड्रामा थिएटर बाबत प्रस्ताव सादर केलेला होता. ५० लक्षचा प्रस्ताव होत या प्रस्तावासंबंधी माहिती मागविलेली होती म्हणुन प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता. आता या प्रस्तावासंबंधी टिप्पणी सादर झालेली आहे त्यास २० लक्ष रुपयाची आणखी वाढ केलेली असुन प्रस्ताव स्थगित ठेवलेला असतांना सुध्दा या कार्यवाहीस उशीर होतो वेळ संपत आलेला आहे. प्रस्ताव स्थगित ठेवलेला असतांना भुसंपादनाच्या कार्यवाहीसाठी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठविलेला आहे यात सभागृहाचा अपमान झालेला नाही का उशीर होत होता तर त्या सभेच्या वेळी आयुक्तांनी खुलासा करावयास पाहिजे होता की, प्रस्ताव मंजुर करावा पाठविण्यात येईल. प्रस्ताव स्थगित ठेवला नसता.

मा. महापौर : या प्रस्तावासंबंधी प्रशासना मार्फत टिप्पणी सादर झालेली आहे. ५० लक्षचे आता ७० लक्ष झालेले आहे. नगरसचिव यांनी टिपणी वाचुन दाखवावी.

नगरसचिव : पुरक टिप्पणी वाचुन दाखवितात औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना वाढी व हद्द नुसार आरक्षण क्र. डी/१ ड्रामा थिएटर सर्व्हे क्र. ८९ व ८८ मौजे इटखेडा येथील मिळकती बाधित आहेत या जमीन संपादन प्रकरणी सर्व्हे क्र. ८९ चे मिळकत धारक श्री. ईस्माईल खान हाजी रहेमान खान यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना महानगरपालिकेस दिनांक ०९-०१-२००२ रोजी दिलेली आहे उक्त प्रकरणी भुसंपादन प्रस्ताव माहे एप्रिल २००२ च्या सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर केले असता सविस्तर माहिती सह पुढील सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यासाठी स्थगित ठेवले. करिता प्रकरणांत खालील प्रमाणे माहिती देण्यांत येते.

उक्त आरक्षण खालील बाधीत मिळकती

| | सर्व्हे क्र. | अंदाजबाधित क्षेत्र |
|---|---|---|
| १) | ८८ मौजे इटखेडा -- | ६०० चौ.मी. |
| २) | ८९ मौजे इटखेडा -- | ८१८१ चौ.मी. |

वरील पैकी सर्व्हे क्र. ८९ च्या मिळकत धारकांने वरील प्रमाणे खरेदी सुचना दिली असुन उक्त खरेदी सुचनेप्रमाणे सहा महिण्याच्या आत म्हणजे दिनांक ०८-०६-२००२ पुर्वी भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचे कडे पाठविणे आवश्यक होत. माहे एप्रिल २००२ च्या नंतर सर्वसाधारण सभा झालेली नाही. त्यामुळे प्रकरणांत कालमर्यादा असल्याने मा. आयुक्तांच्या मान्यतेने भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे जा. क्र./मनपा/नरवि/१३०५/२००२ दिनांक ०७/०६/२००२ नुसार पाठविण्यात आले आहे.

उपरोक्त आरक्षणा खालील संपुर्ण क्षेत्र संपादन करण्यासाठी अंदाजे रु. ७० लाख अपेक्षित आहे. आरक्षणा खालील बाधित मिळकती दर्शविणारा विकास योजना भाग नकाशा सोबत जोडण्यात येत आहे. करिता भुसंपादन प्रस्ताव मान्यतेस्तव व अंदाजे रु. ७० लाख खर्चासह प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

श्री. कुमावत अविनाश : स्थगित प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविता तसेच २० लक्षची वाढ केली कुणाच्या अधिकारात केली आयुक्तांना तसे अधिकार आहे का या बाबतीत चौकशी व्हावी.

श्री. नंदकुमार घोडेले : नोटीस वगैरे दिलेली नाही २० लक्ष रुपये कसे वाढविले स्थगित प्रस्ताव पाठविणे योग्य नाही सभागृहाचा यात अपमान झालेला आहे. प्रस्ताव स.नं. ८९ मधील होता टिप्पणी मध्ये ८८ उल्लेख केला ही पुरक टिप्पणी नसुन दुरुस्त प्रस्ताव आहे, नविन नाही.

मा. महापौर : या प्रस्तावा संबंधी संबंधीत अधिकारी यांनी सविस्तर माहिती द्यावी. स्थगित ठेवलेला असतांना कोणत्या नियमाने पाठविला.

प्र. सहाय्यक संचालक (नगर रचना) : औरंगाबाद मंजुर विकास योजना मधील सर्व्हे क्र.८९ व ८८ मध्ये ड्रामा थिएटर साठी आरक्षित जागा होती. ८९ बाबत पुर्वेस नोटिस दिलेली होती. त्यानुसार मागील बैठकीत तसा प्रस्ताव ठेवलेला होता कारण दि. ०८-०६-२००२ पुर्वी पाठवायचा होता नसता हे रिझवैशन रद्द होऊ शकते. आणि ड्रामा थिएटरमध्ये ८८ चा ६०० चौ.मी. भाग येतो. याची नोटीस दिलेली नाही. परंतु त्याचा भाग येत असल्याने तसे नमुद केलेले आहे. त्यामुळे रक्कम सुध्दा २० लक्षने वाढलेली आहे. दि. ०८-०६-२००२ च्या अगोदर पाठविणे आवश्यक होते म्हणुन मा. आयुक्तांची मान्यता घेऊन तो प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविलेला आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : सर्व्हे नंबर ८८ ची पर्चेस नोटीस नसतांना समावेश कसा केला तसेच प्रस्ताव स्थगित ठेवलेला असतांना कोणत्या नियमाने पाठविलेला आहे. प्रस्ताव स्थगित ठेवलेला आहे असे जिल्हाधिकारी यांना कळविलेले आहे का.

प्र. सहाय्यक संचालक (नगर रचना) : प्रस्ताव स्थगित ठेवलेला आहे. व वेळेच्या आत पाठविणे आवश्यक आहे या सर्व बाबी मा. आयुक्तांच्या निदर्शनास आणुन दिलेल्या होत्या. प्रस्ताव स्थगिती बाबत मा. जिल्हाधिकारी यांना कळविलेले नाही.

श्री. कुमावत अविनाश : सर्वसाधारण सभेने स्थगित ठेवले हे कळवावे.

श्री. अफसरखॉन : पर्चेस नोटीस ६ महिने अगोदर दिली जाते ६ महिन्यानंतर प्रस्ताव सादर होतो. व प्रस्ताव स्थगित ठेवलेला असतांना सुध्दा जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे ही पध्दत चुकीची असुन सभागृहाचा अपमान होत आहे. ५०

लक्षाचा प्रस्ताव असतांना २० लक्ष वाढवुन ७० लक्षचा प्रस्ताव कोणत्या नियमाने पाठविण्यात आला याची चौकशी करावी.

श्री. अंबादास दानवे : सरळ सरळ जिल्हाधिकारी यांना कळवावे की, सर्वसाधारण सभेने हा प्रस्ताव स्थगित ठेवला आहे.

श्री. सुदाम सोनवणे : हा प्रस्ताव स्थगित ठेवलेला आहे असे जिल्हाधिकारी यांना कळविण्यात यावे प्रस्ताव स्थगित ठेवलेला असतांना कोणते अधिकार वापरुन आयुक्तांनी प्रस्ताव पाठविला खुलासा घ्यावा.

मा. महापौर : मागील बैठकीत या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता. प्रस्ताव स्थगित ठेवलेला आहे. असे आयुक्तांनी जिल्हाधिकारी यांना कळवावयास पाहिजे होते. प्रस्ताव स्थगित ठेवलेला असतांना मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणे म्हणजे आता सभागृहाचा अपमान झालेला आहे. यात दुमत नाही म्हणुन आत सभागृहाच्या भावना लक्षात घेवुन हा प्रस्ताव स्थगित ठेवलेला आहे असे पत्र संबंधीत अधिकारी यांनी आजच्या आज मा. जिल्हाधिकारी यांना पाठवावे. ५० लक्षचे ७० लक्ष कसे केले याचा सुध्दा खुलासा करावा.

प्र. सहाय्यक संचालक (नगर रचना) : ड्रामा थिएटर मध्ये सर्व्हे नं. ८८ चा काही भाग येतो. प्रस्तावात घेतलेले नव्हते आता दुरुस्ती केलेली आहे. त्यामुळे २० लक्ष रुपये वाढ झालेली आहे. आम्ही अंदाजे किंमत दाखविली आहे. संयुक्त मोजणी होऊन नंतर किंमत निश्चित होईल.

मा. महापौर : सुचना केल्याप्रमाणे कार्यवाही करावी व या प्रस्तावात ५० लक्षचे ७० लक्ष कसे केले या संदर्भात सर्व सदस्यांना पुढील बैठकीत लेखी माहिती देण्यांत यावी. हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत येतो.

श्री. भगवान घडामोडे : ड्रामा थिएटरची प्रशासनाला पुर्ण माहिती नसतांना मागील बैठकीत ठराव ठेवला सर्व्हे नं. ८८ चा काही भाग येतो म्हणुन २० लक्ष रुपये वाढले असे उत्तर देणे बरोबर नाही. पुर्वीच प्रस्ताव मंजुर करुन पाठविण्यात आलेला असता तर सर्व्हे नं. ८८ च्या बाबतीत पुन्हा नविन प्रस्ताव आणवा लागला नसता प्रशासन या सभागृहाची पुर्णतः दिशाभुल करीत आहे.

श्री. जगदीश सिध्द : ही संपुर्ण जागा ७०००० स्क्वेअर फुट जागा आहे एवढया जागेसाठी ७० लक्ष रुपये देणे परवडणार आहे का तेथील जागेचे दर काय आहे.

मा. महापौर : हे दोन जागा वेगवेगळया ठिकाणी दाखविण्यात आलेले आहे. या संदर्भात माहिती देण्याचे सुचविण्यात आलेले आहे.

श्री. सुदाम सोनवणे : इतिवृत्तातील पान क्र. ३१ वर विषय क्र. ६०५ हा विषय स्थगित झालेला आहे.

श्री. रगडे भगवान : हा प्रस्ताव माझ्या वार्डातील असुन मंजुर झालेला आहे.

मा. महापौर : हा प्रस्ताव ऐनवेळी मंजुर केलेला आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : मागील बैठकीत सर्व विषय मंजुर केलेले होते का केलेले असेल तर चर्चा कशासाठी करित आहे.

श्री. तकी हसनखान : ऐनवेळी आलेल्या प्रस्तावावर सर्व प्रस्ताव मंजुर करण्यांत येते असे रुलींग दिल्यानंतर त्यावर चर्चा होत नाही. व सर्व प्रस्ताव इतिवृत्तात येतात त्यामुळे असे होते प्रस्तावावर चर्चा होणे गरजेचे आहे.

श्री.अंबादास दानवे : अग्निशामक विभागातील कर्मचाऱ्यांना २ वेतन वाढ मंजुर केले ते पुरस्कार प्रदान केल्याच्या तारखेपासुन द्यावे असे मुळ प्रस्तावात आहे त्याप्रमाणे दुरुस्ती करावी.

मा. महापौर : मागिल बैठकीत ऐनवेळी प्रस्ताव आलेले होते. स. सदस्यांचे प्रस्ताव होते, मंजुर करण्यांत आलेले होते. स. सदस्य श्री. दानवे यांनी सुचना केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यांत यावी विषय क्र. १ मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

सर्वसाधारण सभा इतिवृत्त दिनांक ४२-०४-२००२ विषय क्र. ५९०/८ मध्ये ठरावातील सदर ठराव पारित झालेल्या तारखेपासुन म्हणजेच दिनांक २४-०४-२००२ पासुन ऐवजी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे पुरस्कार मिळाल्याच्या तारखेपासुन अशी दुरुस्ती करण्यांस आणि पान क्र. ६ वरील मा. महापौर यांचे चर्चेतील वाक्य प्रकरणात प्राथमिक अहवालानुसार ते इतर विभागात बदली करण्यांत यावी हे वाक्य इतिवृत्तांतातुन वगळण्यास या दुरुस्तासह दिनांक ३०-०३-२००२, ०१-०४-२००२, ०२-०४-२००२, १८-०४-२००२, २४-०४-२००२,आणि १४-०५-२००२, रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ६२०/२ :**

मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे दिनांक ०८-०३-२००२ पत्रानुसार राज्य रस्ते विकास महामंडळाने औरंगाबाद एकात्मिक रस्ते विकास योजने अंतर्गत रु. ३१.०० कोटीची कामे करणे करिताचे निविदा काढलेल्या असुन पुढील कार्यवाहीसाठी मुंबई मुख्यालयास पाठविण्यात आलेले आहे. करिता औरंगाबाद महानगरपालिकेचा चालु आर्थिक वर्षातील रु. १.५ कोटीचा हिस्सा प्राप्त झाल्या शिवाय निविदा स्विकृतीची प्रक्रिया पुर्ण होणार नाही असे त्यांनी कळविले आहे, त्या करिता मुख्य अभियंता यांनी संदर्भिय पत्राव्दारे चालु आर्थिक वर्षात रु. १.५० कोटी व तदनंतरच्या दोन वर्षात म्हणजे २००२-०३ आणि २००३-०४ या आर्थिक वर्षात प्रति वर्ष रु. १.५० कोटी प्रमाणे एकुण रु. ४.५० कोटी देणे बाबत विनंती केली आहे. करिता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या माहितीस्तव व निर्णयासाठी सादर.

संवाद

श्री. दानवे अंबादास : या प्रस्तावसंबंधी निर्णय या पुर्वीच घेतलेला आहे नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतुन प्रत्येकी ५० हजार देण्याचा निर्णय घेतला पुन्हा पुन्हा प्रस्ताव का मंजुरीसाठी देण्यात येतो. प्रशासनाचे काय धोरण आहे.

मा. महापौर : मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : मागील वर्षाचे १.५० कोटी व चालु आर्थिक वर्षात १.५० कोटी व पुढील २००३-२००४ या आर्थिक वर्षात १.५० कोटी असे ४.५० कोटी रुपये रस्ते विकास महामंडळ यांचेकडे देणे आहे. या संबंधीची संचिका माझ्याकडे आलेली नाही त्यामुळे सविस्तर माहिती देऊ शकत नाही. हा प्रस्ताव अति शहर अभियंता कडुन आलेला आहे. माझ्या विभागा- आलेला नाही

अति शहर अभियंता : मुख्य लेखाधिकारी यांचे मार्फतच प्रस्ताव ठेवलेला आहे. रस्ते विकास महामंडळास एकुण ४.५० कोटी रुपये देणे आहे. चालु आर्थिक वर्षात १.५० कोटीची मागणी केलेली आहे.

श्री. संजय शिरसाठ : मुख्यलेखाधिकारी सांगतात मी प्रस्ताव ठेवला नाही. अति शहर अभियंता सांगतात मुख्यलेखाधिकाऱ्या मार्फतच ठेवलेला आहे. प्रस्ताव कोणी ठेवला याचा खुलासा घ्यावा.

मा. महापौर : हा प्रस्ताव यासाठीच घेण्यांत आलेला आहे की, याबाबत प्रशासनाला विसर पडले होते. यावरुन प्रशासनाचे अधिकारी कशा पध्दतीने काम करतात हे दिसुन येते. कामाच्या बाबतीत नियोजन नाही असे म्हणावे लागेल. बजेटमध्ये तरतुद झालेली असतांना पुन्हा का प्रस्ताव येतो.

श्री. स. अली सलामी : प्रस्ताव मंजुर झालेला असतांना कुणी सादर केला त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

मा. महापौर : यापुर्वी मंजुरी झालेली आहे, या प्रस्तावानुसार त्या खर्चाच्या बाबतीत बजेटमध्ये तरतुद केलेली आहे. त्यानुसार कार्यवाही करावी. पुर्वी मंजुरी झाल्यामुळे हा प्रस्ताव आता वगळण्यात येत आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : रस्ते विकास महामंडहास १.५० कोटी देण्याबाबत यापुर्वीच बजेट मध्ये तरतुद केलेली आहे. स. सदस्यांच्या स्वेच्छानिधीतुन प्रत्येकी ५० हजार रुपये व उर्वरित इतर हेड मधुन देण्याबाबत निर्णय घेतलेला होता. बजेट मध्ये तरतुद केलेली आहे प्रस्ताव आणण्याची आवश्यकता नव्हती. रस्ते विकास महामंडळाकडुन होणारे कामात बदल झालेला आहे का व झालेल्या बदलाप्रमाणे महानगरपालिकेची परवानगी घेतली आहे का मुळ ज्या प्रस्तावास मंजुरी दिली त्याचप्रमाणे कामे व्हावीत.

अतिशहर अभियंता (नगर रचना) : जेव्हढे काम पुर्ण होणार आहे तेव्हढीच परवानगी आहे. जास्तीची कामाची परवानगी दिलेला नाही.

श्री. कोकाटे काशिनाथ : जी.एन.ओ.सी.दिली त्यापेक्षा जास्तीचे काम सेव्हन हिल येथे करण्यांत आलेले आहे. असे समजते परंतु जेव्हढी एन.ओ.सी. दिली तेव्हढेच काम झाले पाहिजे याचा खबरदारी संबंधीत अधिकाऱ्यांनी घ्यावी.

मा. महापौर : रस्ते विकास महामंडळाकडुन सेव्हन हिल येथे उड्डाण पुलाचे काम होत आहे. रस्ते विकास महामंडहाच्या कामाच्या संदर्भात संबंधीत अधिकारी यांनी खुलासा मागवुन घ्यावा त्यानंतर विचार करण्यांत येईल.

**ठराव :**

सदर प्रस्तावाबाबत अर्थ संकल्पात तरतुद करण्यात आलेली आहे व यापुर्वी मंजुरी दिलेली असल्याने सदर प्रस्ताव वगळण्यात यावा असे सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ६२१/३ :**

सन २००१-२००२ च्या अर्थसंकल्पामधील ठळक वैशिष्टयामध्ये अभय योजनेचा समावेश होता. त्यानुसार नागरिकांना त्यांनी घेतलेले अनधिकृत नळ कनेक्शन विहीत कालवधी म्हणजेच १५ एप्रिल २००२ ते १४ मे २००२ कालवधीत अधिकृत करण्यासाठीच्या प्रस्तावास सर्वसाधारण सभेने विषय क्र. ५६३/२ दिनांक १८ फेब्रुवारी २००२ नुसार मान्यता दिली होती.

त्यानुसार नागरिकांना नळ कनेक्शन अधिकृत करुन घेण्यासाठी जाहीर निवेदन जा.क्र./मनपा/का अ/ पापु/२८५ दिनांक ११/०४/२००२ नुसार दै. लोकमत सामना, सकाळ तरुण भारत व औरंगाबाद टाईम्स या वृत्तपत्रामधुन प्रसिध्द करण्यांत आले होते. त्याच प्रमाणे शहरामधील विविध मोहल्यातुन जाऊन रिक्षावर भोगे बसवुन जाहिरात करण्यात आली तसेच पुन्हा जाहिरात जा.क्र./मनपा/काअ/पापु/३९९/२००२ दिनांक १६-०५-२००२ अन्वये मराठी, हिंदी व ऊर्दु भाषिक दैनिकात प्रसिध्द केली. तसेच या संदर्भीय माहितीची (स्ट्रीप) जाहिराजत ए.सी.एम.च्या माध्यमातुन दुरदर्शन वाहिनीवर केली. अशा प्रकारे व्यापक प्रमाणावर प्रशासनाच्या वतीने जाहिरात करण्यात आली.

सध्या पाण्याची टंचाई असल्याने व नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग व्हावा म्हणुन सदरील योजनेची मुदत दिनांक ०७ जुन २००२ पर्यंत वाढविण्यात यावी.

संवाद

श्री. किशोर तुळशीबागवाले : नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी लोकांचा सहभाग होत आहे फॉर्म घेऊन जातात लोक पैसे भरण्यासाठी येतात त्यावेळी अधिकारी/कर्मचारी जागेवर राहत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान हात असुन याबाबतीत कार्यवाही करण्यांत यावी.

श्री. दानवे अंबादास : ही योजना चांगली आहे. लोक नळ कनेक्शन अधिकृत करण्याचा फॉर्म घेऊन गेल्यानंतर सदर नळ कनेक्शन कोठे कार्यान्वित करायचे त्या संदर्भात तेथील जागेची पाहणी करण्यासाठी सांगतात परंतु विभागाचे अधिकारी/कर्मचारी प्रत्यक्ष जागेवर कोणीही जात नाही अशी माहिती मिळाली. रिस्पान्स मिळत नाही. टाळाटाळी होते.

श्री. स.अली सलामी : ही योजना खऱ्या अर्थाने राबवायची असेल तर संबंधीत वार्डातील नगरसेवकांना सोबत घ्यावे. स. सदस्यांना सर्व माहिती असते जेणे करुन योजना राबविण्यास तात्काळ मदत होईल. काही लोकांना या योजनेची काहीच माहिती नाही. अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी लोक जातात. परंतु अधिकारी/कर्मचारी प्रतिसाद देत नाही. त्यामुळे उलट अनाधिकृत नळ संख्येत वाढ होत आहे. प्रशासना मार्फत अधिकारी/कर्मचारी यांना ताकीद देण्यांत यावी.

मा. महापौर : स. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे जे अधिकारी/कर्मचारी/ कर्मचारी या उभय योजनेच्या माध्यमातुन अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्याच्या बाबतीत कामात हलगर्जीपणा करीत असतील तर प्रशासनाने कार्यवाही करावी. या योजनेस जास्तीत जास्त प्रतिसाद मिळण्याच्या दृष्टीने आणखी एक महिण्याची म्हणजेच ३१ जुलै २००२ पर्यंत मुदत वाढविण्यात येते तसेच योजना राबवितांना संबंधीत वार्डाच्या नगरसेवकांना विश्वासात घेऊन संबंधीत विभागाने कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार नागरिकांना त्यांनी घेतलेले अनधिकृतउ नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी सध्या पाणी टंचाई असल्यामुळे व नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग व्हावा म्हणुन सदर अभय योजनेनुसार अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी दिनांक ३१ जुलै २००२ पर्यंत मुदत वाढ देण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२२/४ :**

अ आयुक्त (म) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका व छावणी परिषद यांच्यातील जकात कराच्या हिश्यांसंदर्भातील करार हा दिनांक ३१-०३-२००२ रोजी संपुष्टात येत आहे. व दिनांक ०१-०४-२००२ छावणी परिषदेस जकात कराचा हिस्सा वाढीव प्रमाणात दयावा. अशी मागणी छावणी परिषदेकडुन झाल्याने याबाबत खालील प्रमाणे बैठका घेण्यात येऊन त्यात हिस्सा वाटत संदर्भात करार करण्याचे ठरविले आहे.

प्रथम दिनांक १८-०३-२००२ रोजी मा. महापौर यांचे दालनात बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीसाठी छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पुष्पेद्रसिंग श्री. करणसिंग काकस, री. मजीद उल्लाह बरकत उल्लाह, श्री. अनिल जैस्वाल, श्री. सुभाष कच्छवाह यादी सन्माननीय सदस्य उपस्थित होते तर महानगरपालिकेच्या वतीने मा. महापौर श्री. विकास जैन आयुक्त श्री. शैलेशकुमार शर्मा, मा. सभापती श्री. प्रशांत देसरडा मा. विरोधीपक्षनेता श्री. किशोर तुलसीबागवाले, उप आयुक्त, जकात अधिक्षक यांची उपस्थिती होती.

छावणी मंडळाच्या स. सदस्यांनी केंद्र शासनाच्या जा.क्र./१४/१८/९८ डी (क्यु ॲड सी) सरकार, संरक्षण मंत्रालय दि. १७-०८-२००० च्या आदेशानुसार लोकसंख्येच्या आधारावर  जकात कराचा हिस्सा देण्यात यावा अशी मागणी केली. इतर शहरातील छावणी मंडळास ज्याप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात जकात कराचा हिस्सा देण्यात येतो. त्याप्रमाणे औरंगाबाद मनपाने वार्षिक रु. १.१३ कोटी रक्कम घ्यावी. अशी छावणी मंडळाच्या सदस्यांनी आग्रही मागणी केली.

याबाबत महानगरपालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यांत आले की, औरंगाबाद येथील छावणी मंडळाची भौगोलिक परिस्थिती ही इतर शहरातील छानणी मंडळासारखी नसुन ती एकदम उलट आहे. कारण येथील छावणी परिषद ही शहराच्या एका बाजुस असुन त्या ठिकाणी कोणतीही मोठी बाजारपेठ नाही. त्याठिकाणी लहान मोठी ३० ते ४० दुकाने असुन कोणत्याही स्वरुपात मोठी आर्थिक उलाढाल होत नाही. तेथील नागरिकांना खरेदीसाठी शहरातील बाजारपेठेतच यावे लागते त्यामुळे वाटाघाटी करुन मा. महापौरांनी रु. ८५.०० लाख पतिवर्ष देण्याची तयारी दर्शविली, परंतु मंडळाने १.०१ कोटी रुपयापेक्षा कमी रक्कम स्विकारणार नाही असे सांगितल्यामुळे बैठक निर्णय न होता संपली.

सदर बैठकीस महानगरपालिकेने छावणी मंडळाची मागणी अमानय केल्याने मंडळाने स्वतंत्र टोल नाका उभारणीच्या दृष्टीने हालचाल सुरु केली. तसेच महानगरपालिकेने देखील उदभवणाऱ्या प्रसंगास सामोरे जाण्याच्या दृष्टीने गालवाडी व इतर ठिकणी जकात नाके उभारण्यासाठी तयारी सुरु केली. छावणी मंडळाने स्वतंत्र टोळ नाका उभारण्यास व महानगरपालिकेने आपले जकात नाके उभारल्यास यामध्ये सर्वसामान्य नागरिक व व्यापाऱ्यांचे नुकसान होऊन पर्यायाने दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थाचे देखिल आर्थिक नुकसान होण्याचा संभव होता. ही परिस्थिती ओळखुन मा. उप महापौर श्री. राजु शिंदे यांनी याबाबत पुनश्च बैठक घेण्याचे ठरवुन त्यानुसार छावणी मंडळास बैठकीसाठी आमंत्रित करण्यांत आले.

याप्रमाणे दिनांक २८-०३-२००२ रोजी मा. आयुक्त यांचे दालनात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीसाठी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पुष्पेद्रसिंग,स सदस्य श्री. अशफाकखान, श्री. करणसिंग काकस, श्री. आनिल जैस्वाल, श्री. बाबुलाल यादव, श्री. मजीद उल्लाह बरकत उल्लाह यांची उपस्थिती होती. तर महानगरपालिकेच्या वतीने मा.

आयुक्त श्री. शैलेशकुमार शर्मा, उपमहापौर श्री. राजु शिंदे मा. सभापती श्री. प्रशांत देसरडा, मा. सभागृह नेता श्री. संजय शिरसाठ, मा. विरोधी पक्षनेता श्री. किशोर तुलशीबागवाले, श्री. भागवत कराड, उप आयुक्त, श्री. बी.एन.गुट्टे व जकात अधिक्षक श्री. अय्युब खान हे उपस्थित होते.

छावणी मंडळाच्या सदस्यांनी मागील बैठकीतील लोकसंख्येच्या प्रमाणातच हिस्सा देण्याची आपली मागणी या बैठकीतही पुढे केली व प्रतिवर्ष १.०१ कोटी देण्याची मागणी केली. तथापी, मंडळाचे व महानगरपालिकेचे सन्माननीय सदस्य यांच्यात सविस्तर चर्चा होऊन वार्षिक रु. ९३.५० लाख खालील बाबीसह एकमताने निर्णय घेण्यात आला.

१) दिनांक ०१-०४-२००२ ते ३१-०३-२००७ पर्यंत प्रतिवर्ष रु. ९३.५० लाख महानगरपालिकेने जकात कराच्या हिश्यापोटी छावणी परिषदेस अदा करावेत.
२) सदरील रक्कम रु. ९३.५० लाख ही समान (१२) हप्त्यात दर महिण्याचे ०७ तारखेच्या आत अदा करण्यात यावी.
३) छावणी परिषदेस दयावयाचा दरमहा हप्ता देय दिनांकापर्यंत महानगरपालिकेने अदा न केल्यास द.सा.द.शे. १% टक्का दराने व्याज देणेबाबत छावणी परिषदेने मागणी केली आहे.
४) छावणी परिषदेने महानगरपालिकेस मध्यवर्ती नाका उभारण्यासाठी दोन एकर जागा देण्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे मान्य केले.

या प्रमाणे करार करावयाचा असुन मा. सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यास छावणी मंडळासोबत पुढील (५) वर्षासाठी करार करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे मंजुरी स्तव सादर.

संवाद

मा. महापौर : करारनाम्या मधील अट क्र. ३ मधील खुलासा करावा.

जकात अधिक्षक : या प्रस्तावामध्ये छावणी परिषदेने महापालिकेस मध्यवर्ती नाका उभारणीसाठी दोन एकर जागा देण्याबाबत कबुल केलेले आहे व त्यासाठी ते ना हरकत प्रमाणपत्र देणार आहेत.

मा. महापौर : करारनामा करतेवेळी जी जागा महानगरपालिकेस देणार आहे. त्या बाबतीत छावणी परिषदेची प्रथम एन.ओ.सी. घेण्यांत यावी व नंतरच करारनामा करण्यांत यावा.

श्री. कुमावत अविनाश : द.सा.द.शे. एक टक्का व्याजाचा करारनामा करु नये. ते देता येणार नाही.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दीन : अट क्र. ३ रद्द करावी.

मा. महापौर : १ टक्का व्याजाची अट रद्द करण्यांत येते. करारनामा करण्यापुर्वी जागेची एन.ओ.सी.घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावत दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चे नुसार छावणी परिषदेच्या जकात वाटा संबंधीचा करार सुपंष्टात येत असल्याने नविन करार करतांना प्रस्तावात नमुद केलली अ.क्र. ३ ची अट रद्द करुन व करारनामा करणे पुर्वी छावणी मंडळाकडुन महानगरपालिकेस हस्तांतर होणारे जागेचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन करार करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२३/५ :**

कार्यकारी अभियंता,(पाणी पुरवठा) यांनी फेर प्रस्ताव सादर केला की, शहरात पाणी पुरवठा करणारी १४०० मी.मी. व्यासाची मुख्य जलवाहीनी दिनांक १२-१२-२००१ रोजी कांचनवाडी येथे फुटली होती. त्यामुळे जलवाहिनी लगतच्या पसिरातील नागरिकांचे जे नुकसान झाले होते. त्यांना महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत करण्याबाबत सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ५५९/८ दिनांक २०-१२-२००१ अन्वये मान्यता दिलेली आहे.

ज्या वेळी महानगरपालिकेतर्फे प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यानुसार खालील प्रमाणेचे नागरिकांचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

| अ. क्र. | नुकसान धारकाचे नांव | रक्कम रु. |
|---|---|---|
| १. | योगेश्वर प्राव्हीजन | १०,०००/- |
| २. | श्रीमती. शे. सलीम बी.शे. मीयाँ | ३,०००/- |
| ३. | श्री. अशोक उत्तम जाधव | ३,०००/- |
| ४. | श्री. जब्बार बेग अहेमद बेग | ३,०००/- |
| ५. | नितीन रेडीमेंड क्लॉथ स्टोअर्स | ३,०००/- |
| ६. | श्री. कृष्ण हार्डवेअर्स | १,५००/- |
| ७. | श्री. पांडुरंग मोटे | २,०००/- |
| ८. | जयमल्लहार पान सेंटर | १,०००/- |
| ९. | बाबा टेलर्स | १,०००/- |
| १०. | गणेश गॅरेज | १,०००/- |
| ११. | श्री. अब्दुल हमीद | ५००/- |
| १२. | श्री. संजय मुळेकर | १,०००/- |
| १३. | श्री. अनिल रुपचंद मुळेकर | ५००/- |
| १४. | श्री. वसंत क्षिरसागर | ५००/- |
| १५. | श्री. प्रविण शर्मा | १,२००/- |
| | | ३२,२००/- |

उपरोक्त नुसार प्रत्यक्षात त्याच वेळेस घटना स्थळी झालेल्या नुकसानी बाबतचा पंचनामा करण्यात येऊन संबंधीत घरमालक/दुकामादार यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलया होत्या. सदरहु घरे ही वास्तविकत: राज्यमहामार्ग नियमावली नुसार रस्त्याच्या मध्यापासुन २२.५ मी.च्या पलीकडे इमारत रेषेच्या मागे हवीत. वास्तविकपणे संबंधीतांना नुकसान भरपाई देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी नाही. परंतु मानतेच्या दृष्टीकोनातुन सर्वसाधारण सभेमध्ये संबंधीतांना नुकसान भरपाई देणे बाबतचा ठराव पारीत करण्यात आलेला आहे. त्यास अनुसरुन महानगरपालिकेतर्फे वरील प्रमाणेची आर्थिक मदत येणे योग्य राहील.

करिता प्रस्तावावर फेर विचार होण्यास्तव व विचारार्थ सादर.

संवाद

श्री. कुमावत अविनाश : जी आर्थिक मदत देणार कोणाचा फंडातुन देणार आहे खुलासा द्यावा.

श्री. भगवान घडमोडे : २५% घरे नाल्यांच्या कडेला झालेली असुन पावसाळया मध्ये आर्थिक नुकसान झाल्यास सर्वच आर्थिक मदतीसाठी महानगरपालिकेकडे मागणी करतील सर्वांनाच आर्थिक मदत देणार आहात का?

श्री. कुमावत अविनाश : यापुढे कोणचेही आर्थिक नुकसान झाले तर मदत महानगरपालिकेस द्यावी लागेल. याचा सुध्दा विचार करावा

मा. महापौर : आपली जलवाहिनी फुटल्याने असे झाले आहे.

श्री. फुलारी नंदकुमार : सेव्हन हिल येथे पाण्याची पाईपलाईन फुटुन काही दुकानधारकांचे नुकसान झाले त्या नाही आर्थिक मदत देण्यांबाबत कार्यवाही करावी.

मा. महापौर : प्रशासनाने खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : यापुर्वी सर्वसाधारण सभेत मा. सभासदांने ठेवलेला प्रस्ताव पारित झालेला आहे. त्यास १४ ते १५ लक्ष रुपयाची आर्थिक मदत व्हावी म्हणुन मागणी केलेली होती. परंतु सदर जागेवर प्रत्यक्ष पंचनामा करुन जे नुकसान झाले त्यानुसार माहिती घेवुनच आर्थिक मदत देण्या संदर्भात प्रशासनाने प्रस्ताव ठेवलेला आहे. ही आकस्मित घटना आहे. आर्थिक मदत दयायची की नाही हे सभागृहाने ठरवावे. त्यानुसारच पुढील कार्यवाही केली जाईल.

श्री. निकाळजे : योगेश्वर प्रोव्हीजन हे व्यापारी आहेत अल्पघटकातील नाही. त्यांनी प्रकाश विमा काढलेला असेल उद्या मिलींदनगर मध्ये असे झाले तर आर्थिक मदत देणार का?

श्री. घोडेले नंदकुमार : जी आर्थिक मदत देत आहे ती कमी असुन यापेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. प्रस्ताव मंजुर करण्यात यावा व यापुढे ज्याचे नुकसान होईल त्यांना आर्थिक मदत देण्यांत यावी.

मा. महापौर : प्रस्ताव सर्वानमुते मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, शहरात पाणी पुरवठा करणारी १४०० मी.मी. व्यासाची मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे प्रस्तावातील अ.क्र. १ ते १५ मधील नुकसान धारकास एकुण रक्कम रुपये ३२२००/- ची नुकसान भरपाई देण्यांस सर्वांनुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२४/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासन निर्णय क्र. नगर विकास विभाग क्र.एएमसी १४२०१/१५५९/प्र.क्र.१३६/२०१/नवि-२४ दि. १५ नोंव्हेंबर २००१ अन्वये महानगरपालिका आस्थापनेवर कॉम्प्युटर प्रोग्रामर हे पद वेतन श्रेणी रु. ५५००-९००० मध्ये मंजुर करण्यात आले आहे. तसेच हे पद महानगरपालिकेतील पात्र कर्मचाऱ्यांमधुन भरण्याबाबत मंजुरी देण्यात आली आहे. सदर पद हे नव्यानेच निर्माण करण्यात आले असल्याने महानगरपालिका सेवा भरती नियमात समावेश नाही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ची प्रकरण -३ मधील कमल-३ नुसार सदर पदासाठी खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता राहिल असे प्रस्तावित करण्यात येते.

व्यास मान्यता व्हावी. अ) पदाचे नांव : कॉम्प्युटर प्रोग्रामर

वेतनश्रेणी : रु. ५५००-९०००

शैक्षनिक : कॉम्प्युटर इंजिनियरींग (अभियांत्रिकी) मधील पदवी

अथवा

विज्ञान/गणित पदवीधर आणि कॉम्प्युटर सायन्समधील मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी

अथवा

विज्ञान/गणित पदवीधर आणि मान्यता प्राप्त विद्यापिठाची एक वर्षाची संगणक पदविका उत्तीर्ण.

ब) तसेच सदर पदासाठी नोटीस बोर्डवर परिपत्रकाव्दारे कर्मचाऱ्यांचे अर्ज मागविण्यात आले होते त्यानुसार नियमित व दैनिक वेतन कर्मचाऱ्यांचे एकुण चार अर्ज प्राप्त झाले होते. कलम ५४(१) नुसार स्थापन केलेल्या निवड समितीपुढे कर्मचाऱ्यांच्या समक्ष मुलाखती घेण्यास आल्या. त्यात उपरोक्त शैक्षणिक पात्रतेनुसार श्री. अब्दुल बारी मो. ईस्माईल, कनिष्ठ लिपिक हे एकमेव उमेदवार शैक्षणिक पात्रता धारण करित असल्याने सदर पदावर नेमणुक करण्यास पात्र आहेत याबाबत निवड समितीने शिफारस केली आहे. त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) व प्रकरण तीन कलम २ मधील परंतुकानुसार श्री. अब्दुल बारी मो. ईस्माईल, कनिष्ठ लिपीक यांची कॉम्प्युटर प्रोग्रामर या पदावर नामनिर्देशनाने नेमणुक करण्या संबंधीचा प्रस्ताव महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

कृपया प्रस्तावास मान्यता व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका आस्थापनेवर रु.५५००-९००० या वेतनश्रेणी मध्ये निर्माण करण्यांत आलेल्या "कॉम्प्युटर प्रोग्रामर" या पदाकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण -३ मधील कलम-३ नुसार खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हतेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

अ) पदाचे नांव : कॉम्प्युटर प्रोग्रामर

वेतनश्रेणी : रु. ५५००-९०००

शैक्षणिक पात्रता : कॉम्प्युटर इंजिनिअरिंग (अभियांत्रिकी) मधील पदवी

अथवा

विज्ञान/गणित पदवीधर आणि कॉम्प्युटर सायन्समधील मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी

अथवा

विज्ञान/गणित पदवीधर आणि मान्यता प्राप्त विद्यापीठाची एक वर्षाची संगणक पदविका ऊत्तीर्ण.

तसेच कलम ५४(१) नुसार स्थापन केलेल्या निवड समितीपुढे झालेल्या मुलखतीत अनुसरुन समितीने शिफारस केल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) व प्रकरण तीन कलम -२ मधील परंतुकानुसार श्री. अब्दुल बारी मो. ईस्माईल, कनिष्ठ लिपीक यांची कॉम्प्युटर प्रोग्रामर या पदावर नामनिर्देशनाने नेमणुक करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांस येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२५/७ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार २४ मीटर (८०फुट) रुंद रस्ता रोषनगेट ते

सिडको या रस्त्याचा भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक १५-११-१९९५ रोजी पाठविले असुन मा. जिल्हाधिकारी यांनी उक्त रस्त्यात बाधित मिळकतीचा रितसर भुसंपादन कार्यवाहीसाठी प्रकरण विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक औरंगाबाद या कार्यालयाकडे वर्ग करण्यात आला आहे प्रकरणात नगर भुमापन कार्यालयाकडुन संयक्त मोजणी झालेली असुन कलम ६ खालील अधिसुचना प्रसिध्द करावयाची आहे.

परंतु महाराष्ट्र शासनाचा निर्णय क्रमांक एल क्यु एन १८/२००० प्र.क्र.-१२१ अ- २, दिनांक १४-०६-२००१ अन्वये भुसंपादन प्रकरणातील कार्यवाही मधील विलंब कमी करण्याच्या दृष्टीकोनातुन भुसंपादन संस्थेकडुन संबंधीत मिळकत धारकांना देऊ करण्यात यावायाच्या अंदाजीत मावेजा रक्कमेच्या २/३ रक्कम कलम ४ अथवा ६ ची अधिसुचना प्रसिध्द करण्यापुर्वी विन व्याजी ठेव म्हणुन जिल्हाधिकारी/भुसंपादन अधिकारी याचेकडे जमा केल्याशिवाय जिल्हाधिकारी यांनी कलम ४ ची/६ ची अधिसुचना अधिसुचना प्रतिध्द करु नये असे शासनाचे निर्णय आहे. त्यामुळे प्रकरणात संबंधीत मिळकत धारकांना रक्कम देय असलेल्या अंदाजीत रक्कम २/३ रक्कम रुपये १,५०,००,०००/- (रु एक कोटी पन्नास लाख फक्त) विशेष भुसंपादन अधिकारी यांनी त्यांचे पत्र जा.क्र.विभुसंअस/विध औ/भु-/२७३ दिनांक १२-०४-२००२ नुसार मागणी केलेली आहे.

सबब प्रकरणात वरील रक्कम विशेष भुसंपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांचेकडे पाठविण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजुर विकास प्रमाणे रोषनगेट ते सिडको या २४ मीटर (८० फट) रुंद रस्त्याचे भुसंपादनासाठी प्रस्तावात नमुद केलेल्या शासन निर्णय दिनांक १४-०६-२००१ नुसार भुसंपादन अधिनियम १८९४ चे कलम ४/६ ची अधिसुचना प्रसिध्द करण्यापुर्वी मोबदल्याची २/३ रक्कम सुमारे १,५०,००,०००/- (रुपये एक कोटी पन्नास लक्ष फक्त) विशेष भुसंपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांचेकडे पाठविणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२६/८ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे मुस्ताफाबाद येथील सर्व्हे क्र. ३/ पैकी जमीन औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढवि हद्द) नुसार आरक्षण क्र. ८ व ९ अनुक्रमे प्राथमिक शाळा व क्रिंडागण या प्रस्तावाने बाधित क्षेत्र संपादन करण्यासाठी मिळकतधारक मेसर्स यश डेव्हलपर्स तर्फे ॲड. आर.डी. बाहेती यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिनांक २४-०१-२००२ रोजी दिली आहे. उक्त खरेदी सुचनेनुसार सहा महिण्याच्या आत म्हणजे दिनांक २३-०७-२००२ पुर्वी भुसंपादन मुक्त प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा सदरील आरक्षण/व्यवगत होऊन मिळकतधारकांस विकास योजनेनुसार लगतचा वापर देय होऊन त्याप्रमाणे बांधकाम परवानगी दयावी लागेल आरक्षण दर्शविणारा विकास योजना भाग नकाशा अवलोकनार्थ सादर.

उपरोक्त आरक्षण खालील क्षेत्र खालील प्रमाणे आहे.

| आरक्षण क्र. | उद्देश | अंदाजे आरक्षणाखालील क्षेत्र | मौजे | सर्व्हे |
|---|---|---|---|---|
| क्र. ८ पैकी | प्राथमिक शाळा | ४००० चौ.मी. | मुस्ताफाबाद | ३/ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ पैकी | क्रिडागण | ४००० चौ.मी. | मुस्ताफाबाद ३/ |
| | | ८००० चौ.मी. | |

वरील प्रमाणे दोन्ही आरक्षणाचे अंदाजे एकुण क्षेत्र ८००० चौ.मी. असुन अर्जदाराने जमीन संपादनासाठी उपरोक्त खरेदी सुचना दिली आहे.

सदर भागाचा शिद्द सिध्द गणक दर र.रु. २०००/- प्रति चौ.मी. असुन यजावटी जाता रु. ९५ लाख इतका अंदाजे मोबदला होईल.

सबब उपरोक्त आरक्षणा खालील संपुर्ण क्षेत्र संपादन करण्यासाठी व त्यास भुसंपादन खर्चासह भुसंपादन प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद

श्री. कुमावत अविनाश : जागा भुसंपादनासाठी बजेट मध्ये तरतुद आहे. प्रस्तावानुसार अशा जागा भुसंपादनासाठी महानगरपालिकेकडे बजेट आहे का?

श्री. निकाळजे प्रकाश : जागा रिकामी आहे का नसता जागा घेणार व पुन्हा संबंधीत लोकांशी महानगरपालिकेने वाद निर्माण करुन प्रकरण वाढविणे बरोबर होणार नाही महानगरपालिकेचा पैसा खर्च होईल त्यादृष्टीने जागा रिकामी असेल तरच विचार व्हावा. सर्व लोकांनी नियोजन करुन त्यावर घरे झाली असेल.

श्री. भगवान रगडे : या विषयाची पुरवणी नाही. त्यामुळे प्रत आजच मिळालेली आहे त्यावर अभ्यास झालेली नाही. त्यामुळे हा प्रस्ताव पुढील बैठकीत घेण्यात यावा स्थगित ठेवावा.

मुख्यलेखाधिकारी : १-२ कोटीचे निवाडे बाकी आहे. प्रस्ताव सादर झाल्यानुसार एवढया मोठी रक्कम भुसंपादनासाठी देणे या वर्षी शक्य होणार नाही.

श्री. भगवान घडामोडे : यावर्षी किती बजेट ठेवलेले आहे किती जागा भुसंपादन केलेल्या आहेत किती जागेच्या नोटीसेस आलेल्या आहेत. किती जागेचा विकास केलेला आहे किती जागेवर विकास करणे बाकी आहे या संबंधीची सविस्तर माहिती दयावयास पाहिजे.

श्री. तकी हसनखान : १२७ च्या नोटीसचा खुलासा करावा.

नगरसचिव : महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ नुसार विकास योजना मंजुर झाल्यानंतर १० वर्षांच्या आत नियोजन व विकास प्राधिकरण यांनी भुसंपादनाची कार्यवाही केली नाही तर जमीन मालकास किंवा हित संबंधीतास अशी नोटीस विकास प्राधिकरणास देण्यांत येते. ही नोटीस मिळाल्यापासुन ६ महिन्याच्या आत जर भुसंपादनाची कार्यवाही केली नाही तर आरक्षणाखालील जागा व्यपगत होते व त्या भागात लगताचा जी वापर आहे त्यासाठी विकास परवानगी देणे अनुज्ञेय होते. या प्रकरणात महानगरपालिका नियोजन व विकास प्राधिकरण आहे. आपण ६ महिण्यात भुसंपादनाची कार्यवाही सुरु केली नाही. तर आरक्षण रद्द होईल.

श्री. तकी हसनखान : १२७ अन्वये किती लोकांनी खरेदी सुचना दिलेल्या आहेत. खरेदी सुचनेची नोटीस दिल्यानंतर मालक जबाबदार राहणार नाही.

मा. महापौर : किती लोकांनी खरेदी सुचनेची नोटीस दिलेली आहे. किती ठराव आतापर्यंत केलेले आहे. किती ठराव करण्याचे बाकी आहे.

प्र. सहाय्यक संचालक (न.र.) : १२७ खाली जेवढया नोटीस आलेल्या आहे त्या संबंधीचे सर्वच ठराव घेतलेले आहे आणखी नोटीस येण्याची शक्यता आहे.

मा. महापौर : आताच मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा केला की, अशा जागा भुसंपादनासाठी तरतुद नाही व जागाही डिलीट ही होऊ नये. यामधील मार्ग काय, उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुर्ण महापालिकेत आरक्षीत जागा विनामुल्य घेतल्या जातात.

प्र. सहाय्यक संचालक (न.र.) : आरक्षणातील जागा विनामुल्य घेता येतील यास टी.डी.आर. पध्दतीत एफ.एस. आय देऊन जागा घेता येते ती कार्यवाही आता करण्यांत येत आहे.

मा. महापौर : टि.ऊी. आर. ची कार्यवाही किती दिवसापासुन होत आहे.

प्र. सहाय्यक संचालक (न.र.) : ७-८ महिण्यापासुन होत आहे.

मा. महापौर : ७-८ महिण्यात का झाली नाही.

प्र. सहाय्यक संचालक (न.र.) : टि.डी.आर पध्दतीत विनामुल्य जागा मिळते व त्यांना देण्यांत येणारे एफ.एस.आय. त्या त्या झोन मध्ये वापरता येईल.

श्री. कोकाटे काशिनाथ : इतर महानगरपालिकेस ज्याप्रमाणे भुसंपादनाची कार्यवाही केली जाते त्याप्रमाणे करावी. विनामुल्य जागा भुसंपादनाची कार्यवाही व्हावी. सध्याच्या परिस्थितीत महापालिकेची परिस्थिती चांगली नाही. सर्व आरक्षणातील जागा भुसंपादन करण्यांत याव्यात.

श्री. जयवंत ओक : नुसता ठराव पास करुन उपयोग नाही. अमंलबजावणी झाली पाहिजे. ज्या ज्या आरक्षीत जागा आहे. त्या भुसंपादन करण्या संदर्भात एक विशेष बैठक बोलावुन सविस्तर चर्चा करुन निर्णय घेणे योग्य होईल. किती आरक्षीत जागा आहे कोणत्या भागात आहे. किती क्षेत्र आहे सर्वच्या सर्व ८३ वार्डात पाहणी करावी. आरक्षीत जागा रिकाम्या आसाव्यात. आताच चर्चा झाली. जागा भुसंपादन करणार परंतु तेथे अगोदरच चर्चा झालेली आहे महानगरपालिकेने रक्कम मोजायची व पुन्हा वादविवाद करायचा हे बरोबर होणार नाही. कलम १२७ ची नोटीस देणारे ते डिलीट होईल या विषयावर विशेष बैठक बोलावावी सविस्तर चर्चा करावी. सर्व अनाधिकृत वस्त्याचा सुध्दा सर्व करावा. जास्तीत जास्त जागा भुसंपादन कराव्यात प्रस्ताव स्थगित करावी.

श्री. सुदाम सोनवणे : विषय क्र. ८ व ९ हे सारखेच विषय आहेत सदर विषय स्थगित न ठेवता जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्याची काय कार्यवाही केली. जमीन मालकास मोबदला द्यावा लागेल. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नाही. अर्थ संकल्पात २ कोटी ठेवले व या प्रकरणात ३ ते ३.५० कोटी द्यावे लागणार आहे. इतर कोणत्या लेखाशिर्ष मधुन देणार सदर प्रस्ताव स्थगित ठेवुन महानगरपालिकेचा फायदा होणार नाही. हया ऑगस्ट मध्ये विकास योजनेस १० वर्ष पुर्ण होत आहे. ज्यांची १० वर्षात संपादन केली नाही. तर जमीन मालक त्याचा उपयोग घेऊ शकतो शहर विकास आराखडयामध्ये किती आरक्षणे आहेत. किती मोबदला द्यावा लागेल. याचा अंदाज घ्यावा. ऑगस्ट मध्ये कोणकोणते आरक्षण महत्वाचे आहे, ते आपणाकडे घेण्यांत यावे. टि.डी.आर लागु केल्यास अभिनंदन करतील. जनतेला मोबदल्याच्या स्वरुपात एफ.एस.आय. मिळेल आर्थिक बोजा पडणार नाही. परंतु जुनच्या सभेत ठराव होतील जुलै मध्ये इतिवृत्त कायम होतील. ६ ऑगस्टला १० वर्ष

होतील. त्यापुर्वी टि.डी.आर वापरात येईल. असे वाटत नाही. मुख्य लेखाधिकारी यांनी आपली ऐपत नसल्याचे सांगितले. त्यामुळे डिलीट करावे. पुढे शासन दरबारी पत्र पाठवुन मुदत वाढवुन घेऊ टि.डी.आर. लागु करावा. स्थगित करुन जिल्हाधिकारी यांचे कडे पाठवुन काही उपयोग होणार नाही माझे वैयक्तिक मत आहे. आरक्षणातुन वगळावे.

श्री. तकी हसनखान : एकदा जागा भुसंपादन केल्यानंतर जागा मालकास मोबदला दिला जात नाही मोठी मोठी घरे आरक्षीत केलेली आहे. त्यांना परवानगीही मिळत नाही. व भुसंपादन करुन त्यांना पैसा ही दिला जात नाही. जुन्या शहरातील आरक्षणे वगळावी शहर विद्रुप होत आहे. हे शहर सुंदर होण्याऐवजी विद्रुप होत आहे. परवानगीही नाही व संपादनही नाही. नाईलाजाने बांधकाम करावे लागते.

प्र.सहाय्यक संचालक (न.र.) : ज्याची जागा आहे. त्या जागा मालकास एफ.एस.आय. मागविल्यास तात्काळ द्यावा लागेल.

श्री. सोनवणे सुदाम : मध्यवर्ती बसस्थानका जवळील एका जागेवर बोलट पध्दतीने व्यापारी संकुल करायाचा निर्णय घेतलेला होता. खालच्या मजल्यात वाहनतळ करणार होतो तसा ठराव मंजुर केलेला असुन शासनाकडुन सुध्दा मान्यता आलेली आहे. परंतु पुढील कार्यवाही झालेली नाही यात महानगरपालिकेस फार मोठा फायदा होणार होता अशा प्रस्तावाच्या बाबतीत प्रशासन का कार्यवाही करीत नाही.

श्री.दानवे अंबादास : आताच स. सदस्य श्री. सोनवणे यांनी मुद्दा उपस्थित केल्यानुसार बोल्ट पध्दतीने विकास केल्यास महानगरपालिकेला फायदयाचे होईल. अशा प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही झाली पाहिजे.

मा. महापौर : नगर रचना विभागाच्या या विषयावर सविस्तर चर्चा करण्यासाठी येत्या ३० तारखेस विशेष बैठकीचे आयोजन केले जाईल. तशी सुचना प्रशासनाला देण्यांत येत आहे. त्या बैठकीत सविस्तर प्रस्ताव क्र. ८,९ मांडण्यात यावा. चर्चा होऊन निर्णय घेण्यात येईल. या प्रस्तावा संबंधीची कार्यवाही ६ महिण्यापासुन चालु आहे. बजेट ठेवतांना संबंधीत विभागाकडुन तशी सुचना व्हावयास पाहिजे होती. यावरुन प्रशासन कशा पध्दतीने कामे करतात हे दिसुन येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली. तसेच नगर रचना विभागाच्या विषयावर विशेष बैठकीचे आयोजन केले जाईल. त्यावेळी प्रशासनामार्फत हा प्रस्ताव ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६२७/९ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार मौजे कांचनवाडी येथील सर्व्हे क्र. ११ व १२ मधील असलेले क्षेत्र संपादन क्रिडगण या प्रस्तावाने बाधित असलेले क्षेत्र संपादन करण्यासाठी खालील मिळकत धारकांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ ते कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिलेली आहे.

| अ. क्र. | नांव | मौजे | सर्व्हे.क्र. | बाधित क्षेत्र | खरेदी सुचना |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. किरण राधावल्लभ धुत | कांचनवाडी | ११/पैकी | २ ए २२ गुं. | २५-०१-२००२ |
| २. | श्री. ऋषीकुमार राजनारायण बागला | कांचनवाडी | ११/पैकी | १ ए २० गुं. | २७-०२-२००२ |
| ३. | श्री. राजकुमार नंदलाल धुत | कांचनवाडी | ११/पैकी | १ ए २० गुं. | ०८-०३-२००२ |
| ४. | श्री. लतादेवी नविनकुमार | कांचनवाडी | ११/पैकी | १ ए ०० गुं. | २७-०२-२००२ |
| मानधन | | | एकुण | ६ ए २९ गुं. | |

उपरोक्त आरक्षणाखाली विकास योजनेनुसार सुमारे ९ एकर जमीन बाधित आहे, त्यापैकी ६ एकर २९ गुंठे साठी वरील प्रमाणे जमीन खरेदी सुचना प्राप्त झालेली आहे, करीता संपुर्ण आरक्षणा खालील जमीन संपादन केल्यास आरक्षणाचा उद्देश सफल होऊन पुर्ण आरक्षण विकसीत होईल.

सदर भागाचा मुल्यांकन दर रु. १२००/- प्रति चौ.मी. असुन वजावटी जाता अंदाजे रु. २ कोटी ५० लाख इतका मोबदला होईल. सदरील रक्कम ही अंदाजे असुन प्रत्यक्ष मोजणी आणि ज्या तारखेच्या अधिसुचना प्रसिध्द होईल. त्या वेळेच्या दरानुसार मुल्यांकन होईल. उक्त आरक्षण दर्शविणारा विकास योजना भाग नकाशा अवलोकनार्थ सादर करीता उपरोक्त आरक्षणा खालील संपुर्ण क्षेत्र संपादन करणेसाठी व त्यास लागणारा वरलप्रमाणे भुसंपादन खर्चासह भुसंपादन प्रस्ताव दिनांक २४-०६-२००२ पुर्वी मा. जिल्हाधिकारी यांचे कडे पाठविणेस्तव भुसंपादन प्रस्ताव सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली. तसेच नगर रचना विभागाच्या विषयावर विशेष बैठकीचे आयोजन केले जाईल त्यावेळी प्रशासनामार्फत हा प्रस्ताव ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६२८/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगपुरा भाजीमंडी समोर मनपा दुकानावर पाहिला मजला बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. २५,८७,०००/- चे अंदाजपत्रके तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ०४-०८-९८ रोजी मान्यता दिलेली आहे. तसेच मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. १४४/९ दिनांक १९-११-९८ च्या इतिवृत्तान्वये सदरील अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी निविदा मागविल्या असता विक्रिच्या तारखेपर्यंत एकुण ७ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकुण ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. तुलनात्मकदृष्टया सर्वांत कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.१० टक्के जास्त दाराची निविदेस मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ०६-०७-९९ संबंधीत गुत्तेदाराशी दराबाबत दिली. मान्यतेनुसार संबंधीत गुत्तेदारमार्फत कामपुर्ण करुन घेण्यात आले आहे. काम नाल्यातील असल्याने तांत्रिकदृष्टीने नाल्याचे (

) पाया खोल गेल्याने व आर.सी.सी. डिझाईन व (लोखंडामध्ये वाढ) संबंधीत वास्तुविशारद यांनी सुधारित सादर केल्याप्रमाणे सदर कामात अंदाजपत्रकापेक्षा जास्त खर्च झाला आहे. झालेले काम वगळता सदरील इमारतीमध्ये उर्वरित कामात आतील व बाहेरीत रंगकाम, जिन्याचे पुर्ण काम, प्लोरींग स्वच्छता गृह इत्यादी कामासाठी रुपये ६,०१,०१२/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक २०-०५-२००२ रोजी मान्यता दिलेली आहे. व या वाढीव कामासाठी वर्ष २००२-२००३ अर्थसंकल्पात ६,००,०००/- ची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

करिता पुर्वीचे अंदाजपत्रक २५,८७,०००/- व सुधारित ६,०१,०१५/- असे एकुण ३१,८८,०१५/- ची मान्यता देऊन वाढीव काम संबंधीत गुत्तेदारांकडुन करुन घेणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद

श्री. शेख ईसाक शेख जैनोद्दीन : यात आर्किटेक्ट तसेच अंदाजपत्रक तयार करणाऱ्या अभियंत्याची चुक झालेली आहे. अंदाजपत्रक तयार करतांना संबंधीत अभियंता यांनी पाया किती खोल जाणार याची खात्री का करुन घेतली नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पाटबंधारे विभागात अंदाजपत्रक तयार करण्यापुर्वी बोरिंग मशीनने ड्रिल करुन खडक जमीनीमध्ये किती खोल आहे याचे परिक्षण केले जाते. महानगरपालिकेच्या अभियंत्यांनी असे परिक्षण का केले नाही संबंधीत वास्तु विशारदाला स्टिल डिझाईन देतांना याची जाणीव का झाली नाही. संबंधीत गुत्तेदाराकडुन काम पुर्ण करुन घेतल्याचे सांगण्यात येत आहे परंतु सुरुवातीसच पाया खोल गेल्याने अंदाजपत्रकीय दरात वाढ झाल्याचे समजल्यानंतर देखील सभागृहाच्या निदर्शनास का आणुन देण्यात आले नाही.

(याचवेळी उपमहापौर हे महापौर यांचे खुर्चीवर बसुन सभागृहाचे कामकाज चालवितात) मा. महापौर आपण उपमहापौरांकडे कामकाज सोपविले मी महत्वाच्या विषयावर चर्चा करित आहे. सदरचे काम सभागृहाचा अपमान गृहित धरुन करण्यात आले हा सभागृहाचा अपमान आहे. करिता वाढीव अंदाजपत्रकास मंजुरी न देता क्वॉलिटी कंट्रोल किंवा सार्वजनिक बांधकाम खात्याचा तज्ञ अधिकाऱ्यांकडुन सदरील कामाची चौकशी करावी. नंतरच या संबंधीचा प्रस्ताव सभागृहात मांडण्यात यावा. सुरुवातीसच अंदाजपत्रकीय दरात तफावत निर्माण झाली होती. तेव्हा संबंधीचा अधिकाऱ्यांनी निविदा रद्द करुन नव्याने निविदा का मागविली नाही. वाढीव रुपये ६,०१,०१५/- रक्कम घ्यावयाची झाल्यास संबंधीत अधिकाऱ्याकडुन चुकीचा दंड म्हणुन वसुल करावी. हा प्रस्ताव गोलगोल आलेला आहे. अगोदर शहरातील जनतेला पिण्याचे पाणी द्यावे नंतरच अशी विकास कामे करण्यांत यावी. लोक पाण्यासाठी त्रस्त झालेले आहे. या ६ लक्षच्या वाढीव प्रस्तावास मंजुरी देऊ नये.

श्री. सुदाम सोनवणे : सन १९९९ ला मा. आयुक्तांनी संबंधीत गुत्तेदाराशी वाटाघाटी केली. ९.१०% जास्त दराची निविदा भरुन आलेली होती ४% जास्त दराने मा. आयुक्तांनी वाटाघाटी केलेली आहे. हा वाढीव कामाचा प्रस्ताव असुन हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे न येता स्थायी समिती सभेत ठेवण्यास पाहिजे होता. या सभागृहात ठेऊन सभागृहात अवमान झालेला आहे. वाटाघाटी

करतांनाच काम कसे व कोणत्या पध्दतीने करावे. लागणार आहे. खोली किती आहे. निश्चित खर्च किती येणार याची माहिती घ्यावयास पाहिजे होती. ती जबाबदारी न सांभळता उलट वाढीव ६ लक्ष रुपयाचा प्रस्ताव मंजुरीसाठी येतो हे बरोबर नाही. व कोणत्या नियमाने हा प्रस्ताव या सभागृहासमोर आला याची चौकशी झाली पाहिजे व यापुढे असे प्रस्ताव या सभागृहासमोर येणार नाही. व सभागृह अपमानीत होईल असे काही कृत्य केले जाणार नाही याची दखल घेण्यास प्रशासनाला सुचना करण्यात (याचवेळी मा. महापौर त्यांचे आसनग्रहण करतात व सभेचे कामकाज चालवितात.)

श्री. दानवे अंबादास : वाढीव काम हे जास्तीत जास्त १० टक्के च्या वर होत नाही. २५ लक्षचे काम होते ६ लक्ष वाढीव काम आले याचा अर्थ २५ टक्के वाढीव काम होत आहे हे बरोबर नाही. एवढया वाढीव कामाच्या रक्कमेचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे न येता समिती समोर ठेवावयास पाहिजे होता. स्थायी समिती समोर पाठविण्याचे आदेश करावेत.

श्री. भगवान घडामोडे : एकाच कामामध्ये वाढीव खर्च म्हणुन ६ लक्षचे प्रस्ताव येतात. परंतु पाणी प्रश्नासंदर्भात एखादा ५० हजार रुपयाचा प्रस्ताव मंजुर होऊन संचिका सादर केल्यास त्यावर मंजुरी न होता वेगवगळे शेरे येतात. पिण्याचा पाण्याचा प्रश्न महत्वाचा आहे. प्रशासनाचा खुलासा घ्यावा.

मा. महापौर : सदर प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव स्थायी समिती पुढे ठेवण्यास मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ६२९/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, टाऊन हॉल येथील प्रशासकीय इमारत टप्पा क्र. ३ च्या उद्घाटन समारंभाचे वेळी मा. महापौर, यांनी या इमारतील स्वागत कक्षामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची सिंहासनारुढ शिल्पाकृती (म्युरल) बसविण्यात येईल अशी घोषणा केलेली आहे.

तरी टाऊन हॉल येथील प्रशासकीय इमारत टप्पा क्र. ३ मधील स्वागत कक्षात छत्रपती शिवाजी महाराज यांची सिंहासनारुढ शिल्पकृती (म्युरल) बसविण्याचे निर्णयास्तव प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टाऊन हॉल येथील प्रशासकीय इमारत टप्पा क्र. ३ च्या येथील स्वागत कक्षात छत्रपती शिवाजी महाराज यांची सिंहासनारुढ शिल्पकृती (म्युरल) बसविण्याचे स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३०/१२ :**

नगरसचिव महानगरपालिका प्रस्ताव सादर करतात की, ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट मुंबई यांचे तर्फे महानगरपालिकेतील महापौर, उपमहापौर,

पदाधिकारी व महिला निर्वाचित पालिका सदस्यांकरिता पुणे येथे दिनांक १० ते १२ जुलै २००२ दरम्यान विशेष प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यांत आले आहे.

सदरील प्रशिक्षण शिबिरात ७४ वी घटना दुरुस्ती मनपा कायदे, शासकीय योजना, महिला सदस्यांत निर्णय प्रणाली वाढविणे इ. बाबत मार्गदर्शन करण्यांत येणार असुन त्यासाठी प्रत्येकी रु. १५०/- रजिस्टेशन फि स्थानिक स्वराज्य संस्थेकडे भरावे लागणार आहे.

स. सदस्यांचे जाणेयेणेसाठी प्रवास खर्च, निवास व इतर प्रसंगानुरुप खर्च महानगरपालिकेस करावा लागणार आहे. निवास व्यवस्था देखिल प्रशिक्षणार्थी यांना स्वतःच करावी लागणार आहे. शासन नियमानुसार रु. २२५/- प्रती दिवस निर्वाह भत्ता देय आहे.

करिता सदरील प्रशिक्षणास जाणे करिता ४ गांवे सर्वसाधारण सभेने निश्चित करुन देणेसाठी व प्रशिक्षण दौऱ्यास खाजगी वाहन घेऊन जाणेस तसेच निवास, निर्वाह भत्ता व इतर प्रसगानुरुप होणारा संभाव्य खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

मा. महापौर : सचिव यांचेकडे चार सदस्यांची नांवे देण्यात येतील प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई तर्फे पुणे येथे दिनांक १० ते १२ जुलै २००२ रोजी आयोजित प्रशिक्षण शिबीरासाठी ४ महिला पालिका सदस्यांना पाठविण्यास व त्यास येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणारे पालिका सदस्यांची नांवे मा. महापौर यांनी निश्चित करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांत यते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्र. ६३१/१ :**

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे औरंगाबाद शहरात विविध ठिकाणी शॉपिंग सेंटर उभारण्यात आलेले आहेत उदा. औरंगपुरा भाजीमंडी, नाथ सुपर मार्केट रेल्वेस्टेशन (साधना लॉज) येथे जशी शॉपिंग सेंटर मनपाने उभारली आहे, तशी शॉपिंग सेंटर, ऑफिसेस इत्यादी वापर असलेल्या इमारती औरंगाबाद शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी नाहीत. त्यासाठी रेल्वेस्टेशन येथे महापौर बंगल्याच्या दक्षिणेस झोन क्र. ६ चे आवारातही असे व्यापारी संकुल बांधणेस हरकत नाही. मनपाची आर्थिक परिस्थिती पाहता सदर इमारती बाधा वापरा व हस्तांतर करा हया तत्वावर बांधुन घेतल्यास मनपाचा पैसा खर्च न होता हया इमारती पासुन मनपास उत्पन्न मिळेल.

तसेच हया जागा विकास योजनेच्या कोणत्याही प्रस्तावाने अथवा झोनिंग मध्ये येत असतील तर हयासाठी आवश्यक असलेल्या वापराचे अनुषंगाने म्हणजेच व्यापारी संकुलासाठी हया जागेचा वापर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचनाचे अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन वापर बदलावा हया कार्यवाहीचे सर्व अधिकार मा. आयुक्तांना द्यावेत ही जमीन मनपाच्या मालकीची असल्यामुळे व ताब्यात असल्यामुळे मनपा सर्वसाधारण सभेची अनुमती झाल्यास जागेत वरीलप्रमाणे वापर बदलावयाची अंमलबजावणी लगेच

करण्याची मान्यता व्हावी. म्हणजे सदर जागेवर वरील व्यापारी संकुल बांधण्याची कार्यवाही व विकास योजना बदलवयाची कार्यवाही समांतर रित्या करावी.

सुचक : श्री. संजय शिरसाठ
अनुमोदक : श्री. किशोर तुळशीबागवाले

संवाद

श्री. किशनचंद तनवाणी : याच पध्दतीने वसंतभुवन येथेही व्यापारी संकुल बांधण्यात यावे तसा समावेश या प्रस्तावात करण्यात यावा व ठराव मंजुर करावा.
सार्वजनिक निम सार्वजनिक वापर बदलुन महानगरपालिकेचे व्यापारी संकुलासाठी बांधण्यास बदल करावा.

श्री. तुळशीबागवाले : यात स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यात यावे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. तनावणी किशनचंद यांनी सुचना मांडल्यानुसार वसंतभुवन येथेही व्यापारी संकुल बांधण्यात यावे तशी दुरुस्ती प्रस्तावामध्ये करण्यात येते. प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने शहरात विविध ठिकाणी व्यापारी संकुले बांधा, वापरा व हस्तांतर करा या तत्वावर बांधण्यासाठी रेल्वेस्टेशन येथील महापौर बंगल्याचे दक्षिणेस व विभागीय कार्यालय विभाग क्र. ६ च्या आवारात आणि मछली खडक येथील वसंतभुवन, विभागीय कार्यालय विभाग क्र. २ च्या आवारात असलेला भाग औरंगाबाद मंजुर विकास योजना (सुधारीत) मध्ये सार्वजनिक निमसार्वजनिक वापरा ऐवजी किंवा इतर कोणतेही प्रस्तावामध्ये अथवा झोनिंगमध्ये येत असतील ते बदलुन महानगरपालिकेचे व्यापारी संकुलासाठी आरक्षित करण्यांस महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदलाची कार्यवाही करण्यास आणि यासंबंधीचे कार्यवाही करणेचे सर्व अधिकार मा. आयुक्तांना प्रदान करण्यास तसेच व्यापार संकुल बांधणे व विकास योजनेस प्रस्तावित गौण फेरबदल करण्याची कार्यावाही समांतररित्या करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही.

**विषय क्र. ६३२/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेत शासकीय अस्थापनेवर सहाय्य संचलाक नगररचना हे पद असुन या पदाचे सर्व वेतन, भत्ते महानगरपालिका अदा करते. महानगरपालिका अस्तित्वात आली त्यावेळी महानगरपालिकेकडे अनेक अधिकारी प्रतिनियुक्तीवर बोलवण्यात आले होते, जसे शहर अभियंता जलग्रह अभियंता, सहाय्यक आयुक्त ई. परंतु आता महानगरपालिकेकडे अर्हता प्राप्त अधिकारी आहेत, त्यामुळे या पदावरील प्रतिनियुक्ती संपुष्टात आणुन महानगरपालिका अधिकाऱ्यांमधुन ही पदे भरण्यात आलेली आहे.

गेल्या अनेक वर्षापासुन महानगरपालिकेच्या नगर रचना विभागात सहाय्यक संचालक नगर रचना या पदावर कोणीही अधिकारी यांनी जास्त काळ काम केलेले नाही, गेल्या अनेक महिन्यापासुन हे पद रिक्त आहे, शिवाय शासनाच्या नगररचना खात्यात अधिकारी उपलब्ध होण्याची शक्यता वाटत नाही. जनतेची गैरसोय दुर करणे व कामाचा निपटारा होणेसाठी हे पद भरणे आवश्यक आहे. या पदावर शासकीय अस्थापनेवर अधिकारी

उपलब्ध होण्याची शक्यता कमी आहे. महानगरपालिका अस्थापनेवर आता योग्य अर्हता धारक अधिकारी आहेत या पदाचे वेतन भत्ते महानगरपालिकेसच द्यावे लागते.

सबब आता सहाय्यक संचालक नगररचना हे पद शासकीय अस्थापना ऐवजी महानगरपालिकेच्या अस्थापनांवर वर्ग करण्यास आणि सेवाभरती नियमामध्ये स्थंभ क्र. ४ मध्ये पदोन्नतीसाठी नगर रचनाकार म्हणुन किमान ५ वर्षाचा अनुभवासह ऐवजी नगर रचनाकार किंवा उपअभियंता म्हणुन किमान ७ वर्षाचा अनुभवासह अशी दुरुस्तीसह पात्र अधिकाऱ्यांमधुन कार्यकारी अभियंता याच संवर्गात शासनाची मान्यता मिळेल त्यास अधिन राहुन पदोन्नतीने भरण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. किशोर तुळशीबागवाले
अनुमोदक : श्री. मीर हिदायत अली श्री. प्रकाश निकाळजे,
श्री. कैसरखान, श्री. रतनकुमार पंडागळे,
डॉ. आशा बिनवडे, श्री. सुदाम सोनवणे,
श्री. स.अली सलामी.

संवाद

श्री. सोनवणे सुदाम : हा प्रस्ताव मंजुर करावा. प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर लगेच अधिकारी या पदावर नियुक्त होणार नाही. यास शासनाची मंजुरी लागणार असुन वेळ लागणार आहे. महापालिकेतील अधिकारी नियुक्त केल्यास कामे थांबवुन राहणार नाही.

श्री. भगवान घडामोडे : या पदावर शासनाचे अधिकारी येतात आतापर्यंतचा अनुभव आहे. आताच आपले अधिकारी कसे भरणार महापालिकेचे कामकाज चांगले चालवायचे असेल तर या पदावर शासनाचेच अधिकारी असावेत.

श्री. अफसर खान : यापुर्वी या विभागामध्ये अनेक घोटाळे झालेली आहेत तशा बातम्या वृत्तापत्रात सुध्दा आलेल्या होत्या. जे शासनाचे अधिकारी नियुक्त होतात ते जास्त कार्यकाळ राहत नाही. व त्यांची काम करण्याची इच्छा सुध्दा नसते. सतत बदल्या होतात, त्यामुळे या विभागातील कामे वेळेवर न होता उशीर होत आहे, येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत आहे. व महानगरपालिकेचे यामुळे नुकसान होत आहे. नगर रचना हे पद कायम स्वरुपी अधिकारी राहण्याच्या दृष्टीने व कामे तात्काळ होण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेती अधिकाऱ्यांमधुन भरण्यांत यावे. हा प्रस्ताव मंजुर करण्यांत यावा.

श्री. किशोर तुळशीबागवाले : ४-५ वर्षापासुन लोकांना त्रास होत आहे जनतेची कामे होत नाही. म्हणुन कायमस्वरुपी या विभागाचे अधिकारी महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यामधुन भरण्यात यावे या अगोदरही काही पदावर शासनाचे अधिकारी नियुक्त होत असे परंतु आता महापालिकेच्या कर्मचाऱ्यांमधुन घेतले जातात. त्याप्रमाणे या पदाच्या बाबतीत करावे.

श्री. जयवंत ओक : या पदावर तसेच शिक्षणाधिकारी, उप आयुक्त (म.) मुख्यलेखा परिक्षक हे अधिकारी शासनाचे असतात. येथील कर्मचाऱ्यामधुन नियुक्त करु नये. ही प्रथा बंद करावी. प्रस्ताव मंजुर करु नये.

श्री. निकाळजे प्रकाश : आतापर्यंत जे जे शासनाचे अधिकारी या पदावर आलेले आहे त्यांचेवर काहीना काही आरोप ठेवण्यात आलेले आहे. या विभागाची कामे थांबवुन आहे. प्रस्ताव ठेवलयानुसार आता ज्या अधिकाऱ्यांची अर्हता असेल त्याची नियुक्ती करण्यात यावी. प्रस्ताव मंजुर करावा यास/आणखी शासन

मंजुरी लागणार आहे. मंजुर केल्यानंतर लगेच हे पदावर भरती करता येणार नाही. ज्यांनी या महापालिकेस १०-१०,१५-१५ वर्षापासुन खऱ्या अर्थाने सेवा केली त्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने हा प्रस्ताव ठेवलेला आहे. तो मंजुर करावा.

श्री. कोकाटे काशिनाथ : या विभागात शासनाकडुन येणारे अधिकारी जास्त कार्यकाल पुर्ण करीत नाही. त्यामुळे या विभागातील कामे वेळेवर होत नसुन अनेक प्रकरणे प्रलंबीत आहे. व महापालिकेचे उत्पन्न सुध्दा बुडत आहे. आजची महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता व कायम स्वरुपी या पदावर अधिकारी असण्याच्या दृष्टीने या पदावर महापालिकेतील कर्मचाऱ्यांमधुन नियुक्ती करण्यांत यावी. सेवा भरती नियमात बदल करण्यांत यावे यापुर्वीही अनेक बदल सेवा भरती नियमात केलेले आहे. नागरिकांच्या अडीअडचणी तात्काळ दुर होण्याच्या दृष्टीने या प्रस्तावास मान्यता द्यावी. व शासनाकडे प्रस्ताव पाठवुन तात्काळ मंजुरी घेण्यांत यावी. नियमावलीमध्ये बदल करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

श्री. तकी हसनखान : हा प्रस्ताव मंजुर करणे आवश्यक आहे. या पदावर शासनाचे कोणीही अधिकारी येण्यास इच्छुक नाही. आले तरी कमी वेळ राहतात. त्यांचेवर आरोप होतात. चौकशी करण्याची कार्यवाही देखिल पुर्ण न होताच त्यांच्या बदल्या होतात. त्यामुळे चौकशीचे काम सुध्दा पुर्ण करता येत नाही अशी परिस्थिती आहे. कायमस्वरुपी अधिकारी नसल्यामुळे एका महिण्यात २ ते ४ परवानगी मिळते महानगरपालिकेचे उत्पन्न कमी होत आहे. ठराव मंजुर करावा यामागे काहीही राजकारण नाही. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान ही नाही.

श्री. स.अली सलामी : आतापर्यंत शासनाचे जे जे अधिकारी या पदावर येऊन गेले. ते येण्यास इच्छुक नव्हते जे अधिकारी सेवानिवृत्तीस आले त्यांना येथे पाठविले जात असे. काही आरोप आल्यास त्या संदर्भात चौकशी करण्यात सुध्दा खुप अडचणी आलेल्या आहे. जो प्रस्ताव ठेवला तो अत्यंत चांगला असुन महानगरपालिकेच्या फायदयाचा आहे. सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यांत यावा.

मा. महापौर : आजची सभा ३० मिनिटासाठी तहकुब करण्यांत येते. (सभा दुपारी २.२० वाजता तहकुब पुन्हा सभा ३.१० वाजता सुरु होते.)

सौ. संगिता मैंद : महिला व बाल कल्याण समितीची स्थापना होऊन १ वर्ष झाले. परंतु मागील एक वर्षाच्या कार्यकाळात माहिला व बाल कल्याण समितीची कोणतीच कामे झालेली नाही. येणाऱ्या वर्षभरामध्ये तरी कामे व्हावीत अशी अपेक्षा करते. याबाबतीत प्रशासनाने दखल घ्यावयास पाहिजे. मागील वर्षी महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती पदी सौ. दाणे चंद्रभागाबाई होत्या. अर्थ संकल्पाचे पुस्तक छापले त्याच सभापतीचा फोटो यावयास पाहिजे. होते. का आले नाही.

श्री. गणेश तांबे : महिला व बाल कल्याण समितीचे सभापती मागासवर्गीय असल्यामुळे त्यांचा फोटो आलेला नाही.

मा. महापौर : स. सदस्या व महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती यांनी जी सुचना मांडली त्या संबंधी प्रशासनाने वेळोवेळी दखल घ्यावी विषय क्र. २ वर बोलावे.

श्री. अफसर खान : हा प्रस्ता मंजुर करण्यांत यावा.

श्री. कुमावत अविनाश : हा प्रस्ताव प्रशासकीय यावयास पाहिजे. मंजुर करु नये.

मा. महापौर : प्रसाव स्थगित करण्यांत येते आहे.

श्री. तकी हसनखान : प्रस्ताव का स्थगित ठेवला खुलासा द्यावा यापुर्वी नियमावलीमध्ये बदल केलेले आहे. त्याप्रमाणे या पदाच्या बाबतीत करावे.

श्री. रगडे भगवान : ठराव पास केल्यानंतर तात्काळ पद भरणार आहे का? यासाठी वेळ लागणार आहे. शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

मा. महापौर : प्रशासनाने खुलासा करावा.

श्री. कुमावत अविनाश : प्रशासनाचे मत घेण्याची आवश्यकता नाही. प्रस्ताव अशासकिय असुन नगरसेवकांनी दिलेला आहे. प्रशासनामार्फत प्रस्ताव यावयास पाहिजे. नाशिक महानगरपालिकेत अशाच पध्दतीने प्रस्ताव मंजुर केला शासनाकडे पाठविला शासनाने मंजुरी दिली नाही. यात महापौरांची बदनामी झाली तो प्रकार येथे घडु नये त्यासाठी प्रस्ताव मंजुर करणे बरोबर नाही. रद्द करावा.

मा. महापौर : प्रस्ताव स्थगित केलेला आहे. विषय क्र. ३ वर बोलणे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ६३३/३ :**

वार्ड क्र. ५७ अंतर्गत संजयनगर गल्ली क्र. २ (स्लम) च्या नाल्यावर आमदार निधीतुन बहुदउदेशिय हॉल बांधणेस मंजुरीस्तव प्रस्ताव सादर. प्रभागास मोकळी जागा उपलब्ध नाही व वार्ड क्र. ५७ अंतर्गत असलेल्या संजयनगर मधील ब्रिज क्रमांक ३ येथे नाल्यावर आमदार निधीतुन हेल्थ क्लब (व्यायाम शाळा) बांधणेबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. प्रभागात मोकळी जागा उपलब्ध नसल्यामुळे नाल्यावर बांधण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री. अशरफ मोतीवाला
अनुमोदक : श्री. किशोर तुळशीबागवाले,

चर्चा

श्री. स.अली सलामी : न्यायालयाच्या निर्देशानुसार शहरातील रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्याचे काम महापालिकेतर्फे करण्यांत येत आहे. यात गरीब लोकांच्या टपऱ्या सुध्दा काढण्यात आलेल्या असुन ज्या टपऱ्यांना महापालिकेने परवानगी दिलेली आहे. उत्पन्न मिळत होते. त्यासुध्दा काढलेल्या आहेत. परंतु मागील एका सर्वसाधारण सभेत अनधिकृत पणे टावर्स बांधलेले आहेत ते काढावेत असा निर्णय घेतला होता. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही रस्ता रुंद करतांना का टापर्स काढलेले नाही. तसेच जे.सी.बी. मशीन खरेदी करणार होतो याबाबती काय झाले सध्या किती जे.सी.बी.मशीन चालु आहे खुलासा करावा. सदर जे.सी.बी. मशीन महानगरपालिकेच्या मालकीचे आहे का? प्रती दिवस किती भाडे देतो.

अति शहर अभियंता : एक मशीन दुरुस्तीला आहे. एक चालु आहे. व एक भाडयाने घेतलेले आहे. असे सध्या दोन जे.सी.बी. मधीन चालु आहे. जे दुरुस्तीला आहे त्यास ९४ हजार रुपये खर्च येणार आहे.

श्री. अफसरखान : जे.सी.बी. मशीन भाडयाने घेतले, ते कुणाचे आहे, काय दराने घेतले खुलासा करावा.

मा. महापौर : जे दुरुस्तीला आहे, केंव्हापासुन बंद आहे, त्याचा खुलासा करावा.

अति. शहर अभियंता : जे.सी.बी. मशीन भाडयाने घेण्या संदर्भात जाहिर निविदा काढण्यात आलेली होती. त्यानुसार घेतलेले आहे. प्रत्येक दिवशी ४५६०/- रुपये भाडे द्यावे लागते. भाडयाचे मशीन येऊन १ महिना झालेला आहे. एक मशीन १ महिन्यापासुन बंद आहे.

मा. महापौर : दुरुस्तीसाठी एक जे.सी.बी. मशीन १ महिण्यापासुन पडलेले आहे. यावरुन प्रशासन काय काम करते हे दिसुन येते. जवळपास रुपये ४५००/- दररोजचे गृहित धरल्यास महिण्याला १.२५ ते १.३५ लक्ष रुपये द्यावे लागतात. दुरुस्तीला दिलेले मशीन दुरुस्ती करुन घेतले असते तर १.२५ लक्ष रुपये देण्याची गरज पडली नसती हा विचार प्रशासनाने का केलेला नाही.

श्री. अफसर खान : रु. ४००/- प्रत्येक तास प्रमाणे मशीन भाडयाने मिळते. जे मशीन भाडयाने घेतले ते ६००/- रुपये प्रत्येक तासाप्रमाणे घेतलेले आहे ८ तासाचे जवळपास ५०००/- रु. दिले जातात अशी महिती मिळाली.

मा. महापौर : जी मशीन दुरुस्तीला आहे त्याची कार्यवाही कुठपर्यंत आलेली आहे. खुलास दयावा.

अति.शहर अभियंता : सदर संचिका मा.आयुक्तांकडे गेलेली आहे. मान्यता मिळालयानंतर पुढील कार्यवाही होईल.

श्री. स.अली सलामी : महापालिकेच्या मालकीचे मशीन असतांना दुरुस्तीसाठी ९४ हजार रुपये महापालिका खर्च करु शकत नाही. परंतु भाडयाने घेतलेले जे.सी.बी. मशिनसाठी महापालिकेकडे पैसा आहे. दुरुस्तीला असलेले मशीन दुरस्त करुन घेतले असते तर प्रत्येक दिवसाला भाडयाच्या मशीनला ४५००/- रुपये म्हणजेच जवळ१.५० लक्ष रुपये देण्याची आवश्यकता पडली नसती याच महापालिकेचे नुकसान होत आहे. अधिकारी मनयानी करुन कामे करित आहे. मा. आयुक्तांनी मंजुरी दिली असेल तर याबाबतीत कार्यवाही झाली पाहिजे. जनतेचा पैसा योग्य रितीने खर्च व्हावयास पाहिजे त्याची उधळन होता कामा नये. याबाबतीत प्रशासनाने दखल घ्यावी तशी ताकीद प्रशासनाला देण्यांत यावी.

मा. महापौर : जे महापालिकेच्या मालकीचे जे.सी.बी. मशीन दुरुस्तीला आहे. त्या संबंधीची संचिका मा. आयुक्तांची मान्यता घेऊन तात्काळ मशीन दुरुस्त करुन घ्यावे. महापालिकेचे नुकसान होणार नाही. याची दखल प्रशासनानेच घेतली पाहिजे.

श्री. अफसरखान : टावर्सच्या बाबतीत खुलासा द्यावा.

श्री. कोकाटे काशिनाथ : शहरातील जे अनाधिकृतपणे टावर्स झालेले आहे. ते काढण्याबाबत या सभागृहात वारंवार काशिनाथ चर्चा होऊन मा. महापौरांनी रुलींग देऊनही कार्यवाही होत नाही. हे योग्य नाही.

श्री. मीर हिदायत अली : सभागृहात नुसती चर्चा होते मा. महापौरांनी आदेश केल्यानंतर सुध्दा प्रशासन कार्यवाही करित नाही. At and T च्या बाबतची सभागृहात

आवाज उठविण्यात आला होता. या बाबतीत तात्काळ निर्णय घ्यावा. महानगरपालिकेचे नुकसान होत असुन मानहानी होत आहे.

श्री. अफसर खान : सभागृहात निर्णय घेतलेला असतांनाही टावर्स काढण्यात येत नाही. आर्थिक व्यवहार होत असतील अशी शंका निर्माण होते.

श्री. तकी हसनखान : मोबाईल घेतले जातात. सबब तात्काळ कार्यवाही करावी.

श्री. कदीर मौलाना सय्यद : शहरातील गरिब जनतेला यापासुन त्रास सहन करावा लागत आहे. अडचणी दुर होण्याच्या दृष्टीने या बाबतीत ठोस निर्णय घेण्यात येऊन तात्काळ टावर्स काढण्याची कार्यवाही व्हावी.

श्री. प्रकाश निकाळजे : जे टावर्स झालेले आहे ते फार उंच असुन गरिब नागरिकांच्या घरावर पडले तर जीव हानी होण्याची शक्यता आहे. स.स.श्री. डॉ कराड महापौर असतांना टावर्स काढण्या संदर्भात निर्णय घेतलेला असतांना अद्याप कार्यवाही केलेली नाही.

श्री. जावेद मो. ईसाक : ज्या वसाहती अनधिकृत आहेत, त्याबद्दल काय उपाय योजना आहे.

मा. महापौर : जिवितहानी होणार नाही या दृष्टीने तसेच अनधिकृत बांधण्यात आलेले टावर्स काढण्या संदर्भात या सभागृहात वेळोवेळी चर्चा झालेली आहे. सभागृहात नुसती चर्चाच होते परंतु प्रशासन काहीच कार्यवाही करीत नाही याबाबतीत स.सदस्य खऱ्या अर्थाने सहभागी होत नाही असा गैरसमज जनतेमध्ये निर्माण झालेल्या आहे. प्रशासनाला विचारण्यात येते, की, टावर्ससाठी परवानगीची मागणी झालेली होती का? किती टॉवर्सला परवानगी दिलेली आहे. दिलेली नसेल तर रेग्ल्युलर करता येते का/ रेग्युलर करता येत नसेल तर प्रशासन पुढील काय कार्यवाही करणार आहे खुलासा करावा.

प्र.सहा. संचालक (न.र.) : मनोरासाठी ए.टी.ॲण्ड टी. कंपनीने नाहरकत पत्राची मागितलेली होती बांधकाम अगोदर (न.र.) सुरु केले व नंतर एन.ओ.सी.ची. मागणी झालेली आहे. इमारतीच्या कर वगैरे भरलेला आहे का व इतर कागदपत्राची पुर्तता करावी नंतर एन.ओ.सी.चा विचार केला जाईल असे कळविले होते. अनाधिकृत बांधकाम केले या संदर्भात प्रशासकीय अधिकारी यांना सुध्दा कळविलेले आहे. एअर टेलवाल्यांनी टावर्स उभे केले. सर्व कर स्ट्रक्चर ॲबेलीटी ई. सर्व पुर्तता करुन द्यावे पुर्वी बांधकाम केले, ते अनधिकृत केले सर्व गोष्टी तपासणी होऊन जो दंड होतो. तो दंड आकारुन नाहरकत पत्र दिलेले आहे.

अफसर खान : एखादी इमारत बांधवयाची झाल्यास अगोदर परवानगी नंतर एन.ओ.सी.दिली जाते. टावर्स बांधकामाची परवानगी न देता एन.ओ.सी. कशी दिली आहे. प्रशासन चुकीच्या मार्गाने कामे करित आहे. ही पध्दत बंद करुन संबंधीत टावर्स त्वरीत काढण्यात यावे. नियमानेग पुन्हा पुढील कार्यवाही करावी.

श्री. गायकवाड राधाकृष्ण : जालना रोडवर जे टावर्सला एन.ओ.सी. दिलेली आहे. चुकीची माहिती देण्यात येत आहे.

मा. महापौर : अधिकारी सांगतात टावर्सला एन.ओ.सी दिली स. सदस्य ए.ओ.सी. दिली नाही असे सांगतात एन.ओ.सी. दिलेली नसेल तर संबंधीत अधिकाऱ्यांवर कार्यवाही होईल. प्रशासनाला सुचना करतो की, सभागृहात स. सदस्य पोट निवडकीने आप आपले प्रश्न मांडतात. प्रश्न मांडल्यानंतर कोणत्याही

अधिकाऱ्यांनी सभागृहाला चुकीची माहिती देऊ नये याची दखल घेण्यांत यावी. नसता संबंधीत अधिकाऱ्यांवर सभागृहाच्या निर्णयानुसार कडक कार्यवाही केली जाईल.

श्री. स. अली सलामी : टावर्स करतांना टेक्नीकल बाजु तापासणी करावी लागते. नगररचना विभागामार्फत ही कार्यवाही होऊन बांधकामाची परवानगी घ्यावी लागते. त्यानंतर एन.ओ.सी. दिली जाते. परंतु बांधकामाची परवानगी नसतांना अगोदर एन.ओ.सी. देणे बरोबर नाही सर्व काही चुकीचे काम होत आहे. ज्या इमारतीवर टावर्स केलेले आहे. त्या घर मालकाने एन.ओ.सी. घेतलेली आहे का याचा सुध्दा खुलासा करण्यांत यावा कोणत्याही इमारतीला बांधकामाची अगोदर परवानगी दिली जाते त्यानंतर एन.ओ.सी. दिली जाते.

तकी हसनखान : एखादी इमारत बांधकाम परवानगी घेऊन बांधलेली असेल व तो इमारत मालक कर भरणा करित असेल तर अशा इमारत मालकाला एन.ओ.सी. घेण्याची गरल आहे. बांधकाम परवानगीची गरज नाही. माझे मत आहे.

मा. महापौर : शासन नियमाप्रमाणे एन.ओ.सी. अगोदर देता येते का याची चौकशी करण्यात यावी व या बाबतीत प्रशासनाने नियमाने कार्यवाही करावी. ऐनवेळचे प्रशासनाचे सदस्यांचे काही प्रस्ताव मंजुर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्रमांक ५७ अंतर्गत मोकळी जागा उपलब्ध नसल्यामुळे या प्रभागातील संजयनगर गल्ली क्रमांक २ नाल्यावर आमदार निधीतुन बहुउद्देशिय हॉय आणि त्याचप्रमाणे संजयनगर मधील ब्रिज क्र. ३ येथे नाल्यावर आमदार निधीतुन हेल्थ क्लब (व्यायाम शाळा) बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐन वेळचे विषय*

**विषय क्र. ६३४/१ :**

आरोग्य वैधकीय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००२-२००३ चालु आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका औरंगाबाद यांना शासनातर्फे नॅशनल प्रोग्राम ऑफ कंट्रोल ऑफ ब्लाईडनेस अंतर्गत महानगरपालिका औरंगाबाद यांना ६०० मोतीबिंदु शस्त्र क्रियेचे उद्दिष्ट देण्यांत आलेले आहे.

सध्या बन्सीलालनगर आरोग्य केंद्र येथे दर गुरुवारी ऑफ थॅलनिक ओ.पी.डी.नेत्र तज्ञामार्फत चालविली जाते. व मोतीबिंदु शस्त्रक्रियेसाठी रुग्ण नेत्र विभाग घाटी रुग्णालय येथे नेले जातात. गेल्या १० वर्षात या प्रकारे साधारण २५०० मोतीबिंदु शस्त्रकिया महानगरपालिकेतर्फे नेत्र विभाग घाटी रुग्णालया येथे केलेल्या आहेत.

महानगरपलिका, औरंगाबाद मध्ये सध्या एक पुर्ण वेळ व दोन ठराविक वेतनवरील नेत्र रोग तज्ञ कार्यरत आहेत शासनाकडे एक नेत्र सहाय्यकाचे पद मंजुर झालेले आहे. या प्रोग्रामसाठी एन.पी.सी.बी. अंतर्गत वर्ल्ड बँक व केंद्र शासन यांच्यातर्फे काही साहित्य महानगरपालिका औरंगाबाद यांच्यासाठी उपलब्ध झालेले आहेत. व सध्या ते सिव्हील सर्जन

सिव्हील हॉस्पीटल, औरंगाबाद यांच्या ताब्यात आहे. या प्रकल्पासाठी लागणाऱ्या स्टाफिंग पॅटर्नसाठी शासनाचे मार्गदर्शन घेणे योग्य राहिल.

बन्सीलालनगर आरोग्य केंद्र येथे पाहिल्या मजल्यावर हॉस्पीटल बांधण्यासाठी २००२-२००३ मनपाच्या अर्थ संकल्पात रुपये दहा लाख एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच नेत्र साहित्य खरेदीसाठी रुपये एक लाख एवढया खर्चाची तरतुद करण्यात आलेली आहे. (सांकेतांक क्र. ५८८) तरी बन्सीलालनगर आरोग्य केंद्र येथील पहिल्या मजल्यावर १० खाटाचे नेत्र रुग्णालय चालु करण्याबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,बन्सीलालनगर आरोग्य केंद्र येथील पहिल्या मजलयावर १० खाटाचे नेत्र रुग्णालय चालु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३५/२ :**

औरंगाबाद महानगरपालिका कर्मचारी सेवा भरती नियमात वैद्यकिय अधिकारी या पदासाठी एम.बी.बी. एस. अशी शैक्षणिक अर्हता ठरविण्यात आलेली आहे. परंतु बी.ए.एस.अर्हते बाबत सेवाभरती नियमात काहीही तरतुद नाही शासनाने शासन निर्णय काढुन २५ टक्के जागा बी.ए.एम.एस. पदवीधरा मधुन भरण्यात याव्यात म्हणुन अध्यादेश काढलेला आहे. तथापी सध्या महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अस्थायी स्वरुपात बी.ए.एस.पदवीधर उमेदवार वैद्यकिय अधिकारी म्हणुन कार्यरत आहेत. सेवाभरती नियमात बी.ए.एम.एस. बाबत काहीही तरतुद नसल्याने अस्थायी बी.ए.एम.एस. पदवीधर उमेदवारांना वैद्यकिय अधिकारी या पदावर कायम नेमणुकी पासुन वंचीत राहु शकतात. त्यामुळे शासनाचे नियमानुसार महानगरपालिकेच्या कर्मचारी सेवाभरती नियमात बी.ए.एम.एस. पदवीधर वैद्यकिय अधिकारी पदाची २५ टक्के पदे आरक्षीत करण्याची दुरुस्ती करण्यात यावी.

तव्दतच ठरावाचे आधिन राहुन तुर्तास बी.ए.एम.एस. पदवीधर वैद्यकिय अधिकारी करिता महानगरपालिका अस्थापनेवर कायम स्वरुपी नेमणुक देऊन कार्योत्तर मान्यतेसाठी प्रकरण शासनाकडे पाठविण्यात यावे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. संजय शिरसाठ

अनुमोदक : श्री. किशोर तुळशीबागवाले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका कर्मचारी अधिकारी सेवाभरती नियमात वैद्यकिय अधिकारी यांची शासन निर्णयाप्रमाणे २५ टक्के पदे बी.ए.एम.एस. पदाविका मधुन भरण्याबाबत सेवाभरती नियमात दुरुस्ती करण्यास व त्याप्रमाणे पदे भरुन कार्योत्तर मंजुरीसाठी शासनास प्रस्ताव पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३६/३ :**

शहागंज भागातील निजामुद्दीन चौक तसेच बीड बायपास, पैठण रोडवरील चक्रधर स्वामी चौक या ठिकाणी दिवे लावणे बाबत नागरिकांकडुन सतत मागणी होत आहे. हा

रस्ता वाहतुकीस वर्दळीचा असुन रात्रीच्या वेळी या ठिकाणी जास्त झोताचे विद्युत दिवे असणे अत्यंत जरुरीचे आहे.

करिता सदरील दोन्ही चौकात हायमास्ट दिवे बसविणे बाबत त्वरीत कार्यवाही करण्यांत यावी.

प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : कैसर खान, श्री. नंदकुमार घोडेले

अनुमोदक : श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहागंज भागातील निजामुद्दीन चौक तसेच बीड बायपास, पैठण रोडवरील चक्रधर स्वामी चौक या दोन्ही चौकास हायमास्ट दिवे बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३७/४ :**

औरंगाबाद शहरात भिमनगर, भावसिंगपुरा येथे श्रावस्तीनगर (मोतीवाला नगर) ही दलित लोक वस्ती आहे जी १९९५ च्या अगोदरील अनाधिकृत वसाहत आहे. परंतु या वस्तीमध्ये ५० टक्के पेक्षा अधिक लोक दलीत मागासवर्गीय लोक राहात असल्यामुळे सदरील काम हे ५ टक्के कमकुवत कल्याणकारी योजने अंतर्गत करण्यात यावे जणे करुन या भागातील गोर गरिब जनतेस न्याय मिळेल.

करिता प्रस्ताव मंजुर करण्यांत यावा.

सुचक : श्री. गणेश रामचंद्र तांबे

अनुमोदक : सौ. चंद्रभागाबाई, श्री. जगदीश सिध्द

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरात भिमनगर, भावसिंगपुरा येथे श्रावस्तीनगर (मोतीवाला नगर) ही पुर्वीची व ५० टक्के पेक्षा अधिक लोक दलीत मागासवर्गीय लोक वस्ती असल्यामुळे येथील कामे ५ टक्के कमकुवत कल्याणकारी योजने अंतर्गत करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# प्रश्नोत्तरे

मा. श्री. नंदकुमार घोडेले,
नगरसेवक (प्राप्त दि. २६-०४-०२)

प्रश्न क्र. ५९ : १) नक्षत्रवाडी बेंचमार्क या प्रकल्पास दिलेली परवानगी नियमानुसार आहे. काय जर असेल तर त्याची पुनर्तपासणी सक्षम सहाय्यक संचालक नगर रचना अधिकारी म.न.पा. यांचे कडुन करुन घ्यावी व या सभेत अहवाल द्यावा. दिलेल्या परवानगीनुसार काम झालेले आहे काय.

२) सदरील जागेच्या बा.प. बाबत कोणाचा वादाबाबत आक्षेप आहे काय. त्याची दखल घेण्यात आली काय त्याचे समाधान कारक उत्तर काय देण्यांत आले, याबाबत खुलासा व्हावा.

३) सदरील इमारतीस नियमानुसार बांधकाम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आपल्या विभागाकडुन देण्यात आलेले का असेल तर त्याची माहिती प्र.व.अ.वै.अ.व अग्निशमन अधिकारी यांनी देण्यांत यावी. व सध्या सुरु असलेला वापर व विविध प्रकारने ना हरकत प्रमाणपत्र परवाने कुढल्या आधारे देण्यांत आले.

४) बेंचमार्क या प्रकल्पास अंतराष्ट्रीय स्तरावर जसा प्रकल्प उभारला जातो. त्या सर्व नियमांचे विशेष प्रकल्पास बा.प. देतांना जे नियम व अटी लावण्यांस येतात किंवा चार्चेस लावले जातात ते लावले गेले आहेत काय सविस्तर माहिती द्यावी.

५) परवानगी देतांना ज्या नियम, अटी टाकण्यांत आल्या होत्या त्या कुठल्या प्रकारच्या होत्या. माहिती द्यावी.

उत्तर - ५९ : सहाय्यक संचनालक, नगररचना १) नक्षत्रवाडी येथे गट नं. ११७/ भाग या मिळकतीवर मे खुराकीवाला होल्डींग ॲन्ड इन्व्हेस्टमेंट प्रा. लि. यांना दिलेली बांधकाम परवानगी नियमानुसार आहे, त्यास तत्कालिन मा. उप संचालक नगररचना यांची शिफारस व तत्कालीन मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. सर्व साधारणपणे अनुज्ञेय बांधकाम परवानगी नुसार बांधकाम झालेले आहे.

२) पुर्व संदर्भ पाहता सदरील जागेच्या बांधकाम परवानगी बाबत वादा बाबत कोणाचाही आक्षेप आढळुन येत नाही.

३) सदरील प्रकल्पासाठी भागशः भोगवटा प्रमाणपत्र प्रस्ताव या कार्यालयात प्राप्त व मंजुर आहे. परंतु हद्दीत वादा संदर्भाने आक्षेप प्राप्त झाल्यामुळे व इतर त्रुटीच्या पुर्तता अभावी संबंधीतात अदयापावेतो भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. प्रश्नातील इतर मुद्दे या विभागाशी संबधीत नाही.

४) विकास नियंत्रण नियमावली आवश्यक निकर्ष व शासनाने निर्देशित केल्यानुसार आवश्यक ते सर्व शुल्क बांधकाम परवानगी अनुज्ञेय करतांना लावलेले आहेत.

५) संबंधीतास देण्यांत आलेल्या बांधकाम परवानगीची सत्य प्रत सोबत जोडण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. ६० : १) अग्निशमन दलाची एन.ओ.सी. देतांना मनपाचे बांधकाम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र तपासले जाते काय जर असेल तर नक्षत्रवाडी येथील बेंचमार्क या प्रकल्पास अग्निशमन दलाची एन.ओ.सी. बांधकाम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नसतांना कुठल्या आधारे देण्यांत आली सविस्तर खुलासा व्हावा.

२) अग्निशनची एन.ओ.सी. देतांना कॅपीटेशन फिस किती आकारली जाते, बेंचमार्क नक्षत्रवाडी येथील प्रकल्पास किती आकारली जर कमी आकारली असेल तर त्याचे कारण काय.

३) अग्निशमनची बेंचमार्क या प्रकल्पास एन.ओ.सी. देतांना कुठल्या अटी व शर्ती टाकण्यांत आल्या होत्या त्याची पुर्तता झाली काय अटी व शर्ती टाकुण एन.ओ.सी. देण्याचे कारण काय.

४) आरोग्य अधिकारी, अग्निशमन अधिकारी यांनी विविध प्रकारचे बेंचमार्क यास एन.ओ.सी. परवाने देतांना नगर रचना विभागाशी संपर्क न साधता दिलेल्या आहेत काय खुलासा व्हावा.

५) बेंचमार्क नक्षत्रवाडी हा संपुर्ण प्रकल्प निवासी वापरासाठी भुखंड असतांना वाणिज्य वापरासाठी १००टक्के जागा वापरास कुठल्या आधारे देण्यांत आली, सविस्तर खुलासा व्हावा.

उत्तर - ६० : उप आयुक्त (महसुल) : १) अग्निशमन दलाची एम.ओ.सी. देतांना मनपाचे बांधकाम पुर्णत्वाचे तपासले जात नाही. तसेच पहिल्यास ४० टक्के हॉटेल बिल्डींग कंपलेशन नाही.

२) अग्निशमन दलाची एन.ओ. सी. देतांना कॅपीटेशन फिस रु. ५/- प्रति चौ.सी. किंवा कमीत कमी रु. २५,०००/- कॅपीटेशन फिस आकारली आहे. कारण त्यांनी बेंचमार्क दोन नावावर आहे, असे पत्र दिले होते कॅपीटेशन फिसही ५० हजार आकारणे आवश्यक आहे. कारण एडीटीपी/व्ही.ओ. यांच्या अहवालानुसार सदरील बेंचमार्क हॉटेलस एकाचे नावावर आहे. त्यामुळे रु. ५०,०००/- भरण्याची नोटीस दि. २४-०५-२००२ रोजी देण्यांत आली आहे.

३) अग्निशमन दलाची एन.ओ.सी. देतांना कंन्डीशनल एन.ओ.सी. देण्यांत आली आहे. कारण फायर प्रिव्हेंशन व फायर प्रोटशेन, फायर फायटिंग मोठया हॉटेलसाठी घेण्यात वेळ लागत आहे. सध्या पुर्ण फायर फायटींग सिस्टीम बसवलेली नाही.

४) फायर एन.ओ.सी. देतांना सध्यातरी एडीटीपीला विचारणा करण्यांत येत नाही.

प्रश्न क्र. ६१ (प्राप्त दि. २९-०४-२००२) : १) प्र.क्र. २८ नक्षत्रवाडी मध्ये मागील दोन वर्षापासुन मंजुर झालेले तात्पुरते, अंतिम मंजुरी मिळालेले तसेच मंजुरीसाठी दाखल झालेले परंतु अद्यापपर्यंत कुठल्याही प्रकारची मंजुरीची कार्यवाही न झालेले अथवा परवानगी नाकारलेले रेखांकन किती व कोणते (सविस्तर माहिती द्यावी) का नाकारले.

२) मागील दहा वर्षात जी रेखांकने आपण तात्पुरतया अथवा अंतिमरित्या प्र.क्र.२८ मध्ये केलेली आहेत, त्यांची जागेवर सध्या स्थिती काय आहे त्यापैकी किती प्लॉट धारकांना बा.प. देण्यांत आल्या व त्या कोणत्या आधारे देण्यांत आल्या.

३) रेखांकन मंजुर करतांना विकास रस्ते, अंतर्गत रस्ते, आरक्षित जमीनी मोकळे भुखंड, शाळा, मैदान व इतर कारणांसाठी आरक्षित भुखंड यांच्या जमीनीचे भुसंपादन म.न.पा. कडे झालेले आहे काय, झाले असल्यास सविस्तर सर्व्हेक्षण करुन आजच्या स्थितीतील माहिती देण्यांत यावी.

४) ज्या ज्या अटीवर, रेखांकनास मंजुरी दिलेली आहे, असे रेखांकनामध्ये विकास कामे व बां.प.असलेल्या व बा.प. सुरु असलेल्या इमारती यांचे समतोलपणा राखला गेला आहे काय म्हणजे विकास कामे व इमारतीचे बांधकाम याची तपासणी झालेली आहे काय.

५) मेगासिटी या प्रकल्पा अंतर्गत माझे प्रभागात सुरु असलेल्या इमारती/प्रकल्प किती व कोणते त्यांना स्वयं विकसीत करावयाच्या ज्या अटीवर विकास कामे सुरु आहेत. त्याचे सुपरविजन संबंधीत विभागामार्फत

करण्यांत आलेले आहे काय असे निदर्शनास आले की, विकास कामे ठप्प व इमारत बां.प.पुर्ण ही तफावत का

उत्तर - ६१ : सहाय्यक संचालक, नगर रचना : सदर प्रश्न हा जुन्या अभिलेखा वर आधारीत आहे. जुना अभिलेख हा खुप मोठा असुन प्रश्नाचे उत्तर विस्तृत प्रमाणावर द्यावयाचे असल्याने त्याकरिता सखोल छाननीची आवश्यकता आहे. हया विभागात कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने त्याकरिता अधिक अवधी लागणार आहे. तसेच बरेच मुदयाकरिता प्रत्यक्ष मुद्दे निहाय स्थळ पाहणी करण्याची तापासणी गरज आहे. करिता सदर प्रश्नाबाबत तुर्त उत्तरे देण्यास अडचण असल्याने वेळ लागणार आहे. सर्व्हेक्षण व अभिलेख तपासणी झाल्यावर सविस्तर खुलासा देण्यांत येईल.

५) झोन. क्र. ६ अंतर्गत देण्यांत आलेल्या समुह गृह योजने अंतर्गत मधील प्रकरणे खालील प्रमाणे.

१) वेदांत होल्डींग नक्षत्रवाडी
२) नाथ होल्डींग अँड इन्व्हेस्मेंट कांचनवाडी
३) डी.एम. कन्स्ट्रक्शन कंपनी मुस्ताफाबाद
४) प्रेमाबाई अग्रवाल इटखेडा

वरील प्रकल्पा करिताचे विकासाच्या कामाची निगराणीचे काम महानगरपालिकेच्या संबंधीत विभागाचे आहे. प्रकरणातील सदर मुद्दा या विभागाशी संबंधीत नाही.

मा. श्री. अंबादास दानवे,
नगरसेवक (प्राप्त दि. १०-०५-०२)

प्रश्न क्र. ६२ : अ) एप्रिल २००० नंतर निवडुन आलेले महानगरपालिकेचे पदाधिकारी व आयुक्त यांनी चालु महिण्यापर्यंत आपल्या विविध कामासाठी मनपा मार्फत प्रवासावर किती रक्कम खर्च करण्यांत आली.

ब) मा. महापौर, उपमहापौर, मा. स्थायी समिती सभापती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता, व मा. आयुक्त या पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी एप्रिल २००० पासुन अद्यापर्यंत कोणत्या कारणासाठी व कोणच्या ठिकाणी मनपामार्फत दौरा केला व त्यावर किती रक्कम प्रवास व अन्य भत्त्यापोटी खर्च करण्यांत आली.

क) खर्च करण्यात आलेली रक्कम व अग्रीम रक्कम यात तफावत आहेत काय असल्यास कोणती तफावत.

ड) मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. स्थायी समिती सभापती मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता, मा. आयुक्त यांनी केलेला दौरा, त्या दौऱ्याची दिनांक व ठिकाण त्या दौऱ्याचे कारण त्या दौऱ्यावर झालेला खर्च व त्या दौऱ्यावरील अग्रीम रक्कम प्रवास करणाऱ्या पदाधिकारी व आयुक्त यांच्या नावानिशी सविस्तर माहिति देण्यांत यावी.

इ) झालेले दौरे हे अर्थसंकल्पीय रक्कम तरतुदीला अधीन राहुन करण्यांत आलेली आहे काय अर्थसंकल्पातील तरतुद व झालेले खर्च यांचा उल्लेख करावा, अग्रीम रक्कम देतांना मागील अग्रीम रक्कमेंचा हिशोब घेतला जातो काय सविस्तर माहिति व पदाधिकारी व आयुक्त यांच्या नावनिशी उल्लेखित करावी.

उत्तर - ६२ : मुख्य लेखाधिकारी : एप्रिल २००० ते २००२ दरम्यान मा. आयुक्त व महानगरपालिका पदाधिकारी यांच्या प्रवासावर रक्कम रु.४,४२,९३२/- खर्च झालेला आहेग एप्रिल २००० ते २००२ दरम्यान मा. आयुक्त व महानगरपालिका पदाधिकारी यांच्या प्रवासावर रक्कम रु. ४,४२,९.३२/- खर्च झालेला आहे.

मा. महापौर, मा. उपमहापौर मा. स्थायी समिती सभापती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता, व मा. आयुक्त यांनी एप्रिल २००० ते २००२ पर्यंत केलेल्या प्रवास खर्चाचे विवरण सोबतच्या तक्त्याप्रमाणे देण्यांत येत आहे. तसेच यांनी प्रवास खर्च व देण्यांत आलेल्या अग्रीम रकमेबाबत तफावती उल्लेख विवरण तक्त्यात देण्यात आलेला आहे.

महानगरपालिका पदाधिकारी व अधिकारी यांनी केलेल्या प्रवासाचे ठिकाण, प्रवासाचे कारण, प्रत्यक्ष खर्चाबाबत सविस्तर माहिती विवरण पत्रात दिली आहे, महानगरपालिका पदाधिकारी दौऱ्या संदर्भाची माहिती नगरसचिव यांच्याकडुन प्राप्त होऊ शकेल सन २०००-२००२ मध्ये प्रवास खर्चासाठी रु. ४०,००,०००/- एवढी अर्थसंकल्पीय तरतुद होती. त्यापैकी खर्च रु. २,१४,५४३/- झालेला आहे. झालेला खर्च अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मर्यादेत्व आहे सन २००१-२००२ या आर्थिक वर्षात प्रवास खर्चासाठी रु. ११,७०,०००/- एवढी अर्थसंकल्पीय तरतुद होती. त्यापैकी खर्च रु. १.८८.९१७/- झालेला आहे. झालेला खर्च अर्थसंकल्पीय मर्यादेतच आहे. तसेच सन २००२-२००३ मे अखेर रु. ३९,४७२/- खर्च झालेला आहे.

प्रश्न क्र. ६३ : अ) महानगरपालिकेमार्फत व्हिजन पब्लिसिटी या एजन्सीबरोबर जाहिरात फलक लावण्यासंदर्भात मनपामार्फत करार करण्यांत आलेला आहे काय करार केल्याची दिनांक, त्याप्रमाणे कराराची कालावधी व करार करणारे संबंधीत विभागाचे अधिकारी व संबंधीत एजन्सीचे चालक, मालक कोण आहे नावाचा उल्लेख करावा.

ब) किती फलक लावण्याची मुळ परवानगी असुन या परवानगीत पुन्हा अधिक २०० फलक लावण्यात तत्कालीन मालमत्ता विभागाने परवानगी दिलेली आहे काय, दिलेली असल्यास कोणत्या अधिकारात व कोणत्या नियमाने दिली आहे.

क) सदर जाहिरात फलकाचे प्रतिफलक, प्रतिमाह काय दर आहेत, सदर दरानुसार आतापर्यंत एजन्सीकडुन वसुली झालेली आहे काय झालेली असल्यास किती रक्कम प्रतिमाह, प्रतिवर्षी जमा झालेली आहे. झालेली नसल्यास मनपामार्फत काय कारवाई केलेली आहे. कारवाईचा उल्लेख करावा.

ड) मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीटाने जाहिरात फलकाबाबत स्पष्ट निर्देश दिलेले असतांना अन्य जाहिरात फलकावर कारवाई करण्यांत आली. परंतु सदर एजन्सीच्या फलकांवर कोणती कारवाई करण्यात आली.

इ) सदर जाहिरात एजन्सीस जे दर ठरवुन देण्यांत आले, त्यात व विद्युत बिलासंदर्भात जे दर ठरविण्यांस आले, त्यात आपण वेळोवळी नियमानुसार वाढ केली आहे काय सदर एजन्सीच्या कामात करार करतांना वसुली करतांना फलकाची संख्या वाढवुन देतांना गैरव्यवहार झालेची शक्यता व्यक्त

केली जात असुन यासंदर्भात मनपामार्फत संबंधीत व कर्मचारी यांच्यावर कारवाई प्रस्तावित आहे. काय, संपुर्ण माहितीसह तपशिल सादर करावा.

उत्तर - ६३ : उप आयुक्त (महसुल) : महानगरपालिकेने व्हिजन पब्लिसीटी एजन्सी बरोबर जाहिरात फलक लावण्या संदर्भात मनपा मार्फत करारनामा दिनांक १२-०२-९९ रोजी केलेला असुन त्यावेळेस उप आयुक्त मालमत्ता अधिकारी, इमारत निरिक्षक यांनी श्री. गिरीष रामटेके यांना व्हिजन पब्लिसीटी एजन्सी या नावाने जाहिरात फलक लावण्यासाठी करारनामा केलेला आहे. दिनांक १२-०२-९९ रोजी झालेल्या करारनाम्या प्रमाणे जालना रोड ते बाबा पेट्रोल पंप या मार्गावरील विद्युत पोलवर २०० जाहिरात फलक लावण्याची परवानगी वरील करारनाम्या व्दारे देण्यांत आलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२) अन्वये कर आकारणी करण्याचे अधिकार व कलम १४९ चे ४५४,४५७ आणि १७ नुसार औरंगाबाद शहरातील रस्त्यामधील दुभाजका मधील विद्युत पोलवर जाहिरात फलक लावणेसाठी परवानगी दिली आहे.

जाहिरात फलक २.५X४ आकाराचे लावण्यासाठी प्रति ॲड पोल १ फलकास प्रतिवर्ष रु. ६०/- विद्युत शुल्कासह रु. १०१/- दर मंजुर आहेत. संबंधीतांनी विना विद्युत झोतातील बोर्ड लावण्यासाठी परवानगी मागितली असुन त्याप्रमाणे रु.६०/ प्रतिवर्ष प्रति फलक लावण्याची परवानगी दिली आहे. परंतु करार नामा करते वेळेस व संचिकेत नोंद करते वेळेस प्रतिमहा असा उल्लेख करणात आलेला असुन करारनामा देखिल प्रति महाप्रमाणे करण्यांत आलेला आहे. परंतु त्यावर प्रति महा ऐवजी प्रति वर्ष असी खाडाखोड केलेली आहे. सदर एजन्सी कडुन आज पर्यंत रु. १८,०००/- फक्त ३०० बोर्डचे सन १९९९-२००० वर्षासाठी वसुल झाले आहेत, त्यानंतर ३०-११-२००० रोजी तत्कालीन उपआयुक्त यांनी किती फलक संख्येतील खाडखोड दरासाठी व मुदतीसाठी मा. आयुक्तांची मंजुरी बाबत तात्काळ सादर करणेस कळविले. त्यावर दिनांक ०७-११-२००१ अन्वये तुमचा करारनामा रद्द करण्यांत येतो व आपण फलक काढुन घ्यावेत म्हणुन नोटीस देण्यांत आली त्यावर संबंधीतांनी आर.सी.एस.नं. १३३६३/२००१ अन्वये मनपानी दिलेली नोटीस रद्द करावी. व जाहिरात फलक काढण्यात येऊ नये म्हणुन न्यायालयात दावा दाखल केला. न्यायालयाने (टेम्पररी इजाक्शन) पास करुन संबंधीतास वरील दोन्ही करारनाम्याप्रामणे आज पर्यंतची रक्कम डिपॉजिट १५ दिवसात करण्यासाठी दि. १२-१२-२००१ रोजी आदेशीत केले त्याप्रमाणे रु. ४२,०००/- भरुन द्यावेत म्हणुन अर्ज दिला परंतु रक्कम जमा केली नाही.

तसे कोर्टात त्यानंतर लेखी कळावले आहे अद्याप निकाल लागलेला नाही. सदर करार पाच वर्षासाठी करण्यांत आलेला आहे. त्या काळात दरात वाढ करण्यास शासनास दिनांक २८-८-९७ रोजी प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. शासनाचे विचाराधीन आहे.

सदर प्रकरणांत फलकाची संख्या वाढवुन देतांना गैरव्यवहार झाला किंवा नाही हे संचिकेतील संदर्भावरुन दिसुन येत नाही, परंतु दुरुस्ती केल्याबाबत संचिका हाताळणाऱ्या व्यक्ती बाबत खाते चौकशी करण्यासाठी संचिका प्रस्ताविक आहे.

मा. श्री. नंदकुमार घोडेले, नगरसेवक

प्रश्न क्र. ६४ : १) मे. खुराकीवाला होल्डींग्ज प्रा.लि. यांच्या नक्षत्रवाडी येथील बेंचमार्क या प्रकल्पास पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन किती इंची व निवासी आहे की, वाणिज्य, सविस्तर खुलासा व्हावा. कुठल्या आधारे मंजुरी दिली.

२) नळ कनेक्शन देतांना विशेष बाब म्हणुन मंजुरी देण्यांत आली किंवा कसे

३) प्रभागातील नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. अशा दररोज दिंड ते दोन तास पिण्याचे पाणी देण्याचे प्रायोजन कशासाठी.

४) बेंचमार्क या प्रकल्पास नळ कनेक्शन देतांना बां भागेवटा प्रमाणपत्र व इतर आवश्यक प्रमाणपत्रे तपासणी केलेली आहेत. काय, सविस्तर कागदपत्रासह माहिती द्यावी.

५) वारंवार सदरील प्रकल्पाचे कर्मचारी त्यांच्या स्विमिंग पुलसाठी व्हॉलव्हच्या केबीनचे कुलुप तोडुन पाण्याची चोरी.

उत्तर - ६४ : कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) : १) मे. खुराकीवाला होल्डींग्ज प्रा.लि. यांच्या नक्षत्रवाडी येथील बेंगमार्क या प्रकल्पाचे पिण्याचे पाण्याचे नळ २ इंची आहे. सदरील नळ कनेक्शनची मुळ मंजुरी निवासी करिता आहे. परंतु प्रत्यक्ष वापर उद्योग धंदया करिता असल्यामुळे उदयोगधंदया करिताची पाणीपट्टी आकारण्यांत येत आहे.

२) नळ कनेक्शन देतांना विशेष बाब म्हणुन मंजुरी देण्यांत आलेली नाही. नियमीत मंजुरी देण्यांत आलेली आहे.

३) प्रभागातील नागरिकांना योग्य प्रमाणात पिण्याचे पुरवठा करण्यांत येत आहे. तसेच सदरील नळ धारकास सध्या फक्त एक तास पाणी पुरवठा पिण्याच्या पाण्याकरिता करण्यात येत आहे. दिड किंवा दोन तास पाणी पुरवठा करण्यांत येत नाही.

४) बेंचमार्क प्रकल्पात नळ कनेक्शन देतांना आवश्यक प्रमाणपत्र आवश्यक तपासणी केलेली आहेत. अर्जदाराने मालमत्ता कराचा भरणा केलेला होता व शहर विकास निधी रुपये ३,९७,९५९/- भरलेला आहे. तसेच भोगवटा प्रमाणपत्रबाबत नगर रचना विभागात प्रकरण दाखल केलेले होते. अशा परिस्थितीत नियमाप्रमाणे नळ कनेक्शन देता येते.

५) सदरील प्रकल्पाचे कर्मचारी म.न.पा. स्लुस व्हॉल्वचे केबीन तोडतांना आदळलेले नाहीत. सदरील नळ कनेक्शन रितसर मंजुर असुन त्यावर मीटर बसविलेले आहे, त्यामुळे सदरील प्रकल्पाचे कर्मचारी पाण्याची चोरी करतात ही बाब सत्य नाही.

प्रश्न क्र. ६५ : १) नक्षत्रवाडी येथील बेंचमार्क हा प्रकल्प भोगवटा प्रमाणपत्र न घेता बेकायदेशीर सुरु आहे, असे असतांना म.न.पा. तर्फे कार्यवाही का नाही.

२) हया प्रकल्पास ग्रुप हाऊसिंगची परवानगी दिलेली असतांना त्यानुसार नियमानुसार हा प्रकल्प सुरु आहे. काय, जर नसेल तर मनपा तर्फे काय कार्यवाही करण्यांत आली.

३) सध्या या प्रकल्पामध्ये जे व्यवसाय सुरु आहेत. उदा. परमिट रुम, रेस्टॉरंट, स्विमिंग लॉजींग इ. सारखे त्या सर्व व्यवसायांना मनपाची आवश्यक एन.ओ.सी. दिलेली आहे काय, जर असेल तर कुठल्या आधारे जर नसेल तर त्यांचेवर काय कार्यवाही करणार.

४) बेंचमार्क मधील स्विमिंग पुलची तपासणी सक्षम स्ट्रक्चरल इंजिनिअर कडुन आर.सी.सी. डिझाईन तपासले आहे का.

५) बेंचमार्क या प्रकलास ग्रुप हाऊसिंगची परवानगी आहे, त्यामध्ये नागरिकांसाठी/गाळे धारकांसाठी अत्यावश्यक सुविधा देणारी दुकानकेंद्र खुली जागा, सभागृह इ. सुविधा अस्तितत्वात आहेत काय.

उत्तर - ६५ : सहाय्यक संचालक, नगर रचना : १) संबंधीताचा भागशः भोगवटा प्रमाणपत्र प्रस्ताव कार्यालयास प्राप्त आहे व मंजुर आहे तथापी हद्दीचया वादा संदर्भाने अक्षेप प्राप्त झाल्यामुळे व इतर त्रुटीच्या पुर्तते आभावी संबंधीतास अद्याप पावेतो भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही प्राप्त आक्षेप व त्रुटीची पुर्तता या संदर्भाने वस्तुनिष्ठ खुलासा सादर करण्यास्तव संबंधीतास कळविण्यात आले आहे.

२) संबंधीत भागशः वाणिज्य वापरासाठी परवानगी अनुज्ञेय केलेली आहे. तथापी वापरासंदर्भाने संबंधीता कडुन खुलासा मागविण्यात येत आहे.

३) बांधकाम परवानगी अनुज्ञेय केल्या नंतर मंजुर परवानगी नुसार वापर करणे व आवश्यक त्या खात्याच्या एन.ओ.सी. प्राप्त करणे ही जबाबदारी बांधकाम परवानगी धारकांची असते संबंधीताकडे जलतरण तलाव बांधकाम परवानगीमध्ये अनुज्ञेय केलेला आहे.

४) नाही, सदरील स्विमींग पुल ही अर्जदाराची खाजगी मालमत्ता असल्याने त्याची जबाबदारी अर्जदाराची आहे. महानगरपालिकेची नाही.

५) खाजगी मालमत्ता व वैयक्तिक वापर पाहता नागरिक अथवा गाळे धारकांचा या ठिकाणी अद्यापपावेतो संबंध आलेला नाही. तथापी प्रस्तावा अंतर्गत खुली जागा सभागृह (Club Home) यांचे नियोजन केलेले आहे.

मा. श्री. सुभाष कच्छवाह, नगरसेवक
(प्राप्त दि. २३-०५-०२)

प्रश्न क्र. ६६ : श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालयाचे ईमारतीचे बांधकामासाठी सुरुवातीला अर्थ संकल्पात एकुण किती आर्थिक तरतुद करण्यांत आली होती. या ईमारतीचे मुळ अंदाज पत्रकाची एकुण रक्कम किती अंदाज पत्रकीय रकमेत वेळोवेळी कोणकोणऱ्या कारणांमुळे वाढ करण्यांत आली. पुराण वस्तु संग्रहालयाचे ईमारतीचे बांधकाम कोणकोणती अतिरिक्त व वाढवि कामे हाती घेऊन पुर्ण करण्यांत आली अतिरिक्त व वाढीव कामांवर प्रत्येकी एकुण किती खर्च करण्यांत आला.

पुराण वस्तु संग्रहालाचे ईमारतीवर सुरुवाती पासुन ते ईमारत पुर्ण होई पर्यंत एकुण किती खर्च झाला या ईमारती मधील अजुन काही कामे पुर्ण करणे शिल्लक आहे काय, असल्यास कोणकोणती कामे करणे शिल्लक आहे या कामावर अजुन किती खर्च अपेक्षित आहे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालयाचे ईमारतीचे बांधकामाबाबत वरीलप्रमाणे विहीत आकडेवारीसह सविस्तर माहिती आपले अभिप्रायासह सभागृहात सादर करण्यांत यावी.

उत्तर - ६६ : अतिशहर अभियंता : माहिती संकलप करणे चालु आहे.

प्रश्न क्र. ६७ : मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्रासाठी एकुण किती जमीन घेण्यांत आली. या ईमारतीचे जागा एकुण मालकीची आहे. सदर जमीन

खाजगी असल्यास या जागेचा एकुण किती मोबदला खाजगी व्यक्तीस देण्यांत आला.

मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्राच्या ईमारतीचे बांधकामासाठी अर्थसंकल्पात प्रत्येक वर्षी एकुण किती आर्थिक तरतुद करण्यांत येते आहे. या ईमारतीची मुळ अंदाजपत्रकीय एकुण रक्कम किती बांधकामासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेत वेळोवेळी कोणकोणत्या कारणांमुळे वाढ करण्यांत आली.

सदर ईमारतीचे बांधकामात कोणकोणती अतिरिक्त व वाढीव कामे हाती घेवुन पुर्ण करण्यांत आली. प्रत्येक वाढीव मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्राच्या ईमारतीचे बांधकामावर सुरुवाती पासुन ते आतापर्यंत एकुण किती राक्कम खर्च करण्यांत आली. या वास्तु मधील अद्याप काही विकास कामे पुर्ण करणे शिल्लक आहे काय. असल्यास कोणकोणती कामे पुर्ण करणे बाकी आहे. उर्वरित विकास कामावर अजुन किती रक्कम खर्च अपेक्षित आहे मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्राची ईमारत अद्यायवत व सुसज्जरित्या केंव्हा पुर्ण होणार सदर ईमारतीचे बांधकामाबाबत वरील प्रमाणे विहित आकडेवारीसह सविस्तर माहिती आपले अभिप्रायासह सभागृहात सादर करण्यात यावी.

उत्तर - ६७ : सहाय्यक संचालक नगर रचना : मौजे मजनुहिल येथे वृक्षारोपनसाठी सिडको औरंगाबाद यांचे कडुन एकुण २० एकर जमीन त्या कार्यालयाचे ठराव क्र. ३०७० नुसार दिनांक ०१-०२-१९८५ रोजी महानगरपालिकेस विना मोबदला हस्तांतर झालेली आहे. जमीनी पैकी पश्चिम बाजुकडील जागेवर मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्राचे बांधकाम मा. शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांचे विभागामार्फत करण्यांत आलेले आहे.

प्रश्न क्र. ६८ : महानगरपालिकेच्या नगर भुवन परिसरात उभारण्यात आलेल्या प्रशासकीय ईमारतीचे बांधकामासाठी मुळ अंदाजपत्रकाची एकुण रक्कम किती ईमारतीचे बांधकामासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेत वेळोवेळी कोणकोणत्या कारणामुळे वाढ करण्यांत आली सदर ईमारतीचे बांधकामात कोणकोणती अतिरिक्त व वाढीव कामे हाती घेऊन पुर्ण करण्यांत आली. प्रत्येक वाढवि व अतिरिक्त कामावर कामनिहाय एकुण किती रक्कम खर्च करण्यांत आली.

महानगरपालिकेच्या टप्पा क्र.२ प्रशासकीय ईमारतीचे बांधकामावर सुरुवाती पासुन ते बांधकाम पुर्ण होईपर्यंत एकुण किती खर्च करण्यांत आला. सदर ईमारती मधील अद्याप काही विकास कामे पुर्ण करणे बाकी आहे काय. असल्यास कोणकोणते कामे पुर्ण करणे शिल्लक आहे. उर्वरित विकास कामांवर अजुन किती खर्च अपक्षित आहे.

महानगरपालिकेच्या टप्पा क्र. २ या प्रशासकीय विस्तारित ईमारतीचे बांधकामाबाबत ॲटम निहाय विहित आकडेवारीसह सविस्तर माहिती आपले अभिप्रायासह सभागृहात सादर करण्यांत यावी.

उत्तर - ६८ : अति. शहर अभियंता : माहिती संकलन करणे चालु आहे.

मा. श्री. सुरजितसिंग खुंगर, नगरसेवक
(प्राप्त दि. ०७-०६-२००२)

प्रश्न क्र. ६९ : अ) मागील तीन वर्षामध्ये प्रशासनामार्फत किती नागरिकांना बांधकामा परवानगी देण्यांत आली व किती लोकांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यांत आले. याची सविस्तर माहिती देण्यांत यावी.

ब) प्रशासनातर्फे देण्यांत आलेल्या बांधकामा परवानगी प्रमाणे प्लीन्थ पर्यंत बांधकाम झाल्यावर केली जात नाही हे खरे आहे का, नियमामध्ये तरतुद असतांना तपासणी का केली जात नाही. कधी पासुन तपासणी का केली जात नाही. कधी पासुन तपासणीला सुरुवात करणार याबाबत सविस्तर माहिती देण्यांत यावी.

क) मागील तीन वर्षामध्ये किती ले-आऊटला तात्पुरती मंजुरी दिली व नंतर किती ले-आऊट अंतिमरित्या मंजुर करण्यांत आले. याबाबतची सविस्तर माहिती येणाऱ्या सर्वसाधारण सभेत सादर करण्यांत यावी.

उत्तर - ६९ : सहाय्यक संचालक नगर रचना : अ) मागील तीन वर्षामध्ये खालील प्रमाणे वर्ष निहाय बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र देण्यांत आले आहे.

| अ. क्र. | वर्ष | बांधकाम परवानगी | भोगवटा |
|---|---|---|---|
| १. | १-४-२००० ते ३१-३-२००० | ९३० | २२९ |
| २. | १-४-२००० ते ३१-३-२००० | ५३९ | ९८ |
| ३. | १-४-२००० ते ३१-३-२००२ | ६२४ | १०१ |

ब) बांधकाम परवनगी घेतल्यानंतर संबंधीत मिळकत धारक यांनी प्लीथ सटीर्फीकेटसाठी महानगरपालिकाकडे अर्ज करावयाचा असतो. त्यानंतर तपासणी करुन महानगरपालिकेने प्लींथ सर्टीफिकेट घ्यावयाचे असेते. यापुर्वी अशा प्रकारचे अर्ज महानगरपालिकेस प्राप्त होत नव्हते. म्हणुन आता महानगरपालिकेने प्रत्येक बांधकाम परवानगी नकाशावर संबंधीताने प्लींथचे प्रमाणपत्र घ्यावे असा शिक्का मारणे चालु केले आहे.

क) दिनांक १-४-१९९९ ते ३१-३-२००० पर्यंत एकुण १२+७-१९ रेखांकनांना तत्वतः मान्यता व एकुण ३० रेखांकनाला अंतिम मान्यता देण्यात आली आहे.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याने मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २०-०७-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**शनिवार दि. २०-०७-२००२ रोजी मा. महापौर श्री. विकास जैन यांचे अध्यक्षते खाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे दुपारी ३.०० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा.आयुक्त यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
५) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
७) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
८) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. ऊमर
९) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी
११) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१२) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१३) स.स.श्रीमती धायातिलक लिलावती बाळासाहेब
१४) स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१५) स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१६) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१७) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
१८) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१९) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२०) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२१) स.स.श्री. जबिंदा दलविरसिंग रणजितसिंग
२२) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२३) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२४) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२५) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
२६) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
२७) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
२८) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
२९) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाक
३०) स.स.श्री. सोनवणे सुदाम रादास
३१) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३२) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३३) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन

३४) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
३५) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
३६) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
३७) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
३८) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
३९) स.स.श्री. पारे सोपान भाऊराव
४०) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
४१) स.स.श्री. अब्दुल कदिर मौलाना सय्यद
४२) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४३) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
४४) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४५) स.स.श्री. नासेर खॉन अ. रहेमान खॉन
४६) स.स.श्रीमती शाहीन जफर महमुद जफर
४७) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
४८) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
४९) स.स.श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
५०) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५१) स.स.सौ. सिद्यीकी नईम सिद्यीकी म. फसियोद्यीन
५२) स.स.श्री. शेख ईसाक शेख जैनोद्यीन
५३) स.स.श्रीमती सुलताना बेगम चाँदखा
५४) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५५) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
५६) स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
५७) स.स.श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान
५८) स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
५९) स.स.श्री. स.अली सलामी स. मीरा सलामी
६०) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली

# स्विकृती सदस्य

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
३) स.स.सौ. सलमा बानो मीर महमंद अली

**संवाद**

श्री. आनंद तांदुळवाडीकर : शेतकरी कामागार संघटनेचे नेते व सामाजिक व स. सदस्य श्री. जयवंत ओक यांचे मेहुणे स्व. हेमत देशमुख यांचे नुकतेच कार अपघातात निधन झाले त्यांना या सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्धता पाळुन श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री. सुदाम सोनवणे : यास माझे आनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे. सर्वांनी ०२ मिनिट पाळुन श्रध्दांजलीसाठी उभे राहावे. याचवेळी स्व. श्री. हेमंत देशमुख यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्धता पाळुन श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

श्री. सुदाम सोनवणे आज आषाढी एकादशी आहे, महाराष्ट्रात हिंदु समाजाचा हा महत्त्वाचा सण असतो. त्यासाठी सभागृहाच्या वतीने अशी विनंती करतो की, आजची सभा तहकुब करण्यांत यावी.

श्री. अफसरखॉन, श्री. रतनकुमार पंडागळे : स.सदस्य श्री. सोनवणे यांनी जी सुचना मांडली त्यास माझे अनुमोदन आहे.

श्री. अफसरखॉन : विषयपत्रिकेवर मस्जीद संदर्भात प्रश्न देऊन माहिती विचारलेली आहे. परंतु यामुळे शहराचे वातावरण खराब होऊ शकते. त्यासाठी हा प्रश्न विषयपत्रिकेतुन वगळण्यात यावा.

मा. महापौर : या प्रश्नाच्या बाबतीत स. सदस्यांचे मत लक्षात घेतले जाईल. त्यांनी त्यांचे मत मांडावे.

श्री. सुदाम सोनवणे : शहराचा विकास होण्याच्या दृष्टीने मी माझ्या प्रश्न मांडलेला आहे. कुणाच्या भावना दुखावतील या हेतुने मांडलेला नाही. उलट या प्रश्नाच्या बाबतीत प्रशासनावर माझी नारजी आहे की, गेल्या २४ तारखेला प्रश्न देऊनही अद्याप त्या प्रश्नाचे उत्तर मला मिळालेले नाही.

तकी हसनखान : माहिती उपलब्ध होऊ शकली असती. लेखी स्वरुपात देण्याची आवश्यकता नव्हती यामुळे जनतेच्या भावना दुखावल्या जात आहे.

मा. महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन संबंधीत प्रश्न वगळण्यांत येत आहे. तसेच आज आषाढी एकादशी आहे सभा तहकुब करावी अशी भावना स.सदस्यांनी व्यक्त केल्या त्यास मान्यता देऊन आजची सभा तहकुब करण्यांत येते.
याबरोबरच आजच्या सभेचे कामकाज संपले असे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १२-०८-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**सोमवार दि. १२-०८-२००२ रोजी (दि. २०-०७-२००२ चे तहकुब सभा) मा. महापौर श्री. विकास रतलाल जैन यांचे अध्यक्षते खाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी ११.४० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा.आयुक्त यांचेसह संबंधीत अधिकारी वर्ग तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
५) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
७) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
८) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. ऊमर
९) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी
११) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१३) स.स.श्रीमती धायातिलक लिलावती बाळासाहेब
१४) स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१५) स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१६) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१७) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
१८) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१९) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२०) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२१) स.स.सौ. विजया किशोर रहाटकर
२२) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२३) स.स.ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२४) स.स.श्री. जाबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२५) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२६) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२७) स.स.श्री. नजर हमीद अ. गफुर
२८) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२९) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
३०) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३१) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३२) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब

३३) स.स.श्री. नासेरखॉन सरदार खॉन
३४) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक
३५) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३६) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३७) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३८) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
३९) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
४०) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४१) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४२) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४३) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४४) स.स.श्री. पारे सोपान भाऊराव
४५) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
४६) स.स.श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद
४७) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४८) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
४९) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५०) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
५१) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
५२) स.स.श्रीमती शाहीन जफर महमुद जफर
५३) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५४) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५५) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५६) स.स.श्री. स. सलिम स. युसुफ
५७) स.स.श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
५८) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५९) स.स.श्री. सौ. सिद्दीकी नईम सुलताना सिद्दीकी म. फसियोद्दीन
६०) स.स.श्री. शेख ईसाक शेख जैनोद्दीन
६१) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६२) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
६३) स.स.श्री. सलीम पटेल शमशेर पटेल
६४) स.स.श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान
६५) स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुराव
६६) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६७) स.स.सौ. बबीता सुभाष कागडा
६८) स.स.श्री. श्री. तनवाणी किशनचंद लेखराज
६९) स.स.श्री. निखत परविन ईजाज अली

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. भगवान देवदिास घडामोडे
२) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर

३) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४) स.स.सौ. सलमा बानो मिर महमंद अली

**संवाद**

श्री. अंबादास दानवे : भारताचे उपराष्ट्रपती कृष्णकांत, तसेच प्रख्यात संगितकार स्व. शांताबाई दाणी तसेच नागेश्वरवाडी येथील पुलावरुन पडुन सायली नावाच्या मुलीचा अंत झाला त्या मुलीला व स. सदस्या सौ. विमलबाई राजपुत यांचे वडीलांचे निधन झाले त्यांना तसेच अमरनाथ यात्रकरुवर जो हल्ला होऊन मृत्यु झालेले आहेत या सर्वांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

श्री. कोकाटे काशिनाथ, श्री. नंदकुमार फुलारी : स. सदस्य श्री. दानवे यांनी जो ठराव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : श्रध्दांजलीसाठी सर्वांनी कृपया २ मिनिटे उभे राहावे. व श्रध्दांजली अर्पण करावी. (याचवेळी उपराष्ट्रपती स्व. कृष्णकांत, सुधीर फडके, स्व. शांताबाई दाणी तसेच अमरनाथ यात्रेकरु, स्व. कु. सायली, सौ. विमलबाई राजपुत यांचे वडील यांचे निधनाबद्दल त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.)

श्री. पंडागळे रतनकुमार : स. सदस्य सलीम पटेल यांची महाराष्ट्र प्रदुषण मंडळाच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यांत यावे.

श्री. पांडुरंग तायडे : ए.पी.जे. अब्दुल कलाम आझाद यांची राष्ट्रपती पदावर यांची निवड झालेली आहे. त्यांचेही अभिनंदन करण्यांत यावे.

श्री. कोकाटे काशिनाथ : यास अनुमोदन आहे.

श्री. प्रशांत देसरडा : नुकतेच निवडुन आलेले आमदार श्री. श्रीकांत जोशी यांचे सुध्दा अभिनंदन करण्यांत यावे.

घडमोडे भगवान : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : तिघांचेही अभिनंदन करण्यांत येत आहे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : विषयपत्रिकेस सुरुवात करावी.

श्री. कोकाटे काशिनाथ : विषयपत्रिकेला सुरुवात करण्यापुर्वी सर्वसाधारण चर्चा व्हावी. नुकताच मागील आठवडयात नागेश्वरवाडी भोईवाडा भागात असलेल्या एका पुलावरुन सायली नावाच्या मुलीचा पाण्यात पडुन मृत्यु झालेला आहे. तो पुल नादुरुस्त होता याची कल्पना प्रशासनाला आहे. यात प्रशासन नक्कीन दोषी आहे. हे प्रशासन जाणुन आहे. बजेटमध्ये तरतुद करतांना प्रत्येक वार्डतील विकास कामे करणासाठी तरतुद केलेली आहे चालु आर्थिक वर्षात इमारती बांधवयाच्या नाही ही भुमिका घेतलेली असतांना देखील दुसऱ्या बाजुने वार्डात काही ठिकाणी इमारती बांधण्याचे प्रस्ताव या अर्थसंकल्पात घेतलेले आहे. परंतु गोरगरिब लोकांना ज्यांची नितांत गरज आहे त्यामध्ये रस्ते, लाईट, पाणी, स्वच्छता, ड्रेनेज ई. सुविधा देणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. शासनाने सुध्दा अनधिकृत वसाहतीच्या बाबतीत जे आदेश दिलेले आहे. त्यात सुध्दा असे नमुद केलेले आहे की, ज्या भागात अगोदर सुख सुविधा दिलेल्या आहेत त्या भागात सुखसुविधा देण्यात काहीही अडचण नाही. शहरातील लहान मोठया नाल्यावर रस्ता,पुल बांधले. त्याची दुरुस्ती करावी. एकीकडे अनावश्यक खर्च होतो. व दुसरीकडे महापालिकेने दोन वार्डाच्या अंतर्गत असलेल्या लाकडी पुलाकडे दुर्लक्ष केल्यामुळे सायली

नावाच्या मुलीचा पाण्यात बुडुन अंत झालेला आहे. यास प्रशासनाच जबाबदार आहेत यात शंका नाही. असे अनेक पुल या शहरामध्ये असुन त्यांची दुरावस्था झालेली आहे. संबंधीत वार्डाच्या स. सदस्यां सौ. दाणे ताई यांनी सुध्दा अनेक पत्र प्रशासनाकडे हा पुल दुरुस्त होण्याबाबत दिलेले आहे. जाणीवपुर्वक दुरुस्ती झालेली नाही. अशी शंका येते. दुरुस्ती केलेली आहे परंतु कायमस्वरुपी केलेली नाही जग २१ व्या शतकाकडे जात असतांना या पुलावर सिमेंटचा वापर होऊन पक्का पुल करण्याऐवजी लाकडी पुल तयार करुन रस्ता करुन देण्यात येत असेल तर हे आपले दुर्देव आहे. व जो काही प्रकार घडलेला आहे तो प्रशासनाच्या निष्काळजीपणाने घडलेला आहे. आपणही बऱ्याच वार्डात भेटी दिलेल्या आहेत प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. बजेटमध्ये तरतुद करतांना बाजुच्या एका पुलाचे बांधकाम करण्याची तरतुद केलेली आहे परंतु या पुलांचे पक्के बांधकाम करण्यासाठी तरतुद केलेली नाही एका पुलासाठी बजेटमध्ये तरतुद होते तर दुसऱ्या एका पुलासाठी होत नाही असा भेदभाव करणे योग्य होणार नाही. या घटनेमुळे पोलिस केस वगैरे प्रकार झाले परंतु पोलिस केस दाखल करुन घेतलेली आहे म्हणुन महानगरपालिकेची जबाबदारी संपली असा अर्थ होत नाही. म्हणुन याबाबतीत सभागृहात सविस्तर चर्चा झाली पाहिजे दुर्देवाने ही घटना घडलेली आहे व यापुढे असे होणार नाही. जो प्रकार घडला कुणाच्या कारकिर्दीत व कोण यामध्ये कारणीभुत आहे, व सभागृहाच्या वतीने अशी विनंती करतो की, जे जे लाकडी पुल असतील ते काढुन पक्के सिमेंटचे पुल करण्यांत यावे. एकीकडे शहरामध्ये उड्डाण पुलांना तसेच मोठमोठे रस्ते करण्याच्या प्रस्तावात आपण मंजुरी देत आहोत. म्हणुन या शहरातील गोरगरिब नागरिकांना सोई सुविधा पुरविण्याची जबाबदारी महापालिकेची असुन त्याकडे लक्ष देण्याची अत्यंत आवश्यकता आहे. व या प्रकरणासंबंधीची सविस्तर चर्चा होऊन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात यावा व त्यानंतर पुढील योग्य कारवाईचे आदेश करावे.

सौ. दाणे चंद्रभागाबाई : सार्वत्रिक निवडणुक झाली मी या वार्डाची नगरसेविका झाल्यानंतर या पुलाची दुरुस्ती करण्या संदर्भात मी वांरवार पत्र दिलेले आहे. एकुण असे लाकडी पुल ३ आहेत. जेंव्हा वार्डाचा सर्व्हे केला तेव्हा या पुलाचे दुरुस्तीचे काम मोठया प्रमाणात होते. दुरुस्ती करण्यात आलेली होती परंतु ती कायमची केलेली नसल्याने हा प्रकार घेडलेला आहे या पुलावरुन लहान मुलांची नागेश्वरवाडी येथील शाळेत जाण्यायेण्यासाठी मोठया प्रमाणात वर्दळ असते. पत्र देऊनही कार्यवाही झाली नाही अशी घटना पुन्हा होणार नाही म्हणुन तो पुल दुरुस्त करुन सदर मृत्यु झालेल्या मुलीच्या कुटुबीयांना महानगरपालिकेने जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्याची कार्यवाही करावी.

श्री. घडामोडे भगवान : सायली नावाच्या मुलीचा पुलावरुन पडुन अत्यंत दुर्देवी घटना घडुन सदर मुलीचा मृत्यु झाला. घडलेली घटना जसेजसे दिवस निघुन जातील तसतसा विसर पडेल यात शंका नाही. परंतु प्रत्यक्ष घटना घडली त्या ठिकाणी सदर मुलीच्या कुटुंबातील व्यक्ती मोठमोठयाने अक्रोश करुन रडत होते हा प्रकार जे प्रत्यक्ष जागेवर होते त्यांना माहित आहे. वृत्तपत्रात बातम्या आल्या सर्वत्र चर्चा झाली. आणि सर्व जनतेने नगरसेवकांवर ठपका ठेवला परंतु संबंधीत नगर सेवकांनी तसेच तेथील कार्यकर्त्यांनी निवेदने दिलेली

असतांना सुध्दा पुलाचे काम झाले नाही. प्रशासन निष्क्रीय झालेले आहे. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे पदाधिकारी तसेच नगर सेवकांची जनतेसमोर नामुस्की झाली आहे. म्हणुन हा विषय अत्यंत गांभीर्याने घेतला पाहिजे. आज परिस्थिती अशी आहे की, किती व कोणतीही मदत केली तरी सदर मुलगी पुन्हा मिळणार नाही. असे प्रकार पुन्हा होणार नाही तसेच लोकांचे जीव वाचवयाचे असतील तर प्रशासनाच्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे. या प्रकरणामध्ये झोन अधिकाऱ्यांच्या गुन्हा दाखल झाला. जे की, चोर सोडुन संन्यासाला फाशी देण्यात येत आहे. जे यात दोषी असतील अशा अधिकाऱ्यांच्या बाबतीत चौकशी करुन त्यांचेवर गुन्हा दाखल करावा त्यांना निलंबीत करावे. अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करुन व तुटपुंजी आर्थिक मदत सदर मुलीच्या कुटुंबीयांना देऊन जर बगला देण्याचे काम होत असेल तर या आम जनतेला आपण न्याय देऊ शकणार नाही म्हणुन खऱ्या अर्थाने आपल्याला प्रथम नागरिक म्हणुन नावारुपाला यायचे असेल व योग्य अर्थाने न्याय दयायचा असेल तर सदर मुलीच्या भावाच्या नावाने महानगरपालिकेमार्फत २ लक्ष रुपये सदर मुलाच्या शिक्षणासाठी किंवा इतर उदनिर्वाहासाठी कामात येतील जेणे करुन त्या कुटुंबांचा उदर्निवाह चालेल. महानगरपालिकेतर्फे अनेक ठिकाणी कामे केली जातात. काही कामे चुकीची होतात. म्हणुन २ लक्ष रुपये दिले तरी महानगरपालिकेचे काही नुकसान नाही. नियमात बसत नसेल तरी देण्याचा निर्णय घ्यावा लागणार आहे. नसता जनता आपल्याला माफ करणार नाही. घटना घडली म्हणुन ३७ (३) खाली सदरचे काम देऊन टाकले ते काम होईल परंतु सदर मुलगी पुन्हा येणार नाही. म्हणुन २ लक्ष रुपयाची आर्थिक मदत करुन संबंधीत अधिकाऱ्यांवर पुन्हा दाखल करावा.

श्री. अफसरखॉन : संबंधीतास सदस्यांनी दोन तीन वेळेस पत्र देऊनही वेळेवर का काम करण्यांत आलेले नाही का निष्काळजीपणा झालेला आहे. अगोदर खुलासा घ्यावा नंतर या विषयावर चर्चा करणे योग्य होईल.

मा. महापौर : संबंधीत आधिकारी यांनी या संबंधी सविस्तर खुलासा करावा.

अति. शहर : सदर मुलीचा मृत्यु झाला फार दुर्देवी घटना घडलेली आहे. त्याबाबतची सविस्तर माहिती मी आपल्या समोर सादर करीत आहे. उदय कॉलनी ते सुंदरनगर नागेश्वरवाडी भागास जोडलेला लाकडी पुल आणि भोईवाडा ते प्रियदर्शनीनगर नागेश्वरवाडी तसेच नेहरु पॅलेस ते समर्थनगर असे तीन ठिकाणी लाकडी पुल आहेत. सदर पुल सिमेंट क्रॉक्रीटचे होण्यासाठी स. सदस्या सौ. चंद्रभागाबाई दाणे यांनी पत्र दिलेले होते. पाठपुरावा सुध्दा केलेला होता. उदयकॉलनी ते सुंदरनगर तसेच भोईवाडा ते प्रियदर्शनीनगर असे दोन्ही पुल हे अनधिकृत भागास झालेले आहे. म्हणुन बजेटमध्ये तरतुद केलेली नाही परंतु नेहरुपॅलेस ते समर्थनगर कडे जाण्यायेण्यासाठी करण्यात आलेला पुल हा अधिकृत असुन बजेट मध्ये या पुलाचे काम करण्यासाठी ५ लाखाची तरतुद सुध्दा केलेली आहे. त्याचे अंदाजपत्रक सुध्दा तयार झालेले आहे. ज्या ज्यावेळी स. सदस्य यांनी पत्र दिले त्या त्या वेळी ६-६ महिण्यांच्या नंतर जे दोन अनधिकृत भागात लाकडीपुल आहेत त्यांचे मध्ये फळया काढुन दुरुस्तीचे कामे केलेली आहे. जानेवारी २००१ मध्ये सविस्तर दुरुस्ती करण्यात आली व ऑगस्ट २००१ मध्ये तसेच त्यानंतर जानेवारी

२००२ मध्ये जुन्या फळया काढुन नविन फळया बसविण्याचे काम केलेले होते. नविन फळया टाकल्या की लगेच कुणीतरी काढुन घेऊन जातात. असे सुध्दा निदर्शनास आलेले आहे.

श्री. अविनाश कुमावत : ६ महिण्यानंतर नविन फळया टाकल्यास लगेच खराब होतील असे वाटत नाही.

अति. शहर अभियंता : त्या भागात फळया चोरी जातात.

श्री. किशोर तुळशीबागवाले : स. सदस्या सौ. दाणे यांनी पत्र दिले तेव्हांच तात्काळ का कार्यवाही झाली नाही.

श्री. जयवंत ओक : या घटनेच्या संदर्भात वृत्तपत्रात फार वेगवेगळया प्रकारच्या बातम्या छापुन आल्या या महानगरपालिकेतील आधिकारी/सदस्यांच्या मुलांच्या बाबतीत असा प्रकार झाला असता तर महापालिका पेटवुन उठली असती. अधिकारी यांनी जो खुलासा केला तो बरोबर वाटत नाही प्रथम हा पुल केंव्हा तयार झाला. हा पुल दुरुस्तीला होता तर प्रवेश का बंद केला नाही. असे शहरात फळयांवर असणारे किती पुल आहेत. फळया गेल्या की लहान मुले खाली पडणार यात शंका नाही. त्या ठिकाणी जाळया का टाकलेल्या नव्हत्या, ऐगल का नव्हते या संबंधीची सर्व माहिती घेण्यांत यावी. आताच सांगितल्याप्रमाणे ६-६ माहिन्याला काम केलेले आहे तर त्यांचे आताच्या आता संचिका मागवावी खरी परिस्थिती काय आहे समजले ज्या बातम्या आल्या त्यामुळे महापालिकेची फार मोठी बदनामी झालेली आहे. नादुरुस्त होते तर पत्र दिल्यानंतरही का कार्यवाही झाली नाही हा माझा प्रश्न आहे. यापुर्वी या पुलाचे दुरुस्तीचे काम केलेले आहे. अनाधिकृत म्हणुन दाखविण्यात येते, परंतु मोठमोठया इमारती होत आहे. शासनाचे सुध्दा अशा वसाहतीमध्ये काम करण्याचे आदेश आहे हा पुल फार दिवसापुर्वीचा आहे. सहानुभुती म्हणुन या पुलाचे काम करता येत होते. सन १९९५ च्या अगोदर ज्या ज्या ठिकाणी कामे केलेली आहे त्यावर देखभाल दुरुस्तीची कामे करता येतील असे शासनाचे आदेश आहे. हा पुल ९५ च्या अगोदरचा आहे. कादुरुस्ती करण्यात आलेली नव्हती. शासनाचा जी.आर.वाचुन दाखवावा नसता मी आणुन दाखवतो याबाबतचा योग्य खुलासा व कार्यवाही होत नसेल तर मी माझा खाली बसुन निषेध व्यक्त करतो. (याचवेळी स. सदस्य श्री. जयवंत ओक जे मा. महापौर यांचे डायस समोर खाली बसुन निषेध व्यक्त करतात इतरही सदस्य डायस समोर जमा होतात)

मा. महापौर : सर्व. स.सदस्यांना सुचना करण्यात येत आहे की, त्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. स. सदस्य श्री. ओक यांनी आपल्या जागेवर बसावे. आपण केलेल्या प्रश्नाचा योग्य खुलासा घेऊन कार्यवाही करण्यांत येईल. सभागृहात शिस्त पाळावी. (याचवेळी काही सदस्य संबंधीत जे अधिकारी या प्रकरणात दोषी असतील त्यांना निलंबीत करावे अशी मागणी करतात मोठमोठयाने बोलतात काही ऐकु येत नाही)

मा. महापौर : या प्रकरणाच्या प्रशासनाने सविस्तर चौकशीसाठी एका अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी ३० दिवसात अहवाल सादर करण्यात यावा.

श्री. अंबादास दानवे : निलबीत करावे, नंतर चौकशी करावी.

मा. महापौर : मा. आयुक्तांना पुर्णपणे अधिकार देण्यांत येत आहे. या संबंधी ८ दिवसाचे आत चौकशी करुन अहवाल सादर करावा. सर्व स.सदस्यांनी आपआपल्या

जागेववर बसावे. अहवाल प्राप्त होईल त्यानुसार निर्णय घेता येईल. (याचवेळी सर्व.स.सदस्य आपआपल्या जागेवर बसतात)

श्री. सुदाम सोनवणे : सन १९९५ च्या अगोदरचा सदर पुल झालेला आहे. ९५ च्या अगोदर जी जी कामे केलेली आहे त्यावर देखभाल दुरुस्तीचा खर्च करता येतो शासनाची सुध्दा जी.आर.आहे स.सदस्य ओक यांनी जे मत मांडले ते बरोबर आहे म्हणुन ज्या अधिकाऱ्यांनी हे काम केले नाही. त्यांना निलंबित करावे नंतर चौकशी होत राहिल. अशी मागणी या सभागृहाचीच नाही तर जनतेची सुध्दा आहे. सांजवार्ता वृत्तपत्रात बातमी आली की, सायलीच्या ऐवजी नगर सेवकांची मुले मृत्यमुखी झाली असती तर याचा अर्थ हे सभागृहातील सदस्य एवढे मुर्ख आहे का? यामध्ये फार मोठे गांभीर्य आहे. नगरसेवकांची बदनामी होत आहे. हा मुद्दा महत्वाचा आहे. आपल्याला सुपुर्ण निर्णय घेण्याचे अधिकार आहे. जर शासनाचे तसे आदेश होते काम करता येत नव्हते तर त्या पुलाच्या बाजुला महापालिकेने एक बोर्ड लाऊन बंद करावयास पाहिजे होता. परंतु ती सुध्दा कार्यवाही केलेली नाही. एका गरीब कुटुंबाची त्या मुलीच्या मृत्युमुळे मोठया प्रमाणात मानहाणी झालेली आहे. हे विसरुन चालता येणार नाही. या घटनेमुळे स. सदस्य श्री. चंद्रशेखर जैस्वाल तसेच स. सदस्या सौ. दाणे फार मोठी बदनामी झालेली असुन एका सदस्यांची बदनामी झाली तरी या सभागृहाची झाली याचे गांभीर्य घ्यावयास पाहिजे होते ते घेतलेले नाही. या सभागृहाला एकच अपेक्षीत आहे की, जे विभाग प्रमुख आहे त्यांचेवर कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे. तसेच अशा पुलाचे शासन जी.आर. देखभाल दुरुस्तीचे कामे करता येत नाही याबाबत प्रशसनाचे जाहिर प्रगटन अपेक्षित आहे. एका मुलीचा बळी गेल्यानंतर ६७ (३) (क) नुसार काम करण्याबाबतची संचिका मंजुर होत आहे एका ठेकेदाराला कामे देण्यात येत आहे. मा. आयुक्त त्यास मंजुरील देऊन कार्यवाही करणार आहे. सदर संचिका आपल्याकडे सुध्दा आलेली असेल. परंतु सदर पुलाचे काम ६७ (३) (क) नुसार न करता निविदा मागवाव्या त्यानुसार काम सुरु करावे व सदर पुलावरुन नागरिकांचा जाण्यायेण्याचा रस्ता बंद करावा तसा बोर्ड येथे लावण्यात यावा. (याचवेळी स.सभासद मा. महापौर यांचे डायसमोर येऊन मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकु येत नाही.)

मा. महापौर : सभा ०५ मिनिटासाठी तहकुब करण्यात येत आहे. (दुपारी १२.३० वाजता तहकुब केलेली सभा दुपारी २.३० वाजता सुरु झाली.)

श्री. जयवंत ओक : शासनाचा जी.आर. काय आहे तो सभागृहात वाचुन दाखवावा जर अधिकारी दोषी असेल तर मा. आयुक्त काय कार्यवाही करणार आहे त्याचा पण खुलासा करण्यांत यावा.

श्री.अफसर खान : ज्या मुलीचा मृत्यु झाला फार दु:खद घटना घडलेली आहे सदर अधिकारी दोषी असेल तर मा. आयुक्त सेवकाचे दोन महिण्याचे मानधन म्हणुन आर्थिक मदत देण्यात यावी. तसेच महानगरपालिकेतर्फे सुध्दा जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यात यावी अशी सभागृहाच्या वतीने विनंती करतो व सदर पुलाचे ५ ते १० लक्ष रुपये खर्च करुन तात्काळ बांधकाम करण्यात यावे.

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : सायली मृत्यु प्रकरणाच्या बाबतीत चौकशी तसेच शासन जी.आर. ची मागणी झालेली आहे.च सदर मुलीचे वडील हे बेकार असुन त्यांना महानगरपालिकेच्या सेवेत सामावुन घेण्यात यावे ही सभागृहाच्या वतीने मागणी करीत आहे.

सौ. दाणे चंद्रभागाबाई : स.सदस्य श्री. जैस्वाल यांनी सुचना केल्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

श्रीमती मानकापे पार्वती : शहरामध्ये असे किती नाले आहेत नाल्यावर पुल बांधलेले आहेत या घटनेप्रमाणे पुन्हा घटना घडल्यास याबाबतीत प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. अनधिकृत भाग आहेत विकास कामेकरता येत नाही असे प्रशासन सांगते तर २०-२० वर्षापासुनच्या वसाहती असतांना विकास कामे का करता येत नाही. शासनाचा जी.आर. आहे ९५ पुर्वीच्या वसाहतीमध्ये कामे करात येतात. शासनाचा जी.आर. सभागृहात वाचुन दाखवावा. सायलीच्या मृत्युमुळे सदर कुटुंबीयावर मोठया प्रमाणात संकट कोसळले आहे. सदर मुलीच्या भावाला महानगरपालिकेतर्फे २ लक्ष रुपये आर्थिक मदत देण्याची कार्यवाही करण्यांत यावी.

श्री. सुदाम सोनवणे : सायलीच्या मृत्यु या घटनेमुळे सभागृहात सभा झाल्यापासुन कार्यवाही करण्या संदर्भात वाद निर्माण झाला. त्या वादाचे स्वरुप निलंबीत करावे. कार्यवाही करावी, असे असुन या महानगरपालिकेतील कोणत्याही अधिकाऱ्यांवर जाणु बुजुन कारवाई करण्याचा आमचा विचार नाही. या घटनेमुळे वृत्तपत्रात बातम्या आल्या, त्या माध्यमातुन महापालिका आणि नगरसेवकांची प्रतिमा मलीन झाली. आर्थिक मदत देण्याबाबत काही सदस्यांनी विचार मांडले परंतु कितीही आर्थिक मदत दिली तरी जी दुर्घटना घडली ती भरुन निघणार नाही. शासनाच्या जी.आर. ची मागणी या सभागृहात झाली . या पुलाचे काम शासन जी.आर. नुसार करता येत नव्हते तर तसे प्रशासनाच्या माध्यमातुन वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन जाणे येण्यासाठी हा पुल बंद आहे असा बोर्ड लावणे गरजेचे होत परंतु तसे काही झालेले नाही. यापुर्वी अनधिकृत वस्तीमध्यगे अनेक ठिकाणी कामे झालेली आहे. शासनाच्या जी.आर. नुसार आता तशी नविन कामे करता येत नाही. परंतु माझ्या माहितीप्रमाणे जी पुर्वीची कामे केलेली आहे. त्यावर देखभाल दुरुस्तीची कामे करता येतात. असे मार्गदर्शन जी.आर. मध्ये आहे. मी महापौर असतांना त्यावेळच्या त्या वार्डाच्या स. सदस्या. सौ दलाल यांनी डिसेंबर माहिण्यामध्ये त्या पुलाचे दुरुस्तीचे काम करण्या संदर्भात पत्र दिलेले होते. त्यानुसार अधिकाऱ्यांना डायरेक्शन देऊन त्या पुलाचे देखभाल दुरुस्तीचे तीन वेळेस केलेले आहे. सन १९८८ ला हा पुल झालेला असुन ९९-२००० ला या पुलाचे देखभाल दुरुस्तीचे (डागडुलीचे) काम झाले. त्यानंतरही अशी घटना घडते ही दुर्देवाची बाब आहे. अधिकाऱ्यावर कार्यवाहीची मागणी झाली. कुणावर जाणुन बुजुन कारवाई करावी अशी आमची मागणी नाही परंतु ज्या अधिकाऱ्यांनी सदर पुल करण्यासाठी निविदा काढलेली होती, डागडुजीचे काम केलेले होते तीन वेळेस देखभाल दुरुस्तीचे काम केलेले होते. अशा अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे अशी आमची मागणी आहे. प्रशासनाचा अहवाल मागवावा. चौकशी समिती नेमावी. त्यामध्ये जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करावी. यास हे सभागृह सहमत आहे. मा. आयुक्तांच्या माध्यमातुन चौकशी झाली पाहिजे. या

घटनेनंतर लगेच काल एक घटना एन -८ च्या दवाखान्यामध्ये झालेली आहे. एक मुल जन्माताच आपल्या कर्मचाऱ्यांचया हातुन खाली पडुन मृत्यु झाला वृत्तपत्रात तशा बातम्या प्रसिध्द झाल्या यास आपले अधिकारी जबाबदार आहे. आज सायलीच्या मृत्युच्या घटनेची चर्चा चालु आहे. दुसऱ्या बैठकीपर्यंत आणखी काही घटना घडतील यासाठी अधिकाऱ्यांनी त्याचेकडे जी जबाबदारी दिलेली आहे त्यानुसार कामे केली पाहिजे. अशा घटना घडतात तेंव्हा त्या त्या विभाग प्रमुखांनी मा. महापौरांकडे मत मांडले पाहिजे. व महापौर यांचा अपतकालीन जो निधी असतो त्या माध्यमातुन अशा वेळी तात्काळ मदत देऊ शकतो. त्यामुळे जनतेचा राग रोष कमी होऊ शकतो. परंतु अशा घटनेकडे आपले अधिकारी लक्ष देत नाही. जनतेला योग्य माहिती पुरवित नाही. व जनतेचा रोष हा मा. आयुक्त, मा. महापौर तसेच पदाधिकाऱ्यांवर असतो. या पुलाचे काम करता येत होते किंवा कसे या संदर्भात शासनाकडुन आलेला जी.आर. सभागृहात वाचुन दाखववावा.

श्री. अविनाश कुमावत : लोकसंकेत मुंबई वृत्तपत्रात असे दिले की, सायलीचा बळी घेणारा पुल आधिकाऱ्यांनी कागदोपत्रीच दुरुस्त केला. या वृत्तपत्रात स्टेटमेंट दिलेले आहे की, ते वाचुन दाखविण्यात येत आहे --- उदय कॉलनी ते नागेश्वरवाडी येथे जोडणाऱ्या पुलावरुन सायली नावाच्या ४ वर्षीय बालिकेला आपला जीव गमावावा लागला. सदर पुल २ ते ३ वेळेस दुरुस्त केल्याचे महानगरपालिकेतील अति शहर अभियंता व उपअभियंता यांनी कागदोपत्री दाखविलेले आहे. व हजारो रुपयाचा अपहार केलेला. असा आरोप केलेला आहे दुसऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार सौ. चंद्रभागाबाई दाणे यांनी प्रशासनातील सर्व संबंधीत अधिकारी यांना हा पुल दुरुस्ती करण्याची मागणी आतापर्यंत ५ वेळेस पत्र देऊन केलेली आहे. आतापर्यंत कुण्याही आधिकाऱ्यांने दखल घेतलेली नाही व महानगरपालिकेतील अधिकाऱ्याविषयी नाराजी व्यक्त करण्यात आलेली आहे. स. सदस्या सौ. दाणे यांनी २९ मे २००० रोजी पत्र देऊन या पुलाची दुरुस्ती करावी म्हणुन पत्र दिलेले आहे. व दुरुस्ती झालेली नसल्याचे स. सदस्या सौ. दाणे यांनी सांगितले आहे. तर दुसरीकडे तत्कालीन शहर अभियंता यांनी दि. २३ जुलै २००० रोजी जा.क. मनपा/बांध-१/२४५/०२ नुसार श्री. हाश्मी या गुत्तेदारास नागेश्वरवाडी येथील याच पुलावर लाकडी फळया टाकण्यासाठी कामाची वर्क ऑर्डर दिलेली आहे. त्यानंतर पुन्हा ६ महिण्याने जा.क्र. मनपा/बांध -१ २७५/०१ दि. १४ जुन २००१ ला श्री. पवार या गुत्तेदारास याच पुलाचे व सुंदरनगर ते भोईवाडा या पुलावर लाकडी फळया टाकण्यासाठी काम दिलेले आहे. कागदोपत्रीय हे काम पुर्ण झाल्याचे दाखवुन महापालिकेतील अति. शहर अभियंता तसेच उप अभियंता यांनी लाखो रुपयाचा गैरव्यवहार केलेला आह असा आरोप केलेला आहे. नागेश्वरवाडी पुलाप्रमाणेच सुंदरनगर येथील पुलावर लाकडी फळया टाकण्यासाठी कामाची वर्कऑर्डरही ५ मे २००० रोजी जा.क्र. मनपा/बांध -१ /६६ नुसार दिलेली असुन कुठल्याही प्रकारची दुरुस्ती केलेली नाही परंतु महानगरपालिकेतील अधिकारी यांनी या पुलाचे काम केल्याचे कागदोपत्री दाखवुन हजारो रुपयाचा अपहार केला हे स्पष्ट झाले आहे. व सायली नावाच्या मुलीचा या पुलाचे काम न केल्यामुळे मृत्यु झ ाला आहे. अशा अधिकाऱ्यांवर पोलिस गुन्हे दाखल करावे. असे वृत्तपत्रात

दिलेले आहे. ज्या ज्या वर्कऑर्डर दिलेल्श्या आहेत त्या त्या वर्क ऑर्डरची सुध्दा माझ्याकडे प्रत आहे. (स.सदस्य श्री. कुमावत वर्क ऑर्डरच्या प्रती सभागृहात मा. महापौर यांना दाखवितात) जेव्हा चौकशी अहवाल येईल त्यात या वर्कऑर्डरचा सुध्दा उल्लेख थावयास पाहिजे.

श्री. रगडे भगवान : सायली नावाच्या मुलीचा दुर्देवी घटना घडुन मृत्यु झाला सदर मुलीच्या कुटुंबीयांना जास्तीत जास्त आर्थिक मदत २ लक्ष रु. देण्याचे मत स. सदस्यांनी मांडले. कुटुंबातील व्यक्तींना नोकरी देण्याची सुचना काही सदस्यांनी मांडली जर आर्थिक मदत देण्याचा ठराव पारीत करित असेल तर नुकताच माझ्या वार्डातील दिलीप म्हस्के नावाच्या मुलाचा महापालिकेच्या पाण्याच्या टँकर खाली येऊन मृत्यु झाला. त्यांच्या कुटुंबीयांना सुध्दा तेव्हढीच मदत देण्यांत यावी.

श्री. अविनाश कुमावत : स. सदस्यांनी आताच सुचना केल्यानुसार तो विषय वेगळा आहे. हा विषय वेगळा आहे. समान निर्णय घेता येणार आहे.

मा. महापौर : या पुलाचे काम करता येत होते किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी तसेच शासनाचा जी.आर. नुसार कार्यवाही केलेली आहे किंवा काय याचा संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

श्री. कोकाटे काशिनाथ : शासनाचा जी.आर. आलेला आहे. तो नगर सेवक स्वेच्छानिधी कसा वापरता येईल त्याबद्दल माहिती दिलेली आहे. जी.आर. मध्ये १८ व १२ मध्ये तरतुद केलेली आहे की, जी कामे या अगोदर केलेली आहे त्या कामाची डागडुजी तसेच देखभाल दुरुस्तीची कामे करता येतील असे दिलेले आहे.

मुख्यलेखाधिकारी : नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीचा वापर कसा करावा याबाबत शासनाने मार्गदर्शक तत्वे निश्चित केलेली आहे स्वेच्छानिधीतून जर या अगोदर जी जी कामे केलेली असेल देखभाल दुरुस्तीसाठी स्वेच्छानिधीतुन कामे करता येईल असे आहे. इतर महानगरपालिकेतील फंडातुन करता येत नाही. अनधिकृत वसाहतीत काम करता येत नाही.

श्री. जयवंत ओक : अधिकाऱ्यांनी जी जी.आर. वाचुन दाखविला ती स्वेच्छानिधीच्या संदर्भातील आहे परंतु शासनाचा वेगळा दुसरा जी.आर.आहे ९५ च्या अगोदर जी कामे झालेली आहे, त्या कामावर देखभाल दुरुस्तीचे काम करता येते. जी.आर.प्रशासनाकडे नसेल तर मी ०५ मिनिटामध्ये सादर करतो महानगरपालिकेकडे जी.आर. प्रत उपलब्ध नाही खेदाने सांगावेस वाटते.

श्री. सुदाम सोनवणे : १९९५ यापुर्वी झालेल्या काही कामाच्या बाबतीत त्यावर देखभाल दुरुस्तीची कामे करता येत नाही असे शेरे अधिकारी यांनी टाकलेले आहे. ते नियमात बसत नव्हते का? एक तर शासन किंवा प्रशासन सभागृहाची दिशाभुल करित आहे.

श्री. सुनिल मगरे : शासनाच्या जी.आर. चा वारंवार उल्लेख येतो. महाराष्ट्र शासनाने जी.आर. काढला. दुरुस्ती केंव्हा केव्हा झाली याचे स्पष्टीकरण व्हावे.

श्री. अंबादास दानवे, श्री. अविनाश कुमावत : शासन जी.आर. च्या बाबतीत चर्चा चालु आहे. सन २००० व २००१ पर्यंत वर्क ऑर्डर देऊन डागडुलीचे काम केलेली आहे. या संबंधीची माहिती आताच स. सदस्य श्री. कुमावत यांनी दिली सन २००१ पर्यंत देखभाल दुरुस्तीचे काम केल्यानंतर शासनाचा कोणताही नविन जी.आर. आलेला नाही म्हणुन आज का काम करता येत नाही. शासनाच्या

जी.आर. चा संबंधनाही या पुलाचे काम करता येत होते. परंतु अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केलेला आहे. नाला, नदी हे नैसर्गिक रित्या झालेले असते. तो अनधिकृत आहे किंवा अधिकृत किंवा कोणत्या वस्तीमध्ये आहे. याचा प्रश्न येत नाही. एकीकडे वर्कऑर्डर दयायचे दुसरीकडे ते काम करता येत नव्हते असे म्हणजे बरोबर नाही. नैसर्गिकरित्या नाल्यावर संगळयांचाच अधिकार आहे. म्हणुन त्यावर काम करणे हे अनधिकृत ठरु शकत नाही.

श्री. कोकाटे काशिनाथ : शासनाचा जो जी.आर. आलेला आहे. तो स्वेच्छानिधीच्या बाबतीत आहे. अनधिकृत वस्त्यामध्ये नविन कामे करण्याचे बंद केलेले आहे. परंतु जी अगोदर कामे झालेली आहे त्यावर देखभाल दुरुस्तीचे काम करता येते. कोणते काम करावे करु नये हे स्पष्ट आदेशित दिलेले आहे सभागृहाच्या निदर्शनास आणुन दयावे. सर्वच वार्डात सारखीच कामे झाली पाहिजे. या प्रकरणाच्या बाबतीत सखोल चौकशी करुन पुढील कार्यवाही करावी.

मा. महापौर : मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग ए एमसी ११४/२००१ दिनांक २६ फेब्रुवारी २००१ नुसार महानगरपालिकेने नगरसेवक स्वेच्छा निधीतुन घ्यावयाची कामे हा अध्यादेश शासनाने काढलेला आहे सदर अध्यादेशानुसार नियमावली सर्व स. सदस्यांना वितरीत केलेली आहे. यामध्ये अट क्र. ३४ मध्ये स्पष्ट निर्देश दिलेले आहे त्या २७ जानेवारी २००१ ला आदेश काढुन ज्या वस्त्यामध्ये नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतुन केलेल्या कामासाठी खर्च करता येतील व अनधिकृत वस्त्यात कामे करता येणार नाही. असे दिले आहे. यानंतर शासनाने गुंठेवारी कायदा लागु केलेला आहे. त्यास नियोजनच दिलेले आहे की अनधिकृत वस्त्यामध्ये महानगरपालिकांना सुविधा पुरविता येत नाही अनधिकृत व त्यांचा विकास करण्यासाठी शासनाने मार्गदर्शक तत्वे निश्चित केलेली आहे. त्यानुसार महापालिकेने ठराविक निधी घेऊन अनधिकृत वस्त्यामध्ये काम करावे. असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे अनधिकृत वस्त्यामध्ये कोणतेही कामे महानगरपालिका आता करित नाही. फक्त स्वेच्छानिधीतुन ते ही नगरसेवकांनी त्यांचे स्वेच्छानिधीतुन केलेले असेल त्यावर देखभाल दुरुस्तीचे काम करता येईल. व तसेच शासनाचे स्पष्ट निर्देश आहे.

श्री.सुदाम सोनवणे : या जी.आर. नुसार महानगरपालिकेने कोणत्याही निधीतुन कामे करु नये असा स्पष्ट जी.आर. मध्ये नाही. फक्त स्वेच्छानिधीच्या बाबतीत मार्गदर्शक तत्वे शासनाने दिलेली आहे. याचा अर्थ अधिकारी सभागृहाची दिशाभुल करतात व विकास कामे होऊ देत नाही. नगरसेवक स्वेच्छानिधीतुन हे काम करता येत नव्हते परंतु इतर हेड मधुन निधी उपलब्ध करुन महानगरपालिका हे काम करु शकत होते.

श्री. अविनाश कुमावत : पुलाचे काम स्वेच्छानिधीतुन केलेले असेल तर त्यावर देखभाल दुरुस्तीचे काम का होऊ शकत नाही सन २००० मध्ये कोणत्या हेड मधुन काम केले.

श्री. काशिनाथ कोकाटे : मुख्यलेखाधिकारी यांनी स्वेच्छानिधीतुन कामे कशी करायची याबाबतचा जी. आर. वाचुन दाखविलेला आहे आणखी दुसरा जी.आर. आलेला आहे. त्यात ९५ पुर्वीच्या झालेल्या व वसाहतीमध्ये विकास कामे करता येतील त्या वसाहती अधिकृत कराव्या असे आहे. स्वेच्छानिधीतुन

करावयाच्या कामाच्या जी.आर. वेगळा अर्थ लाऊन अधिकाऱ्यांनी शासनाची व सभागृहाची दिशाभुल केलेली आहे. व विकास कामे केलेली नाही. स्वेच्छानिधी व्यतिरिक्त इतर विकास कामे महानगरपालिकतर्फे करण्याचे आदेश करावे. यापुढे विकास कामे करण्याचे थांबवुन नये.

श्री. तकी हसनखान : सायली नावाच्या मुलीच्या मृत्यु प्रकरणात कोणते अधिकारी यात दोषी आहे. या संदर्भात अगोदर चौकशी होईल. शहरातील ही पाहिली घटना नाही. यापुर्वीही एका मुलाचा मृत्यु झालेला आहे. चौकशी केली कार्यवाही नाही.

श्री. जयवंत ओक : मुख्यलेखाधिकारी यांनी जो जी.आर. वाचुन दाखविला तो नगर सेवक स्वेच्छानिधीच्या संदर्भात होता परंतु शासनाने गुंठेवारी संदर्भात जी.आर. काढलेला आहे. गुंठेवारी जी.आर. नुसार या पुलाचे काम करता येत होते. अधिकारी यास जबाबदार आहे. सभागृहाची दिशाभुल होत आहे. जी.आर. नुसार का काम केलेले नाही खुलासा व्हावा. आज एक मुलीचा बळी गेल्या उद्या १०० बळी पडतील. वृत्तपत्रात बदनामी कारक बातम्या येत आहे. जी.आर. माझ्याकडे आहे. याप्रमाणे सन १९९५ पुर्वीच्या ज्या वसाहती झालेल्या आहेत अशा वस्त्यामध्ये विकास कामे करता येती असे दिले आहे. अशा घटना घडल्यास जुना सदस्यांना जाब विचारणार आहे. माझ्याकडे जी.आर. प्रत आहे तो वाचुन दाखववावा.

मुख्यलेखाधिकारी : शासनाकडुन प्राप्त झालेला सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १३ गुंठेवारी लागु करण्या संदर्भातील नियमावली शासनाने ठरवुन दिल्यानुसारच कार्यवाही होईल. शासनाने ३० एप्रिल २००१ ला अध्यादेश दिलेला आहे. त्यावर सभागृहात चर्चा होऊन दुरुस्तीचा तसा ठराव शासन मंजुरीसाठी दिलेला आहे. शासनाने मान्यता दिल्यानंतरच गुंठेवारी कायदा लागु होऊ शकेल तोपर्यंत आपल्याला अनधिकृत वस्त्यामध्ये विकास कामे करता येणार नाही.

श्री. जयवंत ओक : गुंठेवारीच्या जी.आर.नुसार काम करता येत होते किंवा काय याचा खुलासा पाहिजे होतो. अधिकाऱ्यांनी जो जी.आर. स्वेच्छानिधीचा वाचुन दाखविला तो वेगळा होता हे सिध्द झाले. या पुलाचे या अगोदर देखभाल दुरुस्तीचे काम केलेले आहे ते कसे केले.

श्री. अविनाश कुमावत : तीन वेळेस या पुलाचे काम करण्याबाबत वर्कऑर्डर कोणत्या नियमाने काढलेल्या आहेत.

मा. महापौर : या विषयावर भरपुर चर्चा झालेली आहे मा. आयुक्तांना चौकशी करण्याचे आदेश केलेले आहे.

श्री. जयवंत ओक : जी.आर. येण्याच्या अगोदर अनधिकृत वसाहतीमध्ये कामे करता येत होती असा अर्थ निघतो का पुलाचे काम व्यवस्थित झालेले नाही.

श्री. अविनाश कुमावत : पुल दुरुस्त करावा नसता काढुन घेण्यात यावे.

श्री. इलियास किरमाणी : माझ्या वार्डातील पुलाच्या पट्टयाचोरी जातात बसविल्यानंतर महानगरपालिकेचे लक्ष नसते.

श्री. घोडेले नंदकुमार : टेक्नीकल पध्दतीने काम करण्याचे आदेश द्यावे जेणे करुन फळया, पट्टया कोणीही काढुन घेऊन जाणार नाही.

श्री. सुनील मगरे : शासन जी.आर. ३०-०४-२००१ चा आहे. यापुर्वी स.सदस्या सौ. दाणे यांनी या पुलाचे काम करण्याबाबत पत्र दिलेले आहे. का काम करण्यात आले नाही.

श्री. घोडेले नंदकुमार : आजची सभा ही माहे जुलै महिण्याची सभा होत आहे जास्त चर्चा न होता. आता विषयपत्रिकेस सुरुवात करावी.

जैस्वाल चंद्रशेखर : फळया टाकुन हा पुल दुरुस्त करु नये पुन्हा ही परिस्थिती निर्माण होणार असुन महानगरपालिकेची बदनामी होत आहे. त्याकरिता सदर पुलाच्या जागी सिंमेट क्रॉक्रीटचा पुल करण्यात यावा.

मा. महापौर : या प्रकरणाचा प्रशासनाने ८ दिवसात अहवाल सादर करावा व या पुलावरुन पुन्हा अशी घडणार नाही म्हणुन सदर पुलाचे काम चांगल्या प्रकारे होण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. सदर मृत्यु झालेल्या मुलीच्या कुटुंबीयांना महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत देण्यात येईलच परंतु ज्या सदस्यांना आर्थिक मदत देण्याची इच्छा असेल त्यांनी त्यांचे मानधनातुन आर्थिक मदत करावी.

श्री. भगवान रगडे : मागील बैठकीत मी नारेगांव येथे कचरा साचला जात आहे व त्यामुळे मोठया प्रमाणात दुर्गंधी सुटलेली आहे या संदर्भात मी चर्चा केलेली होती. परंतु आजही तशीच परिस्थिती आहे कचरा उचलला जात नाही. दुर्गंधी सुटलेली आहे कचऱ्यांची विल्हेवाट लागली जात नाही. व नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची वेळ आलेली आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येईल असे आपण आश्वासन दिलेले होते. परंतु ती कार्यवाही झालेली नाही. साचलेल्या कचऱ्यावर महानगरपालिकेतर्फे व्यवस्थित औषधी फवारणी होत नाही. त्यामुळे जंतु डासाचे प्रमाण व दुर्गंधी मोठया प्रमाणात झालेली आहे. आजुबाजुच्या गावातील बरेच लोकांना यामुळे गॅस्ट्रो सारखे आजार झाले जनतेचे आरोग्य धोक्यात येत आहे. या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लागली जात नाही म्हणुन या सभागृहाने सविस्तर चर्चा करुन कमेटी स्थापन केलेली होती सदर कमेटीच्या अहवाल सुध्दा प्रशासनाकडे प्राप्त झाला तया अहवालानुसार सत्यम फर्टीलायझरचे मालक यांनी करार नाम्यानुसार पालन केलेले नाही. त्रुटी आढळुन आलेल्या आहेत त्या संदर्भात प्रशासनाने संबंधीत मालकावर आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे खुलासा द्यावा.

मा. महापौर : कमेटीने प्रशासनाकडे अहवाल दिलेले होता. सभागृहात त्यावर चर्चा होऊन प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी असे आदेशित केलेले होते आतापर्यंत प्रशासनाने त्यावर काय कार्यवाही केलेली आहे. खुलासा करावा.

श्री. भगवान रगडे : अहवाल देऊन ९ ते १० महिण्याचा कालावधी झालेला असतांना प्रशासनाने अद्याप काहीही कार्यवाही केलेली नाही संबंधीतास नोटीस देऊन कार्यवाही आहे का? तसेच सभागृहात अहवाल मागवुन वाचुन दाखवावा.

मुख्यलेखाधिकारी : ४ ते ६ महिण्यापुर्वी अहवाल सभागृहात प्राप्त झालेला होता. प्रशासन कुणाला ही पाठीशी घालणार नाही प्रशासनामार्फत संबंधीतास नोटिस दिलेली होती त्यावर त्यांनी मनपाकडे काही सबमिशनन्स केलेले होते.समितीचा दोन ते तीन पानाचा अहवाल होता. त्यानुसार संबंधीत खत कारखान्याचे विद्युत बिले तपासणीसाठी पाठविलेले होते इतर काही रेकॉर्डची तपासणी चालु होती. यासाठी काही वेळ गेलेला आहे. सर्व चौकशी केल्यानंतर सुध्दा आणखी एक नोटीस ८ दिवसांपुर्वी दिलेली आहे त्या

नोटीसचे उत्तर सविस्तर अहवाल ठेवण्यात येईल. कमेटीने जो अहवाल दिलेला होता त्यामध्ये भरपुर तृटया दर्शविलेल्या होत्या त्यानुसार माहिती संबंधीताकडुन मागविली होती. अद्यापही संबंधीत मालकाने स्टॉक रजिस्टर लेखा विभागात दिलेले नाही जे दिले ते रद्द केलेले आहे त्याबाबतीत ही त्यांना पत्र देऊन याबाबतीत काय म्हणणे आहे म्हणुन विचारणा केलेली आहे. सर्व माहिती प्राप्त झाल्यांनतर अहवाल सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यांत यईल.

श्री. भगवान घडामोडे : अहवाल देऊन ८ ते १० महिने झाले आता पर्यंत फक्त नोटीस देऊनच कार्यवाही होते. हे बरोबर नसुन अधिकारी कामामध्ये दुर्लक्ष करतात.

श्री. भगवान रगडे : सध्याची परिस्थिती त्या ठिकाणी फार गंभीर झालेली असुन मोठया प्रमाणात कचरा साचला आहे. (याचवेळी मा. महापौर यांचे आसनगृहावर मा. महापौर सततात व सभेचे कामकाज चावितात)

मुख्यलेखाधिकारी : स. सदस्य ज्या भावना व्यक्त करित आहे त्या बरोबर आहे त्यादृष्टीकोनातुन संबंधीतास नोटीस बजावलेली आहे. १२ लक्षची महानगरपालिकेने संबंधीत ठेकेदास डिमांड केलेली आहे. कचरा डेपोमध्ये जाऊन मा. उपआयुक्त (म.) यांनी येथील वही जप्त केलेली आहे. कारवाई करण्याच्या दृष्टीने सर्व कागदपत्र जमा केलेले आहे.

श्री. भगवान रगडे : अहवाल प्राप्त झाल्यानंतर नोटीस देण्याची आवश्यकता नव्हता. अहवालामध्ये संबंधीत ठेकेदाराचे नियमाचे पालन केलेले नाही असे स्पष्ट दिलेले आहे. अहवाल वाचुन दाखववावा.

श्री. सुरजितसिंग खुंगर : सायलीच्या मृत्युच्या बाबतीत चर्चा झालेली आहे. सदर पुलाचे काम व्यवस्थित न झाल्याने एका बालिकेचा मृत्यु झाला यास महानगरपालिकाच जबाबदार आहे. कचऱ्याची विल्हेवाट लागण्यासाठी ठेका दिला परंतु संबंधीताने नियमाचे पालन न करता कचऱ्यापासुन खतनिर्मिती केली नाही. त्यामुळे या सभागृहात चर्चा होऊन चौकशी समिती नियुक्त केली त्यात प्रशासनाचे अधिकारी सुध्दा होते. अहवालात ज्या त्रुटया आढळुन आल्या त्याचा समावेश केलेला होता परंतु प्रशासनाच्या माध्यमातुन काहीही कार्यवाही झालेली नाही. आतापर्यंत लाखो रुपयाचा कचरा विक्री झाला व विक्री चालु आहे. रॉयल्टी म्हणुन जो आर्थिक फायदा महानगरपालिकेस झाला तेवढी रक्कम संबंधीताने कचरा विक्री करुन स्वत: चा फायदा घेतला ५० लक्षची सबसिडी मिळाली परंतु विषय गोलमोल आहे. निश्चित काय झाले माहित नाही. कमेटी झाली त्याचा फायदा काहीही झालेला नाही. आता सध्या कचरा साचुन आहे लोकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. म्हणुन या प्रकरणाच्या बाबतीत तात्काळ चौकशी अहवाल मागवुन कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे. २ वर्षापासुन या प्रकल्पाच्या बातम्या वृत्तपत्रात येत आहे विधानसभेत सुध्दा या प्रकरणाच्या बाबतीत प्रश्न उपस्थित झालेला होता. परंतु अद्याप काहीही कार्यवाही होत नाही.

मा. उप महापौर : सत्यम फर्टीलायझर प्रकल्पाच्या बाबतीत प्रशासना मार्फत चौकशी चालु आहे. चौकशी अहवाल करुन काय चौकशी केली याचा अहवाल येत्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा. तसेच जो कचरा सध्या साचलेला आहे त्याची प्रशासनाने तात्काळ विल्हेवाट लावावी.

श्री. भगवान रगडे : आतापर्यंत प्रशासनाने काहीही कार्यवाही केलेली नाही. सर्वत्र कचरा साचलेला आहे. चौकशी अहवाल मांडण्यासाठी किती वेळ देणार आहे. कार्यवाही वेळेवर होत नाही म्हणुन -----
(याचवेळी स.सदस्य श्री. रगडे मा. महापौर यांचे डायस समोर जाऊन राजदंड उचलतात व मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकायला येत नाही. काही सदस्य त्यांना त्यांचे जागेवर आणण्याचा प्रयत्न करतात)

मा. उप-महापौर : स. सदस्य श्री. रगडे यांनी सभागृहात मोठमोठयाने बोलुन तसेच राजंदड उचलला त्यामुळे या सभागृहाचा व मा. महापौरांचा अपमान झालेला आहे. त्यांनी याबद्दल दिलगीरी व्यक्त करावी. इतर सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे (मा. महापौर यांनी विनंती करुनही स. सदस्य श्री. रगडे हे सभागृहात डायससमोर मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकु येत नाही.)

श्री. जयवंत ओक : स. सदस्य श्री. रगडे यांनी राजदंड उचलुन मा. महापौरांचा अपमान केलेला आहे. त्याबद्दल माफी मागावी नसता त्यांचे एकदिवसासाठी सभासदत्व रद्द करावे.

मा. उप-महापौर : स.सदस्य श्री. रगडे यांनी सभागृहात मोठमोठयाने बोलुन तसेच राजदंड उचलला त्यामुळे सभागृहाचा अपमान झालेला आहे. त्यांनी याबद्दल दिलगिरी व्यक्त करावी त्यांचे १ दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यांत येईल. (स.स.श्री. रगडे दिलगिरी व्यक्त करित नाही मोठमोठयाने बोलतात)

मा.उप-महापौर : स.स.श्री. रगडे यांना विनंती करुनही मोठमोठयाने बोलणे थांबवित नाही व त्यांनी राजदंड उचलल्याने त्यांनी सभागृहाचा अपमान केलेला आहे. त्यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यांत येते. सुरक्षा रक्षकांनी त्यांना सभागृहा बाहेर काढावे. इतर सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. (याचवेळी स.सदस्य श्री. रगडे यांना सुरक्षा रक्षकाबाहेर घेऊन जातात.) तसेच प्रशासनाला आदेश देण्यात येतात की शहरातील रस्त्यावर ज्या ज्या ठिकाणी खड्डे पडलेले असतील ते बुजविण्याची कार्यवाही करावी. ८ दिवसात दुरुस्तीचे काम करावे कचरा उचलण्याच्या बाबतीत स. सदस्यांच्या भावना प्रशासनाने समजुन न घेतल्यामुळे आजचा प्रकार घडलेला आहे.

सौ. निखत अली : सभा तहकुब होण्याच्या अगोदरच्या बैठकीत बी.पी.एल. ए.टी.एअरटेल टॉवर्स बाबतीत मी प्रश्न उपस्थित केलेला होता. उत्तर बैठकी देणार होते. दोन बैठका झाल्या आता पर्यंत उत्तर मिळाले नाही नगर सेवकांनी प्रश्न उपस्थित केला होता. उत्तर बैठकीत देणार होत दोन बैठका झाल्या आता पर्यंत मिळाले नाही. नगरसेवकांनी प्रश्न उपस्थित केला त्यांच्या भावना प्रगट करतात. परंतु त्यांना सभागृहा बाहेर काढले जाते. हे योग्य नाही. प्रश्न सुटत नसेल तर काय करावास पाहिजे या बाबतीत निर्णय द्यावा नसता प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. माझ्या प्रश्नाचा खुलासा द्यावा तरच विषयपत्रिकेवर चर्चा सुरु करावी.

सौ. लिलावती धायातीलक : सभागृहात माईकव्दारे व्यवस्थित आवाज येत नाही. माईकची यापुढे व्यवस्था व्हावी.

मा. उप-महापौर : सभा अर्ध्या तासाठी (३०मिनिट) तहकुब करण्यांत येते.
(वेळ ३.३० वाजता सभा दुपारी ४.०५ वाजता सुरु)

श्री. अंबादास दानवे : आता विषय पत्रिकेवर चर्चा करावी. मागील महिण्याची ही सभा घेत आहोत.

**विषय क्र. ६३८/१** :

दिनांक १९-०६-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद

:(यानंतर सभागृहाचे कामकाज चालवण्यासाठी मा. महापौर हे आसन ग्रहन करतात)

श्री. शे. ईसाक जैनोद्दीन शे. : पान क्र. १८ वर विषय क्र. ६२७/९ हा विषय स्थगित ठेवण्यात यावा त्यास मंजुरी देऊ नये. सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही.

मा. महापौर : प्रस्ताव स्थागित ठेवलेला आहे मंजुर केलेला नाही. विषय क्र. १ ला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**ठराव** :

दिनांक १९-०६-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६३९/२** :

सहाय्यक संचालक नगररचना यांनी हस्तांतरीत विकास हक्का बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर केला आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे कडील मेमोरंडम क्र. DCR - १०९४/५२९/ CR १०२/९४ न.वि. ११ दि. २०-०४-१९९४ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेसाठी मंजुर केलेल्या विकास कार्य नियंत्रण नियमावलीत हस्तांतरणीय विकास हक्काची तरतुद करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर अधिनियम १९६६ चे कलम (३७) अन्वये गौण फेरबदल करणेबाबत सुचविले होते. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे प्रशासकीय ठराव क्र. ५७७ दि. ०३-१०-१९९४ नुसार मान्यता घेण्यात आलेली आहे. औरंगाबाद शहराच्या विकासाची गती विकासासाठी आवश्यक आलेली आर्थिक तरतुदत पाहता औरंगाबाद शहरासाठी हस्तांतरणी विकस हक्क याची अंमलबजावणी करणे अत्यंत उपयुक्त आहे. यामुळे औरंगाबाद महानगरपालिकाला भुसंपादनासाठी लागणारी रक्कम कमी लागेल. यामुळे विकास आराखडयातील आरक्षणाची जागा महानगरपालिकेस जे मिळकतधारक TDR चा फायदा घेतील त्यांचेकडुन TDR च्या मोबदल्यात विनामुल्य मिळणार आहे. वरील प्रशासकीय ठरावात नमुद केल्यानुसार औरंगाबाद मनपासाठी असलेल्या विकास कार्य नियंत्रण नियमावरील नविन नियम क्र. १४- अ समाविष्ट करणे आहे. ज्यामध्ये जमीनीचा वापर व विकास करण्यासाठी अवलंब करावयाची पध्दत (Labars and mamer of development) हस्तांतरणीय विकास हक्क (Transfer of davelopment Rights) संबंधी अपेडीक्स एन मध्ये एन-३ नंतर नविन नियम एन-४ व झोपडपट्टीचे पुर्ण विकासासंबंधी (Rerabilitation of Slum) तपशील आहे. तसेच टेबल एन च्या मध्ये नविन एन- ४ नंतर नियम एन-५ व वरील नियम एन-५ शी संलग्न अपेंडीक्स क्यु व अपेंडीक्स आर समाविष्ट करणे आहे. त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदल करण्याकरिता अधिसुचना स्थानिक वृत्तपत्र दैनिक सिटीझन व दैनिक लोकमत मध्ये दि. ०९-११-१९९४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २३ फेब्रुवारी १९९५ भाग १ च्या पुरवणीच्या पान क्रमांक २२८ ते ३४० व प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या कार्यवाहीनंतर सदर प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी पाठविण्याकरिता अंतिम मान्यतेस्तव मा. सर्वसाधारण

सभेपुढे दि. ३१-०५-१९९७ ठराव क्र. २७/२४ अन्वये ठेवण्यात आला असता सर्वसाधारण सभेने हा प्रस्ताव स्थागित ठेवला होता.

मा. उपसंचालक नगररचना औरंगाबाद विभाग यांचे कार्यालयात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद मनपासाठी T.D.R लागु करणे बाबत शासनाने अहवाल मागविला होता त्याप्रमाणे त्यांचे तर्फे व संचालक नगररचना पुणे यांचेमार्फे अहवाल शासनास पाठविण्यात आलेला आहे. त्याबाबत शासनस्तरावर निर्णय होऊन अधिकारी नियुक्त करुन कार्यवाही होणे बाकी आहे.

आता वरील प्रस्तावाबाबत इतर महानगरपालिकामध्ये होणाऱ्या कार्यवाही बाबत माहिती घेण्यात आली असुन त्यानुसार काही किरकोळ दुरुस्त्या करुन प्रस्ताव शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेसाठी मा. सर्वसाधारण सभेपुढे खालील प्रमाणे सादर करण्यांत येत आहे.

वरील १९९४ च्या ठरावामध्ये नमुद केलेल्या मुद्यात करावयाचे बदल.

अस्तित्वातील विकास नियंत्रण नियमावलीत अपेंडीक्स Q हा म्हाडाच्या गृहनिर्माण योजनेसाठी शिथीलतेचा नियमन आहे. तरी वरील नियम एन-४ साठी संलग्न अपेंडीक्स Q ऐवजी अपेंडीक्स अशी दुरुस्ती करण्यांस मान्यता आवश्यक आहे. तसेच औरंगाबाद शहराची सुधारीत प्रारुप असाधारण मंजुर करतांना महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण दि. २ मे २००१ मधील पृष्ठ क्र. २३ वर EP-१०८ व EP -१०९ मध्ये शासनाने औरंगाबाद शहरात विकास नियंत्रण नियमावलीत नविन नियम १४.५.३ Reguletioins for infrmation Technology Estabilshments साठी Reservations Appendix-R म्हटले असुन नविन नियम १४.५.३ Regulations for Accaodation Reservations -s म्हटले आहे त्यामुळे वरील मंजुर प्रशासकीय ठराव क्र. ५७७ दि. ०३-१०-१९९४ मधील प्रस्तावित विकास नियंत्रण नियमावलीतील नविन नियम क्र. १४-अ वगळता लागेल तसेच अपेंडीक्स नविन नियम एन-४ साठी संलग्न अपेंडीक्स Q ऐवजी T अशी दुरुस्ती करावी लागेल. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे Appendix Q-१४ ऐवजी T-१४-A व T-१४-B खालीलप्रमाणे दुरुस्त करुन समाविष्ट करण्यात येत आहे.

T-14-A DRXC Will be granted and Drcxsissued only after reserve land is surrendered authonty other wise to the stete govt. as the case may be, and free of Encumbrances, after the owner of lessee has levelled the land to sarroundiry ground have and after he has constructedu 1.50 m high compound wall or a hetght stipulated by the commissioner with gate And to make adequate provision for street lighting and for the WBM access road if required and in case of land atteded by D.P. Road awener of lessee has to level the road land with W.B.M. road sides stom.

Water gutter, and street light to the setisfaction of commissioner or the state Govt. (Where the corporation is not the approprtate authority) The cost ofany trarsaction prvolved shall be home by the owner or lessee.

T-14-B 1) Grant of TDR in case where lands are under acquistion office after 23 Fabruary 1995 i.e. The date of pablication containing TDR ment control regulation containing TDR concept, the TDR may be considered.

2) Possession of the land has been delivered whithout having received part of full compersation under either the M.R. and T.P. Act 1966,B.P.M.C. Act 1949 private negoation or by under any act for the time being in force within 92 years prior to 23 February 1995, the TDR may be considered.

त्याच बरोबर तुर्त झोपडपट्टीच्या पुर्ण विकास संबंधी (Renabiliation of slum) महानगरपालिकांकडुन जास्तीची माहिती उपलब्ध करुन घेऊन सदरील बाबतीत दुरुस्त

प्रस्ताव नंतर ठेवण्यात येईल. तुर्त हा विषय वगळुन प्रस्ताव शासन स्तरावर वरील दुरुस्ती होण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करत आहे.

सदर प्रशासकिय ठराव क्र. ५७७ दिनांक ३०-१०-१९९४ च्या प्रस्तावा संबंधाने नागरिकातर्फे कोणत्याही हरकती व सुचना प्राप्त झालेल्या नाही. अशा प्रकारे महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयाची कार्यवाही पुर्ण केलेली असुन सदर प्रस्तावात वर नमुद केल्याप्रमाणे काही किरकोळ दरुस्त्या करण्याचे मान्यतेस्तव व मान्यतेनंतर हा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्याचे मान्यतेस्तव प्रस्ताव माननीय सर्व साधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. अंबादास दानवे : हस्तांतरीत विकास हक्क बाबत प्रस्ताव ठेवलेला अत्यंत महत्वाचा प्रस्ताव असुन या प्रस्तावावर योग्य ती निर्णय घेण्यासाठी विशेष बैठक आयोजित करावी तसेच या प्रस्तावाच्या अनुषंगाने अधिक माहितीसाठी जो ५७७ क्रमांकांच्या प्रस्ताव सादर केला त्या प्रस्तावामध्ये इंग्रजी संवाद केलेला तो मराठीमध्ये अनुवाद करुन सविस्तर प्रस्ताव विशेष बैठकीत आणावा अशी सभागृहाच्या वतीने विनंती.

श्री. जगदीश सिध्द : हा प्रस्ताव १९९४ ला मंजुर होऊन आतापर्यंत का कार्यवाही केली नाही. या संदर्भात मी प्रशासनाकडे वेळोवेळी पत्र व्यवहार केला. त्या पत्राचे उत्तर सुध्दा मिळाले नाही. १९९४ पासुन आतापर्यंत प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही. हा प्रस्ताव शहर सुधार समितीकडे सादर करुन त्यानंतर सर्वसाधारण सभेत यावयास पाहिजे. म्हणुन या विषयावर चर्चा न होता शहर सुधार समितीकडे पाठविण्यात यावा.

श्री. अंबादास दानवे : स. सदस्य श्री. सिध्द यांनी जी सुचना केली ती योग्य असुन हा प्रस्ताव शहर सुधार समितीकडे पाठवुन त्या समितीने मंजुरी दिल्यानुसार प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे सादर होऊन सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. १९९७ मध्ये प्रशासकिय प्रस्ताव आलेला आहे. त्यास स्थगिती दिली आहे. आता नविन ठराव घेतो. प्रस्ताव इंग्रजीत आहे. मराठीत भाषांतर करुन पोहचले पाहिजे. शहराचे क्षेत्र मोठया प्रमाणात वाढलेले आहे. प्रस्तावांत फक्त अ.ब.क.ड.ई. असे ४ भाग केलेले आहे आणखी भागवाढविण्याची गरज आहे. शहर सुधार मार्फत प्रस्ताव येईल तेंव्हा ६ भाग करावे.

श्री. अफसर खान सौ. कुसुबाई खरात : स.सदस्य यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्द केले, त्यांना पुन्हा सभागृहात बोलविण्यात यावे, तशी त्यांचे वतीने दिलगिरी व्यक्त करण्यांत येते. (याचवेळी स.सदस्य मा. महापौर यांचे डायस समोर मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकावयास येत नाही)

मा. महापौर : ठिक आहे. स.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन स.सदस्य श्री. रगडे यांना पुन्हा सभागृहात येण्याची परवानगी देण्यांत येते. त्यांना सुरक्षा रक्षक यांनी सभागृहातच बोलवावे. सर्व स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. (सर्व सदस्य आपआपल्या जागेवर बसतात)

श्री. जबिदा दलविरसिंग : सन १९९४ ला प्रशासकीय ठराव मंजुर झाला त्यावेळी जाहिर प्रगटन दिलेले होते. आता शासनाने नियम बदलेले म्हणुन दुरुस्तीच प्रस्ताव

आलेला आहे. या प्रस्तावानुसार जाहिर प्रगटनाची कार्यवाही झालेली आहे का?

प्र.सहा.संचालक (न.र.) : जाहिर प्रगटनाची कार्यवाही झालेली आहे.

मा. महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन हा प्रस्ताव शहर सुधार समितीपुढे ठेवण्यात यावा. व त्या समितीने घेतलेला निर्णयाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावा. यासाठी विशेष बैठकीचे आयोजन करुन निर्णय घेण्यात येईल. तो पर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव शहर सुधार समिती मार्फत ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**संवाद**

श्री. घोडेले नंदकुमार : बऱ्याच वेळेस बैठकीत प्रश्नावर चर्चा करण्यासाठी वेळ जात नाही. अगोदर प्रश्नावर चर्चा करण्यांत यावी. एप्रिल पासुनचे प्रश्न प्रलंबित आहेत.

मा. महापौर : विषय संपल्यानंतर प्रश्नावर चर्चा करता येईल. सभागृहानेच वेळ निश्चित करुन प्रश्नावर चर्चा करण्यासाठी सुचवावे त्यानुसार चर्चा केली जाईल. प्रश्नावर चर्चा करण्यासाठी किती वेळ द्यावचा तसेच विषय पत्रिकेवरील प्रस्ताव व चर्चासाठी किती वेळ द्यायचा हा सभागृहानेच वेळ निश्चित करुन सुचवावयाचे असते.

श्री. नंदकुमार फुलारी : इतिवृत्तातील नगररचना विभागा अंतर्गत असेलेल्या विषयावर निर्णय घेण्यासाठी विशेष बैठक आयोजित करण्यात येईल. असे इतिवृत्तात आलेले आहे.

मा. महापौर : या विषयावर जनरल चर्चेत चर्चा करता येईल.

**विषय क्र. ६४०/३** :

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शासन निर्णय दिनांक ०३ जुन २००२ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेन स्वयंसेवी संस्था मार्फत चार लोक सेवा केंद्र कार्यान्वित करावयाचे आहेत.

विविध योजनांच्या माध्यमातुन औरंगाबाद मनपा हद्दीतील दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील बरोजगार युवक/युवतींना प्रशिक्षण देण्यांत येते. त्यांच्या प्रशिक्षणाचा लाभ समाजाला व्हावा आणि बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने सदर केंद्र कार्यरत असतील.

कार्यपध्दती प्रशिक्षित बेरोजगारांनी प्रथम लोकसेवा केंद्रात नांवे नोंदवावीत. या केंद्रात दुरध्वनी संच पुरविण्यात येईल. एखादया कुटुंबास विद्युत दुरुस्ती, फ्रिज दुरुस्ती, वायरमनची सेवा, सुतारकाम,प्लंबर, बांधकाम आणि तत्सम सेवा हवी असल्यास त्यांनी लोकसेवा केंद्रात दुरध्वीवर संपर्क साधुन प्रशिक्षित व्यक्तीची घरबसल्या सेवा उपलब्ध करुन घेऊ शकतात. या केंद्राचे स्थान खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

१. विभाग क्र. १ व २ साठी मनपा इमारत अंबर वाचनालय विभाग क्र. १ कार्यलयाजवळ
२. विभाग क्र. ३ मधील मनपाच्या समाज मंदिरात
३. विभाग क्र. ४ मधील मनपाच्या समाज मंदिरात
४. विभाग क्र. ५ मधील मनपाच्या समाज मंदिरात

नियम :

१. लाभार्थ्यांना दुरुस्तीचे साहित्य/अवजारांची पेटी योजनेच्या अनुदानातुन द्यावी. त्यासाठी रु. ६००/- मर्याद विचारात घ्यावी.

२. महानगरपालिकेच्या जागेत सुमारे १५x१५ चे बांधकाम योजनेच्या निर्कषास अधिन राहुन सेवा केंद्र स्थापन करण्यात यावीत. त्यामध्ये प्रशक्षित तरुणांना बसण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध असावी. उपलब्ध मंदिराचा वापर यासाठी करता येईल.

३. या लोकसेवा केंद्राच्या बांधकाचा खर्च व इतर अनुषंगिक खर्च अंदाजे रु. २ लाखापर्यंतच्या मर्यादित योजने अंतर्गत मुलभुत सोयीसाठी सहाय्य तसेच सामाजिक सरचना या घटका अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीमधुन भागविण्यात यावा असे शासनाचे आदेश आहेत.

४. लोकसेवा केंद्रासाठी आवश्यक असलेले फर्निचर व एक दुरध्वनी महानगरपालिकांनी मोफत पुरवावयाचा असुन त्यावरील आवर्ती अनावर्ती खर्च मनपाने स्वविधीतुन भागवावा.

५. समाज सेवा केंद्रांत नागरिकांसाठी सेवा तक्रार नोंद वही ठेवण्यात यावी.

६. सेवा केंद्रामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवाचे वाजवी दर समाज विकास संस्थानी/महानगरपालिकांनी निश्चित करावेत.

७. सेवा केंद्रावरील संबंधीत प्रशिक्षित लाभार्थ्यांची नांवे नोंदविणे ओळखपत्र देणे ही जबाबदारी महानगरपालिकेची असेल.

८. सेवा केंद्राची माहिती महानगरपालिकांनी सर्व नागरिकांना स्थानिक केबल टि.व्ही. व्दारे (लोकल टी.व्ही. चॅनल) माहिती देण्यांत यावी.

९. सेवा केंद्राच्या बाजुला दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या सुटया भागाचे दुकान योजने अंतर्गत लाभार्थ्यांसाठी उघडण्यात यावे.

१०. सेवा केंद्राच्या दुरुस्ती देखभालीची जबाबदारी महानगरपालिकेची राहिल.

११. सुडा/ ऊडाने महानगरपालिकेस समाजसेवा केंद्र स्थापन करण्यासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करुन द्यावा.

सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद

श्री. प्रशांत देसरडा : या संबंधी वृत्तपत्रात जाहिर प्रगटन दिले की, देणार आहे, खुलासा करावा.

मा. महापौर : प्रकल्प संचालक यांनी या प्रस्तावाबाबत सविस्तर खुलासा करावा.

प्रकल्प संचालक : प्रस्ताव सादर केल्यानुसार प्रस्तावित लोकसेवा केंद्र आहे. अद्यापपर्यंत कुठल्याही स्वयं संस्थेला दिले गेलेले नाही. जाहिरात काढुन स्वयंसेवी संस्थाना निमंत्रीत करणार आहोत. आणि ज्या स्वयंसेवी संस्थाच्या बाबतीत कमेटी निर्णय घेईल त्यांना देण्यांत येईल.

श्री. फुलारी नंदकुमार : महानगरपालिका हद्दीतील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांतील बेरोजगार युवक/युवतीसाठी ही योजना आहे. ज्या भागात दारिद्रय नाही त्या भागासाठी काय करणार आहे. सर्व सोयी सुविधा दारिद्रय रेषेखाली येणाऱ्यांनाच देणार का?

प्रकल्प संचालक : सदर योजना ही शासन प्रस्तावित असल्या मुळे शासन निर्णयानुसार हा प्रस्ताव सादर केलेला आहे. शासनाचे जे आदेश होते त्यानुसार सादर केलेला आहे.

डॉ. आशा बिनवडे : प्रस्ताव चांगला आहे. प्रस्ताव वाचल्यानंतर लक्षात येत नाही. स्वंयसेवी संस्था यामध्ये काय काम करणार आहे. भविष्यात तर सर्व कामे महानगरपालिकेस करुन द्यायची आहे. उदा. जागा देणे, फोन देणे, फर्निचर देणे ई. सर्व महानगरपालिका करणार स्वंयसेवी संस्था काय करणार समजले नाही. कुठलाही बोध होत नाही दारिद्रय रेषेखालील लोकांनाच देणार आहोत की, फक्त बेरोजगारांनाच देणार आहोत.

प्रकल्प संचालक : या योजनेचा लाभ फक्त दारिद्रय रेषेखालील कुटुंबालाच घेता येईल असे शासनाचे स्पष्ट आदेश आहे. दुसरे असे की, स्वयंसेवी संस्थेचा काय सहभाग आहे असा प्रश्न केलेला आहे. परंतु महानगरपालिका फनिर्चर पुरविणार असेल तरी शासकीय अनुदानातुनच देणार आहे. दुरध्वनी व्यवस्था होईल तो सुध्दा खर्च शासन अनुदानातुनच पुरविला जाईल. स्वयंसेवी संस्था एक रजिष्टर मेंटने करणार आहे. जे दरिद्रय रेषेखालील युक उदा. एकादा प्रशिशित युवक इलेक्ट्रीशियन आहे. त्याला काम मिळण्यासाठी नावाची नोंद होईल व त्यानुसार त्यालाच काम दिले जाईल ही जबाबदारी संस्थेवर राहणार आहे.

डॉ. आशा बिनवडे : हे काम साधा क लिपिक सुध्दा करु शकतात स्वयंसेवी संस्थेला देण्याची आवश्यकता नाही. शासनाकडुन अनुदान घेऊन सर्व महानगरपालिकाच करणार आहे तर देण्याची आवश्यकता नाही.

प्रकल्प संचालक : स्वंयसेवी संस्थेचा सहभाग वाढविण्यासाठी शासनाची ही योजना आहे. महानगरपालिकेवर काहीही आर्थिक बोजा पडणार नाही.

डॉ. आशा बिनवडे : स्वंयसेवी संस्थेला काय फायदा होणार आहे.

प्रकल्प संचालक : जो युवक एकादे काम करुन येईल तो ज्या दराने काम करुन येईल. त्यावर काही प्रमाणात टक्केवारी नुसार स्वंयसेवी सस्थेला फायदा होईल. किंवा तो युवक देऊ शकेल. म्हणजे या संस्था बेरोजगार युवकांनी स्थापन केलेल्या आहे. असा त्याचा अर्थ निघेल. व जेणे करुन त्या युवकांना काम मिळेल.

डॉ. आशा बिनवडे : यास अनुसरुनच दुसरा एक प्रश्न असा की, दारिद्रय रेषेखालील सुशिक्षित बेरोजगारांना प्रशिक्षित करायचे होते. त्यासाठी एकुण १३०० लोकांना प्रशिक्षीत करावे म्हणुन शासनाकडुन अनुदान मिळालेले आहे परंतु आतापर्यंत ५०० लोकांच्या वर प्रशिक्षित करु शकलो नाही. अशी माहिती संबंधीत अधिकारी यांनीच एकदा सभागृहात दिलेली होती. तर उर्वरित ७०० लोकांना प्रशिक्षित करणार आहोत किंवा या प्रशिक्षण देण्याच्या बाबतीत कमी प्रतिसादर का मिळाला आहे. या बाबतीत संबंधीत अधिकाऱ्यांनी काय अभ्यास केला या बाबतीत भविष्यात काय तरतुद करणार आहात. असा प्रश्न येतो. प्रशिक्षितच होत नाही तर अगोदरच त्यांच्या सेवेचा प्रश्न उपस्थित होता आहे हे बरोबर नाही १३०० पैकी ५०० लोकांना प्रशिक्षित केले उर्वरित लोकांना प्रशिक्षित करण्यासाठी काय करणार आहे खुलासा द्यावा.

प्रकल्प संचालक : शासनाने १३६५ लोकांना प्रशिक्षित करण्याबाबत उद्दीष्ट दिलेले होते. त्यापैकी ४८५ दारिद्रय रेषेखालील सुशिक्षित बेरोजगारांना आपण प्रशिक्षित केलेले आहे. या बाबतीत सर्व प्रयत्न या विभागाकडुन झालेले आहे. शहरात सर्वेक्षणाचे काम सुध्दा केलेले आहे संबंधीत नगर सेवकांना सुध्दा या

बाबतीत माहिती देऊन जास्तीत जास्त प्रशिक्षित युवक/युवती कसे होतील यासाठी प्रयत्न झालेले आहे त्यातुन ५०० अर्ज योग्य रितीने भरुन आलेले वैध ठरले व समितीने ही निवड केलेले असे ४८५ युवकांना गेल्या वर्षी प्रशिक्षित केलेले आहे. यावर्षीच्या प्रशिक्षणासाठी २ दिवसानंतरच जाहिर प्रगटन प्रसिध्द करणार आहोत. व १३६५ लोकांना प्रशिक्षण देण्याचे उद्दीष्ट आपण पुर्ण करणार आहोत. कमी प्रतिसाद मिळण्याचे कारण असे की, याच कालावधीत जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडुन विनामुल्य प्रशिक्षण दिले गेले. अण्णभाऊ साठे महामंडळ, महात्मा फुले विकास महामंडळ वसंतराव नाईक महामंडळ ई. प्रशिक्षण देण्यांत आले त्यांचे जाहिर प्रगटन याच कालावधीत आलेले होते. तसेच महात्मा फुले महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ असे अनेक महामंडळ प्रशिक्षण देत असतात त्यामुळे बरोजगार युवकांचा त्यावेळी प्रतिसात कमी मिळाला.

डॉ. आशा बिनवडे : याचा अर्थ प्रशिक्षण देणाऱ्या संस्था जास्त आहे. प्रशिक्षण घेणारे युवक कमी आहे. एकीकडे बेकारी जास्त आहे म्हटले जाते तर दुसरीकडे प्रशिक्षणासाठी प्रतिसाद मिळत नाही. अनुदानाचे काय करणार याबाबतीत शासनास कळविले आहे का. संबंधीत अधिकारी यांनी या बाबतीत अभ्यास केला का?

प्रकल्प संचालक : अनेक महामंडळे प्रशिक्षण देणे तसेच कर्ज देणेचे काम करतात १३६५ युवकांना प्रशिक्षण देण्याचे उद्दीष्ट पुर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहोत. वस्त्यामध्ये जाऊन परिपत्रक देऊन माहिती देणार आहोत. ए.सी.एन. वर जाहिर प्रगटन देऊन कार्यवाही करण्यांत येईल.

डॉ. आशा बिनवडे : आतापर्यंत खुप प्रयत्न केले प्रतिसाद मिळत नाही. यासाठी शासनाकडे अशी मागणी करावयास पाहिजे की, फक्त दारिद्रय रेषेखालील बेरोजगार युवकासाठी हे प्रशिक्षण न ठेवता सर्वच जे सुशिक्षित बेरोजगार आहेत त्यांना पण या योजनेच्या माध्यमातुन प्रशिक्षण देण्याची परवानगी द्यावी.

प्रकल्प संचालक : ही बाब केंद्र शासनाच्या आखत्यारातील आहे आणि केंद्र शासनाकडे कळविणे गरजेचे होईल.

श्री. फुलारी नंदकुमार : ज्या वार्डात दारिद्रय रेषेखाली युवक नाही अशा वार्डासाठी काय योजना आणणार आहे मा. महापौरांच्या वार्डात सुध्दा दारिद्रय रेषेखालील युवक नाहीत.

प्रकल्प अधिकारी : ही शासनाची योजना आहे, वार्डात प्रश्न येत नाही ज्या वार्डात दारिद्रय रेषेखालील युवक/युवती नाहीत अशा भागात ही योजना राबविता येणार नाही हे स्पष्ट आहे. शासनाने जे निर्देश घालुन दिले त्यानुसारच कार्यवाही करावी लागणार आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : ही योजना दारिद्रय रेषेखालील येणाऱ्या बेरोजगार युवकासाठी आहे, परंतु जे सुशिक्षित बेरोजगार आहे, त्यांचेसाठी काय करणार आहे. जे दारिद्रय रेषेखालील आहे परंतु शिक्षण घेतलेले असेल तर त्यांचेसाठी काय करणार.

प्रकल्प संचालक : एम.सी.ई.डी. नावाची संस्था आहे. त्या संस्थेमार्फत बेरोजगारांना मोफत प्रशिक्षण दिले जाते.

श्रीमती पार्वती मानकापे : सर्वसाधारण गटात जे सुशिक्षित बेरोजगार येतात त्यांचेसाठी अशा योजनेच्या माध्यमातुन प्रशिक्षण देण्याचा विचार करावा.

श्री. जयवंत ओक : जे प्रशिक्षण देणार आहेत त्यासाठी संपुर्ण वार्डातील दारिद्रय रेषेखालीयेणाऱ्या सुशिक्षित बेरोजगारांचा सर्वे केलेला आहे का? जो सर्वे केलेला आहे तो जिल्हाधिकारी यांचे कडील यादीनुसार आहे की, महानगरपालिकेने केलेला सर्वे आहे. आताच स. सदस्या आशा बिनवडे यांनी काही प्रश्न उपस्थित केले त्याची नोंद घेऊन काय माग्र काढता येईल. त्याबाबत कार्यवाही करावी. दारिद्रय रेषेखालील बेरोजगार युवक म्हणजे कोणत्याचे नॉमस् काय आहे. ज्याचेकडे टी.व्ही. पंखा, स्वतःचे घर नाही. असे युवक दारिद्रय रेषेखाली घेता येतील का? ज्याच्याकडे किंमती वस्तु नाही असा युवक हा गरिब आहेच असे म्हटले तरी चालेले हा ठराव पास होऊन कार्यवाही करण्यास वेळ असेल तसेच महानगरपालिकेमार्फत पुन्हा संपुर्ण वार्डाचा सर्व्हे होत असेल तर येत्या १५ दिवसात सर्व्हेचे काम करावे. नगरसेवक सुध्दा या बाबतीत प्रसिसाद देतील. जो दारिद्रय रेषेत येतो गरिब आहे. जाती पातीचा प्रश्न येत नाही. स्लमचे वेगळे व बाकीचे वेगळे.

प्रकल्प संचालक : १९९८ मध्ये विभागीय अधिकाऱ्यांच्या मार्फत महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी दारिद्रय रेषेखाली येणाऱ्या कुटुंबीयांचे सर्व्हेक्षणाचे काम केलेले आहे. ही यादी आपण मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केलेली आहे व त्यानुसार अशा युवकांना पिवळया रंगाचे रेशन कार्ड दिले व जे दारिद्रय रेषेखाली येतात, अशांचे कार्ड पुर्ण तपासणी करुन अशानाही पिवळया रंगाचे रेशनकार्ड दिलेले आहे. अशा कुटुंबातील युवक/युवतींना आपण प्रशिक्षण देत असतो. दोन-चार दिवसांत प्रशिक्षण देण्यासाठी बेरोजगार युवकाकडुन वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन अर्ज मागविणार आहोत. वेगवेगळया व्यवसायाच्या बाबतीत बेरोजगार युवकांना प्रशिक्षण देणार आहोत. त्या जाहिरातीची प्रत आपल्या माहितीस्तव प्रत्येक नगर सेवकांच्या घरपोज देणार आहोत. जेणे करुन जे वार्डात दारिद्रय रेषेखालील बेरोजगार युवक असतील त्यांना आपण या प्रशिक्षणासाठी पाठवु शकता.

श्री. जयवंत ओक : जर एखादा युवक दारिद्रय रेषेखाली येत असेल तर शिफारस केल्यानुसार यादीत समावेश करता येईल का?

प्रकल्प संचालक : एखादा युवक दारिद्रय रेषेखाली येत असेल व त्यांचे नांव यादीत नसेल तर नगर सेवकांनी शिफारस केल्यानुसार यादीत त्यांच्या नावाचा समावेश करता येईल.

धायातिलक लिलावती : दारिद्रय रेषेखालील येणारे युवक यांची यादी १९९८ ला तयार केली. परंतु वार्डात बऱ्याच दलीत वस्त्या आहेत. अत्यंत गरिब लोक आहे. पुन्हा एकदा सर्व्हे करुन यादी तयार करावी. दलित वस्तीत राहत असतील अशांसाठीच ही योजना राबाविण्याचे केंद्र शासनाने ठरविलेले आहे.

मा. महापौर : या ठिकाणी दलित वस्तीचा प्रश्न येत नाही जे कुटुंब दारिद्रय रेषेखाली येतील ते कोणत्याही जाती धर्माचे असु शकते. सन १९९८ च्या यादीत नांव नसेल तर स. सदस्यांनी नांवे सुचवावी त्यानुसार यादीत समावेश केला जाईल.

श्री. सावंत मधुकर : समाज कल्याण समिती स्थापत झालेली आहेत त्या समितीच्या माध्यमातुन हा प्रस्ताव ठेवण्यात यावयास पाहिजे.

मा. महापौर : महानगरपालिकेने नुकतीच गलिच्छ वस्ती निर्मलन घर बांधणी व समाज कल्याण समिती स्थापन केलेली आहे. त्या समितीर मार्फत हा प्रस्ताव सादर करण्यांत यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव हा गलिच्छ वस्ती निर्मुलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती मार्फत सादर करण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ६४१/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासन अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टी.पी.एस ३००१/१५९५/प्र.क्र.२७३/२००१ नवि-३० दिनांक २ जानेवारी २००२ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुळ मंजुर विकास आराखडयामध्ये क्रांतीचौक ते पैठणगेट (सिल्लेखाना चौराहा) १०० फुट रस्ता रुंदीकरणाबाबत आवश्यक तो बदल करण्यांत आलेला असुन सदर रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक जमीनीचे संपादन करणे, साईड ब्रिजचे काम करणे इत्यादीसाठी लागणारा रु. १.७७ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला जाणार उप सचिव, नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी पत्र क्र. /जी.ई.एन./१०२०००/९८३/प्र.क्र.५५/नवि-३४ दिनांक ३१-०१-२००२ अन्वये विचारणा केली आहे की, सदरील रस्त्यावर करण्यात येणाऱ्या साईड ब्रिजचे बांधकाम महानगरपालिकेकडुन करण्यात येणार आहे किंवा कसे याबाबतचा स्वंयस्पष्ट अहवाल मागविण्यात आला आहे.

सध्या औरंगाबाद शहरातील उड्डाण पुलाचे बांधकाम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडुन करण्यांत येत आहेत.

तरी क्रांतीचौक ते सिल्लेखान रस्त्यावरील साईड ब्रिजचे काम महानगरपालिकेतर्फे करण्यांत यावे यांचे धोरणात्मक निर्णयास्तव प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

संवाद

श्री. घडामोडे भगवान : सिडको हडकोची जनता पाण्यासाठी त्रस्त झालेली आहे. कोणतेही नियोजन पाण्याच्या बाबतीत नाही अगोदर या जनतेला वेळेवर व मुब्लक पाणी द्यावे नंतरच असे रस्त्याची, पुलाची कामे हाती घ्यावी. सभागृहाने या बाबतीत विचार करावा. स्थगित ठेवावे.

श्री. अंबादास दानवे : प्रस्तावावर योग्य तो निर्णय घ्यावा परंतु या प्रस्तावा संबंधीची थोडक्यात पार्श्वभुमी मी आपल्या निदर्शनास आणुन देऊ इच्छितो की, शासनाने एक पत्र देऊन हा रस्ता महानगरपालिकेने करावा किंवा रस्ते विकास महामंडळाकडुन करावा असे पत्र महानगरपालिकेस दिलेले आहे. दिनांक ०६-०१-१९७५ च्या मंजुर विकास आराखडयातील हा रस्ता आहे. या रस्त्यामध्ये ३३ मालमत्ता येत होत्या त्यापैकी ३२ मालमत्ता भुसंपादन विभागाने ऑक्वॉयर केलेल्या आहेत. फक्त एकच मालमत्ता आतापर्यंत ॲक्वायर झालेली नाही. या प्रकरणाच्या बाबतीत काही नागरिक तसेच संस्था न्यायालयात गेलेले आहेत. सन १९७५ च्या विकास आराखडयानुसार या रस्त्याचे काम व्हावे असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दि. ०८-०१-२००० रोजी दिलेले आहे. त्याची प्रत सुध्दा माझ्याकडे आजही उपलब्ध आहे. एक मालमत्ता ॲक्वॉयर करीत असतांना या महानगरपालिकेची कोणतीही

परवानगी न घेता, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (अ) अन्वये महाराष्ट्र शासनाने स्वतःहुन हा प्रस्ताव जनतेच्या सुचनेसाठी ठेवला होता. आज सुध्दा न्यायालयात प्रकरण चालु आहे व ३० एप्रिल २००० पर्यंत हा रस्ता पुर्ण करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी भुसंपादन खाते तसेच मा. जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले होते. हा रस्ता मुदतीपुर्ण न झाल्याने मा. जिल्हाधिकारी यांनी न्यायालयाचा अवमान केला असे माझे मत आहे. यानंतर मा. जिल्हा प्रशासनाने मा. आयुक्त यांना दिनांक २३-०३-२००१ रोजी पत्र देऊन सदर रस्त्याच्या बाजुला मस्जीद येते. त्या मस्जीदच्या बाजुला ३५ फुट रस्ता सर्क्युलर बांधावा व कलम ३७ खाली आराखडयात किरकोळ बदल करावे. व यासाठी सर्वसाधारण सभेचीर मान्यता जिल्हाधिकारी यांनी मागविलेली होती. व या रस्त्यासाठी रुपये १७७ कोटीची तरतुद सुध्दा केलेली होती. जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्रानुसार मा. आयुक्त यांनी या बाबतीत तत्कालीन महापौर डॉ. भागवत कराड यांना पत्र देऊन अशा पध्दतीचा ठराव मंजुर करुन पाठवण्याचे सुचविले होते. परंतु त्यांनी नकार दिला होता याबाबतीत मा. उच्च न्यायालयात सर्व परिस्थिती मांडलेली आहे. या संबंधी मी सुध्दा एक याचिका दाखल केलेली ही मी सुध्दा त्या भागाचा नगरसेवक या नात्याने,न्यालयाने सुध्दा अशा प्रकारच्या दुरुस्तीला जनतेचे सजेशन/ऑब्जेक्शन मागविण्याचे निर्देश दिले त्यानंतर जवळपास ९३७ लोकांचे तक्रारी आल्या की, अशा प्रकारचा रस्ता करु नये या बाजुने शासनाकडे गेलेली आहे उप संचालक नगर रचना यांनी तसा रिपोर्ट दिलेला आहे त्याची सुध्दा प्रत माझ्याकडे आहे म्हणुन ९३७ तक्रारी ची कोणतीही दखल शासनाने न घेता एक तर्की निर्णय या शहराच्या त्या भागातील नागरिकांवर लावलेला आहे. ३३ मालमत्ता भुसंपादन केल्या फक्त १ मालमत्तेचे असे मॉडिफिकेशन कायदयानुसार करता येत नाही. असे आवाहन न्यायालयात करण्यात आले होते सभागृहाच्या वतीने मा. महापौरांना या आयुक्तांना विनंती करते की, या प्रकरणाची न्यायालयात काय प्रक्रिया चालु आहे. सध्याची परिस्थिती काय आहे. यात मनपाने काय केले पाहिजे यावर निर्णय घेण्याऐवजी हा प्रस्ताव स्थगित ठेवावा व विधी सल्लागार यांचेकडुन सर्व माहिती मागवुन घ्यावी यात न्यायालयाचा अवमान होणार नाही या बाबतीत महानगरपालिकेने सुध्दा दखल घेणे गरजेचे आहे व माहिती घेऊन हा विषय पुन्हा सर्व साधारण सभेपुढे सादर करावा.

श्री. तकी हसनखान : १०० फुटाचा रस्ता होता. प्रकरण कोर्टात गेले त्यानंतर काम करण्यास स्थगिती झाली शासनाने सुध्दा ऑफिडेव्हीट दाखल केले आहे. ऑफिडेव्हीट दाखल झाल्यानंतर शासनाने स्वतःहुन निर्णय घेतला की, बाजुला ब्रिजचे काम करावे त्यावर १.७७ कोटी खर्च म्हणुन ठेवण्यात आलेले होते कोर्टात केस आहे शासनाने सुध्दा ऑफिडेव्हीट दाखल केले आहे. शासनाने या रस्त्यासाठी परवानगी दिली शासनास माडीफिकेशन करण्याचा हक्क आहे. शासनाच्या विरोधात महानगरपालिकेला जाता येणार नाही. तसा अधिकार नाही. ठरावानुसार ब्रिजचे काम महानगरपालिका करणार की, इतर यंत्रणाव्दारे करण्याऐवढेच विचारलेले विचारणा केलेली नाही. या व्यतिरिक्त काही नाही. यात उलट शासनाने मार्ग काढुन दिला. त्या बद्दल

अभिनंदन करावयास पाहिजे रस्ते विकास महामंडळाने करावे ही गोष्ट जुनी झाली म्हणुन प्रस्ताव स्थगित ठेवण्याची आवश्यकता नाही मंजुरी दयावी. व ब्रिजेच काम सुरु करावे. शासनाच्या विरोधात जाऊ नये कलम ३७ नुसार बदल करण्याचा शासनास अधिकार आहे. कोण करणार महानगरपालिका किंवा एजन्सी करणार स्थगितीची आवश्यकता नाही.

श्री. अफसरखान : ३२ मालमत्ता संपादीत केल्या या रस्त्यामध्ये मंदिर मज्जीद असेल तर तो भाग सोडुन इतर साईडचे काम करण्यास हरकत नाही कोणीही पक्ष मध्ये न आणता या रस्त्याच्या साईडला ब्रिजचे काम करावयाचे असुन या प्रस्तावास मंजुरी दयावी व काम त्वरीत सुरु करावे.

श्री. घडामोडे भगवान : या विषयानुसार काम करण्यास फार मोठी गुतागुत झालेली आहे. १९९५ च्या विकास आराखडयानुसार हा रस्ता केलेला आहे का? प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलेले आहे. शासनाने जो निर्णय ब्रिज करण्याच्या बाबतीत घेतला तो एकतर्फे निर्णय घेतलेला आहे, महानगरपालिकेचे मत घेतले नाही. या प्रकरणाची कायदेशीर बाबी तपासुनच निर्णय घेण्यात यावा तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा.

श्री. अफसरखान : शासनाने ब्रिज कराया संदर्भात निर्णय घेतलेला आहे. रस्ता कशा प्रकारे करणार कोण करणार या बाबतीत विचारलेले नाही. फक्त साईडचे ब्रिजचे काम महानगरपालिका करणार की, इतर यंत्रणेमार्फत करणार याबाबत विचारणा केलेली शासनाने निर्णय घेतलेला ठराव मंजुर करण्यात यावा.

मा. महापौर : न्यायालयात काय परिस्थिती आहे या बाबतीत स.सदस्यांनी सुचना केल्या त्यानुसार विधी सल्लागार यांचे कडुन माहिती घ्यावी लागेल. त्यानंतरच या सभागृहाला योग्य असा निर्णय घेता येईल सभागृहाने निर्णय घ्यायचा न्यालयाचा अवमान सुध्दा होऊ नये. असा निर्णय घ्यावा लागणार.

श्री. तकी हसनखान : शासनाने रस्त्याच्या साईडला ब्रिजच्या बाबतीत विचारणा केलेली. शासनाने निर्णय घेतलेला तो हे सभागृह डावलु शकत नाही प्रस्ताव मंजुर करावा. काम चालु करावे. शहराचाच विकास होण्यास मदत होईल.

मा.उपआयुक्त (प्र.) : प्र. विधी सल्लागार हे दोन प्रकरणाच्या बाबतीत दिल्ली येथे गेलेले आहे. ते आल्या नंतर या प्रकरणाची माहिती घेऊन सभागृहापुढे सादर करण्यांत येईल.

श्री. कोकाटे काशिनाथ : महानगरपालिकेचे विधी सल्लागार उप आयुक्त (श्री.कांबळे) हेच आहे त्यांना सर्व प्रकरणाची माहिती असावयास पाहिजे.

मा. महापौर : महानगरपालिकेचे पॅनल वरील जे वकील हे प्रकरण चालवित आहे. त्यांचेकडुन विधी सल्लागार यांनी सर्व माहिती लेखी स्वरुपात २/३ दिवसात घेऊन सभागृहापुढे सादर करावी. आज निर्णय घेता येणार नाही. कारण सभागृह सुध्दा अडचणीजत येऊ नये. म्हणुन सर्व माहिती सभागृहाला सादर करावी. त्यानंतर या प्रस्तावावर निर्णय घेण्यात येईल. तो पर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार असे ठरले की, हे प्रकरण न्यायालयात सुरु असल्याने विधी सल्लागारांनी न्यायालयीन प्रकरणांची संपुर्ण माहिती सभागृहापुढे सादर करावी.

त्यानंतर यावर निर्णय घेण्यात येईल. तो पर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६४२/५ :**

उप-आयुक्त (म.) महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करित आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेने ठराव क्र. २३५ दि. १६-०३-९९ अन्वये काही वस्तुवर जकात दरात कपात व काही वस्तुवर जकात दरवाढीचा प्रस्ताव पारित करुन दि. १४-०६-९९ च्या पत्रकान्वये शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. जकात कपात करणे बाबत प्रशासनातर्फे प्रस्ताव दिलेला नव्हता. प्रशासनाने दर वाढीचा प्रस्ताव दिला असता स्थायी समिती स सर्वसाधारण सभेने जकात कपातीचा निर्णय घेतलेला आहे सदर प्रस्तावातील जकात दर वाढीपासुन महानगरपालिकेस अत्यल्प उत्पन्न मिळणार होते. परंतु दर कपाती पासुन तुट मोठया प्रमाणात होणार होती व ही तुट भरुन काढण्यासाठी महानगरपालिकेकडे कोणतेही प्रयोजन नाही. हे उपरोलेखीत पत्रात नमुद करण्यांत आले होते. तथापी दि. २९-०४-२००२ राजपत्रात

खालील वस्तुवर जकात कपात करण्यांत आली आहे. याप्रमाणे कपात केल्यास वर्ष निहाय होणारे आर्थिक नुकसान दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | मालाचे वर्णन | प्रचलित दर | शासनाने मान्य केलेले दर | दर कपातीमुळे होणारे संभाष्य नुकसान. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ |
| १. | तांदुळ | १% | ०.२५% | ३२३५००० | ३५५८०० | ३९१४३५० | ४३०५७८५ |
| २. | तेलबिया | १% | ०.२५% | ५४०४४१६२ | ५९४४५७८ | ६५३९०३६ | ७१९२९४० |
| ३. | कापुस | १% | माफ | २१६५८७० | २३८२४२७ | २६२०७०३ | २८८२७७३ |
| ४. | लोखंड व पोलादाचे भंगार | २% | रु. ६०/- प्रतिटन | ५३४७१५० | ५८८१८६५ | ६४७००५२ | ७११७०५७ |
| ५. | सरकी | १% | ०.२५% | १०९५००० | १२०४५०० | १३२४९५० | १४५७४४५ |
| ६. | रासायनिक खते | १% | रु. २/- प्रतिटन | २५०८३०० | २७५९१३० | ३०३५०४३ | ३३३८५४७ |
| ७. | अवरिफाईड तेल | १% | ०.२५% | ३४२१८७५ | ३७६४०६३ | ४१४०४६९ | ४५५८५१६ |
| ८. | मोटारपार्ट | २.५% | १.५% | ३४३१००० | ३७७४१०० | ४१५१५१० | ४५६६६६१ |
| | एकुण | | | २६६०८३५७ | २९२६९१९३ | ३२१९६११३ | ३५४१५७२४ |
| | नुकसान | | | | | | |

सदर प्रस्तावासंदर्भात शासनाने दि. ३०-०८-९९ रोजीच्या पत्रान्वये विचारणा केली होतो. की, मजुरीसाठी पाठविलेल्या प्रस्तावर हरकती व सुचना मागविल्या होत्या का? तसेच सदरहु प्रस्तावावर आयुक्तांचा स्पष्ट अभिप्राय मागविण्यात आला होता. त्या अनुषंगाने महानगरपालिकेने २७-०८-९९ च्या पत्रान्वये सदर प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाल्यास महानगरपालिकेचे रुपये २.७३ कोटीचे (तत्कालीन स्थिती) आर्थिक नुकसान होणार आहे व होणाऱ्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडे कोणतही प्रयोजन नाही. असे स्पष्ट कळविण्यात आले होते.

महानगरपालिका ठराव क्र. २३५/९९ दि. १६-०३-९९ च्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिल्यास महानगरपालिकेचे रुपये. २.७३ कोटीचे नुकसान होईल ही बाब पुन्हा दि. १८-०९-९९ व ०३-०३-२००१ च्या पत्रान्वये शासनाच्या निदर्शनास आणुन देण्यांत आली होती. तथापी दि. २६-०४-२००२ रोजीच्यानिर्णयानुसार ठराव क्र. २३५ ला मान्यता दिली. व हा निर्णय शासनाने दि. २९-०४-२००२ च्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द केला.

औरंगाबाद शहराची दिवसेंदिवस झपाटयाने वाढ होत आहे, व त्यानुसार नागरिकांना सुखसोई व मुलभुत सुविधा पुरविणेसाठी सध्याचे उत्पन्नच कमी पडत आहे त्यातच जकात दर कपातीचा निर्णय अंमलात आल्यास महानगरपालिकेस सन २००२-२००३ या वित्तीय वर्षात रुपये ३.०० कोटीचे आर्थिक नुकसान होणार आहे. त्याचा परिणाम अर्थ संकल्पावर होऊन शहराच्या विकासावर होणार आहे.

करिता वरील सर्व बाबीचा विचार करता औरंगाबाद महानगरपालिकेस चालु आर्थिक वर्षात अंदाजे रु. ३.०० कोटीचे आर्थिक नुकसान होणार आहे व भविष्यातही सतत नुकसान होणार आहे. सदर बाब लक्षात घेता शासनाने सदरी प्रस्तावावर फेर विचार करुन महानगरपालिकेचे आर्थिक हित विचारात घेऊन दिनांक २६-०४-२००२ रोजी मंजुर केलेला व २९-०४-२००२ रोजी च्या राजपत्रात प्रसिध्द केलेला जकात दर कपातीचा प्रस्ताव फेरविचार करण्यासाठी दि. २२-०५-२००२ व ०६-०७-२००२ रोजी पत्र देऊन विनंती करण्यात आली आहे. उपरोल्लेखित पत्राचे अद्याप पर्यंत शासनाकडुन उत्तर आलेले नाही.

तरी प्रशासनातर्फे दि. २९-०४-२००२ च्या असाधारण राजपत्रात झालेल्या जकात दरवाढीच्या वस्तुवरील जकात वाढ अंशतः दि. २८-०६-२००२ पासुन लागु करण्यात आली आहे.

तसेच जकात दरकपातीच्या संदर्भात अंमलबजावणी करणे बाबत मे.आर.एल.स्टील्स, लि. या कंपनीने दि. ०८-०५-२००२ रोजी. मा. दिवाणी न्यायालयात दावा दाखल करुन लोखंड पोलाद व भंगार या मालावर रु. ६०/- प्र. टन या शासनाने मंजुर केलेल्या दरानुसार जकात आकारणी करावी. असे आदेश प्राप्त झाले. यावर विधी सल्लागार यांनी सदरील आदेशाची अंमलबजावणी करावी असा अभिप्राय दिला आहे. व जेष्ट विधीज्ञ श्री. दामोधर सोमन यांनी जोपर्यंत मा. जिल्हा न्यायालयात स्टे. ऑर्डर मिळत नाही. तापर्यंत रुपये. ६०/- प्र.मे.टन दराने जकात आकारणी करावी असा अभिप्राय दिला आहे. व जेष्ट विधीज्ञ श्री.दामोधर सोमन यांनी जोपर्यंत मा. जिल्हा न्यायालायात स्टे ऑर्डर मिळत नाही. तापर्यंत रुपये ६०/- प्र.मे.टन या दराने जकात आकारणी करावी असा अभिप्राय दिला आहे. परंतु दि. २०-०५-२००२ पर्यत हे दर लागु करण्यांत न आल्याने मे.आर.एल.स्टीलस् लि. तर्फे मा. न्यालयात अवमान याचिका दाखल करण्यांत आली आहे. त्यामुळे मा. न्यायलायाचा अवमान होऊ नये म्हणुन मा. जिल्हा न्यायालयात दाखल करण्यात आलेली याचिका दि. २२-०५-२००२ रोजी शासनास दर कपातीच्या प्रस्तावावर फेर विचार करण्याच्या पत्रास अधिन राहुन लोखंड, पोलाद व भंगार या मालावर शासनाचे आदेश व मा. न्यायालयाच्या आदेशानुसार तुर्त रु. ६०/- प्र.मे.टन या दराने आकारणी सुरु करण्यांत आली आहे. त्याच आदेशा सर्वसाधारण सभेत ज्या (३१) वस्तुमध्ये दर वाढ मान्य करण्यांत आली होती. ज्यास शासनाचीही मान्यता होती. त्याचीही दरवाढ महानगरपालिका, औरंगाबाद यांचे आर्थि हित लक्षात घेऊन अंमलात आणण्यात आली आहे.

करिता महानगरपालिकेच्या हितासाठी लोखंड व पोलादाचे भंगार या मालावर अस्तित्वातील २% दराने जकात कर वसुल करण्यात प्रस्तावास सर्वसाधारण सभेची मंजुरी घेऊन तसा ठराव शासनास मान्यतेस्तव पाठविण्यास व मा. जिल्हा न्यायालयात दाखल करता येईल आणि शासन निर्णय क्र. ए.एम.सी./१४९८/१७१९/प्र.क्र.१९६/९८/नवि - २४ दि.

२६-०४-२००२ अनुसार अनुसुची ओ मधील ॲटम क्र. १ ब, ४ व २१, ४ (नव्याने प्रस्तावित) ५८ अ, ६७ ब, ८५ अ, ७२ व ५ मध्ये दर्शविलेलया वस्तुवरील जकात दराचे कपात रद्द करण्यास सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. प्रशांत देसरडा : या संदर्भात व्यापारी असोशिएशनचे काही लोक न्यायालयात गेलेले आहे का? न्यायालयात प्रकरण प्रलंबीत आहे का? महानगरपालिकेवर गदा येईल याचा विचार करुन या प्रस्तावावर योग्य तो निर्णय व्हावा.

श्री. अफसखान : व्यापारी त्यांचे हितासाठी कार्यवाही करित आहे. २.७३ कोटीचे यात महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. व चालु आर्थिक वर्षात ३ कोटीचे नुकसान होत आहे. महानगरपालिकेला जास्तीत जास्त फायदा, उत्पन्न कसे मिळेल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. तरच या शहरातील जनतेला सोयी सुविधा विकास कामाच्या माध्यमातुन देता येईल म्हणुन जसा प्रस्ताव सादर झालेला आहे. तसाच मंजुर करावा.

श्री. शे.ईसाक शे. जैनोद्दीन : महानगरपालिकेचा फायदा बघावा ठराव क्र. २३५ अन्वये जकातीचे दर कमी करावे असे सुचविले आहे ते रद्द करावे.

श्री. सुदाम सोनवणे : हा प्रस्ताव महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे. महसुली उत्पन्न वाढविण्याचा आहे. सन १९९९ ला या सभागृहाने अर्थ संकल्पास मंजुरी दिली. लोखंड व पोलादचे भंगार यावार जकात कपात केली. व प्रस्तावित दरवाढ रद्द करुन रु. ६०/- प्रति टन अकारले म्हणुन वर्षाला सुमारेग ३ कोटी रुपये कमी होणार यामुळे आतापर्यंत किती नुकसान झाले. तसेच ज्या मालावर दर वाढविले. त्यामुळे किती फायदा झाला याचा खुलासा करावा.

मा. महापौर : जकात अधिक्षक यांनी सविस्तर खुलासा करावा.

जकात अधिक्षक : दिनांक १६-०३-९९ च्या सर्वसाधारण सभेत विषय क्र. २३५ नुसार ठराव पारित झाला त्यात काही वस्तुवर कपात करण्यांत आली. दरवाढीमुळे येणारे उत्पन्न रु. ६५ लाख व कपातीमुळे येणारे कमी उत्पन्न यामध्ये जवळपास २.७३ कोटीचे महानगरपालिकेच नुकसान होणार असे शासनास प्रशासनातर्फे कळविण्यात आलेले होते. चालु आर्थिक वर्षात ३.५४ कोटीचे नुकसान होणार आहे. यामध्ये सर्व प्रकारचे यात ९ ॲटम आहेत. तांदुळाची जकात १% वरुन ०.२५% करण्यात आली तेलबिया १% वरुन ०.२५% करण्यात आले.कापुस. १% वरुन ०.२५% तर लोखंड व पोलाद भंगार २% वरुन रु. प्रति टन ६०/- रु. तसेच रासायनिक खते १% वरुन रुपये २ प्रति टन मोटर पार्ट २.५% ऐवजी १.५% तसेच अनरिफाईन्ड १% वरुन रु. २५/- प्रति क्विंटल याप्रमाणे जकात दर आकारणीचा प्रस्ताव मंजुर झाला.

श्री. अ.कदीर मौलाना सय्यद : शहरात नागरिकांचे प्रश्न अनेक आहेत चिकलठाणा एन.आय.डी.सी. ५०% स्टी (पोलाद) इंडस्ट्रीज घसरली सन १९९०-९१ मध्ये रु. २०/- प्रति टन होतो नंतर ते २% वर आली त्यामुळे रुपये २०० प्रतिटन बोजा पडला आपणाकडे आज फक्त ३-४ इंडस्ट्रीज आहेत. बाहेरुन लोखंड येतो. महानगरपालिकेच हद्दीत आल्यावर रुपये २०० ते ३०० प्रतिटन

जनतेला सहन करावे लागते. स्कॅप किती येतो. रु. ६०/- प्रति टन प्रमाणेच ठेवण्यात यावे.

श्री. प्रशांत देसरडा : प्रस्ताव मंजुर केल्यानुसार शासनाने दरात मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार जकात दर लावावे किंवा काय हे योग्य तपासणी करुन कार्यवाही करावी. महानगरपालिकेने प्रस्तावित दर ठेवले तर नुकसान आहे. १% जकात लावतो म्हणुन जकात चुकवले जातो. इतर महानगरपालिकेत काय स्थिती आहे याबाबत माहिती घेऊन पुढील कार्यवाही करावी. महापालिकेचे नुकसान होईल असे एकही ठराव घेऊ नये.

मा. महापौर : शासन जी.आर. कोणत्या तारखेला प्राप्त झालेला होता.

जकात अधिक्षक : दिनांक २४ एप्रिल २००२ रोजी शासनाकडुन जी.आर.ची प्रत प्राप्त झालेली होती.

श्री. अफसरखान : प्रस्ताव जशाच्या तसा मंजुर करावा महानगरपालिकेचे हित लक्षात घ्यावे.

श्री. जगदिश सिध्द : प्रत्येक वस्तुच्या नगवाईज जकात आकारणी करण्याचा प्रस्ताव घेतलेला आहे. त्यानुसार अंमलबजावणी का होत नाही. उदा. शहरात नारळ किती आले, साबन किती आल्या यावर नगवाईज जकात आकारणी केल्यास मोठया प्रमाणात उत्पन्न मिळेल. याबाबत मी मागील एका स्थायी समितीच्या बैठकीत मुद्दा उपस्थित केलेला होता. प्रत्येक वस्तुवर दर वर्षाला किती जकात येते याची स्वतंत्र माहिती ठेवावयास पाहिजे. नारळ सुपारी हनुमान जवळ जेव्हढे फुटते तेव्हढीच आवक दाखविली जाते.

श्री. अंबादास : दिनांक १६-०३-९९ च्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुर केल्यानंतर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची आवश्यकता नव्हती. काही काही वस्तु जकात कमी करण्याची मान्यता होती तर काहीवर वाढ करण्याची मान्यता झालेली होती. यात महानगरपालिकेचे नुकसान होत असेल तर जशाच्या तसा प्रस्ताव मंजुर करावा. विधी सल्लागार यांचे मत घ्यावे व पुढील कार्यवाही करावी.

मा. महापौर : विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या सविस्तर चर्चेनुसार जकात दर वाढ आणि जकात दर कपात याच्या तुलनेत महानगरपालिकेचे दरवर्षी होणारे रुपये ३.०० कोटीचे आर्थिक नुकसान, यामुळे शहर विकासाच्या कामावर होणारा परिणाम विचारात घेता महानगरपालिकेच्या हितासाठी लोखंड व पोलादाचे भंगार या मालावर रुपये ६०/- प्र.मे.टन या दराऐवजी २% दराने जकात वसुल करण्यास आणि शासन निर्णय क्र. ए.एम.सी./१४१/१७१९/प्र.क्र. १९६/९८/नवि-२४ दि. २६-०४-२००२ अनुसार अनुसुचि ओ मधील ॲटम क्र. १ ब, ४ व २१,४ (नव्याने प्रस्तावित) ५८ अ, ६७ ब, ८५ अ, ७२ व ५ मध्ये दर्शविलेल्या वस्तुवरील जकात दराचे कपात रद्द करण्यास आणि शासनाच्या मान्यतेस्तव पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# "पुरवणी विषय"

**विषय क्र. ६४३/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सर्वसाधारण सभा दिनांक २०-१०-२००१ चे ठराव क्र. ५०९ अन्वये महाठवाडयाचे झुंजार नेते पोलादी पुरुष, दलित मित्र, स्वातंत्र सेनानी व जयभिम हे घोष वाक्य देणारे व मराठवाडा मुक्तीसंग्रमात भाग घेणारे सेनानी भाऊसाहेब मोरे याचा पुतळा कार्तिकी हॉटेल समोरील वाहतुक बेटात उभारण्यास मंजुरी झालेली आहे. परंतु तेथे बाळासाहेब पवार याचा पुतळा उभारण्यासही ठराव पारित झालेला असल्यामुळे आता भाऊसाहेब मोरे याचा पुतळा बसस्थानका लगत हायमास्टला लागुन असलेल्या ८X८ जागेत उभारण्यास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

सुचक : सौ. चंद्रभागाबाई दाणे
अनुमोदक : श्री. रतनकुमार पंडागळे.

संवाद

मा. महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यांत येत आहे शासनाची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. ५०९ दिनांक २०-१०-२००१ अन्वये मंजुरी मिळाल्यानुसार महाठवाडा मुक्ती संग्रामात भाग घेणार सेनानी भाऊसाहेब मोरे यांचा पुतळा कार्तिकी हॉटेल समोरील वाहतुक बेटाऐवजी मध्यवती बसस्थानगा लगत हायमास्ट शेजारी (८X८) जागेत उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४४/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, संपुर्ण सिडको-हडको परिसरातील नागरिकांना गेल्या एक वर्षापासुन एक दिवसांआड पाणी पुरवठा केला जातो व तसेच दर आठ ते दहा दिवसानंतर काहीही कारणे सागुन अडचणी दाखवुन नागरिकांना तीन ते चार दिवसांपर्यंत पाणी पुरवठा केला जात नाही. त्यामुळे संपुर्ण सिडको-हडको मधील नागरिकांना सगळयात जास्त त्रास सहन करावा लागतो आहे. ते फक्त पाण्यासाठीच शहरात मात्र दररोज नियमित पाणी पुरवठा केला जातो. त्या उलट सिडको-हाडको मधील नागरीकांना मात्र पाण्यासाठी मात्र १०० टक्के रस्त्यावर यावे लागते. पाणीपट्टी मात्र १०० टक्के वसुली पाणी मात्र फक्त २५ टक्के आहे. त्यासाठी सिडको-हडकोतील नागरिकांचे पाण्याचे बील सुध्दा पाण्याच्या प्रमाणात घ्यावे. व पाणीपट्टी अर्धी करावी करिता सभेत प्रस्ताव सादर.

सुचक : सौ. जयश्री मोरे
अनुमोदक : श्री. पांडुरंग तायडे, श्री. भाऊसाहेब ताठे

संवाद

श्री. अविनाश कुमावत : असे करता येणार नाही.

सौ. जयश्री मोरे : सिडको हडकोतील नागरिकांना १-१ दिवसाआड तसेच काहीवेळा ४ दिवसानंतर पाणी दिले जाते तेही वेळेवर नाही पाणीपट्टी मात्र १००% मागणी होते येथील भागातील नागरिकांना फक्त वर्षातुन ६ महिणेचे पाणी तेही भरपुर नाही म्हणुन या भागातील नागरिकावर फक्त ६ महिण्याचीच पाणीपट्टी आकारणी करावी.

श्री. भाऊसाहेब ताठे : या भागातील नागरिक वेळेवर पाणी पट्टी भरतात वसुली जास्त प्रमाणात आहे, परंतु पुर्ण वर्ष पाणी न देता १-१ दिवसाआड पाणी देऊन फक्त ६ महिणेच पाणी पुरवठा केला जातो. म्हणुन या नागरीकांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय होऊ नये. म्हणुन ६ महिण्याचीच पाणीपट्टी रु. ६००/- आकारावी.

श्री. पांडुरंग तायडे : सिडको-हडको भागात गेल्या अनेक दिवसापासुन पाण्याची टंचाई आहे. १ दिवसाआड पाणी येते. ते ही मुबलक नाही. कमी दाबाने पाणी येते म्हणुन या भागतील जनतेला ६ महिण्याची रु. ६००/- पाणीपट्टी आकारण्यात यावी.

श्री. घडमोडे भगवान : पाणी प्रश्न हा प्रत्येक नागरिकांचा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. प्रस्ताव अत्यंत महत्वाचा तसेच गंभीर स्वरुपाचा आहे. ६ महिने पाणी दिले जाते. परंतु वर्षा भराची पाणीपट्टी आकारणी होते. उलट मागील व चालु रक्कमेवर व्याज आकारणी होत आहे. त्यामुळे तेथील जनता अधिक संतप्त झालेली म्हणुन या भागातील जनतेला फक्त ६ महिण्याचीच रु. ६००/- पाणीपट्टी आकारुन आकारण्यात येणारे व्याज पाणी रद्द करावे.

श्री. भाऊसाहेब ताठे : या भागातील जनतेला दररोज पाणी दिले तर पुर्ण वर्षाची पाणीपट्टी भरण्यास तयार आहे. पाणी द्यावे पुर्ण पाणीपट्टी घ्यावी. अशाी आमची सुचना आहे.

मा. महापौर : सिडको-हडको वासीयांसाठी महानगरपालिकेने एक्स्पेस लाईनचे काम सुरु केलेले आहे. फेब्रुवारी २००३ पर्यत काम पुर्ण होईल. त्या नंतर या भागातील जनतेला मुबलक पाणी देण्याची कार्यवाही होईल. वसुलीच्या बाबतीत बजेट मध्ये ५-१० कोटी उद्दीष्ट ठेवले आहे.

श्री. सोनवणे सुदाम : या भागातील जनतेला १ ते दिड वर्षापासुन पाण्याचा त्रास आहे वेळेवर पाणी येत नाही. व ४-४ दिवसाआड पाणी दिले जाते. या भागात शहरातील पाणी कमी करुन जास्तीचा पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेतला होता. जेणे करुन सर्वच नागरिकांना समान पाणी मिळेल. १ दिवसांआड पाणी देण्यांत येईल परंतु भरपुर पाणी देण्यात येईल असा निर्णय झाला होता. परंतु १-१ दिवसाआड सुध्दा पाणी येत नाही. ६ महिण्यापेक्षा सुध्दा कमी पाणी दिले जाते. म्हणुन १२००/- आकारणी होते तर सिडको-हडको भागात फक्त ६ महिणेच पाणी दिले जाते म्हणुन ६००/- पाणीपट्टी आकारणी करावी. किंवा जे व्याज आकारणी होते ते रद्द करण्याचा निर्णय घेण्यात यावा व दररोज यापुढे पाणी देण्याचा निर्णय घ्यावा.

सौ. धायातिलक लिलावती : पाणी प्रश्नावर अनेक वेळा बेठक झाल्या निर्णय घेतले परंतु अंमलबजावणी होत नाही. या वार्डातील हातपंप चालु करण्याबाबत दोन वेळापत्र दिले अद्याप दुरुस्त झालेले नाही. पावसाळयाचे दिवस आहे. साफ-सफाई व्यवस्थित होत नाही. व पाणी पुरवठाही व्यवस्थिती होत नाही.

प्र.कार्य अभियंता (पा.पु.) : स.सदस्या सौ. धायातिलक यांनी पत्र दिल्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. निविदा काढलेल्या आहे. लवकरच कार्यवाही होईल.

मा. महापौर : स. सदस्या सौ. धायातिलक यांचे वॉर्डातील हातपंपाचे दुरुस्तीचे काम त्वरीत करावे. तसेच सभागृहाच्या भावना लक्षात घेता सिडको-हडको भागातील जनतेला दररोज पाणी पुरवठा कसा करता येईल यासाठी संबंधीत अधिकारी यांनी प्रयत्न करावे.

श्री. कोकाटे काशिनाथ : जनतेची पाण्यासाठी सतत मागणी होते. परंतु महानगरपालिके तर्फे पाण्याचे योग्य नियोजन होत नाही. सिडको-हडको भागात एक दिवसाआड पाणी देण्यांत येते. सिडको-हडको भागात फक्त ६ महिनेच पाणी दिले जाते म्हणुन ६००/- रु. पाणीपट्टी आकारणी व्याज वेळेवर व दररोज देणार नाही उलट थकीत रक्कमेवर व्याज आकारणी करणार हे अन्याय कारक आहे. दररोज पाणी द्यावे पुर्ण पाणीपट्टी घ्यावी. या भागातील जनतेला २४००/- रुपये पाणीपट्टी येते. छावणी भागात दररोज पाणी दिले जाते. परंतु तेथे फक्त ७००/- रु. दरवर्षाची पाणीपट्टी आकारली जाते.

मा. महापौर : व्याज आकरणी केव्हापासुन करण्यांत येण आहे.

प्र.कार्य अभियंता (पा.पु) : चालु वर्षापासुन पाणीपट्टीवर व्याज आकारणी होत आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : जनतेला मालमत्ता करावर तसेच पाणीपट्टी थकीत बिलावर व्याज आकारणी होत आहे. पाणी भरपुर व दररोज देण्यांत येत नाही व उलट रक्कमेवर व्याज आकारणी करणे बरोबर नाही.

श्री. नंदकुमार फुलारी : एक तर दररोज पाणी द्यावे नसता १ दिवसाआड पाणी द्यायचे असेल तर थकीत पाणीपट्टीवर सिडको-हडको वासीयांच्या रक्कमेवर व्याज आकारणी करु नये.

श्रीमती जयश्री किवळेकर : जवळपास १ वर्षापासुन या भागातील नागरिकांना मोठया प्रमाणात पाण्याचा त्रास होत आहे, व पाणी पुरेपुर देत नाही. १ दिवसाआड पाणी दिले जाते. याचा अर्थ ६ महिणेच पाणी दिले जाते. म्हणुन ६००/- रुपये पाणीपट्टी आकारणी होते, ती सुध्दा रद्द करावी येथील जनतेवर दोन्ही बाजुने अन्यायच होत आहे. एक्स्प्रेस लाईनचे काम होईल तेव्हा होईल. सध्या तरी १८० दिवसांची पाणीपट्टी आकारणी.

श्री. अविनाश कुमावत : पुर्ण वर्षासाठी १२००/- रुपये पाणी पट्टी आकारणी होते. या भागात १-१ दिवसाआड पाणी दिले जात असेल तर ६ महिनेच पाणी दिले जाते. हा विषय मंजुर करणार असाल तर पुंडलिकनगर न्यायानगर यांना पण कमी करावे.

सौ. जयश्री कुलकर्णी : दररोज या भागात पाणी द्यावे नसता रु. ६००/- पाणीपट्टी आकारणी करावे ६ महिनेच पाणी दिले जाते. व्याज आकारणी करु नये.

सौ. जयवंत ओक : सिडको-हडको वासीयांना पाणी देण्या संदर्भात गंभीर व नागरिकांचा जिव्हाळयाच्या प्रश्नावर महत्वपुर्ण चर्चा होत आहे, १-१ दिवसाआड पाणी दिले जाते तर ६ महिण्यांचीच पाणीपट्टी आकारणी व्हावी ६००/- रु. आकारावे कोणत्याही नागरिकांवर अन्याय होऊ नये नसता जनता कर भरणार नाही. शहरात १-१ दिवसाआड पाणी देत असेल तर तेथे सुध्दा ६००/- रुपये पाणी पट्टी आकारावी.

मा. महापौर : ६००/- रुपये पाणी पट्टी आकारणी बजेट नुसार किती रक्कम कमी येईल. खुलासा द्यावा.

प्र.कार्य.अभियंता (पा.पु) : सिडको हडकोतील नागरिकांना ६ महिण्याचीच पाणीपट्टी आकारणी केल्यास ६-७ कोटी रु. कमी वसुली होईल.

मा. महापौर : जी तुट येणार ती कोठुन भरुन काढायची असा प्रश्न येणार आहे. तुर्त तरी हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे. या भागातील नागरिकांना दररोज पाणी पुरवठा करण्यात यावा.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास व सिडको-हडको भागातील नागरिकांना दररोज पाणी पुरवठा करण्यांस सर्वानुमते मंजुर देण्यात आली.

**विषय क्र. ६४५/३ :**

डॉ बाबासाहेब आंबेडकर शालेय गणवेश योजने अंतर्गत मनपाच्या शाळामध्ये शिकत असलेलया विदयार्थ्यांना एक गणवेश देण्यांत येतो मनपाच्या शाळांमध्ये शिकणारी मुले ही आर्थिक दृष्टया कमकुवत घटकातील असतात. त्यांना दरवर्षी दोन गणवेश देण्यांत यावेत. करिता शालेय विदयार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश देण्यासंबंधीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री. रतनकुमार पंडागळे
अनुमोदक : श्री. प्रकाश निकाळजे

संवाद

श्री. सोनवणे सुदाम : सुचक,अनुमोदक यांचे अभिनंदन १५ ऑगस्ट या स्वातंत्र्य दिना निमित्ताने महानगरपालिकेतील शालेय मुलाना गणवेश देतो. ४० लक्षाची तरतुद आहे. १ ऐवजी २ गणवेश दिल्यास मुलांची परिस्थिती सुधारेल. त्याचप्रमाणे पुस्तकाचे सुध्दा वाटप होते. परंतु वेळेवर दिले जात नाही. त्यासाठी शाळा जुन मध्ये सुरु होतात. तेव्हाच सुरुवातीला पुस्तकाचे वाटप करण्यांत यावे.

श्री. पंडागळे रतनकुमार : महानगरपालिके मार्फत सर्वशालेय विद्यार्थ्यासाठी आरोग्य तपासणी शिबिर वेळोवेळी आयोजित केले गेले पाहिजे. व १५ ऑगस्ट पुर्वी गणवेश द्यावे.

मा. महापौर : स.सदस्य श्री. सुदाम सोनवणे यांनी सुचना केल्यानुसार प्रशासनाने या बाबतीत दखल घेऊन कार्यवाही करावी.

डॉ. आशा बिनवडे : एकच गणवेश सध्या दिले जातो तोही वेळेवर देत नाही तर दोन गणवेश कोठुन व केंव्हा देणार आहे. येत्या १५ ऑगस्टसाठी गणवेश वाटप झाले का?

मुख्यलेखाधिकारी : १५ ऑगस्ट पुर्वी म्हणजेच उद्यापासुन प्रत्येक शाळेत गणवेश वाटप सुरु होणार आहे. १५ ऑगस्टपुर्वी सर्वांना गणवेश मिळेल.

मा. महापौर : प्रस्तावानुसार ज्या सुचना केल्या व जो प्रस्ताव सभापती यांनी माडला अत्यंत चांगला प्रस्ताव आहे त्याबद्दल सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन करतो. मुलांना जुनच्या सुरुवातीसच पुस्तके देण्यात यावी. तसेच १५ ऑगस्ट पुर्वी एक

गणवेश व दुसरा गणवेश चालु वर्षी पासुन देण्यांत यावे. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या पुर्वी देण्यांत यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभगृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेच्या शाळामध्ये शिकणारी मुले ही आर्थिक दृष्या कमकुवत घटकातील असतात म्हणुन डॉ बाबासाहेब आंबेडकर शालेय गणवेश योजने अंतर्गत महानगरपालिकेच्या शाळामध्ये शिकणाऱ्या विदयार्थ्यांना दरवर्षी प्रत्येकी दोन गणवेश देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते सन २००२-२००३ या वर्षाकरिता एक गणवेशाचे वाटप करण्यात आले असुन दुसरा गणेवश देण्याकरिता त्वरीत कार्यवाही करावी व या अर्थिक वर्षापासुनच दोन गणवेश देण्यात यावेत. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४६/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बुध्दवासी भाऊसाहेब मोरे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे सहकारी होते. मराठवाडयात त्यांनी दलित जनतेमध्ये जागरुकता निर्माण करण्याचे खुप मोठे कार्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चळवळीमध्ये त्यांनी वर्ग-१ ची शासकीय सेवा सोडुन स्वतःला झोकुन दिले होते. खेडोपाडी पायी फिरुन त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ सर्व सामान्य माणसापर्यंत पोहचविण्याचे कार्य केले आहे. मकरंदपुर येथे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सभा आयोजीत केली होती.

त्यांनी केलेल्या कार्याचा यशोचित गौरव करण्याच्या हेतुने लक्ष्मी कॉलनी येथील चौकास त्यांचे नांव देण्यात यावे.

सुचक : श्री. सुनिल यादवराव मगरे
अनुमोदक : श्री. गणेश रामचंद्र तांबे

मा. महापौर : प्रस्ताव नामांतर कमेटीकडे पाठविण्यांत यावा.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव नामांतर कमेटीकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ६४७/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या बालवाडी शिक्षिका ज्यांचेकडे आवश्यक शैक्षणिक पात्रता आहे. अशा बालवाडी शिक्षिकांना शासकीय डी.एड. प्रशिक्षणासाठी पाठविण्यात यावे. त्यासाठी दर वर्षी शासनाने किमान १५ टक्के पदे आरक्षित करावे यासाठी प्रस्ताव मान्य करुन शासनाकडे पाठविण्यांत यावा.

सुचक : श्री. रतनकुमार पंडागळे, श्री. प्रकाश निकाळजे.
अनुमोदक : सौ. चंद्रभागाबाई दाणे

मा. महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यांत येत आहे. शासनाकडे पाठविण्यांत यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या बालवाडी शिक्षिका ज्यांचेकडे आवश्यक शैक्षणिक पात्रता आहे. अशा बालवाडी शिक्षिकांना शासकीय डी.एड. प्रशिक्षणासाठी पाठविण्यास व त्यासाठी दर वर्षी शासनाने किमान १५% पदे आरक्षित करण्यांस तसेच सदरील प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद** :

श्री. अ.कदीर मौलाना सय्यद : इंदिरानगर बायजीपुरा वार्डात अडीच वर्षापासुन विकास कामे नाही. माहिती विचारली असता गोलमोल उत्तर दिले जाते अडीच वर्षापासुन पुष्कळवेळा पत्र दिले अनेकवेळा अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या या भागात एका जामिनीचा वाद आहे. न्यायालयाचा स्थगिती आदेश आहे. स्थगिती आदेश कोणत्या क्षेत्रासाठी आहे कशा प्रकारे आहे याचे उत्तर दिले जात नाही. फक्त स्थगित आदेश आहे असे दाखविले जाते. वार्डात गल्ली क्र. ५ मध्ये ३ ते ४ फुट कचऱ्याचे ढिगारे त्याखाली ड्रेनेज लाईन आहे. कचरा काढणे गरजेचे आहे. सार्वत्रिक निवडणुक पासुन म्हणजेच अडीच वर्षापासुन स्थगिती आदेश आहे का? पुर्ण वार्डातच काम करता येत नाही का? खुलासा करावा.

प्र.कार्य. अभियंता (ड्रेनेज) : इंदिरानगर (दक्षिण) बाजुला न्यायालयाचे स्थगिती आदेश आहे. त्यामुळे विकास कामे करता येत नाही. दिनांक ०१-०२-२००० ला तसे पत्र आलेले आहे.

श्री. अ.कदीर मौलाना सय्यद : स्थगिती आदेश दुसऱ्या जागेवर आहे. ज्या ठिकाणी अगोदर कामे झालेली आहे त्या जागेला स्थगिती आहे का? नविन कामावर की, जुन्या कामावर.

प्र.कार्य.अभियंता (ड्रेनेज) : स्थगिता आदेश माझ्याकडे नाही. विधी सल्लागार यांचेकडुन मागवुन घेतले जातील. ४-५ संचिकेवर स्थगिती आहे असे लिहिले आहे. त्यामुळे काम झालेले नाही. स्थगिती आदेश कोणत्या भागासाठी आहे, त्याची प्रत मागवुन घेऊन पुढील कार्यवाही होईल.

श्री. अ.कदीर मौलाना सय्यद : जो खुलासा केला तो मला मान्य नाही न्यायालयाचे स्थगिती आदेश कोठे आहे. स्थगिती आदेश कॉव्हेकेट होत नाही. १० ते १५ वर्षापासुन वार्डात कामे होत आलेली आहे. आताच कसे बंद करु शकतो. महानगरपालिकेतील २० ते २५ पोलिस कशासाठी आहे. उत्तर भागात काम करावे. स्थगिती आदेश कोणत्या जुन्या की नविन कामासाठी आहे नविन कामासाठी स्थगिती असेल तर तेव्हढी जागा सोडता येईल.

प्र. कार्य. अभियंता (ड्रेनेज) : कामाच्या बाबतीत संचिका मंजुर आहे. स्थगिती आदेशामुळे काम करता येत नाही.

मा. महापौर : विधी सल्लागार सध्या येथे नाही ते आल्यावर ज्या जागेवर स्थागिती आदेश नाही अशा जागेवर काम प्रस्तावित केलेले असेल तर ते काम तात्काळ करण्यात यावे.

श्री. अ.कदीर मौलाना सय्यद : यापुर्वी जागा मालकास महानगरपालिकेने पैसे दिले. न्यायालयात प्रकरण गेल्यानंतर महानगरपालिकेने काहीच कार्यवाही का केली नाही.

मा. महापौर : संबंधीत व्यक्तीत मा. आयुक्तांनी चर्चेस बोलवावे.

श्री. अ.कदीर मौलाना सय्यद : महानगरपालिका प्रशासनाला कोणत्याही बाबतीत खऱ्या अर्थाने काळजी नाही. आतापर्यंत १००-२०० पत्र दिले आयुक्तांना सुध्दा पत्र दिले त्याचे साधे उत्तर सुध्दा नाही.

श्री. कोकाटे काशिनाथ : एका भागात विकास होतो तर एका भागात नाही स.सदस्य श्री. कदीर मौलाना यांनी केलेली सुचना प्रशासनाने गांभीर्याने घेऊन जातीने लक्ष देऊन विधी सल्लागार यांचे कडुन माहिती घेऊन त्या भागात काम कसे करता येईल यासाठी प्रयत्न करावे.

मा. महापौर संबंधीत व्यक्तीस मा. आयुक्तांच्या चर्चेस बोलवावे काम कसे करता येईल. तसे प्रयत्न प्रशासनाने करावे.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | महापौर, |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १९-०८-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सोमवार दि. १९-०८-२००२ रोजी मा. महापौर श्री. विकास जैन यांचे अध्यक्षते खाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी १२.४० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली.सभेला संबंधीत अधिकारी तसेच खाली प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
५) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद
७) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१०) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
११) स.स.श्रीमती धायातिलक लिलावती बाळासाहेब
१२) स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१३) स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१४) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१५) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
१६) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१७) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
१८) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
१९) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२०) स.स.ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२१) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२२) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२३) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२४) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२५) स.स.श्री. नजर हमीद अ. गफुर
२६) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार
२७) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२८) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
२९) स.स.श्री. डॉ. कराड भागवत किसनराव
३०) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३१) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३२) स.स.श्री. शिंदे किशारे रावसाहेब
३३) स.स.श्री. नासेरखाँन सरदार खाँन

३४) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक
३५) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३६) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३७) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुडलिक
३८) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
३९) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४०) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४१) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४२) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
४३) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४४) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
४५) स.स.सौ. संगिता बाळु मेंद
४६) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
४७) स.स.श्री. नासेरखॉन अ. रहेमानखॉन
४८) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
४९) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५०) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५१) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५२) स.स.श्री. स.सलीम स. युसुफ
५३) स.स.श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
५४) स.स.श्री. गाजी सादोद्दीन गाजी जहिर अहेमद
५५) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५६) स.स.सौ. सिद्दीकी नईम सुलताना सिद्दीकी फसियोद्दीन
५७) स.स.श्री. शेख ईसाक शेख जैनोद्दीन
५८) स.स.सौ. सुलतान बेगम चाँदखॉ
५९) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६०) स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
६१) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६२) स.स.श्री. स.अली सलामी स. मीरा सलामी
६३) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज

# स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
३) स.स.सौ. सलमा बानो मीर महमंद अली.

संवाद

श्री. कोकाटे काशिनाथ : मागील बैठकीत स.सदस्य श्री. रगडे यांनी येथील कचऱ्यांची विल्हेवाट लावण्या संबंधीची सुचना मांडली होती. जनतेच्या आरोग्याचे

दृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे. त्यावर आजच निर्णय घेण्यात यावा. तरच इतर विषयावर चर्चा करावी.

मा. महापौर : मागील बैठकीत चर्चा झाल्यानुसार प्रत्यक्ष खत निर्मितीच्या प्रकल्पास भेट देण्यांत येईल. अगोदर विषय पत्रिकेवर चर्चा करावी. सभा संपल्यानंतर किंवा सभा तहकुब करुन सर्व पदाधिकाऱ्यां समवेत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यांत येईल. ठोस निर्णय घेण्यांत येईल.

**विषय क्र. ६४८/१** :

कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जायकवाडी उद्‌भव येथील सन १९७४ मध्ये योजना कार्यान्वीत करतांना बसविण्यांत आलेल्या पंपींग मशिनरी २७ वर्षापेक्षा जास्त कालावधीची सेवा दिलेली आहे. विद्युत मशिनरीचे व पंपाचे अंदाजीत आयुष्यमान हे १५ वर्षाचे असते. सदरील पंप जास्त सेवा दिल्याने त्याची कार्यक्षमता कमी झाली असुन त्यात वारंवार बिघाड होत आहे. त्यामुळे पाणी पुरवठेत व्यत्यय येत असतो. करिता या पंपींग स्टेशन वरील (जुना जायकवाडी येथे) ४०० अ.श.पंप मोटर व इतर उपकरणे बदलण्याचे प्रस्ताव सादर केला आहे.

जुना जायकवाडी येथे ४०० अ.श. वाटर लुब्रीकेटेड पंपाचा व इतर मशिनरीचा पुरवठा करुन त्यांची उभारणी करणे व त्याची चाचणी देणे यासाठी अधिकृत विक्रेते/उत्पादक व काही बाबी महाराष्ट्र जविन प्राधिकरण मंडळाच्या (यां/वि) २०००-२००१ या दरसुची वरुन रु. ३९,११,७९०/- एवढया किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

सदरील कामासाठी सन २००२-२००३ या आर्थिक वर्षात नविन पंप खरेदी व वॉल्व असेंब्लीची दुरुस्ती करणे या शिर्षकाखाली रु. ४० लाखाची तरतुद करण्यांत आलेली आहे. या तरतुदीतुन हा खर्च करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रुपये ३९,११,७९०/- च्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

मा. महापौर : विषय सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जायकवाडी उद्‌भव येथील पंपींग स्टेशन वरील (जुना जायकवाडी येथे) ४०० अ.श.पंप मोटर व इतर उपकरणे बदलण्याचे व उभारणी करण्यासाठी तयार केलेले रक्कम रुपये ३९,११,७९०/- चे अंदाजपत्रकास आणि सन २००२-२००३ या आर्थिक वर्षात नविन पंप खरेदी व वॉल्व असेंब्लीची दुरुस्ती करणे या लेखा शिर्षतुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४९/२** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र महसुल व वन विभाग आदेश क्र.डी.टी.पी/११/२००१/प्र.क्र. १२६/ई-१ दिनांक ०८-०५-२००२ नुसार श्री. शिवाजी दिवेकर, विशेष भुसंपादन अधिकारी औरंगाबाद यांची उप आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रतिनियुक्तीच्या विहित अटी व शर्तीनुसार प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नेमणुक करण्यांत आली. आहे.

करिता श्री. शिवाजी दिवेकर यांची रुजु झाल्याचे तारखेपासुन म्हणजे दिनांक १०-०५-२००२ रोजी मध्यान्हानंतर उप आयुक्त (महसुल) महानगरपालिका औरंगाबाद या पदावर एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

मा. महापौर : विषय सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महसुल व वन विभाग आदेश क्र.डी.टी.पी/११/२००१/प्र.क्र. १२६/ई-१ दिनांक ०८-०५-२००२ नुसार श्री. शिवाजी दिवेकर, विशेष भु संपादन अधिकारी यांची उप आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर रुजु झाल्याच्या तारखेपासुन म्हणजे दिनांक १०-०५-२००२ (मध्यान्हानंतर) उप आयुक्त (महसुल) या पदावर एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार त्यांच्या प्रतिनियुक्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५०/३** :

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात यापुर्वी लावण्यांत आलेल्या तैलचित्रांच्या धर्तीवर राजामाता जिजाऊ, झाशीची राणी अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले या थोर महिलांची तैलचित्रे तयार करुन लावण्यांत यावीत. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद

श्री. जबिंदा दलबिरसिंग : यामध्ये आणखी स्व.माई बामो यांचे तैलचित्र लावण्यासाठी नावाचा समावेश करावा.

मा. महापौर : ठिक आहे. स.सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे नावाचा समावेश करण्यांत यावा. प्रस्ताव मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात यापुर्वी लावण्यांत आलेल्या तैलचित्रांच्या धर्तीवर राजामाता जिजाऊ, झाशीची राणी अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले व स्व.माई बाभो या थोर महिलांची तैलचित्रे तयार करुन लावण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५१/४** :

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ प्रकाशित करण्यांत यावा. मा. आयुक्तांनी प्रदान केल्यानुसार महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरील नामवंत विव्दान व साहित्यंकांकडुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरन यांच्या जिवनकार्यावर अप्रकाशित मराठीतील लेख मागविण्यांत यावेत. निवड झालेल्या लेखासाठी रुपये ७५०/- मानधन देण्यांत यावे. अशा लेखांचे सर्वाधिकार संशोधन केंद्राकडे राहतील. लेखांवर संपादकीय संस्कार करणे,

दुरुस्ती करण्याचे अधिकार संपादक मंडळाचे असतील. लेखकाच्या मताशी संपादक मंडळ महानगरपालिका सहमत असेलच असे नाही त्यासाठी लेखक जबाबदार असतील ज्या लेखकांच्या लेखांचा समावेश ग्रंथात होईल अशांचा व संपादकीय मंडळाचा शाल श्रीपळ व स्मृतीचिन्ह प्रदान करुन ग्रंथ ऑफसेटवर चार रंगात छपाई करण्यांत येईल. मुख्यपृष्ठ ठरविण्यांचा ग्रंथाच्या प्रती व पुनर्मुद्रणाचा अधिकार मा. आयुक्तांकडे राहील. संपादक मंडळात खालील व्यक्तीचा समावेश असावा. १) डॉ. गंगाधर पानतावणे २) डॉ. सुधीर गव्हाणे ३) डॉ. दत्ता भगत ४) वि.वा जावरे, प्रकल्प संचालक ५) डॉ. एन.जी. भवरे, समन्वयक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र.

संपादक मंडळ वेळोवेळी मा. महापौर व मा. आयुक्तांचा सल्ला घेईल. संपादकीय मंडळातील व्यक्तींना मानधन (प्रकल्प संचालक व समन्वयक व्यतिरिक्त) रु. पाच हजार (एकत्रित) प्रत्येकी देण्यांत यावे.

सत्कार/प्रकाशन समारंभा व्यतिरिक्त गौरव ग्रंथ प्रकाशन या उपक्रमावर रु. २/- लक्ष खर्च अपेशित आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. दानवे अंबादास : यामध्ये श्री. रमेश पांडव, श्री. ब्रम्हानंद देशपांडे,श्री. दिलीप धानोरकर यांचे नांवाचा समावेश करण्यांत यावा.

मा. महापौर : स.सदस्यांनी सुचविलेल्या नावाचा या प्रस्तावामध्ये समावेश करावा.

श्री. दानवे अंबादास : या प्रस्तावामध्ये नमुद केल्याप्रमाणेच छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय येथे सुध्दा अशा पध्दतीने कार्य करता येईल सध्या हा विभाग अति शहर अभियंता यांचेकडे आहे. तो प्रकल्प संचालक यांचेकडे सुपुर्द करता येत असेल तर तसे प्रयत्न करण्यांत यावे.

मा. महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ प्रकाशित करण्यांस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन कार्यावर अप्रकाशित मराठीतील लेख मागविण्यांस आणि निवड झालेल्या लेखासाठी रु. ७५०/- मानधन देण्यांस आणि प्रस्ताव दर्शविल्या व्यतिरिक्त श्री. रमेश पांडव, श्री. ब्रम्हानंद देशपांडे, श्री. दिलीप धानोकर यांचा संपादक मंडळात समावेश करण्यास व संपादकांना (प्रकल्प संचालक व समन्वय व्यतिरिक्त) रु. ५०००/- (एकत्रित) देण्यांस आणि सत्कार/प्रकाशन समारंभ व्यतिरिक्त गौरव ग्रंथ प्रकाशन या उपक्रमावर अपेशित रु. २/- लक्ष खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५२/५** :

मा. कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, २००२-२००३ च्या मंजुर अर्थ संकल्पातील यादी प्रमाणे औरंगाबाद शहरात विविध चौकात हायमास्ट बसविण्याचे कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यास आले. सदरील यादी व अंदाजपत्रक व हायमास्टची उंची खाली प्रमाणे आहे.

| अ. | चौकाचे नांव | | उंची |
|---|---|---|---|

| क्र. | | | |
|---|---|---|---|
| १. | गजानन महाराज मंदिर चौक | -- | २० मीटर |
| २. | विद्यापीठ गेट डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक | -- | १६ मीटर |
| ३. | पैठणगेट | -- | १६ मीटर |
| ४. | उस्मानपुरा चौक | -- | १६ मीटर |
| ५. | आकाशवाणी चौक | -- | ११ मीटर |
| ६. | बाबुराव काळे चौक | -- | ११ मीटर |
| ७. | अमरप्रित हॉटेल चौक | -- | ११ मीटर |
| ८. | शाहु महाराज चौक | -- | ११ मीटर |
| ९. | अण्णाभाऊ साठे चौक | -- | ११ मीटर |
| १०. | निराला बाजार चौक | -- | ११ मीटर |
| ११. | म्हाडा कॉलनी चौक | -- | ११ मीटर |
| १२. | जुने हायकोर्ट चौक | -- | ११ मीटर |

वरील चौकात हायमास्ट बसविण्याचे अंदाजपत्रक रु. ३३,२८,०००/- चे तयार केलेले आहे त्यास मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिली आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. पंडागळे रतनकुमार : आण्णाभाऊ साठे येथील हायमस्टची उंची १८ ते २० मी. करावे.

मा. महापौर संबंधीतांनी नोंद दयावी.

श्री. जबिंदा दलबिरसिंग : २ वर्षापासुन वार्डातील वाहतुक बेटाचे काम झालेले नाही. १ लाखाचे बजेट ठेवलेले आहे.

मा. महापौर : स.सदस्यांनी मांडलेल्या सुचनेची अतिरिक्त शहर अभियंता यांनी नोंद घ्यावी व ताबडतोब प्रस्ताव पाठवण्यात यावा.

श्री. कोकाटे काशिनाथ : सर्वसाधारण सभेने एक ठराव पास करुन कोणत्याही ठिकाणी हायमास्ट दिवा लावायचा नाही. असा निर्णय घेतला तरी सुध्दा पुन्हा प्रशासनाने हायमास्ट दिवा लावण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. हा ठराव मंजुर करणार आहे का? निर्णय झालेल्या असतांना पुन्हा ठराव कसा होतो.

श्री. अफसरखान : बेगमपुरा मकबरा रोडवरील चौ-रस्त्यांवर हायमास्ट लावण्यात यावा.

श्री. जगदिश सिध्द : गांधी पुतळा, शहागंज मध्ये पुर्वी मंजुर झालेले आहे. तेथेही लावावे.

श्री. भाऊसाहेब ताठे : मयुरनगर एन-११ मध्ये हि एक हायमास्ट लावण्याची कार्यवाही करण्यात यावी तसे ठरावामध्ये नांव समाविष्ट करण्यांत यावे.

श्री. कुमावत अविनाश : बजेटमध्ये तरतुद असेल तर हरकत नाही.

मा. महापौर : स.सदस्य यांनी सुचविल्यानुसार बेगमपुरा व गांधीपुतळा शहागंज येथे ११ मीटर उंचीचे हायमास्ट बसविण्याबाबत आणि याच हेडमधुन होणाऱ्या बचतीतुन करण्यास मंजुरी देण्यात येते व मयुरनगर एन-११ येथील हायमास्ट पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यांत यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अनुक्रमांक १ ते १२ प्रमाणे हायमास्ट बसविण्याचे रक्कम रु. ३३,२८,०००/- चे अंदाज पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार बेगमपुरा मकबरा रस्त्यावरील चौ-रस्त्यावर, गांधी पुतळा शहागंज येथे ११ मीटर उंचीचे हायमास्ट बसविण्यास आणि त्याचा खर्च याचा लेखाशिर्षकातुन बचत होणाऱ्या रक्कमेतुन करण्यास आणि मयुरनगर एन-११ मध्ये पुढील अर्थसंकल्पात तरतुद करण्यास सर्वानुमते स्वीकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५३/६** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, इन्स्टीटयुट फॉर हाऊसिंग ॲड अर्बन डेव्हलपमेंट स्टडीज दिल्ली यांनी अंतराष्ट्रीय स्तरावर नागरी व ग्रामीण विकास व्यवस्थापन (अर्वन ॲण्ड रुरल डेव्हलपमेंट मॅनेजमेंट) दिनांक ९ ते २० सप्टेंबर २००२ रोजी चायना व थायलंड येथे कार्यशाळेचे आयोजन केले आहे या संदर्भात त्यांचे पत्र क्र. आय एच एस-आय/आय डब्ल्यु-१०/२००२ दिनांक ०८-०७-२००२ चे पत्र प्राप्त झाले आहे.

सर्वसाधारण सभा दिनांक २८-०२-२००२ चे ठराव क्र. ५७९/९ अन्वये मा. महापौर व मा. आयुक्त यांना ०६ एप्रिल ते १८ एप्रिलच्या कालावधीत सिंगापुर येथे याच संस्थेच्या माध्यमातुन अंतरराष्ट्रीय कार्यशाळेत सहभागी होण्यास मान्यता झालेली आहे. परंतु काही कारणास्तव या कार्यशाळेस मा. महापौर व मा. आयुक्त उपस्थिती राहु शकले नाहीत.

या कार्यशाळेत नागरी व्यवस्थापनाची जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडणे, विकास कामास वित्त उपलब्धी व जनतेचा सहभाग, सर्वसामान्यांना परवडणारी गृहनिर्माण योजना गरिबी निर्मुलन, सुक्ष्म नियोजन, संस्थांच्या कामात सुधारणा व कार्यक्षमता वाढविणे, पर्यावरण ई. वर भर देण्यात येणार असुन भारतातील विविध भागातुन महापौर व अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेसाठी रु. ३९५०/- अमेरिकन डालर्स (रु. १,९३,५५०/-सुमारे) फिस दिल्ली प्रवास निर्वाह भत्ता ई. मिळुन सुमारे रु. २,६०,०००/- प्रति व्यक्ति खर्च अपेक्षित आहे.

या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे मा. महापौर व मा. आयुक्त यांना भाग घेण्यासाठी व त्या करिता राज्य शासन व केंद्रशासन यांची परवानगी घेवुन आवश्यक ती कार्यवाही करणेस व प्रस्तावित खर्चाच्या मंजुरीसह प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

संवाद

श्री. डॉ. भागवत कराड : या कार्यशाळेसाठी मा. उपमहापौर यांचा सुध्दा समावेश करण्यांत यावा.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दीन : विरोधी पक्ष नेता यांचा सुध्दा या कार्यशाळेसाठी समावेश करण्यांत यावा.

श्री. सुनिल मगरे : उपमहापौर विरोधी पक्ष नेते यांचा या कार्यशाळेसाठी समावेश होत असेल तर मा. सभापती स्थायी समिती यांना सुध्दा जाण्याची मंजुरी व्हावी.

श्री. जयवंत ओक : आपण या कार्यशाळेसाठी गेल्यावर सभा कोण बोलविणार आहे तसेच उपमहापौर सभपती जाण्यास इच्छुक असतील तर स्वखर्चाने जाण्याची परवानगी देण्यांत यावी. आंतरराष्ट्रीय कार्यशाळेस उपस्थित राहावयाचे आहे. शासनाने सुध्दा परवानगी दिली पाहिजे. प्रस्तावात फक्त मा. महापौर मा. आयुक्त यांचेच नावाचा समावेश आहे.

मा. महापौर : ज्या सदस्यांना कार्यशाळेस यावयाचे असेल त्यांनी स्वःखर्चाने यावे तशी मंजुरी देण्यांत येते. सचिव यांनी याची नोंद घ्यावी महापौर नसेल तर उपमहापौर सर्वसाधारण सभेचे आयोजन करु शकतील.

श्री. दानवे अंबादास : हा आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचा दौरा आहे ५० स.सदस्यांना जाण्याची परवानगी दिली तरी शासनाने सुध्दा मंजुरी द्यावयास पाहिजे. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करुन मंजुरी देण्यांत यावी.

नगरसचिव : या कार्यशाळेसाठी प्रस्तावात मा. महापौर तसेच मा. आयुक्त यांना जाण्यासाठी येणारा संभाव्य खर्च प्रस्तावित केलेला आहे. त्यानंतर यासाठी शासनाची मंजुरी घ्यावी लागणार आहे.

मा. महापौर : हा प्रस्ताव मंजुर करण्यांत येत आहे. ज्यांना यावयाचे त्यांनी स्वःखर्चाने जायचे असेल त्यांनी जावे.

श्री. शे.ईसाक शे. जैनोद्दीन : जो निर्णय आपण घेतला त्यास माझा विरोध आहे. सुचना केल्याप्रमाणे विरोधी पक्ष नेत यांना सुध्दा कार्यशाळेस जाण्याची परवानगी देण्यांत यावी.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, इन्स्टीटयुट फॉर हाऊसिंग ॲड अर्बन डेव्हलपमेंट स्टडीज दिल्ली या संस्थेमार्फत दिनांक ९ ते २० सप्टेंबर २००२ या कालावधीसाठी नागरी व्यवस्थापनाची जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडणे विकास कामास वित्त उपलब्धी व जनतेचा सहभाग सर्वसामान्यांना परवडणारी गृह निर्माण योजना गरिबी निर्मुलन सुक्ष्म नियोजन, संस्थाच्या कामात सुधारणा व कार्यक्षमता वाढविणे, पर्यावरण इत्यादी विषयावर आयोजित चायना व थायलंड येथील आंतरराष्ट्रीय कार्यशाळेस औरंगाबाद महानगरपालिकेचे मा. महापौर व मा. आयुक्त यांना भाग घेण्यास आणि कार्यशाळेची फि रु. ३९५०/- अमेरिकन डॉलर्स (रु. १,९३,५५०/- सुमारे) आणि दिल्ली प्रवास व निर्वाह भत्त्यासाठी मिळुन प्रत्येकी रुपये २,६०,०००/- च्या अपेक्षित खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५४/७** :

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी असा प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराची पाणी पुरवठा योजना, ज्या अंतर्गत पाच पंपींग स्टेशन २४ तास, आहोरात्र चालु असल्यामुळे योजनेतील जलवाहिण्या व्हॉलवस, जलशुध्दीकरण केंद्रावरील गाळण गृह, फ्लोक्युलेटर तसेच मशिनरी पार्टस, विद्युत केंद्र यांची झीज होते व अत्यावश्यक देखभाल व दुरुसती करता येणे शक्त होत नाही. परिणामी योजनेत अचानक खंडण होऊन शहराचा पाणी पुरवठा पुर्णत: विस्कळीत होतो . पाणी पुरवठयात सुसत्रता आणणे यासाठी योजना महिण्यातुन एक दिवस नियोजीतपणे बंद ठेवल्यास अत्यावश्यक देखभाल व दुरुस्तीची कामे नियोजीत वेळेस करणे शक्य होईल व खंडण सुध्दा कमी होईल.

याकरिता असा प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दर महिण्याच्या निश्चित तारेखेस (सर्व साधारणपणे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळा तर्फे शुक्रवारी रोजी खंडण असतेच असा दिवस) जुनी व नविन योजना बंद ठेवुन आवश्यक त्या देखभाल व दुरुस्तीची कामे पुर्ण करावीत.

सदरचा प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

संवाद

श्रीमती जयश्री किवळेकर : मागील बैठकीत सिडको हडको भागात दररोज पाणी देण्या बाबतचा निर्णय घेण्यांत आला त्यानुसार पाण्याचे नियोजन होऊन दररोज पाणी दिले जात नाही. अंमलबजावणी का झाली नाही.

कार्य. अभियंता (पा.पु.) : जो निर्णय मागील बैठकीत घेण्यात आला त्या संबंधीचे इतिवृत्तांत कायम झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

मा. महापौर : ही चर्चा जनरल चर्चेस येते. त्यावर नंतर चर्चा केली जाईल. विषय मंजुर करण्यांत येत आहे. परंतु कोणत्याही भागात पाण्याचे खंड पडणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराची पाणी पुरवठा योजना आहोरात्र चालु असल्याने जलवाहिनीचे व मशिनरीचे देखभाल दुरुस्ती करता यावी. म्हणुन दर महिण्याच्या निश्चित तारखेस, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा ज्या रोजी खंडण असेल अशा दिवशी जुनी व नविन योजना बंद ठेवुन आवश्यक ती देखाभाल व दुरुस्तीची कामे पुर्ण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५५/८** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकातील महिला व बाल कल्याण समितीचे ९ सदस्यांची निवड होऊन माहे मे २००२ मध्ये सभापती व उपसभापती यांची निवड झालेली आहे. नवनिर्वाचित महिला व बाल कल्याण समितीचे सर्व सदस्यांना समितीचे कामकाजाची माहिती करुन घेणे. तसेच कामाची कार्यप्रणाली व इतर महानगरपालिकामध्ये कोणत्या पध्दतीने कामे होतात. या संदर्भात महिला व बाल कल्याण समितीचे सर्व सदस्यांची मुंबई,पुणे, पिंपरी चिंचवड इ. महानगरपालिकेस भेटी देणेस अभ्यास दौरा आयोजित करणे करिता सुमारे रु. ३०,०००/- खर्च अपेक्षित आहे. तसेच त्यांच्या सोबत आवश्यक तो कर्मचारी वर्ग पाठविण्यात येईल. तरी महिला व बाल कल्याण समितीचे सर्व सदस्यांचे अभ्यास दौरा करणेसाठी व येणाऱ्या संभाष्य खर्चात मान्यता होणेसाठी प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा. महापौर : सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महिला व बाल कल्याण समितीच्या सर्व सदस्यांना इतर महानगरपालिका मधील महिला व बालकल्याण समितीची कामे, कार्य प्रणाली पाहण्यासाठी मुंबई,पुणे, पिंपरी चिंचवड इ. सुमारे रु. ३०,०००/- खर्च अपेक्षित आहे.सदर अभ्यास दौरा करण्यास व येणाऱ्या संभाष्य खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५६/९** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक १८-०२-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र. ५६४/३ अन्वये पारीत झालेल्या ठरावानुसार महानगरपालिका आस्थापनेवरील आरोग्य वैद्यकिय अधिकारी वर्ग-१ या संवर्गातील पद, राज्य शासनाच्या आरोग्य खात्यातील उप-संचालक या संवर्गातील अधिकाऱ्यांमधुन प्रतिनियुक्तीवर भरण्यास मंजुरी मिळाल्यानंतर या संदर्भाने शासनाशी पत्रव्यवहार केल्यानुसार महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. डी.ई.पी-१४०२/प्र.क्र. १३९/सेवा-२, मंत्रालय, मुंबई - ३२ दिनांक १९ जुन २००२ नुसार श्री. डॉ. पी.एल. भारती, सहाय्यक संचालक आरोग्य सेवा गट अ (वर्ग - १) संवर्गातील अधिकारी यांची महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण) अवधी इ. नियम १९८१ मधील परिशिष्ट - ३ मधील नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार आरोग्य वैद्यकिय अधिकारी औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रथमतः एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार महानगरपालिकेकडील आदेश जा.क्र./मनपा/आस्था-१ /२००२/१९८८ दिनांक ०९-०८-२००२ नुसार डॉ. श्री.पी.एल. भारती यांना दिनांक ०१-०८-२००२ रोजी मध्ययान्हपुर्व आरोग्य वैद्यकिय अधिकारी या पदावर रुजु करुन घेण्यात आलेले आहे.

करिता डॉ श्री.पी.एल. भारती यांना दिनांक ०१-०८-२००२ पासुन महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा इ.) नियम १९८१ मधील परिशिष्ट दोन व तीन मधील अटी शर्तीनुसार आरोग्य वैद्यकिय अधिकारी या पदावर एक वर्षाकरिता प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याकरिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा. महापौर : विषय मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.पी.एल. भारती सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा गट अ (वर्ग - १ ) यांची औरंगाबाद महानगरपालिकेत आरोग्य वैद्यकिय अधिकारी या पदावर दिनांक ०१-०८-२००२ पासुन महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा इ.) नियम १९८१ मधील परिशिष्ट दोन व तीन मधील अटी शर्तीनुसार एका वर्षाच्या प्रतिनियुक्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५७/१०** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक २० डिसेंबर २००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र. ५४२/२ अन्वये पारित झालेल्या ठरावान्वये महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन आदेश क्र. संलेको-११०२/प्र.क्र.-६३/२००२/कोषा (प्र-१) मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक २४ जुलै, २००२ नुसार श्री. अ.ग.चाटे, सहाय्यक संचलाक महसुल व वन विभाग गट अ (कनिष्ठ) संवर्गातील अधिकारी यांची महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी-ई) स्वीवेत्तर सेवा नियम १९८१ मधील परिशिष्ट दोन व तीन मधील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुख्ये लेखा परिक्षक, औरांगाबाद महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रथम टप्यात दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीने पदस्थापन करण्यात आलेली आहे.

त्यानुसार महानगरपालिकेकडील आदेश जा.क्र./मनपा/आस्था-१/२००२/१८८१ दिनांक ०३-०८-२००२ रोजी मध्यान्हांनंतर मुख्य लेखा परिक्षक या पदावर रुजु करुन घेण्यात आलेले आहे.

करिता श्री. अ.ग.चाटे यांना दिनांक ०३-०८-२००२ पासुन महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा इ.) नियम १९८१ मधील परिशिष्ट दोन व तीन मधील अटी व शर्तीनुसार मुख्य लेखा परिक्षक या पदावर प्रथमतः दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याकरिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद

श्री. प्रकाश निकाळजे : महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांना पदोन्नतीव्दारे नियुक्ती होण्यासाठी ठराव पास केलेला आह. सदर प्रस्ताव शासनाकडे सुध्दा पाठविलेला आहे. शासनाकडुन प्रतिनियुक्तीने आलेले अधिकारी येथे आल्यानंतर येथील अधिकाऱ्यांवर अन्यायच होता असे म्हटले तरी योग्य आहे. आपण सुध्दा शासनाकडे पत्र देऊन येथीलच अधिकाऱ्यांची शिफारस या पदावर पदोन्नतीने निवड करण्याबाबत शासनाकडे शिफारस केलेली म्हणुन सर्वसाधारण सभेने घेतलेल्या ठरावाचीच अंमलबजावणी व्हावी. हा प्रस्ताव मंजुर करु नये श्री. अ.ग.चाटे यांना पुन्हा त्यांचे विभागामध्ये पाठविण्यांत यावे. व जे गुणवत्ता धारक असतील अशा अधिकाऱ्यांमधुन पदोन्नतीन हे पद भरण्याची मंजुरी देण्यांत यावी.

श्री. डॉ भागवत कराड : याच विषयपत्रीकेवर आरोग्य वैद्यकिय अधिकारी म्हणुन श्री. भारती तसेच उपआयुक्त (म.) म्हणुन श्री. दिवेकर तसेच मुख्य लेखा परिक्षक या पदावर श्री.अ.ग.चाटे. यांची प्रतिनियुक्तीने नियुक्तीचे प्रस्ताव सादर झालेले आहे. आरोग्य वैद्यकिय अधिकारी व उपआयुक्त (म.) यांना प्रतिनियुक्तीचे ठराव आपण मंजुर केलेले आहे. त्याच प्रमाणे अ.ग.चाटे यांना सुध्दा मुख्य लेखा परिक्षक या पदावर प्रतिनियुक्तीने घेण्याचा प्रस्ताव मंजुर करावा. सर्वांना समान न्याय मिळावा. महानगरपालिकेस मुख्य लेखापरिक्षक प्रतिनियुक्तीने पाहिजे म्हणुन शासनास पत्र दिले. त्यास रिसपॉन्स म्हणुन शासनाने त्यांना महानगरपालिकेस पाठवले. त्यांना परत पाठवु नये. करायचे असेल तर तिन्हीला परत पाठवा.

श्री. अविनाश कुमावत : यापुर्वी या पदावर पदोन्नतीचे पद भरण्याबाबत प्रस्ताव मंजुर केलेला आहे त्याचीच अंमलबजावणी व्हावी.

श्री. डॉ. कराड : श्री. अ.ग.चाटे मुख्य लेखा परिक्षक यांना या महानगरपालिकेत रुजु करुन घेतलेले आहे. पुन्हा त्यांचे विभागात पाठविल्यास अडचणीचे होईल हा ठराव मंजुर करावा.

श्री. ताठे भाऊसाहेब : तिन्ही रद्द करा एकच ठराव रद्द करु नये.

श्री. सुनिल मगरे, श्री. गणेश तांबे, श्री. प्रकाश निकाळजे : मुख्यलेखा परिक्षक हे पद पदोन्नतीने भरण्याबाबतचा ठराव केलेला आहे. त्यांची अंमलबजावणी व्हावी. तसे शासनास कळवावे.

श्री. प्रकाश निकाळजे : यापुर्वी सहाय्यक आयुक्त-१ शहर अभियंता पशुधन विकास अधिकारी तसेच मुख्य लेखा अधिकारी ही पदे शासनाकडुन प्रतिनियुक्तीने नियुक्त्या होत असे परंतु आता या पदावर महानगरपालिके -तीलच अधिकाऱ्यामधुन पदोन्नती दिली जात आहे. त्याप्रमाणे या पदावर सुध्दा येथील आधिकाऱ्यांमधुनच पदोन्नतीने नियुक्ती व्हावी.

श्री. डॉ. कराड भागवत : सभागृहात एका अधिकाऱ्याला डोळयापुढे न ठेवता कार्यवाही करावी.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : यापुर्वी ठराव पास केलेला आहे त्याची अंमलबजावणी व्हावी. आपणाकडे सक्षम अधिकारी असल्याने हा ठराव रद्द करावा.

श्री. स.अली सलामी : या पदावर अधिकारी नियुक्त करावेत म्हणुन शासनाकडे महानगरपालिकेने शिफारस केलेली आहे. त्यानुसार श्री. अ.ग.चाटे यांची शासनाने प्रतिनियुक्तीने नियुक्ती केलेली आहे. या सर्वसाधारण सभेने योग्य तो निर्णय घेणे बरोबर हाईल शासनाचे अधिकारी येथे येतात चांगल्या प्रकारे काम करतात त्यामुळे महानगरपालिकेची आजपर्यंत चांगली प्रतिमा आहे या अगोदर ऑडीट मधुन रिपोर्ट आले अधिकारी कर्मचारी यांनी मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. वृत्तपत्रात महानगरपालिकेच्या वेगवेगळया बातम्या प्रसिध्द होतात. चांगल्याप्रकारे काम होण्यासाठी या पदावर शासनाचे नियुक्त केलेले अधिकारी श्री. अ.ग.चाटे यांना यांच्या प्रतिनियुक्तीने मंजुरी द्यावी व प्रस्ताव मंजुर करावा. शासनाचे प्रतिनियुक्तीवर पाठविलेले उपआयुक्त (म.) तसेच शिक्षणाधिकारी, उपसंचालक नगररचना हे शासनाचे अधिकारी आहे. योग्य तो निर्णय घेण्यांत यावा जेणे करुन शासनाच्या आदेशाची पायमल्ली करु नये.

श्री. प्रकाश निकाळजे : यापुर्वी शासनाचे नगर रचना विभागामध्ये अधिकारी प्रतिनियुक्तीने आलेले होते. मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. त्या अधिकाऱ्यांच्या आता बदल्या झाल्या चौकशी चालु आहे. बदल्यामुळे चौकशी करणे अवघड झालेले आहे. यापुढे असे होऊ नये म्हणुन शासनाकडुन आलेले अधिकारी या पदावर नियुक्त न करता येथील अधिकाऱ्यामधुन पदोन्नतीने नियुक्ती करावी हा ठराव नामंजुर करावा.

श्री. ताठे भाऊसाहेब : प्रस्ताव रद्द करु नये.

श्री. अफसरखान : महानगरपालिका निर्णय घेण्यास सक्षम आहे. कलम ४५ नुसार हे पद भरता येईल त्याचप्रमाणे सहा.संचालक नगर रचना हे टि.पी. सेक्शनचे पद आहे. तेथे ही भरण्यांत यावे.

मा. महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन हा प्रस्ताव नामंजुर करण्यांत येतो. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार मुख्य लेखा परिक्षक पदावर नेमणुक करण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेचा आहे. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पात्र अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणुन हे पद महानगरपालिका अस्थापनेवर भरण्यात यावे व शासना मार्फन प्रतिनियुक्तीवर आलेले श्री.अ.ग.चाटे यांना त्यांचे मुळ विभागात तात्काळ परत पाठविण्याची कार्यवाही करावी. त्यास स्विकृती देण्यांत येते.

श्री. ताठे भाऊसाहेब : हा प्रस्ताव नामंजुर करु नये शासनाकडुन श्री. चाटे यांची नियुक्ती झाली आहे.

श्री. डॉ. कराड भागवत : त्यांना महानगरपालिकेमध्ये प्रतिनियुक्तीवर सामवुन घ्यावे प्रस्ताव नामंजुर केल्यास आमच्या सर्व भाजप सदस्यांचा विरोध आहे.
(याचवेळी मोठमाठयाने काही सभासद मा. महापौरांच्या डायस समोर बोलतात. काहीही ऐकावयास येत नाही)

मा. महापौर : सभा ०५ मिनिटासाठी तहकुब करण्यात येते.(सभा तहकुब १२.४० वाजता पुन्हा सभेला सुरुवात १.०० वाजता)

(याचवेळी मा. महापौर जेंव्हा आसन ग्रहण करतात त्यावेळी काही मा. महापौर यांचे डायस समोर मोठयामोठयाने बोलतात काहीही ऐकावयास येत नाही.)

**ठराव :**

उपरोक्त प्रस्ताव नामंजुर करण्यांत येतो. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार मुख्य लेखा परिक्षक पदावर नेमणुक करण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेचा आहे. महानगरपालिकेच्या अस्थापनेवर पात्र अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणुन हे पद मनपा अस्थापनेवर भरण्यांत यावे. त्यामुळे शासनामार्फत प्रतिनियुक्तीवर मुख्य लेखा परिक्षक या पदावर आलेले श्री. अ.ग.चाटे यांना त्याचे मुळ विभागात तात्काळ परत पाठविण्यात येवुन प्रशासनाने सदरील पद मनपा अस्थापनेवर भरण्याची त्वरीत कार्यवाही करावी. श्री. अ.ग.चाटे यांना कार्यमुक्त करुन पदोन्नतीस पात्र असलेल्या अधिकाऱ्यांस या पदाचा कार्यभार सोपविण्यात यावा. या प्रस्तावास बहुमताने स्विकृतीसह मान्यता देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

संवाद

श्री. पंडागळे रतकुमार : औरंगाबाद भाजी मार्केटला सवित्रीबाई फुले नांव दिलेले आहे ते कायम ठेवावे. सावित्रीबाई फुले भाजी मंडई व स्व.सौ. मिनाताई ठाकरे संकुल असे नामकरण करण्यांत यावे.

मा.महापौर : सर्व सभासदांनी जागेवर बसावे. (सुचना करुनही सभासद जागेवर बसत नाही.) सर्व विषय ऐनवेळसह मंजुर करण्यांत येत आहे.

**विषय क्र. ६५८/११** :

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, आदर्श भाजी मंडी अंतर्गत औरंगपुरा भाजी मंडी बांधा, वापरा, हस्तांतरीत करा (बी.ओ.टी.) पध्दतीने विकास करण्याबाबत आतापर्यंत कार्यवाही झाली आहे. परंतु दिनांक २६-०७-२००२ रोजी मा. महापौर यांचे दालनात झालेल्या बैठकीमध्ये बी.ओ.टी. पध्दतीने विकास करण्यास प्रसिाद मिळणार नाही व मनपास त्याचा काहीही आर्थिक फायदा होणार नाही असे ठरले. म्हणुन अस्तित्वातील भाजी मंडी व दुकाने तोडुन मनपा फंडातुन टप्प्या टप्प्याने त्याचा विकास करणे बाबत सुचित करण्यांत आले.

सदरील जागेचे एकुण क्षेत्रफळ अंदाजे १६०००/- चौरस फुट असुन सदरील जागा गावठाण क्षेत्रात असल्याने त्यावर नगर रचना विभागाच्या नियमानुसार बाधीत क्षेत्र वगळुन १.५ पट म्हणजे २४०००/- चौरस फुटाचे बांधकाम काम करता येईल. एकुण मजल्यावर २४०००/- चौरस फुटाच्या बांधकामासाठी व बरुदगर नाल्यावर पार्कींची व्यवस्था करण्यासाठी ढोबळ मानाने ५५०/- रुपये चौरस फुट खर्च अपेक्षित धरुन एकुण प्रकल्पास १.५ कोटीचा खर्च अपेक्षित आहे. व एकुणन प्रकल्पास साधारण दोन वर्षाचा कालावधी लागेल. सन २००२-२००३ या आर्थिक वर्षात टप्पा क्र.१ साठी मार्च २००३ पर्यंत अस्तित्वातील भाजी विक्रेते यांना बारुदगरनाला मागील खुल्या जागेत तात्पुरत्या स्वरुपाचे ओटे व मुळ प्रकल्पाचे तळ घराचे काम करणेसाठी (७+३०) -(३७.०० लक्ष) खर्च आहे. त्यासाठी आर्थिक वर्षातील फुटपाथ बांधण्याची कामे वगळुन सदरील प्रकल्पाचे काम सुरु करता येऊ शकेल. असा

अभिप्राय मा. लेखाधिकारी यांनी दिलेला आहे. या प्रकल्पा बाबत खालील गोष्टीचा सविस्तर विचार करणे गरजेचे आहे.

१) सदरील प्रकल्पाचे सर्व नकाशे मनपाच्या पॅनलवरील वास्तुविशारद श्री. सुनील राका यांचेकडुन प्राप्त करुन ते मनपाच्या नगर रचना विभागाकडुन मंजुर करुन घेण्यात येतील.

२) अस्तित्वातील २४ दुकानदार व १४९ भाजी विक्रेते यांची मालमत्ता विभागातर्फे संयुक्तिक बैठक बोलावुन दुकानधारक व भाजी विक्रेते यांना नगररचना विभागाने मान्यता दिल्यास तळ घरात दुकाने व ओटे बांधुन दिले जातील. याची कल्पना देऊन प्रकल्प सुरु करणे योग्य.

३) अस्तित्वातील भाजी विक्रेते यांना बारुदगरनाल्या मागील मनपाच्या उद्यानासाठी आरक्षित असलेल्या जागेत तात्पुरत्या स्वरुपाचे ओटे बांधुन द्यावे लागतील. त्यासाठी रुपये. ७.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदरील प्रकल्पाचे तळ घराचे बांधकाम पुर्ण झाल्यावर अस्तित्वातील दुकानधारक व भाजी विक्रेते यांना टप्पा क्र. १ मध्ये झालेल्या कामातील दुकाने व ओटे द्यावे लागतील.

करिता एकुण प्रकल्पास अपेक्षित खर्च १.५० कोटी प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव** :

आदर्श मंडी अंतर्गत औरंगपुरा येथील भाजी मंडी तोडुन अत्याधुनिक पध्दतीने नविन भाजी मंडई व्यापारी संकुल बांधणे या कामा निमित्त सदरील जागेचे एकुण क्षेत्रफळ अंदाजे १६०००/- चौरस फुट असुन मनपा नगर रचना विभागाच्या नियमानुसार संबंधीत क्षेत्र वगळुन एकुण प्रकल्प पुर्ण करणे व बारुदनगर नाल्यावर पार्किंगची व्यवस्था करणेसाठी रुपये१.५० कोटी लागत असुन त्यास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यांत येते. तसेच प्रथम टप्यातील कामात तळमजला वरील भाजी मंडईचे काम रुपये ३०.०० लक्ष व अस्तित्वातील भाजी ओटे धारकांसाठी बारुदनगर नाल्या मागील मनपाच्या खुल्या जागेत तात्पुरत्या स्वरुपाचे ओटे बांधणे या कामासाठी रुपये ७.०० लक्ष मान्यता देण्यात येते.

त्यासाठी आर्थिक वर्षातील फुटपाथ बांधण्याचे कामे वगळुन सदरील कामे इमारती बांधणे या लेखाशिर्ष अंतर्गत करण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच या रु (३०+७) - ३७.०० लक्षला सर्वानुमते मान्यता देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *"पुरवणी विषय"*

**विषय क्र. ६५९/१** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक ११-०३-२००२ रोजी मध्यरात्री जालना रोड औरंगाबाद शहराच्या सिडको प्रभागाकडे जाणारी महापालिकेची ७५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी शांतीनाथ स्टील समोर अचानक फुटल्याने पाण्याच्या प्रचंड दाबाने या ठिकाणी श्री. महादेव स्वामी गणाचार्य व श्री. अशोक रामचंद्र झाल्टे यांच्या घरात पाणी शिरुन प्रचंड आर्थिक व मालमत्तेचे नुकसान झाले आहे. संबंधीतांनी नुकसान भरपाई मिळणेसाठी मनपाकडे मागणी केली होती.

तरी मनपाची जलवाहिनी फुटल्यामुळे सदरील नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनी निदर्शनास येत असल्यामुळे संबंधीतांना मनपातर्फे योग्य ती आर्थिक मदत देणे करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. प्रशांत देसरडा, श्री. आनंद तांदुळवाडीकर

अनुमोदक : श्री. रतनकुमार पंडागळे

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक ११-०३-२००२ रोजी मध्यरात्री जालना रोड, औरंगाबाद शहराच्या सिडको प्रभागाकडे जाणारी महापालिकेची ७५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी फुटल्यामुळे मे. शांतीनाथ स्टील यांचे दुकान तसेच श्री. महादेव स्वामी गणाचार्य व श्री. अशोक रामचंद्र झाल्टे यांच्या घरात पाणी शिरुन प्रचंड आर्थिक व मालमत्तेचे नुकसान झाले आहे. संबंधीतांनी अनुज्ञेय नुकसान भरपाई देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६०/२** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिककेत नव्यानेच विषय समिती सभापती पदांच्या निवडणुका संपन्न झाल्या असुन विषय समित्यांचे सभापती म्हणुन स. नगरसेवक विराजमान झालेले आहेत. सभापतींना त्यांचे दैनंदिन कार्यालयीन कामकाज करणे. महापालिका हद्दी मधील सर्वही प्रभागांची पाहणी करणे, नागरिकांचे प्रश्न, समस्या व अडचणी ऐकुण घेणेसाठी विविध प्रभागात फिरावे लागते. त्यांना अद्याप महापालिकेने वाहन पुरविलेले नसल्यामुळे त्यांची अत्यंत गैरसोय होत आहे. विषय समित्याचे सभापतींना वाहन पुरविणेसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. नंदकुमार घोडेले.

अनुमोदक : श्री. जगदिश सिध्द, श्री. मधुकर सावंत

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नव्यानेच स्थापन झालेल्या विषय समित्यांचे सभापतींना त्याचे दैनंदिन कार्यालयीन कामकाज करणे. महापालिका हद्दी मधील सर्व प्रभागांची पाहणी करणे, नागरिकांचे प्रश्न, समस्या व अडचणी ऐकुण घेणेसाठी महापालिकेतर्फे वाहने पुरविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६१/३** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, नॅशनल इंटेग्रेटेड मेडीकल असोसिएशन ही संघटना आयुवैदिक पदवी धारक मिश्र वैद्यकिय व्यवसायिकांची राष्ट्रीय स्तरावरची संघटना असुन संघटनेची येथील शाखा २० वर्षापासुन चालु आहे. शाहनुरमियाँ दर्गा भागात महानगरपालिकेची रुग्णालयाची ईमारत उभारलेली असुन ही ईमारत संघटनेने आयुर्वेद रुग्णालय सुरु करणेसाठी तसेच हे केंद्र मा. नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यास उत्सुक असले मुळे मिळणे बाबत मागणी केली आहे. संघटनेचा उद्देश रुग्णांची तपासणी व आयुर्वेदाचे सर्व उपचार तंज्ञाच्या सेवा याबरोबरच पंचकर्म, क्षारसुत्र आदी उपचार आधुनिक वैद्यकातील तंज्ञाच्या सेवा तात्कालीन उपचार अशा सर्व सेवा उपलब्ध करुन देणेचा

अल्यामुळे या संघटनेस हि ईमारत नाममात्र भाडयाने दिर्घ मुदतीचे कराराने देणेसाठी प्रस्ताव मंजरीस्तव विचारार्थ सादर.

सुचक : श्री. संजय शिरसाठ
अनुमोदक : श्री. रतनकुमार पंडागळे
श्री. दलबिरसिंग जाबिंदा

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नॅशनल इंटेग्रेटेड मेडीकल असोसिएशन या संघटनेस शाहनुरमियाँ दर्गा भागात असलेली महानगरपालिकेची ईमारत आयुर्वेद रुग्णालय सुरु करणेसाठी नाममात्र भाडयाने अथवा दिर्घ मुदतीचे कराराने देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६२/४** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्डसमिती सभापती यांना महानगरपालिकेतर्फे वाहन (कार) देण्यांत आलेल्या आहेत. सर्व प्रभाग सभापती यांना एकुण २१ वार्डाच्या कामासाठी वाहनाला देण्यात येणारा खर्च अपुरा पडत आहे. दिवसा व रात्री या शिवाय सुटयांच्या दिवशी देखील वार्डाची अडी अडचणी सोडविण्याकरिता फिरावे लागते, परंतु महानगरपालिकेची सद्याची आर्थिक परिस्थिती पाहता सभापतींच्या या गाडया (कार) महानगरपालिकेने परत घ्याव्यात, राज्यातील इतर महानगरपालिकांनी सुध्दा हेच धोरण ठरविले आहे. प्रभाग सभापती यांना दर महा दहा हजार (रु. १०,०००/-) फक्त वाहन इंधन व इतर खर्च म्हणुन अदा करण्याकरिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. नासेर खान सरदार खान,
श्री. सलीम पटेल समशेर पटेल, मानिक साळवे.
अनुमोदक : श्री. अफसर खान यासीन खान, श्री. आनंद तांदुळवाडीकर

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्व प्रभाग समिती सभापतींना महापालिकेतर्फे पुरविण्यात आलेले वाहन (कार) परत घेऊन दर महा दहा हजार (रु. १०,०००/-) फक्त इंधन व इतर खर्च म्हणुन अदा करण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६३/५** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरातील इतर उद्यानांमध्ये ज्याप्रमाणे उद्यानाच्या नावानुसार महात्मा व थोरापुरुष यांचे पुतळे उभारण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणेच सिध्दार्थ उद्यानात देखील संपुर्ण जगाला शांतीचा संदेश देणारे युगपुरुष सिध्दार्थ गौतम बुध्द यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. राजु शिंदे, श्री. साहेबराव कावडे
अनुमोदक : श्री. रतकुमार पंडागळे, श्री. अफसर खॉन यासीन खॉन,
श्री. आनंद तांदुळवाडीकर, श्री. किशोर शिंदे

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यानात सिध्दार्थ गौतम बुध्द यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६४/६** :

औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत उभारण्यात येणाऱ्या आदर्श भाजी मंडई या प्रकल्पाचे नामकरण स्वर्गीय सौ. मीनाताई ठाकरे आदर्श भाजी मंडई असे करण्यात यावे.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : विकास जैन

अनुमोदक : श्री. आनंद तांदुळवाडीकर, श्री. चंद्रशेखर

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेमार्फत उभारण्यात येणाऱ्या आदर्श भाजी मंडईस सावित्रीबाई फुले भाजी मंडई व स्वर्गीय सौ. मीनाताई ठाकरे आदर्श व्यापारी संकुल असे नामकरण करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६५/७** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेत नुकत्याच काही विषय समित्यांचे गठण करण्यांत आले आहे. विषय समित्यांचे सदस्यांची निवडणुक झाले नंतर समिती निहाय सभापती देखिल निवडण्यात आले आहेत.

महानगरपालिकेत १० वर्षापुर्वी स्थापत्य समिती व विधी समिती अशा दोन समित्या अस्तित्वात होत्या नव्याने गठण केलेल्या समित्यामध्ये या समित्यांचा समावेश नाही. या दोन अत्यंत महत्वाच्या समित्या असल्याने त्याचे देखिल गठण करणे तसेच त्यांचे सुध्दा सभापतीची निवड करुन अन्य विषय समित्या प्रमाणेच या समित्यांचे देखिल कामकाज सुरु करणेसाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. भरत लकडे

अनुमोदक : श्री. राधाकृष्ण गायकवाड, श्री. चंद्रशेखर जैस्वाल

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्थापत्य समिती व विधी समिती असा दोन नविन समित्यांचे गठण करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६६/८** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,उदय कॉलनी ते नागेश्वर वाडीस जोडणारा लाकडी पुल सध्या मोडलेला आहे. पुलाची लाईफ संपलेली असुन अनेक ठिकाणी लाकडी फळया निघालेल्या आहेत. आणि पुलाने एका मुलीचा बळी घेतलेला आहे. सदरील पुल तयार करणेसाठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यांत आलेली आहे. त्याठिकाणी आर.सी.सी. पुल तयार करण्यांत यावा. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. चंद्रभागाबाई दाणे

अनुमोदक : श्री. किशोर तुळशीबागवाले,

श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उदय कॉलनी ते नागेश्वर वाडीस पुल आर.सी.सी.चा पुल करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६७/१२**:

नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची मान्यता प्राप्त झाली आहे. गेल्या तीन वर्षापासुन प्रलंबीत प्रस्तावास विद्यापीठाने मान्यता दिली. त्याबध्दल महापालिका आयुक्तांचे व विद्यापीठाचे अभिनंदन प्रस्ताव मंजुर करण्यांत यावा.

सुचक : श्री. मधुकर सावंत
अनुमोदक : डॉ. आशा बिनवडे, सौ. जयश्री कुलकर्णी,
श्री. संजय शिरसाठ

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची मान्यता प्राप्त झाल्या बध्दल महापालिका आयुक्तांचे व विद्यापीठाचे अभिनंदन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ६६८/१३**:

महानगरपालिकेमार्फत महापौर चषक स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यांत येतात. या स्पर्धा मध्ये विविध खेळाचा समावेश असतो. महापौर चषक स्पर्धासाठी राज्याचे विविध भागामधुन खेळाडु येऊन स्पर्धा मध्ये सहभागी होतात. शाळाबादाप्रमाणे याही वर्षी महापौर चषक स्पर्धाचे आयोजित करण्यांत येणार आहे. या स्पर्धामध्ये सायकल मॅरेथॉन स्पर्धांचा देखिल समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरुन सायकल पटुना देखिल या स्पर्धामध्ये सहभागी होता येईल. अन्य स्पर्धा प्रमाणेच सायकल स्पर्धाचा देखिल महापौर चषक स्पर्धा मध्ये समावेश करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर
अनुमोदक : श्री. प्रशांत देसरडा, श्री. जयवंत ओक

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दरवर्षी महानगरपालिकेतर्फे महापौर चषक, या नावाने विविध स्पर्धाचे आयोजन करण्यांत येते. या स्पर्धामध्ये महापौर चषक सायकल मॅरेथॉन स्पर्धेचा समावेश करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *"ऐनवळेचे विषय"*

**विषय क्र. ६६९/१**:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेत अन्य नगरसेवका सोबतच स्विकृत नगरसेवक देखील कार्यरत आहेत. महापालिकेच्या विविध प्रभागामधुन निवडुण आलेल्या नगर सेवकांना ते विविध पक्षांचे असल्यामुळे महापालिकेने स्वतंत्र दालने पुरविलेली आहेत. परंतु महानगरपालिकेने स्विकृत नगर सेवकांना स्वतंत्र दालन पुरविलेले नसल्याने स्विकृत सदस्यांची अत्यंत गैरसोय होत आहे. अन्य नगर सेवका प्रमाणेच स्विकृत नगरसेवकांना देखिल महापालिकेत बसणेसाठी स्वतंत्र दालन असणे अत्यंत आवश्यक आहे. स्विकृत नगर सेवकांना बसणेसाठी महानगरपालिकेत स्वतंत्र दालन तसेच इतर सर्व सुविधा पुरविणेसाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. जयवंत ओक
अनुमोदक : सलमा बानो

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतील स्विकृत नगरसेवकांना महापालिकेस बसणेसाठी स्वतंत्र दालन देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७०/२** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील मोहल्ला कबाडीपुरा येथे महानगरपालिकेचा दवाखाना सध्या बंद स्थितीत आहे. कारण सदरील दवाखान्याच्या समोर नाल्यावर मनपातर्फे शॉपिंग सेंटर बांधण्यात आलेले आहे. ज्यामुळे सदरील दवाखान्यात वार्डातील कोणतेही नागरिक जात नाही व नाल्याची दुर्गंधीमुळे औषधी व रुगणावर उपचार करणारे यंत्रणे खराब होत आहे व सामान्य नागरीकांना समोरिल शॉपिंग सेंटरच्या मागे मनपाचा दवाखाना आहे. हे माहित होतच नाही.

करिता सदरील दवाखाना नेहरु भवन मध्ये मनपाच्या वाहन चालकास दिलेल्या निवासस्थाना मध्ये स्थंलातरीत करण्यांत यावे व मनपा वाहन चालकास जुब्लीपार्क येथील रिकामे असलेल्या निवास स्थानामध्ये शिप्ट करण्यांत यावे करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अफसरखान यासीनखान
अनुमोदक : श्री. स.सलिम स. युसुफ

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका हद्दीतील मोहल्ला कबाडीपुरा येथील सध्या बंद स्थितीत असलेल्या दवाखाना नेहरु भवन येथे महानगरपालिकेच्या वाहन चालकास दिलेल्या निवास स्थानामध्ये स्थलांतरीत करण्यांत व महानगरपालिकेच्या वाहन चालकास जुब्लीपार्क येथील रिकामे असलेल्या निवास स्थानामध्ये शिप्ट करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७१/३** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, इंदौर महानगरपालिकेने शहरातील सर्व नागरिक व विद्यार्थी साठी अपघात/अपंगत्व बाबतचा विमा काढलेला आहे. त्या धर्तीवर औरंगाबाद

महानगरपालिकेतही सदरील योजना राबविण्याबाबत कारवाई व्हावी. सदरील योजने बाबतची संपुर्ण व सविस्तर माहिती इंदौर महानगरपालिकेतुन मागविण्यांत यावी.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर सादर.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर, श्री. राधाकृष्ण गायकवाड

अुनमोदक : जगदिश सिध्द

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, इंदौर महानगरपालिकेने शहरातील सर्व नागरिक व विद्यार्थीसाठी अपघात/अपंगत्व बाबतचा विमा काढलेला आहे. त्या धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेतही सदरील योजना राबविण्याबाबच्या कारवाईस व सदरील योजने बाबतची संपुर्ण व सविस्तर माहिती इंदौर महानगरपालिकेतुन मागविण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७२/४** :

आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे. की, दिनांक १३-०८-२००२ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर मा. सभापती स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. सभापती आरोग्य समिती व स. नगरसेवक नारेगांव प्रभाग यांनी आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचासह नारेगांव ट्रेडिंग ग्राऊन्ड येथील मे. सत्यम बायो फर्टीलयाझर प्रा.लि. या खत निर्मिती प्रकल्पास भेट देऊन सद्यापरिस्थितीचा आढावा घेतला संपुर्ण ट्रेनिंग ग्राऊन्ड कचऱ्याचे ढिगाराने व्यापलेला असल्याचे निदर्शनास आले. कचऱ्याची विल्हेवाट मे. सत्यम बायो फर्टिलायझर कडुन वेळोवेळी झालेली नाही. त्यामुळे येथील परिस्थिती अडचणीची झ ाली असुन नारेगांव येथील रहिवाश्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हिताचे नाही. व प्रदुषण वाढुन रोगराई, साथरोग पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तद्नंतर या विषयी मा. आयुक्तांच्या दालनात दुपारी ४.०० वाजता उपरोक्त पदाधिकारी व मुख्य लेखा अधिकारी व संबंधीत अधिकारी यांची तातडीने बैठक होऊन आरोग्याच्या दृष्टीने व प्रदुषण टाळणेसाठी कचऱ्याची त्वरीत विल्हेवाट कशी करता येईल यावर विस्तृत चर्चा झाली. चर्चेअंती असे ठरले की, नारेगांव ट्रेचिंग ग्रांऊड येथील कचरा ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत शेतकऱ्यांना व व्यावसायिकांना त्यांच्या स्वतःच्या वाहनाव्दारे मोफत (विनामुल्य) कचरा घेऊन जाणे बाबत त्वरीत वृत्तपत्रात जाहिर प्रगटन प्रसिध्दीस देण्यांत यावी व सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी ठेवावा.

त्यानुसार दिनांक १४-०८-२००२ रोजी प्रशासकीय मान्यता घेऊन कार्यलयीन जाहिर प्रगटन क्रमांक मनपा/आ.वि./नांगट्रेग्राकवि/ ११५४/२००२ दिनांक १४-०८-२००२ अन्वये स्थगित वृत्तपत्रात देण्यांत आले आहे.

नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंन्ड येथील साचुन असलेल्या कचऱ्याचे विल्हेवाट तातडीने होणेच्या दृष्टीने कचरा शेतकऱ्यांना व व्यावसायिकांना मोफत घेऊन जाणेसाठी प्रशासनाने घेतलेला निर्णयास सर्वसाधारण सभेच्या कार्यात्तरी मान्यतेसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारेगांव येथील रहिवासांच्या आरोग्याच्या दृष्टीने व प्रदुषण टाकणेसाठी नारेगांव कचरा डेपो येथील कचरा ज्या स्थितीत आहे. त्या स्थिती शेतकऱ्यांना व व्यावसायिकांना त्यांच्या स्वतःच्या वाहनाव्दारे मोफत (विनामुल्य) कचरा घेवुन

जाणेस आणि त्यानुशंगाने वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत आलेल्या जाहिर प्रगटनास कार्योत्तर मान्यता देण्यांत येते.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

## दिनांक ३०-०९-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**सोमवार दि. ३०-०९-२००२ रोजी मा. महापौर श्री. विकास जैन यांचे अध्यक्षते खाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त यांचेसह संबंधित अधिकारी वर्ग तसेच खाली प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
२) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
४) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. ऊमर
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.श्रीमती इंगळे शंकुतला सांडुजी
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी
११) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१३) स.स.श्रीमती धायातिक लिलावती बाळासाहेब
१४) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१५) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१६) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
१७) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१८) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
१९) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२०) स.स.सौ. विजया किशोर रहाटकर
२१) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२२) स.स.ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२३) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२४) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२५) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२६) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२७) स.स.श्री. अब्दुल रशिदा अब्दुल सत्तार
२८) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२९) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
३०) स.स.श्री. डॉ. भागवत किसनराव कराड
३१) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान

३२) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३३) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३४) स.स.श्री. नासेरखान सरदार खान
३५) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक
३६) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३७) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३८) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३९) स.स.श्री. तायडे पांडुरंग यंशवंतराव
४०) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४१) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४२) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४३) स.स.श्री. पारे सोपान भाऊराव
४४) स.स.श्री. राजपुत विमलबाई भिकनसिंग
४५) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
४६) स.स.श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद
४७) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४८) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
४९) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५०) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
५१) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
५२) स.स.श्रीमती शाहीन जफर महमुद जफर
५३) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५४) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५५) स.स.श्री. स. सलिम स. युसुफ
५६) स.स.श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
५७) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५८) स.स.सौ. सिद्दीकी नईम सुलताना सिद्दीकी म फसियोद्दीन
५९) स.स.श्री. शेख ईसाक शेख जैनोद्दीन
६०) स.स.श्रीमती सुलतान बेगम चाँदखाँ
६१) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६२) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
६३) स.स.श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान
६४) स.स.श्री. जगदिश कन्हेय्यालाल सिध्द
६५) स.स.सौ. बबिता सुभाष कागडा
६६) स.स.श्री. स.अली सलामी स. मीरा सलामी
६७) स.स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज
६८) स.स.सौ. परविन ईजाज अली

## ***स्विकृत सदस्य***

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह

२) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
३) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
४) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५) स.स.सौ. सलमा बानो मीर महमंद अली

संवाद

श्री. दानवे अंबादास : नुकताच गुजरातमधील स्वामी लक्ष्मीनारायण मंदिरात अतिरेकी हल्यात ४४ हिंदु भाविकांची हत्या करण्यांत आली या सर्वांना, तसेच जेष्ठ कवी स्व. वसंत बापट तसेच इतिहासकार स्व. शिवाजी सावंत माजी मंत्री पै. अब्दुल अजीम, अभिनेत्री स्व. प्रिया तेंडुलकर, तसेच श्री. राधाकिसन शिंदे यांचे आईचे निधन झालेले आहे. या सर्वाना सभागृहातर्फे ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

श्री. माणिक साळवे : तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहाय्यक श्री. नातु यांचे दुःखद निधन झाले त्यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : यास माझे अनुमोदन आहे. श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी तसेच गणपती विसर्जनाच्या वेळी वैजापुर मध्ये त्यांना गणपतींची विटंबना केली अशा देशद्राहिंना कडक शासन झाले पाहिजे. त्यादृष्टीने निर्णय घेऊन संबंधीत विभागाला कळवावे.

मा. महापौर : ठिक आहे. सर्वांनी श्रध्दांजली ०२ मिनिटे उभे राहावे.

याचवेळी गुजरात मधील हल्ल्यात मृत्यु झालेल्यांना जेष्ठ कवी, स्व. वसंत बापट तसेच इतिहासकार स्व. शिवाजी सावंत माजीमंत्री पै. अब्दुल अजीम, अभिनेत्री स्व. प्रिया तेंडुकर,श्री. राधाकिसन शिंदे यांच्या आई तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहाय्यक श्री.नातु या सर्वांचे निधना बध्दल सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

श्री. अविनाश कुमावत : आजच्या सभेला सर्व संबंधीत अधिकारी तसेच मा. आयुक्त यांनी उपस्थित राहणे गरजेचे होते. सभेला मा. आयुक्त नाहीत. जे काही प्रश्न दिलेले आहे तसेच जे प्रस्ताव आलेले आहे ते महत्वाचे आहे प्रशासनातर्फे प्रश्नाची उत्तरे देण्यासाठी आयुक्त हजर राहणे आवश्यक आहे म्हणुन मा. आयुक्त सभेला उपस्थित नसल्यामुळे आजची सभा तहकुब करण्यात यावी. आयुक्त जेव्हा येतील तेंव्हा सभा घेण्यात यावी.

श्री. किशनचंद तनवाणी : महत्वाच्या प्रस्तावावर चर्चा होणार आहे. मा. आयुक्त सभेला नाही . आयुक्त जोपर्यंत सभेला येत नाही तोपर्यंत सभा घेऊ नये.

श्री. सुदाम सोनवणे : नियमाप्रमाणे सप्टेंबर २००२ या महिण्यांची सभा २० तारखेच्या आत का बोलविण्यात आलेली नाही, याचा खुलासा करण्यांत यावा.

श्री.डॉ. भागवत कराड : सर्वसाधारण सभा असतांनाही मा. आयुक्त सभेला उपस्थित नाही. बाहेरगावी गेलेले असतील तर आपली परवानगी घेतलेली आहे का, माहिती देण्यांत यावी.

मा. महापौर : आज सकाळी मला उपआयुक्त यांनी माहिती दिली की, मा. आयुक्त आजारी आहे. प्रश्न व प्रस्तावावर खुलासा करण्यासाठी मा. आयुक्त सभागृहात उपस्थित नाही. आजची सभा ०३ तारखेपर्यंत तहकुब करण्यांत येते.

श्री. तकी हसनखान : यापुर्वी मा. आयुक्त सभेला नसतांना सभा घेण्यात आलेली आहे. आजची सभा सुध्दा घेण्यात यावी. आयुक्तांच्या जागेवर प्र.आयुक्त म्हणुन उपआयुक्त उत्तरे देतील.

मा. महापौर : सभा ०३ तारखेपर्यंत तहकुब करण्यांत येत आहे.

याच बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ०५-१०-२००२ रोजी (दि. ३०-०९-२००२ ची तहकुब सभा) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**शनिवार दि. ०५-१०-२००२ रोजी मा. महापौर श्री. विकास जैन यांचे अध्यक्षते खाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे दुपारी १२.१० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त संबंधित अधिकारी वर्ग तसेच खाली प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
२) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
४) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेद बेगम विखार अहेमद
७) स.स.श्री. शे. ईलियास किरमाणी
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.श्रीमती इंगळे शंकुतला सांडुजी
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी
११) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१२) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१३) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१४) स.स.श्रीमती धायतिलक लिलावती बाळासाहेब
१५) स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१६) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१७) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१८) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
१९) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२०) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२१) स.स.ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२२) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२३) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२४) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२५) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२६) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२७) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
२८) स.स.श्री. डॉ. कराड भागवत किसनराव
२९) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३०) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब

३१) स.स.श्री. नासेरखान सरदार खान
३२) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक
३३) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३४) स.स.सौ. खरात कुसुबाई दौलत
३५) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३६) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
३७) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
३८) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
३९) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४०) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
४१) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
४२) स.स.श्री. अ.कदीर मौलाना सय्यद
४३) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४४) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
४५) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४६) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४७) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
४८) स.स.श्रीमती शाहीन जफर महमुद जफर
४९) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५०) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५१) स.स.श्री. स.सलीम स.युसुफ
५२) स.स.श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
५३) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५४) स.स.सौ. सिद्यीकी नईम सुलताना सिद्यीकी म. फसियोद्यीन
५५) स.स.श्री. शेख ईसाक शेख जैनोद्यीन
५६) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५७) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
५८) स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
५९) स.स.श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान
६०) स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
६१) स.स.सौ. बबिता सुभाष कागडा
६२) स.स.श्री. स.अली सलामी स. मीर सलामी
६३) स.स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज
६४) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
३) स.स.श्री. तरवेंद्रसिंग धिल्लन
४) स.स.सौ. सलमा बानो मिर महंमद अली.

संवाद :

श्री. प्रकाश निकाळजे : या सभागृहाचे स.सदस्य सुनिल मगरे यांची महाराष्ट्र शासनाने माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर सदस्य म्हणुन नियुक्ती केलेली आहे. त्याबध्दल त्यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात यावे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : स.सदस्य श्री. सुनिल मगरे यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते.

श्री. शे.ईसाक शे. जैनोद्दीन : स. सदस्य श्री. स.अली सलामी यांचे वार्डात नुकताच बहुउद्योशिय हॉलचे उद्‌घाटन झाले सदर कार्यक्रम हा महानगरपालिकेतर्फे होता की, राजकीय पक्षातर्फे करण्यात आलेला होता. खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता : पैठणगेट येथील ज्या हॉलचे उद्‌घाटन झाले तो कार्यक्रम महानगरपलिकेतर्फे आयोजित करण्यात आलेला होता. व त्या हॉलचे उद्‌घाटन करण्यात आलेले आहे.

श्री. शे.ईसाक शे. जैनोद्दीन : आताच खुलासा झाला की, महानगरपालिकेतर्फे कार्यक्रम होता परंतु कार्यक्रमाच्या वेळी महानगरपालिकेचे कोणतेच अधिकारी उपस्थित नव्हते. या कार्यक्रमाचे संचलन पराभुत उमेदवाराने केलेले आहे तो व्यक्ती राजकीय पक्षाचे होते. हे नियमान बरोबर आहे का?

श्री. प्रकाश निकाळजे : महानगरपालिकेने बऱ्याच ठिकाणी सभागृह समाज मंदिरे बांधलेली आहेत. उद्‌घाटन करतांना स्थानिक नगरसेवकांच्या सम्मतीने कुणाला बोलु द्यायचे कुणाला नाही. ही परंपरा चालत आलेली आहे. हा खर्च महानगरपालिकेकडुन होत नाही. परंतु कार्यक्रम महानगरपालिकेतर्फे आयोजित केलेला असल्याने महानगरपालिकेमार्फत मदत केली जाते.

शहर अभियंता : या कार्यक्रमाची पत्रिका महानगरपालिकेतर्फे काढण्यात आलेली होती.

श्री. अफसर खान : या बहुउद्देशीय हॉलचे बांधकामासाठी महानगरपालिकेने १४ लक्ष खर्च केलेले आहे. अशा उद्‌घाटन कार्यक्रमाच्या वेळी बाहेरील एका राजकीय पक्षाचा व्यक्ती संचलन करीत असेल तर चुकीचा पायंडा पडत आहे. राजकीय कार्यक्रम होता असे दिसते. महानगरपालिकेचे अधिकारी तेथे उपस्थित असणे आवश्यक आहे. कार्यक्रमासाठी कोणते पदाधिकारी यावयास पाहिजे. त्यांना तसे कळवावयास पाहिजे. त्यांचा कार्यक्रमात मान सन्मान ठेवावयास पाहिजे. असे होत नसेल तर त्या कार्यक्रमास पदाधिकारी व महापौर सुध्दा उपस्थित असणार नाही. पदाधिकारी मान सन्मान करण्याबाबत टाळाटाळ होऊ नये. महापौर यांचे हस्ते उद्‌घाटन करणे आवश्यक होते. असे स.सदस्य श्री. शे. ईसाक शे.जैनोद्दीन यांचे मत आहे. महापालिकेचा पैसा खर्च झालेला आहे व जोही कार्यक्रम करण्यात आला त्याची चौकशी करुन कार्यवाही करावी.

श्री. शे. ईसाक शे.जैनोद्दीन : झालेला कार्यक्रम रद्द समजुन पुन्हा पदाधिकाऱ्यांच्या कार्यक्रमामध्ये अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्यात यावा.

श्री. अफसर खान : एका राजकीय पक्षाचे व्यक्ती घेवुन महानगरपालिकेचा कार्यक्रमामध्ये भाषण करतात. आपले अधिकारी उपस्थित नव्हते पदाधिकाऱ्यांना बोलविण्यात आले नाही. यात महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांची तसेच महानगरपालिकेची बदनामी झालेली आहे. झालेला अपमान कदापीही सहन

करणार नाही त्यामुळे दोषी अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी. जेणे करुन यानंतर असा प्रकार पुन्हा होऊ नये.

श्री. स.अली सलामी : माझ्या वार्डात जो कार्यक्रम झाला त्या संबंधी महानगरपालिकेतर्फे कार्यक्रम पात्रिका तयार करुन वाटप करण्यांत आलेली आहे. नियमाप्रमाणे कार्यक्रम झालेला आहे. संबंधीत भागाचे नगरसेवक यांचे मत घेऊनच उद्घाटनासाठी कोणास बोलवायचे ही परंपरा चालत आलेली आहे. त्याप्रमाणे मी सुध्दा या शहराचे आमदार व संपर्क मंत्री मा. श्री. दर्डा साहेब यांना कार्यक्रमासाठी बोलविले होते या कार्यक्रमास मा. महापौर सुध्दा होते. मा. महापौर या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. संचलन कोणलाही करावे लागते असे अनेक कार्यक्रमे झाले, बाहेरील लोकांनी संचालन केले आहे व पुन्हा एकाच इमारतीचे उद्घाटन केल्यास महानगरपालिकेची व महापौराची यात बदनामी होईल म्हणुन पुन्हा कार्यक्रम घेण्याची गरज नाही.

श्री. अफसर खान : संबंधीत अधिकारी संचलनासाठी उपस्थित का नव्हते महानगरपालिकेच्या कार्यक्रमात राजकीय पक्षाच्या व्यक्तीने येऊन भाषण करणे बरोबर नाही. यात महानगरपालिकेची, महापौरची बदनामी झालेली आहे. म्हणुन स.सदस्य श्री. शे.ईसाक शे.जैनोद्दीन यांनी केलेली मागणी मान्य करुन पुन्हा कार्यक्रम घेण्यात यावा नसता अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी.

श्री.स.अली सलामी : त्या दिवशी मा. आयुक्त सुट्टीवर होते श्री. उपआयुक्त यांना स्वत:दुरध्वनी करुन कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबत कळविले होते. परंतु नंतर अशी माहिती मिळाली की, पत्रिकेवर आमची नावे नाही म्हणुन उद्घाटनास आले नाही, असे समजले. परंतु उप अभियंता, कलीम अख्तर तसेच अभियंता हे उपस्थित होते.

श्री. अंबादास दानवे : मा. विरोधी पक्ष नेते तसेच स.सदस्य श्री. सलामी यांनी जे मुद्दे मांडले ते अत्यंत महत्वाचे आहे. प्रत्येक वेळेस असे होते की, संबंधीत वरीष्ठ अधिकारी हे कार्यक्रमाच्या वेळी नेहमीच गैरहजर राहतात. कार्यक्रम करणे ही जबाबदारी नगरसेवकांची नसुन प्रशासनातील संबंधीत अधिकाऱ्यांची आहे. परंतु नगरसेवकांवर जबाबदारी सोपवुन कार्यक्रम होतात. वरिष्ठ अधिकारी उपस्थित नसतात. क अभियंता हजर असतात ही नेहमीचीच परिस्थिती आहे. त्यामुळे असे प्रश्न निर्माण होतात. कार्यक्रम पत्रिकेवर आयुक्त, पदाधिकारी तसेच जेथे कार्यक्रम असेल त्या त्या प्रभागाचे संबंधीत सभापतीची नांवे असाव्यास पाहिजे. कार्यक्रमास आयुक्त तसेच त्या त्या विभागाचे कार्यकारी अभियंता सुध्दा उपस्थित असावयास पाहिजे. परंतु तसे होत नाही. अधिकारी असे समजतात की, ही जबाबदारी नगरसेवकांची असते. परंतु कार्यक्रम व्यवस्थित रित्या पार पाडण्याची जबाबदारी ही संबंधीत अधिकाऱ्यांची असते. म्हणुन यापुढे असे होऊ नये त्यासाठी कार्यक्रमास अधिकाऱ्यांची हजर राहणे व अधिकाऱ्यांनी संचलन करणे हे दोन्हीही मुद्दे महत्वाचे आहे. याबाबतीत कायमचा तोडगा काढण्यासाठी निर्णय घेण्यात यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : गेल्या दोन महिन्यासाठी कोणत्याही विकास कामाच्या विषयावर चर्चा होत नाही निर्णय नाही जो विषय निघाला तो जनतेच्या हिताचा नाही म्हणुन या विषयावर चर्चा न करता विषयपत्रिकेवर चर्चा करण्यात यावी.

श्री. अंबादास दानवे : या विषयावरची चर्चा समाप्त करावी. विषयपत्रिकेस सुरुवात करावी.

मा. महापौर : जो मद्दा विरोधी पक्ष नेते यांनी मांडलेला आहे त्यांचा मान सन्मानाचा प्रश्न आहे. त्या कार्यक्रमास मी सुध्दा उपस्थित होतो. त्यावेळेस त्यांचा अपमान झालेला आहे. त्यांची नाराजी या सभागृहाच्या वतीने दुर करण्यास येत आहे. त्यासाठी प्रशासनाला अशा सुचना करण्यांत येत आहे की, वार्डात कोणताही कार्यक्रम असो उद्घाटन असो. कोणत्याही पदाधिकारी किंवा नगरसेवकांचा अपमान होऊ नये याची दक्षता यापुढे घेण्यात यावी.

श्री. भाऊसाहेब ताठे : सिडको-हडको भागातील जनतेला दोन-तीन महिन्यापासुन दररोज पाणी येते. परंतु १०-१५ मिनिटेच पाणी येते. ही परिस्थिती किती दिवस राहणार आहे. योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : वार्ड क्र. १९ मध्ये गुंठेवारीच्या संदर्भात महानगरपालिकेचे संबंधीत आधिकारी यांनी बैठक घेतली त्या बैठकीत गुंठेवारी विषयावर माहिती देण्यात आली. माहिती देत असतांना गुंठेवारीच्या बाबतीत नगरसेवक प्रशासनाला मदत करित नाही व म्हणुन आपण मागे पडलेलो आहे अशी चर्चा झाली. व जनतेच्या मनात शंका आणुन दिली गेली व असे अशा महत्वाच्या विषयावर बैठका घेत असतांना संबंधीत वार्डाचे नगरसेवक यांना माहिती दिली जात नाही मी सुध्दा त्याच वार्डात राहतो. मला सुध्दा माहिती नाही. तसेच लक्ष्मी चावडी ते स्मशान रोड या रस्त्याचे रुंदीकरण करावयाचे आहे. रस्ता रुंदीकरण करण्यासाठी ज्या अडचणी येतात. त्यावेळी नगरसेवकांना नागरिकांना समजावुन सांगावे लागते. त्यावेळी अधिकारी आमच्याकडे का येतात. नगरसेवकांना अधिकाऱ्यांची गरज पडत नाही का? याचा सुध्दा खुलासा झाला पाहिजे.

मा. महापौर : आताच स.सदस्य श्री. गायकवाड यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यानुसार ज्या ज्या वेळी महानगरपालिके मार्फत शहरात विविध ठिकाणी विकास कामे करावी लागतात ज्या वेळी काही अडीअडचणी निर्माण होतात. त्यावेळी अधिकाऱ्यांना नगरसेवकांची आठवण येते वार्डात बैठका घेऊन नागरिकांना माहिती दिली जाते त्यापेक्षा नगरसेवकांना सुध्दा बोलविणे आवश्यक आहे. यापुढे असे होऊ नये याची अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी नसता हे सभागृह अधिकाऱ्यांवर वेगळया प्रकारची कार्यवाही करण्याचा निर्णय घेईल.

श्री. नंदकुमार घोडेले : प्रश्न उत्तरावर चर्चा नाही. धोरण ठरवावे जेणे करुन चांगल्या प्रकारे कामकाज चालविता येईल. अगोदर विषयपत्रिका घेण्यात यावी नंतर प्रश्नावर चर्चा करावी.

श्री. सुदाम सोनवणे : मागील तारखेची सभा मा. आयुक्त उपस्थित नव्हते म्हणुन सभा तहकुब केलेली होती ती आज सभा घेत आहोत. या बैठकीत महत्वाचे विषय आहे. एक कार्यक्रमाच्या निमित्ताने मा. विरोधी पक्षनेते यांचा अपमान झाला हा ही मुद्दा उपस्थित झाला. हा प्रश्न लहान असला तरी एका पदाधिकाऱ्यांचा अपमान झालेला आहे. म्हणुन या प्रश्नाला महत्त्व देऊन योग्य ती कार्यवाही होणे गरजेचे आहे यास मी सहमत आहे. त्यांनतर महसुली उत्पन्न तसेच सिडको हडको भागातील पाणी पुरवठयाच्या प्रश्नावर चर्चा घ्यावी.

मा. महापौर : स. सदस्यांनी आता चर्चा करावी. स.सदस्य श्री. ताठे यांनी चर्चा करावी.

श्री. भाऊसाहेब ताठे : सिडको हडको भागात १५-२० मिनिटे दररोज पाणी येत ते अपुरे पडते. तसेच थकीत बिलावर व्याज आकारले जाते. ते व्याज रद्द करुन दररोज पाणी देण्यात यावे अशी यथील जनतेच्या वतीने मागणी करीत आहे.

श्री. जयश्री किवळेकर : मागच्या सर्वसाधारण सभेत दररोज पाणी पुरवठा करण्याच्या निर्णय घेतलेला होता. परंतु दररोज येणारे पाणी हे १०-१५ मिनिटे येते. पाणी येणार अशी कल्पना असते. पाणी आलेले गेलेले समजत नाही. येतांना अगोदर ५ ते १० मिनिटे हवाच येते. पाणी केव्हा येणार व किती वेळ राहणार हे सुध्दा समजुन येत नाही. जनता आमच्या दारात येते. मागणी करतात. किमान ४५ मिनिटे तरी दररोज पाणीपुरवठा व्हावयास पाहिजे. गेल्या दोन वर्षापासुन पाण्याची जी समस्या आहे ती तशीच आहे मागील बिले दिलेली आहे. पाणीच नव्हते. तर लोकांनी बिले भरलेली नाही. आता त्या थकीत बिलावर व्याज आकारले जात असुन आमच्या मागणी नुसार ते व्याज रद्द करावे व जे या अगोदर एक दिवसाआड म्हणजेच १८० दिवस फक्त पाणी दिलेले आहे तेवढीच पाणी पट्टी आकारण्यात यावी. जायकवाडीत पाणी आहे जनतेला पाणी कमी मिळते कोण जबाबदार काय कारण आहे. याचा संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. सिडको हडकोला व्याज दर वगळण्यात यावे रोज पाणी द्यावे. संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. सिडको हडकोला व्याज दर वगळण्यात यावे. रोज पाणी द्यावे.

श्री. सुदाम सोनवणे : पाणी प्रश्नावर चर्चा करण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल सभागृहाच्या तसेच सिडको-हडको नगरसेवकांच्या वतीने आपले अभिनंदन करतो. सिडकोचा पाणीप्रश्न हा बऱ्याच दिवसापासुन चालु आहे. प्रत्येक सदस्य आपआपल्या वार्डात व सिडको हडको भागात वेळोवेळी पाणीपुरवठा कसा होईल यासाठी वेळोवेळी प्रशासनाला सुचना करतात परंतु आजची परिस्थिती अशी आहे की, सिडको हडको भागात पाणी पुरवठा व्यवस्थीत नाही. या सभागृहात बऱ्याच वेळा चर्चा झाली. मा. महापौरांनी ज्या सुचना दिल्या त्याचे पालन अधिकाऱ्यांनी केले परंतु पाण्याची परिस्थिती जशी आहे ती तशीच आहे. काहीही बदल झालेला नाही. पाणीच मिळत नाही. त्यामुळे व्याज आकारण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. व्याज आकरणी केली तर लोक पाणी पट्टी देखिल भरणार नाही. शहरात पाणी किती दिले जाते शहरात दररोज पाणी दिले जाते. सिडकोत गॅप दिला जातो. तर शहरात का नको या पर्यंत मी जाऊ इच्छित नाही. माझा प्रश्न असा की, सिडको हडको भागातील नागरिकांना पाणी दररोज आणि जास्त प्रमाणात दिले पाहिजे. जे व्याज आकारले जाते जर जनतेला पाणीच दिले जात नाही तर व्याज आकारण्याचा प्रश्नच येत नाही. पाणी कमी प्रमाणात व व्याज आकरले तर उलट जनतेला असे सांगण्यात येईल की, व्याज तर नाहीच परंतु पाणीपट्टी सुध्दा भरु नये असे सांगण्याची वेळ येईल. सभागृहात चर्चा होते एक दिवसाआड पाणी द्यावे त्यानुसार अधिकारी एक दिवसाआड पाणी देतात पुन्हा दुसऱ्या सभेत दररोज पाणी देण्याची मागणी होऊन निर्णय होतो. त्यामुळे नागरिकांच्या मनात गैरसमज निर्माण होत आहे. व अज्ञान पणाचे लक्षणाचे जनतेसमोर प्रदर्शन होत आहे. शहरात दररोज पाणी पुरवठा केला जातो. त्याप्रमाणे सिडको हडको भागातही करावी अशी आमची मागणी आहे. या भागातील जनतेला अगोदरच अतिक्रमणाच्या संदर्भात त्रास देण्यात

आलेला असुन आता पुन्हा वेळेवर व भरपुर पाणी न देण्याचा तसेच व्याज आकारण्याच्या दु:खात ही जनता अडकत आहे. जो पाणीपुरवठा केला जातो त्यात येथील नागरिक समाधानकारक नाही कारण एन-७ येथुन जेव्हा पाणी सोडले जाते पाणी येणाऱ्या १५ मिनिटे लागतात. व पुन्हा १५ मिनिटातच पाणी बंद होते याचा अर्थ १५ मिनिटे पाणी राहते. नागरिकांच्या अशा तक्रारी वाढलेल्या आहे की, महानगरपालिकेच्या मार्फत आम्ही विकास कामे करु शकत नाही. फक्त पाणी पुरवठा महानगरपालिका करते तो व्यवस्थित नाही. पाणी भरपुर द्यावे अशी नागरिकांची कळकळीची मागणी आहे. अतिक्रमणामुळे बऱ्याच लोकांना घराची डागडुजी करायची आहे. हिंदुचे सण आलेले आहे. उद्यापासुन नवरात्र महोत्सव सुरु होत आहे. उपवास सुरु होत आहे. नागरिकांचे प्रश्न सोडण्यासाठी आम्ही बोलत आहेत. त्यासाठी उद्यापासुन वेळेवर व मुबलक पाणी देण्यात यावे. कागदोपत्री फक्त दररोज पाणी दिले जात आहे परंतु नागरिक समाधानी नाहीत त्यासाठी एक दिवसाआडच पाणी देऊन मुबलक पाणी देण्यात यावे अशी नागरिक तसेच सभागृहाच्या वतीने विनंती करण्यात येत आहे. दररोज पाणी देणार असेल तर १ तास पाणी द्यावे नसता एक दिवसाआड भरपुर पाणी द्यावे पणी वेळेवर व मुबलक देण्यांत येत नसेल तर व्याज आकारण्याचा प्रश्न येत नाही. सणाच्या निमित्ताने वेळेवर व मुबलक पाणी देण्याची कार्यवाही झाली तर नक्कीच स.सदस्य त्यास मान्य करतील. व यापुढे एक दिवसाआड मुबलक पाणीपुरवठा करण्यांत यावा अशी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री. प्रशांत देसरडा : सिडको हडकोतील जनतेचया पाणीप्रश्नाबाबतच्या समस्या जाणु घ्यायच्या असेल तर सकाळी ७ ते ८ च्या दरम्यान सदस्यांच्या घरी किती लोक तक्रारी घेऊन येतात याची प्रचीती येईल. त्योवळी आपण सिडका हडको भागातील लोकांच्या समस्या लक्षात घ्याव्यात प्रत्येक वेळी सभागृहात नुसती चर्चा होते. व त्या दिवशी फक्त अंमलबजावणी होते पुन्हा तोच प्रश्न उपस्थित होतो. लोकमत टाऊन सेंटरचा भाग शहराला लागुन आहे. त्या भागात पाणी दिले जात नाही तेथुनच सिडको हडको भागात होणारा पाणी पुरवठा नियोजन नसल्यामुळे वेळेवर व भरपुर होऊ शकत नाही. अशी शंका निर्माण होते. उड्डाण पुलाच्या खाली सिडको हडको भागास पाणीपुरवठा होणारी पाईप लाईनचा वॉल येतो. त्या वॉलची सुरक्षितता राहण्याच्या दृष्टीने त्या ठिकाणी कार्यवाही करावी. नुकतेच दोन दिवसापासुन सिडको हाडकोला पाणी दिलेले नव्हते त्याचे कारण असे की, जो वॉल उड्डाण पुलाच्या खाली आहे तो लीकेज झालेला आहे. मोठया प्रमाणात पाणी गळती होते. प्रशासनाने या वॉलवर संबंधीत ठेकेदाराकडुन स्लॅब का टाकुन घेतलेला नाही. रस्ते विकास महामंडळ हे काम करुन देणार आहे की नाही. यासर्व बाबतीत प्रशासनाकडुन खुलासा व्हावा. वॉल उघडता येत नाही. वाईट परिस्थिती आहे ते फक्त दिड कोटीचा वाटा घेणार.

श्रीमती लिलावती धायातिलक : जो प्रश्न आताच सदस्यांनी पाणी प्रश्नाच्या बाबतीत उपस्थित केला तीच समस्या माझ्या वार्डात आहे. महानगरपालिकेचे कर्मचारी वसुलीसाठी येतात. नळ तोडण्याची कार्यवाही होते. नागरिक तक्रार घेऊन माझ्याकडे येतात. व पाणीच नाही तर पाणीपट्टी कोठुन द्यायची असा प्रश्न करतात. अनधिकृत नळ कनेक्शन कायम करण्यासाठी काही

लोकांनी पैसे भरलेले आहे. त्यांना पावत्या दिलेल्या नाही. त्याची काहीही नोंद झालेली नाही. लोक तक्रारी घेऊन येतात. नळ कनेक्शन कायम करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी. जेणे करुन महापालिकेचे उत्पन्न सुध्दा वाढेल. माझ्या वार्डातील जनता गरिब आहे. एकाच वेळी संपुर्ण रु. १२००/- पाणीपट्टी भरु शकत नाही. दर महिण्याला किंवा २ महिण्याला थोडे थोडे करुन भरुन घ्यावे तरी चालेल. परंतु त्यांचे म्हणणे आहे पाणीच मिळत नाही. यावर उपाय काढावा.

सौ. जयश्री. कुलकर्णी : सभागृहात सुचना दिल्यानंतरही अधिकारी अंमलबजावणी करीत नाही, तसेच मा. आयुक्तांनी सुचना दिल्यानंतरही कार्यवाही वेळेवर होत नाही. रेग्युलरपाणी पुरवठा कशा पध्दतीने प्रशासन देऊ शकेल. याचा खुलास द्यावा. सिडको हडको भागातील ७० ते ७५% नागरिक रेग्युलर पाणीपट्टी भरतात. किमान दोन वर्षापासुन पाण्याची समस्या आहे. जनतेला पाणीच वेळेवर व मुबलक दिले जात नाही थकीत बिलावर व्याज आकारण्यात येत आहे. ते रद्द करण्यात यावे.

श्री. भगावन रगडे या सभागृहात येण्यास व महानगरपालिकेचे सदस्य पद घेण्यास दोन ते अडीच वर्षाचा कालवधी गेलेला आहे. तेंव्हापासुन या सभागृहात प्रत्येक बैठकीत सिडको हडको भागातील पाणी प्रश्नावर चर्चा होते. तसेच समित्यांच्या बैठकीमध्ये सुध्दा चर्चा होते. चर्चा करण्याची परवानगी दिल्यास सभागृहाचा वेळ वाया जाऊन शहरातील विकास कामे होण्याच्या दृष्टीने सभागृहाचे कामकाज होत नाही. गुंटेवारीचा विकास दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी असणाऱ्या योजना घरबांधणीचा विकास असे अनेक प्रश्न आहे त्यावर चर्चा करण्यास वेळ न देता नेहमीच पाणीप्रश्नावर चर्चा होते. याबाबतीत प्रशासनाने ठोस निर्णय घेऊन कार्यवाही केली पाहिजे. अडचणी काय आहेत त्या समजुन सांगितल्या पाहिजे. नेहमीच अशी चर्चा न होता विकास कामाच्या दृष्टीने चर्चा होणे गरजेचे आहे.

श्री. सुदाम सोनवणे : पाण्याचा प्रश्न हा ज्वलंत प्रश्न आहे. त्यावर चर्चा होणे आवश्यक आहे. सर्वांना पाण्याची गरज भासते.

श्री. भगवान घडामोडे : सिडको हडको भागातील जनतेसाठी पाणीप्रश्न हा कायमचा सोडवावा असा स. समस्या यांचा सांगण्याचा उद्देश आहे आताच चर्चा झाल्याप्रमाणे एक दिवसाआड पाणी द्यावे तर दुसऱ्या बैठकीत दररोज पाणी द्यावे अशी चर्चा होते. झालेली चर्चा आम नागरिकांचे समोर जाते. त्यामुळे सभागृहाची प्रतिमा खराब होते. आता दररोज पाणी दिले जाते, परंतु १५ ते २० मिनिटे पाणी येते. एक दिवसा आड पाणी दिल्यास एखादे दिवशी विद्युत पुरवठा नसेल तर दोन विसाआड पाणी येईल. सिडको हडको भागात सर्व अधिकृत नळ कनेक्शन आहेत. जेवढे पाणी मिळवयास पाहिजे. तेवढे दिले जात नाही. यात नियोजनाचा सुध्दा अभाव आहे. टप्याटप्याने पाणी दिले जाते. त्यात गॅप देऊन सर्व भागात समान पाणी देण्यांत यावे. तसेच घर वापरासाठी लागणारे पाणी हातपंप इतर काही मार्गाने आणता येत असेल तर पिण्याचे पाणी कमी प्रमाणात लागेल. सिडको हडको भागात नेहमीच सणाच्या दिवशी पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. मागील वेळेसचा आपल्याला अनुभव आलेला आहे. मागिल वर्षीच्या दसऱ्याच्या दिवशी पाणी दिले नव्हते. रात्री २ वाजेपर्यंतत टँकरव्दारे जनतेला पाणी द्यावे लागले ही परिस्थिती

यावेळेस राहु नये आता दसरा दिवाळी सण आलेले आहे रेग्युलर पाणी देण्याबाबत मा. आयुक्त यांना सुध्दा पत्र दिलेले आहे. ४५ मिनिटे पाणी दिले जाईल असे आश्वासन दिले होते. अद्याप कार्यवाही नाही. नुसती सभागृहात चर्चा होते अंमलबजावणी होत नाही. सिडको हडको भागात कशा पध्दतीने पाणी वाटप केले जाईल. किती वेळ पाणी देणार या बाबतीत प्रशासनाने नियोजन काय आहे खुलासा घेण्यात यावा. वेळेवर व भरपुर पाणी दिले जात नाही. व्याज आकारणी होते. जनतेला भरपुर पाणीच मिळत नाही तर व्याज आकरलेल्या रक्कमेचा प्रश्न वेगळाच आहे. भरपुर पाणी दिले तर जनता पाणीपट्टी भरेल व्याज आकारण्यात येऊ नये ते रद्द करण्यात यावे.

श्री. काशिनाथ कोकाटे : पाणी पश्नाबाबत बऱ्याच स.सदस्यांनी आपल्या समोर व्यथा मांडलेल्या आहे. नेहमीच या सभागृहात चर्चा होऊ नये व हा प्रश्न एकदम निकाली काढावा असे मत स.सदस्य श्री. रगडे यांनी मांडलेले आहे. त्यांनी वेगळया शब्दात मांडल्या सभागृहात नुसती चर्चा होते. वृत्तपत्रात बातम्या येतात. फोटो येतात. आम्ही बाजु मांडली असे दाखविले जाते परंतु निर्णय घेतल्यानुसार अंमलबजावणी होत नाही असे स. सदस्यांचे मत आहे. सभागृहात नुसती चर्चा होऊन निर्णय घेणार नसाल तर तर चर्चेला अर्थ राहणार नाही व काहीही न्याय मिळणार नाही. एक दिवसाआड १ तास पाणी द्यावे किंवा दररोज किमान ४५ मिनिटे पाणी द्यावे यापैकी कोणताही निर्णय घेतल्यास योग्य होईल. जी वस्तुस्थिती आहे. त्याबध्दल सभागृहात चर्चा व्हावी इतर चर्चा होऊ नये. शहरात ३६५ दिवस पाणी दिले जाते परंतु सिडको हडको भागात फक्त एक दिवसाआड म्हणु ६ महिने पाणी दिले जाते म्हणुन जेवढया दिवस पाणी दिले तेवढेच दिवसाचे बिल आकारावे पाण्याच्या बाबतीत अशी परिस्थिती असेल तर व्याज आकारण्याच्य बाबतीत सुध्दा नियमाप्रमाणे न्याय द्यावा लागेल. दुसरा मुद्दा असा की, सन २००० मध्ये एन-११, एन-२ व इतर काही घरांना पाणी दिलेले नव्हते म्हणुन ५ वर्षाची तसेच काही घरांना ३ वर्षाची पाणीपट्टी माफ केलेली होती. न्यायालयाच सुध्दा निर्णय झालेला आहे. तसेच स्थायी समितीच्या सभेत जेव्हा सभापती श्री. ढगे होते त्यांनी सुध्दा निर्णय दिलेला आहे. परंतु कोणतीही कार्यवाही झालेली नाही. जेथे अंमलबजावणी करायची ती होत नाही परंतु जनतेला पाणी दिले जात नाही. उलट व्याज आकारणी होत असेल तर योग्य नसुन ते व्याज रद्द करण्यात यावे. व २००० मध्ये या सर्वसाधारण सभेने घेतलेला एन-११, एन-२ भागातील नागरिकांचा पाणीपट्टी माफीचा प्रस्तावाची अंमलबजावणी करुन या सभागृहातील स.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन जनतेच्या भावनेचा आदर ठेवुन आपण योग्य तो निर्णय घ्यावा व सिडको हडको भागात वेळेवर भरपुर पाणी केसे देता येईल यासाठी योग्य तो ठोस निर्णय घेण्यात यावा.

सौ. जयश्री मोरे : सिडको हडकोच्या पाणी प्रश्नावर नेहमीच चर्चा होते. परंतु काहीच उलगडा होत नाही. महानगरपालिकेबध्दल नागरिकांच्या मनात अत्यंत वाईट भावना झालेल्या आहेत. जनतेच्या भावनांचा विचार करावा. व जे व्याज आकारले जाते ते माफ करण्यात यावे.

श्री. अफसर खान : गेल्या ७ वर्षापासुन सिडको हडको भागातील पाण्याच्या प्रश्नावर नेहमीच बैठकीत चर्चा होते ७ वर्षापासुन पाण्याची टंचाई आहे. आजपर्यंत

कोणताही ठोस निर्णय घेऊन तेथील जनतेचा पाणी प्रश्न अद्याप सुटलेला नाही. पाण्याशिवाय कोणताही मुनष्य जीवन जगु शकत नाही. सिडको हडकोतील जनतेला शहराप्रमाणेच मुबलक पाणी कसे देता येईल यासाठी काय उपाययोजना राबविता येईल याचा प्रशासनाकडुन खुलासा घेण्यात यावा. आतच स.सदस्यांनी सुचना मांडल्या २० मिनिटे पाणी येते परंतु २० मिनिटाऐवजी कमीत कमी १ तास पाणी दिले पाहिजे. सिडको हडकोची जनता आपलीच आहे. तसेच वॉल लिकीजेसचा मुद्दा मांडला त्यामुळे कमी प्रमाणात पाणी वाटप होऊ शकेल. शहरात असे किती ठिकाणी वॉल लिकीजेस आहे. याची सुध्दा माहिती घेऊन पाण्याचा गैरवापर होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. जेणे करुन नागरिकांना वेळेवर पाणी मिळु शकेल. राहिला व्याजाचा प्रश्न सिडको हडको तसेच शहरातील जनता ही आपलीच आहे. जे १५% व्याज आकारले जात आहे ते तात्काळ रद्द करण्याचा निर्णय आजच घेण्यात यावा अशी सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

श्री. प्रकाश निकाळजे : अत्यंत जिव्हाळयाच्या प्रश्नावर चर्चा चालु असुन सर्व सदस्य एकजुटीने होऊन सभागृहात पाणी प्रश्नावर चांगल्या प्रकारे चर्चा करतात प्रश्न मांडतात. पाणी टंचाई लक्षात घेऊन गेल्या तीन महिण्यापुर्वी ७ कोटी रुपयांची एक्सप्रेस लाईनचे काम सुरु केलेले आहे. सर्वजण एकत्र आल्यामुळेच हे घडले आहे. असे म्हटले तरी वावगे नाही. या शहरात आज ही असा काही भाग आहे की, दररोज ४५ मिनिटे पाणी देऊ शकत नाही. काल मी निमित्त सिडको भागात एन-१,एन-३,एन-४ भागात गेलो होतो. मोठमोठे बंगल्याच्या आवारात मोठमोठी झाडी, हरळ होती, सिडको हडको भागात पाणी नाही असे म्हटले जाते परंतु झाडांना पाणी कोठुन दिले जाते असे प्रश्न निर्माण झाला विचारणा केली की हौद खाली असतांना पाण्याची टाकी वरती का? त्यावर असे उत्तर मिळाले की, पाणी भरपुर येते व विद्युत मोटारीने पाणी टाकीमध्ये सोडले जाते. व त्यानंतर हौदात सोडले जाते. अशी परिस्थिती दाखविली याचा अर्थ जे मध्यम वर्गीय लोक आहे त्यांच्याच भागात पाणी जात नाही का? मोठमाठया लोकांच्या बंगल्यात पाणी दिले जाते अशी परिस्थिती असतांना सुध्दा संपुर्ण सिडको हडको भागात पाणी नाही असे म्हटले जाते. सन १९७५ ला नगर परिषदेच्या काळात हर्सुल धरणातुन पाणी आणले जात होते त्यानंतर शहराचा व्याप लक्षात घेऊन ७.०० मी.मी. व्यासाची पाईप लाईन टाकण्यात आली. हे शहर झपाटयाने वाढले. कारखानदारी सुरु झाली लोकसंख्या वाढली व त्यामुळे पाण्याची जास्त प्रमाणात गरज भासत असल्याने १९९० ला १४०० मी.मी. व्यासाची पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे. शहराची लोकसंख्या वाढते परंतु पाणी येण्याचे प्रमाण आहे तेच आहे. पाहता पाहता लोकसंख्या १० लक्षावर गेली तसेच वार्डात कर्मचारी नळ कनेक्शन बंद करण्यास गेल्यास आपणच म्हणतो आपलेच आहे राहु द्या एकीकडे जबाबदारी काय असते. हे सुध्दा समजुन घेतले पाहिजे व्याज कमी करावे तसेच पाणीपट्टी कमी करावी असा प्रश्न उपस्थित झालेला आहे. वर्कवाईज बजेट मंजुर केलेला असुन यातुन कोणती कामे कमी करुन व्याज न आकारण्याचा निर्णय घेणार आहे. टारगेट पुर्ण झाले पाहिजे नसता विकास कामे कमी होतील सिडको हडको

भागासारखीच जुन्या शहरात सुध्दा १ दिवसाआड पाणी येते. परंतु ओरड कुणी करीत नाही. सिडको हउको भागतील पाणी पुरवठा करण्याची महानगरपालिका चांगल्या रितीने जबाबदारी पार पाडते. सभागृहाच्या वतीने प्रशासनास सांगु इच्छितो की. जी ७०० मी.मी. व्यासाची पाईप लाईन तात्काळ कशी होईल यासाठी प्रयत्न करुन या भागातील जनतेचा पाण्याचा प्रश्न कसा सुटेल याकडे लक्ष द्यावे व पाणीपट्टी थकीत बिलावरील व्याज वगैरे कमी करण्याबाबत सभागृहाने समजुन घ्यावे. व व्याज आकारणी रद्द करण्याचा निर्णय घ्यायचा असेल तर कोणत्या हेड मधुन भरण्या करणार आहात याचा खुलासा करावा.

श्रीमती लिलावती धायतिलक : वार्डात स्वेच्छा निधीतुन हात पंप करण्याबाबत पत्र दिले अद्याप कार्यवाही नाही.

मा. महापौर : स.सदस्यांच्या प्रश्नाचा खुलासा करावा पाण्याचा प्रश्नावरील चर्चा संपल्यानंतर उत्तर तयार ठेवावे.

श्री. मोतीलाल जगताप : नगरसेवकांना निवडुन येऊन अडीच वर्षाचा कालावधी झाला परंतु अद्याप पर्यंत सिडको हडको भगातील जनतेचा पाणी प्रश्न सुटलेला नाही. निर्णय काहीच झालेला नाही. एक्सप्रेस लाईनचे कामाची घोषणा आपल्या काळात झाली काम सुध्दा सुरु झालेले असुन आपल्या कार्यकाळात या पाईपलाईन व्दारे मुबलक पाणी दिले तर बरेच होईल. या भागात एक दिवसा आड पाणी मिळते, त्यासाठी ६ महिण्याचीच पाणी पट्टी आकारणी करावी. सर्वांनी या निर्णयाला पाठिंबा दिलेला आहे व पाणी प्रश्नाची समस्या कशी सोडविता येईल यासाठी प्रयत्न करावे पाणीपट्टी अर्धीभरण्याबाबत निर्णय द्यावा.

श्री. भगवान घडामोडे : सिडको हडकोतील जनतेच्या थकीत बिलावरील व्याज माफ करण्या संदर्भात विरोधी पक्ष नेते यांनी आम्हाला पाठिंबा दिलेला त्या बध्दल त्यांचे अभिनंदन करतो. परंतु सदस्यांनी यास विरोध दर्शविला त्यांनी चळवळीत काम केलेले आहे काय अशीच शंका घेण्याची वेळ आलेली आहे. विरोधी पक्षनेते हे सर्व गोरगरिब नागरिकांचे नेतृत्व करतात सर्वांच्या समस्या जाणुन घेतात म्हणुनच त्यांनी पाठिंबा दिला त्यांना सर्व जनतेची परिस्थिती माहित आहे जे विरोध करतात त्यांनी स्वतः येऊन प्रत्यक्ष बघावे जे की जनता जी मागणी करीत आहे ती बरोबर आहे म्हणुन व्याज माफ करण्यात यावे प्रकाश निकाळजे यांनी फक्त एन-३,एन-४ येथेच पाहणी केलेली आहे उच्चस्तरीय लोकांचेच घरामध्ये पाण्याची पाहणी केली त्यामुळे मतपरीवर्तन झाले की काय ते कुणचे नेतृत्व करतात असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. सिडको हडको भागातील ७०% जनता कामागार आहे. दररोजचे कामधंदे करुन रोजी रोटी मिळविणारे लोक आहेत. एक दिवसाआड पाणी दिले तर तेवढयाच दिवसाची पाणीपट्टी आकारावी अशी तेथील स्थानिक नगरसेवकां-कडे मागणी करतात म्हणुन व्याज आकारणी सुध्दा रद्द करुन ६ महिन्याचीच पाणीपट्टी आकारावी.

श्री. डॉ भागवत कराड : सिडको हडको भागात व्यवस्थित पाणी पुरवठा होत नाही बऱ्याच तक्रारी आहे वारंवार सभागृहात ही चर्चा होते. एक्सप्रेस लाईनचे काम सुरु आहे आपण पाणी पुरवठा विभागात नविन अधिकारी दिलेले आहे. पाणी पुरवठा व्यवस्थिती करण्याबाबत त्यांची नेमकी काय भुमिका आहे. हे समजुन

घेण्याची वेळ आहे. त्यांचेकडुन सभागृहाने माहिती घ्यावी नियोजन काय करणार आहे. सिडको हडकोच्या नागरिकांसाठी ५ ते ६ कोटी रुपये खर्च करणार आहे एका संचिकेत असे आढळुन आले की, ही पाईप लाईन सिडको हडको विभागामार्फत झाली पाहिजे जेणे करुन सिडकोने भुखंड विकले पैसा कमविला व मुंबई,पुणे सारख्या शहरासाठी वापरला म्हणुन जो पैसा येथे कमविला तो त्या भागातच खर्च कराव. जी संचिका गहाळ झालेली होती ती सापउलेली म्हणुन नविन अभिनंदन करावे. व एक दिवसाआड पाणी द्यायचे की दररोज पाणी द्यायचे या बाबतीत सर्व सिडकोचे स. सदस्य, संबंधीत अधिकारी यांचे समवेत बैठक घेऊन त्यानंतरच निर्णय घ्यावा. तसेच पाणीपट्टी आपण कमी करु शकणार नाही परंतु जे व्याज आकारले जाते ते रद्द करावे.

श्री. भाऊसाहेब ताठे : एक दिवसाआड पाणी देणार असेल तर ६ महिण्यासाठी पाणी पट्टी आकारावी.

श्री. सुदाम सोनवणे : चर्चेमध्ये जास्त वेळ न देता योग्य निर्णय घ्यावा पाण्याचे नियोजन कसे करणार १ दिवसाआड पाणी देणार असेल तर ६ महिण्याचीच पाणी पट्टी आकारावी.

श्री.पांडुरंग तायडे : गेल्या वर्षभरात फक्त ६ महिने पाणी दिलेले आहे. त्यामुळे फक्त ६ महिण्याचीच पाणीपट्टी आकारण्यात यावी. व जे थकीत बिलावर व्याज आकारले जाते ते रद्द करावे. आज वार्डात पाणी आले नाही म्हणुन सभेला येण्यांस उशिर झाला टॅकर मागवावे लागले. १० तारखेपर्यंत आपण प्रत्यक्ष वार्डात भेट दिली नाही व पाण्याच्या बाबतीत सिडको हडकोच्या समस्या समजुन घेतल्या नाही, तसेच व्याज आकारणी रद्द व ६ महिण्याचीच पाणीपट्टी आकारण्याचा निर्णय घ्यावा. नसता येत्या १६ तारखेपासुन मी जनते समवेत महानगरपालिकेच्या गेट समोर मौनव्रत धारण करणार आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

श्री. स.अली सलामी : शहरात सुध्दा पाणी मुबलक येत नाही. व्याज आकारणी रद्द करावी. अर्थसंकल्पात मंजुरी झाल्या प्रमाणे थकबाकीवर व्याज आकारणी करतात.

सौ. कुसुमबाई खरात : एक दिवसा आड पाण्याची मागणी सदस्यांनी केली परंतु तसा निर्णय घेतल्यास १ दिवासाआड ऐवजी ३ दिवसानंतर ही बऱ्याच वेळा पाणी मिळते. शहरात दररोज पाणी दिले जाते. त्याप्रमाणे सिडको हडको भागात येत नाही कमीत कमी ४५ मिनिटे दररोज पाणी द्यावयास पाहिजे फक्त १०-१५ मिनिटे पाणी येते. १० मिनिटे पाईप भरण्यासाठी लागतात त्यानंतर पाणी येते. या सभागृहात येऊन अडीच वर्षाचा कालावधी झाला परंतु पाण्याचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही पाण्याच्या बाबतीत लाकांच्या खुपच तक्रारी असतात. त्यांना काय उत्तरे द्यावीत असा प्रश्न पडतो.

सौ. बबिता कागडा : माझ्या वार्डात ८ दिवसापासुन पाणी येत नाही. पाईप लाईन चोकअप झाली असे सांगितले जाते १० मिनिटे पाणी येते. ३-३ हंडे सुध्दा पाणी मिळत नाही.

मा. महापौर : संबंधीत अधिकारी यांनी स. सदस्य यांचे वार्डात पाणी का येत नाही, याचा त्यांना लेखी खुलासा द्यावा. या संदर्भात अभिनंदन करासेसे वाटते की, पाणी प्रश्नावर सिडकोचे नगरसेवक एकजुटीने येऊन प्रश्न मांडतात सिडकोची जी योजना आपण राबाविणार त्यास सर्वच सदस्यांच्या सम्मतीने

होत आहे. त्यावेळी सर्वांनी मान्यता दिली. सिडकोसाठी जी ५.१० कोटीची तरतुद बजेट मध्ये केलेली आहे. त्यास सर्व सिडकोच्या नगरसेवकांनी आग्रह धरला होता त्यास इतर सर्व सदस्यांनी सहकार्य केले ती योजना करण्याचे काम सुध्दा चालु आहे. आणि महानगरपालिकेची सर्वात मोठया खर्चाची ही योजना चालु वर्षात करण्यात येत आहे. दोन मुख्य मागण्या स. सदस्यांच्या आहे. त्यात पाणी पुरवठा दररोज किंवा एक दिवसाआड पाणी द्यायचे असेल तर भरपुर द्यावे असेही मत स. सदस्यांनी मांडले व दुसरा मुद्दा व्याज आकारणे रद्द करावे. यासाठी प्रशासनाचे मत काय आहे ते जाणुन घेण्याची आवश्यकता आहे. प्रशासनाने खुलासा करावा. व्याज रद्द करता येईल का?

श्री. नंदकुमार घोडेले : मालमत्ता तसेच पाणीपट्टी वरील थकीत रक्कमेवरील व्याज आकारु नये रद्द करण्यांत यावे शहरासाठी सुध्दा कर आकारण्याबाबत व्यवस्थित कार्यवाही झालेली नाही, कमी जास्त कर आकारलेला आहे.

श्री. अफसर खान : शहरासाठी व सिडको वासीयांसाठी थकीत बिलावर व्याज आकारु नये. आम्ही दर कमी करा म्हणत नाही. व्याज कमी करावे नियोजन नाही. सुसुत्रता नाही.

मा. महापौर : प्रशासनाने खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : अर्थसंकल्प सादर केला तेव्हांच निर्णय घेण्यात आला आहे. उत्पन्न बाजुवर चर्चा झाली व थकीत रक्कमेवर व्याज आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. आज रोजी ३६ कोटी मालमत्तेची थकबाकी तसेच पाणीपट्टी १२ कोटीची थकबाकी आहे. नागरिकांनी वेळेवर कर भरावा पाणीपट्टी भरावी अशी प्रवृत्ती निर्माण व्हावी जणे करुन कर भरणा केला नाही तर व्याज आकारु शकते. प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने व्याज आकारणीचा निर्णय घेतलेला आहे. महानगरपालिकेकडे ज्या डिपार्टमेंटचे कर्ज आहे. त्यावर जे बिले येतात ती थकीत रक्कम भरणा केली नाही तर व्याज आकारणी होते. गोदावरी महामंडळाकाडुन कर्ज घेतो. त्यावर व्याज आकारले जाते. एम.एस.ई.बी.चे जे बिले प्राप्त होतात त्यावरही व्याज आकारले जाते. ते व्याज महानगरपालिकेला द्यावे लागते ते नागरिकांच्या पैशातुनच द्यावे लागते त्यादृष्टीन महानगरपालिकेची जी वसुली आहे ती सुध्दा वेळेच्या आत व्हावी. हा उद्देश डोळया समोर ठेवुन व्याज आकारणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. पाणीपट्टी व मालमत्ता कराची एकुण ४८ कोटीची थकबाकी असुन नागरिकांनी मुद्दल रक्कम भरणा करावी जेणे करुन त्यानंतर रेग्युलर व्याज आकारणी करता येणार नाही. ३१ मार्च नंतर जर थकीत व्याज आकारावे असे झोन अधिकाऱ्यांना पण सुचना दिलेल्या आहेत. पुर्ण रक्कमेवर व्याज आकारणी करायची नाही. इतर विभाग महानगरपालिकेकडुन व्याज वसुल करते व महानगरपालिकेची वसुली सुध्दा वेळेवर व्हावी. विकास कामे व्हावीत हा दृष्टीकोन समोर ठेवुन व्याज आकारणी करित आहोत याचा विचार करुन सभागृहाने सुध्दा योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री. नंदकुमार घोडेले : महानगरपालिका जनतेची सेवा करते, उत्पन्नाचे इतर मार्ग आहेत. व्याज आकारले म्हणुन उत्पन्न खुप मोठया प्रमाणात वाढेल असे नाही. थकीत रक्कमेवर जे व्याज आकारतो तो निर्णय रद्द करावा अशी सभागृहाच्या वतीने विनंती.

श्री. भगावान घडमोडे : आताच खुलासा केला ३६ कोटी मालमत्ता कराची व १२ कोटी पाणीपट्टीची थकबाकी आहे ही थकबाकी एका वर्षाची आहे का? टारगेट ठरवुन दिलेले होते त्या त्या विभागाचे अधिकाऱ्यांनी का वसुली केली नाही वसुली केली नाही म्हणुन त्या अधिकाऱ्यांचे वेतन दिलेले नाही का? काही ठिकाणी एका घराला ५०००/- रुपये कर आकारला जातो तर त्याच साईजच्या बाजुच्या घराला १००००/- रुपये आकारणी होते तो व्यक्ती न्यायलायत प्रकरण दाखल करतो त्यामुळे येणारे उत्पन्न नाही ही चुक आपल्या कर्मचाऱ्यांची होते. अशी प्रकरणे किती आहे ती निकाली काढण्या संदर्भात या सभागृहात बऱ्याच वेळा चर्चा झाली कार्यवाही काहीच नाही. तोच प्रकार पाणीपट्टीच्या बाबतीत आहे जे पाणीपट्टी भरतात त्यांचेवर पुन्हा व्याज आकारणी होते. काही भागात तर वसुलीच होत नाही. सिडको हडकोतील जनता रेग्युलर पाणीपट्टी भरते. व अनाधिकृत नळ कनेक्शन सुध्दा या भागात नाही मुळात या भागातील जनतेला वेळेवर व मुबलक पाणीच मिळत नाही तर व्याज आकरण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. ज्या भागात सुविधा देतो पाणी देतो अशा नागरिकांच्या रक्कमेवर व्याज आकारले तर मान्य होऊ शकेल. या भागात ६ महिनेच पाणी दिले जाते जनता फक्त ६ महिण्याचे बिल आकारण्याची मागणी करित आहे. परंतु जे व्याज जाते ते रद्द करण्याचा निर्णयाबाबत विचार करता येईल असे आम्ही नागरिकांना आश्वासन दिलेले आहे. महसुली उत्पन्न किती वाढले यावर प्रशासन का कार्यवाही करित नाही. वृत्तपत्रात येते. आमुक माल पकडला यापुर्वी ते अधिकारी त्याच विभागात होते आताच कसा माल पकडला जातो. दंड वसुल केला जातो. यापुर्वी १० वर्षापासुन अधिकारी काय करित होते. याची सुध्दा चौकशी होणे गरजेचे आहे. व्याज आकारणी करुन महानगरपालिका कार्यक्षम होत आहे का? ज्या थकीत रक्कम आहे. त्या एक वर्षाच्या नाही. महानगरपालिकेस उत्पन्नाचे इतर साधने आहे. त्यापासुन उत्पन्न मिळु शकते. परंतु व्याज आकारुन पाणीपट्टीचे थकीत बील वसुल करणे बरोबर नाही. पाण्याचा प्रश्न हा वेगळा आहे. जिव्हाळयाचा प्रश्न असुन जे व्याज आकारले जाते ते साफ करावे. व जे जे उत्पन्नाचे साधन आहे अशा विभागाचे संबंधीत अधिकारी यांची बैठक बोलवावी व जास्तीत जास्त उत्पन्न कसे वाढेल यासाठी प्रयत्न करावे.

श्री. प्रकाश निकाळजे : सिडको हडको भागातील घरांना व्याज माफ केलेले जो पर्यंत हस्तांतरण महानगरपालिकेकडे होणार नाही तापर्यंत व्याज आकरणी होणार नाही असा ठरावच घेतलेला आहे. मागच्या वेळेस संपुर्ण मालमत्ता कर माफ केले, असा करा संपुर्ण माफ करावी. मी महानगरपालिकेचा ट्रस्टी आहे. माझ्यासाठी बोलत नाही.

श्री. सुदाम सोनवणे : कोण किती महानगरपालिकेचे हित जोपासले याची कल्पना मला आहे. एक जेष्ठ सदस्य अशी भाषा बोलत असेल तर योग्य नाही २ लक्ष लोकसंख्येचे आम्ही सिडको हडको भागातील नगरसेवक नेतृत्व करतो. जेष्ठ सदस्य आमच्या सुचनेची अवहेलना करतात ही दुर्देवाची बाब आहे. त्याबद्दल श्री. स. सदस्य प्रकाश निकाळजे यांचा निषेध करतो. एन-१ भागात जाऊन एका नागरिकांच्या घरात पाणी होते, परंतु इतर एन-१ च्या सर्वच घराला मुबलक पाणी येते का? हे स.सदस्यांनी बघण्याची गरज होती नसता आता

त्यांनी माझ्या बरोबर प्रत्यक्ष भेट देण्यासाठी यावे परिस्थिती काय आहे दिसुन येईल. सिडको हडको मध्ये पाणी दिले जाते महापालिका उपकार करित नाही, उलट या नागरिकांच्या जकातीच्या माध्यमातुन येणाऱ्या वस्तुचे उत्पन्नावर शहराचा विकास होतो. सिडकोला तर एक विकास काम होत नाही सर्व सिडको हडकोतील नगर सेवकांच्या वतीने विनंती करण्यांत येते की, पाणी मुबलक मिळाले नाही तर या भागातील कुणीही व्यक्ती पाणीपट्टी सुध्दा भरणा करणार नाही. नागरिकांना आम्हीच पाणीपट्टी भरु देणार नाही. जकात कराच्या उत्पन्नातुन सिडको हडकोतील नागरिकांसाठी २०% रक्कम खर्च करित नाही. आम्ही पाणी पट्टी भरण्यास नागरिकांना सांगण्यात येईल नसता पाणी पट्टी भरु देणार नाही हा आम्ही सर्व सिडको हडकोचे नगरसेवक निर्णय घेत आहोत. एक दिवसा आड पाणी देणार दररोज पाणी देणार नसेल तर वर्षातील ३६५ दिवसाचे पाणीपट्टी आकारण्याचा कोणताच हक्क नाही. आताच सांगितले गेले ४८ कोटी थकबाकी आहे. वसुली न होण्याला जबाबदार सभागृह नाही व वसुलीचे निमित्त पुढे करुन सिडकोच्या नागरिकांच्या रक्कमेवर आकारले जाणारे व्याज रद्द करणार नसेल तर योग्य नाही. उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने जकातीचे खाजगीकरण करण्या संदर्भात दोन वेळेस जाहिरात दिले खाजगीकरण होऊ शकले नाही झालेली खर्च कोठुन काढणार आहोत जकातीचे खाजगीकरण अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे झाले नाही. मा. महापौर यांनी स्टेंटमेंट करावे. अधिकाऱ्यावर कार्यवाही का होत नाही. नागरिकांच्या मागणीला वेठीस धरणार असेल व आमच्या मागण्या मान्य होत नसेल तर आम्ही खपवुन घेणार नाही. योग्य निर्णय घेण्यात यावा. दररोज पाणी किंवा एक दिवसा आड देणार असेल तर मुबलक पाणी द्यावे. नसता नागरिकांना आम्ही पाणीपट्टी भरु देणार नाही.

श्री. प्रकाश निकाळजे : जकातीच्या उत्पन्नाचा २०% हिस्सा सिडको भागातील नागरिकांसाठी खर्च करावा अशी मागणी स. सदस्यांनी केली आहे त्यास आमचा विरोध नाही. परंतु भेदभाव करण्याचा प्रश्न नाही आपण सिडको हडको भागासाठी ६७ कोटीची योजना राबवीत आहेत. याचा अर्थ ६०% रक्कम या शहरातील नागरिकांची येते ती योजना प्राधिकरणाची असेल तरी महानगरपालिकेच्या माध्यमातुन होत आहे. व त्यास माझा विरोध होत आहे हा गैरसमज काढुन टाकावा घरामध्ये साधे केबल कनेक्शन घेतले तर त्यास २५०/- रु दरमहा भराव लागतात. पाणी देतांना महानगरपालिकेस दररोज एक घरामागे १.४० रु. ,खर्च येतो. पाण्याचे मुल्य समजुन घ्यावे. सिडको हडको महानगरपालिकेकडे हस्तांतरण होत नाही तो पर्यंत मालमत्ता कर लागु करु नये अशा प्रकारचा ठराव या सभागृहाने मंजुर केला त्यास सर्वानी पाठिंबा दिला जी मागणी होती ती सत्य होती. परंतु पाणी वाटपाबाबत दुजाभाव करणे बरोबर नाही. शहरात सुध्दा मुबलक पाणी येत नाही. त्यांचे सुध्दा व्याज रद्द करणार काय? एम.एस.ई.बी. विभाग लाईट बील वेळेवर भरणा केले नाही तर मुदती नंतर ०.३% प्रमाणे प्रत्येक दिवसाला व्याज आकारते, त्यावेळेस का कुणी मत मांडले नाही. पाणी पट्टीचे दर महिण्याला १४० ते १६० रु. येते. तेवढे बील एक नागरिक एक नळाचे भरु शकत नसेल तर दुर्देवी बाब आहे.

श्री. भगावन घडमोडे : या संस्थेचे आम्ही सुध्दा ट्रस्टी आहोत. येथील भागात मुबलक पाणीच दिले जात नाही तर व्याज आकारण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. सिडको भागात कोणतेही विकास कामे होत नाही. व्याज माफ केले तर वावगे नाही भेदभाव करु नये. जनतेचे, संस्थेचे हित सुध्दा जोपासले पाहिजे. यावर योग्य तो निर्णय घेऊन पुढील कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : कार्यकारी अभियंता (पा.पु) यांनी सिडको हडको पाणी प्रश्ना बाबत खुलासा करावा.

कार्य. अभियंता (पा.पु.) नुकताच १ महिण्यापुर्वी मी पाणी पुरवठा विभागाचा पदभार स्विकारला असुन माझ्या परिने या बाबतीत अभ्यास केलेले आहे. सध्या सिडको हडको भागासाठी १८ ते २० एमएलडी पाणी घेतले जाते. सदर पाणी कुठल्याही प्रकारची तांत्रिक अडचण निर्माण झाली नाही तर घेऊ शकतो. १४०० मी.मी. व्यासाची जी पाईप लाईन आहे, या पाईप लाईनव्दारे सकाळी १२ वाजेपासुन ते दुपारी ३ वाजेपर्यंत पाणी घेतले जाते व या वेळात एका तासाला १२०० घन मीटर याप्रमाणे पाणी पुरवठा होतो यात १८ दक्षलक्ष घनमीटर पाणी मिळते. एन-५ च्या टाकी मध्ये होतो तसेच क्रांतीचौक पासुन पंपींग केले जाते. पंपींग व ग्रॅव्हेटीने जे पाणी घेतले जाते. ते २० एम.एल.डी. पाणी घेतले जाते. पाण्याचे नियोजन करायचे झाल्यास लोकसंख्येचा विचार करावा लागेल लोकसंख्या ही जवळपास २.८३ लक्ष आहे. २० दशलक्ष लिटर्स जे पाणी येते ते कमी पडते. ३० ते ३२ एम.एल.डी. पाणी द्यावे लागेल. मागील बैठकीत या सभागृहाने सिडको-हडको भागात दररोज पाणी देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार गेल्या महिणा भरापासुन मी प्रामणिकपणे दररोज पाणी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. यात काही प्रमाणात अडथळे निर्माण झालेले होते. सभागृहाला माझे नम्र निवेदन आहे की, एक दिवसाआड पाणी यात काही पाण्याचे योग्य नियोजन करु, दाब नियमन करता येईल. आज एका भागात पुरवठा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी दुसऱ्या भागात पुरवठा करणार. जुन्या शहरात जवळपास दररोज पाणी दिले जाते गॅप दिला जात नाही. परंतु सिडको-हडको भागात एक दिवसा आड पाणी देणार विशेष परिस्थितीत शहरात सुध्दा गॅपदिला जावा. जुन्या शहरात ही गॅप दिल्यास कृपया सहन करावा अशी प्रशासनातर्फे विनंती आहे. एक्सप्रेस लाईनचे काम चालु आहे. मार्च अखेर पर्यंत कामपुर्ण होईल अशी अपेक्षा आहे. रेल्वेखात्यांचा अडथळा होता त्या बाबतची ना हरकत प्रमाणपत्र सुध्दा घेतले ही एक्सप्रेस लाईनच काम जेव्हा पुर्ण होईल तेंव्हा निश्चितच सिडको-हडको भागातील नागरिकांचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. या पाईप लाईनव्दारे १० ते १५ एम.एल.डी. पाणी वाढवुन मिळेल.

श्री. काशिनाथ कोकाटे : सिडको-हडको भागात पाणी पुरवठा करण्या संदर्भात संबंधीत अधिकारी यांनी सविस्तर माहिती दिली १ दिवसाआड पाणी दिल्या शिवाय पाणीच देऊ शकत नाही असे मत मांडले. नारेगांव,चिकलठाणा, मिसारवाडी, पुंडलिकनगर सह व इतर सिडको-हडकोचा भाग मिळुन एकुण २.८३ लक्ष लोकसंख्या असल्याचे स्पष्ट केले. १९ ते २० एम.एल.डी. पाणी सध्या येत असुन या संपुर्ण भागात मुबलक पाणी देण्यासाठी ३५ ते ४० एम.एल.डी. पाणी असणे आवश्यक आहे. याचा अर्थ या जनतेला १

दिवसाआड पाणी दिले तरच पाणी पुरवठा करु शकतो. असे केलेल्या खुलाशावरुन स्पष्ट होते. जर दिवसाआड पाणी देणार असेल तर तेवढया दिवसाचीच पाणीपट्टी आकारावी. शहरात सुध्दा गॅप दिल्यास तेवढया दिवसाचे बिल द्यावेक आमचे दुमत नाही.

श्री भाऊसाहेब ताठे : एक दिवसाआड पाणी देणार असेल तर ६००/- रुपये पाणीपट्टीच सिडको हडकोच्या नागरिकांसाठी आकारण्यात यावी. व व्याज सुध्दा रद्द करावे.

मा. महापौर : कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रशासनातर्फे मत मांडलेले आहे. सिडको हडको भागातील लोकसंख्येचा विचार केल्यास जो पाणीपुरवठा सध्या केला जातो त्यापेक्षा जास्त पाणीपुरवठा एक्स्प्रेस लाईन होईपर्यंत या भागात करु शकत नाही. शहरात सुध्दा काही वेळी पान्याचा गॅप दिला तरी सुध्दा पुर्णपणे सिडको हडको भागात पाणी पुरवठा करु शकत नाही. असे मत मांडले आहे. केंव्हा केंव्हा विजपुरवठा खंडित झाल्यास सिडको हडको भागातच जास्त प्रमाणात गॅप न देता शहरातही गॅप देता येईल किंवा द्यावा लागेल असे मत मांडले सभागृहातर्फे विनंती करतो की, जुन्या शहरातील जे स. सदस्य आहेत त्यांनी सुध्दा अशी परिस्थिती निर्माण झाल्यास सहकार्य करावे जेणे करुन सर्वच भागातील नागरिकांना सारख्या प्रमाणात पाणी मिळु शकेल. जो गॅप शहरात दिला जाईल तो सहन करावा व सिडको हडको भागात सुध्दा वेळेवर पाणी दिले पाहिजे असे या सभागृहाचे मत झालेले आहे स.सदस्यांनी असेही मत मांडले की, एक दिवसाआड पाणी दिले तर भरपुर पाणी मिळु शकेल. तसेच सर्व सणाच्या दिवशी जनतेला पाणी मिळु शकेल याची दक्षता घेतली जावी जे मागच्या वेळी झाले ते आता होऊ नये असे स. सदस्यांनी मत मांडलेले आहे. सणाच्या दिवशी पाणी जनतेला मिळणार नाही व त्यामुळे अशांतता निर्माण होईल असे होऊ नये. सभागृहाचे मत लक्षात घेऊन असा निर्णय घेण्यात येतो की, सिडको-हडको भागात एक दिवसाआड पाणी देऊन भरपुर पाणी द्यावे. एक्सप्रेस लाईनचे काम मार्चपर्यंत पुर्ण होईल. त्यात ५ ते ६ महिने बाकी आहे. यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे. नियोजन बध्द पाणी पुरवठा करता येईल यासाठी प्रशासनाने काळजी घ्यावी. व्याज आकारले जाते त्याबध्दल स. सदस्यांनी मुद्दा मांडलेला आहे. थकीत बिलावर व्याज आकारले जात आहे. परंतु पाणी पुरवठा पुर्णपणे करु शकत नाही. म्हणुन जो पर्यंत एक्सप्रेस लाईनचे काम पुर्ण होत नाही तापर्यंत शहरात व सिडको हडकोतील सर्वच भागातील जनतेच्या थकीत मालमत्ता व पाणी पट्टी बिलावर कुठल्याही प्रकारचे व्याज आकारणी करु नये. सभा ३० मिनिटासाठी तहकुब करण्यांत येते आहे. (दुपारी १.५० वाजता तहकुब करण्यांत आलेली सभा ३.२० वाजता सुरु झाली.)

मा. महापौर : विषय क्र. १ वर आता चर्चा करावी.

**विषय क्र. ६७३/१ :**

दिनांक २०-०७-२००२,१२-०८-२००२ आणि १९-०८-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद

सौ. चंद्रभागाबाई दाणे : नागेश्वरवाडी येथील पुलाचे काम करण्या संदर्भात मा. आयुक्त यांना पत्र दिले होते. व मा. आयुक्त तसेच संबंधीत अधिकारी यांनी प्रत्यक्ष नादुरुस्त पुलास भेट दिली होती. अद्याप का पुलाचे काम सुरु झाले नाही ८ दिवसात काम सुरु न झाल्यास ९ व्या दिवशी मी महानगरपालिकेसमोर उपोषणास बसणार आहे.

श्री. सुनिल मगरे : मागील बैठकीत ठराव मंजुर करण्यात आला त्याकडे मी लक्ष वेधु इच्छितो. महानगरपालिकेच्या अस्थापनेवर अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणुन मुख्य लेखा परिक्षक पदावर महापालिकेतील अधिकाऱ्या मार्फत भरण्यात यावे, शासनाकडुन प्रतिनियुक्तीवर आलेले श्री.चाटे यांना परत पाठवण्यात आलेले आहे. पदोन्नतीने भरण्यापुर्वी यापदाचा पदभार देण्यात यावा. असा ठराव संमत झालेला आहे. मी विचारु इच्छितो की, पदोन्नती बाबत प्रशासनामार्फत आतापर्यंत काय कार्यवाही झाली.

उपआयुक्त (प्र.) : मागील शासनाने प्रतिनियुक्तीवर पाठविले मुख्यलेखा परिक्षक म्हणुन श्री. चाटे यांना महापालिका सेवेत रुजु करुन घेण्याचा प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर केलेले होता. त्यास मान्यता मिळाली नाही. व श्री. चाटे यांना परत त्यांचे विभागामध्ये पाठविण्याचा निर्णय घेतला व सदर पदावर पदोन्नतीस पात्र असणाऱ्या अधिकाऱ्यांना कार्यभार सोपवावा असा निर्णय झालेला होता त्यानुसार अतिरिक्त कार्यभार म्हणुन श्री. संजय पवार यांचेकडे कार्यभार सोपविलेला आहे. व या बाबतची सर्व माहिती शासनास कळविलेली आहे.

श्री. सुनिल मगरे : शासनाचे काय डायरेक्शन आहेत. शासनाकडे का पाठवण्यात आला.

उपआयुक्त (प्र.) : शासनाकडुन त्यांची नियुक्ती झाली होती सर्वसाधारण सभेच्या निर्णयाप्रमाणे परत पाठविले म्हणुन शासनाकडे पाठवण्यात आला आहे. शासनाकडुन अहवाल आलेला आहे. हा ठराव विखंडीत करण्यात आला आहे.

श्री. भगवान घडामोडे : श्री. चाटे यांना महानगरपालिकेच्या मुख्य लेखा परिक्षक पदावर रुजु करुन घेण्या बाबतचा ठराव आलेला होता. तो ठराव रद्द करुन त्यांना त्यांचे विभागात परत पाठविण्याचा निर्णय घेतला व हे पद पदोन्नतीने भरण्यास व बहुमताने ठराव पास केले असा उल्लेख केलेला आहे. हा प्रस्ताव घाई गडबडीत प्रस्ताव मंजुर केला आमच्या भाजप पक्षाचे सर्व सदस्यांचा या विरोध होता तशी नोंद सुध्दा आहे. बऱ्याच सदस्यांचा विरोध असतांना बहुमताने मंजुरी दिली अशी नोंद करणे चुकीचे आहे. ती चाटे यांना रुजु करुन घेतले असते तर काहीही नुकसान होणार नव्हते.

मा. महापौर : मागील वेळेसची चर्चा करणे बरोबर होणार नाही शासनाकडुन काय पत्र आलेले आहे त्यावर चर्चा करावी.

श्री. अंबादास दानवे : इविवृत्तावर चर्चा करणे योग्य नाही दुरुस्ती काय असेल ती करण्यात यावी. या पदाच्या संदर्भात सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयाबाबत प्रशासनाने शासनास कळविलेले आहे. त्यानुसार शासनाने पत्र दिले त्यावर मा. आयुक्तांनी योग्य तो निर्णय घ्यावा. असे माझे मत आहे. मा. आयुक्तांनी नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री. प्रकाश निकाळजे : शासनाने तीन कनिष्ठ अभियंत्यांना सेवेत सामावुन घेण्याबाबत पाठविले होते. या सभेने तो ठराव मंजुर न करता पुन्हा त्यांना परत

पाठविण्याचा निर्णय घेतला शासनाचे प्रत्येक आदेश या सभागृहाला बंधनकारक नाही. यामुळे आपली बाजु कमकुवत होणार असुन महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात नुकसान होणार आहे. शासनाचे आदेशाचे पालन करायचे की नाही हे सर्वसाधारण सभेने ठरवावे. या प्रस्तावामुळे शहराची शांतता व सुव्यवस्था बिघडेल असे काही होऊ नये याची सुध्दा दक्षता घेतली जावी.

श्री. डॉ भागवत कराड : आपण एकमताने निर्णय घेतला त्यांना रुजु करुन घेवु नये. राज्य शासनाचे पत्र असल्याने त्यांना रुजु करुन घेतले.

श्री. सुनिल मगरे : या पुर्वी अनेक पदे महानगरपालिका अस्थापनावर भरलेली आहेत. त्याचे ठराव शासनाकडे पाठविले नाही हाच ठराव पाठविण्याची काय आश्यकता भासली. प्रशासनाला असा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे अधिकार आहे का?

श्री. स.अली सलामी : सेवा भरती नियम १९९४ मध्ये शासनाने मंजुर केले. त्यात दुरुस्ती करायची असेल तर त्याला शासनाची मंजुरी लागते किंवा कसे याचा खुलासा करावा.

श्री. प्रशांत दसरडा : यात दोन मुद्दे आहे, ठराव शासनाकडे पाठविला येतो का? दुसरा मुद्दा शासनाचे पत्र वाचुन दाखवावे. प्रशासकीय पातळीवर प्रशासनाने शासनाकडे प्रस्ताव पाठविला अस्थापनेवर या पदावर पदोन्नतीने कार्यवाही करावी व श्री. चाटे यांना त्यांचे विभागाकडे परत पाठवावे असा जो ठराव घेतला होता त्यास शासनाने रद्द केलेले आहे. पदोन्नतीस पात्र असणाऱ्यास कार्यभार सोपविण्यात यावा यासही शासनाने रद्द कलेले आहे. त्यावर चर्चा करणे शासनाने पाठविलेल्या पत्रानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. व तसे शासनास कार्यवाही केल्या बाबत कळवावे.

मा. महापौर : शासनाकडे पाठवले असे ठराव पाठविता येतात का?

उप आयुक्त(प्र.) : श्री. चाटे यांना शासनाच्या आदेशानुसार प्रतिनियुक्तीने महानगरपालिकेत पाठविलेले होते. शासनाच्या आदेशानुसार ते आल्यामुळे सर्वसाधारण सभेच्या ठरावा नुसार त्यांना परत पाठवले आहे. या बाबतीत माहिती शासनास कळविलेली आहे.

श्री. सुनिल मगरे : श्री. चाटे यांना त्यांचे विभागात परत पाठवण्याचा जो ठराव मंजुर केला तो ठराव आणि त्यासोबत प्रशासनाने काय लेखी कळविले त्याची सभागृहाला माहिती द्यावी कलम ४५१ खाली असे नमुद केलेले आहे की, एखादा ठराव सभागृहाने मंजुर केला असेल व त्यामुळे शहरातील शांतता भंग होत असेल किंवा महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असेल तरच अशा प्रकारचा मंजुर ठराव शासनाकडे पाठविता येतो. म्हणुन जो ठराव पास केला त्यानुसार महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नव्हते. व शहरातील शांतता भंग होणार नव्हती असे वाटते, असे असतांना प्रशासनाने शासनाकडे ठराव का पाठविला प्रशासनाने शासनाकडे लेखी स्वरुपात काय पाठविले त्याचा सुध्दा खुलासा व्हावा.

उप आयुक्त (प्र.) : ही प्रशासकीय बाब आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : श्री. चाटे यांना परत त्यांचे विभागामध्ये पाठविण्याचा निर्णय घेतल्या नंतर प्रशासनाने शासनाकडे काय माहिती पाठविली ती सभागृहाच्या निदर्शनास आणुन देण्यास हरकत नसावी. ही महिती प्रशासन

सभागृहापासुन गोपनिय ठेवण्यासारखी नाही. कशाच्या आधारे पाठविली यापुर्वी कोणत्या पदाची पाठविलेली होती सर्व माहिती द्यावी. पाठविण्याची आश्यकता होती किंवा नाही याचा सुध्दा खुलासा करावा. शासनाने मुख्य लेखा परिक्षक या पदावर सभागृहाने मंजुरी दिल्यानुसार शासनाकडे मागणी झाली व त्या पदावर श्री. चाटे यांना शासनाने पाठविले. कोणत्या नियमाप्रमाणे ठरावाची माहिती पाठविली स्टष्ट खुलासा व्हावा. व तयावर शासनाने काय निर्देश दिले ते सुध्दा सभागृहाला वाचुन दाखवावे.

सौ. साधना सुरडकर : श्री. चाटे यांना प्रतिनियुक्तीने रुजु करण्याचा ठराव होता त्यास मान्यता न देता त्यांना त्यांचे विभागाकडे पाठविण्याचा निर्णय घेतला परंतु त्या निर्णयाला सर्व भाजप सदस्यांचा विरोध होता तशी नोंद झालेली आहे. शासनाचे काय निर्देश आले त्याच खुलासा करावा. व त्यावर कार्यवाही करावी.

मा. महापौर : यापुर्वी जे ठराव झाले ते शासनाकडे पाठविण्यात आलेले होते का? तसेच जो निर्णय या सभागृहाने घेतला होता त्यास शासनाने रद्द केलेले आहे.

श्री. सुनिल मगरे : यापुर्वी काही अधिकाऱ्यांना पदोन्नतीने नेमणुका झाल्या त्यासंबंधीचे प्रस्ताव शासनाकडे मार्गदर्शन घेण्यासाठी पाठविले होते का? मुख्य लेखा परिक्षक पदावर पदोन्नतीचा ठराव पास केला शासनाकडे कोणत्या नियमाने पाठविला खुलासा करावा. हाच ठराव पाठविण्याची का आवश्यकता भासली.

डॉ. आशा बिनवडे : डिसेंबर मध्ये एक ठराव पास करुन मुख्य लेखा परिक्षक या पदावर पदोन्नतीने हे पर भरावे व अनुभव हा ७ वर्षावरुन ५ वर्षाचा केलेला होता. व तो प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला होता त्या संदर्भात शासनाकडुन काय उत्तर आलेले आहे. आणि मागण्याच्या बैठकीत जो निर्णय घेतला त्यास आमच्या भाजपा सदस्यांचा विरोध असतांना निर्णय घेतला त्या संदर्भात शासनाकडुन काय खुलासा आलेला आहे. त्याची सुध्दा सभागृहाला माहिती द्यावी. आणि त्यानुसार प्रशासन नेमकी काय कार्यवाही करणार आहे. त्याचाही खुलासा करावा.

श्री.डॉ.भागवत कराड : गेल्या ऑगस्ट मध्ये १९ तारखेला सभा झाली त्या सभेत शासनाकडुन प्रतिनियुक्तीवर आलेले मुख्य लेखा परिक्षक श्री. चाटे यांना रुजु करुन घेण्या बाबतचा प्रशासकीय ठराव ठेवलेला होता या बैठकीत प्रतिनियुक्तीचे एकुण ३ प्रस्ताव होते. श्री. चाटे यांना रुजु करुन घेता पुन्हा त्यांचे विभागात पाठविण्याचा ठराव घेण्यात आला तो ठराव सर्वानुमते मंजुर झालेला नाही. त्या ठरावास बऱ्याच सदस्यांनी विरोध केला. विशेष करुन भाजपा सदस्यांनी घेतलेल्या निर्णयास विरोध केला तो आमचा विरोध आम्ही सभा संपल्यानंतर मा. आयुक्त यांना पत्र देऊन सुध्दा आमचा या प्रस्तावावर घेतलेल्या निर्णयास विरोध दर्शविला आहे. गेल्या महिणा भरात सुध्दा बऱ्याच सदस्यांनी मा. महापौर, मा. आयुक्त यांना या प्रस्तावासंबंधी व अशा प्रकारच्या ठरावास घेतलेल्या निर्णयास विरोध म्हणुन पत्र दिले. सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार मा. आयुक्त यांनी शासनाकडे माहिती दिली असेल त्यांचा अधिकार आहे. शासनास पत्र देऊन मा. आयुक्त त्याचा अधिकार वापरु शकतात. परंतु शासनाकडुन जर त्या संबंधी काही माहिती आली असेल तर अशी विनंती आहे. गेल्या १९-०८-२००२ च्या बैठकीत

घेतलेल्या ठरावास शासनाकडुन आलेल्या निर्णयास कायम करुन श्री.चाटे यांना रुजु करुन घ्यावे.

श्री. स.अली सलामी : सेवा भरती नियमात बदल केलेला आहे. बदल केल्यास शासनास पाठवावेच लागते का? याचा खुलासा करावा प्रशासकीय बाब आहे, असे म्हटले सभागृहाला न सांगता येण्या इतपत अशी कोणती प्रशासकीय बाब होऊ शकते.

उपआयुक्त (प्र.) : कुठल्याही नियमात बदल केल्यास शासन मंजुरीची आवश्यकता आहे. स.सदस्य श्री. मगरे यांनी कलम ४५१ खाली आतापर्यंत किती प्रस्ताव शासनाकडे पाठविलेले आहे, असा प्रश्न उपस्थित केला त्या संदर्भात माहिती घ्यावी लागेल. कलम ४५१ खाली ठरावावर कार्यवाही करण्याबाबत ज्या तरतुदी दाखविल्या आहे, त्यानुसार काही बदल होत असेल तर कलम ४५१ खाली तो प्रस्ताव शासनाकडे पाठविला जातो. श्री. चाटे यांना प्रतिनियुक्तीने शासनाने पाठविले होते. म्हणुन या ठराव विषयी शासनास माहिती देणे आवश्यक होते म्हणुन मंजुर केलेला ठराव व प्रशासकीय ठिपण्णी शासनास दिलेली होती. शासनाचे पत्र आले. ठराव विखंडीत करण्यांत आले आहे.

श्री. सुनिल मगरे : एखादया दलित समाजाच्या अधिकाऱ्या संबंधात अशी वागणुक मिळत असेल तर ही अतिशय निषेधार्थ बाब आहे, म्हणुन प्रशासनाचा मी येथे जाहिरपणे निषेध करतो.

मा. महापौर : मुख्य लेखा परिक्षक पदाच्या संदर्भात शासनाकडुन जे पत्र प्रशासनाकडे आलेले आहे ते पत्र प्राप्त झालेले. त्या संबंधी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

श्री. सुनिल मगरे : या महानगरपालिकेमध्ये तिसऱ्या आघाडीच्या गटनेता यांना कॉबीन देण्यांत आलेली आहे माझी सुध्दा भारतीय बहुज महासंघाच्या नेत्यांनी माझी गट नेता म्हणुन निवड केली त्यामुळे मला सुध्दा कॅबीन देण्यांत यावी.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दीन : महानगरपालिकेत जनतेची कामे करण्यासाठी राष्ट्रवादी,कॉग्रेस, पक्षातर्फे माझी गटनेता म्हणुन निवड केलेली आहे. त्यामुळे मला सुध्दा एक कॅबीने देण्यांत यावी.

श्री. भगवान रगडे : माझी सुध्दा गट नेता म्हणुन निवड झालेली आहे. मला सुध्दा कॅबीन देण्यांत यावी.

श्री. प्रशांत देसरडा : स्विकृत सदस्यांतुन गटनेते पदी निवड झालेली आहे. त्यांनी तसे पत्र ही दिलेले आहे. त्यांना सुध्दा कॅबीन देण्यांत यावी.

श्रीमती जयश्री किवळेकर : महिला नगरसेवकांना बसण्यासाठी स्वतंत्र कक्षाची व्यवस्था करावी.

सौ. साधना सुरडकर : ठराव क्र. ६३१/३ रद्द करावा.

श्री. अंबादास दानवे : आताच स.सदस्य श्री. सुनिल मगरे, स.सदस्य श्री.शे. जैनोद्दीन तसेच स्विकृत सदस्यांचे गट नेत्यांनी दालनाची मागणी केली त्यांची मागणी योग्य आहे देण्यास हरकत नसावी परंतु काही सदस्य दोन पक्षाच्या गटात राहुन सहया करतात तिसऱ्या आघाडीच्या गटनेत्याच्या कॅबीनला तत्कालीन महापौर यांनी सभागृहाच्या सम्मतीनेच मान्यता दिलेली होती. जे सदस्य एका गटाचे एक पक्षाचे असतात त्यांनी दुसऱ्या पक्षाच्या गटात सदस्यत्व सुध्दा रद्द होऊ शकते. काही सदस्य दोन ठिकाणी सहया करतात दोन दोन दालनाचा फायदा घेत आहे. या महानगरपालिकेत विरोधी दालनाचा फायदा

घेत आहे या महानगरपालिकेत विरोधी पक्ष नेते म्हणुन श्री. अफसरखॉन झाले आहे त्यांना कोणी पाठिंबा दिला व तिसऱ्या आघाडीचा गट नेत्यांच्या वेळी कोणी पाठिंबा दिला यात एकाच स.सदस्यांच्या दोन्ही ठिकाणी सहया असेल तर पक्षातंर बंधी या कायद्या खाली कार्यवाही करु शकतो. तिसऱ्या आघाडीच्या गट नेत्यांच्या सदस्यांनी जर पाठिंबा दिला असेल तर तिसऱ्या आघाडीचे दालन काढुन घ्यावे. यानंतर वेगवगळया पक्षाच्या गटातील गटनेत्यांनी मागणी केली परंतु त्या त्या गटातील सदस्यांनी सुध्दा दुसऱ्या गटाला पाठिंबा देता कामा नये. फेर विचार केला पाहिजे.

श्री. किशनचंद तनवाणी : तिसऱ्या आघाडीच्या सदस्यांनी विरोधी पक्ष नेते श्री. अफसर खान यांना पाठिंबा म्हणुन सहयाचे निवेदन दिले त्यांची कॅबीन रद्द करावी.

श्री. स.अली सलामी : प्रत्येक महानगरपालिकेत गट नेत्याला कॅबीन देण्यात येतात जे सत्तेवर आहे त्यांचे सभागृह नेता सुध्दा आहे या ठिकाणी पाठिंबा प्रश्न नाही शिवसेना पक्षाला सुध्दा भाजपाचा पाठिंबा होता. त्यानुसार आपण महापौर म्हणुन निवडुण आलेले आहेत.

मा. महापौर : सहयाचा पाठिंबा घेऊन मी महापौर म्हणुन निवडुण आलेले नाही. मतदानानुसार माझी महापौर म्हणुन निवड झालेली आहे. ज्या गट नेत्यांनी आताच मागणी केली त्यानुसार त्यांना कॅबीन देण्यांत यावी. तसेच महिलांसाठी कक्ष महापालिकेत उपलब्ध आहे परंतु त्या ठिकाणी काही ही व्यवस्था नाही. म्हणुन प्रशासनाने महिलांच्या कक्षामध्ये सर्व सोयीयुक्त व्यवस्था करावी व कक्ष अद्यावत करुन द्यावे.

श्री. नंदकुमार घोडेले : विषय समित्यांचे सभापती यांना अगोदर कॅबीन उपलब्ध करुन द्यावी त्यानंतर इतर गटनेत्यांना देण्यात यावी.

मा. महापौर : विषय समित्यांचे सभापती यांनी कॅबीन प्रशासनाने उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करावी.

श्री. सुनिल मगरे : स.सदस्य दानवे यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यावर प्रशासनाने नियमाने कार्यवाही करावी.

श्री. भगवान रगडे : मागील काळात तिसऱ्या आघाडीच्या गटनेत्याला कॅबीन देण्यात आली. आमच्या पक्षाच्या गटनेत्याला कॅबीन देण्याचा ठराव मंजुर झाला होता परंतु त्यावर काही विचार झालेला नाही. कॅबीन देण्याच्या बाबतीत मला असा प्रश्न उपस्थित करावयाचा की, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नसतांना पदाधिकाऱ्यांना किंवा गट नेत्यांना कॅबीन देण्यांचा प्रश्न उपस्थित होते. सदस्य संख्या कमी व पदाधिकारी जास्त अशी परिस्थिती निर्माण होत आहे. जेथे कॅबीन दिली तेथे एक शिपाई एक क लिपिक द्यावे लागतात. हा खर्च वाढतो त्यामुळे माझे असे मत आहे की कोणत्याही गटनेत्याला सुध्दा कॅबीन देण्यात येऊ नये.

श्री. गणेश तांबे : गट नेत्यांना कॅबीन देऊ नये. प्रशासकीय खर्च वाढेल जे विषय समित्यांचे सभापती आहे त्यांना अगोदर कॅबीन देण्याचा विचार व्हावा. कॅबीन दिली तर कर्मचारी द्यावे लागतात.

श्री. सुदाम सोनवणे : गटनेते कॅबीनची मागणी केली. त्यांना गाडया, कर्मचारी दिले व या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नसतांना जर निर्णय घेतला तर उद्याच्या वृत्तपत्रात बातम्या येतील व महानगरपालिकेची तसेच सभागृहाची बदनामी होऊ शकते. विकास कामास पैसा नाही व कॅबीन वगैरे

देऊन प्रशासन खर्च करित आहे. याबध्दल जनतेच्या मनात गैरसमज निर्माण होईल. पाच पदाधिकारी यांचे शिवाय कुणालाही कॅबीन गाडी देण्यात येऊ नये. असे माझे मत आहे. होणारा खर्च वाचवावा अशी विनंती करतो यापुर्वीही समित्या स्थापन झाल्या होत्या परंतु त्यांना कॅबीन वगैरे देण्यात आलेल्या नव्हत्या ते सभापती त्यांच्या स्तरावर काम करित होते.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : विकास कामाच्या संदर्भात चर्चा घेण्या ऐवजी वेगळया विषयावर चर्चा होत आहे. येथे पत्रकार बसलेले आहे. वेगळया प्रकारच्या बातम्या वृत्तपत्रात येऊ शकतील. तसेच महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नाजुक असतांना गटनेत्यांनी जी कॅबीनची मागणी केली ती अत्यंत चुकीची आहे. तिसऱ्या आघाडीच्या काही सदस्यांनी विरोधी पक्ष नेते यांना पाठिंबा दिला म्हणुन तिसऱ्या आघाडीच्या गट नेत्याची कॅबीन रद्द करावी. त्यांना कॅबीन देण्यात येऊ नये.

मा. महापौर : विषय समित्यांच्या सभापतींना कॅबीनची व्यवस्था झालेली आहे. गटनेत्यांना कॅबीन द्यावयाची की नाही तो प्रश्न चालु आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : गट नेत्यांनी कॅबीन देण्याबाबतच्या प्रश्नावर चर्चा चालु आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. म्हणुन कॅबीन देण्यांत येऊ नये असा काहिना मांडला परंतु आताच पाणी प्रश्नावर व्याज न आकारणीचा निर्णय घेतला याचा अर्थ महानगरपालिकेची परिस्थिती चांगली आहे. त्यामुळे सर्वांनाच कॅबीन देण्यांत यावी. विषय समित्यांचे जे अधिकार आहे ते त्या त्या सभापतींना वापरुन द्यावे.

श्री. सुदाम सोनवणे : कोणत्याही गट नेत्याला कॅबीन देऊ नये.

मा. महापौर : विषय समित्यांचे सभापती यांना कॅबीन देणारच आहोत परंतु कोणत्याही गटनेत्याला कॅबीन देण्यास येऊ नये असा सभागृहाच्या सम्मतीने निर्णय घेण्यांत येतो. तसेच तिसऱ्या आघाडीच्या सदस्यांनी विरोधी पक्षनेते यांना सहया देऊन पाठिंबा दिला या संदर्भात स.सदस्य श्री. दानवे व श्री. तनवाणी यांनी तिसऱ्या आघाडीची कॅबीन त्यांचे कडुन काढण्याबाबत मुद्दा उपस्थित केला याबाबत प्रशासनाने तात्काळ नियमाने कार्यवाही करावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : औरंगपुरा भाजी मंडईला स्व. सावित्रीबाई फुले भाजी मंडई असे नांव दिलेले आहे. व मागील दिनांक १९-०८-२००२ च्या बैठकीत चर्चा न करता एक ठराव घेतला की, याच मंडईवर व्यापार संकुलास स्व.सौ मीनाताई ठाकरे व्यापार संकुल असे नामकरण करण्याचा जो प्रस्ताव मंजुर केला, परंतु निदर्शनास आणुन देऊ इच्छितो की, औरंगपुरा भाजी मंडईस २५ वर्षापासुन मार्केट असुन त्यास स्व. सावित्रीबाई फुले नांव दिलेले आहे. व असे अनेक मार्केट त्यांचे नावाने महाराष्ट्रामध्ये आहे त्यांनी पुरोगामी विचार सरणीची जी काही सत्यशोधक केली. त्यांनी महिलासाठी शिक्षणाची व्यवस्था करुन दिले जे स्त्रियांसाठी काम केले. त्यास त्यांना अतोनात त्रास सहन करावा लागलेला असुन अशा महान व्यक्तीचे नांव दिलेले आहे म्हणुन त्या भाजीमंडई च्या संकुलास इतर कोणही व्यक्तीचे नांव न देता समोरच महानगरपालिकेची जागा आहे तेथे मोठे संकुल उभारुन ठराव मंजुर करुन सौ. मीनाताई ठाकरे नांव देऊ शकता अशी माझी सुचना आहे.

श्री. अंबदास दानवे : स्व. सावित्रीबाई फुले हे नांव देण्यास कुणाचा विरोध नाही. त्यावर जे संकुल करणार आहे त्यास स्व.मीनाताई ठाकरे नांव देण्याचा ठराव

स.सदस्यांच्या मागणी नुसार मंजुर केलेला आहे. त्यास मान्यता दिलेली आहे. हा ठराव यापुर्वीच स्विकृती सह मंजुर झालेला आहे. त्यात बदल करण्यासारखे काही नाही.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : सावित्रीबाई फुले नावाबाबत सभागृहात विरोध नाही. परंतु संघटनेच्या लोकांनी या बाबतीत वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केलेला आहे हे बरोबर नाही. या भाजी मंडईच्या वरच्या मजलयावर बांधकाम करुन स्व. सौ. मीनाताई ठाकरे नांव देणार आहे. स.सदस्यांची मागणी होती, त्यानुसार निर्णय घेतलेला आहे. जो निर्णय घेतला तो कायम ठेवावा. सावित्रीबाई फुले बध्दल आम्हाला सुध्दा आदर आहे.

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : ही भाजी मंडई माझ्या वार्डात आहे. स्व. सावित्रीबाई फुले हे भाजी मंडईला नांव कायम राहणार आहे. यात कुणी राजकीय पोळी भाजुन घेऊ नये. सावित्रीबाई फुले यांचा आदर्श आम्हास आहे. या मंडईच्या वरच्या मजल्यावर जे १.५० कोटी रुपये खर्च करुन व्यापार संकुल होणार त्यास स्व. सौ. मीनाताई ठाकरे यांचे नांव देणार आहे. यास विरोध करणे बरोबर नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : कुणीही राजकीय वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करित नाही. वेगळे संकुल करुन नांव देण्यास आमचा संपुर्ण पाठिंबा आहे. अद्याप संकुल झालेले नाही. नावाचा ठराव घेण्याची आवश्यकता का भासली.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दीन : औरंगपुरा येथील भाजी मंडई नगरपरिषदेच्या वेळेस बांधण्यात आलेली आहे. सदरील मंडईस थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले याच्या पत्नी सवित्रबाई फुले यांचे नांव देण्यास आले आहे. सावित्रीबाई फुले हया माळी समाजाच्या होत्या तसेच स्त्री शिक्षण आणि समाज सुधारणा करण्यासाठी त्यांनी पती बरोबर हिरशीने कार्य केले आहे. त्याच्या कार्याचे स्मरण राहावे आणि समाजास स्फुर्ती मिळावी या उद्देशाने भाजीमंडईस सवित्रीबाई फुले नांव देण्यात आले आहे.

परंतु दिनांक १९-०८-२००२ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत या संबंधी प्रस्ताव देतांना भाजी मंडई सावित्रीबाई फुले आणि व्यापारी संकुलास स्व. मीनाताई ठाकरे यांचे नांव देण्यात आल्याचे इतिवृत्तात आल्याने कळाले आहे. परंतु या संबंधी कोणतीही चर्चा सर्वसाधारण सभेत झाली नाही या ठरावाला बहुसंख्या नगरसेवकांचा विरोध होता आणि आज देखील विरोध कायम आहे.

स्व. मीनाताई ठाकरे यांच्याबध्दल आमच्या मनात आदर आहे. परंतु पुर्वी असलेले नांव हटवुन किंवा पुर्वी असेलेल्या नावांसोबत दुसऱ्याचे नाव विभागुन देणे हे संयुक्तीक वाटत नाही. स्व. मीनाताई ठाकरे यांच्या नावास माझा विरोध नाही. परंतु त्यांचे नांव इतर कोणत्याही नांव नसलेल्या वास्तुस द्यावे किंवा नविन वास्तु तयार करुन त्यांचे नांव देण्यास आमचा संपुर्ण पाठिंबा राहिल. सर्वसाधारण सभेच्या नियमाप्रमाणे चर्चेमध्ये निर्णय होत नसल्यास मतदानाने बहुमताचा विचार करुन प्रस्ताव पारित करावा व औरंगपुरा भाजी मंडई आणि व्यापारी या संकुल एकाच ठिकाणी असलेल्या वास्तुस सावित्रीबाई फुले भाजी मंडई व व्यापारी संकुल असे नांव कायम राहु द्यावे.

श्री. मोतीलाल जगताप : स्व. मीनाताई ठाकरे यांचे नांव देण्यास विरोध नाही परंतु एक वस्ती एक इमारत त्यास एकच नांव असावे अशी माझी सुचना आहे.

मा. महापौर : स. सदस्या श्री. चंद्रशेखर जैस्वाल यांचे वार्डातील तो प्रस्ताव आहे. त्यांनीच तो प्रस्ताव मांडलेला होता. स्व. मीनाताई ठाकरे नांव वरच्या मजल्यावर होणाऱ्या वेगळया व्यापार संकुलास नांव देणार आहे. मंजुर केलेल्या ठरावानुसार अंमलबजावणी व्हावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : मंजुर केलेल्या ठराव कायम करित असले तर त्यास आमच्या पक्षाच्या इतर बऱ्याच सदस्यांचा विरोध आहे. याची नोंद घ्यावी.
(याचवेळी क्रॉग्रेस व आघाडीचे स. सदस्य विरोध नोंदवुन सभागृहा बाहेर जातात व थोडया वेळानंतर परत येतात.)

सौ. संगीता मैंद : दिनांक २०-११-२००१ रोजी संपन्न सर्वसाधारण सभेत महिला व बाल कल्याण अधिकारी पदाचा ठराव सम्मत करण्यात आलेला आहे. या पदास शासन मंजुरीसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविला किंवा नाही याचा खुलासा करावा.

मा. महापौर : स.सदस्य व महिला बाल कल्याण सभापती यांनी केलेल्या सुचनेनुसार प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

श्री. मोतीलाल जगताप : इतिवृत्त दिनांक १९-०८-२००२ पा.क्र.५ वर विषय क्र. ६५२/५ अ.क्र. १२ चे हायमास्ट कमी करुन मुकुंदवाडी चौक येथे हायमास्ट बसविण्याची अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

मा. महापौर : वरील प्रमाणे दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

दिनांक २०-०७-२००२,१२-०८-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास आणि दिनांक १९-०८-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तात विषय क्र. ६५२/५ मधील अ.क्र. १२ वरील हायमास्ट ऐवजी मुकुंदवाडी चौक येथे हायमास्ट बसविणे अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली. वरील दुरुस्ती व इतर दुरुस्तीसह इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ६७४/२ :**

दिनांक २७ आगस्ट २००२ रोजी झालेल्या शहर सुधार समितीने विषय क्र. ३ मंजुर करुन सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात शिफारस केली आहे. सदर प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.

सहाय्यक संचालक नगर रचना यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर विकास योजना (सुधारित) आरक्षण क्र. १६५ हायस्कुल व १२ मी. रुंद रस्ता या प्रस्तावने नगर भुमापन ११३१४/१ मोहल्ला शिवनगर को. ऑप सोसायटी दमडी महल लगत असलेली मिळकत संपुर्ण बाधित आहे. सदर मिळकतीचे क्षेत्र ४४३९.५ चौ.मी.आहे.

उक्त मिळकतीच्या मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी सुचना शासनास बजावलेली आहे. शासनाने सदरील सुचना १५-०९-२००१ रोजी कायम केलेली आहे. शासनाने खरेदी सुचना कायम केल्याच्या तारखेपासुन एक वर्षाच्या आत म्हणजेच दिनांक १४-०९-२००२ पर्यंत भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आश्यक आहे. नसता उक्त मिळकत आरक्षणातुन मुक्त होऊन लगतच्या विकास योजना वापरानुसार बांधकाम परवानगी देय होईल.

तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १५२ नुसार महानगरपालिका आयुक्त सर्वसाधारण सभेच्या ठरावाशिवाय ४९ ची खरेदी सुचना प्रकरणी भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवता येऊ शकते.

विकास योजना सुधारित मध्ये आरक्षण क्र. १६५ चे कलम १२ मी.रुंद रस्ता या प्रस्तावामध्ये अर्जदाराची मिळकत नगर भुमापन क्र. ११३१४ शिवाय न.भु.क्र. ११३२४,११३२४/३,११३२४/४,११३२४/५,११३२४/७, ११३१४ ते ११३२५ बधित दर्शवुन आरक्षणा खालील क्षेत्र (०.६९ आर)६९६९ चौ.मी. व १२ मी.रुंद रस्त्यासाठी १२९६ चौ.मी.क्षेत्र बाधित होते.

परंतु शासनाने विकास योजना (सुधारित) मंजुरीच्या वेळी न.भु.क्र. ११३२४, ११३२४/३, ११३२४/४, ११३२४/५ व ११३२४/७ वगळण्यात आले त्यामुळे उक्त आरक्षणाखालील बाधित क्षेत्र (०.६९आर) ६९६९ चौ.मी. ऐवजी (०.५७आर) ५७५७ चौ.मी. दर्शविण्यात आले आहे.

सबब विकास योजना (सुधारित) मंजुरी नुसार उक्त आरक्षण खालील क्षेत्र ०.५७ आर (५७५७चौ.मी.) व १२ मीटर रुंद रस्त्याखालील क्षेत्र १२९६ चौ.मी. असे एकुण ७०५३ चौ.मी. क्षेत्र संपादन करुन संपुर्ण आरक्षण विकसीत करता येईल.

अर्जदाराने दिलेल्या खरेदी सुचना कायम करतांना शासनाने संपुर्ण आरक्षणा खालील क्षेत्र संपादन करणे बाबत सुचना दिली आहे.

सबब वरील आरक्षणा खालील बाधित होणाऱ्या मिळकतीसाठी शिघ्र दर रु. २६००/- प्रति चौ.मी. आहे. त्यानुसार चालु वर्षात जर भुसंपादन केले तर अंदाजे रु. १,४७,२३,२००/- एवढा खर्च येईल. शिघ्र सिध्द गणकाचे दर प्रति वर्षी १०% ते १५% ने वाढतात.

करिता भुसंपादन अधिनियमाखाली भुसंपादन करण्यास येणाऱ्या खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद

श्री. अंबादास दानवे : महानगरपालिकेची प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी आहे. हे हायस्कुलचे आरक्षण आहे. हायस्कुलची जबाबदारी महानगरपालिकेची नाही.

श्री. तकी हसनखान : आरक्षण क्र. १६५ हायस्कुलसाठी आहे. महापालिका हायस्कुल चालवित नाही. हायस्कुलसाठी जिल्हा परिषद भुसंपादन संस्था आहे. जिल्हा परिषदेची जबाबदारी आहे. महानगरपालिकेच्या कर्तव्यात येत नाही. महानगरपालिकेने खर्च करुन जागा घेण्याची आवश्यकता नाही. नियमाप्रमाणे या आरक्षणासाठी भुसंपादन संस्था महानगरपालिका नाही खुलासा करावा.

प्र.सहा.संचालक : ही जागा आरक्षणा मधील आहे. आरक्षण क्र. १६२ हायस्कुल व १२ मी. रुंद रस्त्याने बाधित आहे. कलम ४९ खालील नोटिस कायम झाली. शासनाने महानगरपालिकेस कळविलेले आहे. संबंधिताने खरेदी सुचना शासनास बजावलेली आहे. शासनाने खरेदी सुचना कायम केल्याच्या तारखेपासुन १ वर्षाच्या आत ही जागा भुसंपादन करणे आश्यक आहे. भुसंपादनासाठी सुमारे ३ कोटींची आवश्यकता आहे.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दीन : महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. जागा भुसंपादन करु नये.

श्री. तकी हसनखान : हायस्कुल साठीचे आरक्षण जागा महानगरपालिकेने भुसंपादन करणे नियमानुसार बरोबर नाही.

मा. महापौर : हायस्कुलसाठीचे आरक्षण आहे. परंतु महानगरपालिका हद्दीत येत आहे महानगरपालिकेतर्फे फक्त प्राथमिक शाळाचे वर्ग चालविले जाते. व हायस्कुल जिल्हा परिषद तर्फे चालविले जाते हायस्कुल संबंधीत जागा असल्याने व महानगरपालिका क्षेत्रात असल्याने शासनाने कळविलयानुसार प्रशासनाने प्रस्ताव ठेवलेला आहे. या बाबतीत महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्याने हायस्कुलच्या संबंधीत जागा असल्याने प्रशासनाने जिल्हा परिषद विभागाशी संपर्क साधुन या जागेचा मोबदला जिल्हा परिषद, शासन आपणांस देण्यास तयार असेल तर या प्रस्तावास तशी मान्यता देण्यात येते. प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर विकास योजना (सुधारित) आरक्षण क्र. १६५ हायस्कुल व १२ मी. रुंद रस्ता या प्रस्तावने नगर भुमापन ११३१४/१ मोहल्ला शिवनगर को. ऑप सोसायटी दमडी महल लगत असलेली मिळकत संपुर्ण बाधित आहे. सदर मिळकतीचे क्षेत्र ४४३९.५ चौ.मी. बाबत सदरील जागा ही हायस्कुलच्या संबंधीत असल्याने व महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्याने प्रशासनाने जिल्हा परिषदेशी संपर्क साधुन या जागेचा मोबदला जिव्हा परिषद, शासन आपणांस देण्यास तयार असेल तर या प्रस्तावास तशी मान्यता देण्यास व प्रशासनाने पुढील कार्यवाही करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७५/३ :**

प्रकल्प संचालक, महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण -२०००/प्र.क्र./५/२००१/३९ दिनांक २० जुलै २००२ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई व्दारे सोबत दिलेल्या शासन निर्णयाच्या दिनांकापासुन म्हणजेच २० जुलै २००२ पासुन एक वर्षाच्या आत विहित संगणक विषययक प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यांत येत आहे. हा निर्णय सर्व महानगरपालिकेना देखील लागु करण्यांत आलेला आहे.

तरी शासन निर्णयात नमुद केलेल्या सर्व बाबी औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना लागु होतील, याबाबत महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना वरील शासन निर्णय लागु करणेसाठी तसेच या अनुषंगाने यानंतर शासन निर्गमित/सुधारित होणारे सर्व निर्णय औरंगाबाद महानगरपालिकेला लागु असतील. वरील शासननिर्णय प्रमाणे प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर. शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.

संवाद

श्री. तकी हसनखान : कर्मचाऱ्यांना संगणक प्रशिक्षण देण्याचा प्रस्ताव आहे. महानगरपालिकेने संगणक प्रशिक्षण केंद्र उघडले आहे तेथेच या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यांत यावे. जेणे करुन महानगरपालिकेचा पैसा महानगरपालिकेकडेच येईल. दोन्ही कोर्सचे अफीलेशन आहे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. तकी हसनखान यांनी मांडलेली सुचना प्रशासनाने विचारात घेऊन तशी कार्यवाही करावी. तसेच महानगरपालिकेचे संगणकीकरण करण्याचे काम कुठपर्यंत आलेले आहे.

मुख्यलेखाधिकारी : या संदर्भात कल्याण डोंबिवली व पिंप्री चिंचवड महानगरपालिका कडुन माहिती संकलन केली आहे. नविन सॉफ्टवेअर डेव्हलप न करता तयार सॉफटवेअर घेतल्यास खर्च कमी येईल. छाननी झोलेली आहे.

मा. महापौर : संगणकीकरण मध्ये कोणकोणते विभाग घेणार आहे.

मुख्यलेखाधिकारी : यात मालमत्ता नगर रचना, जकात, पाणीपट्टी इतर उत्पन्नाचे विभाग आहेत त्या सर्वांचे संगणकीकरण करणार आहे.

मा. महापौर : जे जे विभागाचे संगणकीकरण करणार आहेत त्यात नगर सचिव विभागाचा सुध्दा समावेश करावा व या बाबतीत तात्काळ कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण - २०००/प्र.क्र./५/२००१/३९ दिनांक २० जुलै २००२ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई व्दारे दिलेल्या निर्णयाच्या दिनांकापासुन म्हणजेच २० जुलै २००२ पासुन एक वर्षाच्या आत विहित संगणक विषयक प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यांत आले आहे. हा निर्णय सर्व महानगरपालिकेना देखील लागु करण्यांत आला असुन शासन निर्णयात नमुद केलेल्या सर्व बाबी औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना लागु होतील, त्यामुळे हा शासन निर्णय लागु करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. महानगरपालिकिने संगणक प्रशिक्षण केंद्र उघडलेले आहे. तेथे कर्मचारी अधिकारी यांना प्रशिक्षण देणे बाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७६/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वाढत्या विजदरामुळे व होणाऱ्या अनियमित विज पुरठयामुळे सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या पथदिव्यांच्या यंत्रणेत स्तर उचावणे आश्यक झालेले आहे. त्यासाठी ऐनर्जी सेव्हींग डिव्हाईस (Energy sawing Divce) हया यंत्रचा शहराच्या पथदिवे यंत्रणेत वापर केला तर सध्या लागणाऱ्या विजेमध्ये काही प्रमाणात बचत होईल व पर्यायाने त्यामुळे विज देयकामध्ये खर्चामध्ये बचत होईल. सदर यंत्राचा पथदिव्याच्या यंत्रणेत वापर केल्यास विज खर्चात ३०% ते ३५% बचत होईल.

सदर यंत्र बसवल्यास येणारा खर्च जास्त असल्याने सद्य: स्थितीत महापालिकेकडुन अशी यंत्रे बसवण्याचा खर्च करण्याऐवजी प्रायागिक तत्वावर BOT धर्तीवर करुन घेतल्यास या बाबतच्या फायद्याबाबत /प्रत्यक्षात विजेत होणाऱ्या बचतीबाबत खात्री होऊन इतर भागातही सदर यंत्र बसवावीत किंवा कसे? या बाबतचे धोरण निश्चित करणे शक्य होईल. करिता मा. आयुक्त महोदय यांचे मंजुरीने प्रस्तावित करण्यांत येते की, शहरातील प्रमुख रस्ता क्रांतीचौक ते चिकलठाणा या भागासाठी या योजनेची प्रायोजिक तत्वावर BOT धर्तीवर अंमलबजावणी करण्यांत यावी व त्यास मान्यता व्हावी.

सदर योजने अंतर्गत प्रथमत: या भागातीजल १००% पथदिवे चालु करुन घेण्यांत येतील व नंतर सदरील यंत्रे बसवण्यात येतील व त्याचे वापरामुळे विजेच्या बचतीतुन काही प्रमाणांत (टक्केवारीमध्ये) यंत्रे बसवणाऱ्या ठेकेदारास रक्कम देण्यांत येईल. ठेकेदाराची

टक्केवारी मध्ये मागणी व Pay back period या बाबत मान्यता मिळाल्यानंतर संबंधीताच्या निवदे मार्फत दर मागवण्यांत येतील.

हा Pay back period मध्ये हया पथदिवे दुरुस्तीचे पुर्णतः देखभाल दुरुस्तीचे काम संबंधीताने करावयाचे असुन पुर्ण कालावधीकरिता १०% पथदिवे चालु ठेवणे त्यास बंधन कारक राहिल. एखादया पथदिवे बंद झाला तर तक्रार प्राप्तीनंतर ४८ तासामध्ये सुरु करणे व तक्रार निवारण करणे हे संबंधीतास बंधनकारक राहिल व तसे न केल्यास नंतरच्या प्रत्येक २४ तासाचे कालावधी करिता प्रत्येकी रु. १००/- प्रमाणे दंड आकारण्यांत येईल.

या यंत्राचे प्रत्यक्ष अंमलबजावणी करिता महानगरपालिकेस आज कोणताही खर्च करावा लागणार नाही उलट विजखर्चातील बचतीमुळे बचत होईल व देखभाल दुरुस्तीच्या खर्चात Pay back period पर्यंत बचत होईल.

सदरन योजनांचे फलित व यंत्र बसवण्यामुळे होणारी विज वापरातील बचत पर्यायाने विज खर्चातील बचत इत्यादी विचारात घेऊन या यंत्राचा इतर रस्त्याकरिता वापर करण्याबाबत मुल्यमापन प्रायोगिक तत्वावर योजना राबविल्यानंतर करता येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. मीर हिदायत अली : प्रस्ताव महानगरपालिकेच्या फायद्याचा आहे. एनर्जी सेंव्हींग डीवाईस मुळे ३० ते ३५% बचत होणार असे दिले.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : विजेचा बचत होईल प्रस्ताव चांगला आहे. काही भागात दिवसभर लाईट चालु असतात तर काही भागात लाईट नाही म्हणुन मागणी करुनही लाईट दिले जात नाही माझ्या वार्डात २८ टयुब १५ होल्डेजन बल्ब बंद आहे, दुर्लक्ष केले जाते. त्या ठिकाणी कोणतीही व्यवस्था आतापर्यंत झालेली नाही. मागच्या काही वर्षापुर्वी सेंट्रल नाका ते विमानतळ हे यंत्र बसवले. आज कोठे आहे वापर होत नाही दुर्लक्ष झाले आहे का.

कार्य. अभियंता (विदुयत) : अशा पध्दतीने लाईट लावण्याची कार्यवाही केलेली नाही.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : यावर खर्च केलेला होता अधिकाऱ्यांना माहित नसेल परंतु अशा पध्दतीने लाईट लावण्याची योजना चालु केली होती लाखो रुपये खर्च झालेले आहे. त्याप्रमाणे यापुढे होऊ नये.

श्री. अफसर खान : रात्रदिवस काही भागात लाईट चालतात लक्ष दिले जात नाही. महानगरपालिकेस खर्च येतो प्रस्ताव मंजुर करावा.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : यापुर्वी ही योजना राबविण्यात आलेली होती पुराव्या सह देतो त्यावेळचे जे अधिकारी होते, त्यांचे कडुन माहिती घ्यावी. या योजनेत मोठ मोठे रस्ते घ्यावे.

कार्य.अभियंता (विद्युत) : सध्या प्रस्तावानुसार क्रांतीचौक ते चिकलठाणा या रस्त्यांचे काम हाती घेणार आहोत यात ३० ते ३५% विजेची बचत होणार आहे. योजना सक्सेस झालयास इतर शहरातील रस्त्यावर BOT पध्दतीने कार्यवाही करुन विजेची बचत करता येईल.

श्री. प्रशांत देसरडा : प्रायोगिक तत्वावर काही झोनचे स्वच्छता व विद्युतीकरण करण्याचे निर्णय बजेटच्या बैठकीत घेण्यात आलेला होता आतापर्यंत काय कार्यवाही केली.

कार्य. अभियंता (विद्युत) : शहरात महानगरपालिका व विद्युत विभाग (एम.एस.ई.बी) मिळुन एकुण २२००० पोल आहे. त्यापैकी १४००० पोल एम.एस.ई.बी. चे आहे.

महानगरपालिकेच्या मालकीचे एकाच बाजुला पोल असतील तर प्रायोगिक तत्वावर कार्यवाही होऊ शकेल. एका झोन मध्ये महानगरपालिका मालकीचे पुर्ण पोल नाहीत. त्यामुळे करता येईल किंवा नाही ते पहावे लागेल. खर्च वाढेल.

मा. महापौर : विषय सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वाढत्या विजदरामुळे व होणाऱ्या अनियमित विज पुरठयामुळे सद्यःस्थितीत असलेल्या पथदिव्यांच्या यंत्रणेत स्तर उचावणेसाठी ऐनर्जी सेव्हींग डिव्हाईस हया यंत्राचा शहराच्या पथदिव्यांच्या यंत्रणेत वापर करुन विज खर्चात ३०% ते ३५% बचत होणार आहे. करिता सदर यंत्रणा हि.बी.ओ.टी. (BOT) पध्दतीने शहरातील प्रमुख रस्ता असलेल्या क्रांतीचौक ते चिकलठाणा या भागासाठी प्रायोगिक तत्वावर करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७७/५ :**

कुल सचित, श्रीमती नथीबाई दामोधर ठकरशी महिला विद्यापीठ (womens university) मुंबई यांचे पत्र क्र. इलेक्शन- जीइएन-२००२-२००३/१९९ दिनांक-१७ ऑगस्ट,२००२ अन्वये कळविले आहे. या विद्यापीठाच्या सिनेटवर सन २००२,२००३ करिता एक प्रतिनिधीची नियुक्ती करण्यास शिफारस करण्यांत यावी असे कळविले आहे.

तरी एका प्रतिनिधी निवड करण्या करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री.शे. ईसाक शे. जैनोद्दीन : स. सदस्या सौ. निखत परवीन ईजाज अली यांचे पतिनिधी म्हणुन नांव देण्यांत यावे.

श्री. अफसरखान : यास माझे अनुमोदन आहे. आघाडीच्या महिलांना प्राधान्य देण्यांत यावे.

श्री. डॉ. भागवत कराड : एकच नांव सुचवायचे आहे. याबाबतीत लवकरात लवकर विद्यापीठाला कळवण्यात यावे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : मार्केट कमेटीमध्ये व मेडीकलला देखिल एक प्रतिनिधी पाठवतो. आपण निर्णय घ्यावा. यापुर्वी निवडणुक झाली होती.

श्री.डॉ. भागवत कराड : मा. महापौरांना निवडीबाबतचे अधिकार देण्यांत यावे.

मा. महापौर : डॉ. कराड यांनी सुचना मान्य करण्यांस मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महिला विद्यापीठ मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर सन २००२,२००३ करिता एक प्रतिनिधीची नियुक्ती करण्याचे आधिकार मा. महापौरांना देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७८/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग समिती अ चे सभापती यांनी पुणे /पिंपरी चिचंवड/ठाणे/कोल्हापुर महानगरपालिका येथील प्रभाग समितीचे काग्र आणि प्रभाग समिती ब चे सभापती यांनी प्रभाग समिती अ. व ब चे सर्व सभासदासाठी कोल्हापुर/सोलापुर/ पुणे महानगरपालिका येथे अभ्यास दौरा आयोजित करण्याची मागणी केली आहे.

या बाबतीत प्रशासनाचे असे मत आहे की, प्रभाग समितीचे अध्यक्षांना एकत्रित रित्या पुणे/पिंपरी चिंचवड/ कोल्हापुर/सोलापुर/ठाणे या माहनगरपालिकेचा अभ्यास दौरा करणे योग्य होईल आणि प्रभाग समितीचे सदस्यासाठी म्हणजेच सर्व पालिका सदस्या करिता या महानगरपालिकेमध्ये कार्यशाळा आयोजित करणे योग्य राहिल.

त्यानुषंगाने प्रभाग समिती अ/ब/क/ड चे अध्यक्षा करिता पुणे/पिंपरी चिंचवड/ठाणे/कोल्हापुर/ सोलापुर महानगरपालिका येथे अभ्यास दौरा आयोजित करणे, आणि सर्व पालिका सदस्यांसाठी महानगरपालिकेमध्ये कार्यशाळा आयोजित करणे आणि याकरिता येणाऱ्या संभाव्य खर्चाचे मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद
मा. महापौर : प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अ,ब,क,ड चे अध्यक्षाकरिता पुणे/पिंपरी चिचंवड/ठाणे/कोल्हापुर/सोलापुर महानगरपालिका येथे अभ्यास दौरा करण्यास आणि सर्व पालिका सदस्यासाठी या महापालिकेमध्ये कार्यशाळा आयोजित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. प्रभाग समिती अ/ब/क/ड चे अध्यक्षांचा अभ्यास दौरा आणि सर्व पालिका सदस्य यांचेसाठी आयोजित करण्यांत येणारी कार्यशाळा यासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# "पुरवणी विषय"

**विषय क्र. ६७९/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील घोषित स्लम भाग आहेत तसेच गरिबांची संख्या औरंगाबाद शहरामध्ये जास्त प्रमाणात आहेच. बऱ्याच नागरिकांना नळ कनेक्शन नाहीत. त्यामुळे गरिब नागरिकांना पिण्याच्या पाण्याकरिता वन वन भटकावे लागत आहेत. अभय योजने अंतर्गत आणि महानगरपालिकेच्या धोरणमुळे नविन नळ कनेक्शन घेण्यास नागरिक तयार होत नाहीत. तसेच एकाच रकमेत पाणीपट्टी पैसे भरणे गरिब नागरिकांच्या ऐपती बाहेरचे आहेत. माझ्या वार्ड क्र. एक मध्ये सर्वसामान्य आणि हातावरती काम करणारे रोजनदार वर्ग जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे काही नागरिकांनी अनाधिकृत नळ कनेक्शन घेतले होते.

त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिका तोटयात आहे. नागरिकांचे आणि महानगरपालिकेचे संगणमत होऊन आणि नागरिकांना दिलासा मिळेल व महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. या दृष्टीने महानगरपालिकेने दोन किंवा तीन हप्ते पाडुन द्यावेत व नविन नळ कनेक्शन देण्याची सोय सुरु करावी.

कारण महानगरपालिकेने नविन स्टॅन्ड पोस्ट न बसविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अनाधिकृत नळ कनेक्शन घेतलेल्या नागरिकांना देखील या योजनाचा लाभ द्यावा. यापुर्वी म.न.पा. तत्कालीन आयुक्त श्री. भोगे यांनी पुर्वी राबविली होती. हया योजनेमुळे अनधिकृत नळ धारकांना आळा बसेल आणि महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये भर पडेल. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक : श्री ठकुजी रामसिंग वाणी
अनुमोदक : श्री. किशोर शिंदे

संवाद
मा. महापौर : सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावाचे सुचक प्रस्तावाच्या वेळी सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ६८०/२ :**

प्रभाग क्रमांक २६,२७,२८ तसेच प्रभाग क्र. २५ मध्ये देवगिरी कॉलेज, शासकीय तंत्रनिकेतन (पॉलिटेन्किक) इजिनिअरिंग कॉलेज, फुले अध्यापक महाविद्यालय,नागसेन विद्यालय, नागसेन महाविद्यालय अशा शैक्षणिक संख्या असुन या संख्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अनेक उदयोन्मुख खेळाडु आहेत. या भागामध्ये खेळाचे मैदान उपलब्ध नाही. या भागात राहणारे काही खेळांडुनी क्रिकेट,हॉलीबॉल, फुटबॉल या खेळात विशेष प्रविण्या मिळविलेले असुन राज्य स्तरावरील संघात त्यांचा सहभाग आहे. अशा खेळांडुना प्रोत्साहन मिळावे, त्यांची खिलाडुवृत्ती जोपासली जावी. त्यांच्या खेळात सातत्य टिकवण्यासाठी या भागात खेळाचे मैदान (क्रिंडागण) असणे अत्यंत आवश्यक आहे.

सि.स.नं. १६३४० मध्ये याकरिता जागा उपलब्ध असुन शैक्षणिक झोन असल्याने खेळाचे मैदान करिता जागा आरक्षित करुन संपादन करण्यांत यावी.

करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री. प्रकाश निकाळजे
अनुमोदक : श्री संजय शिरसाठ, श्री. रतनकुमार पंडागळे

संवाद
श्री.डॉ. भागवत कराड : संपुर्ण माहितीसह प्रस्ताव प्रशासना मार्फत ठेवावा.
मा. महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती घ्यावी व संपुर्ण माहितीसह प्रस्ताव ठेवण्यांत यावा.

**ठराव :**

सदर प्रस्ताव संपुर्ण माहितीसह ठेवण्यात यावा असे ठरले त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ६८१/३ :**

महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय सुरु करण्यात आले. सुप्रसिध्द इतिहासकार व शिवशाहीर मा. बाबासाहेब पुरंदरे यांचा महानगरपालिकेच्या वतीने उचित गौरव करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेमार्फत

बाबासाहेब पुरंदरे यांना ५१,०००/- रुपयांची थैली अर्पण करणे. मानपत्र व गौरवचिन्ह प्रदान करणे करिता मा. महापौर आयुक्त, मुख्यलेखाधिकारी, प्रकल्प संचालक तसेच डॉ. मोरवंचीकर यांची गौरव समित्याचे गठण करणे तसेच त्यांचे भव्य सत्कार समारंभासाठी लागणाऱ्या खर्चास मंजुरी देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर
अनुमोदक : श्री. राधाकृष्ण गायकवाड, श्री. जयवंत केशवराव ओक,
श्री. जगदिश सिध्द

मा. महापौर : विषय क्र. ३,४, सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सुप्रसिध्द इतिहासकार व शिवशाहीर मा. बाबासाहेब पुरंदरे यांचा रुपये ५१,०००/- ची थैली अर्पण करणे. मानपत्र व गौरवचिन्ह प्रदान करणे करिता मा. महापौर मा. आयुक्त, मुख्यलेखाधिकारी, प्रकल्प संचालक तसेच डॉ. मोरवंचीकर यांची गौरव समित्याचे गठण करुन भव्य सत्कार समारंभासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८२/४ :**

भिमनगर (भावसिंगपुरा) वार्ड क्र. २ मध्ये असलेल्या मनपाच्या शाळेचे नामकरण अध्याप पावेतो झालेले नसल्यामुळे व सदरील वर्ष हे राजश्री शाहु महाराजांचे शताब्दी गौरव वर्ष असल्यामुळे व आरक्षणाचे अध्यशिल्पकार औचित्य साधुन मनपाच्या भिमनगर भावसिंगपुरा येथील शाळेत राजश्री शाहु महाराजांचे नांव देऊन गौरव करावा करिता प्रस्ताव चालु महिण्याच्या सर्वसाधारण सभे करिता मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. गणेश तांबे
अनुमोदक : नासेरखान सरदार खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भिमनगर भावसिंगपुरा येथील महानगरपालिकेच्या शाळेत राजश्री शाहु महाराजांचे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८३/५ :**

प्रस्ताव सादर येतो की, महाराष्ट्र शासनाने गट क व ड नुसार वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने कुंठीतता घालविण्यासंबंधी योजना शासन निर्णय क्र. वेतन २०००/प्र.क्र.-१०/सेवा-३/मंत्रालय,मुंबई दि.३ ऑगस्ट २००१ नुसार मिश्रक/औषध निर्माता कर्मचाऱ्यांना कालाब्ध पदोन्नती देण्यात आलेली रु. ५०००-१५०-८००० ही वेतनश्रेणी रद्द करुन सुधारित वेतनश्रेणी ५५००-१७५-९००० मंजुर केलेली आहे. परंतु अशा प्रकारची वेतनश्रेणी महानगरपालिका कर्मचाऱ्यांना लागु करण्यांत आलेली नाही.

तरी शासन निर्णयाप्रमाणे मनपा कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी मंजुर करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. भगवान रगडे

अनुमोदक : श्री. स.अली सलामी स.मीरा सलामी, श्री. शे. मुनाफ शे. यासीन, श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान

संवाद

श्री. अंबादास दानवे : हा प्रस्ताव प्रशासकीय यावयास पाहिजे तसेच प्रस्तावाचे अनुमोदक सभागृहात नाही.

श्री. भगवान रगडे : शासनाचेच पत्र आहे इतर महानगरपालिकेत कालबध्द वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. या महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना सुध्दा कालबध्द सुधारित वेतन श्रेणी द्यावी व प्रशासनास कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे. प्रस्ताव मंजुर करावा.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दीन : कर्मचाऱ्यांचे सुध्दा हित जोपासचे त्यांचेवर अन्याय होऊ नये याची जाणीव ठेवुन प्रस्ताव मंजुर करावा.

श्री. अंबादास दानवे : अनुमोदक नाही.

डॉ. श्री. भागवत कराड : प्रस्तावाचे सुचक व अनुमोदक उपस्थित असतील तर मान्यता देण्यांत यावी.

मा. महापौर : प्रस्तावास स्थगिती देण्यांत येते.

**ठराव :**

सदर प्रस्ताव स्थागित ठेवण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ६८४/६ :**

महानगरपालिके मार्फत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय उभारले असुन या संग्रहालयात अत्यंत दुर्मिळ अशा वस्तु,नाणी,प्राचिन काळातील तसेच इतिहास कालीन साहित्य ठेवलेले आहे. पुराणवस्तु संग्रहालय पाहणेसाठी शहरातील नागरिक, महिला,मुले यांची संख्या वाढत आहे. संग्रहालयासाठी महानगरपालिके मार्फत प्रवेश शुल्क ठेवण्यात आलेले असुन महानगरपालिका शाळेत शिकत असलेले विद्यार्थी मध्यम वर्गीय व अत्यंत गरिब तसेच दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील असल्यामुळे हे विद्यार्थी फिस भरुन संग्रहालय पाहु शकत नाही. महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना प्राचीन इतिहासाची ओळख व्हावी. त्यांचे ज्ञानात भर पडावी, इतिहासाचे स्मरण रहावे या साठी महापालिकेच्या सर्वही शालेय विद्यार्थ्यांना संग्रहालय फीस आकाण्यात येऊ नये. जेणे करुन विद्यार्थ्यी संग्रहालय पाहणेसाठी त्यांचे कुटुंबीयांना प्रवृत्त करतील व त्या विद्यार्थ्यांना प्राचीन इतिहासाची माहिती होऊन त्यांचे ज्ञानात भर पडेल. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. नंदकुमार फुलारी
अनुमोदक : श्री. संजय शिरसाठ, श्री. जगदिश सिध्द, श्री. भरत लकडे

मा. महापौर : सर्वानुमते प्रस्ताव मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना श्रीमत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय पाहण्यासाठी संग्रहालयाची असलेली प्रवेश फी न घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८५/७ :**

प्रस्ताव सादर येतो की, जबिंदा इस्टेट येथे असलेल्या महापलिकेच्या रंगमंचाला विर सावरकर खुले रंगमंच आणि ज्ञानेश्वर नगर येथे खुल्या जागेवर असलेल्या खुल्या रंगमचास स्वामी विवेकानंद खुले रंगमंच असे नांव देणे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. साधना सुरडकर, डॉ. आशा बिनवडे
अनुमोदक : सौ. संगिता मैंद, श्री. राजु शिंदे

मा. महापौर : विषय क्र. ७,८,९,१० सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जबिंदा इस्टेट येथे असलेल्या महापलिकेच्या रंगमंचाला विर सावरकर खुले रंगमंच आणि ज्ञानेश्वर नगर येथील जागेवरील खुल्या रंगमचास स्वामी विवेकानंद खुले रंगमंच असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८६/८ :**

प्रस्ताव सादर येतो की,प्रभाग क्र. ८ अशोकनगर (मसनतपुर) येथे असलेल्या महानगरपालिकेच्या शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव देण्यांत यावे तसेच येथील डी.पी.इ.पी. शाळेस मातोश्री रमाबाई आंबेडकर यांचे नांव देणे करिता प्रस्ताव सर्व साधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. राजु शिंदे, सौ. संगिता मैंद, सौ. मंदाबाई पवार
अनुमोदक : सौ. साधना सुरडकर, श्री. कवडे साहेबराव

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र. ८ अशोकनगर (मसनतपुर) येथील महानगरपालिकेच्या शाळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच डी.पी.इ.पी. शाळेस मातोश्री रमाबाई आंबेडकर यांचे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८७/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, बुढ्ढीलेन नेहरुभवन येथील मनपा न नविन शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधले आहे. त्या शॉपिंग कॉम्प्लेक्सला पै. माजी मंत्री श्री. अब्दुल अजीम मार्केट असे नांव देण्यांत यावे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. सय्यद सलिम युसुफ
अनुमोदक : श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली,
श्री. सलीम पटेल समशेर पटेल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बुढ्ढीलेन नेहरुभवन येथे महापालिकेने नव्याने बांधलेल्या शॉपिंग कॉम्प्लेक्सला पै. माजी मंत्री श्री. अब्दुल अजीम मार्केट असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८८/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मनपा ने जे कबाडीपुरा येथे नविन शॉपिंग कॉम्प्लेक्स तयार केलेले आहे. ते जमालशाह बाबा यांच्या दर्गा समोर आहे.

म्हणुन कबाडीपुरा येथील व्यापारी संकुलास जमालशाह बाबा मार्केट असे नांव देण्यांत यावे, करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. सय्यद सलिम सय्यद युसुफ, श्री. सलीम पटेल

अनुमोदक : श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कबाडीपुरा येथील व्यापारी संकुलास जमालशाह बाबा मार्केट असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८९/११ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र. ७६ कैसर कॉलनी येथील निजामोद्यीन रोडवरील म.न.पा ची उर्दु वाचनालयास मराठवाडयातील प्रसिध्द शायर/कवी पै. अख्तर उज्जमा नासेर यांचे नावं देण्यांत यावे. असे उर्दु साहित्यकाची वरेच दिवसापासुन मागणी आहे.

तरी मा. महापौर ना विनंती करण्यांत येते. सदरील प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेमध्ये ऐनवेळीचे प्रस्ताव म्हणुन सभेपुढे मंजुरीच्यासाठी विचारार्थी सादर करावे.

सुचक : श्री. सलीम पटेल समशेर पटेल

अनुमोदक : श्री. सय्यद सलीम सय्यद युसुफ

मा. महापौर : सुचक उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावाच्या वेळी सुचक सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ६९०/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या वॉर्डात बेगमपुरा, येथील स्मशान भुमी मध्ये औरंगाबाद महापालिकेतर्फे माझ्या स्वेच्छा निधीतुन शेड उभारण्यांत आलेले आहे, तरी सदरील शेडला कै. श्री. बालंना सोळुके असे नांव देण्यांत यावे.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री. किशोर शिंदे

अनुमोदक : श्री. ठकुजी वाणी

मा. महापौर : अनुमोदक उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावाच्या वेळी अनुमोदक सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ६९१/१३ :**

महानगरपालिके मार्फत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय उभारण्यात आलेले आहे. या संग्रहालयास काही व्यक्तींनी त्यांचेकडे असलेल्या पुराण वस्तु, प्राचिन,नाणी व इतर साहित्य दिलेले आहे. त्यांनी दिलेले प्राचिन वस्तु व इतर साहित्य या संग्रहालयात ठेवण्यात आलेले आहे.

श्री. रमेश रुणवाल यांनी देखिल या वस्तु संग्रहालयास बरीच प्राचिन नाणी विना मुल्य दिलेली असुन त्याबाबत महानगरपालिकेने त्यांचेशी करारनामा सुध्दा केलेला आहे. त्यांचेकडे अजुनही बऱ्याच प्राचिन मौल्यवान वस्तु व नाणी शिल्लक आहेत. त्या सर्वही अति प्रचिन दुर्मिळ वस्तु संग्रहालयासाठी पुर्वी प्रमाणेच करारनामा करुन घेण्याबाबत त्यांनी महानगरपालिका प्रशासनास वेळोवेळी बरेच पत्र दिलेले आहेत.

श्री. रमेश रुणवाल यांचे कडुन त्यांचेकडे असलेल्या अति प्राचिन दुर्मिळ, मौल्यवान वस्तु व नाणी पुर्वी प्रमाणेच करारनामा करुन घेणे तसेच त्यांना भविष्यात अजुनही अशा वस्तु संकलान करणेसाठी अन्य व्यक्तींना जसे मानधन देण्यांत येते. त्याच धर्तीवर मानधन देण्यांत यावे त्याचप्रमाणे सोबत यापुर्वी झालेल्या करारनाम्यानुसार दरवर्षी २५,०००/- रुपये एवढया रकमेची विकास कामे नाणी दिल्या त्या २६-१२-९९ पासुन त्यांनी सुचविल्यानुसार पुर्ण करणे अथवा तेवढी रक्कम संबंधीतास रोख अथवा धनादेशाव्दारे हस्तांतरीत करणे तसेच त्यांचे कडील मौल्यवान प्राचीन नाणी व वस्तु घेणे तसेच त्यांचे नांव शिलालेखान लामतुर यांचे नांव नंतर कोरने बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर

अनुमोदक : संजय शिरसाठ, श्री. रतनकुमार पंडागळे, श्री. सुदाम सोनवणे.

संवाद

श्री. शे. ईसाक शे.जैनोद्दीन : त्यांनी अनेक वेळा विनामुल्य दिले आहे. विनामुल्य घेण्यास हरकत नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : हा प्रस्ताव मंजुर करावा.

श्री. अफसर खान : विनामुल्य घ्यावे. पैश्याची अट काढावी पध्दत पडुन जाईल. उद्या १० माणसे येतील.

श्री. प्रकाश निकाळजे : ऐतिहासिक नाणी आहे. पेशवे कालीन आहेत. रु. ५१,०००/- देवुन मंजुर करावा.

मा. महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री. रमेश रुणवाल यांचे कडुन त्यांचेकडे असलेल्या अति प्राचिन दुर्मिळ, मौल्यवान वस्तु व नाणी पुर्वी प्रमाणेच करारनामा करुन घेणे तसेच त्यांना भविष्यात अजुन अशा वस्तु संकलन करणेसाठी अन्य व्यक्तींना जसे मानधन देण्यांत येते. त्याच धर्तीवर त्यांना मानधन देण्यांस व यापुर्वी त्यांचे सोबत झालेल्या करारनाम्यानुसार

दरवर्षी २५,०००/- रकमेची त्यांना सुचना केलेली विकास कामे नाणी दिलेल्या ताखेपासुन म्हणजेच २६-१२-९९ पासुन पुर्ण करणे अथवा तेवढी रक्कम त्यांना विकास कामे करण्यासाठी रोख अथवा धनादेशाव्दारे देण्यांस व त्यांचेकडील मौल्यवान प्राचिन नाणी व वस्तु घेणे तसेच त्यांचे नांव शिलालेखावर लामतुरे यांचे नावानंतर कोरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९२/१४ :**

शेतकरी संघटनेचे जेष्ठ नेते, हेमंद देशमुख यांचे दि. १९-०७-२००२ रोजी कार अपघातात दुःखद निधन झाले ते मुकुंद सांस्कृतिक प्रतिष्टानाचे सचिव होते. त्यांचे वास्तव्य मुकुंद सहकारी गृहनिर्माण संस्था एन-२ येथे होते. त्यांचे मित्र व सहकाऱ्यांनी या शेतकरी संघटनेच्या नेत्याची आठवण राहावी म्हणुन एन-२ भागातील कामगार चौक ते महालक्ष्मी चौक या रस्त्यास कै. हेमंत देशमुख मार्ग असे नांव देणे बाबत मागणी केली आहे.

हेमंत देशमुख यांचे शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य विचारात घेऊन वर नमुद केलेल्या रस्त्यास कै. हेमंत देशमुख मार्ग असे नांव देणे बाबत.

प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सचुक : आनंद तांदुळवाडीकर, श्री. सुदाम सोनवणे
अनुमोदक : श्री. संजय शिरसाठ

मा. महापौर : विषय क्र. १४,१५ सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-२ भागातील कामगार चौक ते महालक्ष्मी चौक या रस्त्यास कै. हेमंत देशमुख मार्ग असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९३/१५ :**

महानगरपालिकेमार्फत विविध क्रिडा स्पर्धाचे आयोजन करण्यांत येते दरवर्षी या स्पर्धांमध्ये अनेक खेळाडु सहभागी होतात. अन्य क्रिडा स्पर्धा सोबतच दर वर्षी अखिल भारतीय व राज्य क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे. जेणे करुन या खेळात देखिल अनेक खेळांडुना सहभागी होण्याची संधी मिळेल. अन्य खेळांप्रमाणेच महापौर चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजित करणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर
अनुमोदक : श्री. संजय शिरसाठ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेमार्फत होणाऱ्या क्रिडा स्पर्धामध्ये अखिल भारतीय व राज्य स्तरीय क्रिडा पटु साठी महापौर चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# "ऐन वेळचे विषय"

**विषय क्र. ६९४/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका मध्ये सन २००१ पासुन महिला व बाल कल्याण समिती सभापती पद निर्माण करण्यांत आले त्या पदाची कार्यकक्षा ही पुर्ण शहरासाठी निश्चित केलेली आहे. तसेच सभापती व उप सभापती या दोन्ही पदासाठी गाडी वापरण्यापत येते. शहरात कार्यक्रम असला की दोन्ही पदासाठी गाडी वापरण्यात येते. यासाठी हा दिलेला इंधन खर्च कमी पडतो.

तरी स्थायी समिती, सभापती पदासाठी जेव्हढा इंधन खर्च दिला जातो. तितका इंधन खर्च महिला व बाल कल्याण समिती, सभापती पदासाठी देण्यांत यावा ही विनंती.

सुचक : सौ. साधना सुरडकर
अनुमोदक : सौ. विजया रहाटकर, श्री. प्रशांत देसरडा,
सौ. जयश्री कुलकर्णी, सौ. सुवर्णा चंद्रात्रे,
श्रीमती डॉ. आशा बिनवडे
श्री. राजु शिंदे

मा. महापौर : मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सभापती स्थायी समिती, यांना जेव्हढा इंधन खर्च देण्यांत येतो. तेव्हढाच इंधन खर्च महिला व बाल कल्याण समिती सभापती यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९५/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या वार्डातील मौलाना आझाद चौक येथे हायमास्ट लाईट, लावण्याचे कळविले होते. परंतु आर्थिक वर्ष २००२ ते २००३ या कामासाठी तरतुद उपलब्ध नसल्याने हे काम या वर्षी करता येत नाही असे लेखा विभाग तर्फे कळविण्यांत आलेले होते.

तरी मा. साहेबांनी सदरील काम व त्याचे अंदाजपत्रक तयार करुन पुढील आर्थिक वर्षात करुन द्यावे व तसे आपण संबंधीत अधिकाऱ्यांना सुचना द्यावी.

उप अभियंता (विद्युत विभाग-२) यांची एक प्रत जोडलेली आहे. आम्ही दिलेली लेटरची प्रत जोडलेली आहे ही नम्र विनंती.

सुचक : सौ. सुलताना बेगम चाँदखाँ
अनुमोदक : श्री. मुनाफ शे. यासीन,
श्री. स.अली सलामी स. मीरा सलामी

मा. महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौलाना आझाद चौक येथे हायमास्ट लाईट लावण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९६/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपलिकेतर्फे शहानुरमियाँ दर्गा जवळील एकता चौक तसेच टिळक नगर रोपळेकर हॉस्पीटल जवळील सावरकर चौक आणि सुतगिरणी चौक, गारखेडा या तीन चौकात महानगरपालिकतर्फे हायमास्ट दिवे बसविण्यात यावेत. यासाठी आवश्यक असणारी रक्कम अ. पत्रकात तरतुद केलेल्या व उपरोक्त दिव्यांचे टेंडर कमी गेले मुळे शिल्लक रहात असलेल्या रकमेतुन करण्यांत यावी.

सुचक : सौ. साधना सुरडकर
अनुमोदक : सौ. विजया रहाटकर, श्री. प्रशांत देसरडा

मा. महापौर : प्रस्ताव सर्वानमुते मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरमियाँ दर्गा जवळील एकता चौक, सावरकर चौक आणि सुतगिरणी चौक तीन चौकात हायमास्ट दिवे बसविण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच यासाठी आवश्यक असणारी रक्कम अंदापत्रकात तरतुद केलेल्या व त्यांच्या निविदा कमी दराने गेल्यामुळे शिल्लक राहिलेल्या रक्कमेतुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

संवाद

सौ. कचराबाई लोखंडे : माझ्या वार्डात लाईट, स्वच्छता व इतर ही विकास कामे होत नाही. वेळोवेळी सुचना दिल्या काहीच कार्यवाही होत नाही. रस्त्यासाठी बजेट होते काम केले नाही.

मा. महापौर : संबंधीत अधिकारी यांनी स. सदस्यांच्या सुचनेची नोंद घ्यावी. त्यानुसार तात्काळ काम करण्यांत यावे.

मा. सौ. निखत परविन एजाज अली,
नगरसेविका (प्राप्त दि. १४-०८-२००२)

# प्रश्नोत्तरे

प्रश्न क्र. ८० :

| अ. क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १. | जोहरी बाजार (जुनी रिगल टॉकीजच्या जागेवरील) मार्केटच्या बांधकामास परवानगी दिलेली आहे | होय. |

| | | |
|---|---|---|
| | का? | |
| २. | दिले असेल तर केंव्हा दिली. | संचिका क्र. ७१५/१७/९७ बा.प्र.क्र. ७१९/९७ दिनांक २०-०३-१९९७. |
| ३. | सदरील इमारतीची बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेण्यांत आले आहे का? | नाही. |
| ४. | मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम केले आहे का. | या बाबतीत तपासणी करुन पुढील सर्वसाधारण सभेपुढे आपणांस माहिति देण्यांत येईल. |
| ५. | अनधिकृत बांधकाम चालु आहे का? तर चालु असेल तर काय कार्यवाही करण्यांत आलेली आहे. | ----- |

प्रश्न क्र. ८१ :

| अ. क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १. | पंजाब नॅशनल हॉटेल पानदरिबा येथे पाण्याचे नळ कनेक्शन कोणत्या साईजचे दिलेले आहे. व्यावसायिक आहे किंवा घरगुती. | सदरील हॉटेलला ३/४ इंच दोन नळ कनेक्शन देण्यांत आलेले असुन हे कनेक्शन व्यवसायिक स्वरुपाचे दिले आहे. संबंधीताने मार्च ०२ अखरे पर्यंत पाणी पट्टीचा भरणा केलेला आहे. नळ खाता क्र. ६०८०५ अर्धा इंच व्यासाचे व्यावसायिक व ५१७६६ पाऊण इंच व्यासाचे व्यावसायिक |
| २. | व सदर हॉटेलच्या इमारतीस केंव्हापासुन व किती मालमत्ता कर लावण्यात आलेला आहे. व आतापर्यंत मालमत्ता व पाणीपट्टी कर भरला आहे का व भरला नसेल तर किती मालमत्ता व पाणीपट्टी थकबाकी आहे. | सदरील हॉटेलला सन १९८९ पासुन कर आकारण्यात आलेला आहे. (२३७७५ प्रति वर्ष) संबंधीताने मार्च अखेर पर्यंत मालमत्ता कराचा भरणा केलेला आहे. |

प्रश्न क्र. ८२ :
(प्राप्त दि. २८-०८-२००२)

| अ. क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १. | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत एकुण किती मोबाईल टॉवर आहेत त्यापैकी किती कॅम्पनीनी आपल्या विभागाकडुन रितसर परवानगी घेतलेली आहे. परवानगी घेतलेल्या | अप्राप्त (स.स.न.र.) |

| | | |
|---|---|---|
| | टॉवरचे कॅम्पनी व कोणती ठिकाणी आहेत याची सविस्तर माहिती लेखी स्वरुपात मला त्वरीत पुरविण्यात यावी. | |

प्रश्न क्र. ८३ : प्रश्न क्र. ८३ वगळण्यात आला.
मा.सौ. सिद्यीकी नईम सुलतान, नगरसेविका
(प्राप्त दि. २८-०८-२००२)

मा.श्री. नंदकुमार घोडेले, नगरसेवक
(प्राप्त दि. २९-०८-२००२)

प्रश्न क्र. ८४ : १) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडुन प्रतिनियुक्ती एकुण किती अभियंत्रे, लिपीक व इतर कर्मचारी यांना मागविण्यात आले होते कोणत्या उद्देशाकरिता किती वर्षासाठी?
२) म.जि.प्रा.(M.J.P.) च्या अधिकाऱ्यांना आर्थिक तरतुद खर्च करण्याचे अधिकार आहेत काय? कोणत्या नियमानुसार जर काही त्यांच्या चुकीने नुकसान झाले तर जबाबदारी कोणती?
३) जर नियोजित कालववधीपेक्षा त्यांचा कार्यकाल जास्त झाला असेल तर त्याची मंजुरी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करुन सर्वसाधारण सभेसमोर ठेवुन घेतली आहे काय?
४) सध्या कनिष्ठ अभियंता यांचेकडे अतिरिक्त कार्यभार असल्याचे निदर्शनास आले आहे? ही बाबत जर सत्य असेल तर नविन रेग्युलर उप अभियंता बाबत आपण म.जि.प्रा. कडे मागणी केलेली आहे काय? आणि कार्यभार किती महिणेसाठी देता येतो?
५) जर म.जि.प्रा. चे प्रतिनियुक्तीवरचे कर्मचारी, अधिकारी यांना परत पाठवायचे प्रयोजन नसेल तर त्यांना म.न.पा. च्या सेवेत कायम करणार काय? कोणत्या नियमानुसार?

उत्तर : कार्यकारी अभियंता (पा.पु.) माहिती संकलित झाल्यानंतर कळविण्यांत येईल.

मा.श्री. सुनिल मगरे,नगरसेवक
(प्राप्त दि. १३-०९-२००२)

प्रश्न क्र. ८५ :

| अ. क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १. | महानगरपालिका प्रशासनातर्फे आरक्षित पदांवर किती कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यांत आली आहे? किती कर्मचाऱ्यांची प्रकरणे जात पडताळणी समितीकडे पाठविली | एकुण १०२ अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यांत आली असुन संवर्गनिहाय यादी. जोडलेली आहे. अनुसुचित जमातीतील ४६ अधिकारी/कर्मचाऱ्यांची वेगवेगळया तरखेस सन १९९४ नंतर |

| | | |
|---|---|---|
| | आहेत व केंव्हा? | पडताळणी समितीकउे कागदपत्रे पाठविण्यात आलेली आहे. तसेच वि.जा.भ.म. मध्ये ५३ अधिकारी/कर्मचाऱ्यांची जात पडताळणी समितीकडे कागदापत्रे माहे डिसेंबर २००१ मध्ये पाठविण्यात आली आहे. |
| २. | त्यापैकी किती जणांनी जात पडताळणी समिती व्दारे जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी केली आहे. | एकुण ३३ वैध सोबत यादी जोडली आहे. |
| ३. | किती जणांचे प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहे. | एकुण ७० प्रकरणे सोबत यादी जोडली आहे. |
| ४. | प्रशासनाने या संबंधी काय पाठपुरावा केले आहेत? | प्रकरणांत निर्णय घेण्यासाठी समिती कार्यालयास स्मरण पत्राव्दारे विनंती केली आहे. तसेच ज्या कर्मचाऱ्यांनी प्रमाणपत्र पडताळणी साठी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर केलेली नाही. अशा कर्मचाऱ्यांना स्मरणपत्र व अंतिम नोटीस देवुन मासिक वेतन रोखण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यांत आली आहे. |
| ५. | किती जणांचे प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरवले आहेत. प्रशासनाने त्यांचावर काय कार्यवाही केली आहे? | एकुण ०६ जणांची प्रमाणपत्रे अवैध ठरविण्यात आली असुन पैकी प्रशासनाने श्री. मिर्झा मुमताज अली बेग व लि. यांना मनपा सेवेतुन कमी केले आहे. उर्वरित ०४ जणांचे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. तसेच एका प्रकरणात प्रशासनामार्फत निर्णय होणे बाकी आहे. |

प्रश्न क्र. ८६ :

| प्रश्न | उत्तरे |
|---|---|
| महानगरपालिकेव्दारे शहरामध्ये किती शाळा चालविल्या जातात/ | ८२ शाळा आहे. |
| शाळांमध्ये किती विद्यार्थी शिक्षण घेतात? | एकुण विद्यार्थ्यांची संख्या २६५०६ शिक्षकांची संख्या ६४०. |
| एकुण शिक्षकांची संख्या किती? | प्रशासनाचा खर्च रु. ९.५० लक्ष. |
| प्रशासनाचा यावर किती खर्च होतो? किती विद्यार्थी मागे एका शिक्षकाची नियुक्ती करण्यांत येते? | शासन नियमाप्रमाणे शिक्षकांची नियुक्ती करण्यांत येते. १ ते ४ वर्गासाठी १ ते ५० विद्यार्थ्यांची एक तुकडी व त्या प्रमाणे तुकडी प्रमाणे १ शिक्षक. ५ ते ७ वर्गासाठी ४० विद्यार्थ्यांसाठी एक तुकडी सरासरी ३० |

| | |
|---|---|
| | आवश्यक तुकडी मागे १.३ प्रमाणे शिक्षक मान्य. |
| किती विद्यार्थी प्रती वर्षी ७ वी वर्गाची उत्तीर्ण होतात? | १००% |
| प्रशानाव्दारे प्रती वर्षी विद्यार्थी संख्यांची तपासणी केली जाते का? | प्रशासनाचे आदेशाप्रमाणे शिक्षण विस्तावर अधिकारी जि.प. यांच्या व्दारे तपासणी पट पडताळणी करण्यांत येते. |
| असल्यास पटावरी व प्रत्यक्ष संख्या यात तफावत आढळुन आली आहे काय? | तफावत आढळुन आल्याचे दिसुन आले नाही. |
| असल्यास त्यानुसार किती शिक्षक आवश्यक आहेत? | ६७५ शिक्षक |
| त्या अनुषंगाने अतिरिक्त शिक्षकांची संख्या किती? | अतिरिक्त शिक्षक नाही. |

प्रश्न क्र. ८७ : १) दिनांक १०-०५-९३ रोजी म.न.पा. स्थापनेवर नियुक्त लेखापरिक्षकास दोन वर्ष अगोदर म्हणजे १९९१ पासुन लेखापरिक्षक पदाचा मानवि दिनांक वहाल करण्यांत आला, मानवि दिनांक शासनाचे कोणते नियम व आदेश--- न्यायालाचे कोणते निर्णय किंवा स्थायी समिती व सर्व साधारण सभेचे कोणते ठरावनुसार बहाल करण्यात आला, शासनाचे आदेश व नियम--- न्यायालयाचे निर्णय स्थायी समिती व सर्वसाधारण सभेचे ठराव सह तपशिलवार उत्तर द्यावे.

२) ज्या पध्दतीने म.न.पा. प्रशासनाने लेखापरिक्षक यांना मानवि दिनांक बहाल केला, त्या पध्दतीने म.न.पा. तील किती अधिकारी ----- कर्मचारी यांना मानवि दिनांक बहाल करण्यात आला याची तपशीलवार माहिती.

३) मानवि दिनांक बहाल करणे बाबत राज्य शासनाचे व महापालिकेचे नियम काय आहे, नियमाची प्रत सह तपशीलवार उत्तर यावे.

उत्तर : १) मा. उच्च न्यायालय ,खंडपीठ औरंगाबाद मधील रिट याचिका क्र. १६७८/९१ विनाशर्त काढुन घेण्यात मा. उच्च न्यालयाचे परवानगी दिल्याने व शासन निर्णय दि. १४ सप्टेंबर ८२ च्या मार्गदर्शनानुसार लेखा परिक्षक पदाच्या नियुक्तीच्या आदेशातील न्यायालयाच्या अंतिम निर्णयांच्या अधिन नियुक्ती राहिल. ही अट वगळुन त्यांना निवड झालेल्या दिनांकापासुन मानवि दिनांक खालील अटिवर देण्यांत आलेला आहे. १) १६४० ते २९०० या संवर्गात दिनांक २९-०५-९१ रोजी सेवेत असलेल्या इतर कर्मचाऱ्याच्या सेवा जेष्ठतेवर परिणाम होणार नाही.

२) मानवि दिनांक दिल्यामुळे आर्थिक थकबाकी लाभ मिळणार नाही.

२) सदर प्रकरणांत खालील कर्मचाऱ्यांना मानवि दिनांक देण्यांत आला. मानवि दिनांक दिल्यामुळे कोणतेही आर्थिक फायदे देय असुन फक्त सेवा जेष्ठता गृहीत धरण्यांत आली.

१) श्री. एम.डी. सोनवणे
२) श्री. एस.डी पानझडे

३) श्री. आय.बी खाजा
४) श्री. एम.बी.काझी
५) श्री. एच.ए.कोल्हे
६) श्री. डी.पी. कुलकर्णी
७) श्री. एस.डी. काकडे
८) श्री. ए.बी. देशमुख
९) श्री. सी.एम. अभंग
१०) श्री. अय्युब खॉन
११) श्री. आर. एस. तायडे
१२) श्री. व्ही.एम. निकम
१३) श्री. शिरिष रामटेके
१४) श्री. सिद्यीकी अफसर
१५) श्री. पी.जी.पवार
१६) श्री. व्ही.जी वझे

B) मानवि दिनांक बहाल करणे बाबत राज्य शासनाचे जे नियम आहे तेच नियम महानगरपालिका प्रशासनास सुध्दा लागु आहे.

प्रश्न क्र. ८८ : १) महापालिका अधिकारी-कर्मचारी सेवाभरती अंतिम नियम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ची कलम ४५५(२) अंतर्गत राजपत्रात प्रसिध्द होणे आवश्यक आहे काय? तसेच मनपा प्रशासनिक कामकाज मध्ये या कलमाचे किती महत्व आहे?

२) महानगरपालिकेत अधिकारी-कर्मचारी सेवाशर्ती नियम उपलब्ध आहे काय? असेल तर केंव्हा तयार करण्यास आले आणि राजपत्रात ते केंव्हा प्रसिध्द करण्यांत आले तसेच या नियमात म.न.पा. तर्फे किती वेळेस सुधारणा करण्यांत आली होती याची तपशीलवार माहिती.

३) महानगरपालिकेत अधिकारी-कर्मचारी वेतनश्रेणी नियम उपलब्ध आहे काय/ असेल तर ते केंव्हा तयार करण्यांत आले, नसेल तर ते तयार करणे आवश्यक होते काय?

४) म.न.पा. प्रशासनाने कर्मचाऱ्यांना सात वर्षाची वेतनश्रेणी देण्यांचे बंद केले या संदर्भात लेखी आदेश किंवा परिपत्रक जारी करुन कर्मचाऱ्यांना तशी सुचना देण्यात आली काय? सुचना देण्यात आली असेल तर प्रशासनाचे ते आदेश किंवा परिपत्रक सभागृहात सादर करावे.

उत्तर : १) कलम ४५५ (२) अंतर्गत राजपत्रात प्रसिध्द होणे आवश्यक असुन त्यांचे मनपा प्रशासनिक कामकाजामध्ये वेळोवेळी वापर केला जातो.

२) सेवा भरती नियम उपलब्ध असुन सदर नियमात शासनाचे त्याचे निर्णय दि. १६ मे १९९४ रोजी मंजुरी दिलेली आहे. दि. ९ जुन १९९४ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात सदर नियम प्रसिध्द करण्यात आलेले आहे. सदर नियमात खालील प्रमाणे दुरुस्ती करण्याचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेले आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | दुरुस्ती | सर्वसाधारण सभेचा ठराव व दिनांक |
|---|---|---|---|
| १. | उप आयुक्त | नेमणुकीच्या | ठराव क्र. १४/२ दि. १७-१०- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पात्रतेमध्ये दुरुस्ती | ९८ |
| २. | कार्यकारी अभियंता | अनुभवाच्या अर्हतेमध्ये दुरुस्ती | ठराव क्र. ३ दि. १९-०६-९५ |
| ३. | विधी सल्लागार | अर्हतेमध्ये वयाची व अनुभवाची अट वाढविणे | ठराव क्र. २३२/३ दि. १८-२-९९ |
| ४. | सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी | जेष्ठता गुणोत्तर ऐवजी ज्येष्ठता व गुणवत्ता अशी दुरुस्ती | ठराव क्र. ५२१/१ दि. २०-१०-२००१. |
| ५. | मुख्य लेखा परिक्षक | मुख्य लेखा परिक्षक या पदास सात वर्षा ऐवजी कनिष्ठ पदाचा पाच वर्षाचा अनुभव असावा. | ठराव क्र. ५५१/५ दि. २०-१२-२००१. |

३) महानगरपालिका कर्मचारी/अधिकारी यांना शासनाकडील असलेल्या समकक्ष पदाच्या वेतनश्रेण्या लागु केलेल्या आहे. त्यामुळे वेतनश्रेणीचे स्वतंत्र नियम तयार केलेले आहे.

४) शासन निर्णय क्रमांक एएमसी-१४९९/२/प्र.क्र.-१/ नवि-२४ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक २४-११-९९ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागु करण्यांस काही मान्यता देण्यांत आलेली आहे. त्यास मनपा सेवा भरती नियमानुसार कर्मचाऱ्यांना ०७ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी लागु करण्यांत येते. मात्र राज्य शासनाने बारा वर्षानंतर कालबध्द पदोन्नती अथवा पुढील वेतनश्रेणी लागु केली आहे जास्त औरंगाबाद महानगरपालिकेने राज्य शासनाच्या तरतुदीप्रमाणे, महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी सेवा भरती नियमात तशी तरतुद करणे आवश्यक राहिल म्हणजेच महानगरपालिका सेवा भरती नियमात ०७ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देण्याची तरतुद रद्द करुन १२ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देण्याची तरतुद करणे आवश्यक राहिल असे नमुद करण्यात आलेले आहे.

या बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १८-१०-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त शुक्रवार दि. १८-१०-२००२ रोजी मा. महापौर श्री. विकास रतलाल जैन यांचे अध्यक्षते खाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी ११.५० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला संबंधीत अधिकारी यांचेसह खाली प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
२) स.स.श्री. रतनकुमार नारायणराव पंडागळे
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
५) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
७) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
८) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी अहेमद
९) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी
११) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुजी
१२) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१३) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१४) स.स.श्रीमती धायातिलक लिलावती बाळासाहेब
१५) स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१६) स.स.सौ. शिंदे रुख्मिणी राधाकिसन
१७) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१८) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
१९) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२०) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२१) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२२) स.स.सौ. विजया किशोर रहाटकर
२३) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२४) स.स.ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२५) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२६) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२७) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२८) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२९) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार
३०) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
३१) स.स.श्री. डॉ. भागवत किसनराव कराड
३२) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान

३३) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३४) स.स.श्री. नासेरखॉन सरदार खान
३५) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक
३६) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३७) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३८) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३९) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खान
४०) स.स.श्री. तायडे पांडुरंग यंशवंतराव
४१) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४२) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४३) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४४) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४५) स.स.श्री. पारे सोपान भाऊराव
४६) स.स.श्री. राजपुत विमलबाई भिकनसिंग
४७) स.स.श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद
४८) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४९) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
५०) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५१) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
५२) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
५३) स.स.श्री. नासेरखान अ. रहेमान खान कुरैशी
५४) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
५५) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५६) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५७) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५८) स.स.श्री. स.सलीम स.युसुफ
५९) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
६०) स.स.श्री. तकी हसनखान कासिम हसनखान
६१) स.स.सौ. सिद्यीकी नईम सुलाताना सिद्यीकी म. फसियोद्यीन
६२) स.स.श्री. शेख ईसाक शेख जैनोद्यीन
६३) स.स.श्रीमती सुलाताना बेगम चॉदखाँ
६४) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६५) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
६६) स.स.श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान
६७) स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुराव
६८) स.स.श्री. जगदिश कन्हैय्यालाल सिध्द
६९) स.स.सौ. बबिता सुभाष कागडा
७०) स.स.श्री. स.अली सलामी स. मीरा सलामी
७१) स.स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज
७२) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली

# स्विकृती सदस्य

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
३) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४) स.स.सौ. सलमा बानो मिर महमंद अली

संवाद

श्री. अफसर खान : शहरात एक मुख्याध्यापक फादर थॉमस शिंगारे यांचा निर्घुन खुन करण्यांत आला त्या बध्दल निषेध करुन श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री. डॉ. भागवत कराड : यास माझे अनुमोदन आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : श्री. ना. स. इमानदार व मा. मुख्यमंत्री यांचे वडील स्व. दगडुजी देशमुख यांचे सुध्दा दुःखद निधन झालेले आहे. त्यांनी सुध्दा श्रध्दांजली अर्पण करावी.

मा. महापौर : ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे राहावे.
(याचवेळी स्व. मुख्यध्यापक फादर थॉमस शिंगारे, श्री. ना.स.इनामदार श्री. सबनीस तसेच मा. मुख्यमंत्र्याचे वडील स्व. दगडुजी देशमुख्य यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यांत येते.)

मा. महापौर : विषय क्र. १ वर चर्चा करावी.
याचवेळी सभागृहात मा. महापौर यांचे डायस समोर सर्वच महिला सदस्य मोठमोठयाने बोलतात व महिला बालकल्याण समितीची कोणतीच कामे होत नाही असे मत मांडतात व व्यासपिठासमोर धरणे देतात.

सौ. संगिता मैंद : महिला व बालकल्याण अधिकारी यांची नियुक्ती तात्काळ करावी जेणे करुन या समितीचे कामे तात्काळ होतील.

प्रकल्प संचालक : शिवण कला यंत्र तसेच काही सायकलचे वाटप केलेले आहे. उर्वरित यंत्र व सायकलची जाहिरात देऊन मागणी केलेली होती. ती सुध्दा संचिका मंजुर झाली. लवकरच कार्यवाही होईल माझ्याकडे कोणतीही संचिका प्रलंबित नाही.

श्रीमती डॉ. आशा बिनवडे : एक वर्षापुर्वी महिला व बाल कल्याण समितीची स्थापना झाली अर्थसंकल्पात ४० लक्ष रुपयाची तरतुद ठेवण्यात आलली होती. त्यापैकी फक्त ९५ ते ९८ हजार रुपये खर्च झालेले आहे व सुधारित अर्थ संकल्पात ४० लाखाचे एकच लक्ष आले. माहिती घेतली असता त्या समिती मार्फत होणारी कामे कमी झाली त्यामुळे फक्त १ लक्ष ठेवण्यांत आले आहे. बजेट मध्ये तरतुद केल्यानुसार कामे होत नाही समिती बरखास्त करावी. महिला व बाल कल्याण अधिकारी हव्या आहे. दिल्या जात नाही. या अर्थसंकल्पातुन एक ही कामावर खर्च झालेला नाही.

मा. महापौर : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे आपला प्रश्न लवकरच मार्गी काढण्यात येईल. आतापर्यंत जे जे प्रस्ताव मंजुर झाले त्या बाबतची आजची परिस्थिती काय आहे. खुलासा करावा.

सौ. विजया राहाटकर : मागच्या वेळेस जे कोर्सेस सुरु केले होते ते सुध्दा सुरु झाले नाही.
(याचवेळी सर्व महिला सदस्या आपआपल्या जागेवर बसतात.)

प्रकल्प संचालक : चालु वर्षी एक सभा झाली असुन शिवणयंत्राचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे.

श्री. जयवंत ओक : यापुर्वी सभापती सौ. दाणे होत्या त्यानंतर सध्या सौ. मैंद यांना सभापती पद दिले. या समितीने घेतलेल्या निर्णयावर काहीही कार्यवाही होत नाही. असे स. सदस्यांचे म्हणने आहे, समितीची कामे होत नसेल तर समिती स्थापण्याला अर्थ काय?

श्रीमती डॉ. आशा बिनवडे : महिला बाल कल्याण अधिकारी असे पद असावे तसा ठराव झालेला होता त्याबध्दल उद्याप का कार्यवाही केली नाही.

मा. महापौर : येत्या सोमवार पर्यंत महिला व बाल कल्याण अधिकारी या पदावर प्र. अधिकारी म्हणुन प्रशासनाने नियुक्ती करावी व त्यासाठी लागणारा इतर कर्मचारी वर्ग सुध्दा देण्यांत यावा.

श्री. अफसर खान : मा. आयुक्त आजच्या सभेला उपस्थित नाही. सभा तहकुब करावी मागील सभेत आयुक्त उपस्थित नव्हते म्हणुन सभा तहकुब करण्यांत आलेली होती.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांचेवर लोकशाही आघाडीच्या शासनाने कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला अत्यंत चुकीचा निर्णय सरकारने घेतला त्याबध्दल या सरकारचा निषेध करण्यांत यावा.

श्री. सुदाम सोनवणे : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे.

श्री. भरत लकडे : माझ्या वार्डात एका व्यक्तीने महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण केले. त्या व्यक्तीने स्वतःच्या नावाने पी.आर. कार्ड तयार केले. व मोठया प्रमाणात बांधकाम सुध्दा केले. दिनांक २६-०९-२००२ रोजी या संदर्भात मी प्रशासनाला पत्रही दिलेले आहे. न्यायालयाचा निकाल महानगरपालिकेच्या बाजुने लागला कार्यवाही नाही. हात मिळवणी झाली. परंतु अद्याप कार्यवाही झाली नाही जो व्यक्ती महापालिकेच्या जागेचे स्वतःच्या नावाने कागदपत्र तयार करतो, अशा व्यक्तीवर पोलिस गुन्हा दाखल झाला पाहिजे. ज्यांनी त्यांना मदत केली त्यांचेवर कार्यवाही करावी. आता प्रशासकीय अधिकारी टाळाटाळ करतात. त्यांना ताबडतोब काढावे.

श्री. नंदकुमार घोडेले : स. सदस्य श्री. लकडे यांनी बऱ्याच वेळेस या प्रकरणाच्या बाबतीत कार्यवाही होण्यासाठी प्रशासनाकडे मागणी केलेली आहे. प्रशासकीय आधिकारी अशा कामाकडे डोळेझाक करतात. व उडवा उडवीची उत्तरे देतात. पद हे टेकनीकल आहे की नॉन टेक्नीकल आहे याचा खुलासा द्यावा. सध्या किती दिवसापासुन चार्ज दिला किती दिवस ठेवु शकता कायम स्वरुपी या पदावर अधिकारी नियुक्त करावे. तक्रारी दिल्या नंतर त्या व्यक्तीला आपलेच अधिकारी/कर्मचारी तक्रार आहे म्हणुन अगोदरच माहिती देतात. या बाबतीत कोणतीत कोणतीही गोपनियता पाळली जात नाही. प्रशासकीय अधिकारी पदावर शासनाचे अधिकारी असावे. यासाठी पत्र दिले होते. त्यानुसार शासन डायरेक्शन नुसार आतापर्यंत प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. या पदावर नॉन टेक्नीकल संवर्गातील अधिकाऱ्यांमधुन हे पद असावे अशी मान्यता दिली त्यानंतर प्रशासनाने कया कार्यवाही केली. सामान्य माणसाने तक्रार केल्यास तात्काळ कार्यवाही होते. नगरसेवकांनी केलेल्या तक्रारी कचरा पेटीत टाकल्या जाते. विभागीय

अधिकारी दर्जाचा अधिकारी द्यावा. अतिरिक्त कार्यभार किती दिवस ठेवणार, अतिरिक्त कार्यभार ठेवण्यात प्रशासनास काय रस आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वार्डात मोठया प्रमाणात अतिक्रमण होत आहे. प्रशासकीय अधिकारी यांना वारंवार सुचना देऊनही कार्यवाही होत नाही. नगरसेवकांची बदनामी होण्याच्या दृष्टीने अधिकारी संबंधीत व्यक्तीशी बोलतात. कार्यवाही काहिच करित नाही या बाबतीत चौकशी करण्याचे आदेश द्यावेत अशा अधिकाऱ्याची तातडीने बदली करावी.

श्री. सुदाम सोनवणे : या पदावर नॉन टेक्नीकल अधिकारी असावे. असा ठराव मंजुर केला. त्यानंतर या पदावर टेक्नीकल संवर्गातील अधिकारी दिले. आताच स. सदस्य श्री. लकडे यांनी मुदा मांडला की, एका व्यक्तीने महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण करुन बांधकाम केले. स्वतःच्या नावाने पी.आर.कार्ड व या प्रकरणाच्या बाबतीत न्यायालयाचे स्थगिती आदेश आपले वारंवार पत्र देऊनही कार्यवाही झाली नाही. दुर्लक्ष केले. याचप्रमाणे सुरेवाडी मध्ये सुध्दा एका व्यक्तीने एका जागेवर न्यायलयाचे स्थागिती आदेश होते. विधी सल्लागार यांचे जैसे थे स्थिती बाबत प्रशासकीय अधिकारी यांचे कडे पत्र गेलेले असतांना प्रशासकीय अधिकारी यांनी कार्यवाही केली नाही. प्रशासकीय अधिकारी यांनी ५-६ लोकांकडुन ६० ते ७० हजार रुपये घेतले. २ दिवसांत स्लॅब झाला. काम करण्यास प्रोत्साहन दिले. न्यायालयाचे आदेश असतांना जर कार्यवाही होत नसेल तर अत्यंत दुर्देवी बाब असुन अशा अधिकाऱ्यांना त्या पदावर न ठेवता त्यांची चौकशी करुन त्यांचेवर कडक कार्यवाही होणे गरजेचे आहे. संबंधीत अधिकारी हे पैसे घेऊन सर्रासपणे बांधकाम होऊ देतात. अशी प्रचिती आलेली आहे. असे होत असेल तर महापालिकेच्या मालकीची एक जागा शिल्लक राहणार नाही.

श्री. अफसर खान : एका कनिष्ठ अभियंतास उप अभियंताचा चार्ज दिला श्री. खरवडकर यांचे कडुन चार्ज काढुन घ्यावा. दुसऱ्या सिनिअरला द्यावे किंवा श्री. रामटेके यांना चार्ज देण्यांत यावा.

श्री. अंबादास दानवे : आज शहरात महानगरपालिकेच्या जागेवर अनाधिकृत वस्त्यामध्ये तसेच मोठमोठया रस्त्यावर अनधिकृतपणे सर्रास बांधकाम चालु आहे. यासाठी त्या त्या भागासाठी/वार्डासाठी नेमुन दिलेल्या इमारत निरिक्षक यांनी दररोज वार्डात फिरतीवर राहणे गरजेचे आहे. व तसे बांधकाम चालु असल्यास तात्काळ कार्यवाही केली पाहिजे. परंतु या प्रशासकीय विभागाचे ईमारत निरिक्षक जाणीव पुर्वक अनाधिकृत बांधकाम करण्यास प्रोस्ताहन देतात. आताच स. सदस्य श्री. सोनवणे यांनी सांगितल्यानुसार न्यायालयाचे स्थगिती आदेश असतांना बांधकाम झाले. खऱ्या अर्थाने न्यायालयाचा यात अवमान आहे. या संबंधीत अधिकाऱ्यावर नियमाने कार्यवाही होऊ शकते. माझ्याकडे १९६४ चे ले-आऊट मंजुर आहे. रस्ते मोकळे करावे म्हणुन मागणी आहे. या संदर्भात लेखी पत्र सुध्दा दिले कार्यवाही नाही. एक दुसऱ्या विभागाचे नाव दाखविले जाते. बन्सीलाल नगर मध्ये स. माजी महापौर श्री. बारवाल बांधकाम करुन एक तक्रार केली त्याची सुध्दा कार्यवाही झालेली नाही. प्रशासकीय विभागच अनधिकृत बांधकाम करुन देण्यास प्रोत्साहन करित आहे. रस्ते रुंद करावे व अनधिकृत बांधकाम होऊ देऊ नये असे यापुर्वीच न्यायालयाचे आदेश आहे याची सुध्दा दखल घेतली

जात नाही. यात लक्ष देण्याची आवश्यकता आहे व हा विभाग सक्षम करण्याची आवश्यकता आहे.

श्री. डॉ. भागवत कराड : प्रशासकीय विभाग अत्यंत कुचकामी झालेला आहे. शहरात अनधिकृत बांधकामे होत आहे. या संदभ्‍रत कार्यवाही होणाच्या दृष्टीने आपल्या चेंबर मध्ये १ महिण्यापुर्वी बैठक सुध्दा घेतलेली होती. श्रीमती मानकापे ताई यांचे वार्डात नाल्यावर एक इमारतीचे अनधिकृत बांधकाम चालु आहे. तशी सुचना मांडलेली होती व आपण प्रत्यक्ष पाहणी केली होती व प्रशासकीय अधिकारी यांना आदेश दिले होते. अधिकारी ईमारत निरिक्षकास घेऊन गेले कार्यवाही काहीच नाही. उलट अशी माहिती की, झोन-४ मध्ये ईमारत निरीक्षक यांनी एक खाजगी व्यक्ती ठेवलेला आहे. तो व्यक्ती जेथे बांधकाम चालु असेल तेथुन त्या मालकाकडुन २-२ हजार रुपये घेऊन येतो. व जाणुन बुजुन बांधकाम करु दिले जाते. प्रशासकीय अधिकारी डोळेझाक करतात. प्रशासकीय अधिकारी यांना मी मा. आयुक्त यांचेकडे उपआयुक्त यांचे समोर बोलवुन कामे सांगितली होती. सोईचे काम करतात. असे अधिकारी असेल तर अनधिकृत बांधकाम वाढत जातील. अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याची गरज आहे. माझ्या वार्डातील ४ कामे होती त्या बध्दल सुचना देऊन सुध्दा कार्यवाही झाली नाही. रस्त्यावरचे सुध्दा अतिक्रमण काढले नाही. महापालिकेचे हित न बघता स्वत:चे हित हे कर्मचारी/अधिकारी बघतात. म्हणुन प्रशासकीय आधिकारी दुसरे नियुक्त करावे रेग्यलर पद भरण्यात यावे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : बिल्डरने महापालिकेची परवानगी घेऊन काही बांधकामे केली पार्किगसाठी जागा सोडलेली असे रेकॉर्डला दाखविले परंतु प्रत्यक्षात बघीतले तर एकाही बिल्डरने पार्किगसाठी जागा सोडलेली नाही. तेथे बांधकाम केलेले आहे. असे झालेले बांधकाम पाडणार काय? जेव्हा बांधकाम केले तेंव्हा आपले कर्मचारी काय करित होते यामागचे गौड बांगल काय.

श्री. स.अली सलामी : टिळक रोडवर चटई क्षेत्र निर्देशांक घेऊन काही लोकांनी इमारती बांधल्या ज्याप्रमाणे त्यांनी महापालिकेची परवानगी घेतली त्याप्रमाणे बांधकाम केले का? बांधकाम झाल्यानंतर बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणापत्र त्यांनी घेतलेले आहे का? नियमाने असे आहे की, बांधकाम पुर्ण झाल्यानंतर कप्पलेशन प्रमाणपत्रासाठी संबंधीतांनी अर्ज करावयास पाहिजे त्यानुसार या विभागाचे कर्मचारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन ते काम बरोबर झाले असेल तर प्रमाणपत्र दिले जाते. बांधकाम परवानगी प्रमाणे बधांकाम झाले आहे का. नगर रचना विभाग व प्रशासकीय विभाग यांनी घेऊनच पुढील कार्यवाही व्हावयास पाहिजे. परंतु तसे होत नाही. आताच एका सदस्यांनी सुचना केली पार्किगसाठी रेकॉर्डला जागा दाखविली परंतु प्रत्यक्षात तेथे बांधकाम झालेले आहे. ही वस्तुस्थिती आहेतच. दुकाने करुन दुसऱ्यांना चालविण्यास दिली भाडे वसुल करतात अशा बिल्डरवर केंव्हा व कशा पध्दतीची कार्यवाही करणार आहे. यापुर्वी वृत्तपत्रात बातमी आलेली होती. जुन मध्ये २५ बिल्डरांना नोटीस नोटीस दिली. त्याचे काम झाले तसेच बिल्डरांना २५% विकास झालेल्या महानगरपालिकेच्या हिस्स्याच्या जागा हस्तांतरीत करण्या संदर्भात नोटीस दिली होती. त्यांची काय कार्यवाही झालेली आहे. सभागृहाला खुलासा द्यावा. असे चुकीच्या पध्दतीने पर्कीगच्या जागेवर

दुकाने/गोडाऊन तयार करुन भोगवटा प्रमापत्र न घेता वापर करण्याऱ्या बिल्डरवर प्रशासन काय काय कार्यवाही करणार आहे. माझ्या मते प्रशासकीय विभाग फक्त गोरगरिबाच्या टपऱ्या हटविण्याचे काम करीत आहे. वृत्तपत्रात सुध्दा तशा बातम्या झळकतात. परंतु जे मोठमोठे बिल्डर आहे ते जे बांधकाम करतात ते हटविले जात नाही. ज्या बिल्डरांना नोटीस दिली गेली त्यांचेवर आतापर्यंत काय कार्यवाही केली. केली नसेल तर काय कार्यवाही करणार आहे तसेच ज्यांनी परवानगी व्यतिरिक्त जास्तीचे बांधकाम केले अशावर काय काय कार्यवाही करणार आहे व झालेले अनाधिकृत बांधकाम तात्काळ पाडण्याची कार्यवाही व्हावी. अशी माझी सभागृहातर्फे मागणी आहे. टिळक रस्त्यावर जे जास्तीचे बांधकाम त्याचे तातडीने सर्वेक्षण करावे. बांधकाम परवानगी व्यतिरिक्त आहे ते काढावे. शहराचा मध्य भाग आहे. व मुख्अय रस्ता आहे.

सौ. निखत परविन : माझ्या वार्डात कुठे जागा नाही नाल्यावर एक अनाधिकृतपणे इमारत होत आहे. वारंवार सुचना केल्यास कार्यवाही होत नाही. परवानगी किती बांधकामाची दिली माहिती दिली देऊ शकतो या बध्दलचे कागद पत्राची प्रत मागणी केली परंतु मिळाली नाही. संबंधीत अधिकारी श्री. कंकाळ यांना सुध्दा सुचना दिल्या ईमारत निरिक्षक आल्यानंतर पाठवतो असे उत्तर देतात इमारत निरिक्षक आले नाही. काम बंद होते. नंतर २ मजले झाले.

श्रीमती पार्वती मानकापे : चर्चा करुन अर्थ नाही अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्याचा निर्णय घ्यावा.

श्री. शे.ईसाक जैनोद्दीन शे : शहरातील ९ मीटर ते ४५ मीटर रस्ते रुंद करावे असे न्यायालयाचे निर्देश होते त्यानुसार आतापर्यंत किती रस्ते रुंद केले. ठराविकच ठिकाणचे रस्ते रुंद झाले. गरिबांच्या टपऱ्या काढल्या जातात. आतापर्यंत मोजक्याच ठिकाणी कार्यवाही केली . मा. उच्च न्यायालयाचे मोजक्याच ठिकाणी किंवा संपुर्ण शहरासाठी आदेश झालेले आहे. मोठमोठे लोकांकडे जातात कार्यवाही होत नाही.

श्री. प्रकाश निकाळजे : सिडको औद्योगिक भागात निवासी गाळे बांधण्याचा एक प्रस्ताव शासनाकडे होता महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे आयुक्त यांनी मा. महापालिका आयुक्तांना पत्र देवुन हा भाग प्रदुषीत आहे तेथे निवासी गाळयांना परवानगी देऊ नये असे कळविले होते. सि सर्व्हे नंबर सुध्दा दिला होता. परंतु ते पत्र बाजुला ठेवुन नगर रचना विभागाने तेथे परवानगी दिली तो भागप्रदुषण अधिगृहीत भाग आहे. त्याची चौकशी करुन कार्यवाही करण्याची माझी मागणी आहे. परवानगी दिल्यामुळे तेथील नागरिकांच्या जिवितासा धोका होऊ शकतो. परवानगी रद्द करावी.

श्री. जयवंत ओक : हे शहर फार आगळे वेगळे शहर आहे. ११४ वसाहती अनधिकृत आहेत ५२ झोपडपट्टया आहेत आवकाफच्या तसेच सालारजंगच्या काही जागा आहेत एका विशिष्ट भागात ९ मीटर ते ४५ मीटर रस्ता रुंद होणे शक्य नाही. जुन्या शहरात तर होणेच शक्य नाही. सिडको हडकोतील अतिक्रमण का काढले ती जागा सरकारी होती सरकारने प्लॉट पाडुन ते विकलेले होते. जनतेने केलेले अतिक्रमण त्यामुळे पाडता आले तशी परिस्थिती शहरात नाही. शहरातील सिडको प्रमाणे रस्ते रुंद करणार असाल तर भुकंपा सारखी परिस्थिती होईल. या ठिकाणी सभागृहात नगर रचना

विभागाचे अधिकारी आहे. न्यायालयाने डायरेक्शन दिले परंतु जे मुख्य रस्ते जसे गुलमंडी रस्ता, खडकेश्वर रस्ता, आहे अशा रस्त्यावरील जे जे अतिक्रमण असतील . अशी मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणे अगोदर काढण्यात यावी. या सभागृहात प्रशासनाने दिशाभुल करु नये या अगोदर ज्या ज्या सदस्यांनी अतिक्रमणाच्या बाबतीत पत्र दिले होते, त्यानुसार का कार्यवाही केली नाही. तेवढी व्यवस्था महापालिकेकडे आहे का? खाजगी जमीनी वरील अतिक्रमण कसे काढणार नोटीस देणार, पत्र देणार नंतर कार्यवाही होणार प्रशासन व नगर सेवक या दोघांनी मिळुन अतिक्रमण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे परंतु येथे तसे होत नाही दोन सदस्य विरोधात तर दोन प्रशासनाची बाजु घेतात. स्लम भागात लोक दुसऱ्या मजल्यासाठी परवानगी घेणार नाही का? परवानगीसाठी लोक चकरा मारतात त्यांना परवानगी दिली जात नाही. त्यामुळे अधिकारी यांना तो व्यक्ती मॅनेज करतो ही परिस्थिती का निर्माण होते यास दोषी कोण? वेगळी दिशा देणार नाही, परंतु हे शहर फार आगळे वेगळे शहर आहे. इतर शहराप्रमाणे वसलेले नाही. या शहरात ८०% लोक अनधिकृत जागेवर राहतात. म्हणुन शहर स्वच्छ करायचे असेल तर प्रशासनाने ३० मीटर ४० मीटर रस्ते अगोदर रुंद करावे. रस्त्यावरील अतिक्रमण काढावी. वेगळया व्देष भावनेने गरिबांची घरे काढु नये त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न करु नये. आणि ज्या ज्या अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार सोपविलेला असे किती अधिकारी आहेत. त्यांचे कडुन चार्ज काढावा त्यानंतर प्रशासकीय अधिकारी या पदाचा चार्ज काढुन या पदावर नविन अधिकारी नेमावे सर्वांचेच अतिरिक्त चार्ज काढावे. महापालिकेच सध्या उत्पन्न चांगले आहे. तर अतिरिक्त कार्यभार कशासाठी ठेवता शहराची परिस्थिती पहावी नुकसान होऊ नये याची दक्षता घेतली जावी व त्यातुन नगर सेवकांची बदनामी होईल असे अधिकाऱ्यांकडुन कृत्य होऊ नये. काही प्रकरणांत अधिकारी जनतेला जाऊन सांगतात की नगरसेवकांनीच पत्र दिलेले आहे त्यामुळे नगर सेवक व नागरिक यांचेत वाद निर्माण होतो.

मा. महापौर : सभा ३० मिनिटासाठी तहकुब करण्यांत येते. (दुपारी १.३० वाजता तहकुब झालेली सभा ३.१७ वाजता सुरु झाली.)

मा. महापौर : जे जे मुद्दे स सदस्यांनी आताच मांडले त्यावर प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री. जगदीश सिध्द : न्यायालयाने जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिलेले असतांना त्यानंतर शहरात किती प्रकरणाची इमारतीचे बांधकामे झालेली आहे. व किती प्रकरणामध्ये कन्टेम दाखल केलेले आहे.

प्रशासकीय अधिकारी : डॉ. कराड यांनी दोन-तीन तक्रारी केलेल्या होत्या त्यापैकी एक तक्रार कांचनवाडी येथे एका जागेवर होणारे अतिक्रमणाच्या बाबतीत होते. १४ तारखेला सर्व नियोजन करुन प्रशासन गेलेले होते. परंतु स. सदस्यांनी अडथळा आणला त्यामुळे ते काम पुर्ण करु शकलो नाही दुसरा मुद्या स. सदस्य श्री. सिध्द यांचा होता की, जाधववाडी येथे एका जागेवर बांधकाम करण्यास मनाई हुकुम न्यायालयाचा असतांना त्या व्यक्तीने बांधकाम केले त्या जागेवर प्रशासनामार्फत पाहणी झाली. पंचनामा केला. बांधकाम चालु असतांना छायचित्रे काढुन कन्टेन करण्यासाठी विधी सल्लागार यांचे कडे

सादर केलेले आहे. त्यानुसार त्यांचा अंतिम निकाल आल्यानंतरच कार्यवाही करता येईल. स. सदस्य श्री. भरत लकडे यांचे वार्डातील जे ओपन स्पेसवर अतिक्रमण झाले ते काढण्यासाठी संबंधीताने दोन दिवसाची मुदत मागविलेली आहे दोन दिवसात त्यांनी स्वतः काढुन घेतले नाही तर प्रशासन अतिक्रमण काढुन टाकणार आहे.

श्री. भरत लकडे : दिनांक २६-०९-२००० ला मी पत्र दिले त्यानंतरही पत्र दिले दोन दिवसाचा वेळ अद्याप संपलेला नाही का? अधिकाऱ्यांना जाणुन बुजुन कार्यवाही करायची नाही असा अर्थ निघतो.

प्रशासकीय अधिकारी : १६ तारखेला आपण पत्र दिले होते. त्यानुसारच प्रत्यक्ष कार्यवाही करण्यास गेले होतो. परंतु संबंधीताने १ दिवसाची मुदत मागविली स. सदस्यांनी सुध्दा यासाठी विनंती केली. त्यामुळे त्यांनी बांधकाम स्वतःहुन काढले नाही तर कार्यवाही करणार आहोत.

श्री. कशिनाथ कोकाटे : कोणत्या सदस्यांचे प्रेशर होते खुलासा करावा.

मा. महापौर : स. सदस्य यांनी सुचना केल्याप्रमाणे संबंधीत झालेले बांधकाम १ दिवसात सदर व्यक्तीने स्वतःहुन काढले नाही तर प्रशासनाने तात्काळ काढुन घ्यावे.

श्री. मोतीलाल जगताप : सर्व्हे नंबर २५ मध्ये मुकुंदवाडी येथे खुल्या जागेवर अतिक्रमण झाले. मी तीन महिण्यात १० वेळेस पत्र दिले अद्याप कार्यवाही झाली नाही. उपआयुक्त यांना सुध्दा याबाबतीत कल्पना दिलेली आहे.

प्रशासकीय अधिकारी : सर्व्हे नंबर २५ मध्ये मुकुंदवाडी ही जागा शासकीय आहे. त्यावरील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही मा. तहसीलदार करतात. महापालिकेतर्फे त्यांना फक्त सहकार्य केले जाते माहिती दिली जाते.

श्री. काशिनाथ कोकाटे : स. सदस्यांनी १० वेळेस पत्र दिले त्या पत्रानुसार कार्यवाही होणाच्या दृष्टीने किती वेळेस मा. तहसीलदार यांचेकडे पत्र देऊन कार्यवाही केली त्याचा खुलासा करावा आणि त्या जागेवर अतिक्रमण होत असतांना महापालिकेतर्फे कोणते प्रयत्न केलेले आहे.

प्रशासकीय अधिकारी : मा. तहसीलदार यांना पत्र देऊन तशी माहिती दिलेली आहे. अतिक्रमण काढण्याबाबत प्रशासनातर्फे पुढील आठवडयात कार्यवाही करण्यांत येईल. मा. तहसीलदार यांचा सुध्दा सहभाग घ्यावा लागेल.

श्री. काशिनाथ कोकाटे : अधिकारी हे सभागृहाची दिशाभुल करतात. प्रशासकीय विभागाकडे मोठा कर्मचारी वर्ग असतांना एक सदस्य १०-१० वेळेस पत्र देऊन कार्यवाही होत नसेल तर ही काम करण्याची अधिकाऱ्यांची पध्दत चुकीची आहे.

मा. महापौर : शासकीय जागेवर अतिक्रमण होत असेल तरी महापालिका हद्दीत येते. त्यामुळे तहसीलदार यांना पत्र देऊन काहीच कार्यवाही व प्रतिउत्तर मिळाले नसले तरी महापालिका प्रशासनामार्फत ते अतिक्रमण काढण्याची तात्काळ कार्यवाही व्हावी. ३ दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

श्री. से.ईसाक जैनोद्यीन : ९ मीटर ते ४५ मीटरचे रस्ते रुंद करण्याचे मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहे. त्यानुसार ठराविकच रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले मा. न्यायालयाच्या आदेशा नुसार कार्यवाही होत आहे का?

मा. महापौर : जी अतिक्रमण काढण्याची कार्यवाही सुरु झाली ती महापौर यांचे वार्डापासुनच सुरु झालेली होती. सर्वच अतिक्रमण काढण्याचे प्रयत्न होणार आहे.

प्रशासकीय अधिकारी : ९ मीटर ते ४५ मीटरचे असलेले रस्त्याचे सर्वे करण्याचे काम चालु आहे ठिकाणी मार्फीग करुन दिलेल्या आहेत. १ महिण्यात मार्कीचे काम पुर्ण होईल. त्यानंतर अतिक्रमण काढावाची कार्यावाही करण्यात येणार आहे. रहदारीला अडथळा निर्माण करणारीच अतिक्रमण काढण्याची कार्यवाही होत आहे.

अफसर खॉन : शहरातील संपुर्ण भाग प्रशासकीय अधिकारी यांना माहित आहे. कोणता रस्ता किती मीटर रुंदीचा आहे याची सर्वकल्पना असतांना मार्कींग करण्याची का आवश्यकता पडते शहरातील गुलमंडी. सेंट्रल नाका तसेच शहागंज येथील काही अतिक्रमण काढली परंतु इतर भागात अतिक्रमणे जशीच्या तशी आहे.

श्री. स. अली सलामी : शहरात काही रस्त्यावर जाहिरात फलक लावले महापालिकेने परवानगी दिलेली आहे का विना परवानगी असेल तर काढावी. निराला बाजार येथील शेड फुट पाथवर असेल तर ते ही पाहण्यात यावे. व काढुन घ्यावे.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : अतिक्रमणाच्या बाबतीत अधिकाऱ्यांना माहिती दिल्यास अधिकारी कार्यवाही न करता संबंधीतास जाऊन उलट माहिती देतात.

श्री. किशनचंद तनवाणी : गुलमंडी रस्त्यावरील कोणती अतिक्रमणे काढलेली आहे व त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमणे झालेली आहे काय? तसेच बारुदनगर नाल्यावरील अतिक्रमणे काढण्यात आलेली होती ती कोर्टाच्या आदेशानुसार काढले की प्रशासकीय कार्यवाही म्हणुन काढले खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी : गुलमंडी रस्त्यावरील शेड, वगैरे चे जे अतिक्रमण झालेले होते ते काढण्यात आलेले होते. बारुदनगर न्यालावरील अतिक्रमण हे न्यायालयाच्या आदेशानुसार काढलेले आहे.

श्री. किशनचंद तनवाणी : बारुदनगर नाल्यावरील अतिक्रमण काढले परंतु तेथे पुन्हा अतिक्रमण झालेले आहे आता लगेच पाहाणी केल्यास परिस्थिती समजुन येईल. काढलेले अतिक्रमण त्या जागेवर पुन्हा अतिक्रमण होत असेल त्याकडे लक्ष द्यायचे नसेल तर कशासाठी काढण्याचे असा प्रश्न निर्माण होतो. एकच काम अनेक वळा करुन वेळ वाया घालविणे बरोबर नाही.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वार्डात मोठया प्रमाणात अतिक्रमणे होत आहे या बाबतीत प्रशासकीय अधिकारी यांना प्रत्यक्ष सुचना दिल्या लेखी दिले त्या पत्राचे उत्तर सुध्दा दिले नसुन कार्यवाही केलेली नाही.

श्री. जगदीश सिध्द : न्यायालयाचे स्थगिती आदेश असतांना बांधकाम होऊ दिले प्रशासकीय कार्यवाही वेळीच झालेली नाही जेथे बांधकाम केले गेले तेथील आदेश पंचनामा अधिकारी यांनी केला व रहदारीच्याच ठिकाणाची अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही करणार असे म्हटले तसे न्यायालयास प्रशासनातर्फे कळविलेले आहे का?

विधी सल्लागार : सदरचे बांधकाम जैसे थे ठेवण्याचे न्यायालयाचे आदेश होते. या संदर्भात प्रशासकीय विभागाकडुन माहिती मागविलेली होती. तेथील परिस्थिती काय आहे. त्याबाबतीत अनधिकृत बांधकाम बाबत पंचनामा फोटो. या विभागाकडे मागविले. ४-५ दिवसापुर्वीच मागविले आहे. सर्व कागदपत्र न्यायालयाचे आदेशाचे अवमान होते. त्यासंबंधी कार्यवाहीसाठी वकीलाकडे पाठविलेले आहे.

जगदिश सिध्द : अशा प्रकारच्या किती प्रकरणाची कार्यवाही चालु आहे. किती प्रकरणाच्या बाबतीत कन्टेन दाखल केलेले आहे. किती प्रकरणात कार्यवाही झालेली आहे.

विधी सल्लागार : सर्व प्रकरणात तपासणी करुन कळविण्यात येईल.

मा. महापौर : अतिक्रमणाच्या बाबतीत प्रशासकीय विभाग कमी पडत आहे असे वाटते. स.सदस्यांनी आपआपल्या भावना व्यक्त केलेल्या आहे. स. सदस्यांनी जे जे प्रश्न उपस्थित केले त्या संदर्भात प्रशासनाने सविस्तर चौकशी करावी. अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही करावी.

श्री. जगदीश सिध्द : कन्टेन दाखल करणार आहे असे आताच सांगण्यात आले चौकशी काय करणार आहे. व चौकशी करता येते का? प्रशासकीय अधिकारी तसेच संबंधीत ईमारत निरिक्षक यांनी बांधकाम कसे होऊ दिले.

श्री. नंदकुमार घोडेले : एखादया गरिबांने टॅक्स भरला नाही तर घर पाडण्याची सुध्दा कार्यवाही केली जाते. असे महानगरपालिकेच्या जागेवर होणारे अतिक्रमण तात्काळा पाडले पाहिजे. न्यायालयाचे आदेश आहे.

श्री. सुदाम सोनवणे : अधिकाऱ्यांनी पैसे घेऊन बांधकाम होऊन दिलेले आहे. अशा कामास अधिकारी सहकार्य करीत असेल तर महानगरपालिका दिवाळखोरीत निघेल. न्यायालयाच्या आदेशाला अधिकारी जुमानत नसतील तर अशा अधिकाऱ्यांवर कडक कार्यवाही झाली पाहिजे.

मा. महापौर : स. सदस्यांनी आताच भावना व्यक्त केल्या की, अधिकाऱ्यांनी पैसे घेऊन अनाधिकृतपणे होणारे बांधकाम करु दिले. असे मत स. सदस्यांनी व्यक्त केले. या बाबतीत प्रशासनाने १००% सविस्तर चौकशी करुन जे कुणी अधिकारी/ईमारत निरिक्षक दोषी असतील त्यांचेवर निलबनाची कार्यवाही करावी व जे ईमारत निरिक्षक आहेत त्यांच्या त्वरीत बदल्या करण्यांत यावेत.

श्री. भगवान गायकवाड : कर्मचाऱ्यांच्या बदल्या करुन चालणार नाही त्याची चौकशी करुन त्यांचेवर कार्यवाही व्हावी प्रत्येक जण पैसे कमवेल.

मा. महापौर : अतिशय गंभीर बाब आहे प्रशासकीय असोत की, ईमारत निरिक्षक प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. १५ दिवसात करावी.

श्री. राधाकृष्ण घडमोडे : महानगरपालिकेची परवानगी घेऊन पार्किंगसाठी जागा सोडलेल्या होत्या त्या जागेवर बिल्डरांनी बांधकाम केलेले आहे. त्यासंबंधी प्रशासन काय कार्यवाही करणार आहे माहिती देण्यात यावी.

मा.महापौर : ज्या ज्या बिल्डरांनी पार्किंगसाठी सोडलेल्या जागेवर अनाधिकृतपणे बांधकाम केलेले असेल अशा बिल्डरवर प्रशासनाने ताबडतोब कार्यवाही करावी.

श्री. भगवान घडामोडे : पार्किंगच्या जागेवर काही बिल्डरांनी दुकाने तयार करुन विकलेली आहे. अशा प्रकरणाच्याबाबती प्रशासन काय कार्यवाही करणार आहे खुलासा व्हावा.

मा. महापौर : नियमाने प्रशासनाने कार्यवाही करावी अतिक्रमण असेल तर काढण्यात यावे.

श्री. सुनिल मगरे : महानगरपालिकेच्या अस्थापनेवर अधिकारी/कर्मचारी यांना त्या त्या संवर्गातील आरक्षीत पदावर पदोन्नत्या दिलेल्या आहे. यात जातीचा दावा करुन पदोन्नत्या दिल्या गेल्या परंतु एखादा कर्मचारी जर जातीचा दावा करुन फायदे, सवलती घेत असेल तर कायद्यामध्येच असे दिले आहे की, कर्मचारी/अधिकारी यांना पदोन्नती दिल्यानंतर त्यांचे जात प्रमाणपत्र वैध

असावयास पाहिजे व ते ६ महिण्याच्या आता पडताळणी समिती कडे पाठवुन वैध असल्याचे अहवाल महापालिकेकडे यावे. परंतु अनेक पदोन्नतीच्या प्रकरणात विहीत मुदतीत जात पडताळणी समितीकडे पाठविलेले नाही. जे प्रकरणे जात पडताळणी समितीकडे पाठविलेला नाही. जे प्रकरणे जात पडताळणी समितीकडे पाठवण्यात आलेली होती त्यात ४(चार) कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविलेले आहे. त्या चार पैकी ३ कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कार्यवाही केली परंतु एका अधिकाऱ्याच्या बाबतीत अद्याप कार्यवाही झालेली नाही. शासनाचे या बाबतीत निर्देश आहे की जातीचा दावा करुन व त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले गेले तर त्या कर्मचारी अधिकाऱ्यांच्या सवलती/फायदे बंद करुन त्यांना पदावनत करावे. व त्यांचेवर प्रशासकीय कार्यवाही व्हावी. म्हणुन ज्या ज्या कर्मचारी/अधिकारी यांनी आतापर्यंत जातीचा दावा करुन पदोन्नतीचे फायदे घेतले व त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले गेले अशांवर पोलिस केस दाखल करण्यात यावी. व त्यांना ज्या सवलती/फायदे दिले ते रद्द करावे. अशा सभागृहाच्यावतीने मागणी करतो. तसेच विहीत मुदतीत प्रकरण जात पडताळणी समीतीकडे का पाठविले नाही. याचा सुध्दा खुलासा करण्यांत यावा.

मा. महापौर : स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचाप खुलासा करावा ४ पैकी एका अधिकाऱ्यांच्या बाबतीत कार्यवाही केली नाही. असे मत त्यांना मांडले प्रशासनाने त्या बाबतीत खुलासा करावा.

सहाय्यक आयुक्त : अनुसुचीत जातीचे अधिकारी/कर्मचारी असे एकुण ४६ प्रकरणे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रमाणपत्र तपासणीसाठी पाठविण्यात आलेले होते. त्यापैकी २३ प्रकरणातील कर्मचाऱ्यांचे प्रमाणपत्र वैध म्हणुन लेखी उत्तर पडताळणी समितीचे प्राप्त झालेले आहे. ६ प्रकरणात अवैध म्हणुन अहवाल प्राप्त झाला आहे. १) महम्मद खॉन सरदार खॉन विभागीय अधिकारी २) ताज महम्मद, कनिष्ठ लिपीक ३) खॉन खलील खॉ ४) सुरय्या शाहिन ५) एस.आर. जरारे तसेच ६) मिर्झा मुमताज अली बेग असे आहे यापैकी मिर्झा मुमताज अली बेग यांना महानगरपालिका सेवेतुन कायमाचे कमी करण्यात आलेले आहे. उर्वरित ५ लोकांची प्रकरणे न्याय प्रविष्ठ आहेत.

श्री. प्रकाश निकाळजे : ४६ प्रकरणापैकी एक ही प्रकरण जात पडताळणी समिती कडे प्रशासना मार्फत पाठविलेले नाही. तत्कालीन आयुक्त श्री. शर्मा साहेब यांनी काही कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिलेल्या आहे व त्या कर्मचाऱ्यांनी ६ महिण्याच्या आत आपआपले जात प्रमाणपत्र वैध अहवाल जात पडताळणी समिती कडुन आणावे असे पत्र दिलेले होते. एवढी प्रशासकीय कार्यवाही होत असुन ही सहाय्यक आयुक्त-१ यांनी अशी प्रकरणे जात पडताळणी समितीकउे पाठविलेली नाही. व कुण्या एका व्यक्तीने अशा कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र वैध होऊन येत नाही. अशी प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रशासनामार्फत पाठवावी म्हणुन पत्र दिले तरी सुध्दा सहाय्यक आयुक्त -१ यांनी दखल घेतली नाही. व प्रशासनाने ही प्रकरणे जात पडताळणी समिततीकउे न पाठविल्याने विलंब झालेला आहे जी मुदत ६ महिन्याची दिली होती ती संपलेली आहे व संबंधीत कर्मचाऱ्यांना मा. आयुक्त यांना पुन्हा पत्र देऊन कळविले की, सहाय्यक आयुक्त -१ यांनी आमचे जात

प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे वेळेवर पाठविले नाही. त्यात आम्ही दोषी नाही. व त्यामुळे आम्ही प्रमाणपत्र वैध करुन आणु शकलो नाही असे दिलेले आहे या ४६ प्रकरणे नसुन एकुण ७३ प्रकरणे आहे. सदर प्रकरणे समाज कल्याण खात्याच्या विहीत नमुण्यात जात पडताळणी समितीकडे पाठविण्याची आवश्यकता होती. त्या नमुण्यात न पाठविल्यामुळे पुन्हा ती प्रकरणे ३ महिण्यानतर तशीच महानगरपालिकेकडे आलेली आहे. मागे मी एक पत्र देऊन कळविले होते की, ज्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना जातीचा दावा करुन ज्यांना पदोन्नत्या व इतर सवलती दिल्या अशा लोकांचे जात प्रमाणपत्र जो पर्यंत वैध ठरवुन येत नाही तो पर्यंत त्यांना पदोन्नत्या, फायदे सवलती देऊ नये परंतु त्याची सुध्दा कार्यवाही केलेली नाही. सोबत शासन जी.आर. प्रत सुध्दा दिलेली होती. आज ९ महिण्याचा कालावधी झाला आज ही प्रमाणापत्र वैध होऊन आलेले नाही. त्या त्या कर्मचाऱ्यांनी जातीचा दावा करुन आरक्षीत जागेवर फायदा घेत आहे. आणि ज्यांचे प्रमाणपत्र अवैध ठरवुन आले असतांना का कार्यवाही केली नाही याचा खुलासा व्हावा. आणि जात प्रमाणपत्र तपासणीसाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठविण्यास का विलंब झाला त्याचाही खुलासा करावा सहाय्यक आयुक्त-१ यांनी जाणुन बुजुन यात दखल घेतलेली नाही त्यांनी खुलासा करावा.

श्री. सुनिल मगरे : या संदर्भात मागच्या महिण्यात शासनाने नुकसाच एक जी.आर. काढलेला आहे. त्यात स्पष्ट आदेश केलेले आहे की, ज्या व्यक्तीला जातीचा दावा करुन पदोन्नती व इतर फायदे, सवलती घ्यायच्या असतील अशा व्यक्तीने/कर्मचाऱ्यांनी त्यांचे जात प्रमाणपत्र अगोदर वैध करुन आणावे तरच फायदा घेता येईल. उदा. दयावयाचे झाल्यास नुकत्याच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठाता अधिव्याख्याता प्राफेसर पदांच्या मुलाखती घेतल्या त्या त्या आरक्षीत पदावर नियुक्त्या निवड समितीने केल्या परंतु त्या त्या लोकांना नियुक्तीपत्र न देत त्यांना एक पत्र देऊन आपआपले जात प्रमाणपत्र ६ महिण्याच्या आत वैध करुन आणावे असे पत्र दिलेले व आपली आमुक-आयुक पदावर नियुक्ती झालेली आहे. म्हणुन ज्यांना पदोन्नती दिलेल्या आहे त्यांचे जात प्रमाणपत्र वैध ठरवुन जोपर्यंत येत नाही त्यांना त्यांचे मुळ पदावर आणावे व ज्यांना पदोन्नती दयायच्या असतील अशाचे प्रमाणपत्र वैध झाल्या शिवाय त्यांना पदोन्नत्या व इतर सवलती फायदे देऊ नये.

श्री. तकीहसन खान : ज्या ५ लोक न्यायालयात गेलेले आहे त्यावर या सभागृहात चर्चा करणे बरोबर नाही न्यायालय निर्णय देईल त्यानुसार कार्यवाही करता येईल. तसेच ६ महिण्याच्या आत जात प्रमाणपत्र वैध करुन आणण्याच्या जी. आर. संबंधी सुध्दा न्यायालयात केस चालु आहे. जो. जी.आर. काढला तो चुकीचा आहे व त्या संदर्भात न्यायालयात सुनावणी झालेली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असुन जो पर्यंत निकाल हाती येत नाही तोपर्यंत अशा बाबतीत चर्चा करणे बरोबर नाही.

श्री. प्रकाश निकाळजे : ज्यांची प्रकरणे न्याय प्रविष्ठ आहे व न्यायालयाने कार्यवाही करण्यास स्थगित आदेश दिलेले असतील तर कार्यवाही करु शकत नाही. परंतु प्रकरण चालु आहे व स्थगिती आदेश नाही अशा कर्मऱ्यांच्या बाबतीत

प्रशासन कार्यवाही करु शकते. तसेच ज्यांची प्रकरणे न्यायालयात नाही ते जातीच्या दात्यावर पदोन्नती व इतर फायदे घेत आहे.

मा. महापौर : आताच स. सदस्य श्री. निकाळजे यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्या बाबतीत ज्या ज्या कर्मचाऱ्यांचे प्रकरण न्यायालयात असतील त्या बाबतीत प्रशासनाने पुर्णपणे पाठपुरावा करावा व न्यायालयाचे स्थगित आदेश नसतांना व जे कुणी जातीच्या दाव्यावर पदोन्नती व इतर फायदे, सवलती जे अधिकारी कर्मचारी घेत असतील त्यांचे बाबतीत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही तात्काळ करावी.

श्री. स.अली सलामी : शासनाचा जो जी.आर.सादर झालेला आहे तो अशा प्रकरणाला लागु होतो किंवा काय? या बाबतीत विधी सल्लागार यांचे मत घ्यावे. त्या जी.आर. नुसार काही लोकांनी न्यायालयात प्रकरण दाखल केलेले आहे.

मा. महापौर : ज्यांचे प्रकरण प्रकरण न्यायालयात आहे व स्थगित आदेश नाही त्यांचेवर कार्यवाही करण्याचा प्रशासनाने निर्णय घ्यावा तसेच जे न्यायालयात गेले नाही परंतु जातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सवलती फायद आहे ते बंद करावे त्यांचे पदाच्या बाबतीत कार्यवाही करावी आता या विषयावर चर्चा करु नये.

श्री. पांडुरंग तायडे : वृत्तपत्रात बातम्या येतात व हजारो लिटर दुध रस्त्यावर टाकण्यात येत आहे दररोज दुध तपासणी होते की, महिण्यातुन एकदाच होते इतर दिवशी चांगले दुध येते का? खुलासा करावा.

श्री. काशानाथ कोकाटे : शहरात येणारे दुध भेसळ युक्त आहे म्हणुन दिड महिण्यामध्ये कार्यवाही होऊन रस्त्यावर टाकले गेले. वृत्तपत्रात आरोग्य अधिकारी तसेच समितीचे अध्यक्ष यांनी कार्यवाही केल्या बाबतची नावे आलेली होती. जे दुध आरोग्याला घातक व सेवनास योग्य नाही. त्याची तपासणी करुन कार्यवाही केली ते दुध भेसळयुक्त होते त्यांचे नमुने घेतले आहे का त्याचा काही अहवाल आलेला आहे काय? ते दुध खराब होते हे सिध्द झाले का? संबंधीत पुरवठा धारक, कंपनी मालक यांचेवर गुन्हे दाखल केलेले आहेत का, पंचनामा केलेला आहे का? त्यांचे वाहन जप्त केलेले आहे का? एखादया अपघात प्रकरणात वाहन जप्त केले जाते न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत वाहन परत दिले जात नाही परंतु ज्या दुधाची तपासणी झाली जे वाहनामधुन दुध आले ती वाहने जप्त न करता सोडुन देण्यात आलेली आहे. गेल्या दिड महिरण्यापुर्वी कार्यवाही करण्यात आलेली होती पुन्हा गेल्या १६ तारखेला करण्यात आली पुर्वी केलेल्या कार्यवाहीच्या दिवसा पासुन शहरात येणारे दुध चांगल्या प्रतीचे होते का? किती दुधाचे तेंव्हा पासुन नमुने घेतले व किती कंपनी मालकावर कार्यवाही केलेली आहे. सर्व माहिती सभागृहापुढे सादर करावी.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : आरोग्य समितीचे सभापती यांनी या बाबतीत आतापर्यंत केलेली दोन वेळोस कार्यवाही केली खऱ्या अर्थाने त्यांचे या सभागृहातर्फे अभिनंदन करावयास पाहिजे परंतु परवाच कार्यवाही केली तर आज ही शहरात दुध आले ते चांगल्या प्रतीचे होते का? तसे दुध येणार आहेत का? काही कंपन्याच दुध चांगल्या प्रतीचे नसुन लहान मुलाना पोटाचे आजार होऊ शकतात हे सुध्दा डॉक्टरांनी सिध्द करुन दाखविलेले आहे. मोठे व्यक्तीने दुध घेतले तर ते सुध्दा आजारी पडु शकतात. असे दुध कायम स्वरुपी बंद

करणार आहात का? ज्या ठिकाणी दुध प्रोडक्शन होते पॅकींग हाते. त्यावर बंदी घालणार आहात का? ज्या कंपन्याच्या दुधाच्या बाबतीत डॉक्टरांनी रिपोर्ट दिलेले आहे त्या कंपन्याचे दुध शहरात न येऊ देण्यावर कार्यवाही करणे तात्काळ गरजेचे आहे. अशी कार्यवाही करण्याच पाऊल महापालिकेने चांगल्या प्रकारे उचलेले आहे. शहरात येणारे दुध किती कंपन्याची येते याची नोंद आहे का? या बाबतीत कायमची कार्यवाही करुन हा प्रश्न निकाली काढावा.

श्री. जयवंत ओक : मा. महापौर व मा. सभापती आरोग्य समिती यांनी दुध प्रकरणात जातीने लक्ष देऊन कार्यवाही केली त्याबध्दल त्यांचे अभिनंदन करतो. किती कंपन्याचे दुध या शहरात येते. गंभीर स्वरुपाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो रोगराई वाढवु शकते. गोरगरिब दुध घेतात आजार उद्‌भवल्यास उपचार करण्यास त्यांचेकडे पैसे नसतात. १-२ कार्यवाही करुन चालणार नाही. कायम स्वरुपी कार्यवाही करण्यात यावी. या दुधामुळे कोण कोणते आजार होऊ शकतात खुलासा द्यावा लहान मुलांना कोणते आजार होऊ शकतात.

मा. महापौर : आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी : दुधाच्या बाबतीत जे निकृष्ट दर्जाचे दुध आलेले आहे. यासंबंधी वेळीच कार्यवाही झालेली आहे परवाच ४३ हजार लिटर दुधनष्ट करुन शहरतात येऊ दिले नाही. जी कार्यवाही केली ती तात्पुरत्या स्वरुपाची केलेली आहे जे दुध निकृष्ट दर्जाचे आले ते फुड ॲन्ड ड्रग विभागाकडुन कार्यवाही होते. जेंव्हा महानगरपालिकेस वाटले की या दुधापासुन आरोग्यास धोका आहे त्यावेळी ते दुध नष्ट करु शकतो. ही तात्पुरत्या स्वरुपाची कार्यवाही होते. कायम स्वरुपी कार्यवाही करावयाची झाल्यास जे वितरक आहे त्यांना लायसेन्स देऊन त्याच वितरकांनी शहरात दुध आणावे व जे चांगल्या प्रतीचे दुध आणणार नाही. त्यांचेवर आपल्याला कार्यवाही करता येईल यासाठील एक भरारी पथक निर्माण करण्याची आवश्यकता आहे व मा. महापौर व मा. आरोग्य समिती सभापती यांचेसह मी चर्चा सुध्दा केलेली आहे.

श्री. जयवंत ओक : या दुधा पासुन लहान मुलांना कोणते आजार होतात खुलासा करावा लहान बालक या दुधामुळे दगावत असतील तर योग्य निर्णय घेऊ शकतो. निकृष्ट दर्जाचे दुध येत असेल तर महापालिकेतर्फे जनतेला जाहिर प्रगटन करुन शासकीय दुध डेअरीचे दुध घेण्याचे आवाहन करावे. कोणते आजार होतात ते गरिब जनतेच्या वसाहतीत जाऊन आरोग्य विभागाने नजरेस आणुन द्यावी.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी : या दुधापासुन लहान मुलांना पोटाचे गॅस्ट्रो, फुड पॉयजनींग, पोटाचे आजार होऊ शकतात. ते होऊ नये म्हणुन कार्यवाही करणे आवश्यक आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : लहान व मोठया व्यक्तींना सुध्दा या दुधापासुन आजार होऊ शकतात असा खुलासा झाला पंरतु दीड महिण्यापुर्वी कार्यवाही केलेली होती पुन्हा काल १६ तारखेला केली पुर्वी च्या मालकावर या बाबतीत कोणती कार्यवाही केली त्यांचेवर पोलिस गुन्हे दाखल केले का? त्यांची वाहने कोणत्या नियमानुसार परत देण्यात आली कुणाच्या आदेशाने दिली ती

माहिती द्यावी. जेव्हा ४० दिवसानंतर कार्यवाही होते तर मध्यंतरी ४० दिवसा मध्ये दुध चांगल्या प्रतीचे होते का? याची माहिती द्यावी.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी : यापुर्वी दुधाच्या बाबतीत कार्यवाही केली होती त्या दुधाचे नमुने घेऊन तपासणी साठी पाठविलेले आहे. तो अहवाल प्राप्त झाल्यानंतर फुड ॲन्ड ड्रग विभागाला रिपोर्ट पाठविले जाते.

श्री. काशिनाथ कोकाटे : पुर्वीचा अहवाल येईपर्यंत थांबावयास पाहिजे होते. तो अहवाल न येताच पुन्हा धाड टाकुन रस्त्यावर दुध टाकण्यात आले नष्ट केले पुन्हा जे दुध नष्ट केले ते पोषक नव्हते का? वेगळया पध्दतीने कार्यवाही होणे बरोबर नाही.

श्री. प्रकाश निकाळजे : मा. सभापती व संबंधीत अधिकारी यांनी जी कार्यवाही केली ती योग्य असुन कुणीही सभागृहात नकारात्मक बोलु नये. नागरिकांच्या आरोग्याला धोका पोहचण्याचा तो प्रश्न होता जी कार्यवाही झाली ती योग्य असुन सभापती तसेच प्रशासन यांना उलट अशी कार्यवाही करण्यास प्रोत्साहन द्यावे.

श्रीमतीर डॉ. आशा बिनवडे : आरोग्य समितीची स्थापना झाल्यापासुन मा. सभापती यांनी दोन वेळेस शहरात येणारे निकृष्ट दर्जाचे दुध नष्ट करण्याची कार्यवाही केली त्याबध्दल त्यांचे अभिनंदन करते. या समितीत मी व श्री. कावडे आम्ही दोन्ही सदस्य असुन सुध्दा जेंव्हा धाड टाकण्यात आली ती कार्यवाही करतांना आम्हास व कमिटीच्या इतर सदस्यांना कळविलेले नाही. वृत्तपत्रातुन वाचण्यात आले. दुध निकृष्ट दर्जाचे होते, यावर निकर्ष लाऊन ते दुध निकृष्ट आहे म्हणुन पुन्हा दुसऱ्यांदा नष्ट करण्यात आलेले आहे. जी यंत्रणा पुर्वी केलेल्या कार्यवाही साठी वापरली त्या कार्यवाहीचा कोणतीही अहवाल आला नाही. ४० दिवस लागातात. तो अहवाल येण्यापुर्वीच दुसऱ्यांदा दुध नष्ट करण्यायी कार्यवाही करण्यांत आली.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी : धाडी टाकतांना स. सदस्यांना विश्वासात घेवुनच करावे. आरोग्य समितीचे सभापती स्वतः आमच्या बरोबर होते, सभापती यांना विश्वास घेऊनच कार्यवाही केलेली आहे. यानंतर स. सदस्यांना विश्वासात घेऊन कार्यवाही केली जाईल सदरचे दुध निकृष्ट होते त्यात जे फॅट व सॉलिड नॉट फॅटचे प्रमाण प्रमाणकानुसार नसल्यामुळे दुध निकृष्ट आहे असे आपण गृहीत धरु शकतो.

श्रीमती डॉ. आशा बिनवडे : जे प्रमाण होते ते कमी होते. असे प्रशासनाचे मत आहे. परंतु प्रमाण कमी होते. म्हणुन त्यापासुन कोणता आजार उद्‌भवण्याची चिन्हे नव्हती. ते दुध पोषक नव्हते असे म्हणता येईल परंतु ते निकृष्ट दर्जाचे होते, असे म्हणणे चुकीचे आहे जास्त पैसे घेऊन कमी किंमतीचे दुध दिले असता अर्थ लाऊ शकतो. तसेच अगोदरच्या कार्यवाहीचा रिपोर्ट येण्या अगोरदरच दुसऱ्यांदा कार्यवाही झाली हे बरोबर वाटत नाही.

श्री. डॉ. भागवत कराड : महानगरपालिकेच्या आरोग्य समिती सभापती व संबंधीत विभाचे जी भेसळ दुधाच्या बाबतीत दोन दिवस कार्यवाही केली ती अत्यंत चांगली आहे या मताचा मी आहे. दुधामध्ये मीठ साखर फळ केळी ईत्यादी मिसळले जाते. व ते योग्य दुध नसते व असे दुध चांगज्ल्या प्रतीचे दुध समजुन जनतेला देणे योग्य नाही. असे माझे मत आहे. ज्या भावनेने असे दुध घेतले जाते ते पिण्यास योग्य नाही. यामुळे लहान मुलाना किंवा मोठया व्यक्तींना

संडास, उलटया सारखे आजार होऊ शकतात. याही पेक्षा ॲमीबेयासीस किंवा टयुबर क्लॅसीस होऊ शकतो. हा एण्क आजार झाला या दुधापासुन ज्या प्रकारचे सत्व मिळावयास पाहिजे ते मिळत नाही. यामुळे युक्रीस्त्ल डीसीज चे आजार होऊ शकतात. ॲपोकॅल्शीयम मुळे हाडाचे आजार होऊ शकतात याही पेक्षा हॅपो प्रीटोनेमीया होऊ शकतो. असे ६ आजार होऊ शकतात. म्हणुन चांगल्या प्रतीचे दुध देतो असे दाखवुन योग्य दुध देत नसेल व जास्तीचे पैसे घेऊन जनतेची फसवणुक करील असेल तर अशा वितरक कंपनी मालकावर कार्यवाही करणे योग्य होईल ती जबाबदारी महानगरपालिकेची आहे. आताच सदस्यांनी विचारणा केली त्यात रोग जंतु होते का? ते होते की, नाही ते तपासण्याची गरज होती ती कार्यवाही झालेली नाही. परंतु प्रथम दर्शनी भेसळ केलेली आहे अशी शंका आली व ते पुन्हा येऊ नये म्हणुन त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे व संबंधीत मालकावर पोलिस केस दाखल केली असती तर पुन्हा भेसळयुक्ती दुध आले नसते असे वाटते भेसळ करणे अयोग्य असुन अशांना महानगरपालिकेने धडा शिकवावा.

श्री. पांडुरंगा तायडे : ४० दिवस रिपोर्ट येण्यास फार उशीर होतो. ज्या दुध वितरक महासंघाच्या संस्थेने या शहराची दिशाभुल करुन फसवणुक केली अशा दुध संघाच्या मालकावर पोलिस गुन्हे दाखल करण्याचे आदेश द्यावेत.

श्री. तकी हसनखान : जी कार्यवाही केली ती योग्य आहे परंतु रिपोर्ट महानगरपालिकेच्या विरोधात आल्यास जे दुध नष्ट केले त्याचा खर्च महानगरपालिकेला द्यावा लागेल का खुलासा द्यावा.

श्री. जयवंत ओक : आताच डॉ. कराड यांनी विविध ०६ आजार होऊ शकतात असे सांगतिले जनतेच्या माहितीसाठी या बाबतीत जाहिर प्रगटन द्यावे त्या वितरक एजन्सीचे नांव द्यावे. जेणे करुन जनता ते दुध विकत घेणार नाही. व जे वितरक आहेत त्यांचेवर कडक कार्यवाही करावी.

मा. महापौर : एखादे लहान मुल या देशाचे भविष्य आहे असे नेहमीच म्हटले जाते. या लहान बालकांना काही उत्पादक सुविधा देत असेल तर व जो प्रश्न निर्माण झाला की, आतापर्यंत संबंधीत कंपनी मालकावर पोलिस कार्यवाही का झाली नाही. खऱ्या अर्थाने मा. सभापती तसेच आरोग्य अधिकारी यांचे अभिनंदन करावयास पाहिजे. जी कार्यवाही झाली ती आतापर्यंत अशी कार्यवाही या महापालिकेने केलेली नाही. या कार्यवाही मुळेच आता आपणांस समजले व ज्या दिवशी ही कार्यवाही करावयाची होती पहिल्यादांच आपण केलेली आहे. जशी जशी माहिती मिळाली त्या त्या पध्दतीने ही कार्यवाही केलेली आहे. पुढेही आणखी चांगल्या पध्दतीने कार्यवाही होण्याच्या दृष्टीने एक भरारी पथक व प्रयोग शाळा करण्याचे प्रशासनाला सुचविलेले आहे. शहरात येणारे दुध हे रात्री येत असते स. सदस्या यांना आताच मागणी केली की, मी सदस्या असतांना बोलविले नाही. पंरतु वेळ रात्रीची होती. यापुढे असे होणार नाही. सदस्यांना विश्वासात घेऊन कार्यवाही होईल.

श्री. काशीनाथ कोकाटे : समितीच्या किती सदस्यांना विश्वासात घेऊन कार्यवाही केलेली आहे.

मा. महापौर : ठिक आहे प्रशासनाला सुचना दिलेल्या आहे, यापुढे कार्यवाही करतांना सदस्यांना विश्वासात घेऊन कार्यवाही करावी.

श्री. जयवंत ओक : समितीचे सभापती प्रत्यक्ष कार्यवाहीत असल्यास सर्वच सदस्यांची गरज होती असे वाटत नाही.

मा. महापौर : यापुढील अशी कार्यवाही करतांना समितीतील सदस्यांना बोलवावे. व दोन वेळेस आतापर्यंत कार्यवाही झाली त्या दोन्ही वेळेस व यापुढे तिसऱ्यांदा जर सदर वितरक धारक यांचे दुध भेसळयुक्त आढळुन आल्यास त्यांचे लायसेन्स रद्द करण्या. बाबत प्रशासनासमार्फत शासनास शिफारस करण्यांत यावी. व अशा वितरक धारकांवर पोलिस गुन्हे दाखल करण्यात यावे. जेणे करुन या शहरात येणारे दुध हे चांगल्या प्रतीचे पुरवठा होऊ शकेल.

श्रीमती लिलावती धायातिक : भेसळ युक्ती दुधामुळे जेनतेचे आरोग्य बिघडु शकते. त्यावर भरपुर चर्चा झालेली आहे. आरोग्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या दवाखान्यात चांगल्याप्रकारे व्यवस्था असावी तसेच साफसफाईचे काम सुध्दा अत्यंत दिरंगाईने होते. सफाई कामगार वाढविले पाहिजे. अनेक प्रकारचे आजार दुर्गंधीमुळे होतात. कचरा वेळोवेळी उचलला गेला पाहिजे. वार्डात दोन वेळेस कचरा उचलला जात होता. परंतु आता एकच वेळेस कचरा उचलला जातो, त्यात काही शिल्लक राहतो. वार्डात प्रमाणकानुसार मंजुर दिलेले होते, परंतु माझ्या वार्डातील ५ मजुर व ३ स्त्री मजुर इतर दुसऱ्या वार्डात सफाईसाठी दिले आणखी १०-१५ मजुरांची आवश्यकता असुन कामगार वाढवुन देण्यांत यावे. त्यामुळे वार्डात स्वच्छता ही वेळेवर होऊ शकेल.

श्री. मोतीलाल जगताप : संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यांत आलेले आहे. स्वच्छतेच्या दृष्टीने बोलवयाचे झाल्यास वारंवार स्वच्छतेच्या बाबतीत या सभागृहात चर्चा झालेली असुन गेल्या एक वर्षापासुन मी माझ्या वार्डात कचरा वाहुन नेण्यासाठी मोठया ट्रकची मागणी केलेली आहे. वार्डातील कचरा सध्या मिनी ट्रकने उचलला जातो. ट्रक भरल्यानंतर कचरा खाली पडतो. व काही कचरा तसाच शिल्लक पडुन असतो. सर्वच वार्डात चांगल्याप्रकारे स्वच्छता होण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना करणार आहात व माझ्या वार्डासाठी एक मोठा ट्रक कचरा उचलण्यासाठी द्यावा अशी माझी मागणी आहे. या संदर्भात मी प्रशासनाकडे पत्र सुध्दा दिलेले आहे.

श्रीमती लिलावती धायातिक : माझ्या वार्डात टाकीखाली पाणी साचते. जंतु होतात. नळातुन जंतु येतात. आरोग्य बिघडते पाणी कमी प्रमाणात येते ते वाढवावे.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : जेव्हा पासुन निवडुन आले तेंव्हा पासुन वार्डात नविन कचरा कुंडया दिल्या नाही. वारंवार पत्र देऊन मागणी केलेली आहे. कार्यवाही होत नाही. नागरिकांमध्ये तिरस्काराची भावना निर्माण होत आहे. जागा बघुन कायम स्वरुपी कचरा कुंडया तयार कराव्यात रेडीमेड तयार केलेल्या कचरा कुंडया कुणीही घेऊन जातात.

मा. महापौर : संबंधीत झोन अधिकारी यांनी या प्रश्नाच्या बाबतीत दखल घ्यावी. जे विभागप्रमुख असतील त्यांनी नोंद घेऊन पुढील कार्यवाही करावी. स. सदस्यांची भावना झोन अधिकारी यांनी समजुन घेऊन तात्काळ स्वच्छ पाणी कसे देता येईल याबाबतीत कार्यवाही करावी. स्वच्छता अभियान राबवित आहोत व त्या संबंधीचा आराखडा तयार करुन कार्यवाही करित आहोत.

वार्डात स्वच्छता कशी ठेवता येईल यासाठी प्रयत्न करणार आहोत. यात सर्वांचा सहभाग असण्याची गरज आहे. यापासुन योगदान मिळेल.

श्रीमती शाहीन जफर : एकच गाडी दोन तीन वार्डातील कचरा घेऊन जाते त्यामुळे उचलण्यास उशीर होतो. त्यासाठी प्रत्येक वार्डासाठी गाडीची स्वतंत्र व्यवस्था असावी तक्रार देऊनही कार्यवाही होत नाही. सिल्लेखान्यात दुर्गंधी आहे. अळया होतात. मुले आजारी होतात.

मा. महापौर : येत्या २० ते २१ तारखेपर्यंत संपुर्ण शहराची माहिती घेणार आहोत. किती गाडयांची आवश्यकता आहे हे कळेल त्यानुसार कार्यवाही करता येईल.

श्री. जयवंत ओक : स्वच्छता अभियान अभियाम वार्ड क्र. १ पासुन सुरुवात करावी कोणत्या वार्डात केव्हा राबविणार कार्यक्रम पत्रिका तयार करावी. जे बांधकामाचे साहित्य रस्त्यावर पडलेले आहे ते उचलण्याची सुध्दा कार्यवाही व्हावी.

सौ. नईम सिद्यीकी : वार्डात भरपुर पाणी येत नाही. लाईट व्यवस्था नाही. जे लाईट आहे, ते बंद आहेत ड्रेनेजची व्यवस्था बरोबर नाही.

मा. महापौर : स. सदस्या यांनी केलेल्या सुचने नुसार पाणी पुरवठा अधिकारी तसेच विद्युत विभागाचे अधिकारी यांनी वार्डातील ज्या समस्या असतील त्या सोडवाव्यात.

**विषय क्र. ६९७/१ :**

दिनांक ३० सप्टेंबर २००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा. महापौर : इतिवृत्त कायम करण्यांस मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

दिनांक ३० सप्टेंबर २००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ६९८/२ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी शहरातील नागरिकांना घरगुती, व्यावसायिक तसेच वेगवेगळया ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या पाणी पट्टी दरात, वाढीचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

औरंगाबाद शहरात जवळपास संपुर्ण पाणी पुरवठा हा भौगोलिक परिस्थितीमुळे वेगवेगळया पाच पंपींग स्टेशनव्दारे पुरविला जात आहे आज या १३० दशलक्ष लिटर्स पाणी पुरवठासाठी जवळपास ११००० अश्वशक्तीचे पंप अहोरात्र चालवावे लागतात. परिणामी यामुळे विद्युत देयके वर्षाकाळी रु. २४.०० कोटीची येतात त्याच बरोबर पाणी पुरवठा योजना चालविण्यासाठी अस्थापना, रसायने देखभाल दुरुस्ती, पंपाच्या दुरुस्ती वगैरे बाबीसाठी जवळपास वर्षासाठी रु. ६.०० कोटी खर्च येतो त्यामुळे ही योजना चालविण्यासाठी महानगरपालिकेस वर्षाला रुपये २९ ते ३० कोटी एवढा खर्च येतो (या संदर्भातील गोषवारा सोबत देत आहोत) आजच्या परिस्थितीत चालु दरपट्टीनुसार महानगरपालिकेस पाणी पुरवठा पोटी साधारणपणे रुपये १४ कोटी महसुल जमा होतो. याचा अर्थ आज योजनेमध्ये खर्च व उत्पन्न यात जवळ पास १६ कोटी पेक्षा जास्त तुट आहे. दिवसेंदिवस विजेच्या वाढीव

दरामुळे व वापरामुळे सध्याच्या तुटील भर पडुन पाणी पुरवठा योजना चालविणे भविष्यात अशक्य होण्याची शक्यता निर्माण होईल.

या संदर्भात दरवृध्दी प्रस्तावाबाबत सर्वांगाने विचार होऊन पाणीपट्टी दर वाढीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

(सोबत प्रस्ताविक दरवाढीचा तक्ता जोडलेला आहे.)

**Municipal Corporation, Aurangabad**
**Proposed REVIED WATAR TARRJE**
**(TABALE)**

| REIDENTIAL USERS (A) | | | | | (B) | | | | | (Bill) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | EXSITING STRUCTURE | | PROPOSEDSTRUCTURE | | | CORNERCIAL USERS EXISING (A) STRUCTIRS | | PROPOSED STRUCTU | |
| Sr. No. | Dle of connaction | No-of connactoion | Rate | Revenusin lac | Refe amts, | In Rs lac. | No. of connection | Rete | Revenus in lac | Rate | Revenusin l |
| 1. | 1/2"Q | 85000 No | 1200/- | 1020.00 | 2700/- | 2295.00 | 500 No | 5300/- | 26.50 | 6500/- | 32.50 |
| 2. | 3/4"Q | 1210 No | 1950/- | 23.59 | 5500/- | 66.55 | 150 No | 6350/- | 9.52 | 12,000/- | 18.00 |
| 3. | 1"Q | 550 No | 4550/- | 25.02 | 10,000/- | 55.00 | 130 No | 14,150/- | 18.39 | 25,000/- | 32.50 |
| 4. | 1 1/2"Q | 40 No | 5200/- | 2.08 | 30,000/- | 12.00 | 20 No | 14,950/- | 2.99 | 70,000/- | 14.00 |
| 5. | 2"Q | 65 No | 6150/- | 3.99 | 50,000/- | 12.50 | 15 No | 16,200/- | 2.43 | 1,40,000/- | 21.00 |
| 6. | 3"Q | 24 No | 7400/- | 1.77 | 80,000/- | 25.00 | 1 No | 17,500/- | 0.17 | 2,00,000/- | 2.00 |
| 7. | 4"Q | 12 No | 8600/- | 1.03 | 1,20,000/- | 14.40 | 6 No | 19,000/- | 1.14 | 3,00,000/- | 18.00 |
| 8. | 6"Q | 8 No | 9850/- | 0.788 | 2,00,000/- | 16.00 | 2 No | 21,200/- | 0.42 | 4,00,000/- | 8.00 |
| 9. | 8"Q | 2 No | 12,300/- | 0.250 | 3,00,000/- | 6.00 | -- | -- | -- | -- | -- |
| 10. | Enroute Cosumers | | | 300.00 | | 300.00 | -- | -- | -- | -- | -- |
| | Total 1403.52 | | | 2802.45 | | 61.56 | | | | 146.00 | |
| | Total Reveenanc A+AI (Exsting) | | | 1465.08 lakhs | | Total expected Revenue by like of water fariff | | | | 2948.00 lakhs | |
| | Expenditure (Existing) | | | 3027.00 lakhs | | Total Rexverane Exenditure | | | | 3027.00 lakhs | |
| | Deficit | | | 1561.92 lakhs | | Deficit | | | | 79.00 lakhs | |
| | Proposed water supply rate (by metered supply) | | | | | | | | | | |
| | Residential use | | | | | commercial use | | | | | |
| | Existing Rs. | | | prosred Rate Rs. | | Existing Rate Rs. | | | | Proposed Rate Rs. | |
| | 4.00 | | | 8.00 | | 10.00 | | | | 24.00 | |

मा. महापौर : हा विषय प्रशासनाने आर्थिक वर्ष सुरु घेण्याच्या अगोदर ठेवावयास पाहिजे होता ज्यामुळे अर्थसंकल्पामध्ये सुधारणा करता येते. हा विषय येणाऱ्या आर्थिक वर्षापुर्वी ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सभागृहाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे सदरचा प्रस्ताव प्रशासनामार्फत येत्या आर्थिक वर्षापुर्वी ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *"पुरवणी विषय"*

**विषय क्र. ६९९/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महापालिकेच्या अस्थापनेवर लघुटंकलेखक पदावर कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय समितीने निवड केल्यानुसार अस्थायी कर्मचारी म्हणुन ५ वर्षापुर्वी ठराविक वेतनावर नियुक्त्या केलेल्या आहे. लघुटंकलेखक (स्टेनो-टायपिस्ट) हे पद गोपणीयता पाळण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पद आहेत. व अशा पदाचे पदनिर्मितीचे ठराव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने शासन मंजुरीसाठी प्रशासना मार्फत पाठविलेले आहे. माहितीनुसार इतर महानगरपालिकेत अशा पदावर नियुक्त्या करतांना अस्थायी कर्मचारी म्हणुन नियुक्त्या होत नाही. वेतनश्रेणीवर नियुक्त्या केल्या जातात. तसेच कर्मचारी हे ५ वर्षापासुन महानगरपालिकेची सेवा करिता आहे व तेव्हांपासुन आजपर्यंत महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामाचा व्याप सुध्दा वाढलेला आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेचा अस्थापनेवरील खर्च हा ४२% वर होत नाही व या पदावरील कर्मचाऱ्यांचे वय वाढल्याने मानवतेच्या दृष्टीने व सदर पदाचे महत्व व कामाचा व्याप लक्षात घेता--- आणि सदर पदाचे शासन दरबारी असलेल्या प्रस्तावास मंजुरी आणण्यासाठी प्रशासनामार्फत शिफारस करण्यास व सदर पदास शासन मंजुरी येईल या अधिन राहुन या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीवर आदेश पारित करण्यास्तव प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. आनंद तादुळवाडीकर, श्री. अंबादास दानवे
अनुमोदक : श्री. जयंवत ओक

मा. महापौर : हा विषय मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या अस्थापनेवर लघुटंकलेखक पदावर ठराविक वेतनावर नियुक्त्या केलेल्या आहे. अशा कर्मचाऱ्यांना शासन मंजुरीच्या अधिन राहुन अनुज्ञेय वेतन श्रेणीवर आदेश पारित करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७००/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शहरातील विविध चौकात हायमास्ट बसविण्यात येत असुन मदनी चौक हा मुख्य रस्त्यावर असुन हा रस्ता सेंट्रल नाका व एम.जी.एम. कडे जात आहे. या चौकात आपण पाहणी केल्यास लाईट बसविणे किती आवश्यक आहे ते समजेल.

तरी मदनी चौक या ठिकाणी हायमास्ट दिवा बसविणेच्या मंजुरीस्तव व त्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या आर्थिक तरतुदी करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. शेख मुनाफ शेख यासीन
अनुमोदक : श्री. स.अली सलामी स.मिरा सलामी,
श्रीमती सुलताना बेगम चाँदखाँ

मा. महापौर : हा विषय मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मदनी चौक या ठिकाणी हायमास्ट दिवा बसविणेस व येणाऱ्या आर्थिक तरतुद उपलब्ध करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०१/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, रहेमानिया कॉलनी या भागात अन्नु काका हे सामाजिक सोशल वर्कर होते. तरी रहेमानिया कॉलनी या भागात एक लहान चौक आहे. त्या चौकाचे नांव अन्नु काका चौका ठेवण्यात यावे ही नम्र विनंती.

सुचक : श्रीमती सुलताना बेगम चाँदखाँ
अनुमोदक : श्री. शे. मुनाफ शे. यासीन,
श्री. स.अली सलामी स. मीरा सलामी.

मा. महापौर : हा विषय मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रहेमानिया कॉलनी भागातील लहान चौकास अन्नु काका चौक असे नामकरण करण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०२/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद जिल्हा परिषदेप्रमाणे महानगरपालिकेच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांची थंब इंप्रेश्न यंत्रावर हजेरी नोंदविण्यात यावी, त्यामुळे महानगरपालिकेच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत खुप फरक पडेल व नागरिकांचे व लोक प्रतिनिधींचे कामे लवकर होतील करिता दोन थंब इंप्रेशन मशीन घेऊन त्यावर हजेरी नोंदविण्या करिता प्रस्ताव सादर.

सुचक : सलमा बानो मिर मो. अली
अनुमोदक : श्री. किशोर तुलशीबागवाले, श्री. काशिनाथ कोकाटे

मा. महापौर : हा विषय मंजुर करण्यांकत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद जिल्हा परिषदेप्रमाणे महानगरपालिकेच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांची थंब इंप्रेशन यंत्रावर हजेरी नोंदविण्यासाठी दोन थंब इंप्रेशन मशीन घेऊन त्यावर हजेरी नोंदविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०३/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका शिक्षण विभागात १९९२ पासुन बालवाडी शिक्षिका पदावर काही शिक्षिका कार्यरत आहेत. त्यांना ठराविक मानधन देण्यात येते. त्यांनी अंगणवाडी शिक्षिकांप्रमाणे वेतनश्रेणी देणे. बाबत बरेच विनंती अर्ज महानगरपालिकेत सादर केलेले आहेत. अत्यंत कमी मानधन मिळत असल्याने व त्यांची नेमणुक निवासस्थाना पासुन बऱ्याच दुर वरील शाळेवर असल्याने त्यांना शाळेत जाणे येणेसाठी अत्यंत गैरसोय होते. तसेच प्रवासावर बराच खर्च दरमहा करावा लागतो. अत्यंत कमी मानधनावर महागाईचे काळात त्यांना काम करणे अत्यंत त्रासाचे होत असुन मानधनात वाढत्या महागाई नुसार भरावे वाढ करणे बाबत त्यांनी विनंती केली आहे. बालवाडी शिक्षिकांची अत्यंत कमी मानधनामुळे होत असलेली गैरसोय विचारात घेता त्यांना मिळत असलेल्या मानधनात भरिव वाढ करणेसाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर श्री. रतनकुमार पंडागळे
अनुमोदक : श्री. अफसर खॉन, श्री. डॉ. भागवत कराड,
श्री. भगवान घडमोडे

चर्चा

श्री. डॉ. भागवत कराड : यापुर्वी रुपये ७००/- वरुन रुपये ९००/- केलेला होते. रुपये २००/- वाढ झालेली होती किती मानधन वाढवायचे यांचा प्रस्तावात उल्लेख नाही २००/- रुपये वाढवावे.

श्री. सुदाम सोनवणे : ३००/- रुपयेची वाढ करावी.

श्री. अफसर खान : १२००/- रुपये करण्यांत यावे.

सौ. लिलावती धायतिलक : ९००/- रुपये फारच कमी मानधन देण्यात येते. एवढया कमी मानधनामध्ये जाण्या येण्यासाठी सुध्दा खर्च करावा लागतो. परवडत नाही जि.प. मध्ये रुपये १५००/- देण्यांत येते. मनपाच्या बालवाडी शिक्षिकांना सुध्दा रुपये १५००/ देण्यात यावे.

श्री. प्रकाश निकाळजे : आर्थिक तरतुद आहे का, प्रशासनाचा खुलासा द्यावा.

श्री. मणिक साळवे : बालवाडी शिक्षिकाप्रमाणे बालवाडी सेविकांना सुध्दा मानधन वाढवुन देण्यात यावे.

मा. महापौर : बालवाडी शिक्षिका व बालवाडी सेविका यांना प्रत्येकी रुपये ३००/- ची वाढ करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार बालवाडी सिक्षिका व बालवाडी सेविका यांना प्रत्येकी रु. ३००/- प्रतिमाह मानधनात वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०४/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मनपा कर्मचाऱ्यांना या वर्षी दिपावली सनानिमित्तांनी पन्नास दिवसाचा बोनस देण्यांत यावे म्हणुन सदरील प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर करण्यांत येते.

सुचक : श्री. अफसरखॉन, श्री. रतनकुमार पंडागळे
अनुमोदक : श्री. आनंद तांदुळवाडीकर, श्री. गणेश तांबे

संवाद

श्री. डॉ. भागवत कराड : दिपावली निमित्त कर्मचाऱ्यांना बोन्स देण्याचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. महापालिकेचे कर्मचारी हे रात्रंदिवस काम करतात हे शहर स्वच्छ ठेवतात. आरोग्याच्या दृष्टीने महत्वाची सेवा कर्मचारी करतात. याबाबतीत प्रशासनाचे काय मत आहे ते जाणुन घ्यावे व बोनस देण्यास हरकत नसावी.

श्री. सुदाम सोनवणे : बोनसचा विषय आहे. सभागृहनेता विरोधी पक्षनेता यांनी ठेवला आहे. सभागृहाची प्रतिमा मलीन केली. महानगरपालिकेचे हे सर्वोच्च सभागृह आहे. सभागृहात मोर्चा आणावा हे योग्य नाही त्यांचे निवेदन स्विकारण्यासाठी त्यांना आपण या सभागृहात बोलविले हे बरोबर केलेले नाही. असे माझे वैयक्तिक मत आहे. अशी प्रथा पडल्यास नागरिक लहान-लहान प्रश्न घेवुन सभागृहापर्यंत येतील व यासभागृहाला कामकाज चालविणे अडचणीचे होईल. कर्मचारी आपले आहेत. प्रस्ताव आलेला होताच. निर्णय काही घेतला नसता तर त्यानंतर त्यांचे निवेदन स्विकारण्याची आवश्यकता होती, मोर्चाला सामोरे जाऊन बोनस देत नाही, ठराव होता म्हणुन देतो असे घोषित करावे.

श्री. तकी हसनखान : प्रस्तावात पन्नास दिवसांच्या बोनसची मागणी केलेली आहे. बजेट मध्ये तरतुद केलेली आहे का? १.५ कोटी द्यावे लागतील. शहर विकासासाठी ठेवलेले पैसे देणार असाल तर द्यावे, प्रशासनाचे मत घ्यावे.

श्री. प्रकाश निकाळजे : सालबादाप्रमाणे कर्मचाऱ्यांना दरवर्षी बोनस देण्याबाबतचा आपण निर्णय घेत असतो. मागच्या वर्षी शासनाने बोनस न देण्याचा निर्णय घेतलेला असतांना या सभागृहाच्या मान्यतेने कर्मचाऱ्यांना बोनस दिलेला होता. त्यावेळी डॉ. कराड हे महापौर होते. कर्मचारी रात्रदिवस स्वच्छतेची कामे करतात. पहाटे पाच वाजेपासुनच त्यांना कामावर जावे लागते. शहर स्वच्छ ठेवण्याचे काम या कर्मचाऱ्यांच्या हातुन होते. मानवतेचा दृष्टीकोन समोर ठेवुन या सभागृहाने सहानुभुतीपुर्वक विचार करुन या कर्मचाऱ्यांना दिलासा मिळेल या दृष्टीने बोनस देण्याचा हा प्रस्ताव मंजुर करावा. बोनस म्हणुन बजेट मध्ये टोकन अमाऊंट म्हणुन ५ लक्ष रुपये ठेवलेले आहेत. या सभागृहामध्ये ज्या सदस्यांनी ठराव ठेवलेले आहेत. या सभागृहातर्फे अभिनंदन करतो. ५०-६० दिवसांचा बोनस डिक्लेअर केला तरी कुणीही विरोध करणार नाही. प्रशासनाची सम्मती असेल तर ६० दिवसांचा बोनस देण्यास हरकत नाही.

श्री. स.सलीम स.युसुफ : जास्तीत जास्त बोनस देण्यात यावा.

श्री. अफसर खान : ४०-५० दिवसाचे, जितके शक्य आहे ते देण्यात यावे.

श्री. तकी हसनखान : प्रशासनाचा खुलासा घ्यावा. मुख्य लेखधिकाऱ्यांचे मत घ्यावे.

श्री. जयवंत ओक : ज्यांनी ठराव मांडला त्यांचे खरोखरच या सभागृहातर्फे अभिनंदन केले पाहिजे. प्रशासन किती दिवसांचा बोनस देऊ शकेल याबाबतीत मा. महापौर मा. सभापती (स्था. स.) मा आयुक्त तसेच मुख्य लेखाधिकारी यांनी एकत्रित बसुन निर्णय घेतल्यास योग्य होईल ठराव मंजुर करावा. त्यानंतर ठरवावे.

श्री.भगवान घडमाडे : अत्यंत महत्वांच्या व कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळयाच्या प्रश्नावर चर्चा होत आहे जी मागणी आहे. ती सर्वाच्या संम्मतीने मान्य करण्यास हरकत नाही. यात प्रशासनाचे मत सुध्दा महत्वाचे आहे.

श्री. माणिक साळवे : महापालिकेची आर्थिक परिस्थिती दरवर्षी पेक्षा चांगली आहे. पाणीपट्टी, तसेच जकात वसुलीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. कायम स्वरुपी कर्मचाऱ्यांना ५० दिवसांचा नाही तरी ३० दिवसाचा बोनस द्यावा व जे अस्थायी कर्मचारी आहेत त्यांना सानुग्रह अनुदान म्हणुन ३०००/- रु. देण्यात यावे.

श्री. स. अली मीरा सलामी : ८.३३% बोनस लागु करावा. जे अस्थायी कामगार आहेत त्यांना बक्षिस म्हणुन एक महिण्याचे वेतन देण्यात यावे.

श्री. रतनकुमार पंडागळे : जबाबदारीने प्रस्ताव ठेवलेला आहे. महानगरपालिकेच्या जकात तसेच पाणीपट्टी व मालमत्ता कराच्या वसुलीमध्ये गतवर्षीपेक्षा मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. बोनस देण्याबाबत हे सभागृह निर्णय घेवु शकते. तो या सभागृहाचा अधिकार आहे कर्मचारी आपले आहेत मानवतेच्या दृष्टीकोनातुन निर्णय घेण्यात यावा.

सौ. विजया राहाटकर : कर्मचाऱ्यांना बोनस दिल्यानंतर दिवाळी चांगल्या प्रकारे साजरी होते. असे मत सभागृहाचे झालेले आहे. जेव्हा बजेट मंजुर केले तेव्हा तरतुद केली असती तर आजच्या या ठरावास मंजुर करण्यास अडचण आली नसती. आता मंजुर केलेल तरी कोणत्या खर्चामधुन रक्कम कमी करुन देणार आहात याचा खुलासा करावा. गेल्या तीन वर्षापासुन बोनस दिला जात नाही व शासनाने सुध्दा बंद केलेले आहे. विकास कामे बंद ठेवुन बोनस दिला तर जनता या सभागृहाला माफ करणार नाही लेखाविभागामार्फत खुलासा व्हावा.

मा. महापौर : मुख्य लेखाधिकारी यांनी याबाबत खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : सन २००२-२००३ या चालु आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर याच सभागृहाने मंजुर केलेला आहे. बोनस देण्यासंबंधीची कोणतीही तरतुद अर्थसंकल्पात केलेली नाही. अर्थसंकल्पास पृष्ठ क्र. ८९ वर मंजुर दिलेली आहे. महानगरपालिकेने एकुण १२८ कोटींचा अर्थसंकल्प मंजुर केलेला आहे. गेल्या सहा महिन्यात ज्या गतीने वसुली व्हावयास पाहिजे. होती त्याप्रमाणे झालेली नाही. वसुली बाबतीत थोडक्यात माहिती सभागृहाला देऊ इच्छितो की, १२८.८६ कोटीचा अर्थसंकल्प या सभागृहाने मंजुर केलेला आहे. सप्टेंबर अखेर संपुर्ण वसुली त्यात जकात, पाणीपट्टी, मालमत्ता सुध्दा आहे. संपुर्ण वसुली ही रु. ४३.८८ कोटी झालेली आहे. बजेटच्या प्रमाणात ३५% वसुली झालेली आहे. पुढील ६ महिन्यात बाकीची वसुली करावयाची आहे. अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची तरतुद केलेली नसल्याने हा खर्च करता येणार नाही. असे मुख्यलेखाधिकारी म्हणुन खुलासा करीत आहे. सभागृह जो निर्णय घेईल तो मा. आयुक्तांच्या निदर्शनास आणुन देण्यात येईल. या वर्षी महापालिकेने वर्कवाईज बजेट

मंजुर केलेले आहे. यापुर्वीच २ कोटीची आणखी स्थायी समितीमध्ये प्रस्ताव आलेले आहे. अशा परिस्थितीत कामे कोठुन करायची व ही बोनससाठी लागणारी तरतुद कोठुन उपलब्ध करुन द्यायची हे ही सभागृहास ठरवावे लागेल.

श्री. नंदकुमार घोडेले : एकुण १२८ कोटीचे बजेट असुन फक्त आतापर्यंत ४३ कोटीची वसुली झालेली आहे. असे निवेदन मुख्य लेखाधिकारी यांनी केलेले आहे. परंतु सभागृहाच्या असे निदर्शनास आणुन देऊ इच्छितो की, मागिल काही दिवसापुर्वी वृत्तपत्रात अशा बातम्या प्रसिध्द झाला की, या महानगरपालिकेचे जकातीचे उत्पन्न हे विक्रमी होत आहे. विक्रमी उत्पन्न होत असेल तर आर्थिक टंचाई का भासत आहे. उत्पन्न जास्त प्रमाणात होत असेल तर अंदाजपत्रक कमी करायचे, बजेट कमी करायचे किंवा बोनस द्यायचा नाही हे कितपत योग्य होऊ शकते. विक्रमी वसुली असेल तर बोनस देण्याचा निर्णय घेण्यात यावा.

श्री. भगवान घडमोडे : स.स. श्री. घोडेले यांनी अत्यंत महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. एकीकडे विक्रमी वसुली होत आहे. अश्या बातम्या प्रसिध्द होत आहेत व अधिकारी खुलासा करतात की, आतापर्यंत ४३ कोटीच वसुली झाली आहे. ३० ते ३५% च वसुली होत आहे. विक्रमी उत्पन्न येत आहे. अशी बातमी वृत्तपत्रात येते. बोनसचा निर्णय सभागृहावर टाकायचा याचा अर्थ कामगार सभागृहामध्ये उद्या काही अडचण आली तर सभागृहाने निर्णय घेतला असे दाखवायचे व विक्रमी उत्पन्न जकातीचे होत आहे. अशा बातम्या देऊन अधिकाऱ्यांनी प्रसिध्दी मिळवायची हे कितपत योग्य आहे. असे ठरले होते की मा. महापौरांशिवाय कोणीही वृत्तपत्रात प्रसिध्दी द्यायची नाही. वृत्तपत्रात प्रसिध्दी कशी आली? मा. महापौरांनी परवानगी दिली होती का? हा मुद्या आहे. वसुली होत नसेल तर त्यास जबाबदार कोण आहे? त्यांच्यावर कार्यवाही करावी. उद्दीष्टाप्रमाणे वसुली का झाली नाही. याची सुध्दा चौकशी होणे गरजेची आहे. प्रसिध्दी देणे हे अधिकाऱ्यांचे काम नाही. पदाधिकाऱ्यांनी दिली असती तर समजुन घेतले असते अधिकारी प्रसिध्दी मिळवीत असेल तर अत्यंत चुकीचे आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : बजेट मंजुर केले तेंव्हा वसुलीच्या संदर्भात ३-३ महिन्याला आढावा बैठका घेणार होते. बैठक का घेण्यात आलेली नाही?

श्री. स.अली मीरा सलामी : ४३ कोटीच वसुली झालेली आहे. गेल्या आर्थिक वर्षात या कालावधीपर्यंत किती टक्के वसुली झालेली होती?

मुख्यलेखाधिकारी : ती आकडेवारी माझ्याकडे सध्या उपलब्ध नाही. ती नंतर उपलब्ध करुन देण्यांत येईल आताच काही सदस्यांनी मत मांडले की, मागील वर्षी बोनस दिला होता परंतु मागील वर्षी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. कर्मचाऱ्यांना बोनस दिलेला नाही. मागील वर्षाचे दिनांक २१-१०-२००१ च्या सभेचे जे इतिवृत्त आहे. त्यानुसार फक्त शासनास कळविलेले होते की, संघटनेची अशी मागणी आहे. मागील वर्षी बोनस दिला नव्हता फक्त कर्मचाऱ्यांना सणाच्या अग्रीम म्हणुन रु. १५००/- व अस्थायी कर्मचाऱ्यांना अग्रीम म्हणुन रु. १०००/- दिलेले होते. सदर रकमा कपात करुन घेण्याच्या अटीवर दिलेल्या होत्या हा निर्णय मा. महापौर विकास

जैन, मा. प्रशांत देसरडा, मा. संजय शिरसाठ, मा. शर्मा साहेब याचे समक्ष झालेला होता.

श्री. स.अली मिरा सलामी : मागील वर्षी ऑक्टोंबर पर्यंत ३४ कोटीची वसुली झालेली होती अशा माझी माहिती आहे. आणि यावर्षी फक्त ४३ कोटीच वसुली ऑक्टोंबर पर्यंत झालेली आहे. याचा अर्थ आठ कोटीचा फरक येत आहे. ५ ते ६ वर्षापासुन अशी परिस्थिती दिसते की, जे टारगेट ठेवले जाते तेवढी वसुली होत नाही. मार्च माहिण्या जास्त म्हणजेच ३०% वसुली होते. आतापर्यंत ३०-३५% वसुली झालेली आहे. ७०% वसुली प्रमाणकानुसार ३०% वसूली होते. सुरुवातीपासुन वसुली प्रमाणकानुसार केल्यास अशा बोनसच्या प्रश्नावर विचार करुन निर्णय घेण्यास वेळ वाया गेला नसता.

श्री. मणिक साळवे : गत वर्षी पेक्षा महानगरपालिकेचे जकात, पाणीपट्टी व मालमत्ता वसुलीत वाढ झालेली आहे. महापालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. कायम स्वरुपी कर्मचाऱ्यांना तीस दिवसांचा बोनस तसेच जे अस्थायी कामगार त्यांना किमान २००० रु. देण्यांत यावे.

श्री. भगवान घडमोडे : बोनस द्यायचे की नाही ही जबाबदारी प्रशासनाची आहे. वसुली करावयास पाहिजे. जे अधिकारी वसुली करणार नाहीत. त्यांचेवर कार्यवाही करावी. बोनस न देण्यास प्रशासन जबाबदार आहे. पदाधिकारी, नगरसेवक जबाबदार नाहीत.

श्री. काशिनाथ कोकाटे : प्रस्तावाचे सुचक व अनुमोदक हे सर्व पदाधिकारीच आहेत. प्रस्ताव ठेवत असतांना अभ्यास पुर्वक ठेवलेला असावा असे माझे मत आहे. वेगवेगळया सुचना सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या आहेत. बोनस द्यावा असे मत बऱ्याच सदस्यांनी मांडलेले आहे. म्हणुन गेल्या वर्षा बोनस दिला गेला नाही तरी यावर्षी जकात तसेच मालमत्ता कर वसुलीच्या माध्यमातुन प्रभावी मोहिम राबवुन जास्तीत जास्त वसुली करावी या महानगरपालिकाचे कर्मचारी ज्या उद्देशाने काम करतात त्यांची भावना लक्षात घेवुन मानवतेच्या दृष्टीने विचार करुन त्यांना बोनस देण्याचा निर्णय घेण्यात यावा.

श्री. प्रकाश निकाळजे : पदाधिकाऱ्यांनी प्रस्ताव ठेवलेला आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव या सर्व पदाधिकाऱ्यांना असावी म्हणुनच हा प्रस्ताव ठेवलेला आहे. आताच स.स.श्री. साळवे यांनी कायम स्वरुपी कर्मचाऱ्यांना तीन दिवसांचा बोनस तसेच अस्थायी कर्मचाऱ्यांना २०००/- रु बक्षिस म्हणुन मागणी केली त्या मान्यता द्यावी. अशी सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

श्री. भागवत कराड : आपण निर्णय घेतला तर प्रशासनाने सुध्दा त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे. तशा सुचना प्रशासनास देण्यात याव्यात.

श्री. रतनकुमार पंडागळे : या सभागृहाला स्वायत्तता आहे. आपण या स्वयात्ततेचे आत्मापरिक्षण केले नाहीतर यानंतर एकही ठराव हे प्रशासन मानणार नाही. सभागृहाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाने केली पाहिजे. गतपर्षापेक्षा यावर्षी आर्थिक परिस्थिती चांगली आहे. व बजेट मध्ये सुध्दा मी स्वतः सुचना करुन ५ लक्ष रुपयांची टोकन अमांऊट ठेवण्यास भाग पाडलेले आहे. व तशी तरतुदही केलेली आहे. या सभागृहाला स्वायत्तता आहे. सभागृहाने जो निर्णय घेतला तो अंमलात आणावा अशा सुचना प्रशासनास द्याव्यात.

मा. महापौर : स. सदस्यांनी आपआपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्याच्या भावना लक्षात घेवुन कर्मचाऱ्यांना ३० दिवसांचा बोनस देण्यात यावा.

श्री. भगवान रगडे : आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छतेचे काम कर्मचारी करतात. ठरावनुसार मान्यता देण्यात यावी. वारंवार असे सांगण्यात येते की, विक्रमी उत्पन्न होते परंतु तसे काहीही नाही. वृत्तपत्रात बातम्या कशा येतात याबाबतीत प्रशासनाने सुध्दा लक्ष दिले पाहिजे. निर्णय व धोरण याबाबत महापौरानीच घोषित करावे अशी माझ्या मते मुख्यमंत्र्यांची सुध्दा घोषणा होती. ज्या बातम्या मागील काळात वृत्तपत्रात आलेल्या होत्या त्याबाबतीत प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी आणि आताच मुख्य लेखाधिकारी यांनी तरतुद कशी करायची हा मुद्दा मांडला. परंतु कर्मचाऱ्यांचा विचार करुन आपण हा निर्णय घेतलेला आहे. संबंधीत महसुली उत्पन्नाचे जे जे अधिकारी आहेत. त्यांनी वसुलीच्या बाबतीत प्रयत्न केले तर १००% वसुली होऊ शकेल व बोनसचा जो आर्थिक भार पडणार आहे तो भरुन निघेल तसेच चालु वर्षामध्ये वर्कवाईज बजेट मध्ये नमुद केलेली कामे रद्द न करता जुनी थकबाकी वसुली करुन भरती करावी. जकात, पाणीपट्टी मालमत्ता कर त्यांची विक्रमी वसुली करावी व या विक्रमी वसुलीतुन देतात असे गृहीत धरावे.

श्री. माणिक साळवे : आपण सर्वांना मिळुन निर्णय घ्यावयाचा आहे. प्रशासन अंमलबजावणी करेल. आपण आदेश द्यावयाचे. उत्पन्न वाढवावे, बदल्या करण्यात याव्यात दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना रु. १५००/- सानुग्रह अनुदान द्यावे.

मा. महापौर : दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना रु. १५००/- सानुग्रह अनुदान व कर्मचाऱ्यांना ३० दिवसांचा बोनस मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या निर्णयानुसार महापालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना ३० दिवसांच्या पगारा इतका बोनस व दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना रु. १५००/- सानुग्रह अनुदान देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०५/७ :**

प्रभाग क्र. ५५ इंदिरानगर दक्षिण मधील नागरिकांना चोकअप झालेले ड्रेनेज, तुंबलेल्या गटारी, अतिश्चत व अपुरा पाणीपुरवठा, खडयांमधील रस्ते, चिखलमय गल्ल्या, बंद पथदिवे या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सफाई कामगारापासुन या आयुक्तांपर्यंत सर्वच कर्मचारी व अधिकाऱ्यांना या संबंधी अनेक तक्रारी करण्यात आल्या.

करिता प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभागातील काही क्षेत्राचा न्यायालयीन वाद सुरु असल्यामुळे "जैसे थे" स्थिती ठेवण्याचा आदेश मा. न्यायालयाने दि. ०५-०८-२००० रोजी दिला आहे. न्यायालयीन वाद काही क्षेत्राचा आहे मात्र महानगरपालिका अधिकारी विकास कामे करण्यास टाळाटाळ करित आहे. ज्यामुळे येथील नागरिकांना नागरी सुविधा पासुन वंचित राहावे. लागत आहे नागरिकांना सुविधा पासुन वंचित राहावे लागत आहे. न्यालयीन आदेशाने प्रभावीत होणारे क्षेत्र वगळुन उर्वरित भागात विकास कामे त्वरील सुरु करण्यात यावीत. तसेच सुमोरे पाच वर्षापासुन प्रलंबित असलेल्या या प्रकरणात महानगरपालिकेतर्फे न्यायालयात रुजु होणारी सुविधा देण्यासंबंधी मा. न्यायालयाकडुन काही अटी वर विकास कामे सुरु करण्यास परवानगी मिळावावी. तसेच विधी विभागाने या

प्रकारणी कार्यक्षम वकीलाची नियुक्ती करुन त्वरीत हे प्रकरण निकाली निघावे यासाठी प्रयत्न करावे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.

सुचक : श्री. अब्दुल कदीर (मौलाना) सय्यद
अनुमोदक : श्री. शेख ईसाक जैनोद्दीन शेख

मा. महापौर : सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र. ५५ इंदिरानगर दक्षिण भागातील काही क्षेत्रात मा. न्यायालयीन "जैसे थे" स्थिती ठेवण्याचा दिनांक ०५-०८-२००० रोजी आदेश झालेले आहे. या आदेशाने प्रभावित होणारे क्षेत्र वगळुन उर्वरित भागात विकास कामे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच या भागातही विकास कामे करण्यास या न्यायालयाची परवानगी मिळावी यासाठी महानगरपालिकेकडुन कार्यक्षम वकिलाची नियुक्ती करण्यास व हे प्रकरण लवकर निकामी काढण्यासाठी प्रयत्न करावे यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *"ऐन वेळचे विषय"*

मा. महापौर : ऐन वेळचे सर्व विषय मंजुर करण्यात येत आहेत.

**विषय क्र. ७०६/१ :**

औरंगाबाद शहर विकास योजना वाढवि हद्दीतील मौजे मुस्ताफाबाद येथील सर्व्हे नं. ३ पैकी जमीन औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढवि हद्द) नुसार आरक्षण क्र. ८ व ९ पैकी अनुक्रमे प्राथमिक शाळा व क्रिडांगण दोन्ही आरक्षण एकुण क्षेत्र ८००० चौ.मी. अंदाजे याने बाधीत होते.

या जागेसाठी संबंधीत मिळकत धारक मेसर्स एस. डेव्हलपर्स यांनी एम.आर. ॲण्ड टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिली होती. त्याबाबत महानगरपालिका प्रशानाने जागा भुसंपादन करण्यासाठी सर्वसाधारण सभेने माहिती मागविण्यासाठी स्थगित ठेवला होता. हा ठराव न घेता सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकाऱ्याकडे प्रशासनातर्फे कायद्याच्या बंधनामुळे पाठवुन दिला मात्र ही कार्यवाही नियमान धरुन नाही. विकास योजनेतील आरक्षणाची जागा खरेदी करण्यासाठी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे मिळकत धारकाची जागा आरक्षणातुन वगळण्यात यावी. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. नंदकुमार घोडेले
अनुमोदक : श्री. आनंद तांदुळवाडीकर
श्री. संजय सिरसाठ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर विकास योजनेनुसार वाढवी हद्दीतील मुस्ताफाबाद येथील सर्व्हे नं. ३ पैकी आरक्षण क्र. ८ व ९ अनुक्रमे प्राथमिक शाळा व क्रिडांगण या आरक्षणाने बांधीत क्षेत्र अंदाजे ८००० चौ.मी. जागा आरक्षणातुन वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०७/२ :**

औरंगाबाद शहर विकास योजना वाढवि हद्दीतील मौजे कांचनवाडी सर्व्हे नं. ११ क्षेत्र ६ एकर २९ गुंठे ही जागा आरक्षण क्र. एस-२ इ क्रिडांगण याने बाधीत होते या जागोसाठी संबंधीत मिळकत धारकांनी महानगरपालिकेला एम.आर. ॲण्ड टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम १२७ अन्वयेक खरेदी सुचना दिली होती. त्याबाबत म.न.पा. प्रशासनाने जागा भुसंपादन करण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी ठराव ठेवला असता तो सर्वसाधारण सभेने माहिती मागविण्यासाठी स्थागित ठेवला होता हा ठराव न घेता सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकाऱ्याकडे प्रशासनातर्फे कायद्याच्या बंधनामुळे पाठवुन दिला मात्र ही कार्यवाही नियमास धरु नाही. मा. जिल्हाधिकारी यांचे कडुन सुध्दा ३/४ रक्कम भरल्याशिवाय पुढील कार्यवाही करण्यात येणार नाही असे सुचित केले गेले आहे. परंतु मनपाची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने मिळकत धारकांची आरक्षित जागा आरक्षणातुन वगळण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. नंदकुमार घोडेले, श्री. अफसर खॉन
अनुमोदक : श्री. भगवान घडमोडे, श्री. रतनकुमार पंडागळे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर विकास योजना वाढवि हद्दीतील मौजे कांचनवाडी सर्व्हे नं. ११ क्षेत्र ६ एकर २९ गुंठे ही जागा आरक्षण क्र. एस-२ इ क्रिडांगण याने बाधीत जागा या आरक्षणातुन वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०८/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, एन-८ महानगरपालिका आरोग्य केंद्रास स्वातंत्र्यवीर सावरकर नांव देण्यासाठी असंख्य नागरिकांची वारंवार मागणी होत आहे. करिता नागरिकांच्या मागणीच्या विचार करता सदरील आरोग्य केंद्रास स्वातंत्र्यवीर सावरकर आरोग्य केंद्र महानगरपालिका औरंगाबाद असे नांव देण्यांत यावे.

सुचक : श्री. नंदकुमार फुलारी, श्री. सुदाम सोनवणे
अनुमोदक : श्री. रतनकुमार पंडागळे, श्री. आनंद तांदुळवाडीकर,
श्री. भरत लकडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-८ येथील महानगरपालिका आरोग्य केंद्रास स्वातंत्र्यवीर सावरकर नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०९/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, जिल्हा पातळीवरील कराटे स्पर्धा या सन २००२ या आर्थिक वर्षातुन महापौर चषक क्रिडा स्पर्धा या लेखा शिर्षा अंतर्गत घेण्यात याव्या. प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर
अनुमोदक : श्री. भरत श्रीपती लकडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिल्हा पातळीवरील कराटे स्पर्धा या सन २००२ या आर्थिक वर्षातुन महापौर चषक क्रिडा स्पर्धा या लेखा शिर्षा अंतर्गत घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१०/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, औरंगाबाद शहरात मंजुर विकास योजना (सुधारित) प्रमाणे आरक्षण क्र. ११८ क्रिडांगणासाठी ठेवण्यात आलेले आहे. या आरक्षणाला लागुनच पश्चिमेला आरक्षण क्र. ३४८ स्टेडियमसाठी आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. सदर क्रिडांगणाच्या आरक्षणाखालील संपुर्ण जमीन विकसीत झालेली असुन निवास व वाणिज्य वापर चालु आहे. सदर क्रिडांगणाच्या आरक्षणा लगतच स्टेडियमसाठी म.न.पा. भु-संपादन व विकास प्राधीकरण आहे. स्टेडियमच्या आरक्षणात क्रिडांगणाचा वापर अनुज्ञेय होत असल्याने त्या ठिकाणी क्रिडांगणाची आवश्यकता भासत नाही. तसेच म.न.पा. कडे भु-संपादनासाठी पुरेशी आर्थिक तरतुद नाही.

तरी सदर आरक्षणाखालील जमीन क्रिडांगणाच्या आरक्षणातुन वगळुन निवास भागात सामील करण्यात यावी व त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल कार्यवाही करण्यास व या संबंधीची संपुर्ण कार्यवाही करुन शासनास सादर करण्याचे संपुर्ण अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक : श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
अनुमोदक : श्री. स.सलीम स. युसुफ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात मंजुर विकास योजना (सुधारित) प्रमाणे आरक्षण क्र. ११८ क्रिडांगणा खालील जमीन आरक्षणातुन वगळुन निवास भागात सामील करण्यास व त्यासाठी म. प्रा. व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाची कार्यवाही पुर्ण करण्यास तसेच या संबंधीची आवश्यक ती सुपर्ण कार्यवाही करुन किरकोळ फेरबदलाचा प्रस्तावशासनास सादर करण्याचे संपुर्ण अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७११/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, औरंगाबाद शहरात मंजुर विकास योजने (१९९१) राजमार्ग सातारा रोड बाजुचा व सिडकोने त्यांच्या अधिनिगृहीत केलेल्या जमीनीपैकी ज्या सोडुन दिलेल्या आहेत (डी नोडीफाईड) हया जमीनीवर अनधिकृत विकास होत आहे. तसेच मुकुंदवाडी रेल्वे स्टेशनही हया भागात विकसित होत आहे. हया विकासाचा भाग हा महानगरपालिकेच्या हद्दीत असुनही महानगरपालिकेस हयाचा आर्थिक फायदा होत नाही तेथील विकास हा वेडावाकडा होऊन सार्वजनिक आरोग्यास धोकादायक होत चालला आहे तरी या भागासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने विकास योजना करुन त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. हयात सिडकोने (डी नोटीफाईड) केलेल्या महानगरपालिकेतील सर्व जमीनी तसेच सातारा रोड लगत असलेल्या जमीनी ज्या की शेंद्रा

या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीच्या विकासामुळे अनधिकृत घरांच्या वस्त्यांनी विकसित होत चालेलेल्या आहेत. तरी सातारा रोड या राजमार्ग लगत असलेल्या अनधिकृत विकासास थांबविण्यासाठी या रस्ता लगत असलेल्या महानगरपालिका हद्दीतील मुकुंदवाडी गट नं./सर्व्हे नं. ४२,४३,४४ मुर्तुलापुर गट नं./सर्व्हे नं. २२,२३,२४ व चिकलठाणा भागातील गट नं./ सर्व्हे नं. ६११ ते ६२४,६४३ ते ६४९,६५१ ते ६५३ हे निवासक्षेत्रात घेऊन त्याची विकासा योजना लवकरात लवकर करुन अनाधिकृत विकास व महानगरपालिकेचे होणारे आर्थिक नुकसान थांबविणे अत्यंत आवश्यक आहे. करिता त्यासाठी त्वरीत कार्यवाही करणे योग्य. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर
अनुमोदक : सौ. कचराबाई लोखंडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सिडको अधिसुचित क्षेत्रातुन डिनोटीफाईड झालेले क्षेत्र, मुकुंदवाडी गट नं./सर्व्हे नं. ४२ ते ४४ मुर्तुलापुर गट नं./सर्व्हे नं. २२,२३,२४ व चिकलठाणा भागातील गट नं./ सर्व्हे नं. ६११ ते ६२४,६४३ ते ६४९,६५१ ते ६५३ या भागास निवास क्षेत्रात सामिल करुन या क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१२/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, माझ्या वार्डातील शहागंज भागातील नागरिकांची बऱ्याच दिवसापासुनची मागणी आहे की, शहागंज निजामुद्दीन चौकातील परिसरात हायमास्ट बसविण्यात यावा. कारण या परिवारातुन सर्व धर्माच्या मिरवणुका निघत असतात. करिता येथील नागरिकांची मागणी लक्षात घेता सदरील ठिकाणी हायमास्ट त्वरीत बसविण्याकरिता सदरील प्रस्तावास मान्यता देण्यांत यावी.

सुचक : श्री. कैसरखान बद्रोद्दीनखान
अनुमोदक : श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,शहागंज निजामुद्दीन चौकातील परिसरात हायमास्ट बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१३/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, विजया दशमी दिनी औरंगाबाद शहरात असलेल्या बुध्द लेणी परिसरात फार मोठया प्रमाणात भाविकांची गर्दी होते व आंबेडकर नगर येथील व्ही.आय.पी. रोडवरील असलेल्या चौकात दोन्हीही ठिकाणी हायमास्ट लावण्यात यावा.

सुचक : श्री. भगवान रगडे
अनुमोदक : सौ. शंकुतलाबाई इंगळे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बुध्द लेणी परिसरात आंबेडकर नगर येथील व्ही.आय.पी. रोडवरील असलेल्या चौकात दोन्हीही ठिकाणी हायमास्ट लावण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१४/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, मो. शाहाबाजार सीटीएस नं. १०८७१/१७ येथे गौरी शंकर कॉलनी लगत म.न.पा. ने खाजगी जागेवर मुताऱ्या/शौचालय बांधले आहे. जे याबाबत खाजगी मालकास कसल्याही प्रकारचा मोबदला देण्यात आलेला नाही व ही जागा मनपाच्या कोणत्याही आरक्षणाखाली नाही म्हणुन मोबदला देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही म्हणुन सदरील मुताऱ्या सार्वजनिक शौचालय तोडुन ताबडतोब सदर जागा खाजगी मालकीच्या ताब्यात देण्यात यावी. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. शेख मुनाफ, सौ. सुलताना बेगम चाँदखाँ,
श्री. अशफाक सलामी, श्री. इलियास किरमानी

अनुमोदक : श्री. गाजी सादोद्दीन, सौ. निखत परविन ईजाज अली

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. शाहाबाजार येथे गौरी शंकर कॉलनी लगत सीटीएस नं. १०८७१/१७ येथे महानगरपालिकेने खाजगी जागेवर बांधलेले मुताऱ्या/शौचालय तोडुन सदर जागा त्या मालकांच्या ताब्यात देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१५/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, महानगरपालिकेतील शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी व महानगरपालिकेच्या शाळेतील मुलांची गळती थांबवण्यासाठी उपयायोजना करणे आवश्यक आहे. या अंतर्गत प्रायोगिक तत्वावर ५ शाळांचे खाजगी शिक्षण संस्थेमार्फत व्यवस्थापन ठेवुन शाळा चालवणेचा प्रयोग करण्यात यावा. साधारणतः या शाळेवर शिक्षक कर्मचारी व कामगार हे महानगरपालिकेचेच राहतील. अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा महानगरपालिकेचाच असेल, शिक्षण व शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी खाजगी शिक्षण संस्थेमार्फत व स्वयसेवी संस्था पर्यवेक्षण व व्यवस्थापन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अंबादास दानवे

अनुमोदक : श्री. आनंद तांदुळवाडीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतील शाळांचा शैक्षणिक दर्जा/ उंचावण्यासाठी प्रायोगिक तत्वावर खाजगी शिक्षण संस्था व स्वयंसेवी संस्थे मार्फत शाळांचे पर्यवेक्षण व व्यवस्थापन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते तसेच शिक्षक, कर्मचारी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते तसेच शिक्षक, कर्मचारी व कामगार हे महानगरपालिकेचेच असतील आणि अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे राहील यास अधिन राहुन या प्रस्तावास सर्वानमुते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१६/११ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ट ४ खालील भाग ३ चे नियम क्र. २१ अन्वये मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ चे कलम ४ पोटकलमे २ व ५ नुसार पुणे शहर नगरपालिका शाळा मंडळ स्थापन करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ चे प्राधिकृत नगरपालिकेच्या प्रत्येक क्षेत्रासाठी एक नगरपालिका शाळा मंडळ असेल अशी तरतुद आहे. त्याच धरतीवर औरंगाबाद महानगरपालिका शाळा मंडळ स्थापन करण्यात यावे व त्यासाठी सदर अधिनियमान्वये आवश्यक असलेल्या बाबीची पुर्तता करुन नगरपालिका शाळा मंडळ तातडीने सुरु करण्याबाबत आणि या संबंधी कराव्या लागणाऱ्या कार्यवाहीचे सर्व अधिकार मा आयुक्त यांना प्रदान करण्यास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुररीस्तव सादर.

सुचक : श्री. अंबादास दानवे
अनुमोदक : श्री. आनंद तांदुळवाडीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी महानगरपालिका शाळा मंडळ स्थापन करण्यांस व त्यासाठी आवश्यक असलेल्या बाबीची पुर्तता करुन मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ अन्वये महानगरपालिका शाळा मंडळ सुरु करण्या बाबातचे आणि या संबंधी कराव्या लागणाऱ्या कार्यवाहीचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१७/१२ :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करतात की, पैठण गेट येथील नगर भुमापन क्रमांक १३९१४ व १३९१५ च्या दक्षिणेस असलेल्या महानगरपालिकाच्या जागेत शासनाकडुन प्राप्त झालेल्या अनुदानातुन इ.स. १९८३ साली शुल्क शौचालयाचे बांधकाम करण्यात आले होते. सदरील भागात शहरांच्या विकासाबरोबरच नागरिकांनी आपआपल्या घरात शौचालय बांधले व वरील शौचालयाचा नागरिकांनी उपभोग घेणे बंद केल्यामुळे आणि या भागातील मुलांसाठी जवळपास मनपाची प्राथमिक शाळा नसल्यामुळे स नगर सेवकांनी सुलभ शौयालय पाहुन त्याठिकाणी प्राथमिक शाळा बांधण्यासाठी प्रशासनाकडे विनंती केली. उपरोक्त मागणी आणि तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी देखील या ठिकाणी प्राथमिक शाळा बांधण्यासाठी अनुकुलता दर्शविल्यानंतर शहर अभियंता विभागातर्फे मनपातर्फे कामाचा आराखडा नियुक्त वास्तुशा-स्त्रज्ञ यांच्या कडुन तयार करुन घेण्यात आला. सदर कामास तत्कालीन आयुक्तांनी मंजुरी दिल्यानंतर सुलभ शौचालय तोडुन प्राथमिक शाळा बांधण्याच्या कामास सर्वसाधारण सभा दिनांक १९-०१-२००१ रोजी ठराव क्र. २०९/२ अन्वये रक्कम रु. २१,१८,३८२/- यास मंजुरी दिली.

त्यानंतर कामाच्या रितसर निविदा काढुन कामाच्या गुत्तेदाराची नियुक्ती करण्यात आली. त्यानुसार सुलभ शौचालय पाडुन प्राथमिक शाळा बांधण्याचे बांधकाम सुरु करण्यात आले. अंदाजे रक्कम रु. ३,२५,०००/- चे काम झाल्यानंतर या भागातील नागरिकांनी

उपरोक्त प्राथमिक शाळेचे बांधकाम हे औरंगाबाद शहराच्या मंजुर विकास आराखडयातील ४० फुट रुंद रस्त्यामध्ये बाधीत होत असल्या बाबतची तक्रार केलली. उक्त तक्रारी प्राप्त होताच सदरहु इमारतीचे बांधकाम थांबविण्यात आलेले आहे व सध्या उक्त इमारतीचे काम बंद आहे. सदर तक्रार प्राप्त झाल्यानंतर मा. सहाय्यक संचालक नगररचना यांच्या तर्फे जागा पाहाणी होऊन त्यांनी अहवाल दिला की, पैठण गेट जवळील वाहनतळ व शॉपिंग सेंटर लगत असलेल्या प्रस्ताविक १२ मीटर विकास योजना रस्त्याने मनपातर्फे बांधण्यात येत असलेली शाळेची इमारत अंशतः बाधीत होत आहे व बाधीत होणारे क्षेत्र चौ.मी. एवढे आहे व शाळेचे बांधकाम हे मनपातर्फे यापुर्वी मनपाचेच अस्थितत्वातील संडास तोडुन बाधंकाम होत असल्यामुळे बांधकामाच्या जागेच्या बाबत वाद नव्हता.शाळेचे बांधकाम हे मनपा करीत असल्यामुळे व त्यावर होणारा खर्च लक्षात घेता सहाय्यक संचालक नगर रचना यांनी मा. आयुक्तांकडे प्रस्ताव सादर केला की, शाळेचे बांधकाम ज्या रस्त्यात बाधीत होते तो प्रस्ताविक विकास योजना रस्ता आहे. या रस्त्याची आखणी पाहता हा रस्ता अनधिकृत वस्ती वरुन जात आहे. तसेच पैठण गेट वाहनतळ व शॉपिंग सेंटर या मधील ग्राऊंड लेव्हलमध्ये बरीच तफावत आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्टया हा रस्ता होण्यास अडचण असुन त्यांच्या बांधकामास लागणारा खर्चही बराच मोठा होईल, त्यामुळेच अनधिकृत पसऱ्याहुन जाणारा हा रस्ता १९७५ च्या मंजुर विकास योजनेतील असुनही तो आजपर्यंत मनपातर्फे विकसित करता आला नाही व त्याची निकडही भासली नाही. त्यामुळे मनपाची प्रस्ताविक शाळा व शॉपिंग सेंटर यामध्ये अस्तित्वात असलेला ६ मीटर रुंद रस्त्याची रुंदी १२ मीटर करुन त्यासाठी लागणारी जास्तीची ६ मीटर रुंद जागा ही मनपाच्या मालकीची असल्याने त्यांची आखणी बदलणे शक्य आहे. तसेच मनपाच्या प्रस्ताविक शाळेचे बांधकाम पुर्ण करण्याच्या दृष्टीकोनातुन महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रस्त्या आखणी बदलण्यात विकास योजनेत गौण फेरबदल करण्यास मा. सहाय्यक संचालक नगररचना तर यांनी शिफारस केली आहे.

मा. सहाय्यक संचालक नगररचना यांनी केलेल्या उपरोक्त शिफारशीस मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. तसेच प्राथमिक शाळेचे नियोजन करतांना इमारतीचे शहर विकास योजनेनुसार विचार न केल्या बद्दल सर्व संबंधीत अधिकारी व कर्मचारी आणि वास्तुशास्त्रज्ञ यांच्यावर कारणे दाखवा नोटीस बजावुन सविस्तर खुलासे मागविणे बाबत आदेशित केले आहे.

मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यानंतर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नगरभुमापन क्रमांक १३९१४ व १३९१५ च्या आणि प्रस्तावित प्रा. शाळेच्या उत्तरेतुन अस्तित्वातील ६ मीटर रुंद रस्ता हा ८८ मीटर इतक्या लांबीमध्ये १२ मीटर करणे आणि मंजुर शहर विकास आराखडयातील प्रस्तावित १२ मीटर रुंद हा १०२ मी. इतक्या लांबीमध्ये रद्द करुन केल्यामुळे उपलब्ध झालेल्या जागेचा समावेश रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करणे यांची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये, गौण फेरबदलाची कार्यवाही करण्यासाठी मा. आयुक्तांना अधिकार प्रदान करण्यात यावेत. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नगरभुमापन क्रमांक १३९१४ व १३९१५ च्या आणि प्रस्तावित प्रा. शाळेच्या उत्तरेतुन अस्तित्वातील ६ मीटर रुंद रस्ता हा ८८ मीटर इतक्या लांबीमध्ये १२ मीटर करणे आणि मंजुर शहर विकास आराखडयातील प्रस्तावित १२ मीटर रुंद रस्ता हा १०२ मी इतक्या लांबीमध्ये रद्द करुन रस्त्यांच्या आखणीमध्ये बदल झाल्यामुळे

आणि १२ मीटर रुंद रस्त्याची आखणी काही हद्दीपर्यंत रद्द केल्यामुळे प्रस्तावित रस्त्याच्या आखणी नंतरचा भाग रहिवासी रचना क्षेत्रात समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये, गौण फेरबदलाची कार्यवाही करण्यास आणि सदर प्रकरणी अधिसुचना काढणे, सुणावणी देणे, व परिपुर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१८/१३ :**

महानगरपालिकेने बेगमपुरा आमदार निधी खर्च करुन व्यायाम शाळा बांधलेली आहे. सदर व्यायाम शाळा कहार समाज क्रिंडा मंडळाचे पदाधिकाऱ्यांनी चालविणेसाठी देणे बाबत मागणी केली आहे. कहार समाज क्रिडा मंडळ हे पंजीकृत क्रिडा मंडळ असुन या मंडळास ही व्यायाम शाळा चालविणेसाठी देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर
अनुमोदक : श्री. जगदीश सिध्द, श्री. चंद्राशेखर जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बेगमपुरा भागात महानगरपालिकेने आमदार निधीमधुन खर्च करुन बांधलेली व्यायाम शाळा कहार समाज क्रिंडा मंडळाचे पदाधिकाऱ्यांना चालविणेसाठी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१९/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, आपल्या महानगरपालिकेत कामगार कर्मचारी स्वच्छता ठेवण्यासाठी आहोरात्र जिवाची पर्वा न करता व शरीराच्या आरोग्याची पर्वा न करता काम करतात दिवाळी हा सण संपुर्ण देशात मोठया उत्साहाने साजरा होतो आपल्या महानगरपालिकेची आर्थिक सुधारणा झाली आहे कामागाराच्या आर्थिक बाबतीचा विचार करुन किमान ५० दिवसाचा बोनस व दैनिक वेतनावरील कामगारांना किमान रुपये २०००/- मानधन देण्यात यावे. करिता सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवुन मंजुर करण्यांत यावा.

सुचक : श्री. राधाकृष्ण गायकवाड, श्री. भगवात रगडे
अनुमोदक : श्री. नंदकुमार घोडेले, श्री. अफसर खॉन यासीन खॉन,
श्री. कैसरखान बद्रोद्दीन खॉन, श्री. भरत लकडे

**ठराव :**

प्रस्ताव क्र. ७०४/६ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.

**विषय क्र. ७२०/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शहरातुन पैठणकडे जाणारा महत्वपुर्ण असा पैठणरोड वरील चक्रधर स्वामी चौक महानुभव अश्रम जवळ या ठिकाणी बरीच वर्दळ आहे. रात्री अंधार असता. अत्यंत महत्वपुर्ण असा हा चौक आहे.

नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने या चौकाचे सौदर्यीकरण करुन या ठिकाणी "हायमास्ट" चे जे टेंडर आहे त्यांच्या बचतीतुन ठिकाणी हायमास्ट (२० मी. उंचीचा) बसविण्यात यावा करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. नंदकुमार घोडेले
अनुमोदक : श्री. अब्दुल रशिद, श्री. भरत लकडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातुन पैठणकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्यावरील चक्रधर स्वामी चौक येथे २० मीटर उंचीचा हायमास्ट बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२१/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने वारंवार दुध तपासणी केली जाते ही कार्यवाही गतीशील व लवकर करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेची स्वतःची (Mobile) प्रयोग शाळा व फिरते दुग्ध तापासणी पथक लवकरच स्थापन करणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. नंदकुमार घोडेले, श्री. भरत लकडे
अनुमोदक : श्री. चंद्रशेखर जैस्वाल, श्री. सोपान पारे, श्री. गणेश तांबे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेची स्वतःची (Mobile) प्रयोग शाळा व फिरते दुग्ध तापासणी पथक स्थापन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२२/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एन-११ स्मशान भुमीत मुक्तीधाम स्मशान भुमी असे नांव देण्यात यावे.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. भाऊसाहेब ताठे, श्री. भागवत कराड
अनुमोदक : श्री राजु शिंदे, श्री. भगावन घडामोडे
श्री. आनंद तांदुळवाडीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-११ स्मशान भुमीस मुक्तीधाम स्मशान भुमी नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२३/१८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,औरंगाबाद शहरातील चंपा चौक हा वर्दळीचा भाग असुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे आणि जालना रोडकउे जाण्यासाठी १०० फुटी रस्ता देखील तयार करण्यात आलेला आहे. या ठिकाणी मनपा तर्फे वाहतुक बेट देखील तयार करण्यात आले आहे. चंपा चौक हा मोठा सर्कल असुन सामान्य पथदिवे लावल्यामुळे हया

रस्त्यावर पुरेशा प्रमाणात प्रकाश पडत नाही. चौरस्ता प्रकाशाने उजळुन निघावा, १०० फुटी रस्त्याचे सौंदर्य वाढावे आपल्या भागात देखिल मनपातर्फे विकास कामे होत आहेत ही भावना सर्व सामान्य नागरिकांत रुजावी या करिता चंपा चौक भागात हायमास्ट लाईट बसविण्यात यावा. करिता सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुरीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.

सुचक : श्रीमती सिद्यीकी नईम सुलताना, श्री. काशिनाथ कोकाटे
अनुमोदक : श्री. मीर हिदायत अली, श्री. जावेद कुरैशी,
श्री. तकी हसनखान, श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चंपा चौक येथे हायमास्ट लाईट बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२४/१९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,सध्या महानगरपालिका अस्थापनेवर दैनिक वेतन कर्मचारी घेणे आवश्य आहे. महानगरपालिकेतील दैनंदिन कामे वेळेवर होणेच्या दृष्टीने दैनिक वेतनावर कर्मचाऱ्यांची भरती करणे योग्य वाटते.

तरी औरंगाबाद महानगरपालिका आस्थपनेवर दैनिक वेतन कर्मचाऱ्याची भरती करणेबाबतचा प्रस्ताव ऐनवेळी मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. नंदकुमार घोडेले
अनुमोदक : श्री. आनंद तांदुळवाडीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका अस्थापनेवर दैनिक वेतन कर्मचाऱ्याची भरती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२५/२० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,विविध परिसरातील स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार खाली ठिकाणी हायमास्ट बसविण्यात यावा.

१) श्री. चक्रधर स्वामी चौक २) पीर बाजार ३) निजामउद्योन चौक ४) किराडपुरा (वार्ड क्र. ७२) ५) शहानुरमियाँ दर्गाचौक ६) गारखेडा चौक ७) बाळासाहेब चौक हायमास्ट साठी ठेवण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदी मध्ये निविदा कमी दराने गेल्यामुळे बचत झालेल्या रक्कमेतुन सदरील खर्चास मंजुरी देण्यात यावी करिता प्रस्ताव मंजुरीस्वत सादर.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर
अनुमोदक : श्री. अफसर खॉन यासीन खॉन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अनु क्रमांक १ ते ७ दर्शविलेल्या ठिकाणी हायमास्ट बसविण्यास व हायमास्टच्या निविदा कमी दराने गेल्यामुळे बचत झालेल्या रकमेतुन सदरील काम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२६/२१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहराची विकास योजना १९७५ ची सुधारित करतांना १९९५ साली आरक्षण मांडणी करतांना शहराच्या अस्तित्वातील असलेल्या जमीन वापराचा विचार न करता आरक्षणे ठेवली आहेत असे दिसते. या आरक्षणाचा विकास करण्यासाठी प्रथम आरक्षणाचा जागा महानगरपालिकेस संपादन कराव्या लागतील व त्यानंतर त्या विकसीत कराव्या लागतील. हयास लागणारा खर्च महानगरपालिकेस करणे शकय होईल का? हयाचा विचार न करता आरक्षणे ठेवली आहेत असे दिसते. औरंगाबाद शहराच्या पन्नालाल नगर भागात आरक्षण क्र. ३०७ हे गार्डन साठी आरक्षीत ठेवलेले आहे. हयाचे क्षेत्र पाहता गार्डन म्हणुन हया आरक्षणाचा वापर होईल असे वाटत नाही. कारण लगतच स्मशानभुमी आहे. सर्व बाजुने रस्ते आहेत त्याच भागात १०० मीटरवर महापालिकेची गार्डन ची जागा आहे. व ती महानगरपालिकेच्या ताब्यात आहे तरी ही आरक्षण क्र. ३०७ ही बागेची जागा आरक्षणातुन वगळुन निवास क्षेत्रात सामाविष्ट करणे आवश्यक आहे. तरी त्यासाठी आवश्यक ती मुंबई प्रांतिक व नगररचनाचे अधिनियम १९६६ चे कलम ३७ ची कार्यवाही करुन आरक्षण वगळण्याची कार्यवाही करुन आरक्षण वगळावे व जागा निवास क्षेत्रात सामाविष्ट करावी ही सर्व कार्यवाही करणेची हरकती सुचना घेऊन शासनास मान्यतेस्तव देण्याचे अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका यांना देण्यात यावेत. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री. जगदिश सिध्द
अनुमोदक : श्री. आनंद तांदुळवाडीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आरक्षण क्र. ३०७ ही बागेची जागा आरक्षणातुन वगळुन निवास क्षेत्रात सामाविष्ट करुन त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेर बदलाची कार्यवाही करण्यास आणि सदर कार्यवाही करण्यासाठी जसे हरकती सुचना मागवुन सुनावणी देणे व परिपुर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याचे अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२७/२२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, संजयनगर वार्ड क्र. १२ येथे राष्ट्रमाता इंदिरा गांधी यांचा पुतळा उभारण्यात आला परंतु त्या पुतळयाचे तोंड उत्तरेला आहे ते पुर्व दिशेला करुन नियोजीत जागेवर ( मध्यावर) घेण्यात यावे करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ. लिलावती धायातिलक
अनुमोदक : श्री. मोतीलाल जगताप, श्री. किशोर शिंदे,
श्री. भगवान रगडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १२ संजयनगर येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी यांचा पुतळा पुर्व दिशेला नियोजीत जागेवर ( मध्यावर) घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२८/२३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शहरातील बि-बियाणे, शेती औषधी व रासायनिक खते विक्रेते या व्यापाऱ्यांनी विनंती केली आहे की, त्यांच्या आयातीतील माल हा १००% ग्रामीण भागात उपभोगात येतो व या सर्व मालाचा शेतीसाठी उपयोग केल जातो.

केंद्र शासनातर्फे व राज्य शासनातर्फे शेतकऱ्यासाठी विविध लाभार्थी योजना अंमलात आणल्या आहेत. त्या अनुषंगाने शेतकऱ्यांना लाभ मिळावा यासाठी सध्या आकारण्यात येणारी २% जकात ऐवजी शेती औषधी २ रु प्रती (बॉक्स) बि,बियाणे २ रु. प्रति क्विटल, रासायनिक खते २ रु प्रति टन आकारण्यात यावे, जेणे करुन शेतकऱ्यांना मदत होऊन महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढेल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. राधाकृष्ण गायकवाड
अनुमोदक : श्री. आनंद तांदुळवाडीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील बि-बियाणे, शेती औषधी व रासायनिक खते या मालावर सध्या आकरण्यांत येणारी २% जकात ऐवजी शेती औषधी २ रु प्रती (बॉक्स) बि,बियाणे २ रु. प्रति क्विटल, रासायनिक खते २ रु प्रति टन आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२९/२४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरातील स्थानिक व्यापाऱ्यांनी निवेदनाव्दारे विनंती केली. आहे की, शहरात येणाऱ्या शेतकी उपयोगी मशीनरी व त्यास लागणाऱ्या पुरक साहित्य जसे इले, मोटार पंपरोट, स्टार्टर, केबल, वाय इले. स्पेअर्स जी.आर.व पी.व्ही.सी. पाईप त्यास लागणारे पुरक साहित्य मळणी यंत्र, औषध फवारणीचे यंत्र त्यांचे साहित्य, ऑईल इंजिन स्पेअर्स व त्यास लागणारे पुरक साहित्य इत्यादी वस्तुंना सध्या महानगरपालिकेतर्फे २.५% (अडीच टक्के) जकात वसुल करण्यात येते. शहरा जवळील तालुका व इतर ग्रामीण भागामध्ये जकात कर रद्द झाल्यामुळे शहरा बाहेरील व्यापारी सदरील वस्तु शेतकऱ्यांना स्वस्त दरात देत असल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी बंधु बाहेरुन साहित्य खरेदी करण्यास इच्छुक झाले आहे. कारण त्यांना प्रवासी भाडे वाढ झाल्यामुळे जास्त लागते तसेच जकात कर सदरील वस्तुवर लागल्यामुळे जकात कर भरावे लागते. त्यामुळे वस्तुची किंमत त्यांना वाढुन मोजावी लागतो.

करिता शेतकी उपयोगी मशीनरी व त्यास लागणाऱ्या पुरक साहित्य वरील जकात कर अडीच टक्के वर १.५% दिड करण्यात यावा. जेणे करुन शहरा बाहेर जाणारा माल शहरात येईल व त्या माध्यमातुन महानगरपालिकेचे उत्पन्नात भर पडेल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. भरत श्रीपती लकडे

अनुमोदक : श्री. जगदिश कन्हैय्यालाल सिध्द

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरात येणाऱ्या शेतकी उपयोगी मशीनरी व त्यास लागणाऱ्या पुरक साहित्य जसे इले. मोटार पंपसेट, स्टार्टर, केबल, वाय इले. स्पेअरी, जी.आय.व पि.व्ही. पाईप त्यास लागणारे पुरक साहित्य, मळणी यंत्र, औषध फवारणीचे यंत्र त्यांचे साहित्य ऑईल इंजिन स्पेअर्स व त्यास लागणारे पुरक साहित्य, इत्यादी वस्तुंना सध्या महानगरपालिकेतर्फे आकारण्यात येणारी २.५ (अडीच टक्के) जकात ही १.५ (दिड टक्के) करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# "प्रश्नोत्तर "

मा.श्री. अब्दुल कदीर (मौलाना) सय्यद,
नगरसेवक (प्राप्त दि. ०९-१०-२००२)

प्रश्न क्र. ८९ : आर्थिक वर्ष २००० ते वर्ष २००२-२००३ पर्यंत लागणाऱ्या रोपे, जाळयासाठी किती अर्थसंकल्पीय तरतुद करण्यांत आलेली आहे? किती रोपे, जाळया (Tree Giard) खरेदी करण्यात आल्या? किती रोपे-जाळया लावण्यात आली? कोण कोणत्या ठिकाणी (सार्वजनिक रस्ते) विकसीत उद्यान, प्रस्तावित उद्यान तपशीलवर) लावण्यात आले? लावण्यात आले? सविस्तर आकडेवारी सहित वर्षनिहाय माहिती येत्या सर्व साधारण सभेत द्यावी.

उत्तर : सोबत जोडण्यात आलेले आहे.

प्रश्न क्र. ९० : आर्थिक वर्ष २००० ते २००२-२००३ पर्यंत इमारती बांधकाम देखभाल दुरुस्ती, साठी किती अर्थ संकल्पीय तरतुद करण्यात आलेली आहे? त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आली?शिल्लक किती? सदील निधीचा वापर कुढे? किती? आणि कशासाठी? वर्षनिहाय तपशीलवार आकडेवारी सहित सविस्तर माहिती येत्या सर्वसाधारण सभेत देण्यात यावी.

उत्तर : सोबत जोडण्यात आलेले आहे.

प्रश्न क्र. ९१ : आर्थिक वर्ष २००२-२००३ मध्ये जलनि:सारण देखभाली दुरुस्तीसाठी अर्थ संकल्पीय तरतुद किती? त्यापैकी झोन क्र. ३ मध्ये वापरलेली निधी किती शिल्लक किती? आपरुटींग किती? मेन होल दुरुस्ती किती? नविन मेन होल किती? नविन जलनि:सारण वाहिनीची लांबी किती? (मीटर मध्ये प्रभाग निहाय आकडेवारी सहित सविस्तर माहिती येत्या सर्वसाधारण सभेत देण्यांत यावी.

उत्तर : १) सन २००२-२००३ मध्ये जलनि:सारण देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध आर्थिक तरतुद रु. १६० लाख २) झोन क्र. ३ ची तरतुद अ) स्पील ओव्हर रु. ३.४६ लाख, (ब) नविन कामे रु. ५२ लाख क) शिल्लक तरतुद निरंक

| | | |
|---|---|---|
| ३) | प्रभाग निहाय आकडेवारी अप्तुटींग किती, मेनहोल दुरुस्ती | - अंदाजपत्रकात तरतुद केल्याप्रमाणे |
| | किती व नविन मेनहोल किती, नविन | - प्रमाणकात व |

| | | |
|---|---|---|
| | जलनिःसारण | आवश्यकते नुसार |
| | वाहिनीची लांबी किती. | |

प्रश्न क्र. ९२ : आर्थिक वर्ष २००२-२००३ मध्ये स्लम देखभाल, दुरुस्तीसाठी अर्थसंकल्पीय तरतुद किती? त्यापैकी झोन क्र. ३ मध्ये वापरलेली निधी किती? शिल्लक किती? कुठे? कशासाठी? प्रभाग निहाय आकडेवारी सहित सविस्तर माहिती येत्या सर्वसाधारण सभेत देण्यांत यावी.

उत्तर : सोबत जोडण्यात आलले आहे.

**महानगरपालिका औरंगाबाद**

**<u>उद्यान विभाग</u>**

**ही गार्ड व वृक्षारोपन संबंधी माहिती सन २००० ते २००३.**

| अ. क्र. | अर्थसंकल्पीय वर्ष | ट्रिगार्ड व वृक्षारोपन करिता अर्थसंकल्पीय तरतुद | ट्रिगार्ड संख्या/अंदाजपत्रकीय रक्कम | | रौपे खरेदी | वृक्षारोनन संबंधी खर्च | एकुण रुपये लक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९९९-२००२<br>२०००-२००१ | ५.०० (लक्ष) | ४२७<br>५७३ | १.९८(लक्ष)<br>२.६७(लक्ष) | २३, ५०० पॉलीथिन बॅग खरेदी (सिदार्थ उद्यावात तयार करण्यात आलेली रोपे १०,०००/- | ११,३७३/- | ३.०१ (लक्ष) |
| २. | २००१-२००२ | १२.५०(लक्ष) | २४०० | ९.३३(लक्ष) | १५,०००/- रोपे | ६७,१५६/- | १०.०१ (लक्ष) |
| ३. | २००२-२००३ | ८.००(लक्ष) | १००० | ४.९०(लक्ष) | २०,०००/- रोपे च्या निविदा मंजुरी देण्यात आली आहे. | ४८,०७३/-<br>५३५६/- | ५.३८ (लक्ष) |

स्वाक्षरीत/-
शहर अभियंता
महानगरपालिका, औरंगाबाद.

**महानगरपालिका औरंगाबाद**

**वृक्षारोपन अहवाल-२००२-२००३**

**गोषवारा**

| अ. | महिना वर्ष | रस्त्याच्या | रिकाम्या | उद्याने | स्मशानभुमी | रस्ता | शाळा | संस्था | वार्डामध्ये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| क्र. | | दुतर्फा | जागा | | | दुभाजन | | कार्यालय | ट्रि गार्ड | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २०००-०१ | ८१४ | २२५२ | ९१० | २९० | २५२५ | ११६ | -- | ७७० | ७५८० |
| २. | २००१-०२ | २१० | ५०५ | ७६० | २५० | १४५५ | -- | १४४० | १३२९ | ५३५६ |
| ३. | २००२-०३ | १५३८ | १९१८ | २५६२ | ९९६ | ३७४० | ४२१ | ५०७८ | २३० | १६०८३ |

## महानगरपालिका औरंगाबाद
## (उद्यान विभाग)
## शहरामध्ये वृक्षारोपणासाठी लावण्यात आलेली ट्रि गार्ड २००० ते २००१

| दिनांक | ठिकाण | ट्रिगार्ड संख्या | दिनांक | ठिकाण | ट्रि गार्ड संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ११.०५.२००० | पोलिस मुख्य कार्यालय, औरंगाबाद | १५ | १७.०६.२००० | कलश मंगल कार्यालय, उस्मानपुरा | १० |
| ११.०५.२००० | मा. श्री. शिंदे नगरसेवक बेगमपुरा | ०५ | १८.०६.२००० | जया विश्वभारती कॉलनी | १५ |
| ०२.०.२००० | प्रदुषण नियंत्रण कार्यालय, चिकलठाणा | ०६ | १८.०६.२००० | शहानुरवाडी | १० |
| ०४.०६.२००० | अजबनगर | १४ | १९.०६.२००० | समर्थनगर हॉटेल कार्तिकी ते सिल्लीखाना ते निराला बाजार रोड | ३८ |
| ०८.०६.२००० | ज्योती नगर | १२ | १९.०६.२००० | हनुमान मंदिर विश्वभारती कॉलनी | ०७ |
| ०८.०६.२००० | सिटी क्लब | ०७ | २१.०६.२००० | ज्ञोनश्वर विद्यालय, बेगमपुरा | १४ |
| ०९.०६.२००० | ज्योती नगर | ०६ | २१.०६.२००० | सौनिक शाळा, कांचनवाडी | १४ |
| १३.०६.२००० | हॉटेल इरा समर्थनगर | ०४ | २१.०७.२००० | नाथ पुरम कांचनाडी | १० |
| १३.०६.२००० | श्री. जाधव सरकार बॅकेच्या पाठीमागे | ०२ | २३.०६.२००० | न्यु उस्मानपुरा, औरंगाबाद | २५ |
| १३.०६.२००० | श्री. सुनिता रामभाऊ कुलकर्णी, चिकलठाणा | ०२ | २६.०६.२००० | मा. श्री सलीम पटेल नगरसेवक | १० |
| १६.०६.२००० | अजबनगर | ०१ | २८.०६.२००० | शेख ईसाक शेख सादोद्दीन, नगरसेवक | १२ |
| १६.०६.२००० | शंकरनगर, विटखेडा | २० | २९.०६.२००० | मा.श्री. गाजी सादोद्दीन, नगरसेवक | ०६ |
| १६.०६.२००० | मा. श्री. कुमावत नगरसेवक | १४ | २९.०६.२००० | कला हौसिंग सोसायटी बेगमपुरा | ०६ |
| १६.०६.२००० | बन्सीलालनगर सांस्कृतिक सभागृह समोर | ०८ | ३०.०६.२००० | मुख्य पोस्ट ऑफिस | ०४ |

:-

| दिनांक | ठिकाण | ट्रि गार्ड संस्था |
|---|---|---|
| ०१.०७.२००० | यशवंत कला महाविद्यालय, गारखेडा | ०५ |
| ०४.०७.२००० | भगवती कॉलनी | ०५ |
| ०४.०७.२००० | श्री. अरविंद धोंगड, विटखेडा | ०२ |
| १२.०७.२००० | डॉ. आशा दिनवडे, नगरसेविका, अशोकनगर | १० |
| १३.०७.२००० | मा. श्री. कैशरखॉन, नगरसेवक | २५ |
| १३.०७.२००० | राखवि पोलिस निरक्षक कार्यालय | १० |

| | | |
|---|---|---|
| १३.०७.२००० | श्री. व्हि.जी. स्वामी, एन-८ | १० |
| १४.०७.२००० | मा. श्री. शेख मुनाफ शेख यासीन, नगरसेवक | १२ |
| १८.०७.२००० | नेहरु भवन | ०७ |
| १८.०७.२००० | मा. सौ. साधना सुरडकर, नगरसेविका | १२ |
| २०.०७.२००० | वार्ड क्र. ७५, रोशनगेट | १२ |
| २०.०७.२००० | मोहुल उल्लुहिग स्कुल, सिल्कमिल कॉलनी | १० |
| २०.०७.२००० | सुभम सोसायाटी, झांबड | १२ |
| २२.०७.२००० | मा.श्री. केशरखान, नगरसेवक | १४ |
| ३१.०७.२००० | श्री. विष्णु वझे अजय पन्नालालनगर | ०२ |
| ०१.०८.२००० | मा. श्री. सुनिल वडागळे, नगरसेवक | १४ |
| १०.०८.२००० | मा.श्री. कैशरखान, नगरसेवक | १२ |
| ११.०८.२००० | मा. मिर हिदायत अली, नगरसेवक | १४ |
| १४.०८.२००० | श्री. के.पी. शेलीकर, उल्कानगरी, गारखेडा | १० |
| १४.०८.२००० | मा.श्री. अंबादास दानवे, सभागृह नेता | १२ |
| १६.०८.२००० | प्राथमिक आरोग्य केंद्र संजयनगर, मुकुंदवाडी | १४ |
| १६.०८.२००० | मुकुंदवाडी शाळा | १० |
| १८.०८.२००० | जनार्दन स्वामी मठ, हनुमान टेकडी | ०४ |
| १९.०८.२००० | श्री. पटेरीया, तिरुमाला कॉम्प्लेक्स | ०३ |
| २१.०८.२००० | डॉ. गोटे, जय नगर | १० |
| ०८.०३.२००१ | मा. श्री. बंडु ओक, नगरसेवक | ०६ |
| ०८.०३.२००१ | मा. श्री. फुलारी, नगरसेक, सिडको | ०६ |
| | एकुण | ५७३ |

स्वाक्षरीत/-
उद्यान अधिक्षक
महानगरपालिका,औरंगाबाद

## महानगरपालिका औरंगाबाद
## (उद्यान विभाग)
## शहरामधील वृक्षारोपनासाठी वापरण्यात आलेले ट्रिगार्ड सन २००१-२००२

| दिनांक | ठिकाण | ट्रिगार्ड संख्या | दिनांक | ठिकाण | ट्रि गार्ड संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०२.०६.२००१ | मा.श्री. वाणी नगरसेवक, पडेगांव | ०५ | २४.०७.२००१ | ज्ञानेश्वर विद्यामंदिर सिडको | ०८ |
| ०५.०६.२००१ | गुलशनमहल समोर | २५ | २६.०७.२००१ | गुरु रामदास नगर, सुराणानगर | १४ |
| ०७.०६.२००१ | गरम पाणी मोहल्ला | ०४ | २७.०७.२००१ | सुरणा नगर | १४ |
| ०७.०६.२००१ | खडकेश्वर | ०४ | ३०.०७.२००१ | नेहरु नगर, किराडपुरा | १५ |
| ०७.०६.२००१ | जुब्ली पार्क शाळा | ०५ | ३०.०७.२००१ | मुकुंदवाडी स्मशान भुमी | १० |
| ०३.०६.२००१ | संभाजीनगर(सासायटी, पहाडसिंगपुरा) | ०८ | ३१.०७.२००१ | केंद्रिय प्रा.शाळा, एन-९, सिडको | १५ |
| १६.०७.२००१ | पार्वती कन्या विद्यालय | १४ | ०१.०८.२००१ | मा.सौ. विजया रहाटकर, नगरसेविका | १५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६.०७.२००१ | जवाहर कॉलनी ब्दारा डॉ. आशा बिनवडे, नगरसेविका | १४ | ०१.०८.२००१ | तळेश्वर कॉलनी, बेगमपुरा | १४ |
| १६.०७.२००१ | डिग्रस रेखा, नाथ सोसायटी/कांचनवाडी | ०४ | ०१.०८.२००१ | एकनाथनगर, उस्मानपुरा | ०६ |
| १६.०७.२००१ | कांचनवाडी | १० | ०१.०८.२००१ | संभाजी गृ. सो. पहाडसिंगपुरा | २० |
| १७.०७.२००१ | खोकडपुरा | १० | ०४.०८.२००१ | अजबनगर | १० |
| १८.०७.२००१ | रहेमानिया कॉलनी | १४ | ०६.०८.२००१ | संत एकनाथ सोसायटी आकाशवाणी समोर | ०८ |
| १८.०७.२००१ | मा. श्री.सलीम पटेल, नगरसेवक, वार्ड क्र. ७६ | १४ | १३.०८.२००१ | अराफत कब्रस्तान | ०५ |
| १८.०७.२००१ | हनुमान नगर गारखेडा | १४ | १३.०८.२००१ | श्री. पानझडे साहेब | ०५ |
| १८.०७.२००१ | तळेश्वर मंदिर बेगमपुरा | १४ | १३.०८.२००१ | मा.श्री. कोकाटे साहेब (विरोधी पक्षनेता) | १० |
| १९.०७.२००१ | विश्वभारती कॉलनी | १५ | १३.०८.२००१ | मा.श्रीमती मोरे नगरसेविका, एन-९ सिडको | १० |
| १९.०७.२००१ | धर्मवीर संभाजी माध्यमिक विद्यालय, सिडको | १५ | १४.०८.२००१ | सिटी क्लब ते डॉ. आंबेडकर रिसर्च | १२ |
| १९.०७.२००१ | विद्याविहार सोसायटी, पहाडसिंगपुरा | १५ | १४.०८.२००१ | वरद गणेश मंदिर समोर, समर्थनगर | ०१ |
| २०.०७.२००१ | सर्व शाळा, पडेगांव | १५ | १४.०८.२००१ | अराफ मस्जीद | ०५ |
| २०.०७.२००१ | विजली नगर, उस्मानपुरा | १४ | १४.०८.२००१ | कोठला पाणी टाकी | ०२ |
| २१.०७.२००१ | जनार्धन स्वामी मठ, हनुमान टेकडी | ०५ | १४.०८.२००१ | श्री. पानझडे सिडको | ०५ |
| २१.०७.२००१ | श्री.स्वामी समर्थ कम्युनिकेशन बळीराम पाटील | १५ | २८.०८.२००१ | मा.श्री. शेख इलियास किरमाणी, नगरसेवक | १० |
| २१.०७.२००१ | नॅशनल इंटीग्रेशन इग्लिंश हायस्कुल गणेश कॉलनी | १० | २८.०८.२००१ | छावणी बाजार, | ०५ |
| २१.०७.२००१ | मा. श्री. इसाक अंडेवाला, नगरसेवक | १५ | २८.०८.२००१ | मा.श्री. कोकाटे साहेब, नगरसेवक | १० |
| २३.०७.२००१ | शिवमंदिर उस्मानपुरा | १४ | २८.०८.२००१ | श्री. अन्वरखान बिड बायपास | १० |
| २४.०७.२००१ | शिवनेरी नगर, गारखेडा | ०४ | २८.०८.२००१ | समतानगर सो. कांचनवाडी | १० |

:-

| दिनांक | ठिकाण | ट्रिगार्ड संख्या | दिनांक | ठिकाण | ट्रि गार्ड संख्या |
|---|---|---|---|---|---|
| २८.०८.२००१ | अजबनगर | १० | २१.०९.२००१ | मा.श्रीमती चंद्रात्रे, नगरसेविका | १० |
| २९.०८.२००१ | कैलासनगर | ०६ | २१.०९.२००१ | सौ.बोर्ड झांबड इस्टेट | १० |
| ३१.०८.२००१ | भवानीनगर | ०८ | २२.०९.२००१ | मा.श्री. कैसरखान नगरसेवक | १० |
| ०३.०९.२००१ | मा.श्रीमती.नुसरत बानो, नगरसेविका | १५ | २२.०९.२००१ | मा.श्री. इसाकर झैन्धीन नगरसेवक | १० |
| ०४.०९.२००१ | जयदुर्गा स. संस्था, गारखेडा | ०८ | २४.०९.२००१ | मा.श्री. पांडुरंग तायडे, नगरसेवक | १० |
| ०४.०९.२००१ | विठ्ठल रुखमाई मंदिर, ज्योतीनगर | ०६ | २५.०९.२००१ | मा.श्री. जयवंत बंडु ओक, नगरसेवक | १२ |
| ०४.०९.२००१ | श्री.अनिल लिला बन्सीलालनगर | ०६ | २५.०९.२००१ | मा.श्री.काझी गयासुद्याम | १० |
| ०४.०९.२००१ | श्रीमती सुलताना बेगम | १० | २५.०९.२००१ | मा.श्री.देसरडा सभापती | ०८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | नगरसेविका | | | | |
| ०५.०९.२००१ | साईनगर सिडको | १८ | २७.०९.२००१ | मा.सय्यद महाविद्यालये रोशनगेट | १० |
| ०७.०९.२००१ | मा.श्री. पांडुरंग पाटील नगरसेवक | १५ | २७.०९.२००१ | किराडपुरा मनपा शाळा | ०८ |
| ०८.०९.२००१ | श्री. गौतम संचेती समर्थनगर | ०५ | २८.०९.२००१ | सुरणानगर नविन पहाडसिंगपुरा | १८ |
| ११.०९.२००१ | मा.श्री. किशोर शिंदे, नगरसेवक | ०६ | २८.०९.२००१ | मा.श्री. महादेव सुर्यवंशी नगरसेवक | १० |
| ११.०९.२००१ | राजनगर | ०५ | ०१.१०.२००१ | मा.श्रीमती, रहाटकर नगरसेविका | १४ |
| १२.०९.२००१ | श्री.व्ही.बी.पवार, नेहरुनगर भावसिंगपुरा | १२ | ०१.१०.२००१ | क्रांतीचौक रोड | ०६ |
| १२.०९.२००१ | श्री. अनिल लिला बन्सीलालनगर | ०६ | ०३.१०.२००१ | बसस्टॅण्ड बाजु(औ.बाद) | ४५ |
| १२.०९.२००१ | हॉटेल सफर बसस्टॅण्ड | ०६ | ०३.१०.२००१ | श्री. अनिल लीला बन्सीलाल नगर | ०४ |
| १२.०९.२००१ | मा.श्रीमती साजेदा बेगम, नगरसेविका | ०७ | ०३.१०.२००१ | श्री. पटेल बन्सीलालनगर | ०४ |
| १२.०९.२००१ | विद्याविहार सो.पहाडसिंगपुरा | ०८ | ०५.१०.२००१ | मा.श्री. बाळासाहेब थोरात, नगरसेवक | १५ |
| १४.०९.२००१ | मा.श्री. अविनाश कुमावत, नगरसेवक | १५ | ०५.१०.२००१ | नाथपुम गृ.नि.सो.कांचवाडी | १५ |
| १५.०९.२००१ | वेदांत नगर | १८ | ०५.१०.२००१ | शांतीलालजी मोतीलालजी देसरडा | १८ |
| १८.०९.२००१ | अलुहदा उर्दु प्रा.रेल्वेस्टेशन | १५ | ०६.१०.२००१ | मा. श्रीमती साजेदा बेगम नगरसेविका | ०५ |
| १८.०९.२००१ | श्री. चंद्रशेखर शांताराम पाटील एकनाथनगर | ०२ | ०८.१०.२००१ | अग्निशामक दल पदमपुरा | १२ |
| १८.०९.२००१ | अदित्यनगर, गारखेडा | १२ | ०८.१०.२००१ | श्री.खुंगर स्वि.सदस्य,उस्मानपुरा | ०४ |
| २०.०९.२००१ | टिळकनगर, विश्वभारती कॉलनी | १८ | ०८.१०.२००१ | सौ. किरण शर्मा, समर्थनगर | ०४ |
| २०.०९.२००१ | सिटी क्लब रोड | १८ | ०८.१०.२००१ | बुध्द विहार, कैलासनगर | ०५ |
| २१.०९.२००१ | मा.श्री. बाळासाहेब थोरात | १० | ०८.१०.२००१ | श्री.शांतिलाल मोतिलाल देसरडा श्रीनीकेतन कॉ. | १३ |
| २१.०९.२००१ | मा.श्री.औताडे, नगरसेवक | १० | ०९.१०.२००१ | पदमपुरा ते रेल्वेस्टेशन रोड | २२ |
| २१.०९.२००१ | मा.श्री. शिंदे नगरसेवक | ०४ | ०९.१०.२००१ | स्विंवसरा पार्क गारखेडा | ११ |

| दिनांक | ठिकाण | ट्रिगार्ड संख्या | दिनांक | ठिकाण | ट्रि गार्ड संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १०.१०.२००१ | अजबनगर समाधान कॉलनी | ११ | ३१.१२.२००१ | राजे संभाजी भोसले सौनिक शा.कांचनवाडी | १५ |
| ११.१०.२००१ | अजबनगर | ११ | ०७.१.२००२ | मा.श्री. इलियास किरमाणी नगरसेवक | १० |
| १२.१०.२००१ | ज्योतीनगर | ०४ | १०.१.२००२ | पडेगांव कत्तलखान रोड | १८ |
| १२.१०.२००१ | राहुलनगर, रेल्वेस्टेशन | १८ | ११.१.२००२ | ॲन्टी करॅपशन ब्युरो, जुनाबाजार | ०१ |
| १२.१०.२००१ | श्री.आ.वि. पाटील गारखेडा | १५ | १५.१.२००२ | मा.श्री. नंदकुमार फुलारी नगरसेवक | १२ |
| १३.१०.२००१ | श्री. गौतम संचेती समर्थनगर | ०५ | १६.१.२००२ | मा.श्री.संजय शिरसाठ, नगरसेवक | १८ |
| १७.१०.२००१ | मा. श्रीमती, नुसरत बानो, नगरसेविका | १० | १६.१.२००२ | श्री. गिते साहेब आदित्यनगर | ०७ |
| १८.१०.२००१ | देवी मंदिर हर्सुल | १० | १६.१.२००२ | मा.श्री. जयवंत बंडु ओक, नगरसेवक | ०४ |
| १८.१०.२००१ | मा.श्रीमती सलमाबानो | १५ | १९.१.२००२ | मा.श्री. घोडेले नगरसेवक, | १८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रोशनगेट | | | नक्षत्रवाडी | |
| १९.१०.२००१ | मा. श्री. मिर हिदायत अली नगरसेवक | १० | १९.१.२००२ | सौ. चव्हाण बनिशा कॉलनी | ०४ |
| २०.१०.२००१ | म्हाडा कॉ. बाबा पेट्रोल पंप | ०८ | २१.१.२००२ | ॲन्टी करपशन ब्युरो कार्यालय, जुनाबाजार | ०१ |
| ३१.१०.२००१ | फायर स्टेशन चिकलठाणा | ०९ | २२.१.२००२ | | ०४ |
| ०७.११.२००१ | मा. श्री. शकील पटेल, नगरसेवक गारखेडा | १६ | २३.१.२००२ | समर्थ नगर ते औरंगपुरा रोड | ३६ |
| ०७.११.२००१ | मा.श्री. माणिक साळवे. | १६ | २६.१.२००२ | वसंतदादा पाटील शाळा मुकुंदवाडी | १० |
| ०७.११.२००१ | हिदुस्तान आवास समुह नक्षत्रवाडी | १६ | २६.१.२००२ | मा.श्रीमती विजया रहाटकर | १० |
| ०८.११.२००१ | विज्ञान वर्धिनी शाळा रोकडा कॉलनी | १२ | २६.१.२००२ | बन्सीलाल नगर वार्ड | १६ |
| ०९.११.२००१ | कैलासनगर | ०८ | ०८.२.२००२ | श्री.डी.एम. चौधरी, प्राचार्य भुमी अभिलेखा | ०४ |
| ०९.११.२००१ | मा.श्री. मोतीलाल जगताप नगरसेवक | १४ | २६.२.२००२ | श्री. सुभाष कागडा, बन्सीलालनगर | ०५ |
| १४.११.२००१ | श्री. जावरे साहेब | ०३ | ०२.३.२००२ | आयोध्यानगर ग्रॉऊड | १० |
| ०७.१२.२००१ | सतपाल नगर, न्यु पहाडसिंगपुरा | १० | ०५.३.२००२ | श्री. नामदेवराव पवार सुरणा नगर | १० |
| ११.१२.२००१ | दिशा नथांगण एम-२, सिडको | १० | १३.३.२००२ | श्री. भुसारी एस.पी. रावा नगर | ०४ |
| १३.१२.२००१ | तळेश्वर मंदिर, बेगमपुरा | १२ | १३.३.२००२ | श्री. केंद्र आर.एस.एन-२ सिडको | १० |
| १९.१२.२००१ | मा.सौ. साधना सुरडकर | १० | १८.३.२००२ | सहयोग कॉलनी, गारखेडा | ०४ |
| १९.१२.२००१ | सौ. शर्मा समर्थनगर | १० | १८.३.२००२ | श्री. सुनिल लोखंडे, गजानन कॉलनी गारखेडा | ०४ |
| २०.१२.२००१ | श्रीमती रहाटकर नगरसेविका | १० | २१.३.२००२ | श्रीमती. रेखा गंगवाल एन-३ सिडको. | ०८ |
| २५.१२.२००१ | शोतु संस्था, सिल्लीखान | १२ | | | |
| २५.१२.२००१ | वेदांतनगर | १८ | | | |
| २६.१२.२००१ | निपटनिरंजन | १५ | | | |

स्वाक्षरीत/-
उद्यान अधिक्षक
महानगरपालिका, औरंगाबाद

## महानगरपालिका, औरंगाबाद
## (उद्यान विभाग)
## शहरामध्ये वृक्षारोपणासाठी लावण्यात आलेली ट्रिगार्ड इस. २००२-२००३

| दिनांक | ठिकाण | ट्रिगार्ड संख्या | दिनांक | ठिकाण | ट्रि गार्ड संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०७.४.२००२ | श्री.एस.आर. शा.वि.निकेतन कॉ. | १५ | ७.७.२००२ | महायोगी स्वामी मच्छीद्रनाथ मंदिर मिटमिटा | १५ |
| १२.४.२००२ | श्री. एस.व्ही.चव्हाण | १० | ७.७.२००२ | श्री.एस.आर.घन, ए २ राम सिता समर्थनगर | ०४ |
| १९.४.२००२ | श्री.पवार, इसावानगर गारखेडा | ०६ | ९.७.२००२ | टी.बी.हॉस्पीटल ते आरेफ कॉलनी | ३० |
| २५.४.२००२ | श्री.वी.डी.पैठण | ०२ | ९.७.२००२ | मा.श्री. सलीम पटेल नगरसेवक | १५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | तिरुपती विहार, गारखेडा | | | | |
| २५.४.२००२ | श्री. पवार गजानन नगर, गारखेडा | ०४ | १०.७.२००२ | अजबनगर | १८ |
| १९.५.२००२ | हॉटेल एरोला मिलकॉर्नर | ०१ | १२.७.२००२ | श्री.प्रा.सुनिल मगरे, नगरसेवक | २० |
| १०.६.२००२ | श्री.जावदे मुस्तफा प्लॉट नं. ८ एन-१२ डी | ०५ | १३.७.२००२ | श्री. दरबीरसिंग जबिंदा | १० |
| १०.६.२००२ | श्री. इक्तेखर प्लॉट नं. ३८ दिलरस कॉ. | ०५ | १६.७.२००२ | क्रांतीचौक ते सेवनव्हील रोड | ३० |
| १४.६.२००२ | सौ. संगिता बाळु मैंद नगरसेविका | ०८ | १७.७.२००२ | ज्योतीनगर | १० |
| १५.६.२००२ | श्री. मोहसीन पठाण, मोतीलाल नगर | १४ | १७.७.२००२ | मा.श्री. कोकाटे नगरसेवक | १८ |
| १९.६.२००२ | श्री. रामचरण टाफ गांधीनगर | ०५ | १८.७.२००२ | के.प्रा.शाळा मसनतपुर | ०५ |
| २०.६.२००२ | श्री. के.प्र.मुळे, ३४ प्रयाग चैतन्य हॉ.सो.गारखेडा | ०४ | १८.७.२००२ | डॉ.म.आ.सासवडे, न्यु श्रेयनगर | ०४ |
| २०.६.२००२ | श्री. किशोरलालजी धुत पद्मपुरा | ०४ | १९.७.२००२ | शहानुर मिया दर्गा ते बिडबायपास रोड | १५ |
| २१.६.२००२ | टी.बी. दवाखाना ते डॉ. आ. मनोरंजन उद्यान रोड | १५ | १९.७.२००२ | श्री. अनिल लुगीया समर्थनगर | ०३ |
| २४.६.२००२ | महावीर स्तंभ ते हॉटेल कार्तिकी | ०८ | १९.७.२००२ | मा. श्री. नंदकुमार फुलारी नगरसेवक | १० |
| २६.६.२००२ | महावीर स्तंभा बाजुला | १० | २०.७.२००२ | इंजिनिअरिंग कॉलेज रोड | १५ |
| २७.६.२००२ | पदमपुरा ते रेल्वेस्टेशन | ३६ | २०.७.२००२ | सौ. निवेदीता रमेश मगर कांचनवाडी | ०८ |
| २९.६.२००२ | श्री.रवि पट्टमवार, उस्मापुरा | ०३ | २०.७.२००२ | श्री. शेलोकर उल्कानगरी | ०४ |
| २९.६.२००२ | श्री. सोनवणे ॲडव्होकेट शाहुनगर | ०२ | २३.७.२००२ | दर्गा ते शिवाजीनगर व सुतगिरणी | ३० |
| ०३.७.२००२ | मा.श्री. संजय शिरसाठ, नगरसेवक | १५ | २४.७.२००२ | शहाबाजार स्मशानभुमी | ०८ |
| ०१.७.२००२ | मा.श्री. किशोर शिंदे, नगरसेवक | १५ | २६.७.२००२ | नवयुग कॉलनी पदमपुरा | १० |
| ०२.७.२००२ | औरंगाबाद लेणी रोड | १५ | ०१.८.२००२ | बन्सीलालनगर शाळा | १० |
| ०३.७.२००२ | बळीराम पाटील शाळा | १० | ०४.८.२००२ | एप्लॉमिट ते क्रांतीचौक पो.स्टे.रोड | १२ |
| ०५.७.२००२ | पडेगांव कत्तलखाना रोड | १५ | ०५.८.२००२ | मा.श्री. मिर हिदायतअली नगरसेवक | १० |
| ०६.७.२००२ | मा.श्री. किशोर शिंदे, नगरसेवक | १५ | ०६.८.२००२ | उच्च न्यायालय | १५ |
| | | | ०६.८.२००२ | सिधार्थ नगर सिडको | १० |

| दिनांक | ठिकाण | ट्रि गार्ड संस्था |
|---|---|---|
| १४.०८.२००२ | एन-११ सिडको | १० |
| १५.०८.२००२ | श्रीमती नुसरत बानो, नगरसेविका | १० |
| १६.०८.२००२ | श्रीमती जयश्री कुलकर्णी नगरसेविका | १० |
| २३.०८.२००२ | नागेश्वरवाडी, औरंगाबाद | ०५ |
| २३.०८.२००२ | डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा कांचवाडी | १० |
| २४.०८.२००२ | मा.श्री. देसरडा, नगरसेवक | १२ |
| २४.०८.२००२ | निरतर सोसायटी, पुंडलिकनगर | १० |

| | | |
|---|---|---|
| ०२.०९.२००२ | आरेफ कॉलनी | ०६ |
| १४.०९.२००२ | अजबनगर | ०५ |
| १७.०९.२००२ | देवानगरी | १० |
| २४.०९.२००२ | क्रांतीचौक ते सेव्हनव्हील रोड | १८ |
| | एकुण | ७४३ |

स्वाक्षरीत/-
उद्यान अधिक्षक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**"अ अभियंता (इमारती) विभाग"**

**आर्थिक वर्ष २०००-२००३ देखभाल दुरुस्ती या लेखा शिषेची माहिती**

| अ. क्र. | वर्ष | एकुण कामे | अंदाजपत्रकीय | झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | २०००-२००१ | ५६ | ४०.०० लक्ष | २२.०७ लक्ष |
| २. | २००१-२००२ | ७२ | ४०.०० लक्ष | ३६.३० लक्ष |
| ३. | २००२-२००३ | १५ | ६७.८४ लक्ष | ६.६८ लक्ष |

स्वाक्षरीत/-
शहरअभियंता
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
उप अभियंता (इमारती)
महानगरपालिका, औरंगाबाद.

**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद (स्लम-२)**

प्रश्न क्र. ४ : आर्थिक वर्ष २००२-२००३ मध्ये स्लम देखभाल दुरुस्ती अर्थ तरतुद किती? त्यापैकी झोन नं. ३ मध्ये वापरलेली किती? कुठे? कशासाठी? प्रभाग निहाय आकडेवारी संहित सविस्तर माहिती खालील प्रमाणे देण्यांत येत आहे.

टिप : देखाभाल व दुरुस्तीसाठी उपरोक्त अर्थसंकल्पात काम निहाय तरतुद न करता अशा अत्यावश्यक कामासाठी रु. ४०,००,००.०० (रु. चाळीस लाख) ची तरतुद असुन या शिर्ष अंतर्गत आता पर्यंत हाती घेण्यांत आलेल्या कामावर झालेला खर्च व इतर तपशिल खालील प्रमाणे तक्ता "अ" मध्ये देण्यांत येत असुन कॅपिटल खर्चाची तरतुद काम निहाय असल्याने झोन क्र-३ च्या हद्दी पर्यंतचा तपशिल तक्ता"ब" मध्ये देण्यांत येत आहे.

**तक्ता- "अ"**

**:: देखभाल व दुरुस्ती या लेखा शिर्षाची माहिती ::**

| अ. क्र. | वर्ष २००२-२००३ | अंदाजपत्रकात या शिर्षखाली केलेली तरतुद | अंदाजपत्रकिय रक्कम रु. | आतापर्यंत झालेला खर्च रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | २००२-२००३ | ४०,००,०००.०० (पुर्ण स्लम साठी) | २,६९,११३ | १,२२,६३९ | फक्त स्लम २ च्या हद्दी पर्यंत |

तक्ता "ब"

:: आर्थिक वर्ष २००२-२००३ काम निहाय आर्थिक तरतुद व इतर माहिती ::

(झोन नं ३ च्या हद्दीपर्यंत)

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाज पत्रकात बजट मधील तरतुद | अंदाजपत्रकीय रक्कम रु | निविदा रक्कम रु | % कमी/जास्त | कार्यादेश क्रमांक तारिख | कामाची मदुत | झाले खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संजय नगर स्लम येथे आर.सी.सी पुल तयार करुन बॉक्स बांधणे. | (हजारात) २६० | २,५९,०००/- | | ०.१ कमी | | ४ महिने | | मा. आयुक्त याच्याकडे संचिका पाठविण्यात आली. |
| २. | इंदिरानगर स्लम येथे खांडकी व क्रॉक्रीट रस्ता तयार करणे. | २०० | २,६३,२८५/- | २,५०,७४८/- | २७.०९/- कमी | १८-२-०२ | ४ महिने | | संबधीत गुत्तेदाराकडुन विलंब |
| ३. | इंदिरानगर स्लम येथे विविध गल्यात शहाबाद फरशी बसविणे. | ९९१ | ९,९०,६५२/- | ९,४३,४७८/- | ३४.५/- कमी | -- | ४ महिने | | -- |
| ४. | संजय नगर स्लम येथे क्रॉक्रीट रस्ता तयार करणे. | ०८५ | | | | | | | -- |
| ५. | इंदिरानगर बायजीपुरा येथे (स्लम) आर.आर.सी.सी. गटार बांधणे | ४९० | ९,६५,४६२/- | ९,१६,४८८/- | ६७ कमी | ३-१०-०२ | ६ महिने | ८२१३२२/- | काम पुर्ण |
| ६. | शाहबाजार स्लम येथे संरक्षित भिंत बांधणे व भिंतीची उंची वाढविणे | ६६७ | ६,६१,८७४/- | ६,३३,५५८/- | १९.२५% कमी | १८-५-०२ | सहा महिने | -- | वादीत |
| ७. | संजय नगर स्लम येथे जुनी गटार तोडुन नविन गटार बांधणे. | ८२५ | ११,८४,२५९/- | ११,२७,८६६/- | ३०.९६ % below | २८-५-०२ | ९ महिने | -- | |
| ८. | इंदिरानगर स्लम येथे रस्त्याचे पुर्नः डांबरीकरण करणे. | ६०० | ६७,०२३४/- | ५९६८३०/- | २४.९४ % कमी | -- | -- | -- | २% टक्काच भरलेली नाही. |
| ९. | गांधीनगर येथील सार्वजनिक शौचालयाचे सुलभ शौचालयात रुपांतर करणे. | ३१९ | -- | -- | -- | -- | -- | ३,४०,०००/- | काम पुर्ण झाले आहे. |
| | इंदिरानगर स्लम येथे उर्वरित | २०० | १३,२१,२१६/- | १२६७८२५/- | ३८.९१ % below | ४-२-२००० | ६ Mant | | श्री. बसैय्ये |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रस्त्याचे डांबरीकरण करणे. | | | | | | hs | | याच्यासह जागेच्या वाद कार्यवाही अंतर्गत |
| ११. | शहाबाजार येथे क्रॉक्रीट रस्ता तयार करणे.(स्लम) | १०० | | | | | | | |
| १२. | संजयनगर स्लम येथे पुर्न:डांबरीकरणे. | ५०० | ८५९३२६/- | | | | | | |
| १३. | इंदिरानगर स्लम येथे पुर्व:डांबरीकरण करणे. | ५०० | | | | | | | काम रद्द झालेले आहे. |
| १४. | शहाबाजार स्लम येथे शौचालय दुरुस्त करणे व इतर. | ०५० | | | | | | | |
| १५. | शाबाजार स्लम येथे शौचालय बांधणे. | २५० | | | | | | | |
| | Total | ६०.३७ | | | | | | ११.६१ | |

स्वाक्षरीत/-
उप अभियंता स्लम-२
महानगरपालिका, औरंगाबाद.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.